VOLUME 6 ISSUE 1 JANUARY 2021

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# MODLIB E-Bulletin of Library and Information Centre

## Valedictory Function of Golden Jubilee Celebrations















**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.
**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.
**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable
**Website :** http://www.mcasclib.com/ ; **E-mail:** libraran@moderncollegepune.edu.in

# Table of Contents


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Moments of Golden Jubilee Valedictory Function | 4 - 13 |
| 2 | Newspaper Clippings on Golden Jubilee Valedictory Function | 14 - 36 |
| 3 | Congratulations to Honourable Prof.Dr.Gajanan Ekbote Sir and P.E.S Modern College of Pharmacy on Registration of Patent | 37 |
| 4 | Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam invited as Resource Person | 38 - 39 |
| 5 | Prof.Dr.Nivedita Ekbote Madam invited as Resource Person | 40 - 42 |
| 6 | Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam | 43 - 45 |
| 7 | Work of Appreciation: Prof. Dr. Nivedita Ekbote Madam | 46 |
| 8 | News related to P.E.Society | 47 - 49 |
| 9 | Guruvarya Late Shankarrao Kanitkar Smrutidin | 50 –53 |
| 10 | Republic Day Celebrations | 54 –55 |
| 11 | Visit of Best College Inspection Committee on 09.1.2021 | 56 - 58 |
| 12 | Declaration of Results | 59 - 63 |
| | - *Best College Award 2020-21* | 59 |
| | - *Best Teacher Award (Non-Professional Courses) 2020-21* | 59 |
| | - *Congratulations to MCASC, Pune-5 and Dr.Anjali Sardesai* | 60 |
| | - *In-house felicitations at the hands of Honourable Prof.Dr.Gajanan Ekbote Sir, Chairman, P.E.Society* | 61 - 62 |
| | - *Felicitation of Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir by Bank of Maharashtra, Modern College, Shivajinagar Branch* | 63 |
| 13 | Report of Institutional Repository@MCASC– January 2021 | 64 |
| 14 | Release of the Result Analysis 2017-19 and Progress Report | 65 |
| 15 | Events conducted by NSS | |
| | - *Swami Vivekanand Jayanti and Jijau Maa Saheb Jayanti* | 67 |
| | - *Republic Day Celebrations* | 68 |

## *Table of Contents*


| Sr.No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 16 | Events conducted in Library and Information Centre | |
| | - *Savitribai Phule Jayanti* | 69 - 70 |
| | - *Jijau Maa Saheb Jayanti and Swami Vivekanand Jayanti* | 71 |
| | - *Netaji Subhash Chandra Bose Jayanti* | 72 - 73 |
| 16 | Hutatma Din | 74 - 75 |
| 17 | Events conducted by Institution's Innovation Council and Modern Media Station | 77 - 79 |
| 18 | Events conducted by the Departments | |
| | - *Department of Marathi: मराठी भाषा संवर्धन पंधरवडा* | 81—84 |
| 19 | Faculty Members invited as Resource Persons | |
| | - *Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi* | 86 - 87 |
| 20 | Modern Achievements | |
| | - *Miss. Sukanya Aaru, SYBSc.* | 89 - 90 |
| | - *Miss. Afsha Kalimpasha Mashayak, 12th (2019-20)* | 91 - 93 |
| | - *Miss. Samiya Meher, SYBA* | 94 |
| | - *Miss. Tanaya Nalawade, SYBSc* | 95 - 97 |
| | - *Mr. Ravindra Shinde, FYBA* | 98 |
| 21 | Modern Alumni Achievement | |
| | - *Mr. Baban Minde, Alumni of Department of Marathi* | 99 |
| 22 | New Arrivals of Books | 100 |
| 23 | Newspaper Clippings | |
| | - *Related to MCASC (Autonomous), Pune-5* | 102 - 115 |
| | - *Education* | 116 - 212 |
| | - *Research* | 213 - 217 |
| | - *Miscellaneous* | 218 - 225 |
| 24 | Shraddhanjali | |
| | - *Prof. Jagdish Chinchore* Ex Vice Principal Junior College, MCASC Pune-5 | 226 - 228 |
| 25 | Upcoming Events | 229 |

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*



।।श्री।।
।।ज्ञानमयो भव।।
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
**मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)**
शिवाजीनगर, पुणे ५
(स्थापना : १५ जून १९७०)
**सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सांगता समारंभ**

**सस्नेह निमंत्रण**

• **दिनांक** •
मंगळवार,
दि. १९ जानेवारी २०२१

• **स्थळ** •
प्रो. ए. सोसायटीचे
सभागृह, मॉडर्न अभियांत्रिकी
महाविद्यालय आवार,
शिवाजीनगर, पुणे ५

• **वेळ** •
सकाळी ११.०० वाजता

सस्नेह नमस्कार,

प्रो. ए. सोसायटी संचालित मॉडर्न महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ
**श्री. भगत सिंह कोश्यारी** (माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य)
यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.
या कार्यक्रमास
**प्रा. डॉ. नितीन करमळकर** (माननीय कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)
उपस्थित राहणार आहेत. आपण या कार्यक्रमास उपस्थित राहून
संस्थेवरील प्रेम वृध्दिंगत करावे, ही विनंती.

आपले स्नेहांकित,
**प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे** (M.S., M.N.A.M.S.)
माननीय कार्याध्यक्ष, प्रो. ए. सोसायटी, पुणे ५

**प्रा. श्री. शामकांत देशमुख**
कार्यवाह, प्रो. ए. सोसायटी

**प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे**
सहकार्यवाह, प्रो. ए. सोसायटी
नगरसेविका व माजी अध्यक्षा,
महिला व बालकल्याण समिती पुणे मनपा

**प्रा. श्री. सुरेश तोडकर**
सहकार्यवाह, प्रो. ए. सोसायटी

**प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव**
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

आणि
**नियामक मंडळाचे सर्व सदस्य**








# Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021



## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*











# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*














## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

***Letter of Appreciation presented by Honourable Governor of Maharashtra Shri. Bhagat Singh Koshyari to Honourable Prof. Dr. Gajanan R. Ekbote Sir, Chairman, Progressive Education Society .***



**भगत सिंह कोश्यारी**
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

राज भवन
मलबार हील
मुंबई ४०० ०३५
दूरध्वनी : ०२२-२३६३ २६६०
फॅक्स : ०२२-२३६८ ०५०५
१९ जानेवारी २०२१

**प्रशस्ती पत्र**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ही संस्था व संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे हे एक चांगले समिकरण झाले आहे. डॉ एकबोटे यांना अध्यापन व शल्यचिकित्सक म्हणून चाळीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. बी. जे मेडिकल महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून ते आजही अतिशय निष्ठेने ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. आपल्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना वैद्यकीय शाखेचे ज्ञानदान केले आहे, ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू, वैद्यक विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता तसेच देशभरातील विविध शैक्षणिक संस्थांचे नामनिर्देशित सदस्य म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. संघटन कौशल्य, बुद्धिमत्ता तसेच शैक्षणिक व्यवस्थापनातील प्रदीर्घ अनुभव यामुळे त्यांनी एकूणच राज्याच्या शैक्षणिक वाटचालीमध्ये मोठे योगदान दिले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ येथे देखील त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

'प्रोग्रसिव्ह' ही संस्था शिक्षकांनी स्थापन केलेली शैक्षणिक संस्था आहे. स्वत: एक निष्ठावान शिक्षक असलेल्या डॉ एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था उत्तरोत्तर चांगली प्रगती करेल यात शंका नाही. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मी प्रोग्रसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आणि विशेषत: डॉ एकबोटे यांचे हार्दिक अभिनंदन करतो व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

(भगत सिंह कोश्यारी)
राज्यपाल, महाराष्ट्र

**प्रा. डॉ. गजानन एकबोटे,**
कार्याध्यक्ष,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,
पुणे

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

***Letter of Appreciation presented by Honourable Governor of Maharashtra Shri. Bhagat Singh Koshyari to Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir.***

**भगत सिंह कोश्यारी**
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

**राज भवन**
मलबार हील
मुंबई ४०० ०३५
दूरध्वनी : ०२२-२३६३ २६६०
फॅक्स : ०२२-२३६८ ०५०५

**१९ जानेवारी २०२१**

# प्रशस्ती पत्र

डॉ. राजेंद्र झुंजारराव हे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून सन २००८ पासून कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या उल्लेखनीय कामगिरीत त्यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

मॉडर्न महाविद्यालय यंदा स्थापनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. डॉ झुंजारराव यांच्या नेतृत्वाखाली संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 'कॉलेज विथ पोटेन्शियल फोर एक्सलन्स' (CPE) हे मानांकन तसेच स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. प्राचार्य डॉ. झुंजारराव यांच्या पुढाकाराने महाविद्यालयाने नवनवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, तसेच पदवी व पदव्युत्तर शिक्षणासोबतच संशोधन कार्याला देखील चालना दिली आहे, हे नमूद करताना मला आनंद होत आहे. मॉडर्न महाविद्यालयाने समाजाला उत्तम खेळाडू, उत्तम संशोधक, प्राध्यापक, उत्तम शासकीय अधिकारी, उत्तम कलाकार आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे उत्तम नागरिक दिले आहेत, ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीच्या वाटचालीत कार्याध्यक्ष प्राध्यापक डॉ गजानन एकबोटे यांचेसह प्राचार्य डॉ. झुंजारराव यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महाविद्यालयाने नॅक 'अ+'श्रेणी प्राप्त केली आहे. महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय क्रीडा पुरस्कार, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार असे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

आपल्या महाविद्यालयीन जबाबदाऱ्यांसोबत प्रा. डॉ. झुंजारराव संस्थेचे आजीव सदस्य व नियामक मंडळाचे सदस्य म्हणून देखील काम करीत आहेत. आजच्या सुवर्ण महोत्सव सांगतेच्या प्रंसगी मी डॉ. झुंजारराव यांचे हार्दिक अभिनंदन करतो तसेच त्यांना भावी वाटचाली साठी शुभेच्छा देतो.

**(भगत सिंह कोश्यारी)**
राज्यपाल, महाराष्ट्र

**प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
मॉडर्न महाविद्यालय,
पुणे ४११ ००५

## Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021

Progressive Education Society's Chairman Honourable Prof. Dr. Gajanan R. Ekbote Sir, P.E.Society Joint Secretary and CDC Chairperson Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam, Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir and P.E. Society Secretary and Vice Principal Prof. Shamkant Deshmukh Sir gave Letter of Thanks to Governor of Maharashtra Honourable Shri. Bhagat Singh Koshyari on 20.1.2021.









## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

### *प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ*

आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना मातृभूमी, मातृभाषा,सदाचार आणि संस्कृतीला विसरु नका

-राज्यपाल भगतसिंग कोश्यारी

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राज्यपाल भगतसिंग कोश्यारी बोलत होते. यावेळी पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. नितीन करमळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे, संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा.सुरेश तोडकर, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव तसेच शिक्षण व अन्य विभागातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी सेंट्रल सॉफीस्टीकेटेड ऍनालेटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी आणि प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबीनचे डिजिटल स्वरुपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रा.डॉ. गजानन एकबोटे व प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांना राज्यपाल श्री. कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी म्हणाले, आपण सर्वजण आधुनिकीकरणाचा ध्यास घेऊन वाटचाल करत आहोत. परंतु, केवळ आधुनिक बनण्यापेक्षा आदर्श बनण्यासाठी झटणे आवश्यक आहे. सदाचार ही जीवनातील महत्वपूर्ण बाब आहे. सदाचारी व्यक्तीचा सदैव गौरव केला जातो, यासाठी सदाचारी बना. परकीय देशांच्या भाषेचे ज्ञान घेताना मातृभाषेकडे दुर्लक्ष करु नका. आपल्या मातृभूमीचा व मातृभाषेचा सदैव अभिमान बाळगा, असे त्यांनी सांगितले. नाविन्यपूर्ण बाबींचे अधिकाधिक ज्ञान ग्रहण करुन विद्यार्थ्यांनी विद्वान बनावे, असे सांगून राज्यपाल श्री. कोश्यारी म्हणाले, 'भारत' हा प्राचीन काळापासून अनेक गोष्टींमध्ये अग्रेसर देश म्हणून ओळखला जातो, भविष्यात देखील आपला देश विविध बाबींमध्ये अग्रेसर ठरण्यासाठी आपल्या ज्ञानाचा देशहितासाठी उपयोग करा आणि जगभरात चांगले नाव कमवा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत, असे सांगून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये आजवर अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे व संस्थेचे कौतुक केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर म्हणाले, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांना दर्जेदार शिक्षण देणे तसेच त्यांना आपल्या शैक्षणिक संस्थेत टिकवून ठेवणे हे आव्हान असते. विद्यार्थी हिताचे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करुन त्यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे करणे महत्वाचे असते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेत विविध चांगल्या संकल्पना व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे दिसून येते, असे त्यांनी सांगितले.कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे म्हणाले, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाने नेहमीच भर दिला आहे. भविष्यात या संस्थेचा आणखी विस्तार करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. संस्थेच्या वाटचालीबाबत प्रा. डॉ. अंजली सरदेसाई यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. आभार प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी मानले. सूत्रसंचालन कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी केले.

## Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021

### 'मॉडर्न महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने'- मा.राज्यपाल भगतसिंह कोश्यारी

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे,५ या महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ मंगळवार दिनांक १९ जानेवारी २०२१ रोजी पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे राज्यपाल भगत सिंह कोश्यारी हे उपस्थित होते.

'मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड्स मिळाले आहेत.महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे मा.राज्यपाल आपल्या भाषणात म्हणाले. संशोधनाची आपली परंपरा अतिशय जुनी आहे. पुराणातील महत्त्वाचे संशोधन म्हणजे पुष्पक विमान असल्याचा उल्लेख त्यांनी केला.आजच्या काळात सुध्दा अशा नाविन्यपूर्ण संशोधनाला अतिशय महत्त्व आहे. आधुनिकता आणि परंपरा यांचा संगम शिक्षणात असणे आवश्यक आहे.नवीन शिक्षण पद्धतीत भारतीय भाषांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे इंग्लिश या ज्ञान भाषेबरोबर मातृभाषा जपणे महत्त्वाचे आहे. आपण आपल्या देशातील चांगल्या गोष्टी जगभर पोहोचवणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. 'मॉडर्न महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्यामुळे अधिकाधिक उत्तम शिक्षण देणे शक्य आहे असे ते म्हणाले. आपले ज्ञान वाढवून आपण सूर्य सारखे ते सर्वत्र पसरवावे असा संदेश त्यांनी दिला. महाविद्यालयाला सेंटर ऑफ excellence बनवायचं असेल तर खूप प्रगती करावी लागेल. 'मॉडर्न' हे नावाप्रमाणे आधुनिक तर आहेच पण ते मॉडेल कोलेज सुद्धा आहे. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. मॉडर्न महाविद्यालय समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण देते.संस्थेने समाजाचे हित नेहमीच पहिले आहे. आधुनिक काळात शिक्षण हे कवच कुंडलासारखे काम करते.विद्यार्थी त्यामुळे सक्षम तर होतातच शिवाय देशाच्या जडणघडणीत ते आपले योगदान देतात, असे ते म्हणाले. महाविद्यालयाला स्वायत्तेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करता येतात पण हवे तसे स्वांतत्र्य अजूनही प्राप्त झाले नसल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या कार्यक्रमामध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने करण्यात आले. केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून 'डीएसटी-फिस्ट' अंतर्गत मिळालेल्या सुमारे दीड कोटी रुपयाच्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफिची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे.या प्रयोगशाळेचा फायदा पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत संशोधकांना होणार आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन मा.राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते झाले.यासोबतच कोविड काळात विद्यार्थ्यी,पालक आणि इतर प्रशासकीय कामकाजासाठी महाविद्यालयात येणारे विजीटर यांना सहज पद्धतीने प्राचार्यांना भेटता यावे यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आभासी कक्षाचे उद्घाटन मा. राज्यपालांच्या हस्ते झाले. यावेळी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त एक विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या स्मरणिकेमध्ये महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख,माजी विद्यार्थी यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे. मॉडर्न महाविद्यालय आणि प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे समाजामध्ये अतिशय महत्त्वाचे योगदान आहे असे विचार महाविद्यालयीन समितीच्या सचिव मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्रास्ताविक करताना मांडले. राज्यपालांचे महाविद्यालयातील आगमन हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा आहे. शिक्षक ते राज्यपाल असा मा. राज्यपाल साहेबांचा प्रवास हा महाविद्यालयासाठी आदर्श वस्तुपाठ आहे, असे त्या म्हणाल्या.

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री.वासुदेव गाडे, विद्यमान कुलगुरू नितीन करमळकर उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या अभ्याक्रमाची माहिती विद्यापीठाला असणे आवशयक आहे असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू मा.प्रा.डॉ.नितीन करमळकर यांनी मांडले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे महाविद्यालयांना नेहमीच अशा नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांसाठी प्रोत्साहन देत असते. मॉडर्न महाविद्यालयात नेहमीच नवनवीन अभ्यासक्रम राबवले जातात याचे विशेष कौतुक मा.कुलगुरुनी केले. या महाविद्यालयात येताना मन नेहमी प्रसन्न होते असे विषेशोद्गार त्यांनी या प्रसंगी काढले.

पुणे शहराचे महापौर मा.मुरलीधर मोहोळ, उपमहापौर सरस्वती शेंडगे यांनी या कार्यक्रमाला उपस्थितीला लावली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयीन समितीच्या सचिव मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांनी मानले. आय क्यू ए सी समन्वयक डॉ.अंजली सरदेसाई यांनी महाविद्यालयाच्या वतीने पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयीन समितीच्या सचिव मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे, प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह डॉ.निवेदिता एकबोटे, सहकार्यवाह सुरेश तोडकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, संतोष ढोरे, प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे सचिव शामकांत देशमुख उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा विभागाचे संचालक महेश काकडे, डॉ.डी.वाय.पाटील डीम्ड विद्यापीठाचे कुलपती पी.डी.पाटील, युजीसीचे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन यावेळी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटी चे सचिव मा.प्रा.शामकांत देशमुख यांनी केले.

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

## 'मॉडर्न' सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता समारोह

**दि. १८ जानेवारीला आयोजन : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची उपस्थिती**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता समारोह राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या उपस्थितीमध्ये दि. १८ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजता होत आहे. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या आवारातील सभागृहात होणार आहे.

या कार्यक्रमास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव यावेळी उपस्थित होते.

मॉडर्न महाविद्यालयाची स्थापना १९७० मध्ये झाली. या काळात महाविद्यालयाने गुणवत्ता, क्रीडा, सुविधा यामध्ये मोठा टप्पा गाठला आहे. अनेक अभ्यासक्रमदेखील सुरू केले आहेत. त्यामुळेच नॅक समितीने महाविद्यालयात 'ए प्लस' मानांकन दिले. तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने 'कॉलेज विथ एक्सलन्स'चा दर्जा दिला आहे, असे एकबोटे यांनी सांगितले.

Prabhat 16.1.2021

## सुवर्णमहोत्सवाची मंगळवारी सांगता

पुणे, ता. १५ : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारोह राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या उपस्थितीमध्ये १९ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे. या कार्यक्रमास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या आवारातील सभागृहात होणार आहे. संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी ही माहिती दिली.

Sakaal 16.1.2021

# नवराष्ट्र

## राज्यपाल भगतसिंग कोश्यारी राहणार प्रमुख पाहुणे

- प्रा ज्योत्स्ना एकबोटे म्हणाल्या की, मॉडर्न कॉलेजने गेल्या ५० वर्षात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम केले आहे. यामुळेच आज या महाविद्यालयाला 'स्वायत्त' संस्था यासह शैक्षणिक क्षेत्रातील विविध अधिकृत संस्थांकडून रँकिंग मिळाली आहे.
- आगामी काळात आम्ही अभ्यासक्रमांची रचना आणि परदेशी विद्यापीठांशी समन्वय साधून अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करू जेणेकरून विद्यार्थ्यांना त्याचा चांगला फायदा होईल.
- प्रा देशमुख यांनी मॉडर्न कॉलेजतर्फे घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रम व महाविद्यालयीन यशाची सविस्तर माहिती दिली, तर प्रा. डॉ. झुंजारराव महाविद्यालयाच्या सुवर्ण वर्षाच्या समारोप समारंभासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले की, संस्थेचा विस्तार आणि उत्कृष्ट काम लक्षात घेता एक दिवस या महाविद्यालयाला विद्यापीठाचा दर्जा मिळेल.
- परदेशी विद्यापीठांशी करार करत आम्ही उच्च मूल्याचे कोर्स शिकवित आहोत. त्यातून, मॉडर्न महाविद्यालयाच्या सर्वोत्कृष्टतेचा अंदाज केला जाऊ शकतो.

Pune Plus Edition
16 January 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com

## मॉडर्न महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळा राज्यपालांच्या उपस्थितीत

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सवी सांगता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम १९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवाजीनगर येथील संस्थेच्या सभागृहात होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे उपस्थित असणार आहेत. तसेच यावेळी सुवर्णमहोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन केले जाणार आहे, अशी माहिती प्रो. ए. सोसायटीच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, प्राचार्य प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव उपस्थित होते.

प्रा. ज्योत्स्ना एकबोटे म्हणाल्या, केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून मिळालेल्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफीची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते होणार आहे. ही प्रयोगशाळा पदव्युत्तरचे विद्यार्थी, संशोधक प्राध्यापकांना उपयुक्त ठरणार आहे. सुवर्णमहोत्सवी वर्षात महाविद्यालयाला यूजीसीकडून स्वायत्तता मिळाली. यूजीसीच्या परामर्श योजनेत महाविद्यालयाला मार्गदर्शक महाविद्यालय म्हणून स्थान मिळाले. विद्यापीठाचे सर्वोत्कृष्ट क्रीडा महाविद्यालयाचे पारितोषिक मिळाले. येत्या काळात महाविद्यालयात आणखी काही प्रकल्प राबवले जाणार आहेत.

Kesari 16.1.2021

# ६ पुढारी

पुणे, शनिवार, १६ जानेवारी २०२१

## 'मॉडर्न'चा सुवर्ण महोत्सव; मंगळवारी सांगता समारंभ

पुणे : पुढारी वृत्तसेवा

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ येत्या मंगळवारी (दि. १९) होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. सुरेश तोडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव आदी या वेळी उपस्थित होते. या सांगता समारंभात सुवर्ण महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन केले जाणार आहे. एकबोटे म्हणाल्या, "मॉडर्न शैक्षणिक संस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शिक्षकांनी स्थापन केलेल्या या संस्थेचे कामकाज आजही शिक्षकांमार्फतच पाहिले जाते.

१९७० मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेबरोबर आज परदेशातील विद्यापीठे करार करण्यासाठी विचारणा करतात, एवढा नावलौकीक संस्थेने मिळवला आहे. महाविद्यालयाला नुकतेच विद्यापीठाचे सर्वोत्कृष्ट क्रीडा महाविद्यालयाचे पारितोषिक मिळाले आहे. येत्या काळात महाविद्यालयात आणखी काही प्रकल्प राबविले जाणार आहेत."

### अत्याधुनिक प्रयोगशाळेचे होणार उद्घाटन

केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्रालयाकडून मिळालेल्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफीची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते होणार आहे. ही प्रयोगशाळा एमएस्सीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, संशोधक प्राध्यापकांना उपयुक्त ठरणार आहे.

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

## नवभारत

### 19 जनवरी को होगा 'मॉडर्न कॉलेज' के

## स्वर्ण महोत्सवी वर्ष समारोह का समापन

संवाददाता@नवभारत

**पुणे.** सर्वश्रेष्ठ शिक्षा के लिए पिछले 50 वर्षों से कार्यरत मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, साइन्स एंड कॉमर्स, शिवाजीनगर अपने स्वर्णमहोत्सवी वर्ष के समापन पर विभिन्न कार्यक्रमों का आयोजन करने जा रहा है. 19 जनवरी को होने वाले इस कार्यक्रम में महाराष्ट्र के राज्यपाल भगत सिंह कोश्यारी तथा सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. नितिन करमलकर प्रमुख अतिथि के रूप में उपस्थित रहेंगे.



स्वर्णमहोत्सवी कार्यक्रम की जानकारी देने के लिए मॉडर्न कॉलेज में शुक्रवार 15 जनवरी को एक प्रेस वार्ता का आयोजन किया गया.

### 50 वर्षों में शिक्षा के क्षेत्र में बेहतरीन कार्य

इस प्रेस वार्ता में प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी की सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख तथा मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स एंड साइन्स शिवाजीनगर के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव उपस्थित थे.

Pune Edition
16-january-2021 Page No. 4
epaper.enavabharat.com

## नवराष्ट्र

### मॉडर्न महाविद्यालयः सुवर्णमहोत्सव

## समारोपा प्रसंगी विविध कार्यक्रम



प्रतिनिधी @ नवराष्ट्र

**पुणे :** उत्तम शिक्षणासाठी गेली ५० वर्षे कार्यरत असणारे मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगरच्या स्वर्णमोहोत्सवी वर्षाच्या समारोपात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १९ जानेवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितिन करमळकर हे उपस्थित राहणार आहेत.

या सुवर्ण महोत्सवाची माहिती देण्यासाठी आज ( १५ जानेवारी ) मॉर्डन कॉलेज येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत पुरोगामी प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटीच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख आणि मॉडर्ण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र झुंजारराव उपस्थित होते.

Pune Plus Edition
16 January 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com

## नवभारत

### राज्यपाल भगत सिंह कोश्यारी होंगे प्रमुख अतिथि



प्रा. ज्योत्स्ना एकबोटे ने कहा कि, मॉडर्न कॉलेज ने पिछले 50 वर्षों में शिक्षा के क्षेत्र में बेहतरीन कार्य किया है. यही कारण है कि, इस कॉलेज को आज 'ऑटोनॉमस' समेत शिक्षा क्षेत्र की विभिन्न अधिकृत संस्थाओं द्वारा रैंकिंग प्राप्त हुई है. आने वाले समय में भी हम बेहतरीन कोर्सेस डिजाइन कर तथा विदेशी विश्वविद्यालयों के साथ समन्वय कर पाठ्यक्रमों का क्रियान्वयन करेंगे, जिससे छात्रों को काफी अच्छा लाभ होगा.

### 'विश्वविद्यालय' के दर्जे के लिए प्रयास

■ प्रा. देशमुख ने मॉडर्न कॉलेज द्वारा अब तक चलाए गए कोर्सेस और कॉलेज की सफलताओं के संदर्भ में विस्तार से जानकारी दी, जबकि प्रा. डॉ. झुंजारराव कॉलेज के स्वर्णमहोत्सवी वर्ष के समापन समारोह के संदर्भ में जानकारी दी.

■ उन्होंने बताया कि, संस्था के विस्तार और बेहतरीन कार्य को देखते हुए वाले समय में एक दिन इस कॉलेज को 'विश्वविद्याल' का दर्जा प्राप्त होगा.

■ साथ में हम अभी विदेशी विश्वविद्यालयों के साथ भागीदारी करते हुए वहां के उच्च मूल्य पाठ्यक्रमों यहां पढ़ा रहे है. इससे मॉडर्न कॉलेज की सर्वोत्तमता का अंदाजा लगाया जा सकता है.

Pune Edition
16-january-2021 Page No. 4
epaper.enavabharat.com

## मॉडर्नच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा मंगळवारी समारोप

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता कार्यक्रम १९ जानेवारीला होणार आहे.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. समारोप कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे उपस्थित राहणार आहेत, तसेच यावेळी सुवर्णमहोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन केले जाणार आहे.

**प्रयोगशाळेचे उद्घाटन**

केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून मिळालेल्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफीची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते यावेळी होणार आहे.

Saamana 17.1.2021

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# 'मॉडर्न'च्या सुवर्ण महोत्सवाचा समारोप मंगळवारी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता कार्यक्रम मंगळवारी (१९ जानेवारी) होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. सुरेश तोडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव आदी या वेळी उपस्थित होते. समारोप कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे उपस्थित राहणार आहेत. तसेच या वेळी सुवर्णमहोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन केले जाणार आहे.




एकबोटे म्हणाल्या, की सुवर्णमहोत्सवी वर्षात महाविद्यालयाला यूजीसीकडून स्वायत्तता मिळाली. यूजीसीच्या परामर्श योजनेत महाविद्यालयाला मार्गदर्शक महाविद्यालय म्हणून स्थान मिळाले. विद्यापीठाचे सर्वोत्कृष्ट क्रीडा महाविद्यालयाचे पारितोषिक मिळाले. येत्या काळात महाविद्यालयात आणखी काही प्रकल्प राबवले जाणार आहेत.

### अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन

केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून मिळालेल्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफीची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते होणार आहे. ही प्रयोगशाळा पदव्युत्तरचे विद्यार्थी, संशोधक प्राध्यापकांना उपयुक्त ठरणार आहे.

# Courses on hold, colleges wait for host of approvals

**SwatiShindeGole**
@timesgroup.com

**Pune:** Autonomous colleges in the city that have the permission to start new courses, including certificate and diploma that are skill based, are facing many issues.

Their representatives said they have to get several clearances from the state directorate of higher and technical education and the Savitribai Phule Pune University. These are never approved on time resulting in scrapping of the proposals. Sometimes, there is excessive delay in introducing these courses.

Autonomy to the university affiliated colleges for academics was to reduce the burden on the university, improve the quality of education and start new courses as per demand. But, when the colleges applied for new courses they have had a very disappointing experience from the state government over approvals.

Principal of Modern Arts, Science and Commerce College, Rajendra Zunjarrao, said, "We were supposed to start a course in master of science in data science and animation. We have also received approval from UGC. But, the approval from the state higher and technical education is still pending resulting in a delay in starting this course."

When contacted, director of higher and technical education, Dhanraj Mane, said, "We do not make any changes in the guidelines for approving course applications by autonomous colleges. We follow the guidelines. The colleges are expected to take appropriate steps as suggested by the UGC and satisfy all the requirements."

College representatives have raised it with the Savitribai Phule Pune University under the leadership of Gajanan Ekbote, chairman of Progressive Education Society, who has formed a committee to streamline this system.

Meanwhile, the golden jubilee celebration of Modern College of Arts, Science and commerce will be concluded by governor Bhagat Singh Koshiyari on January 19.

### PROCEDURE TO FOLLOW

- UGC gives approval for the course
- Details are sent to the university, higher and technical education department
- University has to get the approval from the higher education department
- After the government issues the order, then the number of seats, reservation, registration with the university, marks and later the certificate is issued



The Times of India 16.1.2021

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

पुणे, मंगळवार, १९ जानेवारी २०२१ ५



“प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या संस्थांची शैक्षणिक वाटचाल अतिशय उत्कृष्टपणे चालू आहे. मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान दिले आहे. हे महाविद्यालय तसेच संस्थेचे माजी विद्यार्थी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामाद्वारे देशसेवा करीत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने या महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा दिला आहे. समाजाबरोबरच शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी–पालकांच्या महाविद्यालयाकडून अपेक्षा आहेत. हे लक्षात घेऊन भविष्यात नवनवीन अभ्यासक्रम सुरू करणे, तसेच विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती करण्याच्या दृष्टीने आमची वाटचाल चालूच राहील. त्या माध्यमातून हे महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात मानाचे स्थान मिळवेल यात शंका नाही. या संस्थेचे अभिमत विद्यापीठात (मॉडर्न विद्यापीठ) लवकरात लवकर रूपांतर व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. आत्तापर्यंतच्या वाटचालीत बहुमोल योगदान दिल्याबद्दल संस्थेचे आजी–माजी पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.”

– **प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे** (कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी)

Sakaal 19.1.2021

## मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

१५ जून १९७० रोजी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी द्वारा मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. गुरुवर्य शंकररावजी कानिटकर यांच्या प्रेरणेतून गुरुवर्य ताटके यांच्या पुढाकारातून संस्थेचे हे पहिले वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. विशेष म्हणजे, महाविद्यालय सुरु करण्यासाठीची शासनाकडून परवानगी मागण्याआधीच महाविद्यालयाची इमारत पूर्णपणे बांधून तयार होती. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून अनुभवी व गुणवंत शिक्षकांची नेमणूक महाविद्यालयात संस्थेद्वारा सुरुवातीपासूनच करण्यात आली होती.

महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीच्या दुसऱ्या दशकांमध्ये, म्हणजे शैक्षणिक वर्ष १९८०-८१ ते १९८९-९० या कालावधीत एम. कॉम. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम अनुदानित तत्त्वावर सुरु करण्यात आला होता. या कालावधीमध्ये एम. फिल. व पीएच. डी. चे आणखी एक संशोधन केंद्र, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने सुरु करण्यात आले. ते संशोधन केंद्र वनस्पतीशास्त्र विषयाचे होते.

पदव्युत्तर अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणात तिसऱ्या दशकामध्ये म्हणजेच १९९०-९१ ते १९९९-२००० या कालावधीमध्ये, प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांच्या पुढाकारातून मोठ्या संख्येने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु झाले होते. यामध्ये विनाअनुदानित तत्त्वावरील विविध विषयातील एम. ए. आणि एम. एस्सी. अभ्यासक्रमांचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा होता. या तिसऱ्या दशकांमध्ये सुद्धा महाविद्यालयात आणखी काही संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या वाटचालीच्या चौथ्या दशकात, म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०००-२००१ ते २००९-२०१० या कालावधीत महाविद्यालयात आणखी काही पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली.

महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबरच, संशोधनाला सुद्धा महत्त्व देणे आवश्यक आहे. अशी आग्रही भूमिका प्रा. डॉ. एकबोटे यांची असल्यामुळे या दशकामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा मान्यताप्राप्त विविध विषयांची संशोधन केंद्रे महाविद्यालयात सुरु करण्यात आली होती. या दशकातील शैक्षणिक वर्ष २००२-०३ मध्ये, राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था (नॅक), बंगलोर, द्वारा महाविद्यालयाचे प्रथम मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले होते. अशा प्रकारचे मूल्यांकन अगदी सुरुवातीच्या काळात करणाऱ्या मोजक्या महाविद्यालयांमध्ये मॉडर्न महाविद्यालयाचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील संख्यात्मक व गुणात्मक प्रगतीची योग्य दखल घेऊन, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाद्वारा महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार, शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये प्रदान करण्यात आला होता. सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्रशासन आणि संस्थेचे व्यवस्थापन या सर्वांच्या दृष्टीने हा पुरस्कार खूप प्रेरणादायी तसेच आनंद व समाधान मिळवून देणारा होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या चौथ्या दशकामध्ये, शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये, नॅक, बंगलोर द्वारा महाविद्यालयाचे दुसरे मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले. त्यावेळी महाविद्यालयाला 'अ' दर्जा प्राप्त झाला.

राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था (नॅक), बंगलोर यांच्या द्वारा आलेल्या पियर टीम मधील सदस्यांनी, महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या उत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्काराची त्यावेळेस विशेष दखल घेतली होती. या द्वितीय मूल्यमापन व मूल्यांकन होण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर, महाविद्यालयामध्ये अनेक विशेष सुविधा निर्माण करण्यात आल्या.अनेक विभागांचे नूतनीकरण सुद्धा करण्यात आले. यामुळे या चौथ्या दशकामध्ये महाविद्यालयामध्ये संशोधन कार्य चांगल्या प्रकारे झाले. त्याने,



गुणवत्तापूर्ण संशोधन कार्याचा वेगही वाढला.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या यशस्वी वाटचालीच्या पाचव्या दशकामध्ये, म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ ते २०१९-२०२० या कालावधीमध्ये प्रा. डॉ. एकबोटे व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या मार्गदर्शनामुळे महाविद्यालयात एम. ए. (इंग्रजी, भूगोल, अर्थशास्त्र, मराठी, मानसशास्त्र, हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र), एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स, बॉटनी, बायोटेक्नोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, ॲनॅलिटिकल केमेस्ट्री, संख्याशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स) एम. सी. ए. (सायन्स) तसेच बॉटनी, झूलॉजी, मराठी, कॉमर्स, लाईफ सायन्स, अर्थशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोबायोलॉजी या विषयांमध्ये (पीएच.डी.) संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे PGDFT, PGDT, PGDBF, Fashion Design हे Add-on अभ्यासक्रम चालविले जातात. अनेक नाविन्यपूर्ण सुविधाही निर्माण करण्यात आल्या. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा, महाविद्यालयाला 'स्वायत्त महाविद्यालय' हा दर्जा प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या प्रगतीच्या वाटचालीमध्ये हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठ, आयसर, पुणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व संस्थेच्या सामूहिक प्रयत्नाने, महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. ब्लेंडेड बायोसायन्स हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. पाचव्या दशकांमध्ये दरवर्षी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आयोजित करणेही आणखी चांगल्या प्रकारे सुरुच राहिले आणि अनेक संशोधन प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आले.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोणताही नवीन अभ्यासक्रम तयार केला, की तो मॉडर्न महाविद्यालयात प्रथम सुरु केला जातो. हे वैशिष्ट्य महाविद्यालयाने आज पर्यंत जपलेले आहे व पुढेही ते जपले जाईल. शैक्षणिक वर्ष १९८६-८७ मध्ये त्यावेळेच्या पुणे विद्यापीठाने बीसीएस हा संगणक शास्त्राचा पदवी अभ्यासक्रम तयार केला होता. हा अभ्यासक्रम त्याच शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयामध्ये यशस्वीरीत्या सुरु करण्यात आला.**

## Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021

८९ वा वर्धापन दिन सकाळ गौरवगाथा



गुरुवर्य कै. श्री. शंकररावजी कानिटकर

# 'मॉडर्न' शिक्षणाचे ध्येय

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे

॥ ज्ञानमयो भव ॥ 1934 EXCELSIOR

**अद्ययावत तंत्रज्ञानांनी समृद्ध होऊन, आधुनिक साधन सामग्रीचा वापर करीत, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, हे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे उद्दिष्ट आहे. त्यामुळेच, संस्थेच्या पहिल्या शाळेचे नाव मॉडर्न हायस्कूल असे ठेवले गेले. प्रोग्रेसिव्ह आणि मॉडर्न हे दोन्ही शब्द तब्बल ८६ वर्षांनंतरही संस्थाचालकांच्यादृष्टीने परवलीचे आहेत. गुरुजनांनी घालून दिलेले आदर्श, संस्कार, मूल्ये आणि परंपरेचे आजतागायत कसोशीने पालन केले जात आहे. अध्ययन आणि अध्यापन याबाबत गुणवत्ता आणि दर्जा संस्थेने राखला आहे. भविष्यकाळात 'मॉडर्न विद्यापीठ' या नावाने अभिमत विद्यापीठाचा दर्जा घेण्याचा संस्थेचा मानस आहे.**



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५ या शिक्षणसंस्थेची स्थापना १६ मे १९३४ रोजी अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर गुरुवर्य श्री. शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनी पुण्यात केली. देशाला सुसंस्कारित, निष्ठावान आणि चारित्र्यसंपन्न नागरिक देणे, हा राष्ट्रभक्ती व राष्ट्रसेवेचा उत्कृष्ट मार्ग आहे. यासाठी सर्वोत्तम शिक्षणसंस्था स्थापन करावी, हा या शिक्षणसंस्थेच्या स्थापनेमागील उद्देश होता.

प्रोग्रेसिव्ह म्हणजे प्रगतिशील. प्रगतिशील म्हणजे काळाशी सुसंगत असे धोरण अवलंबणे. त्यामध्ये,नवीन्यपूर्ण कल्पनांचा समावेश केला जावा या हेतूने संस्थेचे नाव 'प्रोग्रेसिव्ह' हे ठेवण्यात आले. 'मॉडर्न' या शब्दाचा अर्थ 'आधुनिक' असा आहे. एखाद्या शिक्षण संस्थेने 'मॉडर्न' असणे म्हणजे अद्ययावत तंत्रज्ञानांनी समृद्ध होऊन, आधुनिक साधन सामग्रीचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे होय, हे लक्षात घेऊन संस्थेच्या पहिल्या शाळेचे नाव 'मॉडर्न हायस्कूल' असे ठेवले गेले. 'प्रोग्रेसिव्ह' आणि 'मॉडर्न' या दोन शब्दांमध्येच संस्थेच्या ध्येय धोरणांची संकल्पना स्पष्ट आहे. कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाचे बाजारीकरण किंवा व्यापारीकरण होऊ द्यायचे नाही, याकडे संस्थेचा कटाक्ष असून सर्व व्यवहार स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने करण्यावर भर दिला जात आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून संस्थेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाची व ज्ञानाची दिशा सातत्याने विद्यार्थीभिमुख तसेच समाजाभिमुख ठेवलेली आहे. गेली ८६ वर्षे ही तत्त्वे सर्वांनीच कसोशीने पाळली आहेत. ही शिक्षण संस्था शिक्षकांनी स्थापन केलेली संस्था असून, आज २०२१ मध्येसुद्धा संस्थेचा कारभार शिक्षकांमार्फतच केला जातो. संस्थेच्या नियामक मंडळातही सर्व स्तरांतील कर्तबगार व्यक्ती आहेत.

संस्थेचा भर १९६९ पर्यंत शालेय शिक्षणावर अधिक होता. या दरम्यान संस्थेच्या ५ शाळा सुरू झाल्या. १९७० साली मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य, महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे ५ ची स्थापना झाली. स्थापनेच्या दिवसापासून स्वत:च्या मालकीच्या इमारतीत सुरू झालेले हे एकमेव महाविद्यालय!

### डॉ. एकबोटे यांच्याकडे कार्याध्यक्षपदाचा कार्यभार

१९८६ पासून संस्थेच्या प्रगतीस वेग आला. विशेषत: १ जानेवारी १९९४ पासून पुण्यातील सुप्रसिद्ध नामांकित शल्यचिकित्सक आणि मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी संस्थेच्या नियामक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारला. डॉ. एकबोटे यांना द्रष्टेपणाचे वरदान आहे. त्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद, वैद्यक विद्याशाखेचे अधिष्ठाता, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्रकुलगुरू, व्यवस्थापन परिषदेवर मा. राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये सर्जरी विषयाचे प्राध्यापक, भारतातील विविध विद्यापीठांच्या अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या अनेक समित्यांवर सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची व्यक्ती कार्याध्यक्षपदी असल्याने आणि नियामक मंडळाने त्यांना मोलाची साथ दिल्याने संस्थेचा विकास १९९४ पासून वेगाने झाला. **संस्थेच्या प्रगतीत गुरुवर्य विष्णू त्र्यं. ताटके, गुरुवर्य मो. गो. चापेकर, डॉ. माधव नामजोशी, रवी किराड, बाळासाहेब हगवणे, ॲड. बाबासाहेब चव्हाण, सुरेश तोडकर, ॲड. दादासाहेब बेंद्रे, ॲड. माणिकराव पाटील, प्रा. श्यामकांत देशमुख, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. डॉ. अरविंद पांडे, प्रा. पद्माकर चिरपूटकर, प्रा. सीताराम रायकर, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, सौ. मोनिका वैद्य, मच्छिंद्र कांबळे** इत्यादींचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

### पुण्यात संस्थेच्या ६० पेक्षा अधिक शाखा

आज संस्थेच्या ६० शाखा पुणे शहर आणि जिल्हा परिसरात कार्यरत आहेत. शिशू विद्या मंदिर ते पदवी-पदव्युत्तर म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, संगणक, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केवळ महिलांसाठी), व्यवस्थापन, आरोग्यविज्ञान, कृषी जैव तंत्रज्ञान इ. सर्व विद्याशाखांच्या महाविद्यालयांत सुमारे ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्था आता वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार आहे. मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाला नुकतीच 'स्वायत्तता' मिळाली आहे. तेथे चालविल्या जाणाऱ्या B.Sc. (Blended) या अभ्यासक्रमासाठी ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठाशी सुमारे ४ वर्षांपूर्वीच करार झाला आहे. अशाच अनेक परदेशी विद्यापीठांशी शैक्षणिक करार करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी-पदव्युत्तर परीक्षेच्या गुणवत्ता यादीत असतात. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा प्रकारांत संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. अनेक सांस्कृतिक कलादर्शन स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवीत आहेत. संस्थेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी राजकीय, उद्योग, अर्थ, वैद्यकीय क्रीडा, न्याय व विधी आदी क्षेत्रांत गौरवास्पद कामगिरी केली आहे. तसेच करीत आहेत. **त्यामध्ये, कै. बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, माधुरी मिसाळ, कै. सुभाष कुल, जालिंधर कामठे (राजकीय), विजय केळकर (अर्थतज्ज्ञ), कै. अरविंद इनामदार (आयपीएस), अरुण फिरोदिया, बाबा शिदोरे (उद्योग), डॉ. गजानन एकबोटे, डॉ. शिरीष प्रयाग, डॉ. जगदीश हिरेमठ (वैद्यकीय), सौदामिनी देशमुख (पहिल्या महिला वैमानिक), श्रीरंग इनामदार, उज्ज्वला निकम (क्रीडा), त्यागराज खाडिलकर, सचिन जांभेकर (कला)** आदींचा समावेश आहे.

### १९ जानेवारीला सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता

**मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा (२०२०-२१) सांगता समारंभ १९ जानेवारी २०२१ ला महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल श्रीयुत भगतसिंह कोश्यारी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे.**

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# 'मॉडर्न' अभिमत विद्यापीठाचे स्वप्न

पुढील वाटचालींमध्ये, शैक्षणिक सेवेची गुणवत्ता आणखी उंचावून राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था, बेंगलोर, यांच्याकडून अ प्लस प्लस दर्जा प्राप्त करणे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, यांच्याकडून मिळणारा कॉलेज विथ एक्सलन्स हा दर्जा प्राप्त करणे, अशा प्रकारची उद्दिष्टे ठेवलेली आहेत. महाविद्यालयात ज्या पदव्युत्तर विभागात अजूनही संशोधन केंद्रे सुरू झालेली नाहीत, त्या १० विभागांमध्येसुद्धा संशोधन केंद्रे सुरू करण्याचा मानस आहे. तसेच, महाविद्यालयातील ज्या तीन विभागांत केवळ पदवी अभ्यासक्रम शिकवला जातो, त्या विभागातही पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. एकबोटे यांच्या मार्गदर्शनाने, भविष्यात मॉडर्न विद्यापीठ स्थापन व्हावे असे स्वप्न उराशी बाळगून महाविद्यालयाची यापुढील वाटचाल होणार आहे. महाविद्यालयांमध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवताना महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव, संस्थेचे सचिव प्रा. शामकांत देशमुख यांचे, तसेच महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. अंजली सरदेसाई, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांचे बहुमोल असे योगदान असते.

या महाविद्यालयाच्या प्रगतीत सर्व आजी-माजी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सिंहाचा वाटा आहे. माजी शिक्षकांमध्ये प्रा. श्री. पद्माकर चिरपुटकर, प्रा. डॉ. अरविंद पांडे, प्रा. अ. गो. गोसावी, प्रा. गंभीर, माजी प्राचार्य स. य. परांजपे, प्रा. सीताराम रायकर, प्रा. डॉ. प्रकाश दीक्षित, प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नेते आणि या महाविद्यालयातील माजी कर्मचारी श्री. शशिकांत कामथे यांचेही योगदान महत्त्वाचे आहे. मॉडर्न महाविद्यालयाला सध्या स्वायत्त दर्जा प्राप्त असून, भविष्यामध्ये Deemed University करण्याचा मानस आहे. तसेच महाविद्यालयाला यू.जी.सी., नवी दिल्ली द्वारा सध्या असलेला College with Potential for Excellence दर्जा पुढे अधिकची गुणवत्ता वाढून व नवनवे उपक्रम राबवून College with Excellence हा दर्जा मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाची मार्गक्रमणा चालू आहे. तसेच महाविद्यालयास स्वायत्तता प्राप्त झाल्यामुळे विविध उद्योगांच्या दृष्टीने लागणाऱ्या मनुष्यबळाची निर्मिती करण्यासाठी, तसेच Skill Development Courses, Add-on Programme, तसेच Experiential Learning या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट वाटचालीचे श्रेय संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्या अभ्यासपूर्ण बहुमोल मार्गदर्शनाला आणि त्यांचा शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग अनुभव व दूरदृष्टीला द्यावे लागेल. प्रा. डॉ. एकबोटे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अनेक अधिकार मंडळांचे सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्याचा फायदा महाविद्यालयास झाला. महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन महाविद्यालयाच्या वाटचालीमध्ये लाभले आहे.

## विविध पुरस्कारांनी गौरव

- पुणे विद्यापीठाद्वारा पुरस्कृत 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार (२००८)
- विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली द्वारा कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स (CPE) स्टेटस (२०११)
- भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नोलॉजी, द्वारा 'स्टार महाविद्यालय' योजना (२०१३)
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठद्वारा 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (राष्ट्रीय सेवा योजना)' पुरस्कार (२०१४)
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठद्वारा 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार (२०१४)
- नॅक बंगलोर द्वारा 'अ+' श्रेणी ३.५१ श्रेयांकसह पुनर्मूल्यांकन (२०१७)
- विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली द्वारा B.Voc. योजने अंतर्गत 'फॅशन टेक्नोलॉजी ॲण्ड एपरेल डिझायनिंग' या अभ्यासक्रमासाठी निवड (२०१९)
- सामाजिक न्याय आणि सबलीकरण विभाग, भारत सरकार द्वारा बेस्ट एक्सेसिबल वेबसाइट हा राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार (२०१८)
- सलग पाच वर्षे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठद्वारा 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (क्रीडा)' पुरस्कार (२०१६-२०२०)
- शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून 'स्वायत्त' (Autonomy) दर्जा प्राप्त.

# मॉडर्न शिक्षणाचे ध्येय.....

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे

भारतवर्षाला सुसंस्कृत, सुसंस्कारित, निष्ठावान आणि चारित्र्यसंपन्न नागरिक देणे हा राष्ट्रभक्तिचा, राष्ट्रसेवेचा उत्कृष्ट मार्ग आहे. या उद्देशाने पुण्यामध्ये गुरूवर्य मा. शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५ या सर्वोत्तम शिक्षणसंस्थेची स्थापना दि. १६ मे १९३४ रोजी अक्षय्यतृतीयेच्या मुहुर्तावर केली.

प्रोग्रेसिव्ह म्हणजे प्रगतीशील. प्रगतीशील म्हणजे काळाशी सुसंगत असे धोरण अवलंबणे. त्याचप्रमाणे या प्रगतीशील शिक्षणामध्ये नवीन कल्पनांचा समावेश केला जावा, या हेतूने संस्थेचे नाव "प्रोग्रेसिव्ह" हे ठेवले. "मॉडर्न" या शब्दाचा अर्थ "आधुनिक" असा आहे. कोणत्याही शिक्षण संस्थेने "मॉडर्न" असणे म्हणजे अद्ययावत तंत्रज्ञानांनी समृद्ध होऊन आधुनिक साधन सामुग्रीचा वापर करुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे. त्यामुळे संस्थेच्या पहिल्या शाळेचे नाव "मॉडर्न हायस्कूल" असे ठेवले. "प्रोग्रेसिव्ह"आणि "मॉडर्न" हे दोन शब्द आजही संस्था चालकांच्या दृष्टीने परवलीचे आहेत. या दोन शब्दांमध्येच संस्थेच्या ध्येय धोरणांची संकल्पना स्पष्ट आहे. आधुनिकते बरोबरच गुरुजनांनी घालून दिलेले आदर्श, संस्कार, मूल्ये, परंपरा गेली ८६ वर्षे संस्थेने कसोशीने जपल्या आहेत. अध्ययन आणि अध्यापन याबाबतीत गुणवत्ता आणि दर्जा राखला आहे. या शिक्षणसंस्थेचे सर्व व्यवहार "स्वच्छ" आणि "पारदर्शक" आहेत. या शिक्षणसंस्थेने विद्यार्थी हाकेंद्रबिंदू मानून संस्थेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाची, ज्ञानाची दिशा सातत्याने विद्यार्थीभिमुख, समाजाभिमुख ठेवलेली आहे. गेली ८६ वर्षे ही तत्त्वे सर्वांनीच कसोशीने पाळली आहेत. संस्थेच्या नियामक मंडळातही सर्व स्तरातील कर्तबगार व्यक्ती आहेत.

१९६९ पर्यंत संस्थेच्या प्रगतीचा भर शालेय शिक्षणावर अधिक होता. १९३४ ते १९६९ यादरम्यान संस्थेच्या ६ शाळा सुरु झाल्या. १९७० साली मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महा, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना झाली. स्थापनेच्या दिवसापासून स्वत:च्या मालकीच्या इमारतीत सुरु झालेले हे एकमेव महाविद्यालय. १९८६ पासून संस्थेच्या प्रगतीस वेग आला. विशेषत: १ जानेवारी १९९४ पासून पुण्यातील सुप्रसिद्ध, नामांकित शल्यचिकित्सक आणि मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी संस्थेच्या नियामक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार स्विकारला. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांना द्रष्टेपणाचे वरदान आहे. त्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद सदस्य, वैद्यक विद्याशाखेच अधिष्ठाता म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्रकुलगुरु, व्यवस्थापन परिषदेवर मा. राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये सर्जरी विषयाचे प्राध्यापक, भारतातील विविध विद्यापीठांच्या अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या अनेक समित्यांवर सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची व्यक्ती कार्याध्यक्षपदी असल्याने आणि नियामक मंडळाने त्यांना मोलाची साथ दिल्याने संस्थेचा विकास १९९४ पासून वेगाने झाला.

आज संस्थेच्या ६० शाखा पुणे शहर आणि पुणे जिल्हा परिसरात कार्यरत आहेत. शिशु विद्यामंदिर ते पदवी-पदव्युत्तर म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, संगणक, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, व्यवस्थापन, आरोग्य विज्ञान, कृषी जैवतंत्रज्ञान इ सर्व विद्याशाखांच्या महाविद्यालयात सुमारे ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्था आता वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार आहे. त्याचप्रमाणे संस्था अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची नुकतीच "स्वायत्तता" मिळाली आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठाशी मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथे चालविल्या जाणाऱ्या B.Sc. (Blended) या अभ्यासक्रमासाठी सुमारे ४ वर्षापूर्वीच करार झाला आहे.अशाच अनेक परदेशी विद्यापीठांशी शैक्षणिक करार करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी- पदव्युत्तर परीक्षेत गुणवत्ता यादीत असतात. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा प्रकारात संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. कलाप्रांतात अनेकविद्यार्थी विशेष नैपुण्य मिळवित आहेत. अनेक सांस्कृतिक कलादर्शन स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवित आहेत. अनेक माजी विद्यार्थी सुद्धा समाजातील विविध क्षेत्रात गौरवास्पद कामगिरी करीत आहेत. सस्थेच्या या प्रगतीमध्ये गुरूवर्य वि. त्र्यं. ताटके, मो. गो. चाफेकर, संस्थेचे विद्यमान कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. श्री. सुरेश तोडकर, ॲड. बाबासाहेब चव्हाण, डॉ. माधव नामजोशी,रवि किराड, बाळासाहेब हगवणे, चंद्रकांत शेट्टी, ॲड. दादासाहेब बेंद्रे, सीताराम रायकर, श्री. प. स. चिरपुटकर, प्रा. डॉ. अरविंद पांडे, ॲड. माणिकराव पाटील, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. डॉ. प्रकाश दिक्षित, श्री. शरद इनामदार, श्री. चित्तरंजन कांबळे, सौ. मोनिका वैद्य आदींचा महत्वाचा वाटा आहे.

लोकसत्ता Tue, 19 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57825179

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

## 'मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे - सुवर्ण महोत्सवी सांगता

१५ जून १९७० रोजी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी द्वारा मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. गुरुवर्य शंकररावजी कानिटकर यांनी दिलेले 'मॉडर्न' व 'प्रोग्रेसिव्ह' हे दोन प्रेरणादायी शब्द मंत्र घेऊन, गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके यांच्या पुढाकारातून संस्थेचे हे पहिले वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. संस्थेचे उच्च शिक्षणातील हे पहिले पाऊल. विशेष म्हणजे महाविद्यालय सुरु करण्यासाठीची शासनाकडून परवानगी मागण्याआधीच महाविद्यालयाची इमारत पूर्णपणे बांधून तयार होती. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून अनुभवी व गुणवंत शिक्षकांची नेमणूक महाविद्यालयात संस्थेद्वारा सुरुवातीपासूनच करण्यात आली होती.

समाजाच्या शैक्षणिक सेवेचा वसा घेऊन, १९७० पासून मार्गक्रमण करत असलेल्या या महाविद्यालयात १९७०-७१ या शैक्षणिक वर्षात ७०७ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. महाविद्यालयाने दिलेल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे व संस्थेच्या पाठबळामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी वाढत गेली. महाविद्यालयाच्या ५० व्या वर्षी, म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये, प्रवेशित विद्यार्थी संख्या १२००० पेक्षा जास्त झाली होती. शैक्षणिक वर्ष १९७०-७१ ते शैक्षणिक वर्ष १९७९-८० या पहिल्या दशकामध्ये, वरिष्ठ महाविद्यालयामध्ये केवळ पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात होते. यामध्ये बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. या तीन पदवी अभ्यासक्रमाचा समावेश होता. एक विशेष बाब म्हणजे महाविद्यालयाच्या वाटचालीच्या पहिल्या दशकातच म्हणजे शैक्षणिक वर्ष १९७९-८० मध्ये त्यावेळच्या पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने एम.फिल. व पीएच.डी. चे प्राणीशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र सुरु करण्यात आले होते. महाविद्यालयामध्ये सुरुवातीपासूनच शैक्षणिक कामकाजाच्या बरोबरच क्रीडा आणि कला क्षेत्रावर चांगल्या प्रकारे भर देण्यात आला होता. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीच्या दुसऱ्या दशकामध्ये म्हणजे शैक्षणिक वर्ष १९८०-८१ ते १९८९-९० या कालावधीत, शैक्षणिक वर्ष १९७८-७९ मध्ये, एम.कॉम. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम अनुदानित तत्त्वावर सुरु करण्यात आला होता. या कालावधीमध्ये एम.फिल. व पीएच.डी. चे आणखी एक वनस्पतिशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने सुरु करण्यात आले होते.

पदव्युत्तर अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणात तिसऱ्या दशकामध्ये म्हणजेच १९९०-९१ ते १९९९-२००० या कालावधीमध्ये, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या पुढाकारातून मोठ्या संख्येने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु झाले होते. यामध्ये विनाअनुदानित तत्त्वावरील विविध विषयातील एम.ए. आणि एम.एस्सी. अभ्यासक्रमांचा समावेश होता.महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा होता. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी चे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनातून, महाविद्यालयाची होणारी संख्यात्मक व गुणात्मक प्रगती लक्षात घेऊन महाविद्यालयात जास्तीच्या सुविधा पुरविण्यात आल्या होत्या.

महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबरच, संशोधनाला सुद्धा महत्त्व देणे आवश्यक आहे. अशी आग्रही भूमिका संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांची असल्या मुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा मान्यताप्राप्त विविध विषयांची संशोधन केंद्रे महाविद्यालयात सुरु करण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष २००२-०३ मध्ये, राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था (नॅक), बंगलोर, द्वारा महाविद्यालयाचे प्रथम मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले होते.अशा प्रकारचे मूल्यांकन अगदी सुरुवातीच्या काळात करणाऱ्या मोजक्या महाविद्यालयांमध्ये मॉडर्न महाविद्यालयाचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील संख्यात्मक व गुणात्मक प्रगतीची योग्य दखल घेऊन, त्यावेळच्या पुणे विद्यापीठा द्वारा महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार, शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये प्रदान करण्यात आला होता. शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये, नॅक, बंगलोर द्वारा महाविद्यालयाचे दुसरे मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले. यावेळेस प्राचार्य, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्रशासन व संस्थेचे व्यवस्थापन यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्रितरीत्या उत्तम प्रकारे तयारी केली होती. त्यावेळच्या मूल्यमापनामध्ये महाविद्यालयाला 'अ' दर्जा प्राप्त झाला.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या यशस्वी वाटचालीच्या पाचव्या दशकामध्ये, म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ ते २०१९-२०२० या कालावधीमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या मार्गदर्शनामुळे महाविद्यालयात एम. ए. (इंग्रजी, भूगोल, अर्थशास्त्र, मराठी, मानसशास्त्र, हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र), एम. एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स, बॉटनी, बायोटेक्नोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, ॲनॅलिटिकल केमेस्ट्री, संख्याशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स) एम.सी.ए. (सायन्स) तसेच बॉटनी, झूलॉजी, मराठी, कॉमर्स,लाईफ सायन्स, अुशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोबायोलॉजी या विषयांमध्ये (पीएच.डी.)संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे PGDFT, PGDT, PGDBF, Fashion Design हे Add-on अभ्यासक्रम चालविले जातात. अनेक नाविन्यपूर्ण सुविधाही निर्माण करण्यात आल्या. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्थेद्वारा महाविद्यालयाचे तिसरे मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले होते. त्यावेळेस महाविद्यालयात 'ए प्लस' दर्जा प्राप्त झाला. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा, महाविद्यालयाला 'स्वायत्त महाविद्यालय' हा दर्जा प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या प्रगतीच्या वाटचालीमध्ये हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठ, आयसर पुणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वप्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी यांच्या सामूहिक प्रयत्नाने, महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. ब्लेंडेड बायोसायन्स हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.

महाविद्यालयाचे एक वैशिष्ट्य म्हणजे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोणताही नवीन अभ्यासक्रम तयार केला, की तो मॉडर्न महाविद्यालयात प्रथम सुरु केला जातो. हे वैशिष्ट्य महाविद्यालयाने आज पर्यंत जपलेले आहे व पुढेही ते जपले जाईल. शैक्षणिक वर्ष १९८६-८७ मध्ये त्यावेळेच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या चौथ्या दशकाच्या शेवटी व त्यानंतर पाचव्या दशकात सामूहिक प्रयत्नांमुळे महाविद्यालयास 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार (२००८), 'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सिलेंस (CPE) स्टेटस' (२०११/२०१७), 'बेसिक साईनटिफीक रिसर्च'(UGC-BSR) योजना (२०१२), 'स्टार महाविद्यालय'योजना (२०१३), 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (राष्टीय सेवा योजना)'राज्य पुरस्कार (२०१४), 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार (२०१४), 'कम्युनिटी कॉलेज योजना' (२०१५), 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय(क्रीडा)'पुरस्कार (२०१६/२०१७/२०१८/२०१९/२०२०), Best Accessible Website हा राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार (२०१८) इ. अनेक पुरस्कारप्राप्त झाले. NAAC बेंगलोर द्वारा A+ श्रेणी प्राप्त. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून 'स्वायत्त'(Autonomy) दर्जा प्राप्त झाला. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. "स्वायत्त दर्जा" प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थ्यांना उपयुक्त असे अनेक नवीन अभ्यासक्रम सुरु केले जात आहेत. पाच दशकांच्या शैक्षणिक सेवेच्या दैदिप्यमान वाटचालीमध्ये, महाविद्यालयाने नेहमीच एक समाजाभिमुख व विद्यार्थीभिमुख दृष्टिकोन ठेवलेला आहे. आजपर्यंत महाविद्यालयाने समाजाला अनेक उत्तम खेळाडू, उत्तम संशोधक, उत्तम प्रशासकीय अधिकारी, उत्तम प्राध्यापक, उत्तम डॉक्टर्स, उत्तम शासकीय अधिकारी, उत्तम पोलीस अधिकारी, उत्तम कलाकार दिलेले आहे. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट वाटचालीचे श्रेय प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्या अभ्यासपूर्ण बहुमोल मार्गदर्शनाला आणि त्यांच शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग अनुभव व दूरदृष्टीला द्यावे लागेल. महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, त्यांचे पालक या सर्वांच्या सहकार्याने व योगदानाने महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होत आहे. महाविद्यालया च्या प्रगतीच्या या वाटचालीमध्ये आजी-माजी प्राचार्य, रजिस्ट्रार, ग्रंथपाल शारीरिक शिक्षण संचालक, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नेते श्री. शशिकांत कामठे या सर्वांचेही बहुमोल असे योगदान महाविद्यालयास लाभले आहे.

यापुढे सर्व विषयांची संशोधन केंद्रे निर्माण करून समाजाभिमुख Add-on-Corses सुरु करणे गरीब तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय करणे, इ. महत्वाच्या बाबींकडे महाविद्यालयाचे लक्ष राहणार आहे. यासाठी महाविद्यालयाची ११ मजली भव्य, सुसज्ज आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेल्या इमारतीचे बांधकाम लवकरच पूर्ण होईल. यामध्ये पन्नासहून अधिक Smart Class Rooms अत्याधुनिकप्रयोशाळा ग्रंथालय, निरनिराळ्या विषयांची संशोधन केंद्रे, Seminar Hall असणार आहेत. या महाविद्यालयामध्ये समाजातील सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना उत्कृष्ठ शिक्षण मिळावे. त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, हीच सर्व पदाधिकाऱ्याची शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची इच्छा आहे.

महाविद्यालयांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवताना तसेच नाविन्यपूर्ण सुविधा निर्माण करताना, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव, संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. शामकांत देशमुख यांचे तसेच महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. अंजली सरदेसाई यांचे बहुमोल असे योगदान असते. मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंतची प्रगती (२०२०-२१) सर्वांनाच अभिमानस्पद आहे.

महाविद्यालयाच्या या गौरवास्पद प्रगतीमध्ये प्रा. एस. वाय. परांजपे, प्रा. वाय. एस. गंभीर, प्रा. मुकुंद महाजन, प्रा. अ. गो. गोसावी, प्रा. जगदीश चिंचोरे, श्री. अशोक कांबळे, श्री. एस. वाय. कुलकर्णी, श्री गणेश साठे आदींचे योगदान महत्वाचे आहे.

लोकसत्ता Tue, 19 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57825242

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*



**मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे**

कार्याध्यक्ष – प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



**गुरूवर्य श्री. शंकररावजी कानिटकर**

संस्थापक – प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

## मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या अधिपत्याखाली जून १९९९ ला मा. कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन रमाकांत एकबोटे सरांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या संकल्पनेतून मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यात आले. सध्या सुमारे ४००० विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यासाठी सुसज्ञ अशा लॅब, क्लास रूम्स, सेमिनार हॉल सर्व पायाभूत सुविधासह उपलब्ध आहेत. साधारण ८०००० पुस्तकांसह सुसज्ञ असे ग्रंथालय पूर्ण वेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. सुसज्ञ असा जिमखाना व खेळण्याचे मैदान उपलब्ध आहे.

महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण प्राप्त झाले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून व्यावसायिक महाविद्यालयाचा "उत्कृष्ट महाविद्यालय" पुरस्कार मिळवणारे हे पहिले महाविद्यालय ठरले आहे. महाविद्यालयाला **NAAC** च्या मूल्यांकनात "अ" श्रेणी प्राप्त झाली असून **Electrical Engg., E&TC MCA** या अभ्यासक्रमांना **NBA** या संस्थेकडून मूल्यांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयाला **MHRD's Innovation Cell** कडून **"ATAL RANKING OF INSTITUTIONS ON INNOVATION ACHIEVEMENT-2020"** हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या सर्व प्रगतीमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे, स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मा. प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे कार्यवाह मा. प्रा. शामकांत देशमुख, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालाचे आजी-माजी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी (प्लेसमेंट) मोठ्या प्रमाणात देशातील व परदेशातील नामांकित कंपनीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहे, या प्लेसमेंटचा आलेख प्रत्येक वर्षी वाढताना दिसतो. औद्योगिक क्षेत्रातील **Artificial Intelligence, Internet & Electronics** यांचे महत्त्व असाधारण आहे. त्या अनुषंगाने अभियांत्रिकी शिक्षणातील बदल, त्यामध्ये नवे प्रवाह आणणे यावर सखोल अभ्यास करुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व **AICTE** यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तीन नवे अभ्यासक्रम म्हणजेच **"Artificial Intelligence – Machine Learning, Artificial Intelligence – Data Science"** आणि **"Electronics - Computer Engineering"** शाखा मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू करण्याचा निर्णय घेतला.

मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय गेल्या २० वर्षांहून अधिक काळ उत्तम व यशस्वी इंजिनियर्स घडविण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी आज उच्च शिक्षणासाठी व नोकरीच्या निमित्ताने जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहेत. **NBA** व **NAAC** कडून मिळालेले "मूल्यांकन" म्हणजेच या महाविद्यालयाच्या प्रगतीची पावती. नव्या बदलत्या काळात, बदलत्या काळाच्या गरजा ओळखून सकारात्मक बदल स्विकारत महाविद्यालयाने कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा विकास आणि प्रगती होत आहे. मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला भविष्यामध्ये स्वायत्ततेकडे जाण्याचा मानसआहे. तसेच नजीकच्या काळात अभिमत विद्यापीठाचा दर्जा घेण्याचा विचार आहे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी तसेच औद्योगिक संस्थांबरोबर करार करुन नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.

महाविद्यालयाच्या या प्रगतीमध्ये प्रा. डॉ. सौ. कल्याणी जोशी, प्रा. डॉ. सौ. एन. आर. कुलकर्णी, प्रा. डॉ. सौ. सुहासिनी इटकर, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. पद्माकर चिकटे, श्री. दयाराम गांगुर्डे, श्री. समीर ताकवणे, श्री पोपट पायगुडे इ चे योगदान महत्वाचे आहे.

लोकसत्ता Tue, 19 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57825365

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची यशोगाथा



## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे

भारतवर्षाला सुसंस्कृत, सुसंस्कारित, निष्ठावान आणि चारित्र्यसंपन्न नागरिक देणे हा राष्ट्रभक्तिचा, राष्ट्रसेवेचा उत्कृष्ट मार्ग आहे. या उद्देशाने पुण्यामध्ये गुरूवर्य मा. शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५ या सर्वोत्तम शिक्षणसंस्थेची स्थापना दि. १६ मे १९३४ रोजी अक्षय्यतृतीयेच्या मुहुर्तावर केली.

प्रोग्रेसिव्ह म्हणजे प्रगतीशील. प्रगतीशील म्हणजे काळाशी सुसंगत असे धोरण अवलंबणे. त्याचप्रमाणे या प्रगतीशील शिक्षणामध्ये नवीन कल्पनांचा समावेश केला जावा, या हेतूने संस्थेचे नाव "प्रोग्रेसिव्ह" हे ठेवले. "मॉडर्न" या शब्दाचा अर्थ "आधुनिक" असा आहे. कोणत्याही शिक्षण संस्थेने "मॉडर्न" असणे म्हणजे अद्ययावत तंत्रज्ञानांनी समृद्ध होऊन आधुनिक साधन सामुग्रीचा वापर करुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे. त्यामुळे संस्थेच्या पहिल्या शाळेचे नाव "मॉडर्न हायस्कूल" असे ठेवले. "प्रोग्रेसिव्ह"आणि "मॉडर्न" हे दोन शब्द आजही संस्थाचालकांच्या दृष्टीने परवलीचे आहेत. या दोन शब्दांमध्येच संस्थेच्या ध्येय धोरणांची संकल्पना स्पष्ट आहे. आधुनिकते बरोबरच गुरुजनांनी घालून दिलेले आदर्श, संस्कार, मूल्ये, परंपरा गेली ८६ वर्षे संस्थेने कसोशीने जपल्या आहेत. अध्ययन आणि अध्यापन याबाबतीत गुणवत्ता आणि दर्जा राखला आहे. या शिक्षणसंस्थेचे सर्व व्यवहार "स्वच्छ" आणि "पारदर्शक" आहेत. या शिक्षणसंस्थेने विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून संस्थेत देण्यात येणाऱ्या शिक्षणाची, ज्ञानाची दिशा सातत्याने विद्यार्थीभिमुख, समाजाभिमुख ठेवलेली आहे. गेली ८६ वर्षे ही तत्वे सर्वांनीच कसोशीने पाळली आहेत. संस्थेच्या नियामक मंडळातही सर्व स्तरातील कर्तबगार व्यक्ती आहेत.

१९६९ पर्यंत संस्थेच्या प्रगतीचा भर शालेय शिक्षणावर अधिक होता. १९३४ ते १९६९ यादरम्यान संस्थेच्या ६ शाळा सुरु झाल्या. १९७० साली मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महा, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना झाली. स्थापनेच्या दिवसापासून स्वत:च्या मालकीच्या इमारतीत सुरु झालेले हे एकमेव महाविद्यालय. १९८६ पासून संस्थेच्या प्रगतीस वेग आला. विशेषत: १ जानेवारी १९९४ पासून पुण्यातील सुप्रसिद्ध, नामांकित शल्यचिकित्सक आणि मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी संस्थेच्या नियामक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार स्विकारला. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांना द्रष्टेपणाचे वरदान आहे. त्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद सदस्य, वैद्यक विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे प्रकुलगुरु, व्यवस्थापन परिषदेवर मा. राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये सर्जरी विषयाचे प्राध्यापक, भारतातील विविध विद्यापीठांच्या अधिकार मंडळांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या नियोजन मंडळाच्या अनेक समित्यांवर सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची व्यक्ती कार्याध्यक्षपदी असल्याने आणिनियामक मंडळाने त्यांना मोलाची साथ दिल्याने संस्थेचा विकास १९९४ पासून वेगाने झाला.

आज संस्थेच्या ६० शाखा पुणे शहर आणि पुणे जिल्हा परिसरात कार्यरत आहेत. शिशु विद्या मंदिर ते पदवी-पदव्युत्तर म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, संगणक, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, व्यवस्थापन, आरोग्यविज्ञान, कृषी जैवतंत्रज्ञान इ. सर्व विद्याशाखांच्या महाविद्यालयात सुमारे ६०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्था आता वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार आहे. त्याचप्रमाणे संस्था अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची नुकतीच "स्वायत्तता" मिळाली आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठाशी मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथे चालविल्या जाणाऱ्या B.Sc. (Blended) या अभ्यासक्रमासाठी सुमारे ४ वर्षांपूर्वीच करार झाला आहे.अशाच अनेक परदेशी विद्यापीठांशी शैक्षणिक करार करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी- पदव्युत्तर परीक्षेत गुणवत्ता यादीत असतात. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्रीडा प्रकारात संस्थेचे प्रतिनिधित्व करतात. कलाप्रांतात अनेकविद्यार्थी विशेष नैपुण्य मिळवित आहेत. अनेक सांस्कृतिक कलादर्शन स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवित आहेत. अनेक माजी विद्यार्थी सुद्धा समाजातील विविध क्षेत्रात गौरवास्पद कामगिरी करीत आहेत. सस्थेच्या या प्रगतीमध्ये गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके, मो. गो. चाफेकर, संस्थेचे विद्यमान कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. श्री. सुरेश तोडकर, ॲड. बाबासाहेब चव्हाण, डॉ. माधव नामजोशी, रवि किराड, बाळासाहेब हगवणे, चंद्रकांत शेट्टी, ॲड. दादासाहेब बेंद्रे, प्रा. सीताराम रायकर, श्री. प. स.चिरपुटकर, प्रा. डॉ. अरविंद पांडे, ॲड. माणिकराव पाटील, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. डॉ. प्रकाश दिक्षित, श्री. शरद इनामदार, श्री. चित्तरंजन कांबळे, सौ.मोनिका वैद्य आदींचा महत्वाचा वाटा आहे.

Maharashtra Times 19.1.2021

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

### मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे

१५ जून १९७० रोजी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी द्वारा मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. गुरुवर्य शंकररावजी कानिटकर यांनी दिलेले 'मॉडर्न' व 'प्रोग्रेसिव्ह' हे दोन प्रेरणादायी शब्द मंत्र घेऊन, गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके यांच्या पुढाकारातून संस्थेचे हे पहिले वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. संस्थेचे उच्च शिक्षणातील हे पहिले पाऊल. विशेष म्हणजे महाविद्यालय सुरु करण्यासाठीची शासनाकडून परवानगी मागण्याआधीच महाविद्यालयाची इमारत पूर्णपणे बांधून तयार होती. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून अनुभवी व गुणवंत शिक्षकांची नेमणूक महाविद्यालयात संस्थेद्वारा सुरुवातीपासूनच करण्यात आली होती.

समाजाच्या शैक्षणिक सेवेचा वसा घेऊन, १९७० पासून मार्गक्रमण करत असलेल्या या महाविद्यालयात १९७०-७१ या शैक्षणिक वर्षात ७०७ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. महाविद्यालयाने दिलेल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे व संस्थेच्या पाठबळामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी वाढत गेली. महाविद्यालयाच्या ५० व्या वर्षी, म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये, प्रवेशित विद्यार्थी संख्या १२००० पेक्षा जास्त झाली होती. शैक्षणिक वर्ष १९७०-७१ ते शैक्षणिक वर्ष १९७९-८० या पहिल्या दशकामध्ये, वरिष्ठ महाविद्यालयामध्ये केवळ पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात होते. यामध्ये बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. या तीन पदवी अभ्यासक्रमाचा समावेश होता. एक विशेष बाब म्हणजे महाविद्यालयाच्या वाटचालीच्या पहिल्या दशकातच म्हणजे शैक्षणिक वर्ष १९७९-८० मध्ये त्यावेळच्या पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने एम.फिल. व पीएच.डी. चे प्राणीशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र सुरु करण्यात आले होते. महाविद्यालयामध्ये सुरुवातीपासूनच शैक्षणिक कामकाजाच्या बरोबरच क्रीडा आणि कला क्षेत्रावर चांगल्या प्रकारे भर देण्यात आला होता. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीच्या दुसऱ्या दशकामध्ये म्हणजे शैक्षणिक वर्ष १९८०-८१ ते १९८९-९० या कालावधीत, शैक्षणिक वर्ष १९७८-७९ मध्ये, एम.कॉम. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम अनुदानित तत्त्वावर सुरु करण्यात आला होता. या कालावधीमध्ये एम.फिल. व पीएच.डी. चे आणखी एक वनस्पतिशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने सुरु करण्यात आले होते.

पदव्युत्तर अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणात तिसऱ्या दशकामध्ये म्हणजेच १९९०-९१ ते १९९९-२००० या कालावधीमध्ये, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या पुढाकारातून मोठ्या संख्येने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु झाले होते. यामध्ये विनाअनुदानित तत्त्वावरील विविध विषयातील एम.ए. आणि एम.एस्सी. अभ्यासक्रमांचा समावेश होता.महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या वाटचालीत हा एक महत्वाचा टप्पा होता. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी चे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनातून, महाविद्यालयाची होणारी संख्यात्मक व गुणात्मक प्रगती लक्षात घेऊन महाविद्यालयात जास्तीच्या सुविधा पुरविण्यात आल्या होत्या.

महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाबरोबरच, संशोधनाला सुद्धा महत्त्व देणे आवश्यक आहे. अशी आग्रही भूमिका संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांची असल्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ द्वारा मान्यताप्राप्त विविध विषयांची संशोधन केंद्रे महाविद्यालयात सुरु करण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष २००२-०३ मध्ये, राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्था (नॅक), बंगलोर, द्वारा महाविद्यालयाचे प्रथम मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले होते. अशा प्रकारचे मूल्यांकन अगदी सुरुवातीच्या काळात करणाऱ्या मोजक्या महाविद्यालयांमध्ये मॉडर्न महाविद्यालयाचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील संख्यात्मक व गुणात्मक प्रगतीची योग्य दखल घेऊन, त्यावेळच्या पुणे विद्यापीठाद्वारा महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार, शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये प्रदान करण्यात आला होता. शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये, नॅक, बंगलोर द्वारा महाविद्यालयाचे दुसरे मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले. यावेळेस प्राचार्य, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्रशासन व संस्थेचे व्यवस्थापन यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली एकत्रितरीत्या उत्तम प्रकारे तयारी केली होती. त्यावेळच्या मूल्यमापनामध्ये महाविद्यालयाला 'अ' दर्जा प्राप्त झाला.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या यशस्वी वाटचालीच्या पाचव्या दशकामध्ये, म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ ते २०१९-२०२० या कालावधीमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या मार्गदर्शनामुळे महाविद्यालयात एम.ए. (इंग्रजी, भूगोल, अर्थशास्त्र, मराठी, मानसशास्त्र, हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र), एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स, बॉटनी, बायोटेक्नोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, ॲनॅलिटिकल केमेस्ट्री, संख्याशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स) एम.सी.ए. (सायन्स) तसेच बॉटनी, झूलॉजी, मराठी, कॉमर्स,लाईफ सायन्स, अर्थशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोबायोलॉजी या विषयांमध्ये (पीएच.डी.)संशोधन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे PGDFT, PGDT, PGDBF, Fashion Design हे Add-on अभ्यासक्रम चालविले जातात. अनेक नाविन्यपूर्ण सुविधाही निर्माण करण्यात आल्या. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय मूल्यमापन व मूल्यांकन संस्थेद्वारा महाविद्यालयाचे तिसरे मूल्यमापन व मूल्यांकन करण्यात आले होते. त्यावेळेस महाविद्यालयात 'ए प्लस' दर्जा प्राप्त झाला. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा, महाविद्यालयाला 'स्वायत्त महाविद्यालय' हा दर्जा प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाच्या पन्नास वर्षाच्या प्रगतीच्या वाटचालीमध्ये हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठ, आयसर पुणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वप्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी यांच्या सामूहिक प्रयत्नाने, महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. ब्लेंडेड बायोसायन्स हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.

महाविद्यालयाचे एक वैशिष्ट्य म्हणजे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कोणताही नवीन अभ्यासक्रम तयार केला, की तो मॉडर्न महाविद्यालयात प्रथम सुरु केला जातो. हे वैशिष्ट्य महाविद्यालयाने आज पर्यंत जपलेले आहे व पुढेही ते जपले जाईल. शैक्षणिक वर्ष१९८६-८७ मध्ये त्यावेळेच्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेच्या चौथ्या दशकाच्या शेवटी व त्यानंतर पाचव्या दशकात सामूहिक प्रयत्नांमुळे महाविद्यालयास 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार (२००८), 'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सिलेंस (CPE) स्टेटस' (२०११/२०१७), 'बेसिक साईनटिफीक रिसर्च'(UGC-BSR) योजना (२०१२), 'स्टार महाविद्यालय'योजना (२०१३), 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (राष्ट्रीय सेवा योजना)'राज्य पुरस्कार (२०१४), 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार (२०१४), 'कम्युनिटी कॉलेज योजना'(२०१५), 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय(क्रीडा)'पुरस्कार (२०१६/२०१७/२०१८/२०१९/२०२०), **Best Accessible Website** हा राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार (२०१८) इ. अनेक पुरस्कारप्राप्त झाले. **NAAC** बँगलोर द्वारा **A+** श्रेणी प्राप्त. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून 'स्वायत्त'(**Autonomy**) दर्जा प्राप्त झाला. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. "स्वायत्त दर्जा" प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थ्यांना उपयुक्त असे अनेक नवीन अभ्यासक्रम सुरु केले जात आहेत. पाच दशकांच्या शैक्षणिक सेवेच्या दैदिप्यमान वाटचालीमध्ये, महाविद्यालयाने नेहमीच एक समाजाभिमुख व विद्यार्थीभिमुख दृष्टिकोन ठेवलेला आहे. आजपर्यंत महाविद्यालयाने समाजाला अनेक उत्तम खेळाडू, उत्तम संशोधक, उत्तम प्रशासकीय अधिकारी, उत्तम प्राध्यापक, उत्तम डॉक्टर्स, उत्तम शासकीय अधिकारी, उत्तम पोलीस अधिकारी, उत्तम कलाकार दिलेले आहे. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट वाटचालीचे श्रेय प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांच्या अभ्यासपूर्ण बहुमोल मार्गदर्शनाला आणि त्यांच शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग अनुभव व दूरदृष्टीला द्यावे लागेल. महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा प्रा.सौ. ज्योत्स्ना एकबोटे, महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, त्यांचे पालक या सर्वांच्या सहकार्याने व योगदानाने महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होत आहे. महाविद्यालयाच्या प्रगतीच्या या वाटचालीमध्ये आजी-माजी प्राचार्य, रजिस्ट्रार, ग्रंथपाल शारीरिक शिक्षण संचालक, विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नेते श्री. शशिकांत कामठे या सर्वांचेही बहुमोल असे योगदान महाविद्यालयास लाभले आहे.

यापुढे सर्व विषयांची संशोधन केंद्रे निर्माण करून समाजाभिमुख Add-on-Corses सुरु करणे गरीब तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय करणे, इ. महत्वाच्या बाबींकडे महाविद्यालयाचे लक्ष राहणार आहे. यासाठी महाविद्यालयाची ११ मजली भव्य, सुसज्ज आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेल्या इमारतीचे बांधकाम लवकरच पूर्ण होईल. यामध्ये पन्नासहून अधिक Smart Class Rooms अत्याधुनिक प्रयोशाळा ग्रंथालय, निरनिराळ्या विषयांची संशोधन केंद्रे, Seminar Hall असणार आहेत. या महाविद्यालयामध्ये समाजातील सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना उत्कृष्ठ शिक्षण मिळावे. त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, हीच सर्व पदाधिकाऱ्यांची शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची इच्छा आहे.

महाविद्यालयांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवताना तसेच नाविन्यपूर्ण सुविधा निर्माण करताना, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव, संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. शामकांत देशमुख यांचे तसेच महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. अंजली सरदेसाई यांचे बहुमोल असे योगदान असते. मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या महाविद्यालयाची सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंतची प्रगती (२०२०-२१) सर्वांनाच अभिमानस्पद आहे.

महाविद्यालयाच्या या गौरवास्पद प्रगतीमध्ये प्रा. एस. वाय. परांजपे, प्रा. डॉ. अरविंद पांडे, श्री. प. स.चिरपुटकर, प्रा. सीताराम रायकर, प्रा. वाय. एस. गंभीर, प्रा. मुकुंद महाजन, प्रा. अ. गो. गासावी, प्रा. जगदीश चिंचोरे, श्री. अशोक कांबळे, श्री. एस. वाय. कुलकर्णी,, श्री गणेश साठे आदींचे योगदान महत्वाचे आहे.

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

ADVERTORIAL

संस्थापक



गुरूवर्य श्री.शंकररावजी कानिटकर



मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे
कार्याध्यक्ष
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे-५

## मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या अधिपत्याखाली जून १९९९ ला मा. कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन रमाकांत एकबोटे सरांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या संकल्पनेतून मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यात आले. सध्या सुमारे ४००० विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यासाठी सुसज्ज अशा लॅब, क्लास रूम्स, सेमिनार हॉल सर्व पायाभूत सुविधासह उपलब्ध आहेत. साधारण ८०००० पुस्तकांसह सुसज्ञ असे ग्रंथालय पूर्ण वेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. सुसज्ञ असा जिमखाना व खेळण्याचे मैदान उपलब्ध आहे.

महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण प्राप्त झाले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून व्यावसायिक महाविद्यालयाचा "उत्कृष्ट महाविद्यालय" पुरस्कार मिळवणारे हे पहिले महाविद्यालय ठरले आहे. महाविद्यालयाला NAAC च्या मूल्यांकनात "अ" श्रेणी प्राप्त झाली असून Electrical Engg., E&TC MCA या अभ्यासक्रमांना NBA या संस्थेकडून मूल्यांकन प्राप्त झाले आहे. महाविद्यालयाला MHRD's Innovation Cell कडून "ATAL RANKING OF INSTITUTIONS ON INNOVATION ACHIEVEMENT-2020" हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या सर्व प्रगतीमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे, स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मा. प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे कार्यवाह मा. प्रा. शामकांत देशमुख, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालाचे आजी-माजी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी (प्लेसमेंट) मोठ्या प्रमाणात देशातील व परदेशातील नामांकित कंपनीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहे, या प्लेसमेंटचा आलेख प्रत्येक वर्षी वाढताना दिसतो. औद्योगिक क्षेत्रातील Artificial Intelligence, Internet & Electronics यांचे महत्त्व असाधारण आहे. त्या अनुषंगाने अभियांत्रिकी शिक्षणातील बदल, त्यामध्ये नवे प्रवाह आणणे यावर सखोल अभ्यास करुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व AICTE यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तीन नवे अभ्यासक्रम म्हणजेच "Artificial Intelligence – Machine Learning, Artificial Intelligence – Data Science" आणि "Electronics - Computer Engineering" शाखा मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू करण्याचा निर्णय घेतला.

मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय गेल्या २० वर्षांहून अधिक काळ उत्तम व यशस्वी इंजिनियर्स घडविण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी आज उच्च शिक्षणासाठी व नोकरीच्या निमित्ताने जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहेत. NBA व NAAC कडून मिळालेले "मूल्यांकन" म्हणजेच या महाविद्यालयाच्या प्रगतीची पावती. नव्या बदलत्या काळात, बदलत्या काळाच्या गरजा ओळखून सकारात्मक बदल स्विकारत महाविद्यालयाने कार्याध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्री. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखालीमहाविद्यालयाचा विकास आणि प्रगती होत आहे. मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला भविष्यामध्ये स्वायत्ततेकडे जाण्याचा मानसआहे. तसेच नजीकच्या काळात अभिमत विद्यापीठाचा दर्जा घेण्याचा विचार आहे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी तसेच औद्योगिक संस्थांबरोबर करार करुन नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.

महाविद्यालयाच्या या प्रगतीमध्ये प्रा. डॉ. सौ. कल्याणी जोशी, प्रा. डॉ. सौ. एन. आर. कुलकर्णी, प्रा. डॉ. सौ. सुहासिनी इटकर, प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, प्रा. पद्माकर चिकटे, श्री. दयाराम गांगुर्डे, श्री. समीर ताकवणे, श्री पोपट पायगुडे इ. चे योगदान महत्वाचे आहे.

Maharashtra Times 19.1.2021

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# नवभारत

# 'मॉडर्न' शिक्षा में 50 वर्षों की अविरत यात्रा



गुरुवर्य शंकररावजी कानिटकर
संस्थापक



प्रा. डॉ. गजानन एकबोटे
कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी

**महाराष्ट्र में शिक्षा का प्रमुख केंद्र तथा राज्य का ऑक्सफर्ड कहे जाने वाले पुणे शहर में शिक्षा के प्रसार का एक महान मिशन लेकर 'प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी' की स्थापना की गई थी. स्व. श्री. शंकरराव कानिटकर और स्व. श्री. विष्णू ताटके ने सर्वोत्तम शिक्षा का जो बीज बोया था, उसने अगले कुछ वर्षों में शिक्षा के एक कल्पवृक्ष का रूप ले लिया. इस शिक्षा संस्थान के तहत केजी से लेकर पीजी तक शिक्षा दिलाने वाले विभिन्न कॉलेज की शाखाएं विस्तारित हुई. इसी कल्पवृक्ष की उच्च शिक्षा की यह पहली शाखा 1970 में उद्घाटित हुई, जिसका नाम है 'मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, साइन्स एंड कॉमर्स, शिवाजी नगर'. यह कॉलेज महाराष्ट्र के शिक्षा क्षेत्र में माइल स्टोन साबित हुआ है. जिस कॉलेज ने शिक्षा की स्वर्णीम परंपरा स्थापित की उस कॉलेज के 'स्वर्ण जयंती वर्ष' का आज समापन समारोह होने जा रहा है. छात्रों को शिक्षा के माध्यम से जीवन में एक उद्देश्य देने वाले इस कॉलेज की अब तक की यात्रा पर यह एक सरसरी नजर....**




**'मॉडर्न' शिक्षा का माइल स्टोन**
15 जून 1970 को प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी की ओर से मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, साइन्स एंड कॉमर्स, शिवाजी नगर की स्थापना हुई. अपनी स्थापना से ही गुरुवर्य शंकरराव कानिटकर द्वारा दिए गए 'मॉडर्न' और 'प्रोग्रेसिव' यह दोनों ही शब्द एक प्रेरणादायी मंत्र लेकर गुरुवर्य ताटके की पहल पर इस कॉलेज की नींव रखी गई. ग्रेज्युएशन तथा पोस्ट ग्रेज्युएशन की शिक्षा दिलाने वाला प्रोग्रेसिव शिक्षा संस्थान का यह पहला कॉलेज है. इस कॉलेज की विशेषता यह है कि, कॉलेज को सरकार की ओर से मान्यता मिलने से पहले ही कॉलेज की सुसज्जित इमारत बनकर तैयार थी. इससे इस शिक्षा संस्थान के पुरोधाओं के गतिमान कार्य की हम कल्पना कर सकते है. सभी छात्रों को सर्वोत्तम और क्वालिटी शिक्षा मिलें, इसके लिए यहां पर अनुभवी और विशेषज्ञ शिक्षकों की नियुक्ति की गई.

समाज को शिक्षित बनाने का मिशन लेकर स्थापित इस कॉलेज के पहले शैक्षिक वर्ष यानी 1970-71 में केवल 707 छात्रों ने प्रवेश लिया था. यहां पर आने वाले सभी छात्रों का कॉलेज की ओर से विशेष ध्यान रखा गया. उन्हें शिक्षा के लिए पोषक वातावरण तथा हर तरह की मदद दी गई. यही कारण है कि, इस कॉलेज से कई ऐसे छात्र निकले जिन्होंने आगे कर अपने कर्तृत्व से विभिन्न क्षेत्रों में अपना और अपने कॉलेज का नाम रौशन किया. 1970-71 में शुरू हुए इस कॉलेज में दस वर्षों तक केवल स्नातक की शिक्षा दिलाई जाती थी, जिसमें बीएस्सी, बीकॉम तथा बीए का समावेश था. वर्ष 1979-80 से कॉलेज में इसके बाद पोस्ट ग्रेज्युएट की शिक्षा देने का कार्य यहां प्रारंभ हुआ, जोकि और भी उच्च शिक्षा अर्जित करने वाले छात्रों के लिए काफी महत्वपूर्ण साबित हुआ. इस कॉलेज के पहले दशक में ही यानी 1979-80 में उस समय के पुणे विश्वविद्यालय की मान्यता एमफील और पीएचडी के अनुसंधान केंद्र शुरू किए गए थे. यह अनुसंधान केंद्र प्राणिशास्त्र विषय का था.

**विभिन्न पाठ्यक्रमों की शुरुआत**
संस्था के तिसरे दशक में प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे की पहल पर पोस्ट ग्रेजुएट के विभिन्न पाठ्यक्रमों की शुरुआत की गई. इसमें नॉन ग्रैंट एमएस्सी और एमए के पाठ्यक्रमों का समावेश था. तिसरे दशक में संस्था में और भी कई अनुसंधान केंद्रों की शुरुआत की गई. संस्था में छात्रों की बढ़ती हुई संख्या को देखते हुए डॉ. एकबोटे के मार्गदर्शन में महाविद्यालय में क्लासरूम्स की संख्या बढ़ाई गई तथा महाविद्यालय में विभिन्न सुविधाओं में बढ़ोतरी की गई. संस्था के चौथे दशक में कोर्सेस में और सुविधाओं में भी बढ़ोतरी का यही दौर कायम रहा. इस कॉलेज के शिक्षा में बेहतरीन कार्य का संज्ञान लेते हुए सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से विभिन्न अनुसंधान केंद्रों को मान्यता प्रदान की गई. साथ में वर्ष 2002-03 में नैक की ओर से कॉलेज का मूल्यांकन किया गया, जिसमें भी कॉलेज बेहतरीन साबित हुआ. वर्ष 2007-08 में सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से इस कॉलेज को सर्वोत्तम कॉलेज का पुरस्कार दिया गया. वर्ष 2009-10 में नैक द्वारा कॉलेज को 'अ' दर्जा दिया गया. यह इस कॉलेज के लिए एक अविस्मरणीय पल था. इसके बाद तो पुरस्कारों जैसे झड़ी सी लग गई. कॉलेज दिन-ब-दिन और साल दरसाल और भी उन्नत और प्रगत होता गया.

### डॉ. गजानन तथा ज्योत्स्ना एकबोटे का मार्गदर्शन

वर्ष 2011 से 2020 के दौरान प्रा. डॉ. गजानन एकबोटे और महाविद्यालय विकास समिति की अध्यक्ष प्रा. ज्योत्स्ना एकबोटे के अनमोल मार्गदर्शन में महाविद्यालय ने प्रगति के पंख लगाकर और उंची उड़ान भरी. बेहतरीन सुविधाएं और कोर्सेस से कॉलेज को और ज्यादा सफलता मिली. नैक द्वारा सर्वेक्षण तिसरे चक्र में कॉलेज का दर्जा और बढ़कर 'ए+' हो गया. साथ में यूजीसी की ओर से महाविद्यालय को 'स्वायत' दर्जा भी बहाल किया गया. वर्ष 2016-17 में ऑस्ट्रेलिया के मेलबर्न युनिवर्सिटी, आईसर पुणे, सावित्रीबाई फुले पुणे युनिवर्सिटी और प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के संयुक्त प्रयासों के चलते बीएस्सी ब्लेंडेड बायोसाइन्स पाठ्यक्रम की शुरुआत की गई. यह आज तक कॉलेज की विशेष उपलब्धियां रही है. मात्र 707 छात्रों से शुरू हुए इस कॉलेज में बीते 50 वर्षों में काफी लम्बी छलांग लगाई है और आज स्वर्ण महोत्सवी वर्ष के समापन पर इस कॉलेज में छात्रों की संख्या 12 हजार तक पहुंच गई है.



### 'मॉडर्न कॉलेज' की विशेष उपलब्धियाँ

* पुणे विश्वविद्यालय द्वारा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय का पुरस्कार (वर्ष 2008)
* 'नैक' बेंगलूरु द्वारा 'अ' श्रेणी द्वारा रेटिंग (वर्ष 2010)
* यूजीसी (नई दिल्ली) द्वारा 'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सिलेन्स (सीपीई) स्टेटस (वर्ष 2012)
* भारत सरकार के डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी द्वारा 'स्टार महाविद्यालय' का स्टेटस (वर्ष 2013)
* भारत सरकार के डिपार्टमेंट ऑफ साइन्स एंड टेक्नोलॉजी द्वारा 'DTS-FIST' पुरस्कार (वर्ष 2014)
* सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से 'सर्वोत्कृष्ट कॉलेज' (राष्ट्रीय सेवा योजना) का पुरस्कार (वर्ष 2014)
* सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य का पुरस्कार (वर्ष 2014)
* सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' (क्रीडा) पुरस्कार (वर्ष 2016)
* सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' (क्रीडा) पुरस्कार (वर्ष 2017)
* यूजीसी द्वारा 'कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सिलेंस (CPE) स्टेटस (वर्ष 2017)
* नैक (बेंगलुरु) की ओर से 5.51 श्रेयांक के साथ 'अ+' श्रेणी दर्जा (वर्ष 2017)
* सामाजिक न्याय और सबलीकरण विभाग, भारत सरकार द्वारा बेस्ट 'सिम्बल वेबसाइट' का राष्ट्रीय पुरस्कार (वर्ष 2018)
* यूजीसी द्वारा B.Voc योजना के तहत 2 पाठ्यक्रमों के लिए चयन (वर्ष 2019)
* भारत सरकार के डिपार्टमेंट ऑफ साइन्स एंड टेक्नोलॉजी द्वारा DST-FIST योजना (वर्ष 2019)
* सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय की ओर से सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (क्रीडा) पुरस्कार (वर्ष 2019)
* यूजीसी द्वारा M. Voc योजना के तहत 'फैशन टेक्नॉलॉजी एंड एपरेल डिजायनिंग' पाठ्यक्रम के लिए चयन (वर्ष 2019)
* विश्वविद्यालय अनुदान आयोग नई दिल्ली द्वारा परामर्श योजना (मेंटॉर संस्था) के तहत चयन (वर्ष 2019)
* सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय द्वारा पांचवी बार सर्वोत्कृष्ट (क्रीडा) पुरस्कार (वर्ष 2020)

Pune Edition
19-January-2021 Page No. 8
epaper.enavabharat.com

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# नवभारत

## 'मॉडर्न कॉलेज' की प्रगति का मुख्य स्तंभ : डॉ. गजानन एकबोटे



प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी की महान विरासत को संजोते हुए डॉ. गजानन एकबोटे सर पिछले करीब ढाई दशक से ज्ञानदान का कार्य कर रहे हैं. इसके साथ ही वे 'मॉडर्न कॉलेज' को भी सतत रूप से प्रगति के रास्ते पर ले जाने के लिए कार्यरत है. डॉ. एकबोटे को शिक्षा और प्रबंधन क्षेत्र का अच्छा-खासा अनुभव है. सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय में डॉ. एकबोटे ने फैकल्टी ऑफ मेडिसीन के डीन के तौर पर काफी महत्वपूर्ण कार्य किया. वे एक सख्त प्रशासक के तौर पर जाने जाते है. इसके अलावा पुणे के विख्यात बी. जे. मेडिकल कॉलेज में उन्होंने सर्जरी प्रोफेसर के तौर पर बेहतरीन काम किया है. उनके कार्य को देखते हुए महाराष्ट्र के राज्यपाल द्वारा डॉ. एकबोटे को महाराष्ट्र यूनिवर्सिटी ऑफ हेल्थ (नाशिक) के मैनेजमेंट काउन्सिल के सदस्य पद पर चयनीत किया गया.

डॉ. एकबोटे ने नेतृत्व में हमेशा 'मॉडर्न' कॉलेज से संबंधित सभी को मार्गदर्शन दिया और उन्हीं के नेतृत्व में संस्था ने काफी प्रगति की. प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे के सहयोगी भी शिक्षा के प्रति काफी समर्पित भाव से अपना कार्य करते है. पीईएस के संस्थापक स्व. एस. आर. कानिटकर के महान आदर्शों पर चलते हुए संस्था के सभी सदस्य इस विरासत को और ज्यादा लोकाभिमुख कराने के लिए दिन-रात मेहनत करते है. उनका मार्गदर्शन ऐसा रहता है कि, उनके मार्गदर्शन में इस संस्था के सभी सदस्य पीईएस द्वारा संचालित सभी स्कूल-कॉलेजों को एकेडेमिक एक्सलन्स के लिए हमेशा सचेत रहते है और इस दिशा में काम करते है. वे पीईएस के सभी सदस्य शिक्षकों को हमेशा उचित मार्गदर्शन देते है. 'प्रगतिशीलता' और 'आधुनिकता' इन दोनों शब्दों हो पीईएस के सभी सदस्य अपने जेहन में हमेशा जीवित रखते हुए कार्य करते है.

डॉ. एकबोटे के साथ-साथ पीईएस की सहकार्यवाह तथा मॉडर्न कॉलेज के विकास समिति की प्रमुख प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, संस्था के सचिव शशिकांत देशमुख और मॉडर्न कॉलेज के प्राचार्य राजेंद्र झुंजारराव के मार्गदर्शन में यह कॉलेज प्रगति के शिखर पर अग्रेसर है. इन सभी के मार्गदर्शन में मॉडर्न कॉलेज ने हमेशा ही शिक्षा की पवित्रता को बनाए रखते हुए उसका व्यावसायीकरण होने से बचाया है, यह इस कॉलेज की सबसे अलग विशेषता है.

Pune Edition
19-january-2021 Page No. 8
epaper.enavabharat.com

# नवभारत

## 'मॉडर्न विश्वविद्यालय' बनाने के लिए प्रयास



"'मॉडर्न' कॉलेज को आज प्रगति के शिखर पर ले जाने के लिए सभी ने अपनी-अपनी ओर से बहुमूल्य योगदान दिया है. इस कॉलेज को पीईएस के कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे का अनमोल मार्गदर्शन तो प्राप्त हुआ है. इसके अलावा पिछले पांच दशकों में इस कॉलेज ऊंचाइंयों तक ले जाने के लिए और इसमें गुणात्मक बढ़ोतरी करने के लिए महाविद्यालय विकास मिति की अध्यक्ष प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. पद्माकर चिरपुटकर, डॉ. अरविंद पांडे का भी काफी अच्छा मार्गदर्शन मिला है. महाविद्यालय के सभी उपप्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, छात्र तथा अभिभावकों की ओर से इस कॉलेज को काफी अच्छा सहयोग मिला. इसी की बदौलत मॉडर्न कॉलेज का विस्तार हुआ. वर्ष 2019-20 में यूजीसी की ओर से इस कॉलेज को 'स्वायत्त' दर्जा प्राप्त हुआ. यह कॉलेज की प्रगति में एक अहम घटना थी. इस कॉलेज की बेहतरीन शिक्षा के बदौलत ही इस कॉलेज की ओर से समाज को सर्वोत्तम डॉक्टर, विभिन्न खेलों के खिलाड़ी, उच्चपदस्थ अधिकारी, पुलिस के अधिकारी, प्राध्यापक, वैज्ञानिक दिए है. आने वाले समय में संस्था को और भी ज्यादा विकसित करने के लिए प्रयास जारी है. नैक द्वारा दिया गया 'अ+' दर्जा आने वाले समय में भी कायम रखने के लिए प्रयास होगा. अभी भी जिन विभागों में अनुसंधान केंद्र स्थापित नहीं है, ऐसे विभागों में करीब 10 केंद्र स्थापित करने के लिए प्रयास होंगे. अभी को इस महाविद्यालय को 'स्वायत्त' दर्जा है. लेकिन बहोत जल्द 'मॉडर्न कॉलेज' को 'मॉडर्न विश्वविद्यालय' बनाने के लिए का प्रयास किया जाएगा. इसके लिए सभी लोग अपनी-अपनी ओर से योगदान दे रहे है. पीईएस के कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, ज्योत्स्ना एकबोटे, सचिव तथा इस कॉलेज के उपप्राचार्य श्यामकांत देशमुख तथा महाविद्यालय की आईक्यूएसी समन्वयक डॉ. अंजली सरदेसाई का इसमें बहुमूल्य योगदान प्राप्त हो रहा है. आज यह संस्था अपने स्वर्ण महोत्सव वर्ष का समापन कार्यक्रम कर रही है, यह सभी के लिए एक गौरव का क्षण है.

- डॉ. राजेंद्र झुंजारराव,
प्राचार्य, मॉडर्न कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,
शिवाजी नगर, पुणे

Pune Edition
19-january-2021 Page No. 8
epaper.enavabharat.com

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

**नवभारत**

## उत्कृष्ट शिक्षकों ने बदला जीवन



"वर्ष 1970 में मॉडर्न कॉलेज की शुरुआत हुई. इससे पहले सोसाइटी की एक स्कूल थी वहीं से मेरे शैक्षिक जीवन की शुरुआत हुई. अकरावी तक की शिक्षा मैंने वहां अर्जित की. उस समय ताटके सर मुख्याध्यापक थे. वे सोसाइटी के सेक्रेटरी भी थे. इस कॉलेज को शुरू करने में ताटके सर का अहम रोल रहा. इसके बाद लियम सर, गोसावी सर जैसे शिक्षक हमें प्राप्त हुए. मैं स्कूली जीवन में एक मेधावी छात्र था. लेकिन कॉलेज में जाने के बाद और अधिक विकसित हो गया. बारहवी में मुझे और मेरे जैसे मेधावी छात्रों पर शिक्षकों ने विशेष ध्यान दिया. हमारा एक अलग गुट बनाकर हमें ज्यादा किताबें और कोचिंग मुहैया करवाई गई. इस काम में गोसावी सर, लिमये सर और चिरपुटकर सर ने काफी मार्गदर्शन दिया. बेहतरीन शिक्षकों के मार्गदर्शन से हम और तेजी से आगे बढ़े. आगे बीकॉम की पढ़ाई के बाद मुझे इंडियन इनस्टिट्यूट अहमदाबाद में प्रवेश प्राप्त हुआ. आईआईटी में प्रवेश की सारी तैयारी स्नातक की पढ़ाई के दौरान ही पूरी हो चुकी थी. इसके लिए लगने वाली आत्मविश्वास भी मॉडर्न में ही मिला था. अब तक आईआईटी अहमदाबाद में चयनीत मैं कॉलेज का इकलौता छात्र हूं, जिसका मुझे काफी अभिमान है. आगे चलकर मैंने कॉलेज में पूर्व छात्र के तौर पर स्पर्धा परीक्षा के उपक्रम चलाए. कुछ वर्ष तक इंजीनियरिंग में अतिथि शिक्षक के तौर पर अध्यापन भी किया. हम पर उस सम शिक्षकों द्वारा किए गए बेहतरीन प्रयासों की इस विरासत को हम आगे ले जाने का प्रयास कर रहे है. जब भी कॉलेज में कोई कार्यक्रम होता है तो मैं फौरन ही वहां उपस्थित होता हूं. आज जो कोई छात्र उच्च शिक्षा अर्जित करना चाहता है उसके पैर 'मॉडर्न' की ओर बढ़ते है. इस समय आधुनिक संसाधनों का इस्तेमाल करते हुए शिक्षा दिलानी जरुरी है. यह काम मॉडर्न में बेहतरीन तरीके से जारी रहेगा, ऐसी अपेक्षा करता हूं.

– **श्याम वाघ**, पूर्व छात्र बीकॉम, मॉडर्न कॉलेज, पुणे.

Pune Edition
19-january-2021 Page No. 8
epaper.enavabharat.com

**नवभारत**

## समर्पित शिक्षकों की परंपरा



"मॉडर्न कॉलेज को समर्पित शिक्षकों की एक बेहतरीन परंपरा रही है. मैंने वर्ष 1977 में मॉडर्न कॉलेज में प्रवेश किया. मुझपर उस समय चिरपुटकर सर का काफी प्रभाव रहा. सर की अध्यापन पद्धति काफी आकर्षक थी. छात्रों में हमेशा वे सौरार्द का वातावरण रखते थे. उस वर्ष शिक्षा नीति में बदलाव हुआ था और पहली बार बारहवी के लिए बोर्ड शुरू हुआ. इस बदलाव के बाद पहली बार हम परीक्षा दे रहे थे. उस समय पहली बार स्टैटिक विभाग शुरू हुआ था. इस नये क्लास में बैठने की भी जगह उपलब्ध नहीं थी. कई बार हम स्टोर रुम में बैठा करते थे. उस समय के सभी शिक्षक पूरी तरह से तैयारी करते थे. इसमें प्रकाश दीक्षित सर का नाम विशेष तौर पर लेना होगा. सभी शिक्षकों में कमिटमेंट काफी दिखती थी. उस समय संस्था की इमारत ज्यादा बड़ी नहीं थी, लेकिन अब काफी बदलाव हुआ है. महाराष्ट्र का सक्षम निर्माण करने के लिए शैक्षिक तौर पर इस शिक्षा संस्थान का काफी अहम योगदान है. हमें सी. जी. कुलकर्णी सर स्टैटिक और मैथेमेटिक्स और गंभीर सर फिजिक्स पढ़ाया करते थे. कई बार शिक्षक हमें हंसी-मजाक के साथ पढ़ाते थे, जिससे हमें यहां शिक्षा अर्जित करते वक्त काफी आनंद मिलता था. मैं काफी शरारती स्टूडेंट था फिर भी समर्पित शिक्षकों ने मुझे काफी अच्छी तरह से समझाया. हर एक छात्र के सभी सवाल अच्छी तरह से हल हों, इस दिशा में शिक्षक प्रयास करते थे. आने वाले समय में शिक्षा में आमूलचूल परिवर्तन होना जरुरी है. छात्रों का सर्वांगीण विकास हों, इस दिशा में शिक्षकों द्वारा पढ़ाना आवश्यक है. आज हर क्षेत्र में तकनीक उन्नत होती जा रही है, जिससे शिक्षक भी तकनीकी तौर पर काफी मजबूत होने चाहिए और यही तकनीक छात्रों तक सरल भाषा में कैसे पहुंचे इस दिशा में शिक्षकों द्वारा प्रयास की जरुरत है. तेजी से बदलती हुई दुनिया में आज विभिन्न क्षेत्रों में अवसर उत्पन्न हो रहे है. उन अवसरों का लाभ छात्रों को दिलाते दिलाने का प्रयास होना जरुरी है. मैं आशा करता हूं की शिक्षा क्षेत्र की सभी चुनौतियों से पार पाते हुए मॉडर्न कॉलेज अपनी स्वर्ण महोत्सवी यात्रा भी जारी रखेगा और इस कॉलेज छात्रों को शिक्षा के साथ-साथ विभिन्न अवसर प्राप्त होंगे.

– **सी. ई. पोतनीस**, पूर्व छात्र बीएस्सी स्टैटिक, मॉडर्न कॉलेज, पुणे

Pune Edition
19-january-2021 Page No. 8
epaper.enavabharat.com





## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

नवराष्ट्र

# उत्कृष्ट शिक्षकांचा सहवास लाभला : श्याम वाघ

१९७० साली मॉडर्न कॉलेज सुरू झाले. कॉलेज सुरू होण्यापूर्वी सोसायटीची शाळा होती. तिथूनच मी अकरावीपर्यंतचे शिक्षण मॉडर्न हायस्कुल मधूनच पूर्ण केले. त्यामुळे प्राथमिक शाळेपासून ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेतला विद्यार्थी आहे. आमच्यावेळी ताटके सर जे मुख्याध्यापक होते, ते सोसायटीचे सेक्रटरी होते. ताटके सरांचा कॉलेज सुरू करण्यामध्ये खूप मोठा वाटा आहे. त्यावेळी आमची पहिली बॅच होती. त्यामुळे सर्व हेड ऑफ द डिपार्टमेंट शिकवायला असायचे लिमये सर, गोसावी सर यांच्यासारखे शिक्षक म्हणून आम्हाला लाभले.

ताटके सरांनी पुण्यातील सर्वोत्कृष्ट शिक्षक वर्ग इथे शिकवण्यासाठी नेमला होता. असा उत्तम शिक्षक वर्ग आम्हाला त्यावेळी शिकवण्यास होता. मी शालेय जीवनातही गुणवंत विद्यार्थी होतो. परंतु कॉलेजला गेल्यानंतर अधिकधिक विकसित होत गेलो. बारावीत असताना कॉलेजने आमच्या बॅचवर विशेष कष्ट घेतले होते. त्यावेळी हुशार मुलांचा असा स्वतंत्र गट तयार केला आहे. त्यामुळे अधिकची पुस्तके, माहिती, कोचिंग, वेगवेगळ्या ठिकाणीची माहिती दिली जात होती.



उत्कृष्ट शिक्षकांचा सहवास आम्हाला त्यावेळी लाभला, त्याचा फायदा पुढे बी कॉम पूर्ण केल्यानंतर इंडियन इ = ि स्ट ट्यू ट म ६ ये अहमदाबादमध्ये प्रवेश मिळवताना झाला. आयाआयटीला प्रवेशाची सर्व तयारी पदवीच्या काळातच झाली होती. त्यासाठी लागणार आत्मविश्वास , अभ्यास या सगळ्या गोष्टी मला कॉलेजलाच मिळाल्या होत्या. आतापर्यंत आयआयटी अहमदाबादला निवड झालेला मी एकमेव विद्यार्थी असल्याचे मी अत्यंत अभिमानाने सांगू इच्छितो.

पुढे माजी विद्यार्थी म्हणून कॉलेजमध्ये स्पर्धापरीक्षेची तयारी सारखे अनेक उपक्रम राबवले.त्यातही माजी विद्यार्थी म्हणूनही सहभागी झालो. काही वर्षे कॉलेजमध्ये व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणूनही शिकवले. आज माझ्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवताना असताना सातत्याने कोलॅजने, शाळेने केलेल्या भक्कम पायाभरणीची आठवण येते. सुरुवातीच्या काळात आम्हा विद्यार्थ्यांवर घेतलेल्या कष्टाची जाणीव ठेवून आम्हीही पुढील पिढयांना मार्गदर्शन करण्याचे काम करत आहोत, ज्या ज्यावेळी कॉलेजमधून बोलावले जाते तेव्हा आवर्जून आम्ही तिथे जातच असतो.

त्यावेळी लिमये सर प्राचार्य होते, त्यावेळी जाणीवपूर्वक शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे जास्तीत जास्त लक्ष द्यायला सांगितले, ती गोष्ट आम्ही कधीही विसरू शकत नाही. गोसावी सरांनी लिमये सरांकडून स्फुर्ती घेऊन हुशार मुलांचा गट तयार केला, क्लास व्यतिरिकतही अधिकचा वेळा ते आम्हाला देत, सातत्याने आमच्याशी बोलत असत, अनेक इनपुट्स देता असत. चिरपुटकर सरांचेही आम्हाला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

बदलत्या काळानुसार नवनवीन अभ्यासक्रम कॉलेजमध्ये सुरू करण्याचे काम संस्था करत असते. त्यामुळे नावाप्रमाणेच सातत्याने प्रगतीच्या दिशेने संस्थेची वाटचाल सुरू असलेली दिसून येते. संस्थेचा नाव लौकिक मोठा असल्यामुळे शहराबाहेर अनेक विद्यार्थी शिकण्यासाठी मॉडर्नला प्राधान्य देताना दिसतात. क्रीडा,सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्व स्थरवर कॉलेज कायम अग्रेसर असलेले पहायला मिळते. अलीकडच्या ऑनलाईन शिक्षणाचा प्रभाव वाढत असताना प्रत्यक्ष शिक्षण पद्धती व ऑनलाईन असा दोन्हीचा मेळ घालून शिक्षण मिळणे आवश्यक आहे.

Pune Plus Edition
19 January 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

नवभारत

## स्वर्ण महोत्सवी वर्ष में अभिनव कार्यक्रमों का रेला

स्वर्ण महोत्सव वर्ष के स्वर्णीम अवसर पर मॉडर्न कॉलेज में विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया गया. स्वर्ण महोत्सवी वर्ष की शुरुआत 12 अगस्त 2019 को विख्यात वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर के हाथों मेधावी छात्रों को सम्मानीत कर की गई. इसके अलावा 12 फरवरी 2020 को महाराष्ट्र के उच्च शिक्षा मंत्री उदय सामंत की प्रमुख उपस्थिति में कार्यक्रम आयोजित किया. इस समय सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. नितिन करमलकर, पीईएस के कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, सहसचिव सुरेश तोडकर तथा संस्था के एलएमसी सदस्यों की उपस्थिति में संस्था के रिपॉजिटरी, वर्टिकल गार्डन और ऑर्किड हाऊस, मेडिटेशन पॉइंट, मॉडर्न सेल्फी पॉइंट जहां पर पानी बचाने का संदेश दिया गया है, इन कार्यक्रमों का आयोजन किया गया.

इसके अलावा स्टेट लेवल सेमीनार, विभिन्न विषयों के वर्कशॉप, इंटर कॉलेज वर्कशॉप, ट्रेनिंग सेमिनार, फैकल्टी डेवलपमेंट प्रोग्राम्स, बूक फेस्टीवल, बायोटेक फेस्ट, मराठी भाषा संवर्धन पखवाडा, ग्रंथदिंडी, वसुंधरा फेस्ट, फनफेयर गेम्स, काउन्सिलिंग कैम्प, क्विज कॉम्पिटिशन तथा और भी विभिन्न कार्यक्रम आयोजित किए गए. इन सेमिनार और वर्कशॉप में विभिन्न विशेषज्ञों को बुलाया गया, जिनका अनमोल मार्गदर्शन छात्रों को प्राप्त हुआ. कोरोना महामारी और लॉक डाउन के चलते कार्यक्रमों के आयोजनों पर काफी मर्यादाएं थी, लेकिन फिर भी कार्यक्रमों के आयोजन के उत्साह में कोई कमी नहीं आई.









• परिशिष्ट संपादन : सुधीर देशमुख • डिजाइनर : प्रकाश पवार

Pune Edition
19-january-2021 Page No. 8
epaper.enavabharat.com

## मातृभूमी, मातृभाषेचा अभिमान बाळगा

### राज्यपाल भगतसिंह कोश्यारी : मॉडर्न महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे: "केवळ आधुनिक बनण्यापेक्षा आदर्श बनण्यासाठी झटणे गरजेचे आहे. सदाचार ही जीवनातील महत्त्वपूर्ण बाब आहे. सदाचारी व्यक्तीचा सदैव गौरव केला जातो, यासाठी सर्वांनी सदाचारी बनावे. परकीय देशांच्या भाषेचे ज्ञान घेताना मातृभाषेकडे दुर्लक्ष करू नका. आपल्या मातृभूमीचा व मातृभाषेचा सदैव अभिमान बाळगा," असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात मंगळवारी (दि. १९) कोश्यारी बोलत होते. पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव आदी या वेळी उपस्थित होते.

कोश्यारी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण बाबींचे अधिकाधिक ज्ञान ग्रहण करून विद्वान बनावे. भारत हा प्राचीन काळापासून अनेक गोष्टींमध्ये अग्रेसर देश म्हणून ओळखला जातो. आपल्या ज्ञानाचा देशहितासाठी उपयोग करा आणि सर्वांनी जगभरात चांगले नाव कमवा. तसेच नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत.

डॉ. नितीन करमळकर, डॉ. गजानन एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. डॉ. अंजली सरदेसाई यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती दिली. सूत्रसंचालन शामकांत देशमुख यांनी केले. डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी आभार मानले.

Lokmat 20.1.2021

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# आधुनिकपेक्षा आदर्श बना : राज्यपाल कोश्यारी

## 'मॉडर्न'च्या सुवर्णमहोत्सवाची सांगता; 'प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबिन'चे अनावरण

**पुणे, ता. १९ :** "आपण सर्वजण आधुनिकीकरणाचा ध्यास घेऊन वाटचाल करत आहोत. परंतु, केवळ आधुनिक बनण्यापेक्षा आदर्श बनण्यासाठी प्रयत्न करा. आधुनिकीकरण झाले म्हणून आपली मातृभूमी, मातृभाषा आणि संस्कृतीला विसरू नका. नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेचा आग्रह धरा," असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राज्यपाल भगतसिंग कोश्यारी बोलत होते. महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. सुरेश तोडकर, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव



**शिवाजीनगर : मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात अनौपचारिक गप्पांत रंगलेले राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे.**

उपस्थित होते. 'सेंट्रल सॉफिस्टिकेटेड ॲनालॅटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी' आणि 'प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबिन'चे डिजिटल स्वरूपात अनावरण केले. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले.

कोश्यारी म्हणाले, 'नावीन्यपूर्ण गोष्टींचे ज्ञान ग्रहण करून विद्यार्थ्यांनी विद्वान बनावे. भारत हा प्राचीन काळापासून अनेक गोष्टींमध्ये अग्रेसर देश आहे. भविष्यात देखील आपण सर्वांत पुढे राहू. यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा देशहितासाठी उपयोग करावा. नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत, असे सांगून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये आजवर अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे व संस्थेचे कौतुक केले.

कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, "विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना दर्जेदार शिक्षण देणे तसेच त्यांना आपल्या शैक्षणिक संस्थेत टिकवून ठेवणे हे आव्हान असते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेत चांगल्या संकल्पना व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत येतात.

"दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आमची संस्था नेहमीच भर दिला आहे. परंतु संस्थांना स्वायत्तता दिल्यानंतर त्यांना त्यांच्या क्षमतेनुसार काम करण्याची संधी दिली जात नाही' अशी खंतही डॉ. गजानन एकबोटे यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या वाटचालीचे प्रा. डॉ. अंजली सरदेसाई यांनी सादरीकरण केले. प्राचार्य झुंजारराव यांनी आभार मानले.

### स्वायत्तता आहे तर अडवणूक नको

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) गुणवत्ता व क्षमता असलेल्या महाविद्यालयांना स्वायत्तता देऊ केली आहे. तरीही शासनस्तरावरून अडवणूक केली जात असल्याने या स्वायत्ततेचा उपयोग करता येत नाही. महाविद्यालयांना पूर्ण क्षमतेने काम करू दिले पाहिजे असे डॉ. गजानन एकबोटे यांनी सांगितले. त्यावर राज्यपाल कोश्यारी आणि कुलगुरू करमळकर यांनीही सहमती दर्शविली.

Sakaal 20.1.2021

# 'नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा'

## मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सांगता



**मॉडर्न महाविद्यालच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. गजानन एकबोटे, डॉ. नितीन करमळकर, महापौर मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.**

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत, असे सांगून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये आजवर अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे व संस्थेचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी कौतुक केले. आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना आपली मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि आपल्या संस्कृतीला विसरू नका, असेही यावेळी कोश्यारी यांनी नमूद केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राज्यपाल भगतसिंग कोश्यारी बोलत होते. यावेळी महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे, प्रा.सुरेश तोडकर उपस्थित होते. यावेळी सेंट्रल सॉफीस्टीकेटेड ॲनालेटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसीलिटी आणि प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबीनचे डिजिटल स्वरुपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रा.डॉ. गजानन एकबोटे व प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांना राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रा.डॉ.गजानन एकबोटे म्हणाले, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आमच्या संस्थेने नेहमीच भर दिला आहे.

• सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी–सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना दर्जेदार शिक्षण देणे, तसेच त्यांना आपल्या शैक्षणिक संस्थेत टिकवून ठेवणे हे आव्हान असते. विद्यार्थी हिताचे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करून त्यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे करणे महत्त्वाचे असते. हे काम मॉडर्न महाविद्यालयात विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. संस्थेच्या वाटचालीबाबत प्रा. डॉ. अंजली सरदेसाई यांनी माहिती दिली. सूत्रसंचालन संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी केले, तर प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी आभार मानले.

Kesari 20.1.2021

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

सामना



# मातृभाषेतूनच चांगले शिक्षण घेता येते!

## मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सांगता

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) – आधुनिकीकरणाकडे वाटचाल करण्यापेक्षा इतरांसाठी आदर्श बनण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आधुनिक काळात इंग्रजीसारख्या परकीय भाषेचे ज्ञान आत्मसात करीत असताना मातृभाषेकडे दुर्लक्ष करू नका. मातृभाषेतून शिकल्यास आपल्याला चांगल्या शिक्षणाबरोबर उत्तम ज्ञान आत्मसात करता येईल, असे मत राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष सांगता समारंभात ते बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, महापौर मुरलीधर मोहोळ, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. गजानन एकबोटे, प्रा. जोत्स्ना एकबोटे यावेळी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी अंकाचे प्रकाशन आणि प्रा.डॉ. गजानन एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव यांना कोश्यारी यांच्या हस्ते गौरवपत्र प्रदान करण्यात आले.

कोश्यारी म्हणाले, युवकांसाठी आज शिक्षणाच्या नवनवीन सुविधा उपलब्ध झाल्या असून, त्यांनी मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग देशहितासाठी केला पाहिजे. इतर देश आपल्याकडून शिकतील, अशा नावीन्याचा शोध लावण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा, असे आवाहन करत केंद्राच्या नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनीही प्रयत्न केले पाहिजेत', असे कोश्यारी यांनी सांगितले.

डॉ. करमळकर म्हणाले, 'कोरोनामुळे सर्वच शिक्षण संस्थांपुढे शिक्षणाच्या बाबतीतील मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत प्रोग्रेसिव्ह संस्थेचे मॉडर्न महाविद्यालय नवनवीन संकल्पना राबवून सर्व आव्हानांवर मात करीत आहे.

डॉ. एकबोटे म्हणाले, 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी ही शिक्षकांनी स्थापन केलेली संस्था आहे. त्यामुळे या संस्थेच्या माध्यमातून आम्ही शिक्षणाचे पावित्र्य जपत आहोत.

Pune Edition
Jan 20, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com

Saamana 20.1.2021

पुढारी



सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवर.

# मातृभूमी, मातृभाषा, सदाचार, संस्कृतीला विसरू नका

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे आवाहन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

आधुनिकीकरणाकडे वाटचाल करीत असताना मातृभाषा, सदाचार आणि संस्कृतीला विसरू नका. जगाकडून आपण शिकण्यापेक्षा आपण जगाला काय देऊ शकतो याचा विचार करा. नवीन शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेतून शिक्षण देण्याचा आग्रह धरायला हवा. प्रादेशिक भाषेतून मुलांना शिक्षण दिल्यास अभ्यासक्रमातील मूल्ये व तत्त्वे उत्तम पद्धतीने समजतात, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात कोश्यारी बोलत होते. या वेळी महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव आदी उपस्थित होते. या वेळी सेंट्रल सॉफीस्टीकेटेड ॲनॅलॅटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी; तसेच प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबीनचे डिजिटल स्वरूपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले.

कोश्यारी म्हणाले, देशात नवे शैक्षणिक धोरण आले आहे. त्यामध्ये मुलांचे शिक्षण हे मराठी, तेलगू, तमिळ, बांगला अशा प्रादेशिक भाषांमधून देण्याची तरतूद केली आहे. केंद्र सरकारमधील मंत्री व राज्यमंत्री यांच्यासोबतच अनेक मोठ्या व्यक्तिंना संपूर्ण इंग्रजी येत नाही. मात्र, आजही ते यशस्वी आहेत. त्यामुळे इंग्रजीचे शिक्षण आवश्यक त्या गोष्टींसाठी घ्यायला हवे; मात्र शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरायला हवा, असेही त्यांनी सांगितले.

जगात विविध क्षेत्रांत नावीन्यपूर्ण संशोधन होत असून, त्याचे पेंटट देशांना मिळत आहे. या पेटंटची संख्या लक्षणीय आहे. मात्र, त्या तुलनेत आपल्या देशात पेटंटची निर्मिती होत नसल्याचे चित्र आहे. त्यासाठी मॉडर्नसारख्या महाविद्यालयांना आधुनिकतेची कास धरून नावीण्यपूर्ण संशोधन करावे लागणार आहे. प्राचीन युगात देशात पुष्पक विमान होते. मात्र, आता राफेलसारखे विमान देशात आले असून, त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी फ्रान्सचे अधिकारी आले आहेत. या परिस्थितीत आपण संशोधन करून, आत्मनिर्भर व्हायला पाहिजे, असेही कोश्यारी यांनी स्पष्ट केले.

डॉ. एकबोटे, डॉ. करमळकर यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अंजली सरदेसाई यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीची माहिती दिली. सोसायटीचे कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. झुंझारराव यांनी आभार मानले.

Pune Edition
Jan 20, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

# मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरा

### मॉडर्न कॉलेजच्या कार्यक्रमात राज्यपाल कोश्यारी यांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'नवीन शैक्षणिक धोरणानुसार मुलांना मातृभाषेतून शिक्षण देण्याचा आपण आग्रह धरायला हवा. मातृभाषेतून मुलांना शिक्षण दिल्यास अभ्यासक्रमातील मूल्ये व तत्त्वे उत्तम पद्धतीने समजतात,' असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी व्यक्त केले. आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना आपली मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि संस्कृतीला विसरू नका, असे आवाहनही कोश्यारी यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून कोश्यारी बोलत होते. या वेळी महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव आदी उपस्थित होते. या वेळी 'सेंट्रल सॉफिस्टिकेटेड अॅनॅलॅटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी'; तसेच 'प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबिन'चे डिजिटल स्वरूपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. कोश्यारी म्हणाले, 'देशात नवे शैक्षणिक धोरण आले आहे. त्यामध्ये मुलांचे शिक्षण मराठी, तेलगू, तमिळ, बंगाली अशा प्रादेशिक भाषांमधून देण्याची तरतूद केली आहे. मुलांना प्रादेशिक भाषांमधून शिक्षण दिल्यामुळे, त्यांच्या मनात शैक्षणिक मूल्ये आणि अभ्यासक्रमाची तत्त्वे उत्तम रुजतात. त्यामुळे शिक्षणसंस्थांनी शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्र सरकारमधील मंत्री व राज्यमंत्री यांच्यासोबतच अनेक मोठ्या व्यक्तींना संपूर्ण इंग्रजी येत नाही. मात्र, आजही ते यशस्वी आहेत. त्यामुळे इंग्रजीचे शिक्षण आवश्यक त्या गोष्टींसाठी घ्यायला हवे. मात्र, शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरायला हवा.'

डॉ. एकबोटे म्हणाले, 'नव्या शैक्षणिक संस्थांमध्ये सध्या 'क्लास एज्युकेशन'ला अधिक महत्त्व दिले जाते. मात्र, मॉडर्न महाविद्यालयात 'मास एज्युकेशन'ला अधिक महत्त्व देऊन समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते.'

प्रा.ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अंजली सरदेसाई यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीची माहिती दिली. सोसायटीचे कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. झुंजारराव यांनी आभार मानले.



मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि डॉ. गजानन एकबोटे.

### 'भारतात पेटंटची संख्या कमी'

'जगात विविध क्षेत्रांत नावीन्यपूर्ण संशोधन होत असून, त्याचे पेटंट देशांना मिळत आहे. या पेटंटची संख्या लक्षणीय आहे. मात्र, त्या तुलनेत आपल्या देशात पेटंटची निर्मिती होत नसल्याचे चित्र आहे. त्यासाठी मॉडर्नसारख्या महाविद्यालयांना आधुनिकतेची कास धरून नावीन्यपूर्ण संशोधन करावे लागणार आहे. या परिस्थितीत आपण संशोधन करून आत्मनिर्भर व्हायला पाहिजे,' असेही कोश्यारी यांनी सांगितले.

### 'स्वायत्ततेला चालना द्या'

**पुणे :** महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) मिळालेल्या स्वायत्ततेचा उपयोग करता येत नसल्याचे पडसाद प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यक्रमात उमटले.

महाविद्यालयांना पूर्ण क्षमतेने काम करू देण्यासाठी विद्यापीठ व राज्य सरकारने अडवणूक करू नये, अशी भूमिका प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी मांडली. यावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनीही पूर्ण स्वायत्तता मिळण्याचे समर्थन केले.

डॉ. एकबोटे म्हणाले, 'विद्यापीठ व उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मान्यता व परवानगीच्या नावाखाली अडचण निर्माण केली जाते. त्यामुळे महाविद्यालयांची स्वायत्तता पारतंत्र्यात आहे.' यावर कोश्यारी यांनी सभागृहात उपस्थित असलेले 'यूजीसी'चे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांना संबंधित प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली. त्याचबरोबर शैक्षणिक वाटचाल उत्तम करण्यासाठी; नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाविद्यालयांना स्वायत्तता आवश्यक आहे, असेही कोश्यारी यांनी सांगितले.

### 'स्वायत्त महाविद्यालयांसाठी समिती'

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या काही अधिकाऱ्यांना स्वायत्ततेसारख्या काही विषयांमध्ये कार्यवाही करायची झाल्यास, ते हात आखडता घेतात. मात्र, महाविद्यालयांच्या स्वायत्ततेबाबतचा प्रश्न सोडविण्यासाठी विद्यापीठाने समिती स्थापन केली आहे. शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता चांगल्या असणाऱ्या महाविद्यालयांना स्वायत्ततेचा फायदा मिळण्यासाठी पुणे विद्यापीठ प्रयत्नशील आहे,' असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 20.1.2021

# शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरणे आवश्यक

### राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेत शिकण्याची तरतूद आहे. मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शैक्षणिक मूल्ये आणि अभ्यासक्रमाच्या तत्त्वांचे उत्तम आकलन होते. इंग्रजीचे शिक्षण आवश्यक असले, तरी शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरायला हवा. आधुनिकीकरण स्वीकारताना मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि संस्कृतीला विसरता कामा नये, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी मांडले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या समारोप कार्यक्रमात कोश्यारी बोलत होते. महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव आदी या वेळी उपस्थित होते. महाविद्यालयातील अत्याधुनिक प्रयोगशाळा, प्राचार्य आभासी कक्षाचे उद्घाटन आणि सुवर्ण महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांनी केले.

कोश्यारी म्हणाले की, नावीन्यपूर्ण संशोधनासाठीचे एकस्व अधिकार (पेटंट) देशांना मिळत आहेत. त्यामुळे परदेशातील एकस्व अधिकारांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत देशात एकस्व अधिकारांचे प्रमाण फारच कमी आहेत. त्यासाठी मॉडर्न महाविद्यालयासारख्या संस्थांनी 'मॉडेल' झाले पाहिजे. आपल्याकडील प्राचीन ज्ञान, योगाकडे जग पाहात आहे. त्यामुळे मॉडर्न होताना जुन्याची कास सोडून चालणार नाही.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची वाटचाल आता स्वायत्त विद्यापीठाच्या दिशेने होत आहे. विद्यापीठातील अनेक नावीन्यपूर्ण संकल्पना मॉडर्न महाविद्यालयातूनच झाल्याचे डॉ. करमळकर यांनी सांगितले.



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते डॉ. गजानन एकबोटे यांना गौरवपत्र प्रदान करण्यात आले.

### मराठीतच बोला...

महाविद्यालयाच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीची प्रास्ताविकातून माहिती देताना प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी राज्यपालांना समजावे यासाठी इंग्रजी आणि हिंदीचा आधार घेतला. त्यावेळी राज्यपालांनी त्यांना मराठीतूनच बोलण्यास सांगितले.

लोकसत्ता Wed, 20 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57849372

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

## नवभारत

### राज्यपाल भगत सिंह कोश्यारी का मंतव्य

## 'मॉडर्न महाविद्यालय' की शैक्षणिक यात्रा



नवभारत न्यूज नेटवर्क

पुणे. प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी द्वारा संचालित मॉडर्न कला, विज्ञान और वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) शिवाजीनगर की शैक्षणिक यात्रा इस समय विश्वविद्यालय की ओर बढ़ रही है. ऐसा मंतव्य महाराष्ट्र के राज्यपाल भगत सिंह कोश्यारी ने दिया. मॉडर्न महाविद्यालय के स्वर्ण महोत्सवी वर्ष का समापन समारोह मंगलवार 19 जनवरी को हुआ. इस कार्यक्रम में प्रमुख अतिथि के तौर पर कोश्यारी बोल रहे थे.

### सर्वोत्तम शिक्षा का आयकॉन मॉडर्न

कार्यक्रम में अतिथि के तौर पर सावित्रीबाई फुले विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. नितिन करमलकर भी उपस्थित थे. कोश्यारी ने कहा कि, 'मॉडर्न' ने उल्लेखनीय शिक्षा के लिए आज तक विभिन्न पुरस्कार प्राप्त किए हैं. यह कॉलेज सर्वोत्तम शिक्षा का एक आयकॉन बन चुका है. जिस तरह देश में अनुसंधान की परंपरा काफी पुरानी है, उसी तरह 'मॉडर्न' में भी विभिन्न तरह के अनुसंधान होते रहते हैं. इन सभी कारणों से इस समय मॉडर्न की यात्रा विश्वविद्यालय की ओर हो रही है. उन्होंने कहा कि, 'मॉडर्न' को स्वायत्त दर्जा होने के चलते विद्यार्थियों को बेहतरीन पाठ्यक्रम और शिक्षा दिलाने का कार्य यहां चल रहा है. इस महाविद्यालय में मिलने वाले ज्ञान का प्रकाश पूरी दुनिया में फैलाने की जिम्मेदारी छात्रों की ओर से बखूबी निभाई जा रही है. कॉलेज को सेंटर ऑफ एक्सीलेन्स बनाने के लिए और अधिक प्रयास करने होंगे.

### जरूरतमंदों को दी जाती है शिक्षा : डॉ. एकबोटे

प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे ने कहा कि, मॉडर्न कॉलेज में समाज के गरीब और जरूरतमंद छात्रों को भी बेहतरीन शिक्षा दिलाई जाती है. संस्था ने हमेशा ही समाज के हितों को सर्वोपरि माना है. यही कारण है कि, इस कॉलेज के छात्र शिक्षा पूरी होने के बाद भी कॉलेज की प्रगति में हमेशा कुछ ना कुछ योगदान देते रहते हैं. नए पाठ्यक्रमों को शुरू करने में और ज्यादा स्वायत्तता की जरूरत है, जिससे यह कॉलेज और भी ज्यादा प्रगति कर सके.

### अत्याधुनिक प्रयोगशाला का उद्घाटन

इस अवसर पर 'मॉडर्न' में अत्याधुनिक प्रयोगशाला का उद्घाटन डिजिटल प्रणाली से भगत सिंह कोश्यारी के हाथों किया गया. केंद्रीय विज्ञान तकनीक मंत्रालय की ओर से 'डीएसटी-फिस्ट' के तहत प्राप्त करीब डेढ़ करोड की निधि से यह प्रयोगशाला बनाई गई है. कोरोना महामारी के दौरान महाविद्यालय में आने वाले अभ्यागतों को प्राचार्य से मिलना आसान हो, इसके लिए बनाए गए आभासी कक्ष का उद्घाटन भी राज्यपाल के हाथों किया गया. इस समय स्वर्ण महोत्सव विशेषांक का विमोचन किया गया. महाविद्यालय समिति की सचिव प्रा. ज्योत्स्ना एकबोटे ने प्रस्तावना में 'मॉडर्न' की प्रगति की जानकारी दी. प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजार राव ने आभार प्रकट किए. कार्यक्रम में प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी की उपकार्यवाहक डॉ. निवेदिता एकबोटे, सहकार्यवाहक सुरेश तोडकर उपस्थित थे. कार्यक्रम का सूत्रसंचालन प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के सचिव श्यामकांत देशमुख ने किया.

Pune Edition
20-january-2021 Page No. 2
epaper.enavabharat.com

## नवराष्ट्र

### महोत्सव राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे मत

## 'मॉडर्न महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने'

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

पुणे : 'मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड मिळाले आहेत.महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे राज्यपाल 'मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड मिळाले आहेत. महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे, महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ पडला. यावेळी प्रमुख पाहुणे राज्यपाल भगत सिंह कोश्यारी हे उपस्थित होते.मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड मिळाले आहेत.महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे राज्यपाल आपल्या भाषणात म्हणाले. संशोधनाची आपली परंपरा अतिशय जुनी आहे . पुराणातील महत्त्वाचे संशोधन म्हणजे पुष्पक विमान असल्याचा उल्लेख त्यांनी केला.आजच्या काळात सुध्दा अशा नाविन्यपूर्ण संशोधनाला अतिशय महत्त्व आहे. आधुनिकता आणि परंपरा यांचा संगम शिक्षणात असणे आवश्यक आहे. नवीन शिक्षण पद्धतीत भारतीय भाषांना महत्त्वाचे स्थान आहे.



त्यामुळे इंग्लिश या ज्ञान भाषेबरोबर मातृभाषा जपणे महत्वाचे आहे .आपण आपल्या देशातील चांगल्या गोष्टी जगभर पोहोचवणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. 'मॉडर्न महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्यामुळे अधिकाधिक उत्तम शिक्षण देणे शक्य आहे असे ते म्हणाले. आपले ज्ञान वाढवून आपण सूर्य सारखे ते सर्वत्र पसरवावे असा संदेश त्यांनी दिला. महाविद्यालयाला सेंटर ऑफ excellence बनवायचं असेल तर खूप प्रगती करावी लागेल. 'मॉडर्न' हे नावाप्रमाणे आधुनिक तर आहेच पण ते मॉडेल कोलेज सुद्धा आहे. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. मॉडर्न महाविद्यालय समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण देते.संस्थेने समाजाचे हित नेहमीच पहिले आहे.आधुनिक काळात शिक्षण हे कवच कुंडलासारखे काम करते.विद्यार्थी त्यामुळे सक्षम तर होतातच शिवाय देशाच्या जडणघडणीत ते आपले योगदान देतात. महाविद्यालयाला स्वायतेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करता येतात पण हवे तसे स्वातंत्र्य अजूनही प्राप्त झाले नसल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या कार्यक्रमामध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने करण्यात आले.केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून 'डीएसटी-फिस्ट' अंतर्गत मिळालेल्या सुमारे दीड कोटी रुपयाच्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफिची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे.या प्रयोगशाळेचा फायदा पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत संशोधकांना होणार आहे.या प्रयोगशाळेचे उद्घाटन मा.राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते झाले.यासोबतच कोविड काळात विद्यार्थी,पालक आणि इतर प्रशासकीय कामकाजासाठी महाविद्यालयात येणारे विजीटर यांना सहज

Pune Plus Edition
20 January 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com

# *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

WW.INDIANEXPRESS.COM
HE INDIAN EXPRESS, WEDNESDAY, JANUARY 20, 2021 9

ADVERTORIAL



Guruvarya Late Shankarrao Kanitkar
Founder - P. E. Society, Pune 5

## Golden Jubilee Year Valedictory Ceremony
### of Progressive Education Society's
## Modern College of Arts, Science and Commerce
*Shivajinagar, Pune 5.*



Felicitation of Hon'ble Prof. Nitin Karmalkar, Vice Chancellor, SPPU, Pune at the hands of Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, P. E. Society.



Felicitation of Hon'ble Shri Murlidhar Mohol, Mayor, Pune at the hands of Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, P. E. Society.



Felicitation of Shri Bhagat Singh Koshyari Hon'ble Governor Maharashtra State at the hands of Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote



Shri Bhagat Singh Koshyari Hon'ble Governor Maharashtra State handed over letter of Appreciation to Prof. Dr. Gajanan R. Ekbote for his noteworthy contribution in the field of Education & Medical.

Progressive Education Society is a reputed and distinguished educational institution in the State of Maharashtra. Guruvarya Late Shankarraoji Kanitkar, along with his selfless dedicated team of teachers known for the highest moral values, laid the foundation of the Society on the auspicious day of 'Akshay Tritiya' on 16th May, 1934 in Pune. P. E. Society has been making noteworthy progress for the last 86 years along with the noble path and principles laid down by the eminent predecessors such as Guruvarya Late S. R. Kanitkar, Late V. T. Tatke and Late M. G. Chaphekar who were illustrious incarnations of ceaseless hard work and sacrifice. Late S. R. Kanitkar was ably assisted by Late V. T. Tatke, Late M. G. Chaphekar and Late Koparkar. Progressive Education Society is proud to possess the glowing tradition of these stalwarts.

The two remarkable words that appear in the names of the Society and its educational institutions are "Progressive" and "Modern". The inclusion of these words was certainly with some noble intentions, which serves as a bright beacon for P. E. Society to follow with determination. These two words highlight the aims and objects of this reputed educational institution. "Progressive" and "Modern" were the terms used in 1934 by Late Shankarraoji Kanitkar and his colleagues to delineate the dreams and future road map of Progressive Education Society "Progressive" means keeping with the spirit of times and innovation while "Modern" means Modern in outlook, up-to-date in all matters whether it is an academic activity, sports activity or cultural activity. It was resolved to use modern equipments and modern methodology to teach the students. The aims and objects of the Progressive Education Society as laid down in its Constitution are "to impart generally to the rising generations of this country, an efficient Pre-primary, Primary, Secondary, Higher Secondary and Collegiate education, embodying a literacy, scientific, technical, commercial and industrial training and the training of teachers by the establishment at Pune and other places in the Maharashtra State, as circumstances permit, of Pre-primary, Primary, Secondary, Higher Secondary Schools and Colleges or by such other means as may be most conducive to the attainment of the aims and objects of the Society.

#### MISSION STATEMENT

**"TO CREATE Multidisciplinary Best Citizens, TO SUITE The Local, National And International Needs, HAVING Scientific Temperament, Moral And Ethical Values AND Multifaceted Proactive Personalities, BY PROVIDING Excellent Education"**

Progressive i.e. keeping with the spirit of the times and Modern in outlook, up-to-date in all matters whether it be in the classroom or on the playground. Since its inception P. E. Society has never compromised on these two ideas, which are 'VALUES' for us. Even today, in 2021, Progressive Education Society is managed by the teachers.

The past students which have passed out from the Schools / Colleges managed by Progressive Education Society have done and are doing excellent work in the different fields & are serving our nation.

Noted Congress leader Late Br. V. N. Gagdil, Hon'ble Shri Vijay Kelkar, Ex-Secretary, Finance Dept., Govt. of India, Shri Padmakar R. Dubhashi, Ex-Vice-Chancellor, University of Goa are some of the past students of Progressive Education Society.

IAS/ IPS Officers - Late S. P. Palande, Smt. ShantaRao Shastri, Shri Jayant Umaranikar, Shri Sunil Dadhe, Shri Subhash Deore, Shri Avinash Dharmadhikari, Shri Sadanand Date, Shri Vinod Lokhande, Late Arvind Inamdar.

Former Members of Parliament - Mrs. Rajani Patil, Shri Anil Shirole, Former and present Members of Legislative Assembly - Smt. Madhuritai Misal, Shri Vishwas Gangurde, Shri VinayakNimhan, Shri Krushnarao Bhegde, Shri Chandrakant Chajed, Late Shamkant More, Shri Sagar Bondre, Late Subhash Kul.

Former Mayors – Mrs. Rajlaxmi Bhosale, Late V. B. Patil, Shri Balasaheb Shirole, Shri Azambhai Pansare, Zilla Parishad Presidents - Shri Jalindhar Kamathe, Shri Pradip Kand, Industrialists – Shri Arun Firodia, Late Avinash Wardekar, Shri Baba Shidore, Shri Satish Pashankar.

Renowned Doctors – Late Dr. S.J. Kinikar, Dr. Gajanan R. Ekbote, Dr. Jagdish Hiremath, Dr. Shirish Prayag, Dr. Shirish Hiremath, Dr. Nandu Kanade, Dr. Satish Karnik, late Dr. Ajit Golwilkar, Dr. Charudatta Apte, Dr. Sanjay Kulkarni, Dr. Nitin Patki, Dr. Ashok Kanitkar, First Lady Pilot – Smt. Saudamini Deshmukh.

Arjun Award and Shree Shivchhatrapati Award Winners – Shri. Shrirang Inamdar, Smt. Alka Dighe, Smt. Nisha Kulkarni, Smt. Sadhana Rahatekar, Smt. Anita Pawar, Smt. Ujjwala Nikam, Smt. Deepali Rakshe, Smt. Sunita Deshpande, Shri Atul Wakankar.

Arts and cultural field – Smt. Indrayani Sawakar, Smt. Sulochana Bhagwat, Smt. Mrunalini Dhavale, Smt. Asha Parulekar, Smt. Swaroopa Khopkar, Shri Tyagraj Khadilkar, Shri Gaganvihari Borate, Shri Sachin Jambhekar, Smt. Gauri Damale, Smt. Koyal Sarkar.

From the year 1986, the development of Progressive Education Society accelerated without any hindrances. The number of schools/colleges managed by P. E. Society was 9 in the year 1986when Prof. G. R. Ekbote joined P. E. Society. Prof. Dr. Gajanan R. Ekbote, a renowned Surgeon in Pune City and a past student of Modern High School, Shivajinagar, Pune 5 took charge as a Chairman of Progressive Education Scoiety w.e.f. 1st January, 1994.

The great visionary Prof. Dr. G. R. Ekbote has been blessed to with qualities like democratic leadership, which has motivated number of officers, academicians, dignitaries inside the organization and outside the organization. He has worked as a Member of Senate, Management and Academic Council, as a Dean of Faculty of Medicine of Savitribai Phule Pune University, Pune. He has also worked as a Pro-Vice-Chancellor and Member of Senate, and Academic Council of Maharashtra University of Health Sciences, Nashik. He was nominated as a representative of Hon'ble Chancellor on the Management Council of Maharashtra University of Health Sciences, Nashik. Persuasion skill inherited in Prof. Dr. G. R. Ekbote has been the instrumental between several academicians and authorities of Universities. He was also nominated on various authorities of different Universities in India. He has also worked on various Committees of Planning Commission of India. At present, he is working as a Professor of Surgery in B. J. Medical College, Pune for more than 23 years.

The distinctions conferred on him and awards given to him for his outstanding contribution in Higher Education aptly convey the message to public at large that his democratic leadership in academics and related field is accepted wholeheartedly and unanimously. Due to his dynamic personality, valuable guidance and hallucination, Progressive Education Society developed rapidly since 1994. Guruvarya Vishnu T. Tatke, Guruwarya M. G. Chaphekar, Dr. Madhav Namjoshi, Ravi Kirad, Balasaheb Hagawane, Adv. Babasaheb Chavan, Suresh Todkar, Adv. Dadasaheb Bendre, Adv. Manikrao Patil, Prof. Shamkant Deshmukh, Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote, Prof. Dr. A.K. Pande, Prof. P. S. Chirputker, Prof. Sitaram Raykar, Prof. Dr. Nivedita Ekbote, Shri Chittaranjan Kamble, Mrs. Monika Vaidya, Arun Deokate Dattatraya Patole Prof. Dr. Prakash Dixit, Shri Deepak Maratheahave significant contribution in the overall development and progress of Progressive Education Society, Pune.

Till 1969, Progressive Education Society was functional in the field of School Edcuation. In the year 1970, Progressive Education Society took its first step towards Higher Education and established its first Senior College viz. Modern College of Arts, Science and Commerce at Shivajinagar, Pune-5. The College was started in its own building as per the suggestive condition laid down by University of Pune. Qualified and experienced teachers were appointed in the College right from the establishment. In the first decade of successful journey of the College, the First Research Centre of the College in Zoology was started. The first decade also saw the commencement of first Post graduate course viz. M. Com on grant-in-aid basis. During the second decade, Post Graduate Research Center in Botany was also started with the permission of the authorities of Pune University. During next two decades from 1990-2000 and from 2001-2010, the initiative of Prof Dr. Gajanan R. Ekbote sir led to the launch of several Post graduate courses and Research Centers in various subjects. Prof. Dr. G. R. Ekbote insisted that 'Research' must be given importance along with undergraduate and post graduate courses. This was the important stage in the journey of the College.

In the year 2002-2003, College was accredited by the National Assessment and Accreditation Council, Banglore (NAAC). Modern College was one of the few colleges to offer such an assessment in its initial stages. Considering quantitative and qualitative progress in the academic career of the College, University of Pune awarded 'Best College' Award to this College in the academic year 2007-08. For the Management, Principal, Teaching and non-teaching members of the College, this Award was inspirational, motivating, jubilant and satisfying.

During year 2009-10, during the second cycle of Accreditation and Assessment, College was Accredited by 'A' Grade by National Assessment and Accreditation Council, Bangalore (NAAC). During this visit, the members of the Peer Team of NAAC, Bangalore took special note of the 'Best College' Award received by the College from Pune University, Pune. During this important phase, various modern, innovative and sophisticated facilities for teaching- learning process were provided in the College. Various departments of the College were renovated. This augmented Research work in the College.

During the years 2010-2020, under the able and valuable guidance of Prof. Dr. G. R. Ekbote Sir and Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote, Chairperson, College Development Committee, various Post Graduate Courses viz. M. A. (English, Geography, Economics, Marathi, Psychology, Hindi, History, Politics), M.Sc. (Electronics, Botany, Biotechnology, Microbiology, Analytical Chemistry, Statistics, Computer Science, Mathematics), M.C.A. (Science), Research Centers in Zoology, Marathi, Commerce, Life Sciences, Economics, Electronics, Microbiology were launched in the College. The add-on courses like PGDFT, PGDT, PGDBF, Fashion Designing are also conducted in the College.In the academic year 2016-17, through the collective efforts of Melbourne University, Australia, IISER, Savitribai Phule Pune University, Pune a course viz. B.Sc. (Blended - Bio-Science) was established in the College.

In the year 2019-20, University Grants Commission, New Delhi granted 'Autonomous' status to Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, Pune 5. There is a tradition of the College to adopt and conduct any new course designed and started by the University immediately.

Various Awards and Honors received by the College -:

* Best College' Award from University of Pune (2008)
* College with Potential for Excellence' status (CPE) by University Grants Commission (2011)
* Star College' status by DBT, Govt. of India (2014)v Best Principal' Award by SavitribaiPhule Pune University, Pune (2014)
* A+' grade by NAAC, Bangalore (2017)
* Selected by University Grants Commission, New Delhi for 'Fashion Technology and Apparel Designing' under B.Voc. scheme.(2019)
* National Award 'Best Accessible Website' by Social Justice and Empowerment Dept., Govt.of India (2018)v Best College (Sports)' Award by SavitribaiPhule Pune University, Pune for consecutive five years (2016-2020)
* Autonomous Status' to the College from University Grants Commission, New Delhi (w.e.f. academic year 2019-20)

A Golden Jubilee Year Valedictory Ceremony of Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune 5 was organized in the auspicious presence of Shri Bhagat Sinh Koshyari, Hon'ble Governor, Maharashtra State and Prof. Dr. Nitin Karmalkar, Vice-Chancellor, Savitribai Phule Pune University, Pune on Tuesday, 19th January, 2021 at 11.30 a.m. in the Auditorium of Progressive Education Society at Shivajinagar, Pune.

As per the protocol, the programme was started with National Anthem, Saraswati Vandana was presented by Mrs. Renu Bhalerao and Mrs. Swati Patwardhan.

The unforgettable journey of fifty years of the college was revived in the form of a power point presentation by Dr. Anjali Sardesai, IQAC Coordinator.

Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote, Joint Secretary, P. E. Society and Chairperson, College Development Committee, Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar, Pune 5 welcomed Shri Bhagat Singh Koshyari, Hon'ble Governor, Maharashtra State and Prof. Dr. Nitin Karmalkar, Vice-Chancellor, Savitribai Phule Pune University, Pune and all the dignitaries present for the ceremony. In her introductory speech, Prof. Mrs. Jyotsna Ekbote briefed the success of the college and dedicated it to the founders of the P. E. Society and Modern College, Shivajinagar, Pune-5 which is further taken incessantly by the great ideologies of Prof. Dr. Gajanan Ekbote, Chairman, P. E. Society. Prof. Mrs. Jyotsna Ekbote said that the college believes in the two words 'Progressive' ad 'Modern' and all the units of the college are dedicately working in the lines of achieving success.

Modern College, Shivajinagar, Pune-5 which has always been a frontrunner in innovations and research, added two more feathers in its cap by inaugurating the 'Central Sophisticated Analytical Instrumentation Facility' developed with the grants of Rs.1.5 Crores received from Department of Science and Technology, New Delhi under 'FIST Scheme' and 'Principal's Virtual Cabin' at the hands of Honourable Governor of Maharashtra Shri. Bhagat Singh Koshyari. The hi-tech instrumentation facility will be very useful for the post graduate students and research scholars. 'Principal's Virtual Cabin' is the one of its kind to be conceptualized in any educational institution which is highly advantageous in the pandemic situation especially for communicating with the students and parents.

Progressive Education Society's Chairman Prof. Dr. GajananEkbote in his address mentioned that Modern College, Shivajinagar, Pune-5 was conceptualized in late 1960s by Guruvarya Late Shankarrao Kanitkar and Late V. T. Tatke for providing education to the masses and not only classes. Prof. Dr. G. R. Ekbote mentioned that in those days although the establishment of a new college which is in the neighbourhood of another big college like Fergusson College was a big challenge. After 50 successful years, we have proved that the team is ready to accept any challenge and will come out with flying colours. The progress of the college in terms of student strength from 707 in 1970 to 12300 in 2021 proves it all. The all round of the college in terms of academics, research, innovations, sports, co-curricular and extracurricular activities prove the commitment of the Management Authorities, Principal, Vice Principals, Teachers, Non-teaching staff and students. Prof. Dr. G. R. Ekbote also expressed his future plans regarding transforming Modern College, Shivajinagar, Pune 5 to 'Modern Deemed University' along with getting re-accredited with 'A++' grade by NAAC, Bangalore. Prof. Dr. G. R. Ekbote also expressed his desire to establish Post graduate Research Centers in the few departments which are presently only offering courses till Post graduation, similarly the departments having only undergraduate courses will be progressing towards offering postgraduation and later to Research centers.

Prof. Dr. Nitin Karmalkar, Vice Chancellor, SPPU Pune in his speech mentioned that whenever he comes to Progressive Education Society and Modern College, Shivajinagar, Pune-5 he always comes across some new innovative idea, introduction of new course etc. The Honourable Vice Chancellor appreciated the zeal of all the units of the college and also expressed his views regarding commencement of several new courses being an Autonomous College.

The Honourable Governor of Maharashtra Shri. Bhagat Singh Koshyari mentioned that Modern College is actually a 'Model College' for all as it provides education to the poor and needy section of the society. The activities, research and innovations of the college are really remarkable and are taking the college towards achieving excellence. The Governor of Maharashtra also expressed his views regarding requirement of commencement of courses in regional languages. The vision of Prof. Dr. Gajanan Ekbote and Prof. Mrs. Jyotsna Ekbote are forming strong foundations in the further development of the Autonomous College which is 'THE BEST' in all ways. The Governor put forth his suggestions for the youth generation to think about several inventions, innovative ideas in all that they do.

'Letter of Appreciation' was presented to Prof.Dr. G. R. Ekbote by the Governor of Maharashtra for his undying spirit of work which has helped the college achieve several awards and recognitions and is taking the college to reach the highest peak of success.

The Honourable Governor of Maharashtra Shri. Koshyariji also presented 'Letter of Appreciation' to Prof. Mrs. Jyotsna Ekbote, CDC Chairperson and Principal Dr. Rajendra Zunjarrao for celebrating the remarkable 50th year of the establishment of the college which is the most preferable choice of students of Arts, Commerce and Science for Undergraduate, Postgraduate, research, Sports etc. in order to get a holistic development.

The 'Golden Jubilee Souvenir' was also published during the event by the Honourable Governor of Maharashtra Shri. Bhagat Singh Koshyari which refreshes the memories of the staff and students associated with the college since the last fifty years along with the glimpses of the on-going activities and future plans. Under the guidance and ideas of P. E. Society Chairman Prof.Dr.G.R. Ekbote, Joint Secretary and CDC Chairperson Prof. Mrs. Jyotsna Ekbote and suggestions of Secretary Prof.Shamkant Deshmukh and Principal Dr. Rajendra Zunjarrao, the souvenir is prepared by Dr. Vaijayantimala Jadhav and Dr. Shantashree Sengupta.

The event saw the august presence of ShriVighnahari Maharaj Deo, President of Progressive Education Society, Pune, Mayor of Pune ShriMurlidharMohol, Deputy Mayor Mrs. Saraswati Shendge, Dy. Secretary of P. E. Society Prof. Dr. Ms. Nivedita G. Ekbote, Prof. Dr. P. G. Dixit, Shri S.D. Inamdar, Joint Secretary Shri S. V.Todkar, Vice-Chancellor of Dr. D. Y. Patil Deemed University Prof. Dr. P.D. Patil, Shri P.A. Inamdar, Chairman, Maharashtra Cosmopolitan Education Society, Pune, Prof. Dr. Bhushan Patwardhan, Vice-Chairman, Univeristy Grants Commission, New Delhi, Prof. Dr. Vasudeo Gade, Ex-Vice-Chancellor, Prof. Shri Sudhakar Jadhavar Member Management Council SPPU, Prof M. S. Jadhav Ex Finance Officer SPPU, Prof Dr. Mahesh Abale Member Management Council SPPU, Savitirbai Phule Pune University, Pune, Shri Prasenjeet Phadanwis, Shri Santosh Dhore, Shri Dadabhau Shinalkar, Members of Senate of SPPU, Pune, Prof. Dr. Mahesh Kakade, Controller of Examinations, SPPU, Pune and Members of Business Council, Board of Life Members, Board of Life Workers and Heads and teaching and non-teaching staff members of the Schools / Colleges managed by P.E. Society, Pune.

Principal Dr. Rajendra Zunjarrao presented Vote of Thanks and expressed gratitude towards the ceaseless efforts of Prof. Dr. Gajanan Ekbote, Chairman, P. E. Society and Prof. Mrs. Jyotsna Ekbote, Joint Secretary and CDC Chairperson. Dr. Rajendra Zunjarrao also expressed his thanks to Secretary Prof. Shamkant Deshmukh who is always very supportive and helpful in implementing the actions.

The unmatched comparing of the Golden Jubilee Valedictory function was done by Prof. Shamkant Deshmukh who took every minute care of the protocols laid down for the event.

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*

महासंवाद
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

## आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि संस्कृतीला विसरु नका - राज्यपाल भगत सिंह कोश्यारी

### पुणे येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ संपन्न

by **Team DGIPR** जानेवारी 19, 2021**जिल्हा वार्ता**, **पुणे**, **वृत्त विशेष**



पुणे,दि.१९ : आधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना आपली मातृभूमी, मातृभाषा, सदाचार आणि आपल्या संस्कृतीला विसरु नका, असे प्रतिपादन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले.प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राज्यपाल भगत सिंह कोश्यारी बोलत होते. यावेळी पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. नितीन करमळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे, संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा.सुरेश तोडकर, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव तसेच शिक्षण व अन्य विभागातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी सेंट्रल सॉफीस्टीकेटेड □नालेटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी आणि प्रिन्सीपल व्हर्च्युअल केबीनचे डिजिटल स्वरुपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रा.डॉ. गजानन एकबोटे व प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांना राज्यपाल श्री. कोश्यारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी म्हणाले, आपण सर्वजण आधुनिकीकरणाचा ध्यास घेऊन वाटचाल करत आहोत. परंतु, केवळ आधुनिक बनण्यापेक्षा आदर्श बनण्यासाठी झटणे आवश्यक आहे. सदाचार ही जीवनातील महत्त्वपूर्ण बाब आहे. सदाचारी व्यक्तीचा सदैव गौरव केला जातो, यासाठी सदाचारी बना. परकीय देशांच्या भाषेचे ज्ञान घेताना मातृभाषेकडे दुर्लक्ष करु नका. आपल्या मातृभूमीचा व मातृभाषेचा सदैव अभिमान बाळगा, असे त्यांनी सांगितले.

## *Golden Jubilee Valedictory Function - 19th January 2021*





नाविन्यपूर्ण बाबींचे अधिकाधिक ज्ञान ग्रहण करुन विद्यार्थ्यांनी विद्वान बनावे,असे सांगून राज्यपाल श्री. कोश्यारी म्हणाले, 'भारत' हा प्राचीन काळापासून अनेक गोष्टींमध्ये अग्रेसर देश म्हणून ओळखला जातो, भविष्यात देखील आपला देश विविध बाबींमध्ये अग्रेसर ठरण्यासाठी आपल्या ज्ञानाचा देशहितासाठी उपयोग करा आणि जगभरात चांगले नाव कमवा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रयत्न करावेत, असे सांगून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमध्ये आजवर अनेक विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे व संस्थेचे कौतुक केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर म्हणाले, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांना दर्जेदार शिक्षण देणे तसेच त्यांना आपल्या शैक्षणिक संस्थेत टिकवून ठेवणे हे आव्हान असते. विद्यार्थी हिताचे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करुन त्यांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे करणे महत्त्वाचे असते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेत विविध चांगल्या संकल्पना व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे दिसून येते, असे त्यांनी सांगितले. कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे म्हणाले, दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाने नेहमीच भर दिला आहे. भविष्यात या संस्थेचा आणखी विस्तार करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.प्रास्ताविक संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी केले. संस्थेच्या वाटचालीबाबत प्रा. डॉ. अंजली सरदेसाई यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. आभार प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी मानले. सूत्रसंचालन कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी केले.

*Congratulations to Honourable Prof. Dr. Gajanan Ekbote Sir and P.E.S. Modern College of Pharmacy Nigadi, Pune –411044*











## *Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam invited as Resource Person*



# Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam invited as Resource Person









# *Prof.Dr.Nivedita Ekbote Madam invited as Resource Person*







पौष पौर्णिमा म्हणजेच शाकंभरी पौर्णिमा - संपूर्ण विश्वाला शिवरायांसारखा पुत्र देणाऱ्या दैवी स्त्रीचा जन्मदिवस! काल समस्त हिंदू आघाडीच्या मातृशक्ती विभागा तर्फे आई जिजाऊंना मानवंदना देऊन वीरमातांचा सत्कार करण्यात आला. माझ्यासारखी सुदैवी मीच की मला वीर मातांचा सत्कार बघता व करता आला ते देखील ऐतिहासिक लाल महालात!! मिलिंद काकांच्या समस्त हिंदू आघाडी चे संघटन अप्रतिम आणि खूप कमालीचे आहेच, पण समस्त हिंदू आघाडी- मातृशक्ती विभागाचे कार्य बघून मी खूप भारावून गेले. संपूर्ण कार्यक्रम महिलांनी आयोजित केला होता आणि दृष्ट लागावा एवढा अप्रतिम कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला समस्त हिंदू आघाडी चे अध्यक्ष मिलिंद भाऊ एकबोटे, पुण्याच्या उपमहापौर सौ. सरस्वती ताई शेंडगे उपस्थित होत्या. सुंदर कार्यक्रमाला मला बोलवल्याबद्दल सर्व समस्त हिंदू आघाडी च्या मातृशक्ती ला माझे नमन !

# *Prof.Dr.Nivedita Ekbote Madam invited as Resource Person*

## जिजामाता जयंती निमित्त लालमहाल येथे मातृगौरव पुरस्कारांनी आदर्श मातांचा सत्कार

### राजमाता जिजाऊचा आदर्श आजच्या तरुण पिढीने घेऊन आपले जीवन यशस्वी करावे – प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे




शाकंभरी (पौष) पौर्णिमा, गुरुवार दिनांक २८/१/२०२१ रोजी तिथीनुसार मातृशक्ती च्या वतीने लाल महाल येथे राजमाता जिजामाता जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी मा.उपमहापौर सौ.सरस्वती शेंडगे, समस्त हिंदू आघाडीचे कार्याध्यक्ष मा.मिलिंदभाऊ एकबोटे, मानव मिलन संस्थेच्या सौ.मंजूताई चोपडा, भारतीय जनता युवा मोर्चा युवती अध्यक्षा प्रा.डॉ.निवेदिता गजानन एकबोटे मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये हुतात्मा सैनिक संग्राम पाटील (कोल्हापूर) यांच्या मातोश्री सौ. शिवाजी पाटील या वीर मातेला याप्रसंगी सन्मानचिन्ह आणि रोख निधी देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे सौ.ज्योती नारायण रासने, श्रीमती अरुंधती रवींद्र शहा, सौ.अनघा सुहास बिनीवाले, सौ नंदा अरुण डांगे, सौ. शकुंतला सोपान पवार यांना 'आदर्श माता' म्हणून उपमहापौर सरस्वती शेंडगे यांनी सन्मानित केले.

आयुष्यभर प्रचंड कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उत्कर्ष साधण्याचे काम या आदर्श मातांनी केले आहे यापैकी सौ.डांगे यापूर्वी सफाई कर्मचारी म्हणून काम करत होत्या आणि सौ. पवार या मोलकरणीचे काम करत होत्या. मंजू चोपडा यांनी जिजामाताना आदरांजली वाहताना जिजामातेचे हिंदूसमाजावर मोठे उपकार आहेत असे सांगितले. डॉ. निवेदिता एकबोटे यांनी आपल्या प्रभावी भाषणात 'एक स्त्री' आपल्या आयुष्यात केवढे मोठे काम करू शकते याचा आदर्श जिजामाता यांच्या जीवनचरित्रात दिसून येतो. जिजामाते कडून प्रेरणा घेऊन समस्त हिंदूंनी देव, देश आणि धर्म यांच्यावर होणाऱ्या आघातांना प्रत्युत्तर दिले पाहिजे आणि देशद्रोही प्रवृत्तीचांनाश केला पाहिजे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.प्रीती शिंदे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.सारिका वारुळे, सौ.आशा नलावडे, सौ.अनुराधा घोरपडे, सौ.चारुलता काळे, सौ.मनीषा गोरे, श्रीमती सुनंदा कोंढरे, सौ.मनीषा जाधव यांनी परिश्रम घेतले.

# *Prof.Dr.Nivedita Ekbote Madam invited as Resource Person*










# *Work of Appreciation: Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam*



मटा शुभवार्ता

# नवोदित आणि हौशी कलावंतांसाठी चौकात कलाकार कट्टा

## गोखले चौकात घेता येणार कलांचा आस्वाद

Suneet.Bhave
@timesgroup.com
Tweet : @SuneetMT

> गोखले चौकाचे सुशोभीकरण करतानाच या भागात कायम येणाऱ्या नागरिकांच्या कानांवर आदळणाऱ्या वाहनांच्या गोंगाटाऐवजी त्यांना श्रवणीय अनुभूती देण्याची कल्पना होती. शहरातील सर्व कलावंतांना एकत्र करून त्यांना सोबत घेऊन हा कलाकार कट्टा साकारला जात आहे. या कट्ट्यावर पुण्यातील सर्व कलाकारांचे स्वागत आहे.
>
> \- ज्योत्स्ना एकबोटे, नगरसेविका

कलाकार कट्ट्याचे संकल्पचित्र

### प्रतिकृती लवकरच

चित्रसृष्टीतील अनेक कलावंत पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेत (एफटीआयआय) शिकत असताना 'गुडलक' आणि पूर्वीच्या 'लकी' हॉटेलमध्ये कायम यायचे. 'एफटीआयआय'पूर्वी 'प्रभात'सारख्या चित्रनिर्मिती संस्थेचा सगळा डोलारा पुण्यात उभा होता. या संदर्भातून काही सजावट या चौकामध्ये केली जाणार असून कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण करणाऱ्याची प्रतिकृती चौकात लवकरच बसविली जाणार आहे.

पुणे : कॉलेजमध्ये जाणाऱ्या युवक-युवतीपासून ते पेन्शनरांपर्यंत प्रत्येकाचे स्वतंत्र कट्टे असून नव्या वर्षात अत्यंत वर्दळीच्या गोखले चौकाच्या (गुडलक चौक) एका कोपऱ्यामध्ये कलाकार कट्टा साकारला जाणार आहे. विविध कलाकारांना, हौशी चित्रकारांना, नवोदित वादकांना त्यांच्या कलेचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी ही कायमस्वरूपी जागा निर्माण केली जात असून, पुणेकर रसिकांना विविध कलांचा आस्वाद या कट्ट्यावरील आगळ्यावेगळ्या बैठक व्यवस्थेतून घेता येणार आहे.

कलाकार कट्ट्याचे प्राथमिक काम महापालिकेने पूर्ण केले असून, शहरातील विविध कलाकारांकडून येथील सजावटीसाठी कल्पना मागविण्यात आल्या आहेत. या कल्पनांमधून हा कट्टा आणखी आकर्षक करण्याचा संकल्प महापालिकेने केला आहे. येत्या २६ जानेवारीपर्यंत त्याचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. गोपाळ कृष्ण गोखले रस्त्याच्या सुशोभीकरणासोबत विविध कलाकारांसाठी कट्टा स्वरूपातील व्यासपीठ निर्माण करण्याचा हा प्रयोग प्रथमच केला जात आहे.

पुणे महापालिकेने 'अर्बन स्ट्रीट डिझाइन गाइडलाइन्स'नुसार शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचा कायापालट सुरू केला आहे. जंगली महाराज रस्त्यानंतर गोखले रस्त्याचे काम हाती घेण्यात आले होते. हे काम करतानाच गोखले चौकाचे महत्त्व लक्षात घेऊन येथे काहीतरी वेगळी संकल्पना राबविण्याचा विचार सुरू होता. त्यातूनच परदेशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये राबविल्या जाणाऱ्या संकल्पनेवर आधारित कलाकार कट्टा विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थानिक नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला आणि काम सुरू झाले.

सर्वच कलावंतांनी त्यांच्या वेळेनुसार केव्हाही येऊन येथे सादरीकरण करावे आणि आजूबाजूच्या रसिकांकडून त्यांच्या कलेला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने ही कल्पना राबविण्याचा मानस पथ विभागाचे कार्यकारी अभियंता दिनकर गोजारे यांनी व्यक्त केला.

Maharashtra Times 1.1.2021



# *Work of Appreciation– Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam*

सकाळ

## गोखले चौकात साकारतोय कलाकार कट्टा

समाधान काटे

गोखलेनगर, ता. ३ : पुणे शहराचे आणि कलाकारांचे नाते तसे जुनेच आहे. पु. ल. देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, डॉ. जब्बार पटेल, अभिनेते देव आनंद अशा अनेक कलाकारांच्या आठवणी गोखले चौकातील गुडलक कॅफे आणि पूर्वीच्या लकी हॉटेल परिसराशी जोडल्या गेल्या आहेत. या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देण्यासाठी कलाकार कट्ट्याच्या निर्मितीची संकल्पना पुढे आली आहे.

गोखले चौकाचे सुशोभीकरण करताना या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांच्या कानांवर पडणाऱ्या वाहनांच्या गोंगाटाऐवजी त्यांना श्रवणीय अनुभूती देण्याची संकल्पना या प्रकल्पातून साकारण्यात येणार आहे. शहरातील सर्व कलावंतांना एकत्र करून हा कलाकार कट्टा साकारला जात आहे. त्यावर सर्व कलाकारांचे स्वागत असणार आहे. कॉलेजमधील युवक-युवतींपासून ते निवृत्त झालेल्या वयोगटातील प्रत्येकासाठी स्वतंत्र कट्टे या ठिकाणी साकारण्यात येणार आहेत. ऐतिहासिक आणि साहित्यिक पार्श्वभूमी असलेल्या गोखले चौकाच्या (गुडलक चौक) एका कोपऱ्यामध्ये कलाकार कट्टा साकारला जाणार आहे. विविध क्षेत्रातील हौशी आणि नवोदित कलाकार, चित्रकार आणि वादकांना त्यांची कला सादर करण्यासाठी हे कायमस्वरूपी मुक्त व्यासपीठ निर्माण केले जात आहे. पुणेकर रसिकांना विविध कलांचा आस्वाद या कट्ट्यावरील आगळ्यावेगळ्या बैठकांत घेता येणार आहे.




**गोखले चौक : कलाकार कट्ट्याचे संग्रहित छायाचित्र.**

### चित्रीकरणाची प्रतिकृती लवकरच

चित्रपटसृष्टीतील अनेक कलावंत राष्ट्रीय चित्रपट अकादमी आणि दूरचित्रवाणी संस्थेत (एफटीआयआय) शिकत असताना गुडलक आणि पूर्वीच्या लकी हॉटेलमध्ये कायम येत असत. 'एफटीआयआय'पूर्वी प्रभात सारख्या चित्रनिर्मिती संस्थेचा सगळा डोलारा पुण्यात उभा होता. या संदर्भातून काही सजावट या चौकामध्ये केली जाणार असून कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण करणाऱ्याची प्रतिकृती चौकात लवकरच बसविली जाणार आहे.

गोपाळ कृष्ण गोखले रस्त्याच्या सुशोभीकरणासोबतच विविध कलाकारांसाठी कट्टा स्वरूपातील व्यासपीठ निर्माण करण्याचा हा प्रयोग प्रथमच केला जात आहे. या कट्ट्याचे प्राथमिक काम महानगरपालिकेने पूर्ण केले असून, शहरातील विविध कलाकारांकडून येथील सजावटीसाठी कल्पना मागविण्यात आल्या आहेत.

> **सर्व कलावंतांनी त्यांच्या कलेचे या कट्ट्यावर सादरीकरण करावे आणि रसिकांकडून त्यांच्या कलेला प्रोत्साहन मिळावे, हा या प्रकल्पाचा हेतू आहे. यादृष्टीने कलाकार कट्टा उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.**
>
> **– दिनकर गोजरे,** कार्यकारी अभियंता, पथ विभाग

नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे आणि विविध कलाकारांकडून येणाऱ्या कल्पनांची सांगड घालून हा कट्टा आणखी आकर्षक करण्याचा संकल्प महानगरपालिकेने केला आहे.

महापालिकेने 'अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाइन'नुसार शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचा कायापालट सुरू केला आहे. त्या अंतर्गत जंगली महाराज रस्त्यानंतर गोखले रस्त्याचे कामही हाती घेण्यात आले. हे काम करतानाच गोखले चौकाचे महत्त्व आणि परिसराची पार्श्वभूमी लक्षात घेऊन येथे काहीतरी वेगळी संकल्पना राबविण्याचा विचार सुरू होता. त्यातूनच कलाकार कट्टा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्योत्स्ना एकबोटे यांनी त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला असून त्याचे काम सुरू झाले आहे.

Pune, Pune-Today
04/01/2021 Page No. 5

# Work of Appreciation– Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam

नवभारत

## नगरसेविकाओं द्वारा दिया गया प्रस्ताव

# डॉ. साइरस व अदार का मनपा करे सम्मान

नवभारत न्यूज नेटवर्क

पुणे. कोरोना महामारी ने सभी सार्वजनिक जीवन को बाधित कर दिया था. सार्वजनिक जीवन को फिर से बहाल करने के लिए कोरोना पर स्थायी रूप से कुछ किया जाना था. पुणे में सीरम संस्थान ने बीमारी से लड़ने के लिए एक टीका विकसित किया है. उत्पादन संस्थान के अध्यक्ष डॉ. साइरस पूनावाला और कार्यकारी अधिकारी अदार पूनावाला के नेतृत्व में यह किया गया है. इसलिए, पुणे के लोगों की ओर से व पुणे महापालिका के माध्यम से उन्हें सम्मानित करना चाहिए. ऐसा प्रस्ताव नगरसेविका ज्योत्सना एकबोटे व शीतल सावंत द्वारा दिया गया है.

## पुणेकरों द्वारा किया जाए सम्मानित



ज्ञात हो कि विगत 10 माह से कोरोना वाइरस ने पुरे विश्व को प्रताड़ित किया था. इस पर कोई हल नहीं निकल पा रहा था. सभी देशों में टीका बनाने का काम किया जा रहा था. लेकिन इसमें आखिरकार बाजी अपने देश ने मारी है. साथ ही यह काम पुणे से हुआ है. साथ ही अब टीकाकरण की भी शुरुवात हुई है. सार्वजनिक जीवन को फिर से बहाल करने के लिए कोरोना पर स्थायी रूप से कुछ किया जाना था. पुणे में सीरम संस्थान ने बीमारी से लड़ने के लिए एक टीका विकसित किया है.

Pune Edition
17-January-2021 Page No. 4
epaper.enavabharat.com

# *Work of Appreciation : Prof.Dr.Nivedita Ekbote Madam*

लोकमत



दिव्यांगांना धान्य किट वाटपाच्या दुसऱ्या टप्प्यात दिव्यांगांना धान्य किट व ब्लँकेटचे वाटप करताना अवनी या सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, रघुनाथ येमुल, श्रीलेखा कुलकर्णी व उद्योजक रमेश पाटील.

## दिव्यांगांना धान्य किट वाटप

**धनकवडी :** दिव्यांगांच्या कुटुंबांना हातभार लाभावा म्हणून 'अवनी' हि सामाजिक संस्थेच्या वतीने धान्य किट ब्लँकेट वाटप करण्यात आले. दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने सुरू केलेली दिव्यांग अन्न सुरक्षा विमा योजनेचा शुभारंभ नुकताच झाला होता. या उपक्रमात रघुनाथ येमुल, प्राध्यापिका डॉ. निवेदिता एकबोटे, कामयानी संस्थेच्या कार्यकारी अधिकारी श्रीलेखा कुलकर्णी, उद्योजक रमेश पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

Hello Pune
Page No. 4 Jan 08, 2021
Powered by: erelego.com

# *News related to Progressive Education Society*

नवभारत

शिक्षा मंत्री वर्षा गायकवाड़ ने की सराहना

## निजी स्कूलों से बेहतर हैं मनपा स्कूल



नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** कोविड़ 19 की पृष्ठभूमि पर स्कूल शुरू होने के बाद राज्य के स्कूल शिक्षा और खेल विभाग की मंत्री वर्षा गायकवाड़ द्वारा पुणे का दौरा किया गया. इस अवसर पर उन्होंने महापालिका हुतात्मा बालवीर शिरीष कुमार माध्यमिक विद्यालय, शिवाजी नगर का अवलोकन किया. स्कूलों में दी जा रही सुविधाओं की भी उन्होंने सराहना की. साथ ही मनपा स्कूल को निजी स्कूल की तुलना में उत्कृष्ट बताया. इससे अब महापालिका का भी हौसला बढ़ गया है.

### छात्रों से किया संवाद

इस यात्रा में, उन्होंने पहले पूरे विद्यालय और प्रत्येक कक्षा का निरीक्षण किया तथा छात्रों के साथ बातचीत की. विशेष रूप से 10वीं कक्षा के छात्रों के साथ ऑनलाइन और ऑफलाइन शिक्षा में अंतर, एस. एस.सी. बोर्ड परीक्षा और तैयारी, आदि विषय पर स्वतंत्र रूप से संवाद किया.

### कोविड नियमों का सख्ती से पालन हो

स्कूल में सभी सुविधाओं, स्वच्छता और कोविड़ 19 के अनुसार उन्होंने सरकार द्वारा निर्धारित सभी नियमों के सख्त पालन पर संतोष व्यक्त किया. साथ ही उन्होंने प्राथमिक विद्यालय की भी सराहना की.

Pune Edition
28-january-2021 Page No. 4
epaper.enavabharat.com

### इनकी रही उपस्थिति

इस अवसर पर अतिरिक्त आयुक्त सुरेश जगताप, उप महापौर सरस्वती शेंडगे, उपायुक्त नितिन उदास साहायक आयुक्त आशा राउत, जेड.पी. शिक्षा अधिकारी सुनंदा वखारे, मनपा शिक्षा अधिकारी शिवाजी दौंडकर, पार्षद ज्योत्सना एकबोटे, स्कूल प्रमुख संध्या जाधव आदी उपस्थित थे.

Pune Edition
28-january-2021 Page No. 4
epaper.enavabharat.com

# *News related to Progressive Education Society*

## पहिली ते बारावी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक चॅनेल-वर्षा गायकवाड

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २७ - पहिली ते बारावी विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात स्वतंत्रपणे शैक्षणिक चॅनेल सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी केली. त्यामुळे लवकरच शिक्षण विभागातर्फे अधिकृतरित्या शैक्षणिक चॅनेल सुरू होणार असल्याची चिन्हे आहेत.

पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना प्रा. गायकवाड यांनी ही घोषणा केली. करोनाचे संकट आले असले त्यातून संधी म्हणून आता ऑनलाइन, यूट्यूब, फेसबुकच्या माध्यमातून शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. शैक्षणिक चॅनेल लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू करणे आवश्यक असल्याचे सांगत गायकवाड यांनी यासंदर्भात अधिकाऱ्यांना तातडीने पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

**बालचित्रवाणी पुनरूज्जीवित करणार**

बालचित्रवाणीमधील स्टुडिओ वापराविना पडून आहेत. ते सर्व साहित्य अद्ययावत करीत त्याचा उपयोग शिक्षकांद्वारे विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करण्यासाठी केला जाणार आहे. अभ्यासक्रमातील लेखक, कवी यांचेही मार्गदर्शन या माध्यमातून होणे आवश्यक आहे. त्याचा विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर अधिक ज्ञान आत्मसात करता येणे शक्य होणार असल्याची माहिती प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली.

**शिक्षक भरती लवकरच**

शिक्षक भरती पवित्र पोर्टल माध्यमातूनच होणार आहे. मध्यंतरी एसईबीसी संवर्गास स्थगिती दिल्याने ही भरती प्रक्रिया रखडली होती. एकूण ६ हजार शिक्षकांची पदे भरण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच मंजुरी दिली आहे. मात्र, हा प्रस्ताव सध्या सामान्य प्रशासन विभागाकडे (पान २ पहा) ▸▸



पुणे : शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी पुण्यातील आपटे प्रशाला, मॉडर्न हायस्कूल आणि पालिकेच्या शाळांना बुधवारी भेट देऊन शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

प्रभात Thu, 28 January 2021 https://epaper.eprabhat.net/c/58036037

पान १ वरून

### ... विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक चॅनेल

आहे. त्यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल. लवकरच भरतीप्रक्रिया सुरू होईल, असा विश्वास गायकवाड यांनी व्यक्त केला.

**शाळाबाह्य मुलांसाठी विशेष मोहीम**

करोनाच्या संकटामुळे शाळा बंद होत्या. आता सर्व शाळा टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येत आहे. यापूर्वीच नववी ते बारावीच्या शाळा, आता पाचवी ते आठवीच्या शाळा बुधवारपासून सुरू झाल्या. विशेषत: जी मुले शाळा व शिक्षणापासून वंचित राहिले आहेत, अशा मुलांना पुन्हा शाळेत आणण्यासाठी आणि शाळेत उपस्थिती वाढविण्याच्या दृष्टीने विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे शाळाबाह्य मुले विशेषत: त्यातील मुली शाळेत कसा आणता येईल, यावर मोहिमेचे मुख्य काम राहील. त्यासाठी ॲपही सुरू करण्यात येणार असल्याचे प्रा. गायकवाड यांनी म्हटले आहे.

**दोषी अधिकाऱ्यांवर होणार कारवाई**

शिक्षक भरती घोटाळ्यात अडकलेल्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा जामीन न्यायालयाने फेटाळला आहे. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू आहे. तपासात दोषी असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रा. गायकवाड यांनी स्पष्ट केले.

प्रभात Thu, 28 January 2021 https://epaper.eprabhat.net/c/58036(



मंदार देशपांडे

### विद्यार्थ्यांचे कौतुक

'शाळा अनलॉक झाल्यानंतर सर्व नियम पाळून तुम्ही शाळेत हजर राहत आहात, त्याबद्दल अभिनंदन!' अशा शब्दांत शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. 'स्कूल बस' सुरू करण्याबाबत परिवहनमंत्र्यांशी चर्चा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. गायकवाड यांनी बुधवारी लक्ष्मणराव आपटे प्रशाला, मॉडर्न हायस्कूल व महापालिकेच्या हुतात्मा शिरीषकुमार प्रशाला या शाळांना भेट दिली. पहिली ते चौथीच्या शाळांबाबत आढावा घेऊन निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

Maharashtra Times 28.1.2021

# News related to Progressive Education Society

## कमी पटसंख्येच्या शाळा सुरूच राहणार

### शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांचे स्पष्टीकरण

पुणे, ता. २७ : राज्यातील प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे, अशीच आमची भूमिका आहे. त्यामुळे राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करणे किंवा त्यांचे समायोजन करण्याबाबत कोणालाही आदेश दिलेला नाही, असे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

**पुण्यातील शाळांना भेट**

वर्षा गायकवाड यांनी पुणे दौऱ्यात शाळांना भेटी दिली. आपटे प्रशाला, मॉडर्न हायस्कूलसह पालिकेच्या शाळांना भेट दिली. त्या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांनी प्रयोग करून दाखविले. या वेळी उपस्थितीचा आढावाही त्यांनी घेतला.

बालभारती येथे झालेल्या कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.. शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. राज्यातील कोणतीही शाळा बंद करण्याचा किंवा पटसंख्या कमी असलेल्या शाळांचे समायोजन करण्याचा विचार नाही, त्याबाबत मंत्रालय स्तरावरून आदेशही दिलेले नाहीत. शिक्षक भरती घोटाळ्यात अडकलेल्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा जामीन न्यायालयाने फेटाळला आहे. तपासात दोषी असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करणार असल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट केले.

शिक्षक भरती पवित्र पोर्टल माध्यमातूनच होणार आहे, एसईबीसी संवर्गास स्थगिती दिल्याने ही भरती प्रक्रिया रखडली होती. सहा हजार शिक्षकांची पदे भरण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली आहे. हा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवला आहे. त्यास मान्यता मिळाली की भरती प्रक्रिया सुरू केली जाईल. तसेच शिक्षण सेवकांच्या मानधनातही वाढ करण्याचा निर्णय घेतला जाईल.

वर्षभरात बालभारतीचे स्वतंत्र चॅनेल पान २ वर »



शिवाजीनगर : शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी मॉडर्न शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## शिक्षणमंत्र्यांची मॉडर्न हायस्कूलला भेट

औंध, ता. ३० : कोरोनानंतर सुरू झालेल्या शिवाजीनगरच्या मॉडर्न हायस्कूलला शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाळेमध्ये घेण्यात आलेल्या कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांची त्यांनी या वेळी पाहणी केली.

शाळा कोरोना काळात ऑनलाइन व ऑफलाइन अध्यापनाचे कार्य उत्तमरित्या करत आहे असे त्या म्हणाल्या. शाळेने संपूर्ण नियमावलीचे पालन करून नववी व दहावीचे वर्ग यशस्वीपणे सुरू केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. शाळा आणि संस्था मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी करत असलेल्या प्रयत्नांबाबत त्यांनी गौरवोद्गार काढले तसेच पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, नगरसेविका व संस्थेच्या सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, डॉ. निवेदिता एकबोटे, मृगजा कुलकर्णी, प्राचार्य राजेंद्र झुंजारराव, मुख्याध्यापिका संगीता लकारे, उपमुख्याध्यापिका शारदा साबळे, पर्यवेक्षिका सीमा कुळधरण आदी उपस्थित होते.

Sakaal 31.1.2021

## वर्षभरात बालभारतीचे स्वतंत्र चॅनेल

### शिक्षणमंत्र्यांची घोषणा; बालचित्रवाणीतील चांगले साहित्य उपलब्ध करणार



पुणे, ता. २७ : विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षण विभागाने सुसज्ज तीन स्टुडिओ उभे केले आहेत. राज्यातील अनेक शाळा डिजिटल झाल्या आहेत. आता पुढच्या वर्षभरात बालभारतीचे स्वतंत्र चॅनेल सुरू केले जाईल, अशी घोषणा राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी केली.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) संस्थेच्या ५४ व्या वर्धापन दिनानिमित्त व किशोर मासिकाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या शुभारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात गायकवाड बोलत होत्या. या वेळी शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, बालभारतीचे संचालक दिनकर पाटील, समन्वयक विवेक गोसावी, कवी इंद्रजीत भालेराव, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार आदी उपस्थित होते.



गायकवाड म्हणाल्या, कोरोना हे आव्हान होतेच, पण ती संधी देखील होती. त्यामुळे आपल्याला अनेक गोष्टी ऑनलाइन करता आल्या.

महापालिका, जिल्हा परिषदेसह अनेक शाळा व्हर्च्युअल झाल्या आहेत. त्या शाळेतील मुलांसाठी दर शनिवारी विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करणे शक्य आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना एकाच वेळी शिक्षण मिळेल. महापालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदेच्या शाळेतील प्रवेशासाठी रांगा लागतात, याबाबतची माहिती लोकांपर्यंत पोचवण्याचा शिक्षण विभागातर्फे प्रयत्न केला जाणार आहे. बालचित्रवाणीमधील चांगले शैक्षणिक साहित्य पुनर्जिवत करून ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

Sakaal 28.1.2021

# गुरुवर्य कै.शंकरराव रामचंद्र कानिटकर स्मृतीदिन- २५ जानेवारी




## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे ५

**गुरुवर्य शंकरराव कानिटकर (संस्थापक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी)**
**स्मृतीदिन कार्यक्रम**

**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर भागातील सर्व शाळा आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी**

दरवर्षी दिनांक २५ जानेवारी रोजी संस्थेचे संस्थापक गुरूवर्य शंकरराव कानिटकर यांना अभिवादन व आदरांजली अर्पण करण्यासाठीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. याहीवर्षी संस्थेचे संस्थापक गुरुवर्य शंकरराव कानिटकर यांना अभिवादन करण्यासाठी व आदरांजली अर्पण करण्यासाठी **सोमवार, दि. २५ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.३० वा.** संस्थेच्या शिवाजीनगर भागातील सर्व शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुरुवर्य शंकरराव कानिटकर सरांना आदरांजली अर्पण करण्यासाठी आपल्या वेळापत्रकाप्रमाणे नेमून दिलेल्या शैक्षणिक कामकाज संभाळून सकाळी ११.३० वा.मॉडर्न हायस्कूल शिवाजीनगर पुणे ५ च्या आतील पटांगणावर उपस्थित रहावे. संस्थेचे मा.कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन र. एकबोटे हे या कार्यक्रमास उपस्थित राहाणार आहे. सदर कार्यक्रम दुपारी १२.१५ पर्यंत असेल. संस्थेच्या कार्यक्रमास येताना करोना कोव्हीड च्या पार्श्वभूमीवर social distancing, face mask, sanitization नियमांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

23/1/2021

डॉ.आर.एस झुंजारराव
कार्यक्रम समन्वयक

प्रा.शामकांत देशमुख
कार्यक्रम समन्वयक

## गुरुवर्य कै.शंकरराव रामचंद्र कानिटकर स्मृतीदिन- २५ जानेवारी

**गुरुवर्य कै.शंकरराव रामचंद्र कानिटकर हे एक मराठी शिक्षक ,प्राध्यापक आणि समाजसेवक होते. ते ६५ वर्षे पुणे शहरात राहिले. ते सतत १८ वर्षे पुणे नगरपालिकेचे नगरसेवक होते. कानिटकरांनी पुण्यामध्ये इ.स. १९३४ साली प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची आणि मॉडर्न हायस्कूलची स्थापना केली. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !**



# गुरुवर्य कै.शंकरराव रामचंद्र कानिटकर स्मृतीदिन- २५ जानेवारी









## गुरुवर्य कै.शंकरराव रामचंद्र कानिटकर स्मृतीदिन- २५ जानेवारी








# *Republic Day Celebrations 26th January 2021*











## *Republic Day Celebrations 26th January 2021*














# *Visit of Best College Inspection Committee, SPPU on 9.1.2021*
































# *Visit of Best College Inspection Committee, SPPU on 9.1.2021*

















# *Visit of Best College Inspection Committee, SPPU on 9.1.2021*



























# *Congratulations to Team Progressive and Team Modern*











# *Congratulations to Team Progressive and Team Modern*




Hearty Congratulations to Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote Sir, Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam, Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir all CDC Members, Teaching and Non Teaching Staff Members, Students and Parents on being conferred Prestigious "Best College Award" of Savitribai Phule Pune University, Pune to Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce, (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Hearty Congratulations to Prof. Dr. Anjali Sardesai, IQAC Coordinator on being conferred "Best Teacher Award" of Savitribai Phule Pune University, Pune-7.

- Principal Dr. Rajendra Zunjarrao and
P.E.Society Secretary and Vice Principal Prof.Shamkant Deshmukh.

मनःपूर्वक धन्यवाद. हार्दिक अभिनंदन. प्रोग्रेसिव व मॉडर्न या कुटुंबाच्या सर्व सदस्यांनी घेतलेले परीश्रम, सांघिक भावना, प्रामाणिक कष्ट यामुळे हे शक्य झाले आहे.संस्थेचे आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे सर, संस्थेच्या सहसचिव व महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्ष प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे मॅडम, संस्थेचे सचिव प्राध्यापक शामकांत देशमुख यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे, प्रोत्साहनामुळे व परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे. सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

- Dr. Anjali Sardesai, IQAC Coordinator



# *Congratulations to Team Progressive and Team Modern*








# *Congratulations to Team Progressive and Team Modern*













# *Congratulations to Team Progressive and Team Modern*

Felicitation of our College and Respected Principal Sir by ***Bank of Maharashtra staff*** on 30.1.2021 for the ***'Best College Award'*** achievement of our college.





# *Report of Institutional Repository (IR@MCASC)- January 2021*

In the COVID-19 pandemic situation, with the help of Institutional Repository@MCASC, Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 is able to reach out to students by providing them e-contents, lecture notes prepared by respective teachers and scanned reading materials selected by the teachers.

We are thankful to the following teachers and departments for their contribution in IR@MCASC during January 2021:




**CATEGORY: LECTURE NOTES/BOOK CHAPTERS**

- M.Sc Physics (Part I and Part-II) : Prof.Amishi Rindani
- SYBSc Physics : Prof.Sanket Gogte

**CATEGORY: SOUVENIR / REPORTS**

- Prof. Pooja Paratne and Prof. Pratul Gadagkar :
  **Result Analysis 2017-2019 and Progress Report**



# *Release of the Result Analysis 2017-19 and Progress Report*






Published By : Dr. R. S. Zunjarrao, Principal, Modern College, Shivajinagar, Pune 411005

Advisor : Prof. S. R. Chaudhari, Vice Principal, Modern College, Shivajinagar, Pune 411005

Editor : Prof. Pooja M. Paratane

Co-Editor : Prof. P. V. Gadagkar

College Website : http://moderncollegepune.edu.in/

Analysis of results in improvising the standard of education has been one the most important problems in educational institutions. Post result analysis is one of the most important aspects of any institute. It reflects the academic growth of the institute, quality of teaching and also the effectiveness of curriculum. Result analysis is often considered to be a time consuming and tedious task due to the large number of students and the number of courses. In spite of this, there is a possibility of erroneous data which affects the overall result of the institute. It becomes very difficult to get the result analysis of all students as per required parameters like : subject-wise result, teacher-wise result, class-wise, category-wise and gender-wise results etc. due to complicated data.

We have analyzed results of three academic years' viz. 2016-17, 2017-18 and 2018-19 using this 'Post Result-Analysis Software' under all these parameters. It contains result analysis of each class from first year to third year and post graduate students of various streams collectively under a single channel. In section 2, we have provided result analysis of the academic year 2018-19 in this booklet. In a similar fashion detailed result analysis of the academic year 2016-17 and 2017-18 were prepared.

In section 3, a comparative study of three consecutive academic years 2016-17, 2017-18 and 2018-19 are presented. The overall progress of three streams (Arts, Commerce and Science) , subject-wise progress and gender-wise progress are presented in this comparative study. In section 4, progression of all the graduated students in 2019 (i.e. students admitted in the academic year 2016-17) is discussed.

**- Prof.Pooja Paratane**
**Editor (Result Analysis Report)**



# Events Conducted by National Service Scheme (NSS) in January 2021

# Celebration of Birth Anniversary of Swami Vivekananda and Rajmata Jijau– 12th January 2021





*Fill the brain with high thoughts, highest ideals, place them day and night before you, and out of that will come Great work* - Swami Vivekananda.

To commemorate the birthday of Swami Vivekananda, maker of Modern India, National Youth day is celebrated with great joy, enthusiasm every year in India on 12th January.

Also on the same Day, the birth anniversary of Rajmata Jijabai is also celebrated.

On The occasion of Birth anniversary the NSS Unit of Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-05 arranged the online program under the Guidance of Dr.R.S.Zunjarrao Sir (Principal of MCASC) and Prof.Dr.P.S.Varade sir (Program Officer of MCASC). The Program Was Organized by NSS volunteers on the online platform i.e.Google Meet.

The program started with the motivating speech of Prof.P.S.Varade. The students were motivated to be good citizens of India, thus contributing to the development of the country.

After this motivating speech Rashmi Zatale performed Jijau Vandana. Swati Auti delivered the Speech on Rajmata Jijau which gives details information about Jijau. After The speech Gauri Mankar gave information about Swami Vivekanand and their thoughts.

Nikita Muley recited a beautiful poem on Rajmata Jijau. After this motivational poem Kalyani Gore delivered a speech addressing todays youth about how we can face challenges in our day to day life. Tanaya Mondhe presented a video in which Nikita Bahirat sang a song "We are the daughters of Jijau". Amol Mishrikotkar read the speech which was delivered by Swami Vivekanand in Chicago.

After this speech Aditi Shevate delivered a speech on Rajmata Jijau which gives message about protection of todays Women.

On this occasion NSS Volunteers (Sanskruti Shelar, Prerna Jaju, Siddhi Lokhande, Onkar Date) drew awesome sketches of Youth Ideals. A video which includes this sketches was presented by Tanaya Mondhe. Ravindra Shinde told us how todays youth can take guidance from Swami Vivekanand through his speech.

After this speech Sneha Chopada presented a video about Indian Army and their dedication towards the country. Sanskruti Shelar delivered the speech on Rajmata Jijau and at the end of the program Rashmi Zatale delivered a speech about depression and motivation in our today's youth. The anchoring of this program was done by Sukanya Aru.

# Celebration of Republic Day – 26th January 2021

The NSS Volunteers celebrated Republic Day and Parakram Diwas under the guidance of NSS Programme Officer Prof.Dr.P.S.Varade on 26th Janaury 2021 by organizing several programs in online mode on Google Meet.















# *Events Conducted in the Library during January 2021*

## 1. Savitribai Phule Jayanti: 3rd January 2021

The Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of First Women Teacher of India 'Krantijyoti Savitribai Phule'.

Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, College Librarian Dr. Shantashree Sengupta, NSS Co-ordinator Dr.Prabhakar Varade and Library Staff paid their respect to Savitribai Phule.

Principal Sir briefly addressed the great contributions of Savitribai Phule regarding how she demanded dignity for all women, for which she, along with her husband Jyotirao Phule worked their entire lives. The principles of humanity, equality, liberty and justice were of utmost importance to her. During a time when women were mere objects, she ignited a spark that led to equality in education which was impossible in those times.

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to the library staff members who were present during the programme.

-Dr.Shantashree Sengupta, Librarian.














# *Events Conducted in the Library during January 2021*















# Events Conducted in the Library during January 2021

## 2. Jijau Maa Saheb Jayanti and Swami Vivekananad Jayanti: 12th January 2021

The Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversaries of Jijau Maa Saheb and Swami Vivekanand on 12th January 2021.

Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, College Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Jijau Maa Saheb and Swami Vivekanand. Principal Sir briefly addressed the great contributions of Jijau Maa Saheb who was known to be an influential and determined woman. Jijau Maa Saheb was an embodiment of self-respect and virtue. Famed for her fore-sight, Jijabai was herself an able warrior and administrator. She passed down her quality traits to the growing Shivaji, and instilled within him a sense of duty, courage and fortitude to overcome any hardship arising. Under her guidance and care, Shivaji Maharaj developed within him a human touch that saw him harbor a great respect for all women, religious tolerance, and justice, along with the love for his country, his religion and his quest for freedom of Maharashtra.

Shivaji Maharaj owes his greatness to the inspiration of his mother who dedicated her life to bringing up her son to become one of the greatest rulers of the Maratha Empire.

Swami Vivekananda, was an Indian Hindu monk, a chief disciple of the 19th-century Indian mystic Ramakrishna. He was a key figure in the introduction of the Indian philosophies of Vedanta and Yoga to the Western world. His vast knowledge of Eastern and Western culture as well as his deep spiritual insight, fervid eloquence, brilliant conversation, broad human sympathy made an irresistible appeal to the people in contact with him, who heard him and read about him.

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to the library staff members who were present during the programme.

-Dr.Shantashree Sengupta, Librarian.



## *Events Conducted in the Library during January 2021*

### 3. Netaji Subhashchandra Bose Jayanti (Parakram Diwas) : 23rd January 2021

The Library and Information Centre of Progressive Education Society’s Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of Netaji Subhash Chandra Bose on 23.01.2021.

Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, College Librarian Dr. Shantashree Sengupta, NSS Program Officer Prof. Dr. Prabhakar S. Varade and Library Staff paid their respect to Subhash Chandra Bose.

Principal Sir mentioned that this year i.e. in 2021, the Government of India declared 23 January as Parakram Diwas to commemorate the birth anniversary of Netaji Subhash Chandra Bose.

Subhash Chandra Bose gave us the three main principles of Tyag (Sacrifice), Dhairya (Patience) and Shaurya (Courage).

Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir briefly addressed the great contributions of Netaji Subhash Chandra Bose who was an Indian revolutionary prominent in the independence movement against British rule of India. He also led an Indian national force from abroad against the Western powers during World War II. Principal Sir mentioned that “Subhash Chandra Bose gave the famous quote which was "Give me blood and I will give you freedom". Another famous quote was “Dilli Chalo”. This was the call he used to give the INA armies to motivate them. “Jai Hind”, was another slogan used by him and later adopted by the Government of India and the Indian Armed Forces. One of his main contributions towards the same is to form the 'Azad Hind Fauj' or the Indian National Army, where radical measures were taken to attain independence for the country. ”

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to Prof.P.M.Paratne, Department of Mathematics and Prof.Pratul Gadagkar, Department of Mathematics and library staff members who were present during the programme.

-Dr.Shantashree Sengupta, Librarian.





# *Events Conducted in the Library during January 2021*

## 3. Netaji Subhashchandra Bose Jayanti (Parakram Diwas) : 23rd January 2021







# "हुतात्मा दिन"- ३० जानेवारी २०२१

Inf. To: staff & students, We must follow the said instruction/appeal. 29/1/2021

दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन ( स्तब्धता ) पाळून हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : जपुती२२२१/प्र.क्र.९/२९
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ जानेवारी, २०२१

वाचा :- केंद्र शासनाच्या गृह विभागाच्या क्र.२/१/२०२१-Public, दिनांक १८ .०१.२०२१ चे पत्र.

प रि प त्र क

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शनिवार, दिनांक ३० जानेवारी,२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. शनिवार, दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन ( स्तब्धता ) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१२८१६५११५८१२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ल. ना. सदाफुले )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.

# "हुतात्मा दिन"- ३० जानेवारी २०२१



















# Activities conducted by Modern Media Station

# *Institution's Innovation Cell*

# Institution's Innovation Council






# *Institution's Innovation Council*






# *Institution's Innovation Council*






# Events organized by the Departments during January 2021

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा




बोलणे हा केवळ जगाच्या व्यवहारातील उपचाराचा भाग नाही. बोलण्यातून भाषा, साहित्य, समीक्षा, संस्कृती आणि पर्यायाने समाजाचे उन्नयन होत असते. म्हणूनच मराठी भाषा पंधरवडा निमित्ताने विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्य विकासला चालना मिळावी या हेतूने मराठी विभाग वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करत आहे.

दर वर्षी 'मराठी भाषा पंधरवडा'निमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. या वर्षीही ' कोविड १९' च्या प्रादुर्भावाच्या सध्याच्या काळात ऑनलाइन माध्यमाद्वारे महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. २१ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११:३० ते १२:३० या वेळात *वक्तृत्व* हा विशेष कार्यक्रम मराठी विभाग आयोजित करत आहे. सदर कार्यक्रमाचा महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी, संशोधन करणाऱ्या अभ्यासकांनी, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर सहकाऱ्यांनी, सर्व मराठी रसिकांनी आस्वाद घ्यावा.

वक्तृत्व स्पर्धेसाठी विषय -

१) तीन कृषि विधेयके आणि शेतकरी आंदोलन
२) वाचाल तर वाचाल!
३) द्वेषाणू की विषाणू ?
४) टीआरपीच्या नादात...
५) पर्यावरणपूरक जग : काळाची गरज
६) संशोधन आणि ज्ञान निर्मिती प्रक्रिया

यांपैकी कोणत्याही विषयाची निवड करून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपली नावे मराठी विभागातील प्रा.विनोद पवार(पदवी-मराठी विभाग समन्वयक – भ्रमणध्वनी - ९०४९२८९४८५) आणि प्रा. सुरेश रासकर(भ्रमणध्वनी - ७५८८०२३६६२) दि. २० जानेवारी २०२१ पर्यंत द्यावीत.

**वक्तृत्व स्पर्धेसाठी नियम - वक्तृत्व विषय सादरीकरणाला प्रत्येकी ५+२ मिनिटांची वेळ असेल.**

सदर कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी आणि सदर स्पर्धेत भाग घेण्यासाठीखाली दिलेल्या लिंकचा वापर करावा.

https://meet.google.com/rjy-bqsv-bgh

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

***प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे***

## मॉडर्न कला ,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे ५

## मराठी विभाग

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे ५ येथे **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** उपक्रमानिमित्त विविध उपक्रम १४ जानेवारी २०२१ ते २८ जानेवारी २०२१ या दरम्यान राबवले गेले. मराठी विभागाने आयोजित केलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दरम्यान महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम, उपक्रम राबविले, याची सुरुवात श्री. वसंत कुलकर्णी यांच्या 'अभिराम भडकमकर यांचे साहित्य' या विषयावरील व्याख्यानाने झाली. अभिराम भडकमकर यांच्या साहित्याने मराठी साहित्यात घातलेली भर या व्याख्यानात वसंत कुलकर्णी यांनी उलगडून दाखवली.या पंधरवड्यानिमित्त 'कवी आपल्या भेटीला' या कार्यक्रमात कवी अरविंद हंगरगेकर यांचे 'माझ्या कविता निर्मितीचा प्रवास' या विषयावर व्याख्यान झाले, तसेच त्यांच्या कविता ऐकण्याचा योग विद्यार्थ्यांनी आला.






# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

या पंधरवड्यात महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक यांनी "कविकट्टा" या उपक्रमातून आपल्या स्वरचित तसेच संकलित कविता सादर केल्या. या पंधरवड्यात वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धांचेही आयोजन केले होते, त्यामध्ये विद्यार्थ्यांना अनेक विषय दिले गेले होते, विद्यार्थ्यांनी या स्पर्धांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.









# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

या पंधरवड्याच्या समारोपाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. रमेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानातून मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना नवीन उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधींचे मार्गदर्शन करताना ते म्हणाले " मराठी विषयातील विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक मीडिया कडे सुद्धा लक्ष द्यायला हवे. कारण त्यातून नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. ब्लॉग रायटिंग, वेब डिझाइनिंग, जाहिरात, शॉर्ट फिल्मस्, सुत्रसंचालन, वेब सिरीज्, इव्हेंट मँनेजमेंट, प्रकाशन व्यवसाय इ. अनेक क्षेत्रे असून त्यातून अनेक रोजगार आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील असे ते म्हणाले. या सर्वांचे ज्ञान आज विद्यार्थ्यांना असायला हवे. भाषा संगोपन आणि संवर्धन ही काळाची गरज असून भाषा ही नेहमीच जिवंत राहत असते असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. निशा भंडारे यांनी केले. तर प्रमुख वक्त्यांचा परिचय व स्वागत प्रा.डॉ.वैजयंतीमाला जाधव यांनी केले, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला शाखेच्या उपप्राचार्या डॉ. अमृता ओक होत्या.मराठी भाषेचे संवर्धन ही एका रात्रीत होणारी गोष्ट नसून त्यासाठी सतत आपले जगणे ,जीवन व्यवहार आणि भाषा यांची सांगड घालणे आवश्यक आहे असे त्या म्हणाल्या. भाषा मानवी जीवनात अतिशय महत्वाची असून तिचे संवर्धन हे तिच्या रोजच्या वापरातून दररोज होत असते असे त्या म्हणाल्या.कार्यक्रमाचे आभार प्रा. सुरेश रासकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या आरंभी स्वागत गीत दर्शन कुलकर्णी या विद्यार्थ्याने गायले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या शास्त्री या एफवायबीए च्या विद्यार्थ्यीनीने केले, या भरगच्च अशा पंधरा दिवसाच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी सामील झाले.कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर हे सर्व कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले.

विद्यार्थ्यांनीसुद्धा ऑनलाईन पद्धतीने सहभाग घेतला होता. हा संपूर्ण पंधरवडा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या मार्गदर्शना खाली पार पडला.महाविद्यालयातील अशा सर्वच कार्यक्रमांना संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्रा.डॉ.गजानन एकबोटे,सहकार्यवाह प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे आणि सचिव प्रा.शामकांत देशमुख यांचे मार्गदर्शन लाभत असते.

डॉ.वैजयंतीमाला जाधव
कार्यक्रम समन्वयक

डॉ.निशा भंडारे
विभागप्रमुख

# *Faculty Members Invited as Resource Persons during January 2021*

## *Prof.Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi Invited as a Resource Person*



# *Prof.Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi Invited as a Resource Person*

सकाळईन तर्फे व्याख्यानमालेत संविधानदिन ते प्रजासत्ताक दिन या विषयावर *डॉ. निशा भंडारे,* मराठी विभागप्रमुख यांनी दि. २९.१.२०२१ रोजी व्याख्यान दिले.











सकाळनगर : संविधान जागर कार्यक्रमाला उपस्थित सकाळ इनचे पदाधिकारी आणि विद्यार्थी.

## '...काळ इन'कडून संविधान जागर

प्रजासत्ताक दिनानिमित्त 'सकाळ इन'ने संविधान जागर कार्यक्रम ...जित केला होता. सकाळनगर येथे झालेल्या या कार्यक्रमामध्ये डॉ. ...ंडारे, डॉ. मंजुषा कुलकर्णी, एसआयएलसीचे जय प्रकाश आदी उपस्थितीत होते. डॉ. भंडारे यांनी राज्यघटनेसह आणि समता, न्याय व बंधुता याचे महत्त्व पटवून दिले. त्या म्हणाले, ''आम्ही सर्व सावित्रीबाईंच्या लेकी आहोत. आम्ही आज जे काही काम करत आहोत, ते केवळ आणि केवळ सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच! आजच्या मुलींनी व महिलांनी दुसऱ्यांनावर अवलंबून न राहता संरक्षणाचे धडे घेतले पाहिजे.'' डॉ. कुलकर्णी यांना व्यवस्थापन आणि राज्यघटनेवर मार्गदर्शन केले. गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालय आणि मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर व एसआयएलसीचे ॲग्री बिझनेस मॅनेजमेंटचे विद्यार्थी या वेळ उपस्थित होते.

Sakaal 31.1.2021





# Modern Achievements

# Modern Achievements

आपल्या मॉडर्न कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर पुणे ०५ येथील विद्यार्थिनी ***कु. सुकन्या संतोष आरु S.Y.BSc. Div. B* (वरिष्ठ गट)** हिने

१)महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था नागपूर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत पुणे विभागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिला पहिल्या क्रमांकाचं १०,००० रुपयांचे बक्षीस मिळाले आहे.

२)त्याचप्रमाणे राजा प्रसेनजीत अल्पसंख्याक शिक्षण बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत अकोला बुलढाणा पुणे अमरावती हिंगोली या जिल्ह्यातून सुकन्या आरु हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या दोन्ही स्पर्धेत सुकन्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे सुकन्या तुझे खूप खूप अभिनंदन.











# *Modern Achievements*

वेताळ प्रतिष्ठान सिंधुदुर्ग च्या वतीने दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आजचा भारत हा जगातील तरुणांची सर्वाधिक संख्या असलेला देश असून तरूणांच्या वाढत्या आत्महत्या ही समस्या गंभीर बनत चालली आहे. या घटकावर विचारमंथन करण्याच्या उद्देशाने ***'तरुणाईमध्ये वाढते आत्महत्येचे प्रमाण : एक गंभीर समस्या*** या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपल्या मॉडर्न महाविद्यालयातील विद्यार्थिनी ***कु. सुकन्या संतोष आरु (द्वितीय वर्ष विज्ञान)*** हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे. महाविद्यालयाच्यावतीने तिचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.





# Modern Achievements



राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय पुरस्कार
२०१९-२०.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रासेयो- २०२०/प्र.क्र.६६/साशि-७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०० ०३२
तारीख: २० जानेवारी, २०२१

**संदर्भ : शासन पत्र समक्रमांक दिनांक २७ जुलै २०२०**

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या पध्दतीवर आधारित राज्यस्तरावर राज्याच्या रौप्य महोत्सवी वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत पुरस्कार देण्याची प्रथा सन १९९३-९४ वर्षापासून सुरु करण्यात आली. त्यानुसार विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्यात आले व राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेण्यात आला

**शासन निर्णय :**

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये नि:स्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगिकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या नि:स्वार्थ सेवेचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने खाली नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय पुरस्कार देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

(१) सर्वोत्कृष्ट विद्यापीठ (स्मृतिचिन्ह)

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव |
|---|---|
| १ | सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |

(२) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक (स्मृतिचिन्ह व रु. १०,०००/-)

| अ.क्र. | कार्यक्रम समन्वयकाचे नाव | विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रभाकर बचाराम देसाई | सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |

(२. अ) कार्यक्रम समन्वयक प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार

| अ.क्र. | कार्यक्रम समन्वयकाचे नाव | विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|
| १ | डॉ. केशव माणिक वाळके, | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. |

(३) सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार (स्मृतिचिन्ह व रु. ५,०००/- प्रत्येकी)

| अ.क्र. | कार्यक्रम अधिका-यांचे नाव | महाविद्यालय/विद्यापीठ |
|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र अशोक आहिरे | मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नाशिक<br>सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे |
| २ | डॉ धनंजय नाथा लोहार | श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, ता. आटपाडी जि.सांगली<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| ३ | डॉ. रश्मी पी.जोशी (सावलकर) | दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे श्री. राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला<br>संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती |

शासन निर्णय क्रमांकः रासेयो- २०२०/प्र.क्र.६६/साशि-७

| | | |
|---|---|---|
| ९ | विशाल मनोहर शेंडे | श्री. शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजुरा,चंद्रपूर.<br>गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. |
| १० | मंदार विजय ठाकूर | कृषि विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी<br>डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. |
| ११ | पुजा नागनाथ पंढरपुरे | टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे.<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. |
| १२ | मोहन मनोज वरठी | डॉ. आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, नागपूर.<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर |
| १३ | सौरभ तुळशीराम वाघमारे | दै. भ. फ. कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर |
| १४ | रेणूका सुनील मिरगे | प्रशासकीय सेवा पदवी महाविद्यालय, नागपूर<br>कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक. |
| १५ | प्रतीक्षा विलास आदम | एसपीएन दोशी महिला महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई.<br>श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई. |
| १६ | स्वप्नजा अनिलराव खोटारे | सामुदायिक विज्ञान महाविद्यालय,परभणी.<br>वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी |
| १७ | आफशाँ कलीमपाशा मशायक | मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,पुणे.<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय (+२ स्तर), पुणे. |
| १८ | शैलेश दशरथराव जोगदंड | कृषि महाविद्यालय, पुणे<br>महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. |
| १९ | दत्तात्रय दगु जाधव, | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातपूर जि. नाशिक.<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई. |
| २० | प्रविण सुखदेव अटोले | आनंदराव धोंडे अलीसा बाबाजी महाविद्यालय, काडा<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०१२०१२५४२२१७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DATTATRAYA
RAMBHAU KAHAR

(द. रा. कहार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

पृष्ठ ५ पैकी ४



# *Modern Achievements*















## सर्वोत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कारासह विविध पारितोषिके

# राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कारात पुणे विद्यापीठ मानकरी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य शासनाकडून राष्ट्रीय सेवा योजनेसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मानकरी ठरले आहे. सर्वोत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कारासह सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय असे विविध पुरस्कारही विद्यापीठाने पटकावले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजासाठी केलेल्या कामाचा गौरव पुरस्काराच्या माध्यमातून केला

जातो. त्यानुसार २०१९-२० साठीचे विविध पुरस्कार शासन निर्णयाद्वारे गुरुवारी जाहीर करण्यात आले. या पुरस्कारांसाठी राज्य शासनाकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात आला.

### भारती विद्यापीठाचाही गौरव

पुरस्कारांमध्ये भारती विद्यापीठाचाही गौरव झाला आहे. संस्थेच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार आणि याच महाविद्यालयाचे डॉ. सुनील पवार यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला आहे.

विद्यापीठाचे डॉ. प्रभाकर देसाई यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक पुरस्कार, नाशिकच्या कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालयाचे प्रा. रवींद्र आहिरे यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला आहे. नाशिकच्या कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, आकुर्डीच्या प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील मनोज गुंजाळ या विद्यार्थ्याला सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयातील आफशाँ मशायक, टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील पूजा पंढरपुरे, कृषि महाविद्यालयातील शैलेश जोगदंड यांनाही सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार मिळाला आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Thu, 21 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57871769

# Modern Achievements

पुढारी

## एनएसएस पुरस्कारांमध्ये पुणे विद्यापीठाची बाजी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय सेवा योजने (एनएनएस) साठी राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बाजी मारली आहे. सर्वोत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कारासह सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय असे विविध पुरस्कार विद्यापीठाने पटकावले आहेत.

एनएनएसच्या माध्यमातून समाजासाठी केलेल्या कामाचा गौरव पुरस्काराच्या माध्यमातून केला जातो. त्यानुसार २०१९-२० साठीचे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. या पुरस्कारांसाठी राज्य शासनाकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात आला. पुणे विद्यापीठाच्या एनएनएसचे संचालक डॉ.



प्रभाकर देसाई यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक पुरस्कार, नाशिकच्या कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालयाचे प्रा. रवींद्र आहिरे यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार तर महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, आकुर्डीच्या प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील मनोज गुंजाळ या विद्यार्थ्याला सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच, पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयातील आफशाँ मशायक, टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील पूजा पंढरपुरे, कृषी महाविद्यालयातील शैलेश जोगदंड यांनाही सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार मिळाला आहे.

### भारती विद्यापीठाचाही गौरव

पुरस्कारांमध्ये भारती विद्यापीठाचाही गौरव झाला आहे. संस्थेच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार आणि याच महाविद्यालयाचे डॉ. सुनील पवार यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला आहे.

Pune Edition
Jan 22, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## पुणे विद्यापीठाला राज्य शासनाचा पुरस्कार

पुणे, दि. २२ - राज्य शासनाकडून राष्ट्रीय सेवा योजनेसाठी दिला जाणारा पुरस्कार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कारासह सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय असे पुरस्कारही विद्यापीठाने मिळविले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजासाठी केलेल्या कामाचा गौरव पुरस्काराच्या माध्यमातून केला जातो. त्यानुसार २०१९-२० साठीचे विविध पुरस्कार शासन निर्णयाद्वारे गुरुवारी जाहीर झाले. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाचे डॉ. प्रभाकर देसाई यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक पुरस्कार मिळाला. आकुर्डीच्या प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील मनोज गुंजाळ या विद्यार्थ्यांला सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच, पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयातील आफशाँ मशायक, टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील पूजा पंढरपुरे, कृषी महाविद्यालयातील शैलेश जोगदंड यांनाही सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार मिळाला.

Prabhat 23.1.2021

## विद्यापीठाची पुरस्कारांत बाजी

पुणे : राज्य सरकारकडून राष्ट्रीय सेवा योजनेसाठी (एनएसएस) प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कारांमध्ये राज्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मानकरी ठरले असून, विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचा पुरस्कार मिळाला आहे. यासोबतच सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय, अशा विविध पुरस्कारांवरही विद्यापीठाने नाव कोरले.

एनएसएसच्या माध्यमातून समाजासाठी केलेल्या कामाचा गौरव पुरस्काराच्या माध्यमातून केला जातो. विद्यापीठाचे डॉ. प्रभाकर देसाई यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक पुरस्कार, आकुर्डीच्या प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील मनोज गुंजाळ, मॉडर्न महाविद्यालयातील आफशाँ मशायक, टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील पूजा पंढरपुरे, कृषी महाविद्यालयातील शैलेश जोगदंड यांना सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्कारांमध्ये भारती विद्यापीठाचाही गौरव झाला आहे. संस्थेच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा, तर डॉ. सुनील पवार यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला आहे.

Maharashtra Times
25.1.2021

# *Modern Achievements*






# Modern Achievements

Glad to communicate you all that, ***Ms.Tanaya Nalawade*** a student of S.Y.B.Sc. (Microbiology), P. E. Society's Modern College of Arts, Science and Commerce Pune-5 has represented Parade Commander of Navy NCC Troop. Proud feeling moment for all of us. In all three students were selected from SPPU, Pune for Republic Day parade and all are from P. E. Society's Modern College, Shivajinagar, Pune-5.






# *Modern Achievements*

Our ***Navy Cadet Tanaya M Nalawade*** got 2nd all India best Cadets in RD camp Delhi.

-Dr.Ashok Kamble, NCC Co-ordinator (21.1.2021)

**BEST CADETS : RDC 2021**

| S.No | CAT | REGT NO | RANK | NAME | DTE | POSN |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SD (ARMY) | **MP/18/SDA/858247** | **SUO** | **Yogesh Chaturvedi** | **MP & CG** | 1 |
| 2 | | KA/18/SDA/221517 | JUO | Parshwa S | Kar & G | 2 |
| 3 | | TN19SDA600410 | Cdt | Chirag Verma | TN,P&AN | 3 |
| 1 | SD (NAVY) | **KL19SDN169261** | **NC I** | **Anirudh S Bhaskaran** | **Ker & L** | **1** |
| 2 | | PB/18/SDN/127623 | PO | Nakul Sharma | PHHP&C | 2 |
| 3 | | TN19SDN921012 | NC I | Arun S | TN,P&AN | 3 |
| 1 | SD (AIR) | **GJ/19/SDF/226275** | **Cdt Cpl** | **Dheeraj Singh** | **Guj,D & D** | 1 |
| 2 | | MH/SDF/19/970275 | CWO | Vivek Singh | Mah | 2 |
| 3 | | HR/19/SDF/268736 | Cdt | Mayank Sharma | PHHP&C | 3 |
| 1 | SW (ARMY) | **DL19SWA100708** | **Cpl** | **Manya M Kumar** | **Delhi** | **1** |
| 2 | | KA/18/SWA/255143 | JUO | Deeksha Sethi | Kar & G | 2 |
| 3 | | UK/SW/18/A/107642 | Cdt | Himani Singh | UK | 3 |
| 1 | SW (NAVY) | **TN19SWN921404** | **NC I** | **[illegible] Muralidharan** | **TN,P&AN** | **1** |
| 2 | | MH/SWN/19/980502 | CC | Tanaya M Nalawade | Mah | 2 |
| 3 | | KL19SWN199114 | NC I | Archana PK | Ker & L | 3 |
| 1 | SW (AIR) | **MH/SWF/19/970292** | **CWO** | **Kashish Methwani** | **Mah** | **1** |
| 2 | | HP/19/SWF/309253 | CWO | Zubeida Bodh | PHHP&C | 2 |
| 3 | | KA/19/SWF/140207 | Cdt | Devika R Singh | Kar & G | 3 |

19/1/21



# *Modern Achievements*

***Ms.Tanaya Nalawade*** a student of S.Y.B.Sc. (Microbiology), P. E. Society's Modern College of Arts, Science and Commerce Pune-5 received the medal by the hands of Honourable Prime Minister Shri.Narendra Modiji.





## पुण्याची कशीश 'बेस्ट कॅडेट'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) संचलन शिबिरात महाराष्ट्राच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. पुणे येथील हवाई दलाची कॅडेट कशीश मेथवानीने सर्वोत्तम कॅडेटचा पुरस्कार पटकावला.

नवी दिल्लीत सुरू असलेल्या या शिबिराचा गुरुवारी 'प्राइम मिनिस्टर रॅली'ने समारोप झाला. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मानवंदना स्वीकारून या छात्रांना मार्गदर्शनही केले. नवी दिल्लीतील शिबिरातून सीनिअर डिव्हिजन व सीनिअर विंगमधून प्रत्येकी १०० छात्रांची अंतिम संचलनासाठी निवड होते. यंदा या शिबिरात 'एनसीसी'चा महाराष्ट्राचा संघ देशभरातील १७ संचालनालयातून उपविजेता ठरला. सलग दुसऱ्या वर्षी ही महाराष्ट्राने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर आंध्र-तेलंगणाच्या पथकाने प्रथम क्रमांक पटकावला. महाराष्ट्र संचालनालयाकडून सीनिअर अंडर ऑफिसर उपकार ठाकरे याने चषक स्वीकारला. महाराष्ट्राच्या चमूची निवड चाचणी पुण्यातील शिबिरात घेण्यात आली. 'एनसीसी'चे पुणे ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर सुनील लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले. कर्नल प्रशांत नायर, मेजर आरुषा शेटे आणि लेफ्टनंट विवेक बाळे या पथकासोबत होते. सुभेदार किरण माने यांनी संचलनाची (ड्रील) तयारी करून घेतली.

कशीश मेथवानीचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

### संचलनावर पुण्याची छाप

हवाई दलाची सर्वोत्तम छात्र ठरलेली कशीश मेथवानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'बायोइन्फर्मेटिक अँड बायोटेक्नोलॉजी' विभागाची विद्यार्थिनी आहे. तिने 'वॉरंट ऑफिसर' म्हणून जबाबदारी सांभाळली. हवाई दलाचा छात्र व पुण्याच्या ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी विवेकसिंहने द्वितीय क्रमांक, तर नौदल विभागात पुण्याच्याच मॉडर्न महाविद्यालयाच्या तनया नलावडेने द्वितीय क्रमांक पटकावला.











## प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राच्या 'एनसीसी'चा झेंडा

### पुण्याची कशिष मेथवानी सर्वोत्तम छात्र; राज्याच्या 'एनसीसी'ला राष्ट्रीय उपविजेतेपद

सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, दि. २८ : महाराष्ट्र राष्ट्रीय छात्र सेनेने (एनसीसी) प्रजासत्ताक दिनाच्या संचलनातील प्रतिष्ठेच्या प्रधानमंत्री बॅनरचे उपविजेतेपद पटकाविले आहे. पुण्याची कशिष मेथवानी 'एनसीसी'च्या एअर फोर्स विंगची सर्वोत्तम कॅडेट (बेस्ट कॅडेट) ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हे दोन्ही बहुमान आज महाराष्ट्राला प्रदान करण्यात आले. यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राच्या एनसीसी कॅडेटसने उपविजेतेपद तर आंध्र प्रदेश व तेलंगण संचालनालयाने विजेतेपद पटकावले आहे.

आजच्या कार्यक्रमात नाशिक येथील भोसला सैनिकी महाविद्यालयाचा उपकार ठाकरे याने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयास प्राप्त उपविजेतेपदाचा करंडक स्वीकारला. महाराष्ट्राने यापूर्वी १७ वेळा सर्वोत्कृष्ट पंतप्रधान बॅनरचा बहुमान पटकाविला आहे. हवाई दलाच्या बेस्ट कॅडेट्सचा बहुमान पटकाविणारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायो इन्फर्मिटीक अँड बायो टेक्नॉलॉजीची विद्यार्थीनी वॉरंट ऑफिसर कशिष मेथवानीचा पंतप्रधानांच्या हस्ते मानाचे पदक व केन प्रदान करून सन्मान करण्यात आला. एनसीसी हवाई दलाच्या बेस्ट कॅडेटसाठी देशातील एकूण १०० कॅडेट्समध्ये चुरस होती. लेखी परिक्षा, समूह चर्चा आणि एनसीसी महासंचालकांसमोर प्रत्यक्ष मुलाखत व शिबीरातील परेड या निकषांवर बेस्ट कॅडेट्ची निवड करण्यात आली.

हवाई दलाच्या बेस्ट कॅडेट्समध्ये पुण्यातील श्रीशिवाजी सोसयटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी विवेक सिंग याने दुसरे स्थान, तर नौदलाच्या बेस्ट कॅट्समध्ये पुण्याच्याच मॉर्डन महाविद्यालयाच्या तनाया नलावडेने दुसरे स्थान पटकाविले. देशातील एकूण १७ एनसीसी महासंचालनालयाच्या डिसेंबर २०१९ ते नोव्हेंबर २०२० मधील विविध स्तरावरील मुल्यांकन तसेच यावर्षी दिल्लीत आयोजित प्रजासत्ताक दिन शिबीरातील विविध स्पर्धांतील सर्वोत्तम कामगिरीच्या आधारावर आज प्रधानमंत्री बॅनरचा बहुमान विजेत्या व उपविजेत्या संचालनालयास प्रदान करण्यात आला.

नवी दिल्ली : महाराष्ट्र एनसीसीमधील पुण्याची कशिष मेथवानी देशातली सर्वोत्तम छात्र ठरली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

#### महाष्ट्राची उत्कृष्ट कामगिरी

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी दिल्लीतील कॅंटोन्मेंट भागात आयोजित एनसीसीच्या प्रजासत्ताक दिन शिबिरात महाराष्ट्रातील १६ मुले व १० मुली असे एकूण २६ छात्र सहभागी झाले होते . प्रजासत्ताकदिनी झालेल्या पथ संचलनात सहभागी एनसीसीच्या मुलींच्या तुकडीत महाराष्ट्राच्याही मुलींची निवड झाली. विशेष म्हणजे यंदा मुलींच्या राष्ट्रीय तुकडीचे नेतृत्व महाराष्ट्राच्या संघातील जळगावच्या मुलजी जेठा महाविद्यालयाची विद्यार्थीनी सिनीयर व अंडर ऑफिसर समृद्धी संत हिने केले.

# *Modern Achievements*

संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे माळवाडी, पुणे 58

आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा 2021 दिनांक : 30 जानेवारी 2021

या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील ***कु. रविंद्र नागेश शिंदे (प्रथम वर्ष कला, तुकडी: A )*** या विद्यार्थ्याने उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक मिळवला. महाविद्यालयाच्या वतीने त्याचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.






# Modern Alumni Achievements

मॉडर्न कॉलेजचे माजी विद्यार्थी बबन मिंडे यांना महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

३०. बालवाङ्मय – नाटक व एकांकिका भा.रा. भागवत पुरस्कार ५०,०००/- सुनंदा गोरे नवी प्रतिज्ञा गोदा प्रकाशन, औरंगाबाद

३१. बालवाङ्मय – कादंबरी साने गुरूजी पुरस्कार 50,000/- बबन मिंडे दौलतबंकी आणि त्याचा खजिना राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे

३२. बालवाङ्मय – कथा ( छोटया गोष्टी, परीकथा, लोककथांसह) राजा मंगळवेढेकर पुरस्कार ५०,०००/- स्वाती राजे शोध रोहन प्रकाशन, पुणे

३३. बालवाङ्मय – सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे) यदुनाथ थत्ते पुरस्कार ५०,०००/- विजय तांबे बबडू बँकेत रोहन प्रकाशन, पुणे




लोकमत

## उत्कृष्ट वाङ्:मय निर्मितीसाठी पुरस्कारांची घोषणा : ३५ पुस्तकांपैकी २१ पुण्यातील

# ग्रंथ पुरस्कारांमध्ये 'सांस्कृतिक पुणे'च अव्वल

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : उत्कृष्ट मराठी वाङ्:मय निर्मितीसाठी दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्:मय पुरस्कारांची घोषणा गुरुवारी (दि. २८) झाली. यातल्या ३५ पुस्तकांपैकी २१ पुरस्कार पुण्यातील प्रकाशकांना जाहीर झाले आहेत. यात राजहंस, दिलीपराज, रोहन, मनोविकास, पद्मगंधा, साधना, अमेय, स्वयंदीप, समर्थ मीडिया सेंटर या प्रकाशनांचा समावेश आहे.

माधव वझे, डॉ. श्रीपाल सबनीस, अच्युत गोडबोले, नीलिमा गुंडी, डॉ. हमीद दाभोलकर यांच्यासह ज्ञानेश्वर जाधवर, धर्मराज निमसरकर, नयना सहस्त्रबुध्दे, डॉ. ऐश्वर्या रेवडकर, अनिता पाटील, खंडेराव कुलकर्णी, रमेश जाधव, डॉ. गुरुदास नूलकर, मनीषा बाठे, परेश मनोहर, संतोष शेंडकर, डॉ. सुरेश हावरे, विलास मोरे, बबन मिंडे, स्वाती राजे, विजय तांबे, आशा बोकील, आदिती बर्वे या लेखकांच्या लेखनावर पुरस्काराची मोहोर उमटवली आहे.

मी कायम सरकारच्या विरोधात भूमिका मांडत आलो आहे. तरीही माझ्या साहित्याची नोंद घेतली गेल्याने आदिवासींचा आवाज सरकारने ऐकला, अशी माझी भावना आहे. विवेकबुद्धी जागृत ठेवून ग्रंथाची निवड केलेल्या विद्वानांचे मी आभार मानतो. शासनाचेही आभार. मात्र, पुरस्कार मिळाला म्हणून सरकारच्या चुकीच्या धोरणांवर टीका करण्याचे थांबवणार नाही. मी आजवर केवळ सत्याला शरण गेलो आहे, यापुढेही इतर कोणाला शरण जाणार नाही.

**- डॉ. श्रीपाल सबनीस, लेखक**

'गतकाळाची गाज' हे पुस्तक विविध गटाच्या, पेशाच्या वाचकांनी वाचल्याचा मला आनंद आहे. सर्वत्र पुस्तकाची अभ्यासपूर्ण परीक्षणे प्रकाशित झाली. मी या पुस्तकासाठी ७-८ वर्षे अभ्यास करुन सूत्रे शोधून काढल्याने हे पुस्तक वैशिष्ट्यपूर्ण ठरले. वाचकांनी ते स्वीकारले. त्यावर आता राजमान्यतेची मोहोर उमटली आहे. माझ्या आईच्या जगण्याच्या संघर्षातून मला प्रेरणा मिळाली. मी समीक्षक व्हावे, अशी वडिलांची इच्छा होती. दोघांच्याही इच्छा आज फलद्रूप झाल्या.

**- नीलिमा गुंडी, लेखिका**



मी आतापर्यंत मराठी भाषेत ३० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. आतापर्यंतच्या लेखनापैकी 'अनर्थ विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?' हे सर्वांत महत्त्वाचे पुस्तक आहे. आपली प्रगतीची कल्पना चुकीची आहे. त्यामुळे आपण विनाशाकडे चाललो असल्याचे सांगण्याचा प्रयत्न मी केला. या पुस्तकाचे महत्त्व वाचकांना समजले, याचा विशेष आनंद आहे.

**- अच्युत गोडबोले, लेखक**

### पुरस्कारप्राप्त प्रकाशक

राजहंस ४, दिलीपराज ३, रोहन ३, साधना २, पद्मगंधा २, मनोविकास ३, स्वयंदीप १, अमेय १ समर्थ १ आणि आशा बोकिल यांच्या १ पुस्तकाला पुरस्कार मिळाला आहे.

राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'विवेकाच्या वाटेवर' या पुस्तकाला राज्य मराठी ग्रंथलेखन पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मनात अत्यंत संमिश्र भावना आहेत. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रेरणादायी स्मृतींचा आणि विवेकाच्या अवघड वाटेवर निर्धाराने चालण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा हा सन्मान आहे, असे मी मानतो.

**- डॉ. हमीद दाभोलकर, लेखक**

व्याकरणावर कमी प्रमाणात पुस्तके लिहिली जातात. महत्वाचा विषय असूनही त्याला लोकप्रियता नसते. अशा पुस्तकाची दखल घेतली गेली आहे. दुसऱ्या पुस्तकात स्थलांतर झाल्यावर महिलांना कोणत्या दिव्यातून जावे लागते, यावर भाष्य करण्यात आले आहे. पद्मगंधाला दर वर्षी दोन-तीन पुरस्कार मिळतात. मात्र, यंदा वेगळया विषयांची दखल घेतल्याचे समाधान वाटते.

**- अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन**

कोणतेही पुरस्कार हे लेखकांच्या दृष्टीने वाङ्:मय प्रवासासाठी आश्वासक असतात. त्यातून अधिक काम करण्याची प्रेरणा मिळते. संशोधक वृत्तीने काम करणाऱ्या लेखकांची पुस्तके प्रकाशित करण्याचे भाग्य प्रकाशकाला मिळते. या दोन्ही दृष्टीने पुरस्कार मिळाल्याची घटना आनंददायी आहे. लेखकांच्या आनंदातच प्रकाशकाचा आनंद सामावलेला असतो. कारण, लेखकाच्या प्रवासातला प्रकाशक हा महत्वाचा घटक असतो. राजहंस प्रकाशनाला मिळालेले चार पुरस्कार हे त्यादृष्टीने महत्त्वाचे आहेत.

देवाचा न्याय खूप वेगळा आणि अनपेक्षित असतो. पुरस्कार मिळालेल्या तिन्ही पुस्तकांची निवड शंकर सारडा यांनी केली होती. पुरस्कारांची निवड आणि सारडा सरांचे निधन एकाच दिवशी घडले आहे. त्यामुळे संमिश्र भावना दाटून आल्या आहेत.

**- राजीव बर्वे, दिलीपराज प्रकाशन**

रोहन प्रकाशनाच्या तीन लेखकांचा हा सन्मान आहे, ही खूप आनंदाची भावना आहे. लेखन, संपादन, निर्मिती प्रक्रियेचा हा गौरव आहे. यानिमित्ताने सामाजिक, बालसाहित्य अशा विविध विषयांची दखल घेण्यात आली

साधना प्रकाशनाच्या दोन्ही पुरस्कारप्राप्त लेखकांनी मुख्य प्रवाहापासून दुर्लक्षित असलेल्या आदिवासी समाजजीवन आणि शेतकरी समाजजीवन याकडे लक्ष वेधणारे लिखाण केले आहेत. दोघांची ही पहिलीवहिली पुस्तके आहेत. सडेतोड, थेट आणि अभ्यासपूर्ण मांडणी हे पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे.

**- विनोद शिरसाठ, साधना प्रकाशन**

Hello Pune
Page No. 1 Jan 29, 2021
Powered by: erelego.com

# *NEWLY ADDED BOOKS DURING JANUARY 2021*

| Author | Title |
|---|---|
| Dixit, P. G. / Kapre, P. S. | Continuous Probability Distributions Statistics Paper II Sem. III |
| Dixit, P. G. / Kapre, P. S. | Discrete Probability Distributions And Time Series Statistics Paper I Sem. III |
| Dixit, P. G. / Kapre, P. S. | Sampling Distribution And Exact Tests Statistics Paper II Sem. IV |
| Dixit, P. G. / Kapre, P. S. | Test Of Significance And Statistical Methods Statistics Paper I Sem. IV |
| Deshmukh, Narendra / Nikam, Ramesh | Aarogya Manasshastra : आरोग्य मानसशास्त्र |
| Pawar, B. U. / Deshmukh, Narendra | Vaikasik Mansshastra : वैकासिक मानसशास्त्र |
| Aahire, S. U. | Manovikruti Manasshastra : मनोविकृती मानसशास्त्र |



























# *News Paper Clippings : January 2021*



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .
[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** **.**



## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# करोनामुळे निर्माण झालेल्या अडचणींचे विद्यापीठाच्या अधिसभेत प्रतिबिंब

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्या दहा महिन्यांतील आर्थिक अडचणींचे प्रतिबिंब सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेच्या कार्यक्रमपत्रिकेतही उमटले आहे. परीक्षा शुल्क, संलग्नता शुल्क कमी करावे, माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी निधी मिळावा, विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण करावे असे काही ठराव अधिसभा सदस्यांकडून मांडण्यात आले आहेत.

विद्यापीठाची अधिसभा ९ आणि १० जानेवारीला होत आहे. या सभेची कार्यक्रमपत्रिका विद्यापीठाने अंतिम केली आहे. अधिसभेसाठी सदस्यांनी मांडलेल्या ठरावांचा आढावा घेतल्यास त्यात करोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी संबंधित ठरावांची संख्या लक्षणीय असल्याचे दिसून येत आहे.

डॉ. संजय खरात यांनी विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्याचा ठराव मांडला आहे. तसेच डॉ. खरात यांच्यासह डॉ. शामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर यांनी संलग्नीकरण शुल्क रद्द करावे किंवा त्यात सवलत मिळण्याबाबतचा ठराव मांडला आहे. डॉ. देशमुख यांनी संलग्न महाविद्यालयांतील माहिती तंत्रज्ञान सुविधांच्या सक्षमीकरणासाठी विद्यापीठाने गुणवत्ता सुधार योजनेत निधी देण्याबाबत ठराव मांडला आहे. संतोष ढोरे यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करावे आणि शुल्क घेतले असल्यास परतावा देण्याचा ठराव मांडला आहे. तसेच ऑनलाइन शिक्षण घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी धोरण करण्याचा ठरावही मांडला आहे. शिनलकर यांनी परीक्षा शुल्क नाममात्र घेण्याचा ठराव मांडला आहे.

करोनामुळे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करता आली नाही. तसेच ऑनलाइन शिक्षण सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. याचा विचार करून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ची परीक्षा एकत्रित वार्षिक परीक्षा एप्रिल-मेमध्ये घ्यावी. पहिल्या सत्रातील अभ्यासक्रमावर भाग एक व दुसऱ्या सत्रातील अभ्यासक्रमावर भाग दोन असे प्रश्नपत्रिकांचे स्वरूप असावे, असा ठराव डॉ. पंकज मिनियार यांनी मांडला आहे. तर ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थी गोंधळलेले असून यूजीसीने अभ्यासक्रमात ३० टक्के कपात करण्याची सूचना केली आहे. परीक्षांसदर्भात महाविद्यालयांचे अहवाल विचारात घेण्यापेक्षा समिती नियुक्त करून, वस्तुनिष्ठ आढावा घेऊन निर्णय घेण्याची शिफारस प्राचार्य मोतीराम देशमुख यांनी केली आहे.

### अभिनंदनाचेही ठराव...

करोना काळात विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीचे अनेक उपक्रम राबवले. तसेच विद्यापीठातील संशोधकांनी कृत्रिम श्वसन यंत्रणा (व्हेंटिलेटर) विकसित करण्यात योगदान दिले. विद्यापीठाच्या या कामासाठी अभिनंदनाचा ठराव डॉ. शामकांत देशमुख यांनी मांडला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठाने ऑनलाइन, ऑफलाइन परीक्षांचे आव्हान पार पाडल्यासाठी अभिनंदनाचा ठराव डॉ. देविदास वायदंडे यांनी मांडला आहे.

लोकसत्ता Wed, 06 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57538221

# महाविद्यालये सुरू करण्याची तयारी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

लॉकडाउनपासून बंद असलेली महाविद्यालये ११ जानेवारीपासून सुरू होणार असल्याने त्यासाठीच्या तयारीने जोर धरला आहे. महाविद्यालयात स्वच्छता व निर्जंतुकीकरण केले जात आहे. त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांसह विविध नियमांनुसार आवश्यक ती तयारी केली जात आहे.

'यू जी सी' ने विद्यापीठे, महाविद्यालये सुरू करण्याबाबतचे मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) प्रसिद्ध केली आहेत. संस्थेतील जागेच्या उपलब्धतेनुसार ५० टक्के विद्यार्थ्यांना आलटून-पालटून प्रवेश देण्यासह संसर्ग टाळण्यासाठी सुरक्षित अंतर, मास्कचा वापर, सतत हात धुणे किंवा निर्जंतुक करणे, वर्गखोल्या, सार्वजनिक वापराच्या जागांचे निर्जंतुकीकरण, बाधित आढळल्यास त्यांच्यासाठी विलगीकरणाची व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




करोना विषाणू संसर्गामुळे मार्च महिन्यापासून देशभरातील महाविद्यालये, विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्था बंद होत्या. करोनाबाधितांचे प्रमाण नियंत्रणात येत असल्याने पुण्यातील महाविद्यालये ११ जानेवारीपासून सुरू होत आहेत. 'यूजीसी'ने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच महाविद्यालये सुरू केली जातील, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींचा विचार करून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना बोलावता येईल. ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण प्रणालीला जास्तीत जास्त प्राधान्य देण्यात यावे, असे 'यूजीसी'ने स्पष्ट केले.

"अनलॉकमध्ये महाविद्यालयेही सुरू करणे आवश्यक होते. त्यामुळे हा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र, ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही पद्धतीने शिक्षण सुरू राहणार आहे. त्यामुळे निर्माण होणारा संभ्रम दूर करणे आवश्यक आहे.
– तुषार काहुर, विद्यार्थी

प्रॅक्टिकलचा भाग ऑनलाइन शिकण्यास मर्यादा येत होत्या. त्या आता दूर होतील. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. मात्र, करोनासंदर्भात दक्षता हवी.
– ज्ञानेश्वर निकम, विद्यार्थी

थिअरीचा भाग ऑनलाइन पद्धतीने शिकवला गेला. प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालये सुरू होणे गरजेचे होते. आता त्याला प्राधान्य दिले जाईल. सध्या निर्जंतुकीकरण सुरू आहे.
– प्रा. डॉ. व्ही. एम. सोलापूरकर, प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय

महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करूनच महाविद्यालये सुरू केली जातील. सम, विषम सत्राच्या आधारावर विद्यार्थ्यांना बोलावले जाईल.
–प्रा. डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

Maharashtra Times 6.1.2021

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## 'शिक्षक, कर्मचाऱ्यांना विनाशुल्क लस द्यावी'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**अजेंडा सिनेटचा**

करोना व लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेतही करोनासंदर्भातील मागण्या पुढे आल्या आहेत. करोनावरील लसीकरणाला लवकरच सुरुवात होणार असल्याने विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विनाशुल्क लस द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर लॉकडाउनमुळे अर्थचक्रावर झालेला परिणाम लक्षात घेता नाममात्र परीक्षा शुल्क, संलग्नता शुल्क आकारण्यात यावे. त्याचबरोबर २०२०-२१ ची परीक्षा एकत्रित एप्रिल-मे २०२१ मध्येच घ्यावी, अशी मागणीही अधिसभेपुढे मांडली जाणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा येत्या ९ आणि १० जानेवारी रोजी होणार आहे. या सभेची कार्यक्रमपत्रिका (अजेंडा) अंतिम करण्यात आला असून त्यात विविध सदस्यांनी केलेल्या मागण्या व ठरावांचा समावेश आहे.

'करोनाच्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालयांना प्रात्यक्षिक भाग शिकवता आलेला नाही. ऑनलाइन शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचलेले नाही. त्यामुळे २०२०-२१ साठी सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित परीक्षा एप्रिल-मे २०२१ मध्ये घ्यावी,' असा विचार प्रा. डॉ. पंकज मिनियार यांनी मांडला आहे. डॉ. खरात, डॉ. श्यामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर यांनी नाममात्र संलग्नीकरण व परीक्षा शुल्क आकारावे, अशी मागणी केली आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करावे आणि शुल्क घेतले असल्यास परत करावे; तसेच ऑनलाइन शिक्षण घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी धोरण निश्चित करावे, असा ठराव संतोष ढोरे यांनी मांडला आहे.

Maharashtra Times 8.1.2021

पुढारी

## अधिसभेसाठी विविध ठराव

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा ९ आणि १० जानेवारीला होत आहे. या सभेची कार्यक्रमपत्रिका विद्यापीठाने अंतिम केली आहे. यामध्ये अधिसभा सदस्यांनी विविध ठराव मांडले आहेत. त्यात कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी संबंधित ठरावांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून आले आहे.

डॉ. संजय खरात यांनी विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्याचा ठराव मांडला आहे. डॉ. शामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर यांनी संलग्नीकरण शुल्क रद्द करावे किंवा त्यात सवलत मिळण्याबाबतचा ठराव मांडला आहे. डॉ. देशमुख यांनी संलग्न महाविद्यालयांतील माहिती तंत्रज्ञान सुविधांच्या सक्षमीकरणासाठी विद्यापीठाने गुणवत्ता सुधार योजनेत निधी देण्याबाबत ठराव मांडला आहे. संतोष ढोरे यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करावे आणि शुल्क घेतले असल्यास परत देण्याचा ठराव मांडला आहे. तसेच ऑनलाइन शिक्षण घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याबाबत धोरणासाठी ठराव मांडला आहे, तर शिनलकर यांनी परीक्षा शुल्क नाममात्र घेण्याचा ठराव मांडला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ची एकत्रित वार्षिक परीक्षा एप्रिल-मे २०२१ मध्ये घेण्यात यावी. पहिल्या सत्रातील अभ्यासक्रमावर भाग एक आणि दुसऱ्या सत्रातील अभ्यासक्रमावर भाग दोन असे प्रश्नपत्रिकांचे स्वरूप असावे. त्यामुळे भागनिहाय आणि सत्रनिहाय गुणदान करता येईल, असा ठराव डॉ. पंकज मिनियार यांनी मांडला आहे. परीक्षांसंदर्भात महाविद्यालयांचे अहवाल विचारात घेण्यापेक्षा समिती नियुक्त करून, वस्तुनिष्ठ आढावा घेऊन निर्णय घेण्याची शिफारस प्राचार्य मोतीराम देशमुख यांनी केली आहे.

Pune Edition
Jan 8, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा निर्णय लवकरच

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने आक्षेप घेतल्याचे पडसाद विद्यापीठाच्या अधिसभेत उमटले. मद्यालये सुरू झाली, मग महाविद्यालये कधी सुरू करणार ?' अशी टीका राज्य सरकारच्या कारभारावर करण्यात आली. दरम्यान, शासनाशी चर्चा सुरू आहे, पुढील तीन ते चार दिवसात महाविद्यालये सुरू करण्यासाठी निर्णय घेतला जाईल, असे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी स्पष्ट केले.

शनिवारी सकाळी पुणे विद्यापीठाच्या प्रत्यक्ष अधिसभेला सुरूवात झाली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या मनोगताच्या अभिनंदन ठराव मांडण्यात आला. त्यावेळीच्या निमित्ताने अधिसभा सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. महेश आबाळे यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला, त्यावेळी त्यांनी महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय योग्य होता असे सांगितले.

बागेश्री मंठाळकर म्हणाल्या, राज्यात अनलॉकची प्रक्रिया सुरु झाली, त्यात सुरुवातीला मद्यालये, नंतर देवालये, विद्यालये सुरू करण्यात आली; पण महाविद्यालये बंद ठेवली जात आहेत. मद्यालये महसूल देतात म्हणून सुरू केली; पण जर कोरोनामुळे महाविद्यालये सुरु करता येणार नसतील, तर २०२२ पर्यंत थेट शिक्षण बंद असेल, असे स्पष्ट करावे. जर विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर घाला घातला जात असेल, तर अधिसभा सदस्यांनी एकत्र आले पाहिजे.

डॉ. श्यामकांत देशमुख म्हणाले, विद्यापीठाने समिती स्थापन करून त्यांच्या अहवालानुसार महाविद्यालये सुरू करण्यासाठी एक पाऊल पुढे उचलले आहे. तांत्रिक अडचणी असतील; पण विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर बाधा येऊ नये. नियमांचे पालन करून महाविद्यालये सुरू करण्याचा विचार करावा. आम्हालाही महाविद्यालये सुरू व्हावीत, असेच वाटत आहे, पण शासनाने विद्यापीठापेक्षा वेगळी भूमिका शासनाने घेतली असली, तरी आज ना उद्या महाविद्यालये सुरू करावी लागतील, असे डॉ. देविदास वायदंडे यांनी सांगितले.



सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर डॉ. एम. एस. उमराणी म्हणाले, मार्च महिन्यात महाविद्यालये बंद झाल्यानंतर ऑनलाईन शिक्षणासाठी व्यासपीठ तयार करणे, कंटेन्ट तयार केला. महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी, प्राध्यापक, संघटना यांच्या मागणीनुसार सुरू करावेत अशी मागणी केली होती. विद्यापीठाने याबाबत परिपत्रक काढले आहेत, पण शासनाने कोठेही महाविद्यालये सुरू करू नये असे म्हटलेले नाही. पण आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधून, शासनाशी चर्चा करून दोन ते दिवसात प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल.

kesari 10.1.2021

## महाविद्यालये सुरू करा

### सिनेट सदस्यांची आग्रही मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये पारंपरिक शिक्षण प्रक्रियेसाठी खुली करण्याचा निर्णय मागे घेतल्याने सिनेटच्या बैठकीत सदस्यांकडून प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली. 'महाविद्यालये सुरू करावीत,' असेच मत बहुतांश सदस्यांनी मांडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दोन दिवसीय सिनेटमध्ये शनिवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर प्रथम सिनेटसमोर अहवाल मांडला. सदस्यांनी डॉ. करमळकर यांचे अभिनंदन केले. मात्र, त्यानंतर महाविद्यालये सुरू न करण्याच्या भूमिकेवर नापसंती दर्शवून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. महेश आबाळे, डॉ. शामकांत देशमुख, सदस्य बागेश्री मंठाळकर, गिरीश भवाळकर, डॉ. देविदास वायदंडे आदींनी काही प्रश्न उपस्थित केले. 'महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी नसल्याने, शैक्षणिक प्रक्रियेचे चक्र थंड आहे. विद्यार्थी शुल्क भरत नसल्याने, प्राध्यापक-कर्मचाऱ्यांचे वेतन कसे करावे, असा मोठा प्रश्न शिक्षण संस्थांसमोर निर्माण झाला आहे. इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक व प्रकल्पांना महत्त्व असते. एमबीएमध्ये एक सत्र प्रकल्पावर आधारित असते. अशा परिस्थितीत महाविद्यालये सुरू होण्याची आवश्यकता आहे,' असे डॉ. आबाळे म्हणाले.

### 'तीन ते चार दिवसांत निर्णय'

विद्यापीठाच्या प्रशासनाच्या वतीने उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, 'महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्यांशी चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे महाविद्यालये सुरू करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यामुळे महाविद्यालये ११ जानेवारीपासून खुली करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. मात्र, सरकारकडून विचारणा झाल्याने तो निर्णय मागे घेण्यात आला. आता सरकारशी चर्चा करून तीन ते चार दिवसांत पुढील निर्णय घेऊ.'




मंठाळकर म्हणाल्या, 'राज्यात शाळा, मॉल, थिएटर, मद्यालये सुरू होऊ शकतात, तर महाविद्यालये का नाहीत? घरी राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, मानसिक समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे आरोग्याचे नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालये सुरू करावीत.' 'विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सुरक्षित नियमांचे पालन करून, महाविद्यालये ऑफलाइन शिक्षणासाठी सुरुच करावी लागणार आहेत,' अशी भूमिका डॉ. वायदंडे यांनी मांडली, तर 'विद्यापीठाची स्वायत्तता अबाधित राहणे गरजेचे आहे. त्याला कोणीही बाधा पोहोचवू नये,' असा मुद्दा डॉ. देशमुख यांनी मांडला.

Maharashtra Times
10.1.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# महाविद्यालये खुली न करण्यावरून संताप

## सिनेट सदस्य आक्रमक; विद्यापीठ प्रशासनाकडून निर्णय घेण्याचे आश्वासन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**शैक्षणिक विभाग व महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मागे घेतल्याबाबत विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांनी शनिवारी बैठकीत संताप व्यक्त केला. मद्यालये सुरू होऊ शकतात, तर महाविद्यालये का नाहीत, बैठकीमध्ये सदस्यांनी प्रश्नांची सरबत्ती केली. त्यावर विद्यापीठ प्रशासनाकडून तीन-चार दिवसांत महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे सांगण्यात आले.**



पुणे विद्यापीठाच्या दोनदिवसीय सिनेटला शनिवारी सुरुवात झाली. सिनेटच्या पहिल्या दिवशी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यापीठाचा अहवाल सिनेटसमोर सादर केला. त्यानंतर सदस्यांनी डॉ. करमळकर यांचे अभिनंदन केले. मात्र, त्यानंतर विद्यापीठाने महाविद्यालये पारंपरिक शिक्षणप्रक्रियेसाठी खुली करण्याचा निर्णय मागे घेतल्याने, त्यावर प्रश्नांचा भडीमार केला. यामध्ये व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. महेश आबाळे, डॉ. शामकांत देशमुख, सदस्य बागेश्री मंठाळकर, गिरीश भवाळकर, डॉ. देविदास वायदंडे आदींनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि शैक्षणिक प्रक्रिया योग्य पद्धतीने चालण्यासाठी महाविद्यालये खुली झाली पाहिजेत, अशी भूमिका मांडली.

डॉ. वायदंडे म्हणाले, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू होणे गरजेचे आहे. डॉ. आबाळे म्हणाले, विद्यार्थी शुल्क भरत नसल्याने, प्राध्यापक-कर्मचाऱ्यांचे वेतन कसे करावे, असा मोठा प्रश्न शिक्षण संस्थांसमोर निर्माण झाला आहे. एमबीएमध्ये संपूर्ण एक सत्र प्रकल्पावर आधारित असते.

अशा परिस्थितीत महाविद्यालये सुरू होण्याची आवश्यकता आहे. तर 'विद्यापीठाची स्वायत्तता अबाधित राहणे गरजेचे आहे. त्याला कोणीही बाधा पोहचवू नये. महाविद्यालये आता पारंपरिक शिक्षणासाठी खुली करण्याची आवश्यकता आहे, अशी भूमिका डॉ. देशमुख यांनी मांडली. ग्रामीण भागात स्मार्टफोन, इंटरनेटची समस्या असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणाचा फायदा घेऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत सत्र परीक्षा घोषित झाल्या, तर गोंधळ उडण्याची शक्यता आहे. सर्व महाविद्यालयांची मते जाणून घेण्यासाठी समितीची स्थापना करावी, असा प्रस्ताव डॉ. मोतीराम देशमुख यांनी मांडला होता. त्याला सिनेटने मान्यता दिली.

### महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय तीन-चार दिवसांत

उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, कॉलेज सुरू करण्याबाबत विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्यांशी चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे महाविद्यालये सुरू करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यामुळे महाविद्यालये खुली करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. मात्र, सरकारकडून विचारणा झाल्याने तो निर्णय मागे घेण्यात आला. आता सरकारशी चर्चा करून, विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग व महाविद्यालये येत्या तीन ते चार दिवसांत सुरू करण्याचा निर्णय घेऊ, असे त्यांनी सांगितले.

# ...तर परीक्षांचा दर्जा टिकला असता

## सिनेट सदस्यांकडून ऑनलाइन परीक्षेचे वाभाडे

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

प्रॉक्टर्ड पद्धतीने परीक्षा घेतल्या असत्या, तर परीक्षांचा दर्जा टिकला असता. तसेच कॉपीसारखे गैरप्रकार झाले नसते. ऑनलाइन परीक्षेदरम्यान उडालेल्या गोंधळाची, तांत्रिक समस्या; विद्यार्थ्यांनी कॉपी करण्यासाठी लढवलेल्या युक्तीची माहिती देत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटमध्ये सदस्यांनी परीक्षांचे वाभाडे काढले.

सिनेटला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. ९) सुरुवात झाली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन पद्धतीने घेतलेल्या परीक्षेवर सिनेट सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नसेल, तर आगामी सत्र परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात, अशी भूमिका सदस्यांनी मांडली. ऑनलाइन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक गुण मिळाले. ऑनलाइन परीक्षेत होत असलेल्या गोंधळामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकाला धक्का पोहचत आहे, असे मत सदस्य डॉ. पंकज मिनियार यांनी व्यक्त केले. विद्यार्थी उद्यानामध्ये एकत्र येऊन ग्रुपने सामूहिक कॉपी व गुगलचा वापर करून परीक्षा देत असल्याचे दिसून आल्याची माहिती सदस्य संतोष ढोरे यांनी दिली. परीक्षेसाठी विचारलेले प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे, हास्यास्पद आणि दर्जाहीन असल्याचे सदस्य अभिषेक बोके यांनी सांगितले.

### चित्रांचे जतन होणार

विद्यापीठाच्या संग्रहातील दुर्मिळ चित्रांची दुरवस्था झाल्याने त्याचे पडसाद शनिवारी अधिसभेतही उमटले. चित्रांच्या जतनासंदर्भात पुरातत्त्व विभागाचे संचालक तेजस गर्गे यांच्याशी चर्चा सुरू होती. मात्र, कोरोनामुळे व्यत्यय आला. चित्रांच्या जतनासाठीची कार्यवाही सुरू करण्यात आली. मार्चपर्यंत हे काम पूर्ण होईल, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

Pune Edition
Jan 10, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुणे

# मद्यालये सुरू केली; महाविद्यालयांसाठी अडचण काय?




- उच्च शिक्षण विभागाच्या आक्षेपावर अधिसभा सदस्यांचा सवाल
- ...तर मग २०२२ पर्यंत थेट शिक्षण बंद असल्याचे स्पष्ट करावे

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने आक्षेप घेतल्याचे पडसाद विद्यापीठाच्या अधिसभेत उमटले. 'मद्यालये सुरू झाली; मग महाविद्यालये कधी सुरू करणार,' अशा भावना व्यक्त करत अधिसभा सदस्यांनी राज्य सरकारच्या आक्षेपावर नाराजी दर्शविली.**

पुणे विद्यापीठाच्या प्रत्यक्ष अधिसभेला शनिवारपासून सुरू झाली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सादर केलेल्या अहलावानंतर सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यावेळी अधिसभा सदस्यांनी महाविद्यालय सुरू करण्याच्या निर्णयावर मते मांडत राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महेश आबाळे यांनी 'विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याचा घेतलेला निर्णय योग्य होता,' असे म्हटले.

बागेश्री मंठाळकर म्हणाल्या, 'राज्यात अनलॉकची प्रक्रिया सुरू झाली, त्यात सुरूवातीला मद्यालये, नंतर देवालय, विद्यालये सुरू करण्यात आली. पण महाविद्यालये बंद ठेवली जात आहेत. मद्यालये महसूल देतात म्हणून सुरू केली. परंतु करोनामुळे महाविद्यालये सुरू करता येणार नसतील तर २०२२ पर्यंत थेट शिक्षण बंद असेल, असे स्पष्ट करावे. विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर घाला घातला जात असेल तर अधिसभा सदस्यांनी एकत्र आले पाहिजे,' असे त्या म्हणाल्या.

डॉ. शामकांत देशमुख म्हणाले, 'विद्यापीठाने समिती स्थापन करून त्यांच्या अहवालानुसार महाविद्यालये सुरू करण्यासाठी एक पाऊल पुढे उचलले आहे. तांत्रिक अडचणी असतील पण विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर बाधा येऊ नये. नियमांचे पालन करून महाविद्यालये सुरू करण्याचा विचार करावा.

डॉ. देवीदास वायदंडे म्हणाले, 'आम्हालाही महाविद्यालये सुरू व्हावेत असेच वाटत आहे, पण शासनाने विद्यापीठापेक्षा वेगळी भूमिका शासनाने घेतली असली तरी आज ना उद्या महाविद्यालये सुरू करावी लागतील.'

> "मार्चमध्ये महाविद्यालये बंद झाल्यानंतर ऑनलाइन शिक्षणासाठी व्यासपीठ तयार करणे, कंटेन्ट तयार केला. सर्व प्राचार्य, विद्यार्थी, प्राध्यापक, संघटना यांनी महाविद्यालये सुरू करावेत अशी मागणी केली होती. विद्यापीठाने याबाबत परिपत्रक काढले आहे, पण शासनाने कोठेही महाविद्यालये सुरू करू नये असे म्हटलेले नाही, पण आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधून, शासनाशी चर्चा करून दोन ते दिवसांत प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल.
>
> - **डॉ. एन. एस. उमराणी,**
> प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Prabhat 10.1.2021

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## Decision to reopen university, colleges after January 20

**Higher and technical edu minister Uday Samant said more consultations needed before final call**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror



After Savitribai Phule Pune University (SPPU) announced that the colleges and university departments can be reopened on January 11, higher and technical education minister Uday Samant said on Saturday that the final decision on the same will be taken over only after January 20.

After Pune Municipal Corporation (PMC) took the decision to open the schools from January 4, colleges and university departments were also announced by SPPU to be reopened from January 11. While all the colleges and their principals are prepared to open the colleges, the same decision will now be taken after January 20.

NS Umarani, pro vice chancellor, SPPU, said, "While we had initially decided that colleges would begin from January 11, but the disaster management act is still applicable in the state therefore we also need to discuss the same with the government. All the SOPs given by the state government and University Grants Commission (UGC) need to be followed so we will talk to the state government about the same and follow the decision. We have also asked colleges to prepare their infrastructure to follow all the norms. The colleges would also get some time to prepare the same."




Even while the decision over the college reopening is still pending, colleges and senate members said on Saturday that students and colleges are ready to open and SPPU may take the decision to open it.

Shamkant Deshmukh, one of the senate members at SPPU, said, "We are ready with the infrastructure and students, teachers and colleges are ready to start with physical training. SPPU should announce the reopening date and allow colleges to open physically."

Another senate and management council member Mahesh Abale said, "Colleges should be reopened and at least professional courses should be allowed for practical classes. Most of the masters students having specialisation are also less in strength therefore they can attend the classes. At the same time, practical works need to be done by the students. For all these reasons, colleges should be now opened as soon as possible."

Uday Samant on Saturday said, "The higher and technical education department has already consulted the professors, institutes, universities and students. The decision about reopening of the colleges will be taken soon. The decision will be taken by January 20 after consulting all the universities again. The chief minister has still requested the citizens to follow all the norms to keep a check on COVID-19 cases and to keep the cases less. Therefore, taking all these things into consideration, the decision will be taken."

Pune Mirror 10.1.2021

## ...तर पुणे विद्यापीठाचा हा अपमान

११/१/२०२१ ११/१/२०२१

प्रभात वृत्तसेवा प्रभात



पुणे, दि. १० - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा सुधारणा समितीत समावेश नसल्याचा मुद्दा रविवारी अधिसभेत गाजला. कुलगुरूंचा समावेश नसणे, हा पुणे विद्यापीठाचा अपमान असल्याची भावना अधिसभा सदस्यांनी व्यक्त केली. एवढेच नव्हे तर या समितीच्या खर्चाची जबाबदारी पुणे विद्यापीठावर टाकण्याच्या शासनाच्या निर्णयावरही अधिसभा सदस्यांतून तीव्र नाराजी दर्शविली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दोन दिवसीय अधिसभेचा रविवारी समारोप झाला. विद्यापीठ कायदा सुधारणा संदर्भात राज्य शासनाने नेमलेल्या समितीत राज्यातील तीन विद्यापीठांच्या कुलगुरूंचा समावेश आहे. या समितीच्या बैठकांसाठी येणारा सर्व खर्च पुणे विद्यापीठाकडून केला जात आहे. या समितीत पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंचा समावेश नसणे आणि हा खर्च पुणे विद्यापीठावर टाकण्याबाबत राज्य शासनाचा तीव्र निषेध करावा, असा ठराव करण्याची मागणी काही सदस्यांनी अधिसभेत केली.

समितीत पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश नसणे खेदजनक आहे. याबाबतची अधिसभा सदस्यांची नाराजी विद्यापीठाने राज्य शासनापर्यंत पोहोचवावी, अशी मागणी गिरीश भवाळकर, राजीव साबडे, डॉ. शामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे आदींनी केली. 'विद्यापीठ कायद्यातील सुधारणांबाबत नेमलेल्या या समितीचा खर्च पुणे विद्यापीठावर का टाकण्यात आला? याचे स्पष्टीकरण शासनाने द्यावे,' अशी मागणी अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर यांनी केली. विद्यापीठाने या समितीच्या बैठकांसाठी तसेच सदस्यांच्या निवासव्यवस्थेसाठी विद्यापीठातील गेस्टहाऊससारख्या सुविधांचा वापर करावा, पंचतारांकित हॉटेल्समध्ये सदस्यांची व्यवस्था करून विद्यापीठावरील आर्थिक भार वाढवू नये, असेही मंठाळकर म्हणाल्या. करोनामुळे शासनाची आर्थिक परिस्थितीही नाजूक असल्याने शासनाने समितीच्या खर्चाची जबाबदारी पुणे विद्यापीठावर दिली असावी, असे सांगत अमित पाटील यांनी शासनाची पाठराखण केली. यानंतर कुलगुरूंसह काही सदस्यांनी केलेल्या विनंतीनुसार हा ठराव न करण्यास अधिसभेने मान्यता दिली.

Prabhat 11.1.2021

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# राज्य शासनाच्या निर्णयावर अधिसभा सदस्यांची तीव्र नाराजी

## विद्यापीठ कायदा सुधारणा समितीबाबत पुणे विद्यापीठ अधिसभेत पडसाद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठीच्या समितीच्या खर्चाचा भार एकट्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर टाकणे, समितीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश नसणे अपमानास्पद असल्याचे सांगत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी शासनाच्या निर्णयाबाबत अधिसभेत तीव्र नाराजी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या दोन दिवसीय अधिसभेचा शनिवारी समारोप झाला. त्यात विद्यापीठाने घेतलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षांपासून शैक्षणिक, प्रशासकीय मुद्यांवर चर्चा झाली. राज्यातील आघाडीचे विद्यापीठ असलेल्या सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाच्या कु लगुरूं चा समितीमध्ये समावेश नसणे अपमानास्पद आणि खेदजनक आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांसाठीच कायद्यात सुधारणा के ल्या जात असल्याने त्यासाठीचा खर्च सर्वच विद्यापीठांनी करण्याची भूमिका सदस्यांनी मांडली. डॉ. के. एल. गिरमकर, गिरीश भवाळकर, राजीव साबडे, डॉ. शामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, डॉ. संजय खरात, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजित फडणवीस, डॉ. सुधाकर जाधवर, अमित पाटील आदी सदस्यांनी सहभाग घेतला.

### विद्यापीठाची जागा देता येत नाही...

सोष्नजी पंपाला विद्यापीठातील जागा मिळण्याबाबत 'एमएनजीएल' कडून राज्यपालांना पत्र देण्यात आल्याबाबत अधिसभा सदस्य अभिषेक बोके आणि आदित्य पटील यांनी प्रश्न उपस्थित केले. सीएनजी पंपाला जागा मिळण्यासाठी विद्यापीठाकडे विचारणा झालेली नाही. तसेच विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाची जागा देताही येत नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले.

### परीक्षेतील गोंधळ आणि भ्रष्टाचाराचा आरोप

परीक्षा घेण्यासाठी निवडलेल्या खासगी कंपनीच्या निवड प्रक्रियेबाबत, विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणींबाबत सदस्य अमित पाटील यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांनी परीक्षांदरम्यान अडचणी आल्याचे मान्य करत केलेल्या कामाची माहिती दिली. तसेच राज्यात सर्वात पहिल्यांदा ऑनलाइन परीक्षा यशस्वीरित्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतल्याचे सांगितले. नवीन महाविद्यालय प्रस्ताव प्रक्रियेत विद्यापीठाच्या अधिकाऱ्याकडून ५० हजार रुपये मागण्यात आल्याचा आरोपही पाटील यांनी केला. त्यावर कुलगुरूंनी आरोपांबाबत पुरावे दिल्यास आणि आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्याला त्वरित बडतर्फ करण्याचे आश्वासन दिले.

### अभ्यास मंडळ बंद

'मास रिलेशन' हा नगरच्या उपकेंद्रातील अभ्यासक्रम बंद होऊनही त्या अभ्यासक्रमाचे अभ्यास मंडळ अजूनही सुरू असल्याचे राजीव साबडे यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर कुलगुरूंनी सदर अभ्यास मंडळ तातडीने बंद करण्याचे निर्देश प्रशासनला दिले.

लोकसत्ता Mon, 11 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57655187

---

पुढारी

# समितीत कुलगुरु नसणे हे खेदजनक

## सिनेट सदस्यांची तीव्र नाराजी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**पुणे विद्यापीठ राज्यातील आघाडीचे विद्यापीठ आहे. विद्यापीठ कायद्यातील बदल राज्यासाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे अशा बदलांबाबत शिफारस करणाऱ्या समितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंचा समावेश नसणे खेदजनक असल्याचे मत मांडून हा पुणे विद्यापीठाचा अपमान असल्याचे सांगत अधिसभा सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दोनदिवसीय अधिसभेचा रविवारी (दि. १०) समारोप झाला. विद्यापीठ कायदा सुधारणा समितीचा मुद्दा या अधिसभेत चांगलाच गाजला. राज्य शासनाने नेमलेल्या या समितीमध्ये राज्यातील तीन विद्यापीठांच्या कुलगुरूंचा समावेश आहे. या समितीच्या बैठकांसाठी येणारा सर्व खर्च सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या निधीतून करावा, असे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार या बैठकांचा खर्च पुणे विद्यापीठाकडून केला जात आहे. या समितीत पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश नसणे आणि हा खर्च पुणे विद्यापीठावर टाकण्याबाबत राज्य शासनाचा तीव्र निषेध करावा, असा ठराव करण्याची मागणी काही सदस्यांनी अधिसभेत केली. मात्र, यावर झालेल्या जोरदार चर्चेनंतर असा ठराव न करण्याचा निर्णय घेण्यात आला.

'विद्यापीठ कायद्यातील सुधारणांबाबत नेमलेल्या या समितीचा खर्च पुणे विद्यापीठावर का टाकण्यात आला ? याचे स्पष्टीकरण शासनाने द्यावे,' अशी मागणी अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर यांनी केली. 'बदलांबाबत शिफारस करणाऱ्या समितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंचा समावेश नसणे खेदजनक आहे. याबाबतची अधिसभा सदस्यांची नाराजी विद्यापीठाने राज्य शासनापर्यंत पोहोचवावी,' अशी मागणी गिरीश भवाळकर, राजीव साबडे, डॉ. शामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे आदींनी केली. राज्य शासन विद्यापीठाचे मायबाप आहे. त्यामुळे आपली नाराजीदेखील शासनाकडे मांडण्याची मुभा विद्यापीठाला आहे, असे डॉ. के. एल. गिरमकर यांनी सांगितले.



### सदस्यांची व्यवस्था गेस्टहाऊसला करावी

अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर म्हणाल्या, विद्यापीठाने या समितीच्या बैठकांसाठी तसेच सदस्यांच्या निवासव्यवस्थेसाठी विद्यापीठातील गेस्टहाऊससारख्या सुविधांचा वापर करावा, पंचतारांकित हॉटेल्समध्ये सदस्यांची व्यवस्था करून विद्यापीठावरील आर्थिक भार आणखी वाढवू नये.

कोरोनामुळे शासनाची आर्थिक परिस्थितीही नाजूक असल्याने शासनाने या समितीच्या खर्चाची जबाबदारी पुणे विद्यापीठावर दिली असावी,असे सांगत अमित पाटील यांनी शासनाची पाठराखण केली. यानंतर कुलगुरूंसह काही सदस्यांनी केलेल्या विनंतीनुसार हा ठराव न करण्यास अधिसभेने मान्यता दिली.

Pune Edition
Jan 11, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

## ...तर आपण खर्च का करायचा?

### विद्यापीठ कायदा सुधारणा समितीच्या रचनेवर अधिसभेत नाराजी

पुणे, ता. १० : 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६' मध्ये बदल करण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन केली आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंना स्थान नाही. मात्र, या समितीचा सर्व खर्च पुणे विद्यापीठाला करावा लागत आहे. सर्वच गोष्टींमध्ये दिशादर्शक असलेल्या विद्यापीठाचा प्रतिनिधीच या समितीत नसेल तर आपण खर्च का करायचा?, असा प्रश्न अधिसभा सदस्यांनी उपस्थित करत राज्य सरकारच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करणारा ठराव संमत केला.

**निषेधाऐवजी तीव्र नाराजी**

आपला प्रतिनिधी समितीमध्ये नसताना शासकीय समितीच्या खर्चाची जबाबदारी आपल्यावर का? अशी टीका करत सरकारच्या निषेधाचा ठराव मांडा, अशी आक्रमक भूमिका काही सदस्यांनी घेतली. त्यावर डॉ. श्यामकांत देशमुख यांनी शासनाचा निषेध करणे योग्य नाही, आपण आपली तीव्र नाराजी त्यांच्याकडे पोचवली पाहिजे असे सांगितले.

अधिसभा सदस्य डॉ. संजय खरात यांनी विद्यापीठ सुधारणा कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी विद्यापीठामार्फत सूचना द्याव्यात, असा प्रस्ताव दिला होता. त्यावर चर्चा सुरू असताना डॉ. कान्हू गिरमकर म्हणाले, 'पुणे विद्यापीठाने गुणवत्ता सिद्ध केली आहे. असे असताना इतर विद्यापीठांसोबत पुणे विद्यापीठाला सोबत घेणे गरजेचे होते. या सुधारणा समितीमध्ये कुलगुरूंचा समावेश असलाच पाहिजे."

प्रसोनजित फडणवीस म्हणाले, "हा कायदा सर्व विद्यापीठांसाठी असताना केवळ पुणे विद्यापीठानेच खर्च का उचलावा." अशीच भूमिका राजीव साबडे यांनीही मांडली.

"समितीचे सदस्य फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये मुक्काम करत असल्याने तो खर्च आपल्याला करावा लागत आहे. समिती सदस्यांची गेस्ट हाऊसमध्येही व्यवस्था होऊ शकली असती", अशी टीका बागेश्री मंठाळकर यांनी केली.

अमित पाटील म्हणाले, या चर्चेतून विद्यापीठविरुद्ध सरकार अशीच भूमिका जात आहे. कोणताही निर्णय झाला की विद्यापीठाकडून राज्य सरकारवर बोट ठेवले जात आहे. यापूर्वीही विद्यापीठामुळे परीक्षेच्यावेळेस गोंधळ झाला होता. त्यामुळे ठराव करताना व्यवस्थित शब्द वापरावेत.

Sakaal 11.1.2021

SPPU SENATE MEETING 11|1|2021

## 30 per cent cut in exam syllabus, free vaccines for staff discussed

ALIFIYA KHAN
PUNE, JANUARY 10

REDUCTION IN affiliation fees of colleges, establishing a committee to review 30 per cent cut in syllabus for further exams, resetting the academic calendar, free vaccines to teaching and non-teaching staff, sanitisation of hostels and reopening rooms for students, in the backdrop of the Covid-19 pandemic, are some of the decisions taken at the Senate meeting on Sunday at the Savitribai Phule Pune University (SPPU).

In a proposal tabled by principal Dr Sanjay Kharat, it was pointed out that there has been a considerable delay in conducting admissions, especially in professional courses offered by colleges affiliated to the university. He pointed towards a need to restructure the academic calendar of 2020-21 and 2021-22 to meet the same.

Vice-chancellor Dr Nitin Karmalkar said that the timetable is being worked out by the respective department and soon it will be announced.

Kharat also tabled a proposal for free vaccination of all teaching and non-teaching staff, to which the administration said it was in talks with the Serum Institute of India. "We will get staffs vaccinated on priority as they have been working hard during the pandemic period," Kharat said.

A few Senate members, including Kharat and Abhishek Bokey, proposed that the university hostels, departments and colleges should be reopened soon as students were suffering major academic loss.

"However, proper sanitisation of hostel rooms needs to be carried out before students start coming in," said Boke, whose proposal was approved.

In a proposal by principal Motiram Deshmukh, it was pointed out that while UGC had instructed that 30 per cent syllabus be reduced and exams be based on the rest, he said that in tribal and remote areas, not even 10 per cent students have been able to attend classes and are not aware of what constitutes the syllabus. Acting on his proposal not to announce further examinations till the situation on ground is reviewed, university administration replied that a committee has been set up to review the reduction of syllabus in a uniform manner.

Senate member and vice-principal of Modern College, Shamkant Deshmukh, proposed that the affiliation fee of colleges be reduced since colleges had been facing the brunt of Covid-19 and admissions were lower than expected. Deshmukh said, "Out of every 100 admissions, 35 per cent are outstation students in almost all colleges and this year, there has been an impact on that. The overall admissions scenario is slow and first year admissions of many courses are still ongoing. Colleges are facing lot of financial difficulties since fees collected is very less. Considering all, affiliation fee should be reduced."

Karmalkar said that the matter had been discussed earlier in a meeting with principals and a sympathetic view has been taken of the situation. He assured that an appropriate decision is expected soon.

The Indian Express 11.1.2021

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

## नवीन अभ्यासक्रमांसाठी मान्यतेचे विघ्न

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांना रोजगाराभिमुख व नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्वायत्तता दिली जाते. परंतु प्रत्यक्षात महाविद्यालयात नवे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी उच्च शिक्षण विभागांकडून लवकर मान्यता मिळत नाही. त्यामुळे नवे अभ्यासक्रम प्रत्यक्षात सुरू करण्यास अडचणी येत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

'यूजीसी'ने स्वायत्तता दिल्यानंतर महाविद्यालयांना नवे अभ्यासक्रम सुरू करता येतात. मात्र, त्यात कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी अभ्यासक्रमांची माहिती विद्यापीठाच्या विद्या परिषदेला द्यावी लागते. त्यानंतर विद्यापीठामार्फत हे अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे माहितीसाठी पाठविले जाते. त्यानंतरची कार्यवाही वेळेत होत नसल्याने, महाविद्यालयांना संबंधित अभ्यासक्रम सुरुच करता येत नसल्याचे दिसून येत आहे. या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता असल्याचे प्राचार्य व शिक्षणसंस्थांचे म्हणणे आहे.

दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांना नावीण्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत अडचणी येत आहेत. याबाबत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालये प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. नितीन नितीन करमळकर यांची भेट घेऊन, त्यांच्यापुढे प्रश्न मांडले. त्यानंतर विद्यापीठाने यासंदर्भात समिती स्थापन केली आहे, अशी माहिती डॉ. एकबोटे यांनी दिली.

Prabhat 16.1.2021

## महाविद्यालयांची स्वायत्तता कागदावरच

### नियमांमध्ये आणखी शिथिलता हवी : प्राचार्यांचे मत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) कॉलेजांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार रोजगाराभिमुख नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी स्वायत्तता दिली जाते. मात्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि विद्यापीठांकडून हे अभ्यासक्रमांना वेळेत मान्यता मिळत नसल्याने महाविद्यालयांना नवे अभ्यासक्रमच सुरू करता येत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे महाविद्यालयाची स्वायत्तता कागदावरच असून, नियमांमध्ये आणखी शिथिलता आवश्यक असल्याचे मत अनेक महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व्यक्त केले आहे.

यूजीसीच्या नियमानुसार महाविद्यालयांना रोजगार व कौशल्यांवर आधारित नवे अभ्यासक्रम सुरू करता येतात. मात्र, पुढे जाऊन कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी अभ्यासक्रमांची माहिती विद्यापीठाच्या विद्या परिषदेला द्यावी लागते. त्यानंतर विद्यापीठामार्फत हे अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे माहितीसाठी पाठविण्यात येतात.

त्यानंतर या अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळण्यासोबतच विद्यापीठाच्या यादीत अभ्यासक्रमांचे नाव येण्यासाठी; तसेच विद्यापीठाची पदवी मिळण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून आवश्यक कार्यवाही ठराविक कालावधीत होण्याची आवश्यकता असते. मात्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व विद्यापीठाकडून आवश्यक कार्यवाही वेळेत होत नसल्याने, महाविद्यालयांना संबंधित अभ्यासक्रम सुरूच करता येत नाही. त्यामुळे स्वायत्तता मिळवलेल्या महाविद्यालयांसमोर अनेक प्रश्न निर्माण होत असून, या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता आहे.



### स्वायत्त महाविद्यालयांसाठी समितीची स्थापना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांना नावीण्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत अडचणी येत आहेत. याबाबत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची भेट घेऊन, त्यांच्यापुढे प्रश्न मांडले. त्यानंतर आता डॉ. एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून या समितीच्या माध्यमातून स्वायत्त महाविद्यालयांच्या अडचणी संबंधित यंत्रणांपुढे मांडण्यात येत आहेत.

> यूजीसीकडून स्वायत्त महाविद्यालयांबाबत आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणताही बदल न करता राज्य सरकारने स्वीकारल्या आहेत. स्वायत्त महाविद्यालयांनी त्यानुसार दिलेल्या कालावधीत कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.
>
> **- डॉ. धनराज माने,**
> संचालक, उच्चशिक्षण संचालनालय

> महाविद्यालयात एमएस्सी ॲनिमेशन, एम-व्होक फॅशन टेक्नॉलॉजी, बी-व्होक ॲनिमेटर, बी-व्होक लँडस्केपिंग अँड अर्बन फार्मिंग, पीजी डिप्लोमा इन डेटा सायन्स असे नवे अभ्याक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाची लवकर परवानगी मिळत नसल्याचे चित्र आहे.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंझारराव,**
> प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स

Pudhari 16.1.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# स्वायत्तता 'पारतंत्र्या'त

## महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांना मंजुरी मिळण्यात दिरंगाई

म. टा. प्रतिनिधी, पुणे

स्वायत्त महाविद्यालयांच्या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि विद्यापीठांकडून दिरंगाई होत आहे. परिणामी, महाविद्यालयांची शैक्षणिक स्वायत्तता कागदोपत्रीच राहिल्याचे चित्र आहे. याचा फटका अखेर विद्यार्थ्यांनाच बसतो आहे.

चांगली शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त केलेल्या महाविद्यालयांनी स्वायत्तता घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) केले जाते; तसेच त्यासाठी प्रोत्साहनही दिले जाते. महाविद्यालयांना उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम तयार करण्याची मुभा मिळावी, हा त्यामागे प्रमुख उद्देश असतो. पुण्यातील अनेक महाविद्यालयांनी अलीकडच्या काळात 'यूजीसी'कडे प्रस्ताव पाठवून स्वायत्तता मिळवली आहे. मात्र, स्वायत्त महाविद्यालयांचे अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण विभाग; तसेच विद्यापीठांकडे मंजुरीसाठी रखडल्याचे चित्र असल्याने स्वायत्ततेच्या मूळ हेतूलाच हरताळ फासला जात असल्याचे स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे म्हणणे आहे.

सरकारी विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यापीठांवरील हा ताण कमी करण्यासाठी केंद्रीय शिक्षण विभाग आणि 'यूजीसी'कडून शैक्षणिक गुणवत्ता चांगली असलेल्या महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे धोरण अवलंबले जात आहे. 'यूजीसी'च्या नियमानुसार, महाविद्यालयांना रोजगार व कौशल्यांवर आधारित नवे अभ्यासक्रम सुरू करता येतात. मात्र, पुढे जाऊन कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी अभ्यासक्रमांची माहिती विद्यापीठाच्या विद्या परिषदेला द्यावी लागते. त्यानंतर विद्यापीठामार्फत हे अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे माहितीसाठी पाठविण्यात येतात. त्यानंतर या अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळण्याबरोबरच विद्यापीठाच्या यादीत अभ्यासक्रमांचे नाव येण्यासाठी; तसेच विद्यापीठाची पदवी मिळण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून आवश्यक कार्यवाही ठरावीक कालावधीत होण्याची आवश्यकता असते. उच्च व तंत्रशिक्षण विभाग व विद्यापीठांकडून ही कार्यवाही वेळेत होत नसल्याने, महाविद्यालयांना संबंधित अभ्यासक्रम सुरूच करता येत नसल्याचे चित्र आहे. या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता असल्याचे मत प्राचार्य व शिक्षण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी नोंदवले.

याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. धनराज माने यांच्याशी संपर्क साधला असता, 'यूजीसीकडून स्वायत्त महाविद्यालयांबाबत आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणताही बदल न करता राज्य सरकारने त्या स्वीकारल्या आहेत. राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांनी त्यानुसार दिलेल्या कालावधीत उचित कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे,' अशी भूमिका त्यांनी मांडली.

> "आमच्या महाविद्यालयाने एमएस्सी ॲनिमेशन, एम-व्होक फॅशन टेक्नॉलॉजी, बी-व्होक ॲनिमेटर, बी-व्होक लँडस्केपिंग ॲंड अर्बन फार्मिंग, पीजी डिप्लोमा इन डेटा सायन्स असे नवे अभ्याक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाची लवकर परवानगी मिळत नाही. या मंजुरीअभावी विद्यापीठ आणि समाजकल्याण विभागाकडूनही अभ्यासक्रमांना लवकर मान्यता मिळालेली नाही. अशा परिस्थितीत एक वर्ष उशिराने अभ्यासक्रम सुरू करावे लागतात. इतर स्वायत्त महाविद्यालयांनाही अशीच समस्या भेडसावत आहे. यावर तोडगा निघणे गरजेचे आहे.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
> प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स

> नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करून, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी 'यूजीसी'कडून महाविद्यालयांना स्वायत्तता दिली जाते. मात्र, तेथेही सरकारचा अप्रत्यक्ष हस्तक्षेप जाणवतो. 'यूजीसी'ने अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिल्यानंतरही सरकार व विद्यापीठांकडे पुन्हा नव्याने मान्यतेसाठी पाठपुरावा करावा लागतो. महाविद्यालयांना स्वायत्तता मिळाली, मात्र 'फाइलिंग प्रोसेस' कमी झालेली नाही. त्यामुळे स्वायत्तता असूनही महाविद्यालयांना त्याचा फायदा मिळत नसल्याचे चित्र आहे.
>
> **- ॲड. एस. के. जैन,** अध्यक्ष,
> नियामक मंडळ, शिक्षण प्रसारक मंडळी




### डॉ. एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली समिती

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांना नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत येत असलेल्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे (पीईएस) कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या पुढाकाराने महाविद्यालयांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची भेट घेऊन, त्यांच्यापुढे प्रश्न मांडले. त्यानंतर आता उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांची एक आणि डॉ. एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली असल्याचे पीईएसचे कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख यांनी सांगितले.

Maharashtra Times 16.1.2021

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

## विद्यापीठ कायद्यातील बदलांसाठी समितीची विविध घटकांशी चर्चा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अधिकार मंडळावर कुलगुरूंद्वारे नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करून थेट निवडणुकांद्वारे अधिकार मंडळांवर सदस्यांची नियुक्ती व्हावी, नामनिर्देशित सदस्यांची किमान शैक्षणिक पात्रता निश्चित करावी, विद्यापीठ अधिकार मंडळाला सामाजिक आरक्षण लागू करावे, अशा काही सूचना विद्यापीठ संबंधित विविध घटकांकडून विद्यापीठ कायदा सुधारणा समितीकडे करण्यात आल्या.

विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली समिती राज्यातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षणातील विविध घटकांशी संवाद साधत आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बैठक झाली. संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध घटकांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

विद्यापीठाच्या दृष्टीने राज्यपालांचे अधिकार कमी न करण्याची शिफारस डॉ. ए. पी. कुलकर्णी यांनी केली. तर विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींचे अधिकार कमी करू नयेत, असे विद्यार्थी प्रतिनिधींनी सांगितले. संस्थाचालकांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करून थेट निवडणुकातून सदस्यांची नियुक?ती व्हावी, अधिष्ठातांची संख्या वाढवावी, राज्य शासनाच्या उच्च शिक्षण आयोगाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्र्यांऐवजी राज्यपाल असावेत, संलग्नतेची प्रक्रिया सुटसुटीत करावी आणि तक्रार निवारण समितीची पुनर्रचना करावी.

'विद्यापीठांच्या अधिकार मंडळाला आणि अधिष्ठाता पदांना सामाजिक आरक्षणाचे तत्त्व लागू करावे, तक्रार निवारण समितीला तक्रार निकाली काढण्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी,' अशा शिफारसी शिक्षण हितकारिणीचे अध्यक्ष प्रा. प्रकाश पवार यांनी केल्या. तर स्वायत्त महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यांना उच्च शिक्षण विभाग आणि विद्यापीठांकडून संरक्षण मिळण्याची आवश्यकता आहे. स्वायत्त संस्थांना त्यांचे काम गतिमान करण्यासाठी कायद्यात बदल होण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

लोकसत्ता Sun, 17 January 2021 https://epaper.loksatta.com/c/

## स्वायत्त महाविद्यालयांना लालफितीचा फटका

पुणे, ता. १६ : पुण्यातील स्वायत्त महाविद्यालयांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून नवे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे आदेश लालफितींच्या कारभारात अडकून पडले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणारी अनेक महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्वायत्तता दिली आहे. त्यामुळे ही महाविद्यालये बदलत्या काळानुसार महाविद्यालयांचा अभ्यासक्रम ठरविणे, रोजगाराभिमुख नवे कोर्स सुरू करणे, परीक्षा घेणे आदी कामे करू शकतात.

नवे अभ्यासक्रम सुरू करताना 'यूजीसी'ने परवानगी दिल्यानंतर त्याबाबत विद्यापीठ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाला माहिती देणे आवश्यक आहे. परंतु विद्यापीठाकडून शासनाचा आदेश आल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करा असे सांगितले जाते. शासन आदेश आल्यानंतर या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच्या आरक्षित जागा, विद्यापीठाकडे नोंदणी, त्यानुसार गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र मिळते. शासन आदेशाविना अभ्यासक्रम सुरू केल्यास संस्था आणि विद्यार्थ्यांना अडचणींना तोंड द्यावे लागते.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह श्यामकांत देशमुख म्हणाले, 'मॉडर्न महाविद्यालयात यंदापासून एमएससी ॲनिमेशन आणि डेटा सायन्समध्ये पदव्युत्तर पदवी पदविका सुरू करण्यात येणार होता. त्यासाठी 'यूजीसी'कडून मान्यता मिळाली आहे, परंतु राज्य शासनाकडून परवानगी मिळालेली नसल्याने हे अभ्यासक्रम सुरू करता आलेले नाहीत.

**“ परवानगीसाठी लागणारा उशीर, परीक्षा शुल्कासाठी विद्यापीठाचा हिस्सा, संशोधन केंद्र आदी अडचणींसाठी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे,**

**- डॉ. गजानन एकबोटे,**

कार्याध्यक्ष,

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

सकाळ १७।०१।२०२१

Sakaal 17.1.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# विद्यापीठ कायद्यात बदलाचा सूर

## समितीमार्फत शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांशी संवाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर कुलगुरूंद्वारे नामनिर्देशित सदस्यांची संख्या जास्त आहे. त्याऐवजी नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करून थेट निवडणुकांद्वारे अधिकार मंडळावर सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. तसेच नामनिर्देशित सदस्यांची किमान शैक्षणिक पात्रता निश्चित करावी, असा बदल विद्यापीठ कायद्यात केला जावा, अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शनिवारी झालेल्या बैठकीत करण्यात आली.

राज्य शासनाने नव्या विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत सर्व विद्यापीठात प्रत्यक्षात शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांशी संवाद साधत कायद्यात काय बदल अपेक्षित आहे, ते जाणून घेतले जात आहे. समितीची नागपूर, मुंबईनंतर शनिवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बैठक झाली. यावेळी समितीने संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यांशी समोरासमोर संवाद साधला. सर्वांनी त्यांची मते मांडली. त्यानंतर सर्व सूचनांचा अभ्यास करून समितीमार्फत कायद्यात दुरुस्तीची कार्यवाही होणार आहे.

संस्थाचालकांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करून थेट निवडणुकीतून सदस्यांची नियुक्ती व्हावी, अधिष्ठात्यांची संख्या वाढवावी, राज्य शासनाच्या उच्च शिक्षण आयोगाचे अध्यक्षपद राज्यपालांकडे द्यावे, संलग्नतेची प्रक्रिया सुटसुटीत करावी आणि तक्रार निवारण समितीची पुनर्रचना करावी, असे बदल समितीपुढे सुचविल्याचे ते म्हणाले.

विद्यापीठाच्या दृष्टीने राज्यपालांच्या अधिकारात कपात करू नये, अशी शिफारस डॉ. एस. पी. कुलकर्णी यांनी केली आहे. विद्यापीठात कायद्यात विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींचे अधिकार कमी करू नयेत, असे विद्यार्थी प्रतिनिधींचे म्हणणे आहे. अधिसभेत सदस्यांची संख्येत करावी, अशी मागणी करण्यात आली.

विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे धोरण स्वीकारले आहे, अशा परिस्थितीत स्वायत्त महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यांना उच्च शिक्षण विभाग व विद्यापीठांकडून संरक्षण मिळणे आवश्यक असल्याचे सदस्यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. सर्व विद्यापीठांत शैक्षणिक क्षेत्रातील घटकांशी संवाद साधत त्यांची मते जाणून घेण्यात येत आहे. त्यामुळे विद्यापीठ कायद्यात काही बदल होणार असल्याचे सूतोवाच समितीचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केले. सर्व बदल व दुरुस्तीचा सर्वंकष अभ्यास करून समिती राज्य शासनास तीन महिन्यांत अहवाल सादर करणार आहे.

Pune Edition
Jan 17, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुणे । सोमवार, १८ जानेवारी २०२१ — पुणे

# कायद्याबाबत सूचनांचा महापूर

## शिक्षणक्षेत्रातील घटकांनी विद्यापीठ कायदा सुधारणा उपसमितीसमोर मांडली मते

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

अधिकार मंडळावर थेट निवडणुकीद्वारे सदस्यांची नियुक्ती करावी, नामनिर्देशित सदस्यांची किमान शैक्षणिक पात्रता निश्चित करावी, विद्यापीठाच्या दृष्टीने राज्यपालांच्या अधिकारात कपात करू नये, विद्यापीठाच्या कुलगुरु निवड समितीतील एक प्रतिनिधी विद्यापीठातील असावा, अशा सूचना शैक्षणिक क्षेत्रातील घटकांनी विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी तयार केलेल्या उपसमितीला केल्या आहेत. कायद्यात सुधारणा करण्यासाठी उपसमितीसमोर सूचना येत असल्याने, कायद्यात बदल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

राज्य सरकारने नव्या विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापन केली आहे. या उपसमितीमार्फत सर्व विद्यापीठांतील शैक्षणिक घटकांशी संवाद साधून काय बदल अपेक्षित आहेत, हे जाणून घेतले जात आहे. समितीची नागपूर, मुंबईनंतर शनिवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बैठक झाली. या वेळी समितीने कुलगुरू, विभागप्रमुख, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी समोरासमोर संवाद साधला. सर्वांनी त्यांची मते मांडली. सर्व सूचनांचा अभ्यास करून समितीमार्फत कायद्यात दुरुस्ती होणार आहे.

### तीन महिन्यांत अहवाल सरकारला सादर

नागपूर, मुंबई, पुण्यानंतर २३ जानेवारीला औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात समितीची बैठक होणार आहे. या सर्व विद्यापीठांत शैक्षणिक क्षेत्रातील घटकांशी संवाद साधून त्यांची मते जाणून घेण्यात येत आहेत. एकूणच विद्यापीठ कायद्यात दुरुस्तीसाठी शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती मते मांडत असून, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. त्यामुळे योग्य सुचनांनुसार विद्यापीठ कायद्यात काही बदल होणार असल्याचे सूतोवाच समितीचे अध्यक्ष डॉ. थोरात यांनी केले आहे. ऑनलाइन पद्धतीने सुमारे साडेतीन हजार सूचना आल्या असून, त्यांचाही अभ्यास सुरू आहे. कायद्यातील प्रस्तावित बदल, दुरुस्तीचा सर्वंकष अभ्यास करून समिती राज्य सरकारला तीन महिन्यांत अहवाल सादर करील, असेही डॉ. थोरात म्हणाले.



अधिष्ठात्यांची संख्या वाढवावी, राज्य सरकारच्या उच्चशिक्षण आयोगाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री आहेत. त्यांना वेळ मिळत नसल्याने अध्यक्षपद राज्यपालांकडे द्यावे, संलग्नतेची प्रक्रिया सुटसुटीत करावी आणि तक्रार निवारण समितीची पुनर्रचना करावी, असे बदल डॉ. गजानन एकबोटे यांनी सुचविले. उपकुलगुरू हे पद तयार करून अवाजवी अधिकार देण्यात आले आहेत. त्याचे पुनरावलोकन करून आवश्यक तेवढेच अधिकार ठेवावेत, अधिष्ठाता पदे पूर्वीच्या कायद्याप्रमाणे ठेवावीत, विद्यापीठातील सर्व अधिकार मंडळाला सामाजिक आरक्षणाचे तत्त्व लागू करावे, सिनेट सभागृहाची सदस्य संख्या वाढवावी, तक्रार निवारण समितीत दाखल केलेली तक्रार लवकरात लवकर निकाली काढावी, अशा सूचनांचे निवेदन 'शिक्षक हितकारणी संघटने'च्या वतीने प्रकाश पवार यांनी डॉ. थोरात यांना दिले.

विद्यापीठाच्या दृष्टीने राज्यपालांच्या अधिकारात कपात करू नये, अशी शिफारस डॉ. एफ. पी. कुलकर्णी यांनी केली आहे. विद्यापीठात कायद्यात विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींचे अधिकार कमी करू नयेत, असे विद्यार्थी प्रतिनिधींचे म्हणणे आहे. अधिसभेत सदस्यांची संख्येत करावी, अशी मागणी करण्यात आली. ही बैठक अतिशय सकारात्मक झाल्याचे दिसून आले.

**'महाविद्यालयांना स्वायत्तता मिळावी'**

विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे धोरण स्वीकारले आहे. अशा परिस्थितीत स्वायत्त महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, त्यांना उच्चशिक्षण विभाग आणि विद्यापीठांकडून संरक्षण मिळणे आवश्यक आहे. स्वायत्त संस्थांना त्यांचे काम गतीमान करण्यासाठी आवश्यक ते बदल होणे आवश्यक असल्याचे उपस्थितांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली.

Maharashtra Times 18.1.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# 'कॅस' शिबिर महाविद्यालय स्तरावर घ्या

## संस्थाचालकांनी तक्रार केल्याने उच्च शिक्षण विभागाचे विद्यापीठाला पत्र

पुणे, ता. १७ : सहाय्यक व सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस) शिबिर हे विद्यापीठ स्तरावर आयोजित न करता महाविद्यालय स्तरावरच घेणे योग्य ठरेल, असे पत्र उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला पाठवून यावर खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षभरात तीन वेळा 'कॅस' शिबिर रद्द केले होते, त्यानंतर आता ८ ते १४ जानेवारी या काळात विद्यापीठामध्ये मुलाखती घेतल्या. मात्र, यावर पुण्यातील संस्थाचालकांनी आक्षेप घेत उच्च शिक्षण संचालकांकडे तक्रार केली आहे. त्यावर डॉ. धनराज माने यांनी 'कॅस' अंतर्गत पदोन्नती समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष व सचिव प्राचार्य असतात, त्यामुळे अध्यापकांची निवड आणि शिबिर घेणे संबंधित महाविद्यालयात बैठक घेणे उचित ठरेल, असे पत्रात नमूद केले आहे.

**यापूर्वी आम्हाला मुलाखती घ्या असे आदेश आले होते, त्यामुळे या मुलाखती विद्यापीठात घेतल्या, यापुढे त्या महाविद्यालय स्तरावर होतील. कॅस शिबिरासाठी मानधन व इतर खर्चासाठी व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार समिती गठित केली होती. समितीचा खर्च येत्या ४-५ दिवसांत जाहीर केला जाईल.**

**- डॉ. एन. एस. उमराणी,** प्र-कुलगुरू, पुणे विद्यापीठ

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, ''कॅसच्या मुलाखती महाविद्यालय स्तरावर झाल्या पाहिजेत, पुणे विद्यापीठाने संस्था अध्यक्षांच्या गैरसोईची वेळ घेतल्याने अनेक जणांच्या मुलाखती झालेल्या नाहीत. या मुलाखती महाविद्यालय स्तरावर होण्यासाठी विद्यापीठाने विषय तज्ज्ञ उपलब्ध करावेत. कॅस मुलाखतींसाठी प्राध्यापकांकडून प्रत्येकी साडेसात हजार रुपये घेतले आहेत, ते एका महाविद्यालयाच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. या मुलाखती महाविद्यालय स्तरावर झाल्या असत्या तर प्राध्यापकांना पैसे द्यावे लागले नसते.''

Sakaal 18.1.2021

२० || प्रभात पुणे, मंगळवार, दि. १९ जानेवारी २०२१

# नामनिर्देशित सदस्यांची किमान शैक्षणिक पात्रता निश्चित करा

## नवा विद्यापीठ कायदा सुधारणा बैठकीत शिक्षण क्षेत्रातून सूर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १८ - विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर कुलगुरूंद्वारे नामनिर्देशन सदस्यांची संख्या तुलनेत जास्त आहे. ही संख्या कमी करून थेट निवडणुकांद्वारे अधिकार मंडळावर सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. नामनिर्देशित म्हणजेच थेट नियुक्ती करावयाची असल्यास, त्या सदस्यांची किमान शैक्षणिक पात्रता निश्चित करावी, अशी दुरुस्ती विद्यापीठ कायद्यात व्हावी, अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या बैठकीत करण्यात आली.

राज्य शासनाने नव्या विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत सर्व विद्यापीठात प्रत्यक्षात शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांशी संवाद साधत कायद्यात काय बदल अपेक्षित आहे, ते जाणून घेतले जात आहे. समितीची नागपूर, मुंबईनंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बैठक झाली. यावेळी संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यांशी समोरासमोर संवाद साधला. सर्वांनी त्यांची मते मांडली. त्यानंतर सर्व सूचनांचा अभ्यास करून समितीमार्फत कायद्यात दुरुस्तीची कार्यवाही होणार आहे.

समितीची पुढील बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात होणार आहे. सर्व विद्यापीठांत शैक्षणिक क्षेत्रातील घटकांशी संवाद साधत त्यांची मते मागवण्यात येत आहेत. एकूणच विद्यापीठ कायद्यात दुरुस्तीसाठी शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीसमोर येत मते मांडत असून, ही बाब सकारात्मक आहे. त्यामुळे विद्यापीठ कायद्यात काही बदल होणार आहेत.सर्व बदल व दुरुस्तीचा सर्वंकष अभ्यास करून समिती राज्य शासनास तीन महिन्यांत अहवाल सादर करण्यात येईल.

**- डॉ. सुखदेव थोरात,** समिती अध्यक्ष

संस्थाचालकांची प्रतिनिधी म्हणून डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, 'नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करून थेट निवडणुकातून सदस्यांची नियुक्ती व्हावी, अधिष्ठातांची संख्या वाढवावी, राज्य शासनाच्या उच्च शिक्षण आयोगाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री आहेत. त्यांना वेळ मिळत नसल्याने त्याचे अध्यक्षपद राज्यपालांकडे द्यावेत, संलग्नतेची प्रक्रिया सुटसुटीत करावी आणि तक्रार निवारण समितीची फेररचना करावी, असे बदल समितीपुढे सुचवले आहेत.'

विद्यापीठाच्या दृष्टीने राज्यपालांच्या अधिकारात कपात करू नये, अशी शिफारस डॉ. एफ. पी. कुलकर्णी यांनी केली आहे. विद्यापीठात कायद्यात विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींचे अधिकार कमी करू नयेत, असे विद्यार्थी प्रतिनिधींचे म्हणणे आहे. अधिसभेत सदस्यांची संख्येत वाढ करावी, अशी मागणी करण्यात आली.

### स्वायत्त महाविद्यालयांना संरक्षण मिळावे



विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे धोरण स्वीकारले आहे. अशा परिस्थितीत महाविद्यालयांच्या अडचणी लक्षात घेता त्यांना उच्च शिक्षण विभाग व विद्यापीठांकडून संरक्षण मिळणे आवश्यक आहे. स्वायत्त संस्थांना त्यांचे काम गतिमान करण्यासाठी आवश्यक ते बदल होणे आवश्यक असल्याचे सदस्यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली.

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# आता दरमहा होणार 'कॅस'चे शिबिर

## पुणे विद्यापीठाचा आदेश; प्राध्यापकांच्या बढतीतील अडसर दूर

**पुणे, ता. २३ :** साहाय्यक, सहयोगी प्राध्यापकांनी पदोन्नतीसाठी पात्रता, अनुभव कमावला; पण वेळेवर सेवा अंतर्गत प्रगती योजनेतून (करिअर अडव्हान्समेंट स्कीम-कॅस) शिबिर होत नसल्याने शेकडो प्राध्यापक प्रमोशनशिवाय वंचित राहत आहेत. आता प्रत्येक महिन्यात महाविद्यालय स्तरावर 'कॅस' शिबिर घ्या, असे आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांना दिले आहेत.

राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्याला 'कॅस' मुलाखती होत आहेत; पण पुणे विद्यापीठामध्ये शासनाच्या नियमात बदल झाल्यानंतर त्याची व्यवस्था निर्माण झालेली नाही. विद्यापीठाने मार्च महिन्यात आयोजित केलेले ''कॅस' शिबिर कोरोनामुळे पुढे ढकलावे लागले. त्यानंतर सप्टेंबर-आक्टोबरमध्ये ठरलेले शिबिर पुढे ढकलले. अखेर ८ ते १४ जानेवारी या कालावधीत सुमारे ५०० प्राध्यापकांचे 'कॅस' शिबिर घेण्यात आले. पण संस्थाचालकांनी विद्यापीठाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला.

'कॅस' शिबिर घेण्याचा अधिकार महाविद्यालयांना आहे व त्या समितीचे अध्यक्ष संस्थेचे प्रमुख असतात. त्यामुळे महाविद्यालय स्तरावरच शिबिर झाले पाहिजे, अशी तक्रार उच्च शिक्षण संचालकांकडे केली होती. त्यानंतर पुणे विद्यापीठाला महाविद्यालय स्तरावरच शिबिर घ्यावेत, असे आदेश उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी दिले होते.

या पत्रानंतर पुणे विद्यापीठाने गुरुवारी (ता. २१) परिपत्रक काढले आहे. शासनाच्या ८ जुलै २०१९ पत्रानुसार प्राध्यापकांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या तरतुदी विचारात घेऊन प्रत्येक महिन्याला ठराविक दिवशी किंवा शेवटच्या आठवड्यात महाविद्यालय स्तरावर मुलाखती घ्याव्यात, असे आदेश महाविद्यालयांना दिले आहे.

> 'कॅस'च्या मुलाखती घेण्याची जबाबदारी महाविद्यालयांवर आली आहे. प्रत्येक महाविद्यालयात दर महिन्याला शिबिर घेणे, त्यासाठी विद्यापीठ नियुक्त तज्ज्ञ, विषय तज्ज्ञ हे एकाच वेळी उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. तसेच, त्याचा खर्चही महाविद्यालयांना करावा लागणार आहे. विद्यापीठाच्या आदेशात आणखी स्पष्टता अपेक्षित असून, प्रत्यक्षात शिबिरे झाल्यानंतर त्याची मर्यादा व यश स्पष्ट होईल.
> - **डॉ. कान्हू गिरमकर**, अध्यक्ष, स्पुक्टो

> **'कॅस' समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष असतात, त्यामुळे त्यांच्या नियोजनानुसार मुलाखती घ्याव्यात असे आमचे म्हणणे होते, ते विद्यापीठ व शासनाने मान्य केले आहे. कोणावरही अन्याय होऊ न देता मुलाखती घेतल्या जातील.**
> - **डॉ. गजानन एकबोटे**, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Sakaal 24.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय ४ जानेवारीला

पुणे, दि. ३१ (प्रतिनिधी) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय सुरू करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीची दुसरी बैठक ४ जानेवारीला होणार आहे. त्यात महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

शहरातील माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववी ते बारावीचे वर्ग ४ जानेवारीपासून सुरू होणार असले तरी महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्यापि निर्णय झालेला नाही. कोरोनानंतर बंद करण्यात आलेली महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. त्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन केली आहे.

या समितीमध्ये विविध विद्याशाखांमधील प्राध्यापक आणि प्राचार्य यांचा समावेश आहे. या समितीची नुकतीच पहिली बैठक झाली. महाविद्यालय सुरू करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, महाविद्यालय प्रशासनाकडून विद्यार्थ्यांची सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात बैठक व्यवस्था करता येऊ शकते का? विज्ञान विषयाचे प्रॅक्टिकल्स सुरू करणे योग्य ठरेल का, अशा विविध विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

Saamana 1.1.2021

## प्रवेशासाठी रिक्त जागा आज जाहीर

पुणे : इयत्ता अकरावी प्रवेशासाठी जाहीर झालेल्या विशेष फेरीच्या निवड यादीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला होता. यातील १५ हजार ९५ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये दिलेल्या मुदतीत प्रवेश निश्चित केला आहे. आज, एक जानेवारीला प्रवेशासाठी उर्वरित रिक्त जागा जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती अकरावी प्रवेश नियंत्रण समितीतर्फे देण्यात आली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ कॉलेजांमध्ये एक लाख सात हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ६० हजार २५७ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. प्रवेशासाठी अद्यापही ४६ हजार ७७३ जागा रिक्त आहेत. विशेष फेरीसाठी २८ ते ३१ डिसेंबर दरम्यान प्रवेशाची संधी देण्यात आली. यामध्ये १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांपैकी १५ हजार ७९ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दिली. आज, शुक्रवारी रिक्त जागा जाहीर होतील. त्यामुळे दहावीच्या पुरवणी परीक्षेतील विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे.

Maharashtra Times 1.1.2021

## नवीन शंभर अभ्यासक्रम 'स्वयम'वर उपलब्ध

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील शंभरहून अधिक अभ्यासक्रम स्वयम वेबसाइटद्वारे ऑनलाइन शिकण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. देशभरातील पात्र विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम जानेवारी २०२१ च्या सत्रापासून शिकता येणार आहेत.

या अभ्यासक्रमांमध्ये पदवी स्तरावरील ७८; तर पदव्युत्तर स्तरावरील ४८ अभ्यासक्रमांचा समावेश आहे. नवे अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय, व्यवस्थापन, संगणकशास्त्र, विज्ञान, वाणिज्य, विधी, मानव्य आणि समाजशास्त्र अशा विद्याशाखांतील आहेत. विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना श्रेयांक (क्रेडिट) घेउन स्वयम वेबसाइटवर अभ्यासक्रम करता येतात. हे अभ्यासक्रम विनामूल्य असून, विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा शुल्क भरावे लागते. राष्ट्रीय परीक्षा मंडळाकडून (एनटीए) परीक्षा घेतली जाते, अशी माहिती 'यूजीसी'ने दिली आहे.

Maharashtra times 1.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## अनुसूचित विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणात भरारी

### 'समाजकल्याण'च्या परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ

सकाळ EXCLUSIVE

अनिल सावळे : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३१ : अमेरिकेतील न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी, स्टॅंडफोर्ड युनिव्हर्सिटी, इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ मॅंचेस्टर असो किंवा ऑस्ट्रेलियातील सिडनी युनिव्हर्सिटी... परदेशांतील अशा नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचा ओढा दिसून येत आहे. परदेशी शिष्यवृत्तीचा आधार घेत राज्यातील एक हजार तीनशे विद्यार्थ्यांनी कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. आणि व्यवस्थापन क्षेत्रात भरारी घेतली आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात नामांकित शिक्षण संस्थेत शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी २००३ पासून परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. पदव्युत्तर पदवी आणि पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी तीनशे 'क्यूएस रँकिंग'च्या आतील परदेशातील शिक्षण संस्थांमध्ये

पान ६ वर »

> **"पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेत सहभागी व्हावे. यासोबतच राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून देशांतर्गत विद्यापीठांमध्ये आयआयटी, एनआयटी, आयआयएम या संस्थांमध्ये शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेमध्येही विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.**
> **- डॉ. प्रशांत नारनवरे,** आयुक्त, समाज कल्याण

### या अभ्यासक्रमांकडे कल...

- **पदव्युत्तर पदवी :** मास्टर ऑफ इंजिनिअरिंग, मास्टर इन आयटी, मास्टर ऑफ सायन्स, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, पोस्ट ग्रॅज्युएशन इन लॉ, एमएस्सी अकाउंटन्सी अँड फायनान्स, इकॉनॉमिक्स अँड फायनान्स, हेल्थ सायकॉलॉजी
- **व्यवस्थापन :** मास्टर ऑफ इंटरनॅशनल बिझनेस, एमबीए, मास्टर ऑफ ॲप्लाइड फायनान्स.
- **पीएच.डी. :** डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी, डॉक्टर ऑफ अँथ्रोपोलॉजी, सोशॉलॉजी, फिजिक्स रिसर्च, कॅन्सर सायन्स, ड्रग डिझाइन डेव्हलपमेंट, केमिकल इंजिनिअरिंग, फार्मसी

Sakaal 1.1.2021

## अनुसूचित विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणात भरारी

» पान १ वरून

प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना या योजनेतून शिष्यवृत्ती दिली जाते. त्यात विद्यार्थ्यांना परदेशात जाण्यासाठी व्हिसा, विमानाच्या प्रवास खर्चापासून निवास-भोजन आणि संपूर्ण शैक्षणिक शुल्क देण्यात येते. या वर्षासाठी ७५ विद्यार्थ्यांची परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड केली आहे. त्यासाठी राज्य सरकारने २०२०-२१ वर्षासाठी सुमारे ४० कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सुमारे १२ कोटी रूपयांचा निधी समाज कल्याण विभागाला प्राप्त झाला आहे.

"एखाद्या कंपनीत नोकरी करून कुटुंबातील सर्व जण समाधानी राहतील, एवढीच अपेक्षा होती; परंतु मित्रांकडून परदेशी शिष्यवृत्ती योजनेची माहिती मिळाली. त्यातूनच जर्मनीतील विद्यापीठात प्रवेश मिळाला. त्यामुळे मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले. मीही यापुढे सामाजिक दायित्व लक्षात घेऊन गरीब विद्यार्थ्यांसाठी प्रयत्न करणार आहे. जेणे करून त्यांना उच्च शिक्षणाचा लाभ घेता येईल," असे या योजनेचा लाभ घेतलेल्या **एका गरीब** कुटुंबातील विद्यार्थ्याने **'सकाळ'शी** बोलताना सांगितले.

## विशेष फेरीत ८२ टक्के विद्यार्थ्यांचा प्रवेश

### १४ हजार ४९६ जणांकडून प्रतिसाद; रिक्त जागांचा तपशील आज

**» अकरावी प्रवेश प्रक्रिया**

पुणे, ता. ३१ : अकरावी प्रवेशाच्या पहिल्या विशेष फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ८१.७९ विद्यार्थ्यांनी सरत्या वर्षाच्या अखेरपर्यंत प्रवेश घेतला. जवळपास १४ हजार ४९६ विद्यार्थ्यांनी गुरुवारी सायंकाळपर्यंत प्रवेश निश्चित केल्याची माहिती इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश समितीने दिली.

या प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या तीन नियमित फेऱ्या झाल्यानंतर १९ डिसेंबरला विशेष फेरी जाहीर करण्यात आली. या फेरीची गुणवत्ता यादी २८ डिसेंबरला जाहीर झाली. या फेरीत जवळपास १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड करण्यात आली. यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत दिली होती.

या प्रवेश प्रक्रियेत सुमारे १५ हजार ७९ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दर्शविली असून जवळपास १४ हजार ४९६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या फेरीत निवड होऊनही जवळपास दोन हजार ६४३ विद्यार्थ्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, अशी माहिती समितीने दिली.

**आवश्यकतेनुसार कार्यपद्धती**

प्रवेशाची पहिली विशेष फेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहणाऱ्या जागांचा तपशील शुक्रवारी (ता.१) जाहीर होणार आहे. यामध्ये राखीव कोट्यातून प्रत्यार्पित केलेल्या सर्व रिक्त जागांचाही समावेश असणार आहे. प्रवेश प्रक्रियेच्या यापुढील कार्यवाहीबाबत त्यावेळच्या आवश्यकतेनुसार कार्यपद्धती जाहीर करण्यात येईल. तसेच द्विलक्षी विषयांच्या प्रवेशाबाबतची कार्यपद्धती लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे समितीच्यावतीने सांगण्यात आले आहे.

| फेरीचा तपशील |
|---|
| २०,३४७ पहिल्या विशेष फेरीसाठी पात्र झालेले विद्यार्थी |
| १७,७२२ निवड झालेले विद्यार्थी |
| १५,०७९ प्रवेशासाठी संमती दर्शविलेले विद्यार्थी |
| १४,४९६ प्रवेश घेतलेले विद्यार्थी |
| २,६४३ निवड होऊनही प्रतिसाद न दिलेले विद्यार्थी |

Sakal 1.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

## पंधरा हजार जणांचे विशेष फेरीत प्रवेश

### आज उर्वरित प्रवेशासाठी रिक्त जागा होणार जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेशासाठी जाहीर झालेल्या विशेष फेरीच्या गुणवत्ता यादीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला होता. यातील तब्बल १५ हजार ९५ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये दिलेल्या मुदतीत प्रवेश निश्चित केला आहे. दि. १ जानेवारीला प्रवेशासाठी उर्वरित रिक्त जागा जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती उपसंचालक कार्यालयातून देण्यात आली आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ६० हजार २५७ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. प्रवेशासाठी अद्यापि ४६ हजार ७७३ जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

विशेष फेरीसाठी २८ ते ३१ डिसेंबरदरम्यान प्रवेशाची संधी देण्यात आली. यामध्ये १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांपैकी १५ हजार ७९ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दिली. त्यापैकी १५ हजार ९५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. ८ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. तर २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केला.

आता १ जानेवारीला उर्वरित प्रवेशासाठी रिक्त जागा जाहीर होतील. त्यामुळे दहावीच्या पुरवणी परीक्षेतील विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांनादेखील प्रवेशाची संधी मिळणार असल्याचे दिसून येत आहे.

My Pune Edition
Jan 1, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीत १५ हजार ९५ विद्यार्थ्यांचा प्रवेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या विशेष फेरीत १५ हजार ९५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्यापैकी १४ हजार ४९६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रक्रियेतून, तर ५९९ विद्यार्थ्यांनी राखीव जागांतून प्रवेश घेतला. २ हजार ६४३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याकडे पाठ फिरवली. मात्र गेल्या दोन फेऱ्यांच्या तुलनेत विशेष फेरीतील ऑनलाइन प्रवेशांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरी ३१ डिसेंबरला संपली. विशेष फेरीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला होता. त्यापैकी १४ हजार ४९६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, तर २ हजार ६४३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही. २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केला, तर तांत्रिक कारणास्तव आठ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आल्याची माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीत ९ हजार ८३९, तिसऱ्या फेरीत ३ हजार ९०६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामुळे या दोन फेऱ्यांच्या तुलनेत विशेष फेरीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे पुढील विशेष फेऱ्यांतील प्रवेशांची संख्या वाढण्याची शिक्षण विभागाला अपेक्षा आहे. विशेष फेरी दोनसाठीच्या रिक्त जागा आज (१ जानेवारी) जाहीर केल्या जाणार आहेत.

लोकसत्ता Fri, 01 January 20
https://epaper.lok

## First round of FYJC admissions complete

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** The first special round of the First Year Junior College (FYJC) admissions completed today and a total of 17,722 students were allotted the seats of which 15,095 students have completed their admission process in this round. A large number of students have not yet confirmed their admission and as of today, 41,533 seats are vacant across streams in the Pune and Pimpri-Chinchwad region. Earlier in the first, second and third regular round of the admissions, 40,013, 23,120 and 12,461 seats were allotted respectively by the education department. Now after three normal rounds, the first special has completed and on January 1, 2021, the vacancy list for after completion of the special round will be displayed online. Due to the interim stay given by the Supreme Court (SC) on the implementation of the quota for the Maratha community in jobs and education, the state education department had stopped the admission process for Class 11 (FYJC) since September 9 and it resumed back from November 26. For this year's Class 11 admission process, a total of 68,072 students were eligible for the first round, 46,794 for the second round and 33,661 for the third round of admission in 304 colleges of Pune and Pimpri-Chinchwad area. Now, in the first special round, 20,347 students were eligible for admissions. The total intake of seats this year was 1, 07,030 in Pune region, till now 60,182 students have completed the admission process in all the three regular rounds and now 41,533 seats are still vacant. Meena Shendkar, assistant director of education, Pune said, "The first special round of admissions is now over and still a large number of students have not yet confirmed their admissions. Students and their parents wait to get admission in a few prominent colleges which are not possible as the process is centralised. Students need to understand this as they need to take admission as per marks and in the college which cut off is close to their marks."

> The first special round of admissions is now over and still a large number of students have not yet confirmed their admissions
>
> **MEENA SHENDKAR,** assistant director of education, Pune

Hindustan Times 1.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## 'सीबीएसई' दहावी आणि बारावीच्या परीक्षा ४ मेपासून

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** केंद्रीय शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या असून लेखी परीक्षा ४ मेपासून तर प्रात्यक्षिक परीक्षा १ मार्चपासून होणार आहेत.

दरवर्षी साधारण फेब्रुवारी, मार्चमध्ये सीबीएसईची दहावी आणि बारावीची परीक्षा सुरू होते. मात्र, यंदा जानेवारी उजाडेपर्यंत वेळापत्रक जाहीर न झाल्यामुळे विद्यार्थी अस्वस्थ होते. अखेर सीबीएसईच्या परीक्षांची तारीख जाहीर करण्यात आली. केंद्रीय शिक्षणमंत्री रमेश पोखरियाल यांनी परीक्षांच्या तारखा गुरुवारी जाहीर केल्या.

दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षा ४ मे २०२१ पासून सुरू होणार असून १० जूनपर्यंत चालणार आहेत. त्यापूर्वी बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा होणार आहेत. १ मार्चपासून प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होतील.

परीक्षांनंतर निकालही लगेच जाहीर करण्यात येणार असून १५ जुलैपर्यंत निकाल जाहीर होईल. परीक्षांबाबतचा निर्णय विद्यार्थी, शिक्षक, पालक अशा सर्व घटकांनी दिलेल्या सूचना लक्षात घेऊन जाहीर करण्यात आल्याचे, रमेश पोखरियाल यांनी सांगितले.



### शैक्षणिक वर्ष लांबणार...

जुलैमध्ये निकाल जाहीर झाल्यावर पुढील वर्षीच्या अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू होऊ शकणार आहे. दरवर्षी मे अखेरीपर्यंत निकाल आणि जूनपासून सुरू होणारी प्रवेश प्रक्रिया लांबणार आहे. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयांचे पुढील शैक्षणिक वर्षही लांबणार आहे.

### प्रवेश परीक्षाही एकाच वेळी...

जेईई यंदा चार वेळा घेण्याचा निर्णय राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे. त्यानुसार फेब्रुवारी ते मे या कालावधीत चार संधी देण्यात येतील. मे महिन्यात होणाऱ्या परीक्षा आणि सीबीएसईच्या परीक्षा एकाच वेळी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात चार संधींचा लाभ घेता येणार का याबाबत साशंकता आहे.

### राज्यातील परीक्षा कधी?

सीबीएसईच्या परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर आता राज्य मंडळाच्या परीक्षा कधी होणार याबाबत उत्सुकता आहे. सध्या राज्य मंडळाचे परीक्षा अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून एप्रिल अखेर किंवा मे महिन्यात परीक्षा सुरू करण्याचे संकेत शिक्षण विभागाने दिले आहेत.

लोकसत्ता Fri, 01 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57

प्रभात पुणे, शनिवार, दि. ०२ जानेवारी २०२१ ५

## अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या विशेष फेरीला सुरुवात



■ नवीन अर्ज आणि दुरुस्तीसाठी ४ जानेवारीपर्यंत संधी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १ - इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या विशेष फेरीला सुरुवात झाली असून शुक्रवारी (दि.१) संकेतस्थळावर रिक्त पदांची संख्या दर्शविली आहे. तसेच, ४ जानेवारीपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग १ मध्ये आवश्यकता असल्यास बदल करून घेणे तसेच या कालावधीत नवीन दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता येणार आहे. या फेरीची गुणवत्ता यादी दि. ५ जानेवारीला प्रसिद्ध होणार आहे, अशी माहिती अकरावी प्रवेश समितीकडून देण्यात आली.

अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेची पहिली विशेष फेरीतील प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक गुरुवारी रात्री उशिरा जाहीर करण्यात आले. यानंतर शुक्रवारपासून विद्यार्थ्यांना ऑनलाइन नव्याने अर्ज प्रक्रिया, पसंतीक्रम नोंदवणे व अर्जात बदल करण्याची संधी देण्यात आली आहे. दि. ४ जानेवारीपर्यंत ही प्रवेशप्रक्रिया पार पडेल. यानंतर ५ जानेवारी रोजी सायं.६ वाजता गुणवत्ता यादी व कट-ऑफ गुण प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या फेरीत रिक्त जागांव्यतिरिक्त कोट्यांतर्गत प्रवेश आणि द्विलक्षी अभ्यासक्रमांचे प्रवेश दिले जाणार आहेत. दि. ६ ते ८ जानेवारी या कालावधीत विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश घेता येणार आहे. यादरम्यान, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करायचे आहेत. दि. ८ जानेवारी रोजी झालेले प्रवेश संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदविण्यासाठी उच्च माध्यमिक विद्यालयांना अतिरिक्त वेळ दिला जाणार आहे. दि. ९ जानेवारी रोजी प्रवेशाची विशेष फेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांचा तपशील जाहीर केला जाणार आहे. प्रवेशप्रक्रियेच्या पुढील कार्यवाहीबाबत तसेच एटीकेटीबाबतची कार्यपद्धती या फेरीनंतर जाहीर केली जाणार आहे, अशी माहिती माध्यमिक संचालक दत्तात्रय जगताप यांनी दिली.

## 'पुरवणी'चे उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशापासून वंचित

फार्मसी, अभियांत्रिकी पदविकेला संधी नाही

**पुणे, ता. १ :** महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर केला. पण यातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना फार्मसी, अभियांत्रिकी पदविकेला प्रवेश घेण्याची संधी अद्याप तंत्रशिक्षण विभागाने दिलेली नाही. या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र फेरी राबविण्यात यावी व प्रवेशाची मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ नॉन एडेड इन्स्टिट्यूट्स इन रूरल एरिया (एटीएमयूआयआरए) या संस्थेने केली आहे.

पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर अकरावीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच आयटीआयनेही प्रवेश देण्यास सुरवात केली. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई) आणि तंत्रशिक्षण संचालनालयाकडून दहावी आणि बारावीनंतरच्या फार्मसी, अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या प्रक्रियेत पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संधी दिली नाही. त्यामुळे पुरवणी परीक्षेतील दहावी आणि बारावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेश घेता यावा, यासाठी विशेष फेरी किंवा समुपदेशन फेरी राबविण्याची मागणी संघटनेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

**"अभियांत्रिकी, फार्मसी पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी ८ जानेवारीपर्यंत मुदत आहे; पण अद्याप अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही. तसेच पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी नसल्याने विशेष फेरी राबविण्यात यावी आणि त्यासाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदत द्यावी.**
**- रामदास झोळ,** अध्यक्ष, 'एटीएमयूआयआरए'

Sakaal 2.1.2021

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

## सावित्रीबाई फुले 'महिला शिक्षण दिन' सर्वत्र साजरा करणार

### शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड



मुंबई, दि. १ - स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस राज्यात साजरा केला जातो. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, त्यांनी आचरणात आणलेली स्त्री उद्धारासाठीची मूल्ये भावी पिढीसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील योगदान, त्यांचे कार्य, समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि त्यांनी रुजविलेली शैक्षणिक मूल्ये पुढील पिढीपर्यंत संक्रमित करण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती 'महिला शिक्षण दिन' म्हणून साजरी करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली.

या दिवशी शाळांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भाषणे, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, परिसंवाद व एकांकिकांचे आयोजन करण्यात येईल. त्याचप्रमाणे, सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात, शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल.

त्यांच्या नावाने स्त्री शिक्षणात कार्यरत शिक्षिका, अधिकारी, सामाजिक कार्यकर्त्या यांना पुरस्कार देण्यात येईल, ऑनलाइन तसेच ऑफलाइन चर्चासत्र आयोजित केले जातील आणि समाजमाध्यमांवर 'सावित्री, महिला शिक्षण' दिन असे हॅशटॅग वापरून नव्या पिढीला यात सामावून घेतले जाईल, अशी माहिती प्रा. गायकवाड यांनी दिली आहे.

Prabhat 2.1.2021

## फॉर्म सतरा भरण्यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदत

### दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज

पुणे, ता. १ : दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी खासगीरीत्या म्हणजे फॉर्म नंबर १७ भरून नावनोंदणी करण्यासाठी ११ जानेवारीपासून अर्ज करता येईल. यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदत असून, हे अर्ज आणि शुल्क ऑनलाइन भरावे, असे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून सांगण्यात आले.

अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन शुल्क भरल्याची पावती तसेच मूळ कागदपत्रे संबंधित शाळेत किंवा कनिष्ठ महाविद्यालयात जमा करायचे आहे. यासाठी १२ ते २७ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तसेच शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाइन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याच्या पावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे आणि यादी विभागीय मंडळाकडे दोन फेब्रुवारीपर्यंत जमा करता येणार आहे, अशी माहिती

पान ७ वर »

या संकेतस्थळावर भरा अर्ज
- दहावीसाठी : http://form17.mh-ssc.ac.in
- बारावीसाठी : http://form17.mh-hsc.ac.in

## फॉर्म सतरासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदत

» पान १ वरून

मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जातील दुरुस्त्या १० जानेवारीपर्यंत विभागीय मंडळामार्फत करण्यात येणार आहेत. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी आपली शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विभागीय मंडळाशी संपर्क साधावा, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे. ऑनलाइन अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५७०५२०७/ २५७०५२०८, तसेच इतर बाबींसाठी २५७०५२७१ वर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य मंडळाने केले आहे.

Sakaal 2.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## 'जादा शुल्काबाबत तक्रार करावी'

पुणे : शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) ठरवलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क महाविद्यालयांनी आकारल्यास, महाविद्यालयांची प्राधिकरणाकडे तक्रार करावी, असे आवाहन 'एफआरए'कडून करण्यात आले आहे.

विविध व्यावसायिक पदवी, पदविका आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना सुरुवात झाल्याने, 'एफआरए'ने गुरुवारी परिपत्रक प्रसिद्ध केले. 'एफआरए'कडून विविध अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्यात येत असून, त्याची माहिती वेळोवेळी http://www.sssamiti.org या वेबसाइटवर प्रकाशित करण्यात येते. 'एफआरए'च्या कक्षेत येणाऱ्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी शुल्काची माहिती घेऊन खातरतमा करावी आणि त्यानंतरच महाविद्यालयात शुल्क भरावे, अशी माहिती 'एफआरए'कडून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

राज्यातील महाविद्यालयांकडून जादा शुल्क आकारण्यात येत असल्यास संबंधित महाविद्यालयांची तक्रार विद्यार्थ्यांनी fra.govmh@gmail.com या ई-मेल आयडीवर तक्रार पाठवावी, असे सांगण्यात आले.

Maharashtra Times 2.1.2021

## अकरावीसाठी दुसरी विशेष फेरी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इयत्ता अकरावी प्रवेशासाठी दुसऱ्या विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर झाले असून, विद्यार्थ्यांना चार जानेवारीपर्यंत अर्ज भरणे, अर्जात बदल करणे आदी प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे. येत्या पाच जानेवारीला निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक दत्तात्रय जगताप यांनी दिली.

### प्रवेशाची 'परीक्षा'

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ३०४ कॉलेजांमध्ये एक लाख सात हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ६० हजार २४३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. अजूनही ४६ हजार ७८७ जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

### विशेष फेरीचे वेळापत्रक

**१ ते ४ जानेवारी**

- विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भाग एकमध्ये आवश्यकता असल्यास बदल करून घेणे.
- या कालावधीत नवीन दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश अर्ज भरता येतील.
- यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द करता येईल, तसेच विशेष फेरीसाठी लगेच अर्ज सादर करता येईल.
- प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे (भाग-दोन भरणे) व लॉक करणे. पसंतीक्रमात बदल करता येतील.

**५ जानेवारी**

- प्रवेश फेरी अंतर्गत प्रवेशासाठी निवड, निवड यादी प्रदर्शित करणे.
- कट-ऑफ गुण वेबसाइटवर दर्शविणे.

**६ ते ८ जानेवारी**

- विद्यार्थ्यांनी मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास 'प्रोसिड फॉर ॲडमिशन' करणे.
- विद्यार्थ्याने मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.
- महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाइन निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे; तसेच प्रवेश नाकारता येणे.
- सर्व तिन्ही कोटांतर्गत प्रवेश सुरू राहतील.

**८ जानेवारी**

- प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती वेबसाइटवर नोंदविण्यासाठी कॉलेजांसाठी अतिरिक्त वेळ.

Maharashtra Times 2.1.2021

पुढारी

## अकरावीच्या दुसऱ्या विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर

### ५ जानेवारीला होणार गुणवत्ता यादी जाहीर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेशासाठी तीन नियमित आणि एक विशेष फेरी राबविण्यात आल्यानंतर आता दुसऱ्या विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या फेरीत विद्यार्थ्यांना १ ते ४ जानेवारीदरम्यान अर्ज भरणे, अर्जात बदल करणे आदी प्रक्रिया पार पाडावी लागणार आहे. येत्या ५ जानेवारीला गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक दत्तात्रय जगताप यांनी दिली आहे.



पुणेआणिपिंपरीचिंचवडपरिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ६० हजार २४३ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. प्रवेशासाठी अद्यापही ४६ हजार ७८७ जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे. रिक्त जागांसाठी संबंधित प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेची पुढील कार्यवाही तसेच एटीकेटी विद्यार्थ्यांबाबत ९ जानेवारीनंतर कार्यपद्धती जाहीर करण्यात येणार आहे.

### अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या विशेष फेरीचे वेळापत्रक

**१ ते ४ जानेवारी**

- विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भाग एकमध्ये आवश्यकता असल्यास बदल करून घेणे, तसेच या कालावधीत नवीन दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश अर्ज भरता येतील.
- यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द करता येईल व विशेष फेरीसाठी लगेच अर्ज सादर करता येईल.
- प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे (भाग-दोन भरणे) व लॉक करणे.
- यापूर्वी ऑप्शन फॉर्म भरला असल्यास त्यामध्ये बदल करता येतील.

**५ जानेवारी**

- प्रवेश फेरीअंतर्गत प्रवेशासाठी निवड, गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- प्रवेश फेरीचे कटऑफ संकेतस्थळावर दर्शविणे.

**६ ते ८ जानेवारी**

- विद्यार्थ्यांनी मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास प्रोसिड फॉर ॲडमिशन करणे.
- विद्यार्थ्यांनी मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.
- महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाइन निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारता येणे.
- सर्व तीनही कोटांतर्गत प्रवेश सुरू राहतील. व्यवस्थापन कोट्यासह इनहाऊस आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गत जागा येथून पुढे भरता येतील, तसेच त्यांचे प्रत्यार्पण करता येईल.

**८ जानेवारी**

- झालेले प्रवेश संकेतस्थळावर नोंदविण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ.

**९ जानेवारी -**

- प्रवेशाची विशेष फेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहणाऱ्या जागांचा तपशील जाहीर करणे. यामध्ये राखीव कोट्यांतून प्रत्यार्पित केलेल्या सर्व रिक्त जागांचाही समावेश असेल.

My Pune Edition
Jan 2, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

# शिक्षणमंत्र्यांचे आदेश केराच्या टोपलीत!

## टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीच्या इमारतीचे काम अद्याप अर्धवटच

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील बहुचर्चित टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीच्या इमारतीचे डिसेंबर महिन्यात उद्घाटन करू, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले होते. परंतु आता डिसेंबर संपत आला तरी ॲकॅडमीच्या इमारतीचे बांधकाम अर्धवट आहे. त्यामुळे उच्च शिक्षणमंत्र्यांच्याच आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. सामंत यांच्या आदेशाला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, तंत्रशिक्षण संचालनालय आणि उच्चशिक्षण संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असलेल्या आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (एमएसबीटीई) जागेत टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमी सुरु करण्यात येणार आहे. या ॲकॅडमीसाठी मॉडेल कॉलनीत सुसज्ज इमारत उभारण्यात येत आहे. मात्र, या इमारतीचे बांधकाम सहा वर्षांपासून रेंगाळले आहे. त्यामुळे या बांधकामाचा आढावा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ऑगस्ट महिन्यात घेतला. निम्म्याहून अधिक रक्कम देऊनसुद्धा त्याप्रमाणात कामच झाले नसल्यामुळे सामंत यांनी कंत्राटदार आणि बांधकाम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास खडसावले होते; तसेच काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या बैठकीत टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीचे उद्घाटन १ जानेवारीला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत होईल, असे जाहीर केले होते.

मात्र, प्रत्यक्षात इमारतीचे अजुनही बांधकामच सुरू आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी आणखी काही दिवस लागणार असल्याने, आता टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीच्या इमारतीचे उद्घाटन १ मे रोजी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कंत्राटदार आणि बांधकाम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकडून वसूल करावा, असे आदेश सामंत यांनी दिले होते. त्याची अंमलबजावणी झाली की नाही, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे.

इमारत उभारणीच्या २० कोटी रकमेपैकी १३ कोटी रुपये कंत्राटदाराला देण्यात आले असून, एमएसबीटीईकडून १६ कोटी रूपये या कामासाठी खर्च करण्यात येणार आहेत. या इमारतीत टिचर्स ट्रेनिंग ॲकडमी आणि राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे कार्यालय होणार आहे. सध्या एमएसबीटीईसाठी आवश्यक काम बंद असून टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीच्या कामाला प्राधान्य देण्यात येत आहे. या इमारतीत कॅन्टीन, निवासाची सोय आणि अद्ययावत स्टुडीओ तसेच परदेशी पाहुण्यांसाठी तीन व्हीव्हीआयपी रूम तयार करण्यात येणार आहे.

### इमारतीच्या आढाव्यासाठी शिक्षणमंत्र्यांचा गुप्तदौरा...

टिचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीचे बांधकाम दिलेल्या मुदतीत पूर्ण न झाल्याने सामंत यांनी तंत्रशिक्षण, एमएसबीटीई, उच्चशिक्षण तसेच बांधकामाशी संबंधित सर्वांची झाडाझडती घेतली. त्या वेळी बांधकाम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. परंतु या दौऱ्याबाबत कोणालाही सूचना न देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे उदय सामंत पुण्यात येऊन गेल्याची माहिती कोणालाही कळू नये यासाठी एमएसबीटीई तसेच तंत्रशिक्षण संचालनालय यांनी पुरेपूर काळजी घेतल्याचे दिसून आले.

Pune Edition
Jan 2, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# SPPU signs MoU with ICAI to bridge gap between theory, practical knowledge

**ALIFIYA KHAN**
PUNE, JANUARY 1

NOT KNOWING how to write a demand draft or what an expense statement audit entails are a few of the real-world problems which commerce graduates have to face, owing to the gap between theory lessons and practical applications.

*Finding a way to bridge the same, the Savitribai Phule Pune University (SPPU) has signed a* Memorandum of Understanding (MoU) with the Institute of Chartered Accountants of India (ICAI) to impart job skills to their students.

SPPU Vice Chancellor Dr Nitin Karmalkar said that this is also another way to counter the coming placement season, which is expected to be slower this year.

"The commerce faculty makes up forty percent of our students. We will have placements coming up and we all are anticipating a slowdown there, given the current job market conditions. Hence, we have recently signed a lot of MoUs with organisations for internships and job-related courses... They will help give an edge to our students. Often we see that commerce graduates don't even know the basics of banking, accounts and such. The ICAI has a country-wide network of professionals and getting our students placed under practising CAs will open more doors for them," he said.

Besides providing students with internship opportunities, the MoU aims at providing skill-oriented education to students, conducting faculty development programs for staff and enhancing skill sets of students through webinars and seminars.

CA Nihar Jambusaria said that while the MoU will help students work in companies while learning, it will also help practising CAs in pursuing post doctoral education.

The Indian Express 2.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

# विभागातील २.५ हजार विद्यार्थ्यांना 'स्वाधार'

## १० कोटी ४६ लाख रुपये खात्यात जम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०१७ पासून राबविली आहे. चालु वर्षात म्हणजेच सन २०१९-२०२० मध्ये पुणे विभागातील पाच जिल्ह्यांतील २ हजार ५०८ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आला आहे. त्या लाभापोटी विद्यार्थ्यांना थेट बँक खात्यात रुपये १० कोटी ४६ लाख ७५ हजार जमा करण्यात आले असल्याची माहिती प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण पुणे विभाग बाळासाहेब सोळंकी यांनी दिली आहे.

पुणे विभागात मागील कन्टिन्यू अर्ज (२०१८-१९), तसेच चालू वर्ष अर्ज (२०१९-२०) असे नोव्हेंबरअखेर एकूण निकाली २ हजार ५०८ अर्जांपैकी पुणे - १ हजार ३९१, सातारा ११०, सांगली - २६०, सोलापूर - २८४ व कोल्हापूर - ४६३ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. ११ वी, १२ वी व १२ वीनंतरच्या व्यावसायिक, तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

राज्यात सामाजिक न्या
विभागांतर्गत ४४१ शासकीय वसति
असून, त्यामध्ये २३४ मुलींची,
२०७ मुलांची वसतिगृहे आहे
दोन्ही मिळून विद्यार्थी ४१ हज
४८० आहेत. राज्यात दिवसेंदिव
वाढत असलेली व्यावसायिव
बिगरव्यावसायिक महाविद्यालयां
संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ
मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख
वाढत आहे. त्याप्रमाणे विद्यार्थ्यां
शासकीय वसतिगृह सुविधेचा जागेच
उपलब्धतेमुळे त्वरित लाभ देणे शव
होत नाही. त्यामुळे वसतिगृहात प्रवे
न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणि
नुकसान होऊ नये, म्हणून भोज
निवास व इतर शैक्षणिक सुविधा
विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करू
घेण्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँ
खात्यामध्ये थेट रक्कम या योजनेद्व
जमा केली जात आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवडमध
उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसा
प्रतिवर्षी ६० हजार रुपये, इतर महसू
विभागीय शहरातील व उर्वरित क व
महानगरपालिका क्षेत्रात उच्च शिक्ष
घेणाऱ्यांसाठी प्रतिवर्ष ५१ हजार रुपये
तर इतर जिल्ह्याच्या ठिकाणी उ
शिक्षण घेणाऱ्यांसाठी प्रतिवर्ष ४३ हज
रुपये याप्रमाणे बँक खात्यात लाभापो
जमा करण्यात येतात.

Pune Edition
Jan 2, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# FYJC ADMISSION: SPECIAL ROUND 2 SCHEDULE OUT

**Dheeraj Bengrut**

puneletters@htlive.com

**PUNE:** The detailed schedule of the special round 2 of the first year junior college (FYJC) Class 11 admissions for Pune was declared on Friday by the deputy director of education, Pune.

Earlier in the first, second and third regular rounds of the admissions, 40,013, 23,120 and 12,461 seats were allotted, respectively, by the education department.

As per the new schedule of special round 2, on January 1 at 10 am the vacancy list for admission in the special round will be displayed online, including quota seats surrendered by junior colleges.

The bifocal admission procedure for admitted students will now also start with a special round.

Upto January 4, 3 pm, application form (Part-1) edit and choice, or updating of option form (Part-2) for special round will be allowed online.

"Every student must give his/her consent to participate in this round. So check if option form is locked or not," said Dattatray Jagtap, director of secondary and higher secondary education department.

On January 5 at 6 pm junior college allotment list for special round 2 admissions will be displayed online. Accordingly, display of cut-off list for special admission round will be done and SMS will be sent to students. Then from January 6-8 students need to confirm admissions in the allotted colleges.

Finally on January 9 the vacancy list for after completion of this special round 2 will be displayed online.

Hindustan Times 2.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

# शिक्षणाचा रुतलेला गाडा सुरळीत करण्याचे आव्हान

## २०२१ अजेंडा पुणेकरांचा शिक्षण



गणेश खळदकर

पुणे : शिक्षण क्षेत्रात यंदा २०२१ साली नव्या दशकाची सुरुवात होत आहे. पुण्याचा शिक्षणाचे माहेरघर म्हणून नावलौकिक आहेच. तो नावलौकिक टिकवण्यासाठी शिक्षण क्षेत्रात काही आमूलाग्र बदलांची गरज आहे. यामध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी, ऑनलाइन शिक्षण, विद्यार्थ्यांची मागणी असलेले अभ्यासक्रम, त्याचबरोबर शालाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि शिक्षण क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करणे आदी आव्हाने पेलावी लागणार आहेत. तरच गेल्यावर्षी कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रातील रुतलेला गाडा सुरळीत करण्यात यश येणार आहे. त्यासाठीच २०२१ सालचा अजेंडा महत्त्वाचा ठरणार आहे.

राज्यात कोरोना प्रादुर्भावामुळे १४ मार्च २०२० मध्ये शिक्षणाला ब्रेक लागला तो नवीन वर्षात थोडासा सैल होताना दिसत आहे. परंतु, कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रातील तीन वर्षांवर मोठा दूरगामी परिणाम झाला आहे. मार्च महिन्यात कोरोनाचा शिरकाव झाल्यानंतर पहिल्यांदा प्राथमिक आणि माध्यमिक शाळा बंद करण्यात आल्या. त्यानंतर महाविद्यालये बंद करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असतानादेखील परीक्षा रखडल्या. कोरोनामुळे अगोदर परीक्षा होणार की नाही याचा संभ्रम निर्माण झालेला असताना प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर अखेर केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यादेखील बहुपर्यायी ऑनलाइन, ऑफलाइन घेण्यात आल्या. परीणामी विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करणे अडचणीचे ठरले आणि केवळ परीक्षांची औपचारिकताच पार पडली. त्यानंतर पुन्हा नवीन प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली. परंतु, २०२१ हे वर्ष सुरू झाले तरी अद्यापि वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया सुरूच आहे. त्यामुळे प्रवेशप्रक्रिया कधी पूर्ण होणार, नवीन वर्षाचा अभ्यासक्रम कधी पूर्ण होणार आणि संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षा कधी होणार असे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे सध्या कोरोनाचा अंदाज घेऊन तत्काळ शाळा, महाविद्यालये सुरू करण्याची गरज आहे. या सध्याच्या प्रश्नांबरोबर काही अमूलाग्र बदल होणेदेखील गरजेचे आहेत. हे बदल करण्यासाठी विविध उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण क्षेत्राचा एक वेगळा आराखडा तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे

### तंत्रशिक्षण संस्थांना उद्योगजगताशी जोडावे लागणार

एकीकडे नोकऱ्यांसाठी वणवण भटकणारे विद्यार्थी आहेत. तर दुसरीकडे उद्योगांमध्ये कौशल्याधिष्ठित कर्मचाऱ्यांची वाणवा आहे. परंतु, उद्योगजगताला आवश्यक ज्ञान विद्यार्थ्यांकडे नाही, तर विद्यार्थ्यांकडील ज्ञानाचा उद्योगजगताला उपयोग नाही. अशा कात्रीमध्ये उद्योजगत आणि तंत्रशिक्षणचे विद्यार्थी सापडले आहेत. त्यामुळे तंत्रशिक्षण संस्थांना उद्योगजगताशी जोडण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी पारंपरिक अभ्यासापेक्षा विद्यार्थ्यांना आता उद्योगधंद्यामध्ये थेट कौशल्यपूर्ण शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे. नववर्षात त्यादृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### ऑनलाइन शिक्षण वाढवावे लागणार

कोरोना काळात पारंपरिक शिक्षणापेक्षा ऑनलाइन शिक्षणाचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे यापुढील काळात कोरोनासारखी कोणतीही भीषण परिस्थिती निर्माण झाली तरी शिक्षणात कोणत्याही प्रकारचा खंड पडू नये आणि शिक्षण विस्कळीत होऊ नये यासाठी ऑनलाइन शिक्षणावर जास्तीत जास्त भर द्यावा लागणार आहे. ऑनलाइन शिक्षणामुळे केवळ चार भिंतींच्या आत शिकण्यापेक्षा हव्या त्या वातावरणात शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात ऑनलाईन शिक्षण पोहचत असल्यामुळे शिक्षकांनादेखील देशभरात किंबहुना जगभरात शिकवण्याची संधी प्राप्त होणार आहे. पुण्यातही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने इकोटेकची निर्मिती करून राज्यभरात महाविद्यालयांना पोहचवला आणि त्याद्वारे विद्यार्थ्यांना घरबसल्या कोरोनाच्या काळातही शिक्षण घेता आल्याचे दिसून आले.



### मागणी असणारे अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज

पुणे शहरात तब्बल १५ विद्यापीठे अस्तित्वात आहेत. परंतु, या विद्यापीठांमधून आजही अनेक कालबाह्य अभ्यासक्रम शिकवण्यात येत आहेत. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासक्रम शिकतात. परंतु, विद्यार्थ्यांना बौद्धिकदृष्ट्या किंवा अर्थार्जनाच्या दृष्टीनेदेखील फार फायदा होताना दिसत नाही. त्यामुळे सध्या शिकवण्यात येत असलेले कालबाह्य अभ्यासक्रम बंद करून विद्यार्थ्यांची मागणी असणारे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. यामध्ये आयटी क्षेत्र, मोबाईल टीव्ही गेमींग, आर्टीफिशीयल इंटेलीजन्स, सेवा क्षेत्रातील अभ्यासक्रम तयार करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत आहे.

### मराठी शाळांना उर्जितावस्था देण्याची गरज

एकीकडे केंद्र सरकारकडून मातृभाषेला प्राधान्य देण्यात येत आहे. त्यासाठी विविध प्रवेशपरीक्षा मातृभाषेतून विद्यार्थ्यांना देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु राज्यात मात्र मराठी शाळेपेक्षा इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे प्रमाण लक्षणीय वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठीपेक्षा इंग्रजीसह अन्य भाषांचे वर्चस्व वाढत असल्यामुळे मराठी शाळांना उर्जितावस्था देण्याची गरज निर्माण झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजित डिसले यांना नुकताच ग्लोबल टिचर प्राईझ पुरस्कार मिळाला आहे. त्यामुळे मराठी शाळेत शिकवणारा शिक्षक हा जागतिक पुरस्काराचा मानकरी ठरत असल्यामुळे मराठी भाषेतील शिक्षणाचा दर्जा आजही चांगला असल्याचे स्पष्ट होत असून तो आणखी सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. डिसले यांना मिळालेल्या पुरस्काराने मराठी शाळांना उर्जितावस्था देण्यासाठी बुस्ट मिळणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

### या वर्षात काय होणे गरजेचे आहे...

- तंत्रशिक्षण संस्थांना उद्योगजगताशी जोडावे लागणार
- ऑनलाइन शिक्षण वाढवावे लागणार
- मागणी असणारे अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज
- मराठी शाळांना ऊर्जितावस्था देण्याची गरज
- शालाबाह्य मुलांसाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज
- नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी तत्काळ गरजेची
- शिक्षण क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास गरजेचा
- शाळा, महाविद्यालये तत्काळ सुरू करावे लागणार

### शालाबाह्य मुलांसाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज

शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण मोफत आणि बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु, ऊसतोड कामगार, झोपडपट्टी किंवा आर्थिक दारिद्र्य असलेल्या कुटुंबातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर शालाबाह्य झाल्याचे दिसून येतात. केंद्र तसेच राज्य शासनाकडून शालाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी वेगवेगळ्या घोषणा केल्या जातात. परंतु, या सर्व घोषणा कागदावरच असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे शालाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे. शालाबाह्य मुलांचे प्रमाण कमी करण्यासाठी आता केवळ कागदोपत्री घोषणा उपयोगी नसून ठोस कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे.

### नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी तत्काळ गरजेची

भारतात तब्बल ३४ वर्षांनतर नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे.

▶▶ पान ३ वर

My Pune Edition
Jan 2, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

पुढारी

## शिक्षणाचा रुतलेला गाडा सुरळीत करण्याचे आव्हान



(पान १ वरून)

या धोरणात शिक्षणाचे ५+३+३+४ हे नवे सूत्र तयार करण्यात आले आहे.जागतिकस्तरावर आपल्या विकासाच्या अशा पल्लवित होत असताना भारत एक विकसित सार्वभौम राष्ट्र म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे आपल्या देशात शिक्षणाबाबतचा मागील पाच वर्षांपासून सुरू असलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा प्रवास आता तत्काळ अंमलबजावणीच्या दृष्टीने सुरू होणे गरजेचे आहे. १९६६ मध्ये कोठारी आयोगने शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) किमान ६ टक्के खर्च व्हावा, अशी शिफारस केली होती. परंतु, त्याची अंमलबजावणी अद्याप होऊ शकली नाही. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावर ६ टक्के खर्च व्हावा, असे आवर्जून म्हटले आहे. मागील ३८ वर्षांत शिक्षणाची सुमार गुणवत्ता, पदवीधारकांच्या हाती कौशल्ये नसणे, शिक्षांणामध्ये गळतीचे प्रमाण, शिक्षकांच्या योग्य मूल्यमापनाची प्रक्रिया नसणे, या सर्वच बाबींचा नवीन शैक्षणिक धोरण आणताना विचार करून प्रत्येक घटकाचा सांगोपांग विचार करण्यात आला आहे. त्यामुळे या धोरणाची तत्काळ अंमलबजावणी अपेक्षित आहे.

### शिक्षण क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास गरजेचा

पुण्याच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला तर पुण्याच्या अर्थव्यवस्थेत शिक्षण क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शहरात किंवा शहरालगत जेवढे उद्योग आहेत. तेवढ्या सर्व उद्योगांना मनुष्यबळ पुरविण्याचे काम शिक्षण क्षेत्रातून होते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात पायाभूत सुविधांची वाढ होणे गरजेचे आहे. दर्जेदार शैक्षणिक इमारती, पाश्चात्य अभ्यासक्रम शिकण्याची संधी, चांगल्या दर्जेदार वसतीगृहांची बांधणी, जगात मागणी असलेल्या तंत्रज्ञानासाठी आवश्यक मशिनरींची उपलब्धता आदी पायाभूत सुविधांचा विकास होणे गरजेचे आहे. तरच पाश्चात्य विद्यार्थ्यांबरोबर स्थानिक विद्यार्थ्यांनादेखील आधुनिक जगतासाठी आवश्यक शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

My Pune Edition
Jan 2, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# हिंमत दाखवा, महाविद्यालये सुरू करा!

धनंजय बिजले सकाळ

राज्यासह पुण्यातील महाविद्यालये कोरोनाचे कारण देत अद्याप बंदच आहेत. महाविद्यालयीन मुले बाहेर फिरायला, प्रवासाला, सिनेमाला, नाटकाला, मंदिरात, ट्रेकिंगला, हॉटेलात सर्वत्र बिनदिक्कत जाऊ शकतात. फक्त कॉलेजलाच जाऊ शकत नाहीत! यासारखा दुसरा विनोद नाही. यातून विद्यार्थ्यांचे अपरिमित शैक्षणिक नुकसान होत आहे.

नव्या वर्षांत पाऊल टाकताना कोरोना विषाणूचा विळखा थोडा सैल होवू लागल्याने सर्वांनाच हायसे वाटत आहे. त्यातच लवकरच कोरोनावरील लस उपलब्ध होण्याची दाट शक्यता असल्याने वातावरणातील ताण हलका होण्यास सुरुवात झाली आहे. राज्यात 'अनलॉक'ची प्रक्रिया गतिमान होऊनही आता बरेच दिवस उलटले असून, बहुतांश व्यवहारही नेहमीप्रमाणे सुरळीत झाले आहेत. ग्रामीण भागात शाळाही सुरू झाल्या आहेत, मात्र या 'न्यू नॉर्मल'मध्ये अजूनही एकच गोष्ट कडकडीत बंद आहे, ती म्हणजे महाविद्यालये. गेल्या वर्षी मार्चमध्ये महाविद्यालयांची



बंद झालेली कवाडे अजूनही उघडलीच नाहीत. सध्याच्या निराशाजनक वातावरणात केवळ ऑनलाइन शिक्षण सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे, मात्र त्याकडे पुरेशा गांभीर्याने लक्ष देण्यास कोणालाही वेळ नाही. पुण्यात सारे व्यवहार केव्हाच सुरू झाले असल्याने एव्हाना महाविद्यालये सुरू करण्यास हरकत नव्हती. मात्र, याबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्याने विद्यार्थी हवालदिल झाले आहेत. केवळ पुणे विद्यापीठाचा विचार केल्यास येथे सात लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यातील जवळपास चार लाख विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील आहेत. याशिवाय खासगी विद्यापीठांत शिकणाऱ्यांची संख्या वेगळीच. यावरून या विषयाच्या व्याप्तीचा आवाका यावा.

3/1/२०२१

पान ८ वर »

**हे अजून ऑनलाइनच...**

| | |
|---|---|
| १६८ पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये | १७७ जिल्ह्यातील शास्त्र, कला, वाणिज्य, महाविद्यालये |
| ७७ अभियांत्रिकी महाविद्यालये | १५५ एमबीए महाविद्यालये |
| ३३ फार्मसी | ६५ बीपीएड |

**७ लाख** घरातूनच शिकत असलेले महाविद्यालयीन विद्यार्थी


# हिंमत दाखवा, महाविद्यालये सुरू करा!


» पान १ वरून

## पाया कच्चा राहण्याचा धोका

मुळातच महाविद्यालयात शिकणारी मुले-मुली वयाने लहान नसतात. या विशीच्या पुढील मुलांना कोरोनाचा सजगपणे मुकाबला कसा करायचा, हे नक्कीच कळते याबाबत कोण्याच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हिंमत दाखवून तातडीने पाऊल टाकले पाहिजे. केवळ समित्या स्थापन करणे आणि बैठका घेणे अशा लालफितीच्या कारभारातून विद्यार्थ्यांचे भले होणार नाही. विद्यार्थ्यांना केवळ आणि केवळ ऑनलाइन शिक्षण देणे कितपत व्यवहार्य आहे, याचा विचार शिक्षण क्षेत्रातील धुरीणांनी, विद्यापीठातील निर्णय प्रक्रियेतील सर्वांनी गांभीर्याने आणि तत्काळ केलाच पाहिजे. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी थेट प्रयोगशाळेतील प्रॅक्टिकल खूपच महत्त्वाचे असते, हे कोणाला सांगण्याची गरज नाही. प्रॅक्टिकलशिवाय विज्ञानातील मूलभूत संकल्पना मुलांना समजणार कशा? शिवाय आपल्या परीक्षा पद्धतीतही प्रॅक्टिकलला महत्त्व आहेच. अशा वेळी केवळ ऑनलाइन शिक्षणातून मुलांना सारे काही समजेल, ही भाबडी आशा ठेवणे अतिशय चुकीचे आहे. यातून विद्यार्थ्यांचे अधिकच नुकसान होणार आहे.

महाविद्यालये बंद आहेत म्हणून मुले घरी बसली आहेत, असे मानणे स्वतःची व त्यांची फसवणूक करण्यासारखेच होईल. केवळ महाविद्यालयांची दारे बंद ठेऊन काही साध्य होणार नाही व विद्यार्थ्यांचा पाया कच्चा राहील.

## काळजी घ्या, सुरुवात करा

अकरावीचे प्रवेशही अजून अधांतरी आहेत. अशा वेळी दहावी उत्तीर्ण झालेल्यांनी अजून महाविद्यालयाचे तोंडही पाहिलेले नाही. हे कितपत योग्य आहे? एकदम महाविद्यालये सुरू करणे धोक्याचे आहे, हे मान्य केले तरी नियम व अटी घालून निम्म्या उपस्थितीत तरी ती सुरू केलीच पाहिजेत. किमान प्रॅक्टिकल सुरू व्हायलाच पाहिजेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रथम वर्ष अजूनही सुरू झालेले नाही. यामुळे पहिल्या वर्षाला प्रवेश घेतलेल्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याचा धोका आहे. ग्रामीण भागात शाळाही सुरू झाल्या आहेत, पण महाविद्यालये अजूनही बंदच आहेत, यासारखा दुसरा विनोद नाही! ग्रामीण भागात ९वी ते १२वी ची मुले शाळेत जातात; पण त्यांच्यापेक्षा मोठी मुली घरातूनच शिक्षण घेताहेत.

गेल्या वर्षी परिक्षांच्या काळात कोरोना आला. त्यावेळी त्याचा मुकाबला कसा करायचा हे नेमकेपणाने ठाऊक नव्हते. त्यामुळे त्यावेळी विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान समजण्यासारखे आहे. मात्र, आता परिस्थिती पूर्ण नियंत्रणाखाली आलेली आहे व शिवाय कोरोनाचा मुकाबला कसा करायचा याचेही भान शासकीय तसेच वैद्यकीय यंत्रणांसह सर्वसामान्यांनाही आलेले आहे. त्यामुळे योग्य ती काळजी घेत म्हणजे सोशल डिस्टन्सिंग, शरीराचे तापमान मोजण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करून तातडीने महाविद्यालये सुरू करण्याची हिंमत दाखवायला हवी, त्यातच विद्यार्थ्यांचे खरे हित आहे.

Sakaal 3.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# शिष्यवृत्तीचे ५७१ कोटी राज्याला मिळणार

## निधी देण्यास केंद्र सरकार राजी; सामाजिक न्याय विभागाच्या प्रयत्नांना यश

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. २ : केंद्र सरकारच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीबाबत प्रलंबित असलेल्या विविध राज्यांच्या मागणीला महाराष्ट्र सरकारच्या समाजकल्याण आयुक्तालयाच्या पुढाकाराने यश आले आहे. केंद्र सरकारकडून २०२०-२१ या आर्थिक वर्षात राज्य सरकारला ५७१ कोटी रुपये मिळणार आहेत.**

राज्यासह देशात केंद्र सरकार पुरस्कृत 'भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती'साठी निधीबाबत २०१७-१८ पासून प्रश्न प्रलंबित होता. केंद्र सरकारने या शिष्यवृत्तीच्या धोरणात बदल केल्यामुळे त्याचा फटका महाराष्ट्रासह विविध राज्यांना बसत होता. केंद्राची योजना असूनही केंद्राचा ६० टक्के निधी राज्याला मिळत नव्हता. त्यामुळे राज्याच्या तिजोरीतून सुमारे एक हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च होत होता. यासंदर्भात समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्य सरकारमार्फत केंद्राकडे प्रस्ताव सादर करून सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश प्राप्त झाले आहे.

केंद्र सरकारने मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा केंद्राचा हिस्सा राज्यांना उपलब्ध करून द्यावा, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत होता. राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने पुढाकार घेऊन केंद्राचा हिस्सा मिळावा, ही मागणी लावून धरली होती. या मागणीनुसार केंद्र सरकारने केंद्राचा हिस्सा उपलब्ध करून देणार असल्याचे आदेश जारी केले आहेत.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्याय विभागाचे मंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने केंद्र सरकारकडे मागणी लावून धरली होती. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. तसेच, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव श्याम तागडे यांच्या सूचनेनुसार समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, सहआयुक्त भारत केंद्रे यांच्यासह आयुक्तालयातील अधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. 3/1/2021

"मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचा अनुसूचित जातीच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ मिळावा, यासाठी सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी चालू शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता राज्यातील महाविद्यालयांनी आणि अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी सरकारच्या 'महाडीबीटी पोर्टल'वर ऑनलाइन अर्ज तत्काळ सादर करावेत. लाभार्थ्यांनी आपले बँक खाते आधार संलग्नीकृत करून घ्यावे.

– डॉ. प्रशांत नारनवरे, समाजकल्याण आयुक्त

Sakaal 3.1.2021

# १५ एप्रिलनंतर बारावीची, तर दहावीची परीक्षा १ मेनंतर

## शिक्षणमंत्र्यांची माहिती



मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – दरवर्षी फेब्रुवारी आणि मार्चमध्ये होणाऱ्या दहावी, बारावीच्या परीक्षा यंदा लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. कोरोनामुळे यंदा बारावीची परीक्षा १५ एप्रिलनंतर तर दहावीची परीक्षा १ मेनंतर होऊ शकते, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली.

कोरोनामुळे विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी करण्यासाठी दहावी, बारावीच्या परीक्षा उशिराने घेण्याचे संकेत याआधीच शिक्षणमंत्र्यांनी दिले होते. दरवर्षी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात बारावीची, तर मार्चच्या पहिल्या आठवड्यात दहावीची परीक्षा घेण्यात येते. मात्र, यंदा कोरोनामुळे शाळा, कॉलेजना ऑनलाइन हजेरी लावणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळावा, यासाठी परीक्षांचे आयोजन एप्रिल, मेमध्ये करण्यात येणार आहे.

Saamana 4.1.2021

# 'फेरपरीक्षेतील उत्तीर्णांना डिप्लोमासाठी संधी द्या'

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी-बारावीच्या फेरपरीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अद्याप जाहीर झाली नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेची अजूनही प्रतीक्षाच आहे. त्यामुळे डिप्लोमा प्रवेशासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्रवेश फेरी राबवण्याची मागणी संस्थाचालकांकडून करण्यात आली आहे.

दहावी व बारावीच्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रियेत सामावून घेतले जाते. त्यासाठी विशेष फेरी; तसेच समुपदेशन फेरी घेण्यात येते. त्यानुसार दहावीच्या पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी आयटीआय आणि अकरावीच्या प्रवेशप्रक्रियेत सामावून घेण्यात आले आहे. मात्र, दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची अजूनही संधी देण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर त्यांच्यासाठी समुपदेश फेरी राबवण्याची मागणी असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ नॉन एडेड इन्स्टिट्यूट्स इन रुरल एरिया या संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

### 'डीटीई'च्या निर्णयाकडे लक्ष

पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संधी न मिळाल्यास संस्थांतील अनेक जागा रिक्त राहातील. प्रवेश फेरी न घेतल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. या सर्वांचा विचार करून समुपदेशन फेरी आणि स्वतंत्र प्रवेश फेरी घ्यावी, असे प्रा. झोळ यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे 'डीटीई'कडून याबाबत कोणता निर्णय घेण्यात येतो, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

Maharashtra Times 4.1.2021

# News Paper Clippings During January 2021

## Section: Education

# आजपासून शाळा सुरू

**६६ शाळा सुरू करण्यास परवानगी**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३ -** करोनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून शहरातील सर्व शाळांची तपासणी होऊ शकली नाही. तसेच अनेक शिक्षकांचा करोना चाचणीचा अहवालही प्राप्त न झाल्याने अनेक शाळा बंद राहणार आहेत. मात्र, पहिल्या दिवशी म्हणजेच उद्यापासून (दि. ४) महापालिकेच्या ४४ आणि खासगी २२ अशा ६६ शाळा सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

राज्य सरकारने इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास मान्यता दिली आहे. राज्यभरातील शाळा सुरू झाल्या, पण पुण्यातील शाळा सुरू होऊ शकल्या नाहीत. यापूर्वी दोन वेळा शाळा सुरू करण्याचा निर्णय पुढे ढकलावा लागला. मात्र, तिसऱ्या वेळेस महापालिका प्रशासनाने ४ जानेवारीपासून शहरातील शाळा सुरू होणार असल्याचे सांगितले. शाळा सुरू करताना पालकांचे संमतीपत्र, शाळांनी केलेल्या उपाययोजना हा महत्त्वाचा भाग होता. महापालिकेच्या शाळेसह खासगी शाळांमधून पालकांकडून संमतीपत्र घेण्याचे काम अजूनही सुरूच आहे. शाळांमध्ये सॅनिटायझेशन, थर्मल गन, ऑक्सिमिटर, वर्गामधील बसण्याची व्यवस्था याचे नियोजन झाले आहे. पण शिक्षकांच्या करोनाच तपासणीचा अहवाल अद्याप मिळालेला (पान २ पहा) ▸▸



## २३,२२० पालकांची संमतीपत्र

विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यापूर्वी पालकांना संमतीपत्र सादर करणे अनिवार्य आहे. आत्तापर्यंत २३ हजार २२० पालकांनी संमतीपत्र दिले आहे. तर २ हजार २१३ शिक्षकांनी व ८४२ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी करोना चाचणीचा अहवाल सादर केला आहे. यामध्ये १३ शिक्षक आणि ७ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आलेला आहे, असे निदर्शनास आले आहे.

# आजपासून शाळा सुरू

नसल्याने शाळा सुरू करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे सहाय्यक प्रशासकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांच्या पथकामार्फत शाळांची तपासणी सुरू आहे. रविवारी (दि. ३) दुपारपर्यंत शहरातील ५२९ पैकी २३२ शाळांची तपासणी पूर्ण झाली आहे. यामध्ये महापालिकेच्या ४४ आणि खासगी १८८ शाळा आहेत. त्यापैकी महापालिकेच्या १०० टक्के आणि २२ खासगी शाळांना सोमवारपासून वर्ग सुरू करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश जगताप यांनी सांगितले.

**आठवडाभरात उर्वरित शाळांना परवानगी**

शहरात इयत्ता नववी ते बारावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालये बहुतांश इंग्रजी माध्यमाच्या आहेत. त्यांना गेल्या आठवड्यात नाताळाची सुट्टी असल्याने शाळा बंद होत्या. त्यामुळे मनपाच्या पथकास तेथे जाऊन तपासणी करता आलेली नाही. आता शाळा उघडल्याने त्यांची तपासणी होईल. तसेच शिक्षकांचे करोना तपासणीचे अहवाल सादर होतील. त्यामुळे येत्या आठवड्याभरात शहरातील अनेक शाळा सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

Prabhat: 4.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

## Section: Education

प्रशासनाची तयारी पूर्ण : महापालिकेच्या ४४ आणि खासगी २२ शाळांचा समावेश

### पुण्यातील ६६ शाळा आजपासून सुरू; पालक संभ्रमावस्थेत

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे महापालिका प्रशासनाने इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिल्याने शहरातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परंतु, सर्व नियमावली पूर्ण करणाऱ्या केवळ ६६ शाळांचीच घंटा सोमवारी वाजणार आहे. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाला कंटाळलेले काही विद्यार्थी शाळेत जाण्यास उत्सुक आहेत. मात्र, कोरोना संसर्गाच्या भीतीमुळे अजूनही काही पालक विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्याबाबत अनुकूल नसल्याचे दिसून येत आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मार्च २०२० पासून बंद असलेल्या पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळा सुरू होऊन एक महिना उलटून गेला. मात्र, कोरोना रुग्णांची संख्या कमी न झाल्यामुळे शहरातील शाळा सुरू करण्यास पालिका प्रशासनाकडून परवानगी मिळाली नव्हती. परंतु, पालिकेच्या परवानगीनंतर येत्या सोमवारपासून शहरातील शाळा सुरू होणार आहेत. त्यात पालिकेच्या ४४ व खासगी २२ शाळांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहेत.

कोरोनानंतर सुरू होणाऱ्या शाळांमध्ये पालकांनी संमती दिलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश द्यावा, अशी नियमावली शासनाने प्रसिद्ध केली आहे. त्याचप्रमाणे शाळा निर्जंतुकीकरणाबाबत खबरदारी घेण्याचेही निर्देश दिले आहेत.



पुणे महापालिका क्षेत्रातील नववी ते बारावीचे वर्ग सोमवापासून सुरू होणार असल्याने शाळांची स्वच्छता करण्यात आली.

पालिका प्रशासनाने ५२९ पैकी २५२ शाळांची पाहणी केली. प्राप्त झालेल्या अहवालानुसार सोमवारी ५० ते ६० शाळा सुरु होणार आहेत. सुमारे ८ हजार ५०० विद्यार्थ्यांपैकी ३,२०० विद्यार्थ्यांच्या पालकांनी संमतीपत्र दिले आहे. त्यामुळे पालिका हद्दीतील सुमारे ३० टक्के विद्यार्थीच सोमवारपासून शाळेत येणार आहेत.

– सुरेश जगताप, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

- पुणे महानगरपालिका प्रशासन व आरोग्य विभागाने शाळांना प्रत्यक्ष भेटी देवून पाहणी केली.
- त्यानंतर काही शाळा सुरू करण्यास परवानगी दिली आहे.

Lokmat 4.1.2021

### एप्रिल व मे महिन्यांत दहावी, बारावी परीक्षा?

मुंबई : केंद्रीय शिक्षणमंत्री रमेश पोखरियाल यांनी 'सीबीएसई'च्या दहावी, बारावी परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. यानंतर राज्य शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी दहावीची परीक्षा तीन मेनंतर आणि बारावीची परीक्षा पंधरा एप्रिलनंतर घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली.

करोनामुळे यंदा शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक कोलमडले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले. तर, मुंबई आणि परिसर वगळता राज्यातील इतर भागात नववी ते



बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. प्रत्यक्ष शाळा सुरू नसल्या, तरी विद्यार्थी आणि पालकांचे परीक्षा कधी होणार, याकडे लक्ष होते. या पार्श्वभूमीवर दहावीची परीक्षा तीन मेनंतर आणि बारावीची परीक्षा पंधरा एप्रिलनंतर घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती शिक्षणमंत्र्यांनी दिली.

Maharashtra Times 4.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## एमफिल, पीएचडीच्या प्रबंधासाठी मुदतवाढ

**पुणे :** करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएचडी आणि एमफिलचा शोधनिबंध सादर करण्याची तारीख ३० जून २०२१ पर्यंत वाढविण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या निर्णयाचे परिपत्रक प्रसिद्ध केले असून, त्याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आदेश शैक्षणिक विभागांना आणि संशोधन केंद्रांना दिले आहेत.

लॉकडाउनच्या काळात पीएचडी आणि एमफिलच्या विद्यार्थ्यांना संशोधनात अडचणी आल्याने, शोधनिबंध तयार करता आला नाही. याबाबत 'यूजीसी'कडे तक्रारीदेखील करण्यात आल्या होत्या. देशातील एकूणच परिस्थितीचा आढावा घेतल्यावर 'यूजीसी'ने सहा महिन्यांची मुदतवाढ जाहीर केली होती. त्यानुसार ३० जून २०२० पर्यंत शोधनिबंध सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. 'यूजीसी'च्या सूचनेनुसार आता विद्यापीठाने ३१ डिसेंबर २०२०पर्यंत शोधनिबंध सादर करण्याची मुदत असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सहा महिन्यांची (३० जून २०२१) मुदतवाढ मिळाली आहे. पब्लिकेशन्स दोन कॉन्फरन्समध्ये सादरीकरण करण्याची मुभा दिली आहे. या निर्णयाचा फायदा संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे. एमफिल/पीएचडीसाठी फेलोशिपचा कालावधी पाच वर्षांचाच ग्राह्य धरण्यात आला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उपकुलसचिवांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

Maharashtra Times 4.1.2021

## तब्बल नऊ महिन्यांनी आज शाळा उघडणार

### शहरातील ५२९ पैकी २३२ शाळांची तपासणी पूर्ण

**पुणे, ता. ३ :** तब्बल नऊ महिन्यांनंतर शहरातील सर्वच शाळा आज (ता. ४) सुरू होतील, अशी अपेक्षा होती. मात्र, महापालिकेकडून सर्वच शाळांची तपासणी होऊ शकली नाही. तसेच, अनेक शिक्षकांचा कोरोना चाचणीचा अहवाल न झाल्याने अनेक शाळांचे टाळे कायम राहणार आहे. दरम्यान, आज महापालिकेच्या ४४ आणि खासगी २२ शाळा सुरू करण्यास परवानगी दिली असली तरी काही खासगी शाळा सुरू होतील की नाही, याबाबत अनिश्चितताच आहे.

राज्य सरकारने इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास मान्यता दिली आहे. राज्यातील शाळा सुरू झाल्या; मात्र, विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातील शाळा सुरू होऊ शकल्या नाहीत. यापूर्वी दोन वेळा शाळा सुरू करण्याचा मुहूर्त पुढे ढकलावा लागला. मात्र, तिसऱ्या वेळेस महापालिका प्रशासन ४ जानेवारीपासून शहरातील शाळा सुरू करण्यावर ठाम राहिले. शाळा सुरू करताना पालकांचे संमतिपत्र, शाळांनी केलेल्या उपाययोजना, हा महत्त्वाचा भाग होता. महापालिकेच्या शाळांसह खासगी शाळांमध्ये पालकांकडून संमतिपत्र घेण्याचे काम अद्यापही सुरूच आहे. शाळांमध्ये सॅनिटायझेशन, थर्मल गन, ऑक्सीमिटर, वर्गामधील बसण्याची व्यवस्था याचे नियोजन झाले आहे. मात्र, काही शिक्षकांच्या कोरोना तपासणीचा अहवाल मिळाला नसल्याने संबंधित शाळा सुरू करण्यास परवानगी दिली नाही.

महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे सहाय्यक प्रशासकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांच्या पथकामार्फत शाळांची तपासणी सुरू आहे. रविवारी (ता. ३) दुपारपर्यंत शहरातील ५२९ पैकी पान ६ वर »

**आठवड्यात इतर शिक्षकांचेही अहवाल मिळणार**

शहरात नववी ते बारावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालये आहेत. यात बहुतांश इंग्रजी माध्यमाच्या शाळा असल्याने त्यांना गेल्या आठवड्यात नाताळाची सुटी असल्याने त्या बंद होत्या. त्यामुळे महापालिकेच्या पथकास तेथे जाऊन तपासणी करता आली नाही. आता शाळा उघडल्याने त्यांची तपासणी होईल. तसेच, शिक्षकांचे कोरोना तपासणीचे अहवालही सादर होतील. त्यामुळे येत्या आठवड्यात शहरातील अनेक शाळा सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात येईल, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**अनेक महिन्यांनंतर कॉलेजमध्ये जायला मिळणार असल्याने आनंद झाला आहे. कॉलेजमध्ये जाण्याची भीती नाही; पण काळजी घेतली पाहिजे. तसेच, थेट वर्ग सुरू झाल्याने आमचे प्रॅक्टिकलही सुरू होईल, हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे.**
**- सिद्धेश कदम,** विद्यार्थी, इयत्ता बारावी

## तब्बल नऊ महिन्यांनी आज शाळा उघडणार

» पान १ वरून

२३२ शाळांची तपासणी पूर्ण झाली. यामध्ये महापालिकेच्या ४४ आणि खासगी १८८ शाळा आहेत. त्यापैकी महापालिकेच्या १०० टक्के आणि खासगी २२ शाळांना सोमवारपासून वर्ग सुरू करण्याची परवानगी दिली आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश जगताप यांनी सांगितले.

**२३ हजार पालकांनी दिले संमतिपत्र**

विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यापूर्वी पालकांना संमतिपत्र सादर करणे अनिवार्य आहे. आतापर्यंत २३ हजार २२० पालकांनी संमतिपत्र दिले आहे. दोन हजार २१३ शिक्षक व ८४२ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कोरोना चाचणीचा अहवाल सादर केला आहे. यामध्ये १३ शिक्षक आणि सात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे.

Sakaal 4.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# खासगी विद्यापीठे वाऱ्यावर

## 'यूजीसी'च्या समितीकडून राज्यातील १८ पैकी चारच विद्यापीठांची पाहणी

मटा विशेष

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @harshdudhe_MT

"सुरुवातीचे काही महिने वगळले, तर गेल्या वर्षी देशात करोनाचा प्रादुर्भाव अधिक होता. त्यामुळे 'यूजीसी'च्या 'एक्स्पर्ट कमिटी'ला शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, कॉलेजांना भेटी देता आल्या नाहीत. आता ही प्रक्रिया पुन्हा सुरू होईल.
- **डॉ. भूषण पटवर्धन**, उपाध्यक्ष, 'यूजीसी'

### 'मोदी युनिव्हर्सिटी' दाखवली महाराष्ट्रात

'यूजीसी'ने खासगी विद्यापीठांच्या यादीत मोदी युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी महाराष्ट्रात दाखविली आहे. याबाबतची माहितीही वेबसाइटवर प्रकाशित करण्यात आली आहे. प्रत्यक्षात हे विद्यापीठ राजस्थानातील सिकर जिल्ह्यात आहे. त्यामुळे 'यूजीसी'ला वेबसाइटसोबतच देशातील विद्यापीठे, कॉलेज आदींची माहिती अपडेट करण्याची आवश्यकता आहे.

पुणे : राज्य सरकारने परवानगी दिलेली एकूण १८ खासगी विद्यापीठे राज्यात आहेत. मात्र, यापैकी केवळ चारच विद्यापीठांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) तज्ज्ञ समितीने भेट देऊन पाहणी केली आहे, तर उर्वरित १४ विद्यापीठांना मनमानी कारभार करण्यासाठी 'यूजीसी'ने अप्रत्यक्ष मोकळीकच दिली असल्याचे चित्र आहे. या १० विद्यापीठांच्या प्रशासनाने 'यूजीसी'कडे माहिती दिली नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे राज्यातील खासगी विद्यापीठांमध्ये शैक्षणिक प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

राज्यात सरकारच्या परवानगीने २०१४ पासून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १८ खासगी विद्यापीठे स्थापन करण्यात आली. यापैकी १० विद्यापीठे पुणे जिल्ह्यात असून, त्यांची शैक्षणिक प्रक्रिया सुरू आहे. राज्यात खासगी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर, संबंधित विद्यापीठाची माहिती 'यूजीसी'ला प्रत्यक्ष पाहणीसाठी द्यावी लागते. विद्यापीठाने माहिती दिल्यानंतर, 'यूजीसी'कडून शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा तपासण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात येते. त्यानंतर ही समिती विद्यापीठाला भेट देऊन, शैक्षणिक सोयीसुविधा, शैक्षणिक संकुल, वसतिगृह आदींची पाहणी करते. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्याशी संवाद साधून, विद्यापीठाबाबतचा अहवालही 'यूजीसी'कडे पाठविण्यात येतो. मात्र, सध्या ही प्रक्रियाच पूर्णपणे ढेपाळली आहे. १८ खासगी विद्यापीठांपैकी केवळ चार विद्यापीठांनाच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तज्ज्ञ समितीने भेट देऊन पाहणी करून, आपला अहवाल दिला आहे. या विद्यापीठांपैकी १० विद्यापीठांच्या प्रशासनाने 'यूजीसी'कडे माहितीच दिलेली नाही. त्यामुळे 'यूजीसी'ला 'एक्स्पर्ट कमिटी' स्थापण्यात अडचणी येत आहेत. मात्र, या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यावर होण्याची शक्यता आहे; तसेच विद्यापीठांच्या मनमानी कारभाराविरोधात कोणतीच तक्रारही करता येणार नाही.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठे व 'यूजीसी'कडून ही प्रक्रिया पार पडलेली नाही, असे 'यूजीसी'कडून सांगण्यात आले आहे. मात्र, यातील काही विद्यापीठांची स्थापना २०२०पूर्वी झाली आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांकडून तपसणीसाठी जाणीवपूर्वक बगल दिली जात असल्याची शक्यता शैक्षणिक तज्ज्ञांकडून वर्तविली जात आहे. या खासगी विद्यापीठांवर 'यूजीसी'कडून कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येते, याकडे तज्ज्ञांचे लागले आहे.

Maharashtra Times 4.1.2021

# अनुसूचित विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याचे आवाहन

**पुणे, ता. ३ :** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १५ जानेवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज भरावेत, असे आवाहन समाज कल्याण आयुक्तालयाने केले आहे.

महाडीबीटी पोर्टलद्वारे अनुसूचित जातीच्या पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यावर थेट वितरित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना योजनांचे अर्ज ऑनलाइन भरण्यासाठी सहकार्य करावे. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन भरलेल्या अर्जांची छाननी करावी. तसेच, पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त यांच्याकडे ऑनलाइन पाठवावेत.

विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर ही लाभाची रक्कम जमा केल्यावर डीबीटी पोर्टलद्वारे प्रत्येक महाविद्यालयास दिली जाईल. त्यामुळे संबंधित विद्यापीठ, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि तंत्रनिकेतन यांनी कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेऊ नये. विद्यार्थ्यांची पिळवणूक होऊ नये, याबाबत खबरदारी संस्थांनी घ्यावी, असे आदेश समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिले आहेत. **संकेतस्थळ** : https://mahadbtmahait.gov.in

**अडचण आल्यास टोल फ्री क्रमांक :** ०२२-४९१५०८००

Sakaal 4.1.2021

# कॉलेजे ११ जानेवारीपासून

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय**

मटा इम्पॅक्ट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

### ही कॉलेज सुरू होणार

- अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, हॉटेल मॅनेजमेंट, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण, विधी आणि तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमांची द्वितीय वर्ष आणि त्या पुढील वर्षांचे वर्ग
- कला, विज्ञान, वाणिज्य, समाजशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, पत्रकारिता आणि संज्ञापन अशा अभ्यासक्रमांचे द्वितीय वर्ष आणि त्यापुढील वर्ग

प्रत्यक्ष होऊ द्या प्रात्यक्षिक

पुण्यातील कॉलेजे ११ जानेवारीपासून 'अनलॉक' होणार आहेत. कॉलेज सुरू झाल्यानंतर प्रात्यक्षिकांवर भर देण्यात येणार आहे. गर्दी टाळण्यासाठी सम-विषम सत्रांप्रमाणे (सेमिस्टर्स) विभागणी करण्यात आली आहे. विषम सत्राची परीक्षा झाल्यानंतर प्रत्यक्ष अध्यापन (थिअरी) सुरू होईल.

महाविद्यालये समक्ष सुरू करण्याबाबत विद्यापीठाने नेमलेल्या प्रा. डॉ. व्ही. बी. गायकवाड समितीने सोमवारी अहवाल कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांना सादर केला. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. किमान प्रात्यक्षिकांसाठी तरी महाविद्यालये सुरू करावीत, यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स'ने 'अविद्येचे प्रात्यक्षिक' या वृत्तमालिकेच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. त्यानंतर विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे.

विषम सत्राच्या परीक्षानंतर प्रत्यक्ष वर्ग सुरू करता येतील. याच धर्तीवर पदवी अभ्यासक्रमांचेही नियोजन करण्यात आले आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे प्रवेश प्रक्रिया न राबवलेल्या पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी, बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे थिअरी आणि प्रात्यक्षिक वर्ग ११ जानेवारीपासून सुरू होतील. प्रवेश प्रक्रिया राबवलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षांचे ऑफलाइन वर्ग सक्षम प्राधिकरणाने जाहीर केलेल्या तारखांनुसार सुरू होतील.

Maharashtra Times 5.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये ११ जानेवारीपासून सुरू

### प्रात्यक्षिक, प्रकल्प करण्याची मुभा; प्रत्यक्ष अध्यापन सत्र परीक्षेनंतर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिके, प्रकल्पांसाठी विद्यार्थ्यांना ११ जानेवारीपासून महाविद्यालयात जाता येणार आहे. तर महाविद्यालयांतील प्रत्यक्ष अध्यापन विषम सत्र परीक्षा झाल्यानंतर सुरू होणार आहे.

महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू करण्याबाबत विद्यापीठाने डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. सोमवारी झालेल्या बैठकीनंतर समितीने आपला अहवाल कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना सादर केला. त्यानंतर विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत मार्गदर्शक सूचना परिपत्रकाद्वारे जाहीर केल्या. त्यात पदव्युत्तर पदवी, पदवीपूर्व आणि प्रथम वर्ष अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, हॉटेल मॅनेजमेंट, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण, विधी आणि तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्ष आणि त्या पुढील वर्गातील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक, प्रबंध आणि प्रकल्पांसाठी ११ जानेवारीपासून महाविद्यालयात जाता येईल. कला, विज्ञान, वाणिज्य, समाजशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, पत्रकारिता आणि संज्ञापन अशा बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्ष आणि त्या पुढील वर्गातील विद्यार्थ्यांनाही ११ जानेवारीपासून त्यांचे प्रात्यक्षिक, प्रकल्प, प्रशिक्षण सुरू करता येईल. विषम सत्राच्या परीक्षांनंतर प्रत्यक्ष वर्ग सुरू करता येतील. या पद्धतीनेच पदवीपूर्व स्तरावरील अभ्यासक्रमांचेही नियोजन करण्यात आले आहे. एम.फिल. आणि पीएच.डी. च्या ऑफलाइन संशोधनाचे कामही ११ जानेवारीपासून सुरू करता येणार आहे.

महाविद्यालये सुरू करताना विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि स्थानिक प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या आणि संपण्याच्या नियोजनात कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

**प्रथम वर्षाबाबत...**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) प्रवेश प्रक्रिया न राबवलेल्या पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे थिअरी आणि प्रात्यक्षिक वर्ग ११ जानेवारीपासून सुरू होतील. तर सीईटी सेलतर्फे प्रवेश प्रक्रिया राबवलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे ऑफलाइन वर्ग सक्षम प्राधिकरणाने जाहीर केलेल्या तारखांनुसार सुरू होतील.

लोकसत्ता Tue, 05 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57513771

## दि. ११ जानेवारीपासून महाविद्यालयेही 'रिस्टार्ट'

**प्रभात वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिपत्रक प्रसिद्ध**

पुणे, दि. ४ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित पारंपरिक महाविद्यालये येत्या ११ जानेवारीपासून सुरू होणार आहेत. पहिल्या सत्रातील शिक्षण ऑनलाइनद्वारे बहुतांशपणे पूर्ण झालेले आहेत. त्यातील प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी ही महाविद्यालये सुरू होणार आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या करोनाच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालये सुरू होणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये सुरू करण्यासाठी प्राचार्य व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीची सोमवारी विद्यापीठात बैठक झाली. त्यानंतर महाविद्यालये प्रत्यक्षपणे सुरू करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले.

पदवी आणि पदव्युत्तरस्तरावरील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट आणि शोधप्रबंध पूर्ण करणे शक्य होणार आहे. त्यानंतर पहिल्या सत्रातील परीक्षा होतील.

**'व्यावसायिक' अभ्यासक्रम महाविद्यालयेही लवकरच**

अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, एमबीए या सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया अजून सुरू आहे. या व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरू होण्यास आणखी कालावधी लागणार आहे. मात्र अन्य महाविद्यालये येत्या ११ जानेवारीपासून प्रत्यक्षात सुरू होतील, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

Prabhat 5.1.2021

## महाविद्यालयांची बेल सोमवारपासून

### पुणे विद्यापीठाचा निर्णय; कॅम्पसमध्ये नियमांचे पालन आवश्यक

हिंमत दाखवा, महाविद्यालये सुरू करा!



**पुणे, ता. ४ :** गेल्या महिनाभरापासून महाविद्यालये सुरू कधी होणार याची प्रतीक्षा लागली असताना आता ११ जानेवारीपासून सर्व अभ्यासक्रमांचे थेट वर्ग आणि प्रॅक्टिकल सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे वर्ग सुरू करताना विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि राज्य शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करावे, असा आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिला आहे.

पुणे विद्यापीठाने प्राचार्य व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. या समितीने शिफारशी व महाविद्यालये सुरू करण्याचा अहवाल कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना सादर केला आहे.

इंजिनिअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, व्यवस्थापन, हॉटेल मॅनेजमेंट, शैक्षणिक, शारीरिक शिक्षण, विधी, बीएस्सी, एमएससी आदी अभ्यासक्रमांचे प्रथम सत्राचे प्रॅक्टिकल ११ जानेवारीपासून सुरू होतील. तसेच कला, वाणिज्य, समाजशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, पत्रकारिता यांसह इतर अभ्यासक्रमांचे प्रॅक्टिकल, प्रकल्प याच तारखेपासून सुरू करता येतील. सध्या ज्या अभ्यासक्रमांची विद्यार्थी संख्या ५० पेक्षा कमी आहे, अशांचे प्रत्यक्ष वर्ग देखील होतील. एमफील, पीएचडीचे काम ऑफलाइन सुरू ठेवण्यात येईल.

**प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्याची प्रतीक्षा**

विद्यापीठाने ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी दिली आहे. पण इंजिनिअरिंग, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट यांसह इतर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सीईटी सेलमार्फत राबविली जात आहे. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सक्षम संस्थांनी जाहीर केलेल्या तारखांनुसार थेट शिकवणी व प्रॅक्टिकल पूर्ण करावेत, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

**प्रथम सत्राच्या परीक्षेनंतर लगेच द्वितीय वर्ष**

प्रथम सत्राच्या परीक्षा संपल्यानंतर विद्यापीठातील विभाग व संलग्न महाविद्यालयांनी त्वरित दुसऱ्या सत्राचे थेट वर्ग घेण्यास सुरुवात करावी. यासाठी 'यूजीसी', राज्य सरकार यांच्या नियमावलीचे पालन करावे, तसेच स्थानिक प्रशासनाची परवानगी घ्यावी असे आदेशात नमूद केले आहे.

Sakaal 5.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## SPPU AFFILIATED COLLEGES TO START OFFLINE PRACTICALS FROM JAN 11

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** According to a circular issued by the Savitribai Phule Pune University (SPPU) administration on Monday, senior colleges related to SPPU will start their offline practicals from January 11.

In an effort to avoid crowding of students at colleges campuses, an odd-even division of semester has been done. Once the exams of the odd semester are completed then theory lectures for students will start.

In order to start colleges, SPPU appointed a committee headed by Dr V B Gaikwad. The committee submitted its report to SPPU vice chancellor Dr Nitin Karmalkar. After studying the committee's report, the SPPU administration issued a circular about starting colleges from January 11.

The practical, dissertation and offline programs will start from January 11 for post-graduate courses of engineering, architecture, pharmacy, management, hotel management, education, physical education, law and other courses from second year onwards.

While for undergraduate courses and M.Phil and Ph.D, offline related work will also start from January 11. The guidelines issued by University Grants Commission (UGC) and the state government should be strictly followed, the circular said.

### UGC GUIDELINES SHOULD ALSO BE STRICTLY FOLLOWED

Hindustan Times 5.1.2021

## बारावी परीक्षेच्या अर्जांसाठी मुदतवाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे ऑनलाइन अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. नियमित शुल्कासह विद्यार्थ्यांना १८ जानेवारीपर्यंत अर्ज भरता येतील.

राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. या पूर्वी मंडळाने ऑनलाइन अर्जांसाठी १५ डिसेंबर ते ४ जानेवारी अशी मुदत दिली होती. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या नियमित विद्यार्थ्यांसह व्यवसाय अभ्यासक्रम, पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणी सुधार आणि तुरळक विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचेही अर्ज १८ जानेवारीपर्यंत भरता येतील. कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन डाऊनलोड करून चलनाद्वारे बँक शुल्क भरण्यासाठी १५ ते २५ जानेवारी अशी मुदत आहे.

लोकसत्ता Tue, 05 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57518470

## पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये ११ जानेवारीपासून उघडणार

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित पारंपरिक महाविद्यालये दि. ११ जानेवारीपासून सुरू होणार आहेत. पहिल्या सत्रातील शिक्षण ऑनलाइनद्वारे बहुतांशपणे पूर्ण झालेले आहेत. त्यातील प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी ही महाविद्यालये सुरू होणार आहेत. विद्यापीठ अनुदान मंडळ आणि राज्य शासनाच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाविद्यालये सुरू होणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये सुरू करण्यासाठी प्राचार्य व्ही.बी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीची नुकतीच बैठक पार पडली. त्यानंतर महाविद्यालये प्रत्यक्षपणे सुरू करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले. पदवी आणि पदव्युत्तरस्तरावरील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके, प्रकल्प आणि शोधनिबंध पूर्ण करणे शक्य होणार आहे. त्यानंतर पहिल्या सत्रातील परीक्षा होतील. अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, आर्किटेक्चर, एमबीए या सारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया आणखी सुरू आहे. या व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालय सुरू होण्यास आणखी कालावधी लागणार आहे. मात्र, अन्य महाविद्यालये येत्या ११ जानेवारीपासून प्रत्यक्षात सुरू होणार आहेत, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

Kesari 6.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## सुधारित गुणपत्रिकेअभावी प्रवेश धोक्यात

**पुणे, ता. ५ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बी. कॉम.चा निकाल जाहीर केला. परंतु, त्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत चुका आहेत. त्यामुळे फेरनिकाल जाहीर केला. मात्र, विद्यार्थ्यांना अद्याप गुणपत्रिका मिळालेली नसल्याने पदव्युत्तर पदवीच्या प्रवेशापासून हे विद्यार्थी वंचित राहण्याची भीती आहे, विद्यापीठाने त्वरित गुणपत्रिका उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे केली आहे.

विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाची परीक्षा घेतली. १२ नोव्हेंबर रोजी बी.कॉमचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांच्या निकालात त्रुटी असल्याने त्यांनी फेरनिकाल लावण्याची मागणी विद्यापीठाकडे केली. विद्यापीठाने निकाल पुन्हा व्यवस्थित तपासून ऑनलाइन निकाल जाहीर केला.

या विद्यार्थ्यांना एमबीएसह इतर अभ्यासक्रमासाठी फक्त दोन दिवस शिल्लक आहेत. अशा स्थितीत त्यांना अद्याप गुणपत्रिका मिळालेल्या नसल्याने हे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यापीठाने त्वरित सुधारित गुणपत्रिका उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी अधिसभा सदस्य संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, शशिकांत तिकोटे यांनी कुलगुरूंकडे केली आहे.

Sakaal 6.1.2021

## मोजक्या महाविद्यालयांच्या अहवालावरून परीक्षा नको

### विद्यापीठाच्या अधिसभेत मांडणार ठराव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आदिवासी व ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना स्मार्ट फोन, इंटरनेट अभावी ऑनलाईन शिक्षण घेता आले नाही. पहिल्या सत्रातील परीक्षेचा अभ्यासक्रमही माहीत नाही. केवळ मोजक्या संस्था व महाविद्यालयांच्या अहवालावरून परीक्षेची तारीख जाहीर करू नये. सर्व घटकांतील विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, असा ठराव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत मांडला जाणार आहे. तसेच, वर्षभराच्या परीक्षा एकाच वेळी घेण्याचा ठरावही मांडला आहे.

विद्यापीठाची अधिसभा ९ व १० जानेवारी रोजी होणार आहे. या अधिसभेमध्ये सदस्यांनी मांडलेल्या प्रस्ताव व ठरावांची कार्यक्रमपत्रिका प्रसिध्द केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदस्यांनी विविध ठराव मांडले आहेत. प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख यांनी परीक्षेसाठी समिती नेमण्याचा ठराव मांडला आहे. काही संस्था व महाविद्यालयांच्या अहवालानुसार निर्णय घेऊ नये, असे त्यांनी म्हटले आहे. तर यावर्षीची परीक्षा एप्रिल व मे २०२१ मध्ये एकत्रित घ्यावी व सत्रानुसार प्रश्नपत्रिकेचे दोन भाग करावेत, त्यानुसार गुणपत्रिकेवर गुणदान करता येईल, असा ठराव डॉ. पंकज मिनियार यांनी मांडला आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क नाममात्र घेण्यात यावे, अशी शिफारस दादाभाऊ शिनलकर यांनी केली आहे. तर, संतोष ढोरे यांनी वसतिगृह शुल्क माफ करावे किंवा यापूर्वी घेतले असल्यास परत द्यावे, असा ठराव मांडला आहे. हे चारही ठराव विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

Lokmat 6.1.2021

## SPPU senate meeting to be held offline

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** The Savitribai Phule Pune University (SPPU) will be holding a two-day offline senate meeting on January 9 and 10. It will be the first physical senate meeting by SPPU post-lockdown. Earlier, in the month of August, an online senate meeting was held.

While the agenda for the forthcoming senate meeting has been released by SPPU, the senate members have given their points of demand and issues to be discussed in the senate.

"We are fully prepared for conducting the offline senate meeting on January 9 and 10. Various issues will be discussed in this meeting as we are now going towards opening up of colleges in a phase-wise manner. Also, demands and issues raised by the senate members will be discussed and accordingly further decisions on it will be taken. It is the first physical senate meeting we are holding post lockdown and senate members from all the three districts, Pune, Nashik and Ahmednagar will be present for it," said SPPU vice-chancellor Dr Nitin Karmalkar.

> We are fully prepared for conducting the offline senate meeting on January 9 and 10.
>
> **NITIN KARMALKAR,** SPPU vice-chancellor

Sudhakar Jadhavar, SPPU's management council member and part of the senate meeting said, "This senate meeting has a lot of importance looking at the Covid-19 pandemic. Several issues related to students, academics and faculty recruitment will be discussed in it. We will be taking extra precautions while conducting it, proper social distancing will be maintained and PPE kits will be given to members who will be attending it."

Hindustan Times 6.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# Allow changes in view of virus, says SPPU senate body

## Members propose exam fee cut, helplines to assist pupils

Sukhada.Khandge @timesgroup.com

TWEETS @Sukhadak_Mirror



FILE PHOTO

SPPU senate meet is due on Jan 9-10

With Savitribai Phule Pune University's (SPPU) senate meeting scheduled on January 9 and 10, members of the governing body have suggested various measures around the coronavirus pandemic in view of the issues faced by students during the course of the ongoing health scare.

Since colleges and universities were forced to discontinue physical classes from March last year, the shutdowns brought about a sea change in the way education was imparted traditionally and examinations were held, with both processes going online. Keeping the sudden changes in mind, senate members have raised various concerns and demanded that the varsity bring in some alterations to tackle the issues.




Talking about the appeals, SPPU senate member Ravaji Deshmukh said, "I have proposed that the varsity increase the funds sanctioned to support students through various policies and programmes. With classes and evaluation systems going digital, it is important to include rural colleges in this purview, so that students don't face glitches in attending online classes."

State member Dadabhau Sinalkar added, "In light of the financial setbacks faced by many families, I feel that exam fees should be slashed for the next academic year."

Sinalkar said, "Students whose parents have faced funds crunch should be provided concessions and scholarships so that their studies are not discontinued."

Considering that pupils have been getting remote education, with everything from admissions to exams going online, senate members also proposed that SPPU improve the helpline facilities to attend to students' complaints.

Backing the upgraded call centre proposal, senate member Santosh Dhore suggested, "Since students cannot go to the varsity now, call centre services should be improved to assist them remotely."

MG Chaskar, dean, science and technology department, SPPU, informed that a committee is working to evaluate the problems faced by the students during the pandemic and suggest changes accordingly.

Senate members feel that if due consideration is taken of their suggestions, glitches and crises related to online education could be avoided in the future.

Pune Mirror 6.1.2021

पुढारी

# विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात ३० टक्के कपात करण्याचा ठराव

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सिनेट येत्या ९ आणि १० जानेवारीला पार पडणार आहे. त्या अनुषंगाने सिनेटचा अजेंडा प्रसिद्ध करण्यात आला असून, त्यामध्ये सदस्यांकडून विविध ठराव आणि प्रस्ताव मांडण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांचा सिलॅबस कमी करणे; तसेच सर्व महाविद्यालयांना विचारात घेऊन परीक्षेचा निर्णय घ्यावा. त्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमावी, अशी सूचना सिनेट सदस्य डॉ. मोतीराम देशमुख यांनी केली आहे.

करोनाचा प्रादुर्भाव, लॉकडाऊन या सर्वांचा परिणाम विद्यापीठांच्या परीक्षा व प्रवेशप्रक्रियांवर झाला आहे. लॉकडाऊनमुळे महाविद्यालये बंद होती. त्यामुळे यूजीसीने विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरू करण्याची परवानगी देत, विविध सिलॅबसमध्ये ३० टक्के कपात करण्याची सूचना केली आहे. लॉकडाऊनमध्ये ग्रामीण भागातील पालकांवर उपसामारीची वेळ आली आहे. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थदिखील आहेत. अनेक विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन नाहीत. ग्रामीण भागात मोबाईलला रेंजच येत नाही. या सर्वांमुळे ग्रामीण भागातील १० टक्के विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणाचा फायदा घेऊ शकत नाही.

विद्यार्थ्यांना अजूनही त्यांच्या अभ्यासक्रमाविषयी माहिती नाही. अशा परिस्थितीत सत्र परीक्षा घोषित झाल्या, तर गोंधळ उडण्याची शक्यता आहे. परीक्षा घेतांना केवळ बोटावर मोजता येण्यासारख्या कॉलेजांचे म्हणणे ऐकून न घेता, सर्व कॉलेजांची मते जाणून घेण्यासाठी समिती स्थापन करावी, असा प्रस्ताव डॉ. देशमुख यांनी मांडला आहे.

### अॅकेडमिक कॅलेंडर पुनर्रचित करावे...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया अजूनही सुरू आहेत. अशा परिस्थितीत २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन्ही शैक्षणिक वर्षांचे अॅकेडमिक कॅलेंडर पुनर्रचित करावे, असा ठराव सदस्य डॉ. संजय खरात यांच्याकडून मांडण्यात येणार आहे.

Pune Edition
Jan 6, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# Colleges to reopen with UGC norms for safety of students on campus

## Small Batches & Staggered Timings In Initial Phase

Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN

**Pune:** Colleges are getting ready to open from Monday after the Savitribai Phule Pune University allowed them to conduct practical, industrial training, laboratory and dissertation work.

From sanitisation equipment to scheduling classes to avoid overcrowding, college authorities said a task force has been constituted to oversee a smooth reopening.

At Cummins College of Engineering for Women, principal Madhuri Khambete said, "We are still finalising a detailed plan. Laboratories may start in the first phase. We are trying to ensure that the arrangements for hostel students are in place."

On Monday, deputy registrar of SPPU, Uttam Chavan, issued a circular stating that practical, theory, industrial training projects, dissertation of undergraduate, postgraduate and doctoral programmes in colleges affiliated to the SPPU will start from January 11.

The practical, internship and dissertation related work of odd semesters for second year and the rest will be conducted from January 11.

Principal Sanjay Kharat of Modern College of Arts, Science and Commerce said they have been getting ready since the past couple of weeks. "We have planned a single entry into the college with thermal scans and oximeter checks. Hand-wash points with foot-touch wash basins are also on the campus. We are scheduling laboratory sessions with just 15 students at a time."

Principal Gulshan Gidwani of St Mira's College for Girls said they would have staggered timings and more classrooms for junior college.

"It will be a challenge to open junior, senior and postgraduate sections together. We had scheduled the online semester exams between January 10 and 21, so we have that time to prepare for the reopening for our students," she added.

### WHEELS SET IN MOTION

"A committee will ensure that UGC norms are adhered to. Instructions will displayed on the campus. Thermal guns and oximeters will be at all gates and departments' entrances. We have had meetings with principals to ensure that the norms are followed
— NS Umarani | SPPU PRO-VC"

"We have received a circular from SPPU on reopening of colleges from January 11. Our examinations are starting the same day online. Hence, we have still got time to prepare for the reopening. We will chalk out a plan and communicate it to the students
— Hrishikesh Soman | PRINCIPAL OF SYMBIOSIS COLLEGE OF ARTS & COMMERCE"

The Times of India 6.1.2021

१०|| प्रभात पुणे, गुरुवार, दि. ७ जानेवारी २०२१

# वर्षभराच्या परीक्षा एकाचवेळी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत ठराव

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तीनही जिल्ह्यांतील ग्रामीण व आदिवासी भागातील अनेक विद्यार्थ्यांना स्मार्टफोन, इंटरनेट अभावी ऑनलाइन शिक्षण घेता आले नाही. पहिल्या सत्रातील परीक्षेचा अभ्यासक्रमही त्यांना माहित नाही. त्यामुळे केवळ मोजक्या संस्था व महाविद्यालयांच्या अहवालावरून परीक्षेची तारीख तातडीने जाहीर करू नये. सर्व घटकांतील विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, असा ठराव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत मांडण्यात आला आहे. एवढेच नव्हे, तर वर्षभराच्या परीक्षा एकाचवेळी घेण्याचा प्रस्तावही अधिसभेत सादर केला जाणार आहे.

विद्यापीठाची अधिसभा दि. ९ व १० जानेवारी रोजी होणार आहे. यामध्ये सदस्यांनी मांडलेला प्रस्ताव व ठरावांची कार्यक्रमपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये करोना पार्श्वभूमीवर सदस्यांनी विविध ठराव मांडले. प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख यांनी परीक्षेसाठी समिती नेमण्याचा ठराव मांडला आहे. काही संस्था व महाविद्यालयांच्या अहवालानुसार निर्णय घेऊ नये, असे त्यांनी म्हटले आहे. तर, यावर्षीची परीक्षा एप्रिल व २०२१ मध्ये एकत्रित घ्यावी त्यामध्ये सत्रानुसार प्रश्नपत्रिके दोन भाग करण्यात यावेत, त्यानुस गुणपत्रिकेवर गुणदान करता येईल असा ठराव डॉ. पंकज मिनिय यांनी मांडला.

### दूरशिक्षणातून कायद्याचे शिक्षण

विधी शाखेचा नियमित स्वरुपाचा अभ्यासक्रम आहे. त्यामुळे नोकरी व अर्धवेळ काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेता आला नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी बीए-एलएलबी हा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या दूरस्थ (डिस्टन्स एज्युकेशन) पद्धतीने पुढच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याची शिफारस अधिसभा सदस्य विवेक बुचडे यांनी केली आहे.



### महत्त्वाच्या विषयांवर चर्चा

करोना पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क नाममात्र घेण्यात यावे, अशी शिफारस दादाभाऊ शिनलकर यांनी केली. वसतिगृह शुल्क माफ करावे किंवा यापूर्वी घेतले असल्यास परत द्यावे, असा ठराव मांडला. त्यामुळे अधिसभेत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची चिन्हे आहेत.

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

प्रभात पुणे, गुरुवार, दि. ७ जानेवारी २०२१ ॥ ५

## अकरावी प्रवेशाची दुसरी यादी जाहीर

**साडेपाच हजार विद्यार्थांना मिळाला प्रवेश**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ६ - इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेची दुसऱ्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी बुधवारी (दि.६) जाहीर झाली. यात ५ हजार ५५५ विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळाले आहे. यापैकी ३ हजार ६४२ जणांना प्रथम पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. या फेरीतील विद्यार्थ्यांना ८ जानेवारीपर्यंत प्रत्यक्ष प्रवेश घ्यायचा आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड कनिष्ठ महाविद्यालयातील रिक्त जागांवर अकरावीची दुसरी विशेष फेरी राबविण्यात येत आहे. बुधवारी गुणवत्ता यादी व कटऑफ जाहीर झाला. दुसऱ्या विशेष फेरीत वाणिज्य शाखेतून २ हजार ६५० विद्यार्थ्यांना महाविद्यालय देण्यात आले. यानंतर विज्ञान शाखेतून २ हजार १३२ विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळाले. कला शाखेत ५७३, तर व्होकेशनल अभ्यासक्रमासाठी २०० विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळाले आहे. माध्यमनिहाय महाविद्यालय मिळालेल्या संख्येनुसार राज्य शिक्षण मंडळाचे सर्वाधिक ४ हजार ९२४, सीबीएसई ४०९, आयसीएसई १५३, आयजीसीएसई ५, एनआयओएसचे ५७ आणि इतर माध्यमाच्या ७ विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळाले असल्याचे अकरावी प्रवेश समितीकडून कळविण्यात आले.

### नामांकित महाविद्यालयातील कटऑफ

- सिंबायोसिस कॉलेज : वाणिज्य (८९. ४०%)
- आबासाहेब गरवारे कॉलेज : कला (६७. ६०%), विज्ञान (९१.४०%)
- मॉडर्न ज्युनिअर कॉलेज : विज्ञान (८०.८०%)
- सिटी प्राईड ज्युनिअर कॉलेज : वाणिज्य (७९.८०%), विज्ञान (८२%)
- डॉ. शामराव कलमाडी हायस्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज : विज्ञान (९१.२०%)
- सर परशुरामभाऊ ज्युनिअर कॉलेज : वाणिज्य (९०. ८०%)
- एस. एम. जोशी कॉलेज : वाणिज्य (८०.६०%), (विज्ञान ८८.२०%)
- नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स : वाणिज्य (८०.८०%)
- एस. एम. चोक्सी हायस्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज : विज्ञान (८२%)

## परीक्षेची तयारी; पद्धत गुलदस्तात

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ऑफलाइन की ऑनलाइनबाबत संदिग्धता

पुणे, ता. ६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे फेब्रुवारीत प्रथम सत्राच्या परीक्षा होणार आहेत. त्या ऑफलाइन होणार की ऑनलाइन, याबाबत अद्याप विद्यापीठाचा निर्णय गुलदस्तात आहे. गुणवत्ता राखण्यासाठी ऑफलाइन परीक्षा घेण्याचा एक मतप्रवाह असताना कोरोनाचा प्रादुर्भाव, थेट परीक्षेतील येणाऱ्या अडचणींमुळे ऑनलाइन परीक्षा होऊ शकते, असे विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाने ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी दिली आहे. यामध्ये प्राधान्याने प्रात्यक्षिकांचे वर्ग सुरू करण्याचे नियोजन विद्यापीठासह महाविद्यालयांकडून सुरू आहे. प्रथम सत्राचा जवळपास सर्वच अभ्यासक्रम संपला आहे. राज्यातील इतर विद्यापीठांकडून प्रथम सत्राच्या परीक्षांचे नियोजन पूर्ण केले असून, काही ठिकाणी सुरू झाल्या आहेत. पण अद्याप पुणे विद्यापीठाकडून याबाबत स्पष्टता आलेली नसल्याने विद्यार्थ्यांकडून याबाबत चौकशी केली जात आहे. दरम्यान, काही संघटनांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना अंतिम वर्ष आणि बॅकलॉग परीक्षेप्रमाणे प्रथम सत्राची नियमित परीक्षा ऑनलाइन घ्यावी, अशी मागणी केली आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर म्हणाले, "गुणवत्ता राखण्यासाठी ऑफलाइन परीक्षा झाली पाहिजे, पण परिस्थिती योग्य नसल्यास ऑनलाइन वैयक्तिक उपकरणांऐवजी महाविद्यालयांच्या संगणक प्रयोगशाळेत प्राध्यापकांच्या उपस्थितीत घेतली जावी. विज्ञान व तंत्रज्ञान विभागात येणाऱ्या अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये प्रश्न काढताना गुणवत्ता राखली जाईल, याकडे लक्ष द्यावे, चुका टाळाव्यात अशी सूचना करण्यात आली आहे."

"वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्यापरिषदेशी संबंधित अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांची बैठक पुढच्या आठवड्यात घेतली जाणार आहे. कोरोनाची स्थिती पाहता, ही परीक्षा प्रॉक्टर्ड पद्धतीने ऑनलाइन घेणे योग्य ठरेल. पण याबाबतचा अंतिम निर्णय परीक्षा मंडळाच्या बैठकीत होईल," असे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर यांनी सांगितले.

मानवविज्ञान शाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे म्हणाल्या, "सध्या तरी ऑफलाइन परीक्षेची चर्चा सुरू आहे, पण परीक्षा कशी होणार यावर परीक्षा मंडळाच्या बैठकीत निर्णय होईल.

#### विद्यार्थी संघटनांची कोलांटउडी

अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन घेण्यास विद्यार्थी संघटनांनी विरोध केला होता. त्यासाठी सोशल मिडीयातून मोहीमदेखील चालवली होती. मात्र, परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना भरपूर गुण मिळाले. अनेक अभ्यासक्रमांचे निकाल १०० टक्के लागले आहेत. यात विद्यार्थ्यांचा फायदा असल्याने दोन महिन्यातच विद्यार्थी संघटनांनी भूमिका बदलून 'आता ऑफलाइन नको, ऑनलाइनच परीक्षा घ्या' अशी मागणी लावून धरली आहे.

Sakaal 7.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# अभ्यासक्रमात ३० टक्के कपात

## परीक्षांबाबत नेमलेल्या तज्ज्ञ समितीचा प्रस्ताव

**अजेंडा सिनेटचा**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ग्रामीण कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाचा कमी फायदा झाला आहे. त्यामुळे अभ्यासक्रमात ३० टक्के कपात करून, त्यानुसार परीक्षा घेण्याचा प्रस्ताव 'सिनेट'मध्ये मांडण्यात येणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अभ्यासक्रमात कपात करण्याबाबत यापूर्वी विद्यापीठांना सूचना केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सिनेटमध्ये चर्चा होऊन निर्णय होणार आहे.

विद्यापीठाची सिनेट येत्या ९ आणि १० जानेवारीला पार पडणार आहे. त्या अनुषंगाने सिनेटचा अजेंडा प्रसिद्ध करण्यात आला असून, त्यात सदस्यांकडून विविध ठराव आणि प्रस्ताव मांडण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या विविध परीक्षांचा अभ्यासक्रम कमी करणे; तसेच सर्व महाविद्यालयांना विचारात घेऊन परीक्षेचा निर्णय घ्यावा. त्यासाठी तज्ज्ञांनी समिती नेमावी, अशी सूचना सिनेट सदस्य डॉ. मोतीराम देशमुख यांनी केली आहे.

राज्यात करोनाचा प्रादुर्भाव साधारण १० महिन्यांपासून आहे. त्यात काही काळ लॉकडाउन होता. या सर्वांचा परिणाम विद्यापीठांच्या परीक्षा व प्रवेश प्रक्रियांवर झाला आहे. लॉकडाउनमुळे महाविद्यालये बंद होती. त्यामुळे यूजीसीने विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरू करण्याची परवानगी दिली; तसेच विविध अभ्यासक्रमांत ३० टक्के कपात करण्याची सूचना केली आहे. प्रत्यक्षात लॉकडाउनच्या काळात ग्रामीण भागातील पालकांवर उपासमारीची वेळ आली. यात महाविद्यालयीन विद्यार्थीही आहेत. अनेक विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोनदेखील नाहीत. ग्रामीण भागात इंटरनेटची समस्या असल्याने, मोबाइलला रेंजच येत नाही. या सर्वांमुळे ग्रामीण भागातील १० टक्के विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणाचा फायदा घेऊ शकत नाहीत. विद्यार्थ्यांना अजूनही त्यांच्या अभ्यासक्रमाविषयी माहिती नाही. अशा परिस्थितीत सत्र परीक्षा घोषित झाल्या, तर गोंधळाची शक्यता अधिक आहे. विद्यार्थ्यांमध्येही रोष निर्माण होऊ शकतो. परीक्षा घेताना केवळ मोजक्याच कॉलेजांचे म्हणणे ऐकून न घेता, सर्व कॉलेजांची मते जाणून घेण्यासाठी समितीची स्थापना करावी, असा प्रस्ताव डॉ. देशमुख यांनी मांडला आहे.

> सिनेटमध्ये प्रस्तावावर चर्चा केल्यानंतर, याबाबतचा निर्णय कळेल. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ म्हणून आपण यापुढेही जाऊन ट्रायमिस्टर पद्धतीचा अवलंब करण्याच्या तयारीत आहोत. यामुळे शैक्षणिक वर्षांची विस्कटलेली घडी पूर्वपदावर येईल; तसेच परीक्षांच्या आयोजनाबाबत सुसूत्रता येईल. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व रोजगारासाठी फायदा होईल.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ




### पुनर्रचनेचा ठराव मांडणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया अजूनही सुरू आहेत. अशा परिस्थितीत २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन्ही शैक्षणिक वर्षांच्या कॅलेंडरची पुनर्रचना करावी, असा ठराव सदस्य डॉ. संजय खरात यांच्याकडून मांडण्यात येणार आहे.

Maharashtra Times 7.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## कॉलेजांचे शुल्क ठरविण्यासाठी 'एआय'

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @HarshDudheMT



पुणे : व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे (एफआरए) असणाऱ्या संगणकीय प्रणालीमध्ये आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे महाविद्यालयांचा जुना डेटा एका क्लिकवर उपलब्ध होणार असल्याने 'अवास्तव' शुल्कवाढीवर नियंत्रण राहणार आहे.

मटा विशेष

नव्या प्रणालीसाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. 'एफआरए'कडून इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, कृषी, वैद्यकीय अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क महाविद्यालयांच्या एकूण खर्चानुसार दर वर्षी ठरविण्यात येते. यामध्ये प्राध्यापक-कर्मचाऱ्यांची संख्या व वेतन, विद्यार्थी-प्राध्यापक प्रमाण, प्रयोगशाळा, महाविद्यालयांमधील सोयीसुविधा आदींचा समावेश असतो. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क लाखांच्या घरात असते. शुल्क ठरवण्यासाठी 'एफआरए'कडून सध्या संगणकीय प्रणालीचा वापर केला जातो. महाविद्यालयाने शुल्काबाबत 'एफआरए'कडे दिलेल्या प्रस्तावातील माहितीनुसार शुल्क ठरविण्यात येते. या प्रणालीमध्ये शुल्क ठरविण्यासाठी विविध पर्याय दिले आहेत. मात्र, या पर्यायांमध्ये वाढ होऊन, प्रणाली अधिक अद्यावत होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे मानवी हस्तक्षेप कमी होण्यासोबतच, अचूक शुल्क ठरिण्यासाठी अद्यावत 'एआय' तंत्रज्ञान असणारे सॉफ्टवेअर आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन नव्या सॉफ्टवेअरसाठी समिती नेमण्यात येणार आहे. समिती माहिती तंत्रज्ञानाशी (आयटी) निगडित सर्व मुद्द्यांवर चर्चा करून, अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती 'एफआरए'च्या सदस्यांनी दिली.

### कॉलेजांच्या हेराफेरीवर नजर

व्यावसायिक महाविद्यालये शैक्षणिक शुल्काचे प्रस्ताव देताना, दर वर्षी वेगवेगळी माहिती भरतात. या माहितीमध्ये बऱ्यापैकी तफावत असल्याची काही प्रकरणे समोर आली. काही कॉलेज भरमसाठ शुल्क वाढवून मिळण्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थीसंख्या, वेतन, सुविधांवर खर्च आदींची खोटी माहिती देतात. अशा कॉलेजांच्या हेराफेरीवर लक्ष ठेवण्याची, तसेच प्रत्यक्षात झालेल्या खर्चाच्या आधारे शुल्क ठरण्याची गरज आहे. त्यासाठी 'एआय'चा वापर महत्त्वाचा ठरणार आहे.

**"शुल्क ठरविताना महाविद्यालये 'एफआरए'कडे प्रस्ताव सादर करतात. प्रत्येक वर्षाच्या प्रस्तावात वेगळी माहिती असते. जुन्या व नव्या प्रस्तावांची माहिती शुल्क ठरवताना कमी वेळेत व अचूक उपलब्ध व्हावी, यासाठी 'एआय'सारखे तंत्रज्ञान आवश्यक आहे. त्या संदर्भात समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

– चिंतामणी जोशी, सचिव, 'एफआरए'

**व्यावसायिक महाविद्यालयांचे आगामी शैक्षणिक वर्षाचे शुल्क वर्षभरापूर्वीच्या ऑडिटवर ठरविण्यात येते. शुल्क ठरवताना 'एआय' तंत्रज्ञान आल्यास, शुल्काची अचूक माहिती कमी वेळेत उपलब्ध करून देता येईल.**

– डॉ. आर. एस. माळी, माजी कुलगुरू व 'एफआरए' सदस्य

Maharashtra Times 7.1.2021

कोरोना महामारीमुळे आर्थिक फटका : वाढीव शुल्क आकारू नये

## अधिसभेत विद्यार्थी हिताच्या प्रश्नांवर भर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनामुळे विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे. त्यामुळे विद्यापीठाने त्यांच्याकडून वाढीव शुल्क आकारू नये, महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना नाहक शुल्क भरावे लागते. विद्यापीठाने या प्रवेश पूर्व परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, महाविद्यालयांच्या पीएच.डी. शुल्कात एक समानता ठेवावी. तसेच ऑनलाईन शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांवर अचानक परीक्षा लादू नये, आदी मुद्यांवर सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### पीएच.डी नियमावली सुधारावी

- विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयात पीएच.डी अंतर्गत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे विद्यापीठाने पीएच.डीच्या नियमावलीत सुधारणा करावी.
- तसेच विद्यार्थ्यांकडून एक समाजशुल्क आकारले जाईल अशी व्यवस्था करावी, हा मुद्दा चर्चेसाठी मांडला जाणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक येत्या ९ व १० जानेवारी रोजी आयोजित केली जाणार आहे. त्यात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबरोबरच कोरोनामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर मार्ग काढण्याच्या दृष्टीने चर्चा केली जाणार आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासह अनेक प्रश्नांबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी साह्यता व मार्गदर्शन केंद्र सुरू करावे. विद्यार्थी कोरोनामुळे सुमारे आठ-नऊ महिन्यांपासून घरी आहेत. विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे पहिले सत्र संपत आले आहे. मात्र, एकूण परिस्थितीचा आढावा घेऊनच परीक्षा जाहीर कराव्यात, अशी मागणी अधिसभा सदस्यांकडून केली जाणार आहे.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा घेतली जाते. मात्र, या परीक्षांचे शुल्क अवाच्या सवा असते. त्यामुळे विद्यापीठाने या परीक्षांवर निर्बंध घालावेत. कोरोनानंतर विद्यार्थ्यांना आरोग्यदायी वातावरणात शिक्षण घेता येईल, याबाबत खबरदारी बाळगावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांकडून केली जाणार आहे.

Lokmat 7.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## विद्यापीठाकडून कॅसच्या मुलाखती ८ जानेवारीपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या कॅस अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या मुलाखती ८ ते १४ जानेवारी या कालावधीत होणार आहेत. त्यामुळे प्रलंबित मागणीला यश आले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कॅस अंतर्गत पदोन्नतीची प्रक्रिया राबवावी, ही मागणी विद्यापीठाकडे सातत्याने केली. त्यामुळे विद्यापीठाने केंद्रीय पद्धतीने सर्व महाविद्यालयांना आपल्या पात्र शिक्षकांचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दोन वेळा मुलाखतींचे नियोजन केले. परंतु, दोन्ही वेळा विद्यापीठाने या मुलाखती काही कारणास्तव रद्द केल्या. मात्र, अधिसभेपूर्वी प्राध्यापकांची कॅस अंतर्गत रखडलेली प्रक्रिया पूर्ण केली नाही, तर अधिसभेसमोर आंदोलन करण्याचा इशारा प्राध्यापक संघटनेने दिला. त्यामुळे विद्यापीठाने येत्या ८ ते १४ जानेवारी या कालावधीत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्याचे नियोजन केले आहे.

दोन वर्षांपासून विद्यापीठाने कॅस प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे पदोन्नती रखडली आहे. मात्र, विद्यापीठाने आता पदोन्नतीची प्रक्रिया रद्द करू नये, या मागणीचे निवेदन राज्याचे उच्च शिक्षण संचालक व पुणे विभगीय सहसंचालकांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. एस. एम. राठोड यांनी दिले आहे.

Lokmat 7.1.2021

## अकरावीसाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी फेरी

### शिक्षणमंत्री : ७७ टक्के प्रवेश निश्चित

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्याच्या माध्यमिक शिक्षण संचालक कार्यालयातर्फे राज्यातील काही प्रमुख महापालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश फेरी राबविली जात आहे. आत्तापर्यंत सुमारे ७७ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यामुळे उर्वरित जागांसाठी आता प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी राबविली जाणार असल्याची माहिती राज्याच्या शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी ट्विटरद्वारे दिली आहे.

पुणे, मुंबई, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक या महानगरपालिका पालिका कार्यक्षेत्रातील अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविली जात आहे. अकरावी प्रवेशाच्या पहिल्या विशेष फेरी अखेरपर्यंत ३ लाख १४ हजार ५६९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेतला आहे. तसेच काही ठिकाणी दुसऱ्या प्रवेश फेरीचे प्रवेश सुरू आहेत.

वर्षा गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार : राज्यातील अकरावीच्या ५ लाख ५८ हजार ७७० जगांसाठी ४ लाख ५१ हजार ६२४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. त्यातील ३ लाख २१ हजार ९७९ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. राज्यातील ४२ टक्के जागा रिक्त आहे. अद्याप २३ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही. दुसरी विशेष फेरी झाल्यानंतर प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी फेरी राबविली जाणार आहे.

राज्य शासनाने इयत्ता नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे आत्तापर्यंत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून संमतिपत्र घेऊन कनिष्ठ महाविद्यालये सुरू करावीत.

मात्र, शिक्षण विभाग व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील शिक्षण अधिकारी मीना शेंडकर यांनी सांगितले.

### पुण्यातील प्रवेशाची आकडेवारी

| | |
|---|---|
| उपलब्ध जागा- | १,०७,०३० |
| प्राप्त अर्ज - | ७९,७९८ |
| झालेले प्रवेश - | ६१,३८० |
| रिक्त जागा - | ४५,६५० |
| प्रवेश न मिळालेले विद्यार्थी - | १८,४१७ |

Lokmat 7.1.2021

## विद्यार्थ्यांसाठी सुविधा वाढवण्याची मागणी

### अधिसभा सदस्यांकडून ठराव सादर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा वाढवण्याची मागणी के ली आहे. त्यासाठी समान संधी कक्ष, अंध विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कक्ष, शिष्यवृत्तीच्या रकमेत ५० टक्के वाढ, विद्यार्थी सहायता आणि मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याबाबत ठराव मांडले असून विद्यापीठाच्या ९ आणि १० जानेवारीला होणाऱ्या अधिसभेत या बाबत चर्चा होईल.

गेल्या काही वर्षांमध्ये विधी शाखेत संधी निर्माण होत आहेत. मात्र, केवळ नियमित अभ्यासक्रमामुळे विधी शाखेत पदवी घेऊ इच्छित असलेल्या नोकरी, व्यवसाय करणाऱ्यांना संधी मिळत नाहीत. त्यामुळे विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागातर्फे विधी पदवी अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा ठराव अधिसभा सदस्य विवेक बुचडे यांनी मांडला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनांच्या रकमेत ५० टक्के वाढ करण्याचाही ठराव मांडला आहे.

केंद्रीय विद्यापीठांच्या धर्तीवर विद्यापीठ समान संधी कक्ष सुरू करून या कक्षाद्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना संवाद कौशल्ये, इंग्रजी संभाषण असे उपक्रम राबवावेत, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठीच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची संख्या ३०० पर्यंत वाढवण्यासाठी आर्थिक तरतूद करावी, असे ठराव अधिसभा सदस्य राजीव साबडे यांनी मांडले. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अडचणी सोडवण्यासाठी दूरध्वनीवर मार्गदर्शन मिळण्यासाठी विद्यार्थी सहायता आणि मार्गदर्शन के ंद्र सुरू करण्याचा, विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्राच्या सक्षम करून विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे ठराव अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी मांडले आहेत, तर गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी साहित्य उपलब्ध करून देण्याचा ठराव अभिषेक बोके यांनी मांडला आहे.

विद्यापीठात आणि संलग्न महाविद्यालयात शिकणाऱ्या अंध विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विभाग निर्माण करून या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क न घेता पदवीपूर्व ते पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण देण्याचा ठराव डॉ. बाळासाहेब सागडे यांनी मांडला आहे.

### पुन्हा टॅबलेटची खरेदी

विद्यापीठ प्रशासनाने व्यवस्थापन परिषद सदस्यांसाठी गेल्या वर्षी लाखो रुपये खर्च करून टॅबलेटची खरेदी केली होती. तर या पूर्वीच्या व्यवस्थापन परिषद सदस्यांनाही आयपॅड देण्यात आले होते. मात्र व्यवस्थापन परिषद सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर संबंधिक वस्तू परत घेण्याबाबत विद्यापीठाने काहीच धोरण ठरवले नसल्याचा प्रकार 'लोकसत्ता'ने फेब्रुवारीमध्ये समोर आणला होता. त्यानंतर नुकतेच विद्यापीठाने जवळपास एक लाख रुपये खर्च करून पाच टॅबलेट खरेदी केले आहेत. मात्र टॅबलेट परत घेण्यासंदर्भातील धोरण अद्यापही ठरवण्यात आलेले नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

लोकसत्ता Thu, 07 January 2021 https://epaper.loksatta.com/c/5

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# विशेष फेरीच्या प्रवेशांत घट

## अकरावी प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या विशेष फेरीची निवड यादी जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या विशेष फेरीच्या प्रवेशांमध्ये घट झाली आहे. दुसऱ्या विशेष फेरीच्या निवड यादीत ५ हजार ५५५ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून त्यापैकी ३ हजार १४२ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना ८ जानेवारीपर्यंत महाविद्यालयात प्रवेश निश्चित करता येईल.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीने मंगळवारी रात्री दुसऱ्या विशेष फेरीची निवड यादी जाहीर केली. दुसऱ्या विशेष फेरीसाठी एकूण ३८ हजार ७६६ जागा उपलब्ध होत्या.

त्यासाठी ८ हजार ४१९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. प्रत्यक्ष प्रवेश जाहीर झालेल्या ५ हजार ५५५ विद्यार्थ्यांपैकी कला शाखेसाठी ५७३, वाणिज्य शाखेसाठी २ हजार ६५०, विज्ञान शाखेसाठी २ हजार १३२ आणि व्यवसाय अभ्यासक्रमासाठी २०० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला.

प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या आणि एक विशेष फेरी राबवण्यात आली आहे. त्यात पहिल्या फेरीत ४० हजार १३, दुसऱ्या फेरीत २३ हजार १२०, तिसऱ्या फेरीत १२ हजार ६४१ आणि पहिल्या विशेष फेरीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे.

ही आकडेवारी पाहता दुसऱ्या विशेष फेरीतील निवड यादीतील प्रवेशांच्या संख्येत घट झाल्याचे स्पष्ट होत आहे.

### पात्रता गुणांमध्ये घट

प्रवेशांच्या तीन फेऱ्यांमध्ये नामांकित महाविद्यालयांतील प्रवेशासाठीचे पात्रता गुण नव्वदीपार होते. तर पहिल्या विशेष फेरीत पात्रता गुणांमध्ये घट झाली होती. आता दुसऱ्या विशेष फेरीत पात्रता गुण आणखी कमी झाले आहे. त्यात सिम्बायोसिसमध्ये वाणिज्य शाखेसाठी ८९.४० टक्के, आबासाहेब गरवारे महाविद्यालयात कला शाखेसाठी ६७.६० टक्के, विज्ञान शाखेत ९१.४० टक्के, मॉडर्न महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ८०.८० टक्के, सिटीप्राइड कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी ७९.८० टक्के, विज्ञान शाखेसाठी ८२ टक्के, डॉ. कलमाडी शामराव महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९१.२० टक्के, स. प. महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी ९०.८० टक्के गुण आवश्यक आहेत.

लोकसत्ता Thu, 07 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57568820

# विद्यापीठ कायद्याविरोधात प्रचंड रोष

## सुधारणा समितीकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी

देवेश गोंडाणे, लोकसत्ता

**नागपूर :** भाजप सरकारच्या काळात अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने स्थापन केलेल्या सुधारणा समितीकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या असून त्यामुळे सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ विरोधात शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड रोष असल्याचे स्पष्ट होत आहे.

विद्यापीठ कायद्यामध्ये सुधारणा करताना नवीन शैक्षणिक धोरण २०२०, आतापर्यंत शिक्षणामध्ये झालेले बदल, इतर राज्य व केंद्रशासनाच्या विद्यापीठ कायद्यामधील तरतुदी, निवडक परराज्यातील विद्यापीठाचा कायदा, विद्यापीठ अनुदान आयोग व 'एआयसीटीई'चे निर्देश लक्षात घेऊन सुधारणा करण्याच्या शिफारशींचे उद्दिष्ट समितीसमोर आहे. त्यामुळे सुधारणा समितीचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी सहा उपसमित्या स्थापन केल्या आहेत. या उपसमिती सध्या विविध विद्यापीठांमध्ये भेटी देत तेथील प्राध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, कुलगुरू, प्र-कुलगुरू व इतर अधिकाऱ्यांकडून सूचना स्वीकारत आहेत. या सूचनांचा आधार घेऊन कायद्यामध्ये आवश्यक ते बदल केले जाणार आहेत.

समितीने याआधी ऑनलाइन माध्यमातून सूचना मागवल्या होत्या. यामध्येही एकट्या पुणे विभागातूनच तीन हजारांवर लोकांनी सूचना पाठवल्या आहेत. शिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला भेट देत अमरावती, गडचिरोली व नागपूर विद्यापीठामधील कुलगुरू व अधिकाऱ्यांकडून सूचना घेतल्या. यावेळी उपस्थितांनी कायद्याविरोधात प्रचंड रोष व्यक्त केला.

कायद्यामध्ये नामनिर्देशित सदस्यांच्या निवडीची संख्या मोठी असल्याने त्याचा फटका शैक्षणिक गुणवत्तेला बसत असल्याचा आक्षेप घेण्यात आला. काही संघटनांनी नवीन कायद्यामुळे विद्यापीठात राजकीय हस्तक्षेप अधिक वाढल्याचा आक्षेप घेतला. ज्या पक्षाची सत्ता असेल त्यांची विद्यापीठामध्ये मक्तेदारी वाढत असल्याची बाब काही प्राचार्य संघटनांनी व्यक्त केली. या समितीसमोर नवीन शिक्षण धोरण व अन्य बाबींपेक्षा कायद्यातील उणिवांवर अनेकांनी बोट ठेवल्याचे समितीमधील सदस्यांनी सांगितले.

### सूचना काय?

- प्राधिकरणांमधील नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करावी.
- प्राधिकरणांचे सदस्य निवडताना गुणवत्तेला प्राधान्य हवे.
- कुलगुरू, प्र-कुलगुरू निवडीतील राजकारण संपवा.
- यूजीसीनुसार वेतन आयोग व पदोन्नती द्या.
- कायमस्वरुपी अधिष्ठात्यांची नेमणूक रद्द करा.

> नागपूर विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी संघटनांचे मत जाणून घेण्यासाठी दोन दिवसांचे सत्र घेण्यात आले. अशाप्रकारचे सत्र मुंबई, पुणे, औरंगाबादमध्येही आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी सर्वांचे मत जाणून घेण्यात येईल.
>
> – डॉ. सुखदेव थोरात, कायदा सुधारणा समिती.

लोकसत्ता Thu, 07 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57560533

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## Round 2: Colleges declare cut-off lists for FYJC admissions

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE :** The second special round of class 11 or the First Year Junior College (FYJC) admissions is underway with the junior college allotment list for admissions on display including the cut-off list of colleges.

In the second special round, of the total 38,766 available seats, there were 8,419 applicants and 5,555 students were allotted a college.

The remaining 2,864 students who had applied for admission in this round couldn't match the cut-off list of colleges with their given college preference and marks.

Of the 5,555 allotted students, 3,142 students were given the college of their first preference, 908 students were given the college of their second preference and 521 students were given the college of their third preference.

For this year's class 11 admission process, a total of 72,820 students are eligible for the first round of admission in 304 colleges of Pune and Pimpri-Chinchwad area.

Due to the interim stay given by the Supreme Court (SC) on the implementation of the quota for the Maratha community in jobs and education, the state education department had stopped the admission process for FYJC since September 9 and resumed back from November 26.

Hindustan Times 7.1.2021

## विशेष फेरीला अल्प प्रतिसाद

### आठ जानेवारीपर्यंत प्रवेश निश्चिती आवश्यक; नऊ तारखेला 'एटीकेटी'चे वेळापत्रक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या विशेष फेरीच्या निवड यादीत पाच हजार ५५५ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून, पैकी तीन हजार १४२ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे ज्युनिअर कॉलेज मिळाले आहे. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना आठ जानेवारीपर्यंत कॉलेजांमध्ये प्रवेश निश्चित करता येणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. दुसऱ्या विशेष फेरीची गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर झाली. अकरावी प्रवेशासाठी ३०४ कॉलेजांमध्ये एक लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ६१ हजार ७२३ विद्यार्थ्यांनी बुधवारपर्यंत प्रवेश घेतला. दुसऱ्या विशेष फेरीसाठी ३८ हजार ७६६ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी आठ हजार ४१९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. यातील पाच हजार ५५५ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांना आठ जानेवारीपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार आहे. त्यानंतर नऊ जानेवारीला रिक्त राहणाऱ्या जागांचा; तसेच एटीकेटी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबद्दल वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या आणि एक विशेष फेरी राबवण्यात आली आहे. त्यात पहिल्या फेरीत ४० हजार १३, दुसऱ्या फेरीत २३ हजार १२०, तिसऱ्या फेरीत १२ हजार ६४१, तर पहिल्या विशेष फेरीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. ही आकडेवारी पाहता दुसऱ्या विशेष फेरीतील निवड यादीतील प्रवेशांच्या संख्येत घट झाल्याचे स्पष्ट होत आहे. या फेरीत केवळ पाच हजार ५५५ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. याविषयीची अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.

दुसऱ्या विशेष प्रवेश फेरीमध्ये पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाची संधी मिळाली आहे. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या साधारण तीन हजारांच्या आसपास आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी पुन्हा विशेष फेरीचे आयोजन करण्यात येईल का, याकडे विद्यार्थी-पालकांचे लक्ष लागले आहे.

#### तीन हजार जणांना पसंतीचे कॉलेज

अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून पाच हजार ५५५ विद्यार्थ्यांचे प्रवेश जाहीर झाले आहेत. यातील तीन हजार १४२ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. त्यामुळे त्यांना प्रवेश घ्यावा लागणार आहे. या फेरीत ९०८ विद्यार्थ्यांना दुसऱ्या, ५२१ विद्यार्थ्यांना तिसऱ्या, ३५० विद्यार्थ्यांना चौथ्या आणि २३५ विद्यार्थ्यांना पाचव्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. अन्य विद्यार्थ्यांना पाचव्या ते १० व्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. संबंधित विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात प्रवेश घेता येईल किंवा पुढच्या फेरीची वाट पाहता येणार आहे.



#### 'कट ऑफ'मध्ये घट

प्रवेशांच्या तीन फेऱ्यांमध्ये नामांकित प्रवेशासाठीचे पात्रता गुण नव्वदीपार होते. पहिल्या विशेष फेरीत पात्रता गुणांमध्ये घट झाली होती. आता दुसऱ्या विशेष फेरीत पात्रता गुण आणखी कमी झाले आहे. त्यात सिम्बायोसिसमध्ये वाणिज्य शाखेसाठी ८९.४० टक्के, आबासाहेब गरवारे ज्युनिअर कॉलेजमध्ये कला शाखेसाठी ६७.६० टक्के, सायन्स शाखेत ९१.४० टक्के, मॉडर्न महाविद्यालयात सायन्स शाखेसाठी ८०.८० टक्के, सिटीप्राइड ज्युनिअर कॉलेजमध्ये कॉमर्स शाखेसाठी ७९.८० टक्के, विज्ञान शाखेसाठी ८२ टक्के, डॉ. श्यामराव कलमाडी महाविद्यालयात सायन्स शाखेसाठी ९१.२० टक्के, एस पी कॉलेजमध्ये कॉमर्स शाखेसाठी ९०.८० टक्के गुण आवश्यक आहेत.

Maharashtra Times 7.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

## Section: Education



विद्यार्थी पालकांचा सवाल : अभ्यासक्रम, परीक्षांबाबतचा संभ्रम

# जानेवारी महिन्यातही अकरावी प्रवेश सुरू; शिकवणार कधी?

रिॲलिटी चेक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना व मराठा आरक्षणाला दिलेल्या स्थगितीमुळे राज्यातील पुण्यासह प्रमुख महापालिकांमधील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबली. जानेवारी महिना उजाडला तरीही प्रवेश प्रक्रिया सुरू असून प्रत्यक्षात अकरावीचे वर्ग केव्हा सुरू होणार?, यंदा अभ्यासक्रम किती असणार?, परीक्षा केव्हा घेतल्या जाणार? याबाबत शासनाने अद्याप कोणतीही स्पष्टता न दिल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने या संदर्भात मार्गदर्शन करणे गरजेचे आहे, अशी मागणी केली जात आहे.

कोरोनामुळे दहावीचा निकाल प्रसिध्द करण्यास विलंब झाला. परिणामी अकरावी प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाली. परंतु, केवळ पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रवेश ऑफलाइन पद्धतीने दिले आहेत. तसेच राज्य शासनाने नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिली असली तरी प्रवेश प्रक्रिया पूर्ण न झाल्याने शहरातील अकरावीचे वर्ग नियमितपणे सुरू झाले नाहीत. त्यातही शासनाने शाळा सुरू करण्यास मान्यता दिली असली तरी; शिक्षकांच्या उपस्थितीची मर्यादा ५० टक्केच ठेवली आहे. त्यामुळे काही ठिकाणी शाळा सुरू पण शिक्षक नाही, असे चित्र दिसून येत आहे.

अकरावीमध्ये प्रवेश घेतल्या विद्यार्थ्यांचे वर्ग कनिष्ठ महाविद्यालयांनी सुरू करावेत. त्यासाठी शिक्षण विभाग व शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या नियमावलीचे पालन करणे अपेक्षित आहे. परंतु, अद्याप शहरातील नामांकित महाविद्यालयांचेसुध्दा अकरावीचे वर्गच सुरू झाले नाहीत.

११ ॲडमिशन

| | |
|---|---|
| उपलब्ध जागा | १,०७,०३० |
| प्रवेशासाठीचे अर्ज | ७९,७९८ |
| झालेले प्रवेश | ६१,३८० |
| रिक्त जागा | ४५,६५० |
| प्रवेश न मिळालेले | १८,४१७ |

अकरावी अभ्यासक्रम व परीक्षांबाबत शासनाने स्पष्टता देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या पायाभूत संकल्पना स्पष्ट होतील, असा अभ्यासक्रम एप्रिल महिन्यापर्यंत पूर्ण करून त्यावर परीक्षा घेणे उचित ठरू शकते. त्यादृष्टीने शासनाने धोरण निश्चित करून शाळांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

\- राजेंद्र सिंह, इंडिपेंडेंट इंग्लिश स्कूल असोसिएशन

अकरावी प्रवेशास विलंब झाला असून येत्या एप्रिल महिन्यापर्यंत या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. परंतु, शिक्षण विभागाने अद्याप याबाबत स्पष्टता दिलेली नाही. अभ्यासक्रम कमी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासनाने मार्गदर्शक सूचना देणे गरजेचे आहे.

\- संतोष फासगे, अध्यक्ष, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने शिक्षकांच्या उपस्थितीबाबत काही नियमावली प्रसिध्द केली होती. त्यानुसार अजूनही शिक्षकांच्या उपस्थितीची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत आहे. मात्र, ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून शिक्षकांच्या १०० टक्के उपस्थितीबाबत शासन आदेशानुसार निर्णय घेतला जाईल.

\- दत्तात्रय जगताप, संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य

Lokmat 8.1.2021

# News Paper Clippings During January 2021

## Section: Education



### दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढले

- अभ्यासातील २५ टक्के कपात अस्पष्ट
- शिक्षकांचा सर्व धडे शिकविण्यावर भर

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) - कोरोनामुळे ऑनलाइन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी शिक्षण विभागाने अभ्यासक्रमातील २५ टक्के भाग वगळण्याचा निर्णय घेतला, पण या कपातीविषयी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. प्रत्यक्षात अभ्यासक्रमातून कोणताही धडा वगळलेला नाही. केवळ ॲक्टिव्हिट बेस संकल्पना आणि जादा प्रश्न कमी केले आहेत. त्यामुळे शिक्षकही संपूर्ण पाठ्यपुस्तक शिकविण्यावर भर देत आहेत.

दहावी, बारावी परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे टेंशन वाढले आहे. अद्यापही ३० ते ४० टक्के विद्यार्थी शाळेच्या संपर्कात नाही. जे विद्यार्थी अभ्यास करीत आहेत त्यांना अभ्यासक्रम आणि पेपर पॅटर्नविषयी कोणतीही माहिती नसल्याचे समोर आले आहे. टीचर्स डेमॉक्रॅटिक फ्रंटचे उपाध्यक्ष राजेश पंड्या यांनी सांगितले, 'काही विषयांतील पूर्ण धडा कमी न करता फक्त त्यातील काही भाग वगळण्यात आला आहे. त्यामुळे तो धडा ऑप्शनला टाकायचा का, त्याचा किती अभ्यास करायचा, त्याच धड्यावर प्रश्न विचारला तर काय करावे, या प्रश्नांच्या विचारात सध्या विद्यार्थी सापडले आहेत.'

#### *प्रीलिमही नाही; बहुपर्यायी प्रश्न वाढविण्याची मागणी*

*बोर्डाच्या परीक्षेपूर्वी दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी शाळास्तरावर प्रीलिम परीक्षा घेण्यात येते, पण यंदा कोरोनामुळे ग्रामीण भागात या परीक्षांचे आयोजन झालेले नाही. शहरी भागात काही कॉन्व्हेंट शाळा विद्यार्थ्यांना सराव प्रश्नपत्रिका मेलवर पाठवित आहेत. या प्रश्नपत्रिका सोडवून पालकांनी त्या तपासाव्यात अशा सूचना दिल्या जात असल्याचे शिक्षक भारतीचे सुभाष मोरे यांनी सांगितले. तसेच बोर्डाने लवकरात लवकर प्रश्नपत्रिकांचे स्वरूप जाहीर करून परीक्षांची काठीण्य पातळी यंदाच्या वर्षापुरती कमी करावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.*

#### क्रीडा, कला कोट्याच्या २५ गुणांवर यंदा पाणी?

कला, क्रीडा कोट्यातील वाढीव २५ गुणांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे यंदा काय होणार? या विद्यार्थ्यांना वाढीव गुण कोणत्या निकषाद्वारे देणार, याविषयी अद्याप बोर्डाने खुलासा केलेला नाही. कोरोनामुळे कोणत्याही स्पर्धांचे आयोजन झालेले नाही. त्यामुळे या गुणांच्या लाभासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या हक्काच्या २५ गुणांवर पाणी सांडण्याची शक्यता आहे.

Saamana 8.1.2021

### प्रथम येणाऱ्यास संधी

#### अकरावी प्रवेशाबाबत शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

पुणे, ता. ७ : पुणे, पिंपरी-चिंचवडसह मुंबई-ठाणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद या महापालिका क्षेत्रांतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पुढील टप्प्यासाठी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' (एफसीएफएस) फेऱ्यांचे आयोजनास मान्यता दिली. शालेय शिक्षण विभागाने गुरुवारी अध्यादेश काढून ही माहिती दिली. त्यामुळे अकरावीच्या प्रवेशापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या पुढील टप्प्यात 'एफसीएफएस'द्वारे प्रवेशाची संधी मिळणार आहे.

अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी २३ जून २०२० मध्ये काही बदल केले. त्यात शासन निर्णयानुसार, 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' ही फेरी रद्द केली होती. त्याऐवजी अतिरिक्त विशेष फेरीची प्रक्रिया राबविणार होते. यात 'एफसीएफएस' फेरी रद्द करून त्याऐवजी आवश्यकतेनुसार जेथे सर्व रिक्त जागा या सर्वसाधारण जागांमध्ये रूपांतरित करण्यात येतील आणि आरक्षणाऐवजी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्ता यादीतील गुणांवर आधारित जागा देण्यात येतील, असे जूनमधील अध्यादेशात नमूद केले होते. मात्र, विशेष फेरीच्या शेवटी बरेच विद्यार्थी प्रवेशाविना राहिले. ही परिस्थिती विचारात घेता, यावर्षीही प्रवेशासाठी शेवटच्या टप्प्यात नियमित फेऱ्यांऐवजी 'एफसीएफएस' फेरीचे आयोजन करण्याचा विचार सुरू होता. त्याला राज्य सरकारने मान्यता दिली.

#### दुसऱ्या फेरीत अडीच हजार विद्यार्थ्यांना प्रवेश

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील प्रवेशाच्या दुसऱ्या विशेष फेरीसाठी आठ हजार ४१९ विद्यार्थी पात्र ठरले. त्यातील पाच हजार ५५५ विद्यार्थ्यांना या फेरीत प्रवेश दिला. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी शनिवारपर्यंत (ता. ९) मुदतवाढ दिली आहे. मात्र, गुरुवारी सायंकाळपर्यंत तीन हजार १५९ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दर्शविली, तर दोन हजार ५८३ जणांनी प्रवेश घेतला आहे.

Sakaal 8.1.2021

### परीक्षा फेब्रुवारीअखेर

#### अभ्यासक्रमांच्या सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यास प्राधान्य

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम वर्ष सत्र परीक्षा फेब्रुवारीच्या अखेरीस घेण्याबाबत पडताळणी सुरू असून, या परीक्षा वेळेत पार पाडण्यासाठी ऑनलाइन पद्धतीला प्राधान्य देण्यात येणार आहे. ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेताना, त्यात एमसीक्यू आणि विस्तृत स्वरूपातील प्रश्न विचारण्यात येण्याची शक्यता आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांची प्रक्रिया संपली असून, निकालही जाहीर झाले आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रम वगळल्यास इतर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली असून, नव्या वर्षालाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे प्रथम वर्षासह जुन्या विद्यार्थ्यांच्या सत्र परीक्षा कधी होतील, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांच्या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. करोनाच्या प्रादुर्भावामुळे ऑनलाइन शिक्षण पद्धतीद्वारे पाठ्यक्रमही पूर्ण झाला आहे. याचमुळे पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून फेब्रुवारीअखेरीस परीक्षा घेण्याची चाचपणी सुरू आहे. परीक्षा कमी कालावधीत होऊन, निकालाही वेळेत जाहीर होण्यासाठी सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. लेखी परीक्षा एमसीक्यू आणि विस्तृत स्वरूपातील प्रश्नाधारित राहणार आहे. त्यामुळे निकाल कमी कालावधीत लावणे शक्य होणार आहे. शैक्षणिक वर्षाची विस्कटलेली घडी बसवण्यासही मदत होणार आहे.

याउलट ऑफलाइन पद्धतीने परीक्षांचे नियोजन केल्यास, साधारण दोन महिने परीक्षा घेण्यासाठी लागतील; तसेच निकाल जाहीर करण्यास ४५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष रेंगाळण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिस्थितीचा विचार करता ऑनलाइन परीक्षा घेणे सोयीस्कर ठरेल, असे मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

> परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सत्र परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. त्यानुसार परीक्षा विनाअडथळा पार पडण्यासोबतच विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. येत्या काही दिवसांत सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरण्याची पक्रिया सुरू करण्यात येईल. त्यानंतर फेब्रुवारीअखेरीस ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत पडताळणी सुरू आहे.
>
> - डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ



**सत्र परीक्षांचे प्रस्तावित नियोजन**

| | | |
|---|---|---|
| जानेवारी | : | अर्ज भरण्याची प्रक्रिया |
| फेब्रुवारी अखेरीस | : | परीक्षांना सुरुवात |
| मार्च | : | परीक्षा पूर्ण होणे |
| एप्रिल | : | निकाल जाहीर होणे |

Maharashtra Times 8.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## विद्यापीठाची सत्र परीक्षा फेब्रुवारीअखेर?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम वर्ष सत्र परीक्षा फेब्रुवारीच्या अखेरीस होण्याची शक्यता आहे. विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ त्याबाबत पडताळणी करत असून, या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यासाठी प्राधान्य आहे. ऑनलाइन परीक्षेच्या प्रश्नपत्रिके त बहुपर्यायी प्रश्नांसह विस्तृत लेखनाच्या प्रश्नांबाबतही चाचपणी सुरू आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा, निकाल जाहीर झाले आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रम वगळता अन्य पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रियाही झाली आहे. त्यामुळे आता प्रथम वर्षासह अन्य वर्षाच्या सत्र परीक्षा कधी होणार असा प्रश्न आहे. करोना काळात ऑनलाइन पद्धतीने झालेले अध्यापन लक्षात घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून फेब्रुवारीच्या अखेरीस परीक्षा घेण्याची चाचपणी सुरू आहे. कमी कालावधीत परीक्षा घेऊन वेळेत निकाल जाहीर होण्यासाठी ऑनलाइन परीक्षा सोयीस्कर आहे. त्यामुळे महाविद्यालयांच्या संगणक प्रयोगशाळेत प्राध्यापकांच्या निगराणीखाली परीक्षा घेता येतील का, प्रॉक्टर्ड पद्धत आणखी कठोर करता येईल का याचाही विचार करण्यात येईल. ऑनलाइन परीक्षेत बहुपर्यायी प्रश्नांसह विस्तृत लेखनाचे प्रश्न विचारता येतील का याचाही अभ्यास सुरू आहे. ऑफलाइन पद्धतीमध्ये परीक्षा आणि निकाल जाहीर करण्याच्या प्रक्रियेत बराच वेळ जाऊ शकतो. परिणामी शैक्षणिक वर्ष आणखी लांबू शकते. त्यामुळे ऑनलाइन परीक्षा सोयीच्या ठरतील, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सांगण्यात आले.

**विद्यार्थी संघटनांचे घूमजाव**

अंतिम वर्ष परीक्षांवेळी ऑनलाइन परीक्षांना विरोध करणाऱ्या विद्यार्थी संघटनांनी घूमजाव केले आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने पार पडल्यानंतर आता सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीनेच घेण्यासाठी विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठाकडे निवेदने दिली आहेत.

" परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सत्र परीक्षा फेब्रुवारीच्या अखेरीस ऑनलाइन पद्धतीने घेता येतील का, याची पडताळणी सुरु आहे. येत्या काही दिवसांत सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ऑनलाइन अर्जांची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

– डॉ. महेश काकडे, संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

लोकसत्ता Fri, 08 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57581373

## प्रथम सत्राच्या परीक्षेला विरोध

### विद्यापीठाच्या अधिसभेसाठी सदस्यांचा ठराव

**पुणे, ता. ७** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा येत्या आठवड्यात होत असताना यातील निर्णय प्रक्रियेत आणि चर्चेमध्ये कोरोनाचेच परिणाम केंद्रस्थानी असणार आहेत. कोरोनामुळे प्रथम सत्राची परीक्षा घेऊ नये, विद्यार्थ्यांकडून नाममात्र परीक्षा शुल्क घ्यावे, वसतिगृहाचे शुल्क माफ करावे, यांसह अनेक ठराव अधिसभा सदस्यांनी मांडले आहेत.

कोरोनामुळे जून महिन्यात विद्यापीठाची अधिसभा ऑनलाइन झाली होती. मात्र आता ९ व १० जानेवारीला थेट अधिसभा होणार आहे. यासाठी सदस्यांनी मांडलेले ठराव व कार्यक्रमपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख यांनी परीक्षेसाठी समिती नेमण्याचा ठराव मांडला आहे. ठरावीक महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन शिक्षण झालेले आहे; पण आदिवासी व ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना स्मार्ट फोन, इंटरनेटअभावी ऑनलाइन शिक्षण घेता आले नाही. पहिल्या सत्राचा अभ्यासक्रम काय आहे, हे देखील त्यांना माहिती नाही. त्यामुळे मोजक्या महाविद्यालयांच्या अहवालावरून परीक्षेच्या तारीख जाहीर करू नका. सर्व घटकांतील विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, असे देशमुख यांनी ठरावात नमूद केले आहे.

कोरोनामुळे महाविद्यालयात प्रात्यक्षिक होऊ शकले नाही, ऑनलाइन शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले नाही. त्यामुळे प्रथम सत्राची परीक्षा न घेता एप्रिल-मे महिन्यात प्रथम व द्वितीय सत्राची परीक्षा एकत्र घ्यावी व प्रथम सत्रासाठी सेक्शन एक व द्वितीय सत्राचा सेक्शन दोन करून निकाल लावावा, असा ठराव प्रा. डॉ. पंकज मिनीयार यांनी दिला आहे. तर कोरोनामुळे विद्यापीठाच्या विविध योजना व त्यांचा हिशेब सादर करण्यास मुदतवाढ देऊन ३१ मार्चपर्यंतची मुदत द्यावी, असा ठराव डॉ. देविदास वायदंडे यांनी दिला आहे.

**'परीक्षा शुल्कात सवलत द्या'**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क नाममात्र घेण्यात यावे, अशी शिफारस दादाभाऊ शिनलकर यांनी केली आहे. संतोष ढोरे यांनी वसतिगृह शुल्क माफ करावे किंवा यापूर्वी घेतले असल्यास परत द्यावे, असा ठराव मांडला आहे.

Sakaal 8.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## विद्यापीठात हवे सहाय्यता केंद्र

### विद्यार्थ्यांचे हेलपाटे थांबविण्यासाठी शंकांचे निरसन आवश्यक

**पुणे, ता. ७ :** "विद्यार्थ्यांना महाविद्यालयांच्या माध्यमातून सर्वच माहिती व्यवस्थित मिळते, असे नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या सोईसाठी सहाय्यता केंद्र असली पाहिजेत. विद्यापीठाने समिती स्थापन करून या केंद्रांची कार्यपद्धती कशी असावी, तक्रार नोंदवून घेतल्यानंतर त्याचे रेकॉर्डिंग, ट्रॅकिंग करण्यासाठी नेटवर्क तयार झाले पाहिजे, त्यातून विद्यार्थ्यांचे हेलपाटे वाचतील," असे अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात शिकणारा शुभम भुतकर सांगत होता. दरम्यान, विद्यापीठाने सध्याचे मदत केंद्र व्यवस्थित सुरू असल्याचा दावा केला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत पुणे, नाशिक, नगर या तीन जिल्ह्यांत सुमारे ७ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थी प्रवेश, परीक्षेसह इतर अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठाशी संपर्क साधतात. त्यावेळी संबंधित विभागाकडून व्यवस्थित उत्तर मिळत नाही, म्हणून रोज शेकडो विद्यार्थी प्रवास करून विद्यापीठामध्ये चौकशीसाठी येतात. आवश्यक माहिती किंवा काम करून घेण्यासाठी ते दिवसभर थांबतात. ऑक्टोबर महिन्यात विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा घेतली, त्या वेळी तात्पुरती हेल्पलाइन सुरू केली; पण त्यातून विद्यार्थ्यांना मदत मिळण्याऐवजी गोंधळच जास्त निर्माण झाल्याचे समोर आले.

नाशिक येथे शिकणारा विद्यार्थी स्वप्नील पाटील म्हणाला, "विद्यार्थ्यांना मुख्य अडचणी परीक्षा व शैक्षणिक कामाबाबत येतात. त्यावेळी विद्यार्थ्यांना उत्तरे व्यवस्थित मिळत नाहीत. त्यासाठी यंत्रणेत सुधारणा होणे गरजेचे आहे. तसेच बहुतांश विद्यार्थी सोशल मीडियावर आहेत. विद्यापीठाने त्यांचे निर्णय जाहीर करण्यासाठी ट्विटरसारखे माध्यम वापरले पाहिजे."

विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य संतोष ढोरे म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना, शंकांना व्यवस्थित उत्तरे मिळण्यासाठी विद्यापीठामध्ये स्वतंत्र यंत्रणा असणे आवश्यक असल्याने 'विद्यार्थी सहाय्यता केंद्र' सुरू करावे, असा ठराव अधिसभेला दिला आहे. विद्यार्थ्यांना योग्य उत्तरे मिळाली, त्यांच्या तक्रारींचा योग्य पाठपुरावा होऊन त्याचे निरसन झाले, तर विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल."

**समुपदेशन केंद्र कागदावरच**

कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांच्या परीक्षेसह अन्य विषयांशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी विद्यापीठाने मे महिन्यात तीन जिल्ह्यांत नऊ महाविद्यालयांमध्ये समुपदेशन केंद्र सुरू केले होते. त्यासाठी प्राध्यापकांचे फोन नंबर दिले होते. पण, एकाच दिवशी अनेक फोन आल्याने अनेकांनी फोन बंद केल्याने विद्यार्थ्यांना उत्तरे मिळाली नाहीत.

> विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांसाठी मदत केंद्र आहे. तेथे ६० प्रकारच्या सेवा ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने पुरविल्या जातात. त्याचा लाखो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. फोनद्वारे देखील व्यवस्थित उत्तरे मिळतात.
>
> **- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Sakaal 8.1.2021

## विद्यापीठ, महाविद्यालयांसाठी आरोग्यविषयक नियमावली

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील महाविद्यालये व विद्यापीठे बंद होती. मात्र, विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करावे, अशा सूचना विद्यापीठ अनुदान मंडळाने दिल्या होत्या. त्यानुसार विविध शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकवले जात आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महाविद्यालय व विद्यापीठे सुरू करण्यासंदर्भात यूजीसीने नियमावली प्रसिद्ध केली आहे.

राज्य शासनाने व शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करून विद्यापीठ व महाविद्यालय सुरू करावीत, असेही यूजीसीने स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा. कोरोनाच्या फैलावासंदर्भात शैक्षणिक संस्थांनी जागृती करावी. महाविद्यालयातील वर्गामध्ये ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवून टप्प्याटप्प्याने विद्यार्थ्यांना शिकवण्याची प्रक्रिया सुरू करावी. महाविद्यालयात अनोळखी व्यक्तींना येण्यास मज्जाव करावा. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ओळखपत्राशिवाय शैक्षणिक संकुलात प्रवेश देऊ नये.

महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये मास्क बंधनकारक करावा, तसेच फिजिकल डिस्टन्सच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. यासह वसतिगृह प्रयोगशाळा उपहारगृह याबाबत कोणती काळजी घ्यावी, यासंदर्भात सविस्तर सूचना यूजीसीने दिल्या आहेत.

Kesari 9.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## महाविद्यालयांबाबत परिपत्रक जारी

पुणे, ता. ७ : कोरोनामुळे गेल्या नऊ महिने बंद असलेले महाविद्यालये आता खुली होणार आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) आता देशातील विद्यापीठे व महाविद्यालये सुरू करण्याबाबत सविस्तर नियमावली व मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू केली जाणार असून याबाबत विद्यापीठाने गुरुवारी परिपत्रक काढले आहे.

गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याबाबत मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर 'यूजीसी'ने विद्यापीठे व महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातील नियमावली प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू केली जाणार आहे.

Sakal 8.1.2021

## महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय अंगलट

### पुणे विद्यापीठाला खुलासा करण्याचा आदेश

पुणे, ता. ८ : राज्य शासनाची परवानगी नसतानाही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परस्पर महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय अंगलट आला आहे. हा निर्णय कोणत्या नियमांच्या आधारावर घेतला, याचा खुलासा करण्याचा आदेश उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठाला दिला आहे. त्यामुळे ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय मागे घेण्याची नामुष्की विद्यापीठावर आली आहे.

महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी समोर आल्याने पुणे विद्यापीठाने यासाठी समिती नेमली. समितीच्या अहवालानुसार, सुरक्षेच्या नियमांचे पालन करून ११ जानेवारीपासून प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता याच निर्णयामुळे खुलासा करण्याची पान ६ वर »

### शासन निर्णय कधी घेणार?

महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यापीठाला खुलासा करण्यास सांगण्यात आले आहे. मात्र, ऑनलाइन शिक्षणातील मर्यादा, प्रात्यक्षिक बंद असल्याने विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी थेट वर्ग सुरू करा, अशी मागणी होत आहे. शाळा सुरू झाली; पण महाविद्यालये सुरू झाली नाहीत. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दुर्लक्ष का होत आहे, असा प्रश्न काही प्राचार्यांनी 'सकाळ'शी बोलताना उपस्थित केला.

## विद्यापीठ, महाविद्यालयांसाठी आरोग्यविषयक नियमावली

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील महाविद्यालये व विद्यापीठे बंद होती. मात्र, विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करावे, अशा सूचना विद्यापीठ अनुदान मंडळाने दिल्या होत्या. त्यानुसार विविध शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकवले जात आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महाविद्यालय व विद्यापीठे सुरू करण्यासंदर्भात यूजीसीने नियमावली प्रसिद्ध केली आहे.

राज्य शासनाने व शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करून विद्यापीठ व महाविद्यालय सुरू करावीत, असेही यूजीसीने स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा. कोरोनाच्या फैलावासंदर्भात शैक्षणिक संस्थांनी जागृती करावी. महाविद्यालयातील वर्गामध्ये ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवून टप्प्याटप्प्याने विद्यार्थ्यांना शिकवण्याची प्रक्रिया सुरू करावी. महाविद्यालयात अनोळखी व्यक्तींना येण्यास मज्जाव करावा. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ओळखपत्राशिवाय शैक्षणिक संकुलात प्रवेश देऊ नये.

महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये मास्क बंधनकारक करावा, तसेच फिजिकल डिस्टन्सच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. यासह वसतिगृह प्रयोगशाळा उपहारगृह याबाबत कोणती काळजी घ्यावी, यासंदर्भात सविस्तर सूचना यूजीसीने दिल्या आहेत.

Kesari 9.1.2021

## महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय अंगलट

» पान I वरून
नामुष्की विद्यापीठावर आली आहे.

उच्च शिक्षण विभागाने याबाबत पुणे विद्यापीठाला गुरुवारी पत्र पाठवले आहे. त्यामध्ये राज्यातील अकृषी विद्यापीठांनी प्रत्यक्ष वर्ग हे 'यूजीसी'ने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार शासनाच्या मान्यतेने सुरू करणे आवश्यक होते. मात्र, पुणे विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकात ११ जानेवारीपासून प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याचे आदेश दिले. राज्य शासनाने कोणतेही आदेश दिले नसताना थेट वर्ग सुरू करण्याचा निर्णय कोणत्या नियमांच्या आधारे घेतला, याचा खुलासा करा, असा आदेश उच्च शिक्षण संचालकांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिला आहे. हे पत्र आल्यानंतर विद्यापीठाने सुधारित आदेश काढत महाविद्यालये सुरू करण्याची तारीख शासनाच्या आदेशानंतर कळविण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

**अहवाल स्वीकारला; पण...**

पुणे विद्यापीठाने समितीचा अहवाल स्वीकारून ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला; पण त्याचवेळी कोरोनाच्या आपत्तीमुळे शासनाने महाविद्यालये बंद केली. ती सुरू करताना शासनाची परवानगी आवश्यक आहे हे विद्यापीठातील अधिकाऱ्यांच्या लक्षात आले नाही. त्यामुळेच उच्च शिक्षण विभागाच्या पत्रानंतर एक पाऊल मागे घ्यावे लागले आहे. दरम्यान, याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

Sakaal 9.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## प्राचार्य भरतीवरील बंदी राज्य सरकारने उठविली

पुणे, ता. ८ : कोरोनामुळे शासकीय पदभरतीवर टाकलेली बंधने काही प्रमाणात शिथिल करत राज्य सरकारने राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील २६० प्राचार्यांची रिक्तपदे भरण्यास मान्यता दिली आहे. त्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शुक्रवारी (ता. ८) आदेश काढले.

गेल्याच महिन्यात राज्य शासनाने शिक्षक भरतीवरील बंदी उठवली आहे. राज्यभरातील महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. तसेच प्राचार्य नियुक्तीही कोरोनामुळे बंद झाली होती. महाविद्यालयांमध्ये प्राचार्य नसल्याने प्रशासकीय कामासह शैक्षणिक कामातही अडचणी येत होत्या. त्याचे नुकसान विद्यार्थ्यांना सहन करावे लागत आहे. त्यामुळे प्राध्यापक भरतीसह प्राचार्य भरतीही सुरू करावी अशी मागणी राज्य सरकारकडे केली जात होती. राज्यात २६० प्राचार्यांची पदे रिक्त आहेत, ही पदे भरण्यासाठी वित्त विभागाने मान्यता दिल्याने उच्च शिक्षण विभागाने हे आदेश काढले आहेत.

प्राचार्यांची रिक्त पदे भरताना यापूर्वी निश्चित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. प्राचार्य पदांसाठी प्राप्त होणारे प्रस्ताव संबंधित विभागीय सहसंचालकामार्फत तपासणी करून घ्यावेत. तसेच संगणक प्रणालीद्वारे ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावे, असे आदेश राज्य शासनाचे अवर सचिव व्ही. व्ही. दळवी यांनी परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

**प्राध्यापकबंदी कधी हटणार**

राज्यातील हजारो सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत, यंदा कोरोनामुळे तासिका तत्त्वावरील कामही बंद आहे. राज्य सरकारने बिंदू नामावलीचा घोळ संपवून प्राध्यापक भरतीवरील बंदी उठवावी, अशी मागणी केली जात आहे. परंतु, याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही.

**“ प्राचार्यांविना महाविद्यालय चालविणे अवघड आहे, त्यात विद्यार्थ्यांचेही नुकसान होत आहे. पदे भरण्याच्या निर्णयाबद्दल अभिनंदन.**

**- डॉ. सुधाकर जाधवर,**
सचिव, प्राचार्य महासंघ

Sakaal 9.1.2021

## परीक्षागोंधळाबाबत चर्चा होणार?

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अनुभव नसलेल्या आयटी कंपनीला अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी दिलेल्या कंत्राटामुळे निर्माण झालेला गोंधळ, प्रश्नपत्रिकेतील चुका, विद्यापीठ प्रशासनात समन्वय नसणे अशा महत्त्वांच्या प्रश्नांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटमध्ये आज, शनिवारी (९ जानेवारी) चर्चा होणार का, असा सवाल काही सदस्यांनी उपस्थित केला आहे.

**अजेंडा सिनेटचा**

राज्यातील इतर विद्यापीठांनी कमी खर्चात ऑनलाइन परीक्षा घेतल्या. मात्र, पुण्यात विद्यापीठाने एका विषयाच्या ऑनलाइन परीक्षेसाठी १५ रुपये खर्च केला. या जादा दराचा फायदा कोणाला झाला, असाही आरोप माजी सिनेट-सदस्यांकडून करण्यात येत आहे.

विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठीचे कंत्राट निविदा प्रक्रियेसाठी खासगी आयटी कंपनीला दिले. निविदा प्रक्रियेसाठी मुदत कमी असतानाही, या आयटी कंपनीने निविदा भरताना एका विषयाच्या परीक्षेसाठी ३० रुपये असा दर दिला होता. त्यानंतर कंत्राट मिळवण्यासाठी प्रत्यक्षात हा दर निम्म्यावर म्हणजे १५ रुपयांवर आणला गेला. त्यासाठी कंपनीचे अधिकारी विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटीसाठी आले होते. याचाच अर्थ हा दर आणखी कमी होऊ शकत होता. राज्यातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने; तसेच परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने १० रुपयांच्या आत दर निश्चित केला.

अशा परिस्थितीत पुणे विद्यापीठाने जादा दर का आकारला, त्याचा फायदा कोणाला झाला, असा आरोप माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी केला आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षांत प्रश्नांचा दर्जा नव्हता, ऑनलाइन परीक्षांत सामूहिक कॉपीचे प्रकार झाले, विद्यार्थ्यांनी गुगलचा वापर करून प्रश्नांची उत्तरे दिली; निकाल चुकले, या सर्वांमुळे परीक्षा केवळ नावापुरती झाल्याची चर्चा आहे. याबाबत विद्यापीठ प्रशासनाला जाब विचारण्याची आवश्यकता असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

**‘स्वतंत्र कक्ष सुरू करा’**


संग्रहित छायाचित्र

विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा वाढवण्याची मागणी केली आहे. त्यासाठी समान संधी कक्ष, अंध विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कक्ष, शिष्यवृत्तीच्या रकमेत ५० टक्के वाढ, विद्यार्थी सहायता आणि मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याबाबत ठराव मांडले आहेत. गेल्या काही वर्षांत विधी शाखेत संधी निर्माण होत आहेत. मात्र, केवळ नियमित अभ्यासक्रमामुळे विधी शाखेत पदवी घेऊ इच्छित असलेल्या नोकरी, व्यवसाय करणाऱ्यांना संधी मिळत नाहीत. त्यामुळे विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागातर्फे विधी पदवी अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा ठराव अधिसभा सदस्य विवेक बुचडे यांनी मांडला आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनांच्या रकमेत ५० टक्के वाढ करण्याचाही ठराव मांडला आहे.

Maharashtra Times 9.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# महाविद्यालये बंदच राहणार

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दबावामुळे विद्यापीठाने निर्णय मागे घेतल्याची चर्चा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाविद्यालये खुली करण्याच्या निर्णयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने माघार घेतली असून, याबाबतचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्ध केले आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठावर दबाव टाकल्याने, विद्यापीठाच्या प्रशासनाला निर्णय मागे घ्यावा लागला, अशी चर्चा शैक्षणिक वर्तुळात आहे. राज्यात शालेय विद्यार्थ्यांच्या शाळा सुरू होऊ शकतात; तर महाविद्यालये खुली होण्याबाबत प्राचार्य आग्रही असतानाही विद्यापीठ प्रशासनाने असा निर्णय का घ्यावा, याबाबत शंका निर्माण झाली आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे मार्च महिन्यापासून शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे बंद होते. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून, शैक्षणिक वर्षाला सुरुवात ही ऑनलाइन शिक्षणाद्वारे झाली. मात्र, या शिक्षणाला आयटी सुविधांची उपलब्धता, साधने, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आदींची अडचण येत होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. त्याला राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आता जानेवारीच्या अखेरीस प्राथमिक शाळा सुरू होण्याची शक्यता आहे. याउलट महाविद्यालयांमध्ये शिकणारे विद्यार्थी सज्ञान असतानाही, महाविद्यालये बंद होती. इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, कृषी अशा व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक आणि प्रकल्पांना महत्त्व आहे. मात्र, महाविद्यालये बंद असल्याने, प्रात्यक्षिक, प्रकल्प, शैक्षणिक भेटी अशा कोणत्याच गोष्टी होत नसल्याचे चित्र आहे. या परिस्थितीची जाण ठेवून विद्यापीठाने उशिरा का होईना; पण ११ जानेवारीपासून महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय गेल्या आठवड्यात घेतला होता.

### राज्य सरकारच्या आदेशानंतर निर्णय

विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाने मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी; तसेच पूर्वतयारीसाठी शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयांना काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या आदेशानंतरच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालये खुली करण्याबाबतची पुढील तारीख कळवण्यात येईल, असे प्रशासनाने जाहीर केले आहे.

### 'सरकार विद्यार्थ्यांप्रति असंवेदनशील'

'दहा महिन्यांपासून व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये बंद असल्याने, विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. सरकार असंवेदनशीलपणे वागत आहे. केवळ सरकारच्या अडवणुकीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, रोजगाराच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. राज्य सरकारने तातडीने महाविद्यालये सुरू करावीत; अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या रोषाला सामोरे जावे लागेल,' असा इशारा 'अभाविप'चे प्रदेश मंत्री स्वप्नील बेगडे यांनी दिला आहे.

### खुलासा सादर करण्याचे आदेश

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्य सरकारने विद्यापीठे व महाविद्यालये खुली करण्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नाहीत. विद्यापीठाने पारंपरिक शिक्षणासाठी वर्ग सुरू करण्याबाबतची कार्यवाही कोणत्या निर्णयाद्वारे केली, याबाबतचा खुलासा उच्चशिक्षण संचालनालयाला तत्काळ सादर करावा, असा आदेश संचालनालयाचे प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी दिला आहे.



### मटा भूमिका

येत्या सोमवारपासून (११ जानेवारी) शहरातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय एकाएकी रद्द करून पुढील आदेश मिळेपर्यंत तो लांबणीवर टाकण्यामागे नेमके तार्किक स्पष्टीकरण काय, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. शहरातील इयत्ता नववी ते बारावीच्या अनेक शाळा सुरू झाल्या आहेत आणि महाविद्यालये मात्र बंद असे विरोधाभासाचे चित्र सध्या आहे. एकीकडे प्रत्यक्ष अनुभवावर भर देणारे शिक्षण हवे, अशी भूमिका शिक्षण क्षेत्रात मांडली जात असताना, प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना तेच नाकारले जात आहे. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना तर भावी नोकरीसाठी प्रात्यक्षिकांतून मिळणारे ज्ञान अत्यावश्यक आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व ती खबरदारी घेऊन किमान प्रात्यक्षिकांसाठी तरी महाविद्यालयांची दारे उघडणे गरजेचे आहे.

Maharashtra Times 9.1.2021

१०॥ प्रभात पुणे, शनिवार, दि. ९ जानेवारी २०२१

## अधिसभा सदस्यांकडून प्रस्ताव : वेळापत्रकावर अभ्यासपूर्ण चर्चेची चिन्हे

# यंदा शैक्षणिक वर्ष वेळापत्रकात बदल व्हावा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ८ - करोनाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया प्रलंबित आहे. काही प्रवेशाची प्रक्रिया अजूनही सुरू आहे. त्यामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षातील वेळापत्रक पुनर्रचित करावा, असा प्रस्ताव सदस्यांनी अधिसभेत मांडला. त्यामुळे शैक्षणिक वर्षातील वेळापत्रकावर अभ्यासपूर्ण चर्चा होण्याची चिन्हे आहेत.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक दि. ९ ते १० जानेवारी रोज आहे. त्यानिमित्ताने अधिसभा सदस्यांनी प्रस्ताव व ठराव सादर केले आहेत. त्यात प्राचार्य संजय खरात यांनी यंदाच्या शैक्षणिक वर्षातील वेळापत्रकात बदल करावा, असा प्रस्ताव मांडला आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्नित व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयात प्रवेशप्रक्रिया पूर्णत्वास आले नाही. ही प्रवेशप्रक्रिया जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत यावर्षीच शैक्षणिक कॅलेंडर पुरर्चित करावा, असे प्राचार्य खरात यांनी प्रस्तावाद्वारे म्हटले आहे. दरवर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया ऑगस्टअखेर पूर्ण होतात. यंदा करोनाच्या प्रादुर्भावामुळे प्रवेश परीक्षा व त्याच्या निकालास दिरंगाई झाली. या सर्व गोष्टींचा विचार करता शैक्षणिक वेळापत्रकात बदल करणे योग्य राहणार असल्याचे काही सदस्यांचे म्हणणे आहे.



विद्यापीठात आणि संलग्न महाविद्यालयात शिकणाऱ्या अंध विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विभाग निर्माण करून त्यांच्याकडून शैक्षणिक शुल्क न घेता पदवीपूर्व ते पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण देण्याचा ठराव डॉ. बाळासाहेब सागडे यांनी मांडला आहे. माजी विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी पुन्हा जोडण्यासाठी त्यांचा दरवर्षी मेळावा घ्यावा आणि त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा ठराव मांडला आहे.

दरम्यान, केंद्रीय विद्यापीठांच्या धर्तीवर विद्यापीठ समान संधी कक्ष सुरू करून, त्याद्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना संवाद कौशल्ये, इंग्रजी संभाषण असे उपक्रम राबवावेत, असा ठरावा अधिसभा सदस्य राजीव साबडे यांनी मांडले आहेत.

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

मटा अँकर 'यूजीसी'चे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन

## शिक्षण-उद्योग मेळाचे मॉडेल पुण्यात शक्य

म. टा. प्रतिनिधी, पुणे

> पुण्यामध्ये शंभरहून अधिक वर्षांची परंपरा असलेल्या शिक्षण संस्था कात टाकत आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थाही नवे बदल स्वीकारत असून, स्वायत्त संस्थांचीही संख्या वाढते आहे. नव्या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय शिकून क्रेडिट जमा करता येणार आहेत.
>
> – डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, यूजीसी



'विद्यार्थ्यांना शिकता शिकता उद्योगांतील अनुभव मिळावा, वर्गात उद्योगांतील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे, उद्योग व शिक्षण संस्थांतील शिक्षकांना संशोधन संस्थांत संशोधन करता यावे आणि संशोधन संस्थांतील संशोधन उद्योगांना उपयोगी पडावे, अशा प्रकारचे मॉडेल आता निर्माण व्हायला हवे. शिक्षण संस्था, संशोधन संस्था आणि उद्योग असे जाळे असलेल्या पुण्यात याचा पथदर्शी प्रयोग होऊ शकतो,' असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुणे आवृत्तीच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'मटा फेसबुक लाइव्ह'मध्ये ते बोलत होते. सहसंपादक सिद्धार्थ केळकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. काही काळापूर्वी पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आसपासच्या परिसरात संशोधन संस्था, शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांचा मेळ घालून 'मेटायुनिव्हर्सिटी'चा प्रयोग राबविण्याची चर्चा झाली होती. असा प्रयोग शक्य आहे का, असे विचारले असता, डॉ. पटवर्धन यांनी वरील भूमिका मांडली. ते म्हणाले, 'नव्या शैक्षणिक धोरणातही क्लस्टर विद्यापीठांची भूमिका मांडण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'यूजीसी'चा 'वर्कलिंक्ड प्रोग्राम'ही उद्योग आणि शिक्षण संस्थांमध्ये मेळ घालण्याच्या उद्देशानेच तयार करण्यात आला आहे. पुण्याबाबत बोलायचे, तर पूर्वी काही उद्योग दहावीनंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळण्यासाठी अप्रेंटिसशिप करण्याची संधी देत असत. केवळ पदवी मिळविण्यापेक्षा अशा प्रकारे अनुभवातून शिकणे नक्कीच लाभदायक ठरते. असे प्रयोग नव्या स्वरूपात सुरू करणे गरजेचे आहे. पुण्यात एनसीसीएस, सी-डॅक, आयुका, एनसीआरए, एनसीएल अशा राष्ट्रीय संशोधन संस्था आहेत; तसेच आयटी आणि ऑटो हबही आहे. विद्यार्थ्यांना शिकता शिकता याठिकाणी इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली, तर ते त्यांच्या करिअरसाठी फायदेशीर ठरेल.'

'विद्यार्थ्यांनी करिअरचा विचार करताना आपली आवड आणि कल याचा विचार करावा. नव्या बदलांना सामोरे जाण्यासाठी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागणार आहेत, त्याकडेही लक्ष द्यावे,' असा सल्लाही डॉ. पटवर्धन यांनी दिला.

Maharashtra Times 9.1.2021

# पुणे विद्यापीठाची खरडपट्टी

## शासनाच्या परवानगीविना पदवी, पदव्युत्तर शिक्षण सुरू केल्याने उच्च शिक्षण विभागाने फटकारले

अनिकेत साठे, लोकसत्ता

**नाशिक :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग राज्य शासनाच्या परवानगीविना ११ जानेवारीपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्याचे धाडस विद्यापीठाच्या अंगाशी आले आहे. उच्च शिक्षण विभागाने खरडपट्टी काढल्यानंतर या निर्णयास स्थगिती देण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढावली आहे.

करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने पदवी, पदव्युत्तर महाविद्यालयांत नियमित वर्ग सुरू करता येतील की नाही, याविषयी आढावा घेण्यासाठी विद्यापीठाने प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. या समितीने पुणे, नाशिक, नगर जिल्ह्यांतील स्थितीचा आढावा घेतला. या समितीच्या अहवालाच्या आधारे विद्यापीठाने ११ जानेवारीपासून सर्व महाविद्यालयांत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालयात प्रत्यक्ष वर्ग सुरू करताना शासनाची मान्यता घेणे बंधनकारक आहे. परंतु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परिपत्रक जारी करत पदवी, पदव्युत्तरचे प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याचा निर्णय परस्पर घेतला. यावरून उच्च शिक्षण संचालकांनी विद्यापीठास फटकारले आहे. शासनाने कोणतेही आदेश दिले नसताना कोणत्या नियमाच्या आधारे हा निर्णय घेतला, याचा तात्काळ खुलासा मागितला आहे. यासंबंधीचे पत्र उच्च शिक्षण संचालनालयाने विद्यापीठास पाठविले आहे.

त्यानंतर विद्यापीठाने त्वरित महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयास स्थगिती दिली. महत्त्वाची बाब म्हणजे विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांनी महाविद्यालये सुरू करण्याची मागणी केल्याचे म्हटले गेले असले तरी अनेक प्राचार्यांकडे या संदर्भात विचारणा केली नसल्याचे उघड झाले आहे. विद्यापीठाकडून एकामागोमाग येणाऱ्या परिपत्रकांमुळे गोंधळाची स्थिती आहे.

### स्पष्टीकरण असे...

- उच्च शिक्षण विभागाने आक्षेप घेतलेला नाही. केवळ माहिती मागविली आहे. ती माहिती दिली जाईल. विद्यापीठाने गठित केलेल्या डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील समितीने स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन महविद्यालये हळूहळू सुरू करता येईल, असा कल व्यक्त केला. विद्यार्थी, प्राध्याप्कांसह प्राचार्यांची तशी मागणी असल्याचे निदर्शनास आणले. ११ जानेवारी रोजी सर्वच काही एकदम सुरू होणार नव्हते. प्रात्यक्षिक, प्रयोगशाळेतील कामे, संशोधनासंबंधी कामे, सादरीकरण असे हळूहळू सुरू करण्याचे नियोजन होते.
- विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी महाविद्यालयांना निर्जंतुकीकरण, सुरक्षित अंतराचे पथ्य आणि पायाभूत सुविधांची उभारणी यासाठी आणखी काही कालावधी लागणार आहे.
- आपत्ती व्यवस्थापन कायदा, जिल्हाधिकारी आणि शासन यांच्याकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर महाविद्यालये सुरू करण्याच्या नवीन तारखा जाहीर केल्या जातील, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी स्पष्ट केले.



लोकसत्ता Sat, 09 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57598315

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# राज्य लॉक, तरीही महाविद्यालये अनलॉक



**पुणे विद्यापीठाच्या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने मागवला खुलासा**

**आपलाच निर्णय फिरवण्याची विद्यापीठावर नामुष्की**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ८ - राज्यात जानेवारी अखेरपर्यंत लॉकडाऊन आहे. अशा परिस्थितीत राज्य शासनाची परवानगी न घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या ११ जानेवारी रोजी संलग्नित महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याबाबतचे दोन परिपत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रात संभ्रम वाढला आहे. राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून परवानगी न घेता पुणे विद्यापीठाने हा निर्णय घेतल्याने, त्यांचाच निर्णय आता अंगलट आला आहे. याप्रकरणी उच्च शिक्षण विभागाने पुणे विद्यापीठाला खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहे.**

पुणे विद्यापीठाने घाईत महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. याउलट विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थानिक परिस्थिती आणि राज्य शासन नियमाच्या अधिन राहून महाविद्यालय सुरू करण्यास मुभा दिली आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाने महाविद्यालये सुरू करण्याचा कोणताच निर्णय घेतलेला नाही. परंतु, राज्य शासनाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करीत पुणे विद्यापीठाने थाटात महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने त्याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

राज्य शासनाकडून टप्प्याटप्प्याने शाळा सुरू करण्यात येत आहे. त्यातच आता ब्रिटन स्ट्रेनचे रुग्ण आढळल्याने राज्य शासनाची चिंता वाढली आहे. त्याचप्रमाणे ३१ जानेवारीपर्यंत लॉकडाऊन आहे. ही परिस्थिती असताना विद्यापीठाने कोणत्या आधारावर महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला, असा प्रश्न निर्माण होत आहे. समितीने निर्णय घेतला असला तरी कुलगुरू आणि प्र-कुलगुरुंनी यांनी राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे शिक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

> "पुणे विद्यापीठाने महाविद्यालय सुरू करण्याचे परिपत्रक काढले. तेच रद्द करीत सुधारित परिपत्रक काढले जाते. त्यावरून संभ्रम वाढत आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या नियमांच्या अधिन राहून अभ्यासपूर्ण परिपत्रक काढणे अपेक्षित आहे.
>
> - प्राचार्य नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ"

## तूर्तास महाविद्यालये सुरू होणे अशक्य

विद्यापीठाने नव्याने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकावरून महाविद्यालये दि. ११ जानेवारीपासून सुरू होणार नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या निर्णयानंतर महाविद्यालये सुरू होतील. त्यामुळे महाविद्यालये इतक्यात सुरू होतील, याची शक्यता कमी आहे. एकूणच विद्यापीठाने अतिघाई करीत विद्यार्थी व पालकांमध्ये गोंधळ वाढविला आहे.

## पुणे विद्यापीठाला खुलासा सादर करण्याचे निर्देश

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार शासनाने कोणतेही आदेश निर्गमित केलेले नसतानासुद्धा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ११ जानेवारीपासून वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. कोणत्या नियमाच्या आधारे हा निर्णय घेतला, त्याबाबतचा अहवाल तत्काळ सादर करावा, असे आदेश उच्च शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी सुयश दुसारे यांनी दिले.

## दोन परिपत्रकावरून संभ्रम

पुणे विद्यापीठाने दि. ४ जानेवारी रोजी परिपत्रक प्रसिद्ध करून ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले. राज्य शासनाने परवानगीच दिली नसताना हा निर्णय घेतलाच कसा? असा प्रश्न आहे. या परिपत्रकावरून चूक लक्षात येताच पुन्हा दि. ७ जानेवारी रोजी नव्याने परिपत्रक प्रसिद्ध केले. त्यात महाविद्यालये राज्य शासनाच्या नियमाला अनुसरून सुरू होतील, असे नमूद केले. म्हणजेच दि. ४ जानेवारीचे परिपत्रकच रद्द झाल्यासारखे आहे. महाविद्यालये कधी सुरू होणार आहेत, याचा कोणताच उल्लेख परिपत्रकात नाही. त्यामुळे गोंधळात भर पडली आहे.

Prabhat 9.1.2021

पुढारी

# अंतिम वर्ष परीक्षांवरून सिनेट गाजणार



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी अनुभव नसलेल्या आयटी कंपनीला दिलेल्या कंत्राटामुळे निर्माण झालेला गोंधळ, प्रश्नपत्रिकेतील चुका, विद्यापीठ प्रशासनामध्ये समन्वय नसणे आदी महत्त्वाच्या प्रश्नांवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटमध्ये आज शनिवारी ९ जानेवारीला वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठीचे कंत्राट निविदा प्रक्रियेसाठी खासगी आयटी कंपनीला दिले. निविदा प्रक्रियेसाठी मुदत कमी असतानाही या आयटी कंपनीने निविदा भरताना एका विषयाच्या परीक्षेसाठी ३० रुपये, असा दर दिला होता. त्यानंतर कंत्राट मिळवण्यासाठी प्रत्यक्षात हा दर निम्म्यावर म्हणजे १५ रुपयांवर आणला गेला. राज्यातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने; तसेच परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने दहा रुपयांच्या आत दर निश्चित केला. अशा परिस्थितीत पुणे विद्यापीठाने जादा दर का आकारला, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षांमध्ये प्रश्नांचा दर्जा नव्हता, ऑनलाइन परीक्षांमध्ये सामूहिक कॉपी प्रकार झाले, विद्यार्थ्यांनी गुगलचा वापर करून प्रश्नांची उत्तरे दिली, निकाल चुकले, या सर्वांमुळे परीक्षांची केवळ औपचारिकताच पार पाडली गेली. त्यामुळे अधिसभा सदस्यांकडून याबाबत विद्यापीठ प्रशासनाला विचारणा होण्याची शक्यता आहे.

## विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कक्ष व केंद्र सुरू करा

अधिसभा सदस्यांनी विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा वाढवण्याची मागणी केली आहे. त्यासाठी समान संधी कक्ष, अंध विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कक्ष, शिष्यवृत्तीच्या रकमेत ५० टक्के वाढ, विद्यार्थी सहायता आणि मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याबाबत ठराव मांडले आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये विधी शाखेत संधी निर्माण होत आहेत. मात्र, केवळ नियमित अभ्यासक्रमामुळे विधी शाखेत पदवी घेऊ इच्छित असलेल्या नोकरी, व्यवसाय करणाऱ्यांना संधी मिळत नाहीत. त्यामुळे विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागातर्फे विधी पदवी अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा ठराव अधिसभा सदस्य विवेक बुचडे यांनी मांडला आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनांच्या रकमेत ५० टक्के वाढ करण्याचाही ठराव मांडला आहे.

Pune Edition
Jan 9, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

# महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय कशाच्या आधारे घेतला?

## संचालनालयाकडून विद्यापीठाला विचारणा; महाविद्यालये सुरू करण्याचा आदेश स्थगित

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून येत्या ११ जानेवारीपासून पदवी व पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिके सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे; परंतु विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनेसंदर्भात शासनाने कोणतेही आदेश दिलेले नसतानासुद्धा विद्यापीठाने वर्ग सुरू करण्यासंदर्भात घेतलेला निर्णय कोणत्या नियमाच्या आधारे घेतला आहे. याबाबतचा खुलासा तत्काळ उच्च शिक्षण संचालनालयास करावा, असे स्पष्ट आदेश प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिले आहेत.

राज्यात नववी ते बारावीचे वर्ग सुरू झाल्यानंतर महाविद्यालये सुरू करण्यासाठीची चाचपणी सुरू झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यासाठी डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. या समितीने सर्व घटकांशी चर्चा करून ४ जानेवारीला विद्यापीठाला अहवाल दिला. त्यानंतर विद्यापीठाने ११ जानेवारीपासून पदव्युत्तर पदवी, पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालये सुरू करण्याचे निर्देश दिले होते. सुरुवातीला विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयात येण्याची मुभा देण्यात आली, तर सत्र परीक्षेनंतर प्रत्यक्ष अध्यापन सुरू करण्यात येणार होते, तशा सूचना विद्यापीठाच्या वतीने देण्यात आल्या होत्या. मात्र हा निर्णय आता स्थगित करण्यात आला आहे.

> उच्च शिक्षण संचालनालयाकडून पत्र प्राप्त झाले आहे. मागितलेली माहिती विनाविलंब सादर करण्यात येईल.
>
> **- डॉ. प्रफुल्ल पवार,**
> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

महाविद्यालयांमध्ये वर्ग सुरू करण्यासाठी सुरक्षिततेचे विविध उपाय करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, महाविद्यालयांनी त्याबाबतची काळजी घेणे आवश्यक आहे. महाविद्यालय सुरू करण्याची तारीख राज्य शासनाच्या निर्देशानंतर जाहीर करण्यात येईल, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू होण्याचा निर्णय बारगळला असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, विद्यापीठे, महाविद्यालये सुरू करीत असताना राज्य सरकार, तसेच आरोग्य विभागाच्या नियमांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे लागणार आहे. विद्यापीठाने मात्र परस्पर निर्णय घेतल्यामुळे उच्च शिक्षण संचालनालयाकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

Pune Edition
Jan 9, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# SPPU gets show-cause notice on reopening from higher edu dept

**SwatiShindeGole**
**@timesgroup.com**

**Pune:** The state directorate of higher education issued a show-cause notice to Savitribai Phule Pune University (SPPU) on Thursday seeking to know on what basis was the reopening for colleges declared through a circular on January 4.

The notice stated that neither had the state government decided about the reopening of colleges nor did the University Grants Commission (UGC) guidelines say so. Yet, the university had declared that its departments and colleges in Pune, Nashik and Ahmednagar would open for physical classes from January 11. There are 800 colleges under the university.

DHE administrative officer Suyash Dusane said the reason for issuing the circular must be sent to the department at the earliest. Following this notice, the university put out a new circular late on Thursday postponing the reopening.



The university had said colleges in Pune, Nashik and Ahmednagar would reopen from January 11

SPPU registrar Prafulla Pawar said, "We respect the communication received from the state higher education department. We are seeking details about the decision for the reopening. We shall soon provide all the information sought promptly to the DHE."

The DHE notice said there are guidelines issued by the Union government and UGC to be followed by universities and colleges in the before reopening. State governments must declare the area safe for reopening of educational institutions, and state and private universities should be reopened as per the decision of the respective state governments.

The government should prepare a region-specific plan, instead of a uniform plan for the entire state, and issue standard operating procedures to vice-chancellors and principals, it added.

When contacted, SP College principal V M Solapurkar said, "We have been preparing for the reopening for a while and have been scheduling classes. The university has to consider hundreds of colleges and their preparedness after which it can allow them to reopen."

The Times of India 9.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## SPPU senate meet to decide on shorter syllabus

**Dheeraj Bengrut**

puneletters@htlive.com

PUNE The senate meeting of the Savitribai Phule Pune University (SPPU) is scheduled on January 9 and 10. Senate members have taken up several important issues for discussion at the meeting.

Reduction of syllabus by 30 per cent and slashing exam fees for the next academic year are some of the points to be discussed at the meeting.

Dr Motiram Deshmukh, a senate member, has proposed reduction of the syllabus by 30 per cent for various courses of the SPPU.

Also, SPPU is to take all the college principals into consultation about further examinations to be held.

Another SPPU senate member Ravaji Deshmukh said, "The SPPU should increase funds sanctioned for students through various policies and programmes.

"Rural students should be considered as they face several issues while attending online classes and it is important to help them for online education."

Dadabhau Sinalkar, also an SPPU senate member, said, "Concessions in fees should be given to students who are from farmer families and whose parents have suffered a financial crisis due to the Covid-19 pandemic.

"Also, scholarships should be given to students so studies are not affected due to fee-related issues."

Hindustan Times 9.1.2021

## Parents urge edu dept to drop FCFS mode admissions

### Claim it is unfair to pupils securing merit-based seats

**Sukhada.Khandge@timesgroup.com**

TWEETS @Sukhadak_Mirror

While tthe online admission process for Class XI students in the state is still going on, Maharashtra education department has announced that the admissions for the remaining seats will be done on a first-come-first-serve (FCFS) basis, adding that it would be the final chance for students to secure their admission.

Confirming the developments, state education minister Varsha Gaikwad even tweeted to say that the FCFS mode will be announced soon.

Miffed with the announcements, parents' organisations have written to the school education department, urging it to revoke the decision. Citing that the move does not justify the admission process, parents are of the opinion that giving preference to the FCFS method would discredit merit and do grave injustice to students who are yet to bag admission and even those who have completed the process.

Commenting on the move, Kalpesh Yadav, a representative of a parents' organisation, said, "While the first few admission rounds were completed based on merit, the state education department cannot suddenly shift gear and alter its stand and put students at risk."

Parents fear that the new directives will allow students with average results to bag admissions in colleges, compromising the academic process further.

A parent whose ward has got admission in the science stream in a college added, "It is unfair towards students who have already been allotted seats based on merit, as now the remaining slots are set to be filled merely on FCFS basis."

"Authorities had announced a similar move last year as well, which was cancelled later. Why then is the state education department so eager to implement it again?" asked Yadav.

Elaborating on the changes, Dattatray Jagtap, director, school education department (secondary), said, "We will tally the admissions in the fifth round and fill the remaining seats through an FCFS basis. If we keep relying on the merit-based admissions, the process will keep dragging. We will soon come to a decision on how to go about it. We are working on how to implement it. If problems arise, those will be addressed."

Pune Mirror 9.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

लोकमत

## ऋषितुल्य व्यक्तिमत्वाला आपण मुकलो

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : डॉ. प्र. चिं. शेजवलकर हे अतिशय ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते. त्यांनी व्यवस्थापन क्षेत्रात विपुल कार्य केले. त्यांच्या जाण्याने या क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे कार्य न विसरता येण्यासारखे आहे, अशी श्रध्दांजली विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वाहिली.



### शेजवलकर यांना १८ संस्थांकडून जीवनगौरव पुरस्कार

पुणे महापालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ वर्ल्ड मॅनेजमेंट कॉंग्रेस, नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट, बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटना, एमआयटी टीचर्स कॉंग्रेस, पुणे रोटरी इंटरनॅशनल यांसह विविध संस्थांतर्फे १८ वेळा जीवनगौरव पुरस्कार

### शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे योगदान मोलाचे

पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्रात डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे योगदान मोलाचे होते. त्या संस्थेमध्ये अनेक सेवाभावी आणि उत्तम शिक्षक अध्यापक यांचा समावेश असल्याने महाविद्यालयांची शैक्षणिक क्षेत्रात उंची होती. तिथे पोहोचण्यासाठी ज्यांनी मोलाची कामगिरी केली. त्यामध्ये डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांचे स्थान निर्विवाद आहे. पुणे शहर शैक्षणिक क्षेत्रात पुढे आहे तसेच औद्योगिक क्षेत्रातही प्रगत आहे. त्या क्षेत्राला सतत मार्गदर्शन करण्यामध्ये डॉ. शेजवलकर यांचा वाटा मोठा होता. त्यांनी हजारो विद्यार्थी तयार केले. औद्योगिकरणाला आवश्यक मनुष्यबळ तयार करण्यासाठीही डॉ. शेजवलकर यांची कामगिरी मोलाची होती. फर्ग्युसन, बीएमसीसी या संस्थांमार्फत हे योगदान त्यांनी दिले. मला स्वतःला त्यांचा विद्यार्थी म्हणून निश्चित लाभ झाला. असे उत्तम शिक्षक आमच्यामध्ये राहिले नाहीत, याचे दुःख आहे.

**- शरद पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री**

एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्व गेले आहे. विद्यापीठाचे आणि त्यांचे जवळचे नाते होते. राज्यपाल नियुक्त सल्लागार सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले. डॉ.शेजवलकर यांच्या जाण्याने व्यवस्थापन क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

**- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

शेजवलकर यांनी व्यवस्थापन संस्थांची पायाभरणी केली. व्यवस्थापन क्षेत्रात अध्यापन आणि संशोधनातही मोलाचे योगदान दिले.वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्रातील गुरू गेले आहे.

**- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

प्र. चिं. शेजवलकर यांचे साहित्य परिषदेशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. मराठी ज्ञानभाषा व्हावी, असा त्यांचा आग्रह होता. व्यवस्थापनविश्वाचे शिल्पकार, मॅनेजमेंट गुरु, साहित्यावर निखळ प्रेम करणारे व्यक्तिमत्व असे त्यांचे वर्णन करता येईल. शेजवलकर यांच्या निधनामुळे आपण अत्यंत जवळची व्यक्ती गमावल्याची भावना निर्माण झाली आहे.

**- प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद**

मॅनेजमेंट गुरु म्हणून ओळखले जाणारे डॉ. शेजवलकर जीवनविद्यागुरु होते. साहित्य, शिक्षण, संस्कृती या क्षेत्रातील त्यांचे चिंतनशील व्यक्तिमत्व शेवटपर्यंत प्रेरणादायी होते. अफाट समाजसंपर्क असलेला ज्ञानव्रती ही त्यांची ओळख न विसरता येण्यासारखी आहे.

**- डॉ. न. म. जोशी, शिक्षणतज्ज्ञ**

Hello Pune
Page No. 6 Jan 09, 2021
Powered by: erelego.com

## महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय मागे

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) - राज्य शासनाची परवानगी नसतानाही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परस्पर महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय कोणत्या नियमांच्या आधारावर घेतला, याचा खुलासा करण्याचा आदेश उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठाला दिला आहे. त्यामुळे ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय मागे घेण्याची नामुष्की विद्यापीठावर आली आहे.

महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी समोर आल्याने पुणे विद्यापीठाने यासाठी समिती नेमली. समितीच्या अहवालानुसार सुरक्षेच्या नियमांचे पालन करून ११ जानेवारीपासून प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता याच निर्णयामुळे खुलासा करण्याची वेळ विद्यापीठावर आली आहे.

उच्च शिक्षण विभागाने याबाबत पुणे विद्यापीठाला गुरुवारी पत्र पाठवले आहे. त्यामध्ये राज्यातील अकृषी विद्यापीठांनी प्रत्यक्ष वर्ग हे यूजीसीने दिलेल्या मार्गदर्शक



### विद्यापीठावर ओढवली नामुष्की

सूचनेनुसार शासनाच्या मान्यतेने सुरू करणे आवश्यक होते. मात्र, पुणे विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकात ११ जानेवारीपासून प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याचे आदेश दिले. राज्य शासनाने कोणतेही आदेश दिले नसताना थेट वर्ग सुरू करण्याचा निर्णय कोणत्या नियमांच्या आधारे घेतला, याचा खुलासा करा, असा आदेश उच्च शिक्षण संचालकांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिला आहे.

हे पत्र आल्यानंतर विद्यापीठाने सुधारित आदेश काढत महाविद्यालये सुरू करण्याची तारीख शासनाच्या आदेशानंतर कळविण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

Saamana 10.1.2021

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

## महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय लवकरच

### उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत : ८ ते १० दिवसांत सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करणार

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. ९ - राज्यात करोनाचा प्रादुर्भात कमी होत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेला प्राधान्य देत येत्या २० तारखेपर्यंत महाविद्यालय सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे राज्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी स्पष्ट केले. त्यामुळे आता लवकरच महाविद्यालये सुरू होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

सध्या करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असला तरी मुख्यमंत्र्यांच्या आव्हानांना प्रतिसाद देत सुरक्षिततेचे नियम पाळणे हे कर्तव्य आहे. त्यामुळे महाविद्यालये उघडण्याचा निर्णयास उशीर होत आहे. मात्र, आता राज्य शासन राज्यात सर्व महाविद्यालये सुरू करण्याचा विचार करीत आहेत. येत्या ८ ते १० दिवसांत सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी यासंदर्भात चर्चा केली जाणार आहेत. त्यात प्रत्येक विद्यापीठांमधील वसतिगृहांची स्थिती, महाविद्यालयांची स्थिती आणि तेथील क्वारंटाईन सेंटर बंद झाली का? याचा आढावा उच्च शिक्षण विभागातर्फे घेतला जाणार आहे. त्यानंतर २० जानेवारीपूर्वी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी संवाद साधून ५० टक्के विद्यार्थी उपस्थितीमध्ये महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे सामंत यांनी फेसबुक लाइव्हद्वारे केलेल्या संवादात सांगितले. (पान २ पहा) ▸▸

### विधी व तंत्रशिक्षण प्रवेशाला मुदतवाढ

विधी (लॉ) अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेत तांत्रिक अडचणी आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे येत्या सोमवार व मंगळवार असे दोन दिवस प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. या दोन दिवसांत विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करावेत, असे आवाहन उदय सामंत यांनी केले. तसेच पॉलिटेक्निकसह अन्य तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ८ जानेवारी अंतिम मुदत होती. मात्र, विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेऊन १५ तारखेपर्यंत मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.

## महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय...

प्राचार्यांची २६० पदे व विद्यापीठातील ४९ संवैधानिक पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच प्राध्यापकांची पदे भरण्याच्या निर्णय लवकरच होणार असल्याचे सामत यांनी म्हटले. प्राध्यापक भरतीला मान्यता दिली होती. परंतु, करोना काळात कोणतीही भरती प्रक्रिया करू नये, असा अध्यादेश राज्य शासनातर्फे काढण्यात आला. त्यामुळे सध्या प्राध्यापकांची पदे भरली जात नाहीत. यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली असून, लवकरच प्राध्यापक भरतीचा निर्णय होणार असल्याचे ते म्हणाले.

Prabhat 10.1.2021

प्रभात पुणे, रविवार, दि. १० जानेवारी २०२१ || ५

## 'ऑनलाइन' प्रश्नी विद्यापीठाचीच 'परीक्षा'

### यापुढील परीक्षा ऑफलाइन घेण्याचा अधिसभा सदस्यांचा आग्रह

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - करोनामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन घेतल्या. आता पुढच्याही परीक्षा ऑनलाइन घ्यायची तयारी आहे. मात्र, ही परीक्षा पद्धत विद्यार्थ्यांसाठी जाचक आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची उदाहरणे देत अधिसभा सदस्यांनी 'ऑनलाइन परीक्षा नकोच,' असा सूर आळवला. यापुढच्या परीक्षा पहिल्याप्रमाणे म्हणजेच ऑफलाइन झाल्या पाहिजे, अशी आग्रही मागणी केली. यावर आता विद्यापीठ काय निर्णय घेणार, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष आहे.

अधिसभेच्या दुपारच्या सत्रात डॉ. पंकज मिनियार यांनी ऑनलाइन परीक्षेचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर विद्यापीठाने एकूण १६ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी तक्रार अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १६ हजार ३०९ विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण केल्याचे सांगितले. आतापर्यंत ऑनलाइन परीक्षेवर ३ कोटी ४२ लाख रुपयांचा खर्च आला आहे. परीक्षेचे काम एजन्सीकडे देऊन विद्यापीठाची सर्व यंत्रणा कामास लागली. त्यामुळे एजन्सीच्या कार्यपद्धतीवर अधिसभा सदस्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेत अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध केले. परंतु अनेक विद्यार्थी असे आहेत की त्यांनी तक्रारी केल्या नाहीत. एवढेच नव्हे, अंतिम वर्षाची परीक्षा घेताना सामूहिकपणे एकमेकांना मदत करत विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याचे सदस्यांनी सभागृहास निदर्शनास आणून दिले.

### स्वतंत्रपणे प्रवेश परीक्षा नाहीच

विद्यापीठ संलग्नित अनेक महाविद्यालये अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड पडत आहे, असा प्रश्न अधिसभा सदस्यांनी उपस्थित केला. अशा महाविद्यालयांना स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्यास प्रतिबंध करावा, अशी शिफारस सदस्यांनी केली. त्यावर प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी कोणत्याही महाविद्यालयांना स्वतंत्रपणे प्रवेश परीक्षा घेता येणार नाही. याउलट ही परीक्षा घेतली तरी ती नियमबाह्य राहील, असेही ते म्हणाले.

### अभ्यासक्रम कपातीबाबत समिती

करोनामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले नाही, त्यामुळे अभ्यासक्रमात कपात करावी. परीक्षा घेऊ नये. अशा परिणामांचे विश्लेषण करून अहवाल मांडण्यासाठी समिती नेमली जाईल, असा निर्णय अधिसभेच्या बैठकीत मान्य करण्यात आला.

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## मुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतरच कॉलेज सुरू

### 20 जानेवारीपर्यंत निर्णय घेण्याची सामंत यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे



उदय सामंत

'विद्यार्थ्यांचा करोनापासून बचाव व्हावा, यासाठीच अद्याप महाविद्यालये सुरू करण्यात आलेली नाहीत. मात्र, करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने प्रशासनाकडून परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून २० जानेवारीपर्यंत पन्नास टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल,' असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी स्पष्ट केले. विधी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दोन दिवस, तर तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिल्याचेही त्यांनी जाहीर केले.

येत्या ११ जानेवारीपासून प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नुकताच घेतला होता. मात्र, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दबावापोटी हा निर्णय मागे घेण्याची नामुष्की विद्यापीठावर ओढावली. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी 'फेसबुक लाइव्ह'द्वारे आपली भूमिका स्पष्ट केली. करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असून लसीकरणही लवकरच सुरू होणार आहे. मात्र, सुरक्षितता पाळणे हे आपले कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात पाठवावे की नाही, अशी शंका पालकांना आहे. त्यामुळे येत्या आठ ते दहा दिवसांत सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून तेथील परिस्थिती, क्वारंटाइन सेंटर, वसतिगृहांची माहिती घेण्यात येईल. त्यानंतर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून २० जानेवारीपर्यंत आम्ही निर्णय जाहीर करू, असेही सामंत म्हणाले.

'प्राध्यापक भरतीबाबत; तसेच विद्यापीठातील पदे भरण्याबाबतही राज्य सरकार सकारात्मक आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे,' असे सामंत यांनी सांगितले. मास्टर दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयासाठी पं. हृदयनाथ मंगेशकरांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल,असेही सामंत म्हणाले.

### प्रवेशप्रक्रियेला मुदतवाढ

- विधी अभ्यासक्रमांसाठी ११ व १२ जानेवारी रोजीही प्रवेश घेता येणार.
- तंत्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेशांसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ.
- तंत्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेशांसाठी १५ जानेवारी हीच अंतिम मुदत.

### 'महाविद्यालय बंद'चे पडसाद सिनेटमध्ये

पुणे : उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दबावाखाली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक विभाग व महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय मागे घेतल्याचे पडसाद शनिवारी सिनेटच्या बैठकीत उमटले. हा विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर घाला असल्याचा संताप सदस्यांनी व्यक्त केला. 'राज्यात शाळा सुरू होऊ शकतात, मद्यालये सुरू होऊ शकतात, तर महाविद्यालये का नाहीत,' असा प्रश्न सदस्यांनी केला. 'तीन ते चार दिवसांत महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय घेऊ,' अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली सिनेट बैठकीला सुरुवात झाल्यानंतर प्रथम याच मुद्द्यावर चर्चा झाली. 'विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालये खुली करावीत,' अशी भूमिका सदस्यांनी मांडली.

▶▶ सविस्तर वृत्त...३

Maharashtra Times 10.1.2021

## अधिसभेत ऑफलाइन परीक्षेचा आग्रह

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेदरम्यान उडालेल्या गोंधळाची, तसेच विद्यार्थ्यांनी कॉपी करण्यासाठी लढवलेल्या युक्त्यांची माहिती देत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे वाभाडे काढले. त्याचप्रमाणे चांगल्या वातावरणात ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नसेल, तर केवळ ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा घ्यावी, असा आग्रह धरला.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी पार पडली. परीक्षा विभागाने घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेवर अधिसभा सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना परीक्षा देताना आलेल्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठाची यंत्रणा अपुरी पडली. तसेच विद्यार्थी उद्यानामध्ये एकत्र येऊन ग्रुप करून परीक्षा देत असल्याचे दिसून आल्याची माहिती अधिसभा सदस्यांनी दिली. परीक्षेसाठी विचारलेले प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे व हास्यास्पद असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

विद्यापीठाने परीक्षेसाठी निवडलेल्या एजन्सीच्या क्षमतेवर यावेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले. हजारो विद्यार्थ्यांनी परीक्षेबाबत विद्यापीठाकडे तक्रारी केल्या. विद्यापीठाकडून अनेक विद्यार्थ्यांचा चुकीचा निकाल जाहीर केला. ऑनलाईन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक गुण मिळाले. ऑनलाईन परीक्षेत होत असलेल्या गोंधळामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकाला धक्का पोहचत आहे.

Lokmat 10.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## प्राचार्यभरतीचा मार्ग अखेर मोकळा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील महाविद्यालयांमध्ये रखडलेल्या प्राचार्यभरतीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्य सरकारने प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे राज्यातील सुमारे २६० महाविद्यालयांना नवे प्राचार्य मिळणार आहेत.

करोनामुळे सरकारच्या तिजोरीवर आलेला ताण लक्षात घेता सरकारी पदभरतीवर बंदी घालण्यात आली होती. राज्य सरकारने राज्यातील अनुदानित महाविद्यालयांतील २६० प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली. याबाबतचा अध्यादेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नुकताच प्रसिद्ध केला. राज्यातील अनुदानित महाविद्यालयात २६० प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यासाठी वित्त विभागाने मान्यता दिल्यानंतर राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने हे आदेश काढले. प्राचार्यांची रिक्त पदे भरताना यापूर्वी केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. या पदांसाठी येणारे प्रस्ताव संबंधित विभागीय संचालकांमार्फत तपासून घ्यावेत; तसेच संगणक प्रणालीद्वारे 'ना-हरकत' प्रमाणपत्रासाठी शासन मान्यतेसाठी सादर करावे, असे या अध्यादेशात नमूद करण्यात आले आहे.



### प्राध्यापक भरतीची मागणी

प्राचार्य भरतीला मान्यता दिल्यानंतर आता प्राध्यापक भरती सुरू करण्याची मागणी जोर धरत आहेत. राज्यात सहायक प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त आहेत. त्यातच करोनामुळे महाविद्यालये बंद असल्याने तासिका तत्त्वावरील व्याख्यानेही बंद असल्याने उमेदवार अडचणीत आले आहेत.

Maharashtra Times 10.1.2021

## 'पुणे विद्यापीठ' अधिसभेत शासनाचा निषेध

### शासनाने मागवला खुलासा ; अधिसभा सदस्यांकडून निषेध

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या ११ जानेवारीपासून संलग्न महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, राज्य शासनाच्या परवानगीशिवाय विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याचे जाहीर कसे केले? याबाबत राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठाकडे खुलासा मागितला आहे. त्याचा निषेध या विद्यापीठाच्या अधिसभेत करण्यात आला.

पुणे विद्यापीठाने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालये टप्प्या टप्प्याने सुरू करण्याचा निर्णय घेतला. प्रथमत: विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक (प्रॅक्टिकल) घेण्याचे निश्चित करण्यात आले. मात्र,राज्य शासनाची व स्थानिक प्रशासनाची परवानगी न घेताच विद्यापीठाने महाविद्यालय सुरू करण्याची घोषणा केल्यामुळे उच्च शिक्षण विभागाने विद्यापीठाला याबाबत जाब विचारला आहे. विद्यापीठाकडून खुलासा मागवणे म्हणजे विद्यापीठाच्या स्वयत्ततेवर घाला घातल्यासारखे आहे,असे मत काही अधिसभा सदस्यांनी मांडले.

सध्या शासनाने हॉटेल्स, मंदीरे, मॉल सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे महाविद्यालये सुध्दा सुरू झाली पाहिजेत. यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला. मात्र,शासनाने याबद्दल खुलासा मागवणे हे निषेधार्ह आहे,असेही काही अधिसभा सदस्य म्हणाले.तर पुढील तीन ते चार दिवसात महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठ सकारात्मक निर्णय घेईल, असे प्र-कुलगुरू डॉ.एन.एस.उमराणी यांनी स्पष्ट केले.

### विद्यापीठाच्या घाईबाबत नाराजी



विद्यापीठाने केलेल्या घोषणेमुळे पुण्याबाहेर किंवा गावी असलेल्या विद्यार्थ्यांनी पुण्यात येण्याची तयारी सुरु केली. मात्र, विद्यापीठाने शासन मान्यतेनंतर महाविद्यालये सुरु करण्याचे पत्रक प्रसिध्द न केल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्याच काही प्राचार्यांनी विद्यापीठाने केलेल्या घाईबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच स्थानिक प्रशासनाच्या परवानगीनंतरच विद्यापीठाने महाविद्यालये जाहीर करणे अपेक्षित होते.विद्यापीठाने ही परवानगी घेतली नाही. त्यामुळे आता विद्यापीठाला खुलासा सादर करावा लागणार आहे.

Lokmat 10.1.2021

## मद्यालये सुरू झाली, महाविद्यालये का नाही ?

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत सवाल ; राज्य सरकारच्या कारभारावर टीका

पुणे, ता. ९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने आक्षेप घेतल्याचे पडसाद विद्यापीठाच्या अधिसभेत उमटले. मद्यालये सुरू झाली, मग महाविद्यालये कधी सुरू करणार, अशी टीका अधिसभेत राज्य सरकारच्या कारभारावर करण्यात आली.

शनिवारी पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या मनोगतावर अभिनंदन ठराव मांडताना महेश आबाळे यांनी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय योग्य होता, असे सांगितले. बागेश्री मंठाळकर म्हणाल्या, "राज्यात सुरुवातीला मद्यालये, नंतर देवालये, विद्यालये सुरू झाली; पण महाविद्यालये बंद आहेत. मद्यालये महसूल देतात म्हणून सुरू केली; पण जर कोरोनामुळे २०२२ पर्यंत महाविद्यालये सुरू करता येणार नसतील, तर तसे स्पष्ट करावे. विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर घाला घातला जात असेल तर सदस्यांनी एकत्र आले पाहिजे."

डॉ. श्यामकांत देशमुख म्हणाले, 'विद्यापीठाने समिती स्थापन करून त्यांच्या अहवालानुसार महाविद्यालये सुरू करण्यासाठी एक पाऊल पुढे उचलले आहे. तांत्रिक अडचणी असतील; पण विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर बाधा येऊ नये. नियमांचे पालन करून महाविद्यालये सुरु करण्याचा विचार करावा."

'आम्हालाही महाविद्यालये सुरू व्हावीत, असेच वाटत आहे; पण शासनाने विद्यापीठापेक्षा वेगळी भूमिका शासनाने घेतली असली तरी आज ना उद्या महाविद्यालये सुरू करावी लागतील," असे डॉ. देविदास वायदंडे यांनी सांगितले. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, "महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी, प्राध्यापक, संघटना यांच्या मागणीनुसार महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी केली होती. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधून, शासनाशी चर्चा करून दोन दिवसांत प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल."

### उपहासात्मक ठराव झोंबला

पुणे विद्यापीठाकडून अधिसभा सदस्यांनी मांडलेल्या व मंजूर केलेल्या ठरावांबाबत आश्वासन देऊन पुढे काहीच केले जात नाही. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनातील अधिकाऱ्यांचा कुलपतींच्या हस्ते सत्कार करावा, असा उपहासात्मक ठराव राजीव साबडे यांनी मांडला. हा ठराव प्रशासनाला झोंबला. प्रशासनातर्फे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय चाकणे यांनी हा ठराव प्रशासनाची गरीमा राखणारा नाही, अशी टीका करत ठराव मागे घेण्याची मागणी केली. मात्र, इतर सदस्यांनी प्रशासनाच्या गरीमेबरोबर सदस्यांचीही गरीमा महत्त्वाची आहे, या ठरावामागील भावना समजून घ्या, असे सांगितले. त्यानंतर ठराव मागे घेतला.

Sakaal 10.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## महाविद्यालये सुरू करण्याचा विद्यापीठाच्या अधिसभेत सूर

लोकसत्ता प्रतिनिधी

ुणे : बाजारपेठ, मंदिरे, पर्यटनस्थळे, शाळा सुरू झाल्या आहेत, मग महाविद्यालयेच का सुरू होत नाहीत, असा सूर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत उमटला. यावर, शासनाशी संवाद साधून महाविद्यालये सुरू करण्याबाबत शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्याचे स्पष्टीकरण विद्यापीठ प्रशासनाने दिले.

विद्यापीठाची अधिसभा कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी सुरू झाली. प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी या वेळी उपस्थित होते. अधिसभेत महाविद्यालये सुरू करणे, अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षा, सत्र परीक्षा या प्रमुख मुद्यांसह प्रशासकीय आणि शैक्षणिक विषयांवर चर्चा करण्यात आली.

राज्यात नववी ते बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. महाविद्यालयांकडून ऑनलाइन शिक्षण सुरू असले, तरी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके, प्रकल्प करता येत नाहीत. तसेच, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी नसल्याने शैक्षणिक चक्र थांबले आहे,' असे सदस्य डॉ. महेश अबाळे यांनी सांगितले.

करोनाची परिस्थिती कधी संपेल याची खात्री नाही. महाविद्यालये सुरू केल्यास विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येतील. महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाच्या स्वायत्ततेला धक्का लागता कामा नये, असे मंठाळकर म्हणाल्या.

प्राचार्य डॉ. संजय खरात यांनी सांगितले, की यंदा महाविद्यालयांतील प्रवेशांमध्ये घट झाल्याने महाविद्यालयांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्राध्यापक-कर्मचाऱ्यांच्या वेतनापासूनचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्यांशी चर्चा करून महाविद्यालये खुली करण्याचा घेण्यात आलेला निर्णय शासनाने खुलासा मागितल्याने स्थगित करण्यात आला. आता शासनाशी चर्चा करून शक्य तितक्या लवकर महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी स्पष्ट केले.

### 'वरून' आलेल्या आदेशाचे गुपित

विद्यापीठाने घेतलेल्या अंतिम वर्षांच्या ऑनलाइन परीक्षेदरम्यान उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी, परीक्षेच्या घसरलेल्या दर्जाबाबत गिरीश भवाळकर, अभिषेक बोके, संतोष ढोरे, दादाभाऊ शिनलकर, बागेश्री मंठाळकर आदी अधिसभा सदस्यांनी नाराजी व्यक्त करत प्रश्न उपस्थित केले. या वेळी प्रशासनाकडून अंतिम वर्ष परीक्षा प्रॉक्टर्ड पद्धतीने न घेण्याबाबत 'वरून' आदेश आल्याचे सांगितले. मात्र परीक्षेतील त्रुटींबाबत बराच वेळ चर्चा सुरू राहिल्याने वरून म्हणजे कोणाकडून, हे गुपितच राहिले.

### समितीची नियुक्ती

यूजीसीने ऑनलाइन शिक्षणासाठी परवानगी देताना अभ्यासक्रमांमध्ये ३० टक्के कपात करण्याची सूचना केली आहे. मात्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणात मर्यादा आहेत. अशात सत्र परीक्षांमध्ये गोंधळ उडण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविद्यालयांची मते जाणून घेण्यासाठी समितीची स्थापना करण्याच्या डॉ. मोतीराम देशमुख यांच्या प्रस्तावास अधिसभेने मान्यता दिली.

लोकसत्ता Sun, 10 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57621868

## अधिसभेत ऑफलाइन परीक्षेचा आग्रह

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेदरम्यान उडालेल्या गोंधळाची, तसेच विद्यार्थ्यांनी कॉपी करण्यासाठी लढवलेल्या युक्त्यांची माहिती देत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांचे वाभाडे काढले. त्याचप्रमाणे चांगल्या वातावरणात ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नसेल, तर केवळ ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा घ्यावी, असा आग्रह धरला.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी पार पडली. परीक्षा विभागाने घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेवर अधिसभा सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना परीक्षा देताना आलेल्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठाची यंत्रणा अपुरी पडली. तसेच विद्यार्थी उद्यानामध्ये एकत्र येऊन ग्रुप करून परीक्षा देत असल्याचे दिसून आल्याची माहिती अधिसभा सदस्यांनी दिली. परीक्षेसाठी विचारलेले प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे व हास्यास्पद असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

विद्यापीठाने परीक्षेसाठी निवडलेल्या एजन्सीच्या क्षमतेवर यावेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले. हजारो विद्यार्थ्यांनी परीक्षेबाबत विद्यापीठाकडे तक्रारी केल्या. विद्यापीठाकडून अनेक विद्यार्थ्यांचा चुकीचा निकाल जाहीर केला. ऑनलाईन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक गुण मिळाले. ऑनलाईन परीक्षेत होत असलेल्या गोंधळामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकाला धक्का पोहचत आहे.

Lokmat 10.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## SPPU sets up special committee to restart offline classes

**Namrata Devikar**
puneletters@htlive.com

**PUNE :** The Savitribai Phule Pune University (SPPU) has set up a special committee for restarting offline classes and a decision will be taken soon, said university officials during the first offline senate meeting on Saturday.

In a recent circular, city based colleges were asked to reopen from January 11 as per the norms issued by the University Grants Commission (UGC). However, later SPPU retracted the circular and asked the colleges to wait for a new date.

Speaking during the senate meeting, NS Umrani, pro vice-chancellor of SPPU said that we have been discussing the issue and a decision will be made soon.

"The university has set up a committee who will take the decision soon. This decision will be based on what the teachers and students want. We will discuss and take a positive decision for the benefit of students," said Umrani.

MEMBERS OF THE SENATE ALSO DEBATED ABOUT THE ONLINE PROCTORED METHOD OF EXAMINATION USED TO CONDUCT THE BACKLOG EXAMINATION

He further added that though the colleges are shut, online education continues. There are a total of 800 colleges under the SPPU.

"In the next three to four days, we will take a decision for colleges and students," added SPPU vice-chancellor Dr Nitin Karmalkar.

In the senate meeting, officials noted that a special committee will also be set up to reduce the syllabus for examination this year.

"This special committee will take a call as online lectures continue about the syllabus that needs reduction from different subjects for this year," said Umrani.

Members of the senate also debated about the online proctored method of examination used to conduct the backlog examination for students.

After students faced glitches and several complications during the exam, the vice-chancellor was questioned by the senate members, however their questions remained unanswered.

Hindustan Times10.1.2021

प्रभात पुणे, रविवार, दि. १० जानेवारी २०२१ ॥ ५

## 'ऑनलाइन'प्रश्नी विद्यापीठाचीच 'परीक्षा'

### यापुढील परीक्षा ऑफलाइन घेण्याचा अधिसभा सदस्यांचा आग्रह

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ९** - करोनामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन घेतल्या. आता पुढच्याही परीक्षा ऑनलाइन घ्यायची तयारी आहे. मात्र, ही परीक्षा पद्धत विद्यार्थ्यांसाठी जाचक आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची उदाहरणे देत अधिसभा सदस्यांनी 'ऑनलाइन परीक्षा नकोच,' असा सूर आळवला. यापुढच्या परीक्षा पहिल्याप्रमाणे म्हणजेच ऑफलाइन झाल्या पाहिजे, अशी आग्रही मागणी केली. यावर आता विद्यापीठ काय निर्णय घेणार, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष आहे.

अधिसभेच्या दुपारच्या सत्रात डॉ. पंकज मिनियार यांनी ऑनलाइन परीक्षेचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर विद्यापीठाने एकूण १६ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी तक्रार अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १६ हजार ३०९ विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण केल्याचे सांगितले. आतापर्यंत ऑनलाइन परीक्षेवर ३ कोटी ४२ लाख रुपयांचा खर्च आला आहे. परीक्षेचे काम एजन्सीकडे देऊन विद्यापीठाची सर्व यंत्रणा कामास लागली. त्यामुळे एजन्सीच्या कार्यपद्धतीवर अधिसभा सदस्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षेत अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध केले. परंतु अनेक विद्यार्थी असे आहेत की त्यांनी तक्रारी केल्या नाहीत. एवढेच नव्हे, अंतिम वर्षाची परीक्षा घेताना सामूहिकपणे एकमेकांना मदत करत विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याचे सदस्यांनी सभागृहास निदर्शनास आणून दिले.

**स्वतंत्रपणे प्रवेश परीक्षा नाहीच**

विद्यापीठ संलग्नित अनेक महाविद्यालये अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड पडत आहे, असा प्रश्न अधिसभा सदस्यांनी उपस्थित केला. अशा महाविद्यालयांना स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्यास प्रतिबंध करावा, अशी शिफारस सदस्यांनी केली. त्यावर प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी कोणत्याही महाविद्यालयांना स्वतंत्रपणे प्रवेश परीक्षा घेता येणार नाही. याउलट ही परीक्षा घेतली तरी ती नियमबाह्य राहील, असेही ते म्हणाले.

**अभ्यासक्रम कपातीबाबत समिती**

करोनामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले नाही, त्यामुळे अभ्यासक्रमात कपात करावी. परीक्षा घेऊ नये. अशा परिणामांचे विश्लेषण करून अहवाल मांडण्यासाठी समिती नेमली जाईल, असा निर्णय अधिसभेच्या बैठकीत मान्य करण्यात आला.

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

## SPPU admin in talks with state govt on offline classes

SwatiShindeGole
@timesgroup.com

Pune: A decision on reopening colleges is expected be taken over the next three to four days, pro-vice-chancellor of Savitribai Phule Pune University (SPPU) NS Umrani said during the senate meeting on Saturday.

Umrani said the university administration is in talks with the state government regarding the reopening process as well as affiliated colleges on their view about offline classes.

SPPU had issued a circular regarding reopening its departments and colleges from January 11. However, the state government challenged the decision and issued a show cause notice to the varsity on January 7 regarding the basis on which the reopening was announced. The varsity then issued another circular on January 7, retracting its decision to reopen colleges.

Umrani told senate members on Saturday, "The decision to reopen colleges was taken after an elaborate meeting conducted with college principals by the vice-chancellor after taking a review of their preparedness and they were all willing to reopen their institutions in the interest of students. However, after the state government notice, it was decided to give full information to the authority and then make a positive announcement in the next three to four days."

The pro-vice-chancellor said that the university was in talks with the state government as well as colleges regarding the reopening. He further stated, "There are many aspects, such as placements, career-related activities and practical modules, that cannot be done online. Students, colleges, institution heads are all motivated to reopen colleges and a favourable decision would be announced soon."

Meanwhile, some senate members condemned the government's decision to issue a show cause notice to SPPU stating that it was a breach of university autonomy. Members stated that the university was autonomous and had the freedom to take the decision on reopening after consulting local authorities.

Senate member Bhagyashree Manthalkar said, "The government has opened cinema halls, temples, playgrounds and many other social institutions so why has it taken so long to reopen colleges. The college-going students are old enough to understand their safety. In any case, they are not confined to their homes. They might as well start attending offline classes with all due precautions."

File photo



SPPU had issued a circular regarding reopening its departments and colleges from January 11

### Senate concern on mock question

The question-answer session of the senate meeting was largely dominated by the semester exam conducted online by the university. Many senate members pointed out issues in the online exam, including poor student redressal system regarding exam-related queries, proctored or non-proctored exams, among others. While the heated discussion regarding various issues in online examinations was on, senate member Abhishek Bokey brought up a specific query. He said, "There was a mock question by the SPPU which asked 'Do you have a crush?' and the options provided were funny too. This is certainly not expected from the university and an examination should not become a joke." TNN

The Times of India 10.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## नवभारत

### प्र-कुलगुरु ने यूनिवर्सिटी सीनेट में दी जानकारी

# कॉलेज खोलने पर निर्णय जल्द ही लिया जाएगा

नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय (एसपीपीयू) द्वारा कॉलेजेस 11 जनवरी से फिर से खोलने के बारे में सर्कुलर जारी किया गया था. लेकिन उसे रद्द किया गया है. कॉलेजेस खोलने पर 3-4 दिनों में निर्णय किया जाएगा, यह जानकारी प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमरानी ने शनिवार को एसपीपीयू सीनेट में दी. सभा के आरंभ में कुलगुरु डॉ. नितिन करमलकर ने एसपीपीयू की रिपोर्ट पेश की. कॉलेजेस कब खोले जाएंगे, सदस्यों द्वारा यह पूछे जाने पर डॉ. उमरानी ने कहा, कि इस बारे में 3-4 दिनों में निर्णय किया जाएगा. यूनिवर्सिटी और प्रोफेसरों के स्वास्थ्य की दृष्टि से व्यावहारिक निर्णय क्या होगा? यह देखना आवश्यक है. इसका विचार करने के बाद ही कॉलेजेस खोले जाएंगे. प्र-कुलगुरु डॉ. उमरानी ने कहा कि, मार्च महीने में कॉलेजेस बंद करने के बाद ऑनलाइन शिक्षा के लिए प्लेटफार्म तैयार किया गया.



### ऑफलाइन परीक्षा पर जोर

प्रिंसिपल, प्रोफेसर, छात्र और विभिन्न संगठनों की मांग पर कॉलेजेस खोलने का निर्णय लिया गया और इसके अनुसार यूनिवर्सिटी ने सर्कुलर भी जारी किया, लेकिन सरकार ने कहीं भी नहीं कहा कि, कॉलेजेस खोले जाएं. अब आपदा प्रबंधन प्रणाली से संपर्क करके और सरकार से चर्चा करके 3-4 दिनों में कॉलेजे शुरू करने पर निर्णय किया जाएगा. डॉ. पंकज मिनीयार, डॉ. मनोहर चासकर और अन्य सदस्यों ने मत व्यक्त किया कि, यूनिवर्सिटी की ऑनलाइन परीक्षा में उपजी परेशानियां को देखते हुए अब परीक्षाएं ऑफ लाइन तरीके से ही ली जाएं. परीक्षा व मूल्यांकन मंडल के निदेशक डॉ. महेश काकडे ने स्पष्टीकरण दिया कि, परीक्षा में गड़बड़ी छात्रों द्वारा अलग-अलग मेल के आधार पर परीक्षा देने के कारण हुई है. संतोष ढोरे ने सवाल उठाया कि, परीक्षा आयोजित करने वाली कंपनी ने जिम्मेदारी से काम नहीं किया, यह स्पष्ट हो चुका है. फिर यूनिवर्सिटी ने इस कंपनी पर क्या कार्रवाई की है?

Pune Edition
11-january-2021 Page No. 3
epaper.enavabharat.com

# Senate meet at SPPU takes up free vaccines, timetables

SwatiShindeGole
@timesgroup.com

11/1/2021

**Pune:** Free vaccines for teaching and non-teaching staff, sanitisation of hostels and reopening rooms for students, reduction in college affiliation fees against the backdrop of the Covid-19 pandemic were some decisions undertaken at the senate meeting on Sunday at the Savitribai Phule Pune University (SPPU).

The university has been in talks with the Serum Institute of India for the vaccine and its availability for the varsity's staff on priority. It was also decided to restructure the academic calendar due to several delays caused during the pandemic.

Vice-chancellor Nitin Karmalkar said, "We will ensure that the staff gets vaccinated on priority as they are working hard in this pandemic period."

He was replying to a proposal by senate member Sanjay Kharat to give free vaccine, and funds be provided by the SPPU.

Senate member Abhishek Bokey had proposed that the university hostels, departments and colleges should be reopened soon as students were suffering a huge academic loss.

Bokey said, "Before the reopening, the hostel rooms should be sanitised thoroughly." The senate approved the proposal.

A proposal to restructure the academic calendar was also approved by the senate at the meeting.

Karmalkar said timetables are being worked out by the respective departments considering all the losses faced by the students and it will be announced soon.

### REDUCTION OF ACADEMIC FEES

- Senate member Shamakant Deshmukh said colleges were facing the brunt of the pandemic and admissions were lower than expected
- He said that almost all the colleges in the city had 35% admissions from outstation students which had been affected
- Overall admissions are also slow and first-year admissions to many courses are still underway which had affected the financial situation of most colleges
- The situation should be taken into consideration and the academic fee should be discounted, he said
- Karmalkar said a review from all the principals would be sought and a decision would be taken



The Times of India 11.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## प्रथम वर्षाची परीक्षा ऑफलाइन घ्या

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन घेताना विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईने मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटरवर परीक्षा देण्याची मुभा दिली. त्यामुळे सामूहिक कॉपीचे प्रकार घडले. त्याचे पडसाद अधिसभेत उमटले. जर विद्यापीठाची क्षमता नसेल आणि गुणवत्ता राखली जाणार नसेल तर येणाऱ्या प्रथम वर्षाची परीक्षा ऑफलाइन घ्या, असा सल्ला अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाला दिला.

सामना

अंतिम वर्षाची परीक्षा घेताना विद्यार्थ्यांनी एकत्र बसून पेपर सोडविले, ज्या विद्यार्थ्यांना अडचणी आल्या त्यांना व्यवस्थित उत्तरे मिळाली नाहीत. विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षा घेताना संबंधित कंपनीला काम दिले, पण तिची क्षमता होती का, असे प्रश्न उपस्थित करत अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला फैलावर घेतले.

### अधिसभा सदस्यांचा विद्यापीठाला सल्ला

११/१/२०२१

परीक्षेमध्ये काठिण्य पातळीचा विचार केला गेला पाहिजे. त्यासाठी ऑफलाइन परीक्षा घ्यावी, हे सांगतानाच दादाभाऊ शिनलकर यांनी त्यांच्या परिसरातील विद्यार्थ्यांनी कशा पद्धतीने कॉपी केली, याची उदाहरणे बैठकीत दिली. संतोष ढोरे यांनीही याचे दाखले बैठकीत दिले.

गिरीश भवाळकर म्हणाले, 'प्रॉक्टर्ड मेथड नसल्याने विद्यार्थ्यांना भरपूर गुण मिळाले, त्यांच्या पूर्वीच्या आणि आताच्या गुणांमध्ये तफावत आहे.

'प्रॉक्टर्ड मेथडने परीक्षा घेऊ नये, असे आदेश कोणी दिले हे स्पष्ट झालेच पाहिजे. शिक्षणाचा दर्जा राखताना असे प्रकार गंभीर आहेत', अशी टीका बागेश्री मंठाळकर यांनी केली. अभिषेक बोके म्हणाले, 'ऑनलाइन शक्य नसेल, तर ऑफलाइन परीक्षाच घ्यावी, ऑनलाइन परीक्षा घेणे व्यवहार्य नाही.'

Saamana 11.1.2021

## महाविद्यालय मान्यतेसाठी अधिकाऱ्यांकडून लाच?

**अधिसभा सदस्य अमित पाटील यांचा आरोप**

प्रभात वृत्तसेवा

### सेंट्रल पूलची अजूनही चौकशी सुरूच

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वित्त विभागात नियमाचे उल्लंघन करून 'सेंट्रल पूल'मधून अधिकाऱ्यांना कर्मचारी, अधिकाऱ्यांना पैसे वाटप करण्यात आले. त्याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीला नेमके कोणत्या काळातील किती पैसे आहे याची अजूनही माहिती देण्यात आलेली नसल्याने सात महिन्यानंतरही या प्रकरणाची चौकशी अजून सुरू असल्याचे अधिसभेत झालेल्या चर्चेतून स्पष्ट होत आहे.

> विद्यापीठाकडून महाविद्यालय मान्यतेची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने केली जाते. मात्र, मान्यतेच्या प्रक्रियेसाठी कोणी पैसे घेतले असतील तर संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

पुणे, दि. १० - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून महाविद्यालयास मान्यता देण्याच्या प्रक्रियेसाठी संस्थाचालकांकडून पैसे घेतले जात असल्याचा आरोप अधिसभा सदस्य अमित पाटील यांनी रविवारी अधिसभेच्या बैठकीत केला. त्यामुळे अधिसभेत एकच गोंधळ उडाला.

पुणे विद्यापीठातर्फे संलतग्नित महाविद्यालय सुरू करण्यासाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारले जाते. मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही कागदपत्र ऑफलाइन सादर करावी लागतात. मात्र, विद्यापीठातील काही अधिकारी महाविद्यालय मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ५० हजार रुपये घेत असल्याचा आरोप अमित पाटील यांनी केला. दरम्यान, यासंदर्भात लेखी तक्रार प्राप्त झाल्यास विद्यापीठाकडून चौकशी केली जाणार असल्याचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी अधिसभेत सांगितले.

अमित पाटील म्हणाले, एका संस्थाचालकाकडून विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्याने महाविद्यालय मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ५० हजार रुपयांची मागणी करून पैसे घेतले. मात्र, हा उघडपणे भ्रष्टाचार असून त्याची विद्यापीठाने चौकशी करावी अन्यथा विद्यापीठाविरोधात आंदोलन केले जाणार असल्याचे सांगत इशारा दिला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध कामकाज करण्यासाठी स्थापन केल्या जाणाऱ्या समित्यांच्या बैठका नियोजित कालावधीत घेतल्या जात नाहीत. त्यामुळे समित्यांचे कामकाज वेळेत पूर्ण होत नाही. याबाबत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच समित्यांच्या कामासाठी कालमर्यादा निश्चित करण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी केली.

Prabhat 11.1.2021

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

## महाविद्यालय मान्यतेसाठी अधिकारी घेतात पैसे?

### अधिसभा सदस्यांचा आरोप; चौकशी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून महाविद्यालय मान्यतेच्या प्रक्रियेसाठी संस्थाचालकांकडून पैसे घेतले जात असल्याचा खळबळजनक आरोप अधिसभा सदस्य अमित पाटील यांनी रविवारी अधिसभेच्या बैठकीत केला. तसेच विद्यापीठाने याबाबत चौकशी न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय सुरू करण्यासाठी विद्यापीठातर्फे ऑनलाइन अर्ज स्वीकारले जातात. तसेच मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही कागदपत्र ऑफलाइन पद्धतीने जमा करावी लागतात. मात्र, विद्यापीठातील काही अधिकारी महाविद्यालय मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ५० हजार रुपये घेत असल्याचा आरोप अमित पाटील यांनी केला. त्यामुळे अधिसभेत एकच गोंधळ उडाला. तसेच या संदर्भात लेखी तक्रार प्राप्त झाल्यास विद्यापीठाकडून चौकशी केली जाईल, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी स्पष्ट केले.

अमित पाटील म्हणाले, एका संस्थाचालकाकडून विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्याने महाविद्यालय मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ५० हजार रुपयांची मागणी करून पैसे घेतले. मात्र, हा उघडपणे भ्रष्टाचार असून त्याची विद्यापीठाने चौकशी करावी, अन्यथा विद्यापीठाविरोधात आंदोलन केले जाईल.

> विद्यापीठाकडून महाविद्यालय मान्यतेची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने केली जाते. मात्र,मान्यतेच्या प्रक्रियेसाठी कोणी पैसे घेतले असतील तर संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु

११।१।२०२१

## समित्यांच्या कामाची कालमर्यादा निश्चित करा

लोकमत



लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध कामकाज करण्यासाठी स्थापन केल्या जाणाऱ्या समित्यांच्या बैठका नियोजित कालावधीत आयोजित केल्या जात नाहीत. त्यामुळे समित्यांचे कामकाज वेळेत पूर्ण होत नाही, याबाबत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच समित्यांच्या कामासाठी कालमर्यादा निश्चित करण्याची मागणी केली.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेच्या कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी विविध कारणांसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचे कामकाज अनेक दिवस चालते. त्यात काही व्यक्तींच्या नियुक्तीसंदर्भातील चौकशीसाठीसुद्धा समिती स्थापन केली जाते. परंतु,संबंधित व्यक्ती सेवानिवृत्त झाली, तरीही समितीने आपला अहवाल विद्यापीठासमोर सादर केला नाही,यावर अधिसभा सदस्य राजीव साबडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

कुलगुरू नितीन करमळकर म्हणाले, विद्यापीठाच्या समित्यांनी नियोजित कालावधीत कामकाज करणे अपेक्षित आहे. परंतु, काही समित्यांच्या बैठका होत नसतील तर संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत माहिती घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

Lokmat 11.1.2021

## महाविद्यालय मान्यतेसाठी घेतले पन्नास हजार

### पुणे विद्यापीठ अधिसभेच्या बैठकीत आरोपाने खळबळ

**पुणे, ता. १० :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत समारोपाच्या वेळेस झालेल्या आरोपामुळे खळबळ उडाली. नवीन महाविद्यालय सुरू करताना मान्यतेसाठी संस्थाचालकांकडून ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप करत, याप्रकरणी कारवाई न केल्यास आंदोलन केले जाईल, असा इशारा अधिसभा सदस्य अमित पाटील यांनी बैठकीत दिला.

महाविद्यालय सुरू करण्यासाठी मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही कागदपत्र ऑफलाइन पद्धतीने जमा करवी लागतात. यावेळी विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी त्यास मान्यता देण्यासाठी ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप केला. तसेच संस्थाचालकांना संस्था चालवायची असते म्हणून ते घाबरून तक्रार करत नाहीत असेही पाटील यांनी सांगितले.

याची गंभीर दखल घेत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, "विद्यापीठाकडून ऑनलाइन प्रक्रिया राबविली जाते. पण असा प्रकार घडला असले तर याची लेखी तक्रार करावी, याबाबत विद्यापीठाकडून चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाईल."

प्राचार्यांसोबत असलेल्या वैचारिक मतभेदातून सहाय्यक प्राध्यापकांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव 'कॅस'ला पाठवताना अडवणूक केली जात आहे, असे सदस्य शशिकांत तिकोटे यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर 'अडवणूक केल्याच्या तक्रारी येत असून, याबाबत संस्थाचालकांना पत्र पाठविले जाईल, असे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी सांगितले. तर काही सदस्यांनी प्राचार्य हे संस्थेचे असून त्यांचे वेतन प्राध्यापकांपेक्षा जास्त असावे अशी मागणी केली. यासाठी राज्य सरकारने निर्णय घ्यावा असा प्रस्ताव पाठविण्याचा ठराव मंजूर केला.

#### परीक्षेच्या निविदेवरून आरोप



अंतिम वर्षाची परीक्षा घेताना निविदेतील नियमांना बगल देऊन एजन्सी नेमण्यात आली, एजन्सीची क्षमता नसल्यानेच परीक्षेत गोंधळ झाला आहे असा आरोप पाटील यांनी केला. या आरोपास आक्रमक उत्तर देताना परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परीक्षा घेताना आलेले अडथळे, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्या अडचणी, दिवस रात्र परीक्षा विभागात कर्मचाऱ्यांनी केलेले कामाचे दाखले देत, शेरोशायरीच्या माध्यमातून त्यांची बाजू मांडली. त्यावेळी सदस्यांनी टाळ्या वाजवून याचे स्वागत केले. त्यानंतरही पाटील यांनी मुद्दा लावून धरत निविदा प्रक्रियेतील नियमांना बगल दिल्याबद्दल खुलासा केला नाही, असे बैठकीत निदर्शनास आणून दिले.

#### समित्यांसाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवा

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध कामकाज करण्यासाठी स्थापन केलेल्या समित्यांसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित केला पाहिजे. या समितीचे वेळेत कामकाज पूर्ण होत नाही, असे बैठकीत सदस्यांनी निदर्शनास आणून देत नाराजी व्यक्ती केली. त्यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी समित्यांनी नियोजित कालावधीत कामकाज करणे अपेक्षित आहे. अशा पद्धतीने कामकाज होत नसेल तर कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

Sakaal 11.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा

## शासनाच्या समितीत कुलगुरूंचा समावेश न केल्याने विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये पडसाद

११/१/२०२१

लोकमत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य सरकारने 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 2016' मध्ये बदल करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश नाही. परंतु, या समितीच्या सर्व खर्चाची जबाबदारी पुणे विद्यापीठावर टाकली आहे,याबाबत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी प्रश्न उपस्थित करत राज्य शासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करणारा ठराव अधिसभेच्या बैठकीत रविवारी मांडला.

विद्यापीठ सुधारणा कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी विद्यापीठामार्फत सूचना द्याव्यात,असा प्रस्ताव अधिसभा सदस्य डॉ. संजय खरात यांनी सादर केला. त्यावर सभागृहात काही अधिसभा सदस्यांनी मनोगत व्यक्त केले.त्यात डॉ. कान्हू गिरमकर म्हणाले, पुणे विद्यापीठाने स्वत:ची गुणवत्ता व क्षमता सिद्ध केली असताना विद्यापीठ कायद्यातील सुधारणेसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीत इतर विद्यापीठांच्या कुलगुरूंबरोबरच पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश केला पाहिजे.

विद्यापीठ कायदा राज्यातील सर्व विद्यापीठांसाठी असताना केवळ पुणे विद्यीपाठानेच याचा खर्च का उचलावा,असा प्रश्न प्रसोनजित फडणवीस यांनी उपस्थित केला.तर या समितीमध्ये कुलगुरूंचा समावेश झाला पाहिजे,अशी भूमिका राजीव साबडे यांनीही मांडली.

बागेश्री मंठाळकर म्हणाल्या, विद्यापीठ कायद्यातील सुधारणेसाठी स्थापन केलेल्या समितीचे सदस्य पंचतारांकित हॉटेलमध्ये मुक्काम करत असून त्याचा खर्च विद्यापीठाला करावा लागत आहे. मात्र,समिती सदस्यांची विद्यापीठाच्या गेस्ट हाऊसमध्ये देखील व्यवस्था होऊ शकली असती.

दरम्यान, विद्यापीठाचा प्रतिनिधी शासनाच्या समितीमध्ये नाही म्हणून आपण शासनाचा निषेध करणे उचित ठरणार नाही.मात्र,अधिसभेची शासनाकडे तिव्रनाराजी कळवता येईल,असे मत काही ज्येष्ठ सदस्यांनी व्यक्त केले.



- विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षेच्या कामसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीच्या निवड प्रक्रियेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप अधिसभा सदस्य अमित पाटील यांनी केला.
- निविदा काढताना विशिष्ट शब्दाचा उल्लेख केला नाही. तसेच एजन्सीची 30 कोटींची उलाढा असावी, अशी अट घालणे सुध्दा चूकेचे होते, असा दावा सुध्दा पाटील यांनी यावेळी केला.

११/१/२०२१

Lokmat 11.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## SPPU'S SENATE MEETING ENDS ON "DISAPPOINTING" NOTE

**HT Correspondent**

puneletters@hindustantimes.com

**PUNE:** The two-day senate meeting of the Savitribai Phule Pune University (SPPU) concluded on Sunday after several issues were discussed by the senate members.

The senate raised the issue of not having a representative on the committee formed by the state government to amend the Maharashtra University Act, 2016.

All the senate members unanimously pointed out their disappointment at not having the SPPU vice-chancellor on the committee, despite the state government's decision about giving financial responsibility of the committee to SPPU.

"SPPU is one of the leading and reputed universities in the state and changes made in the university act are important. It is disappointing that SPPU's representative as vice-chancellor is not a part of this committee. Through this senate meeting, the disappointment of senate members should be conveyed to the state government," said Girish Bhawalkar, a senate member on behalf of all the other senate members.

"On one hand, the state government has given orders to file expenses of this committee from the SPPU budget; however, there is no SPPU member on this committee. It is necessary that the state government gives a clarification," said another senate member Bageshree Manthalkar. In the last hour of the senate meeting, issues related to last year students' online examinations were discussed which led to a heated debate between senate members and SPPU examination department officials.

Hindustan Times 11.1.2021

## बैठकीतील निर्णय कळणार वेबसाइटवर

म. टा. प्रतिनिधी, पुणे



'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद; तसेच विद्या परिषदेच्या बैठकांचे संक्षिप्त अहवाल विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केले जातील,' असे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी रविवारी जाहीर केले. हे अहवाल वेबसाइटवर प्रसिद्ध होत नसल्याची तक्रार संतोष ढोरे यांच्यासह अधिसभा सदस्यांनी केल्यानंतर कुलगुरूंनी हे आश्वासन दिले.

अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी ऑनलाइन परीक्षा, समित्यांचे कामकाज, करोनाचे लसीकरण, सेंट्रल पूलचा निधी आदी विषयांवर चर्चा झाली. डॉ. संजय खरात यांच्या ठरावावर विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या लसीकरणासंदर्भात सीरम इन्स्टिट्यूटशी चर्चा सुरू असून, लवकरच निर्णय घेतला जाईल, असे डॉ. करमळकर यांनी स्पष्ट केले.

काही व्यक्तींच्या नियुक्तीसंदर्भातील चौकशीसाठी विद्यापीठाने स्थापन केलेल्या समितीने संबंधित व्यक्ती निवृत्त झाली, तरी अहवाल दिला नाही, याकडे अधिसभा सदस्य राजीव साबडे यांनी लक्ष वेधले. याबाबत माहिती घेऊन कार्यवाही करण्याचे आश्वासन कुलगुरूंनी दिले. विद्यापीठाच्या माहिती अधिकार विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची मागणीही साबडे यांनी केली. विद्यापीठाच्या नगर येथील उपकेंद्रातील 'मास रिलेशन' हा अभ्यासक्रम बंद झाला असला, तरी त्याचे अभ्यास मंडळ कार्यरत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. हे अभ्यासमंडळ त्वरित बरखास्त करण्याचे आदेश कुलगुरूंनी दिले.

साबडे यांनी 'सेंट्रल पूल'च्या निधी वाटपाबाबत विचारलेल्या प्रश्नाला '६० लाख रुपये वाटप करण्यात आलेले नाहीत,' असे लेखी उत्तर देण्यात आले होते. त्यावरही अधिसभेत चर्चा झाली. 'व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानंतरही हे पैसे देण्यात आले आहेत. मात्र, परिपत्रक काढण्यापूर्वीची एकूण रक्कम किती व नियम लागू झाल्यानंतरची रक्कम किती हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही माहिती वित्त विभागाकडून अजून उपलब्ध झालेली नाही. पुढील बैठकीत नेमकी रक्कम किती होती, हे स्पष्ट होईल,' असे डॉ. महेश आबाळे यांनी सांगितले.

सीएनजी पंपाला जागा मिळण्यासंदर्भात विद्यापीठाकडे विचारणा झाली नाही. विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाला अशी जागा देताही येत नाही, असे कुलगुरूंनी अधिसभा सदस्य अभिषेक बोके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

म. टा.

### परीक्षांवरून खडाजंगी

नाशिक येथील अधिसभा सदस्य अमित पाटील यांनी ऑनलाइन परीक्षेच्या यंत्रणेची निविदा काढताना विद्यापीठाने जाणूनबुजून 'प्रायव्हेट लिमिटेड' कंपन्यांना दूर ठेवल्याचा आरोप केला. त्यानंतर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परीक्षांदरम्यान अनेक अडचणी, समस्या आल्याचे मान्य करतानाच पाटील यांना प्रत्युत्तरही दिले. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मदतीने रात्रंदिवस काम केल्याचे त्यांनी सांगितले.

### पन्नास हजारांच्या मागणीचा आरोप

विद्यापीठाच्या एका अधिकाऱ्याने महाविद्यालय मान्यतेसाठी ५० हजार रुपये मागितल्याचा खळबळजनक आरोप अमित पाटील यांनी केला. या प्रकरणी; तसेच ऑनलाइन परीक्षेच्या निविदेतील त्रुटींविषयी माहिती देऊनही कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला. यावर लेखी तक्रार; तसेच पुरावे दिल्यास संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून निलंबित केले जाईल, असे कुलगुरू डॉ. करमळकर यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times 11.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

## Section: Education

# 'प्रथम प्राधान्य' फेरीचे वेळापत्रक जाहीर

- १३ ते ३१ जानेवारीपर्यंत रिक्त जागांवर प्रवेश
- पुरवणी फेरीतील उत्तीर्ण, एटीकेटी विद्यार्थी पात्र




प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ११ - राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे इयत्ता अकरावीच्या 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' (एफसीएफएस) फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध झाले आहे. येत्या १३ ते ३१ जानेवारीपर्यंत विद्यार्थ्यांना रिक्त जागांवर प्रवेश देण्यात येणार आहे.

या फेरीसाठी पुरवणी फेरीतील उत्तीर्ण व एटीकेटी विद्यार्थी पात्र ठरणार आहेत, अशी माहिती अकरावी प्रवेश समितीकडून देण्यात आली.

पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया राबविण्यात आली. त्यातून विद्यार्थ्यांना गुणवत्ता व पसंतीनुसार प्रवेश देण्यात आला. मात्र, आता उर्वरित जागांसाठी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' फेरी राबविली जाणार आहे. यासाठी ४५० ते ५०० गुणांक असलेल्या म्हणजेच ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा पहिला संवर्ग, ४०० ते ५०० गुणांकाचा (८० टक्क्यांपेक्षा अधिक) दुसरा संवर्ग, ३५० ते ५०० गुणांक असलेला (७० टक्क्यांपेक्षा अधिक) तिसरा संवर्ग, ३०० ते ५०० गुणांकाचा (६० टक्क्यांपेक्षा अधिक) चौथा संवर्ग, २५० ते ५०० गुणांक असलेला (५० टक्क्यांपेक्षा अधिक) पाचवा संवर्ग असणार आहे. तसेच, सहाव्या संवर्गात दहावीत उत्तीर्ण असणारे सर्व विद्यार्थी आणि सातव्या संवर्गात एटीकेटी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सातही संवर्गासाठी स्वतंत्र फेऱ्या घेतल्या जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### 'एफसीएफएस' फेरीसाठी पात्र विद्यार्थी

- प्रवेश अर्ज भाग – १ भरून प्रमाणित केलेले सर्व विद्यार्थी
- यापूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी
- मिळालेला प्रवेश रद्द केले आहेत किंवा ज्यांना प्रवेश नाकारला असे विद्यार्थी
- यापूर्वी किंवा डिसेंबरमधील पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी
- एटीकेटी मिळालेली विद्यार्थी

### विद्यार्थी केव्हा करू शकतील प्रवेश निश्चित

पहिला संवर्ग
दि. १३ ते १५ जानेवारी

दुसरा संवर्ग
दि. १६ ते १८ जानेवारी

तिसरा संवर्ग
दि. १९ ते २० जानेवारी

चौथा संवर्ग
दि. २१ ते २२ जानेवारी

पाचवा संवर्ग
दि. २३ ते २५ जानेवारी

सहावा संवर्ग
दि. २७ ते २८ जानेवारी

सातवा संवर्ग
दि. २९ ते ३१ जानेवारी

Prabhat 12.1.2021

सकाळ

# प्राध्यापक भरतीबाबत कार्यवाही करा | 'यूजीसी'चे सरकारला पत्र

पुणे, ता. ११ : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राज्यातील रिक्त असलेल्या प्राध्यापकांची १०० टक्के भरती करा, असे पत्र वारंवार देऊनही गेल्या अनेक महिन्यापासून ही भरती ठप्प आहे. याविरोधात 'यूजीसी'कडे तक्रार केल्यानंतर प्राध्यापक भरतीबाबत कार्यवाही करा, अशी सूचना उच्च शिक्षण विभागाला केली आहे.

राज्यात १५ हजार प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. त्यातील ४० टक्के पदभरती करण्याचा निर्णय २०१८मध्ये घेण्यात आला होता. परंतु आदेशातील त्रुटींमुळे ही भरती ठप्प झाली. 'यूजीसी'ने रिक्त असलेली प्राध्यापकांची रिक्तपदे १०० टक्के भरावीत म्हणून जून ते ऑक्टोबर २०१९ याकाळात पाच वेळा परिपत्रक काढले. मात्र याकडे विद्यापीठ आणि राज्य शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे नेट सेट पीएचडीधारक संघर्ष समितीने याबाबत विद्यापीठ, राज्य शासनाला जाब विचारत 'यूजीसी'कडेही तक्रार केली होती. 'यूजीसी'ने या तक्रारीची दखल घेत राज्याचे उच्च शिक्षण संचालकांना पत्र पाठवून प्राध्यापक भरतीबाबत कार्यवाही करा अशी सूचना केली आहे.

> राज्यातील नेट सेट पात्र प्राध्यापकांची अवस्था वाईट झाली आहे. त्यांची शंभर टक्के भरती होणे आवश्यक आहे. यूजीसीने परिपत्रक काढूनही भरती केली जात नाही. त्यामुळे केवळ आदेश देण्यापुरतीच भूमिका आहे का, यावर 'यूजीसी'ला खुलासा मागविला होता. त्यानुसार आज 'यूजीसी'ने पत्र पाठविले आहे. त्यानुसार शासनाला विचारमंथन करून कार्यवाही करावीच लागेल.
>
> - सुरेश देवढे,
> राज्य समन्वयक, नेट सेट पीएचडीधारक संघर्ष समिती

Pune, Main
12/01/2021 Page No. 2

# News Paper Clippings During January 2021

## Section: Education

# NEP task force is ready with action plan for parents, teachers

TIMES NEWS NETWORK

**New Delhi:** The National Education Policy 2020 (NEP) is the first step towards demolishing the restrictive, repetitive, regimented processes of learning in schools, enabling students to have an edge over others in this highly-competitive world, said Ashok Ganguly, educationist and former CBSE chairman, at a panel discussion on the NEP implementation, as part of the 'Keep Learning' programme, an initiative of The Times of India, powered by BYJU's.

### NEP, an inevitable change

Ganguly said the government has arrived at the new pedagogical framework and redesigned the curriculum after evaluating the recommendations made by the drafting committee, parents, students and teachers. "The NEP has made it clear that if our schools don't move away from the regimental pattern, we may lag behind other countries," he said.

Corroborating Ganguly's point with figures, Education Minister Ramesh Pokhriyal Nishank said, "The NEP was formulated after much deliberation with 1,10,00,000 teachers, 33 crore students and 66 crore parents. The draft was also put on the public domain and around 2.25 lakh suggestions were looked into."

### Task teams in states

The government has set up task teams for the smooth implementation of the NEP. The Department of School Education and Literacy and the Department of Higher Education have identified the policy points, actions and activities. Also, the University Grants Commission and the All India Council for Technical Education have started working towards the execution. Each state has set up a task force.

–MK SRIDHAR, member of NEP Draft Committee




### Govt has to fill gaps

Technology played a key role in ensuring continuity in education during the pandemic. However, there is a digital apartheid and the children in rural areas don't have access to devices and internet services like those in urban areas do. Data shows that only 45% of households in India receive uninterrupted electricity for more than 12 hours on a daily basis, said Kasliwal. "The NEP can only be successful if the government works on addressing these factors and fills these gaps," she said.

–MANSI KASLIWAL, VP - Social Initiatives, BYJU's

THE TIMES OF INDIA INITIATIVE

Keep Learning

POWERED BY BYJU'S

**UPCOMING WEBINAR**

Webinar on 'Parenting while kids learn from home' with Mary Kom and other celebrities on Sunday, 17th Jan, 11am. To register for the webinar log on to www.TimesKeepLearning.com, give a missed call on 9555977000 or scan the QR code

### NEP WILL EMPOWER STUDENTS: POKHRIYAL

- Freedom for students to mix-and-match subjects of their choice at school level and pursue it further at the higher educational level.
- No more report card system. Progress cards will help in assessment after a 360-degree evaluation by students themselves, peers, teachers and parents.
- If a student for any unforeseen reason has to miss a year of education at the higher level, he can pick up from the point he left as "the past learning will be credited and taken forward", said Pokhriyal.

### ROLE OF PARENTS AND TEACHERS IN EXECUTION

- Teachers and parents will have to understand the aptitude of the child and enable the selection of subjects.
- Parents will have to adopt more interventional approach in the multi-disciplinary learning process and support teachers in demolishing the rote-learning methodology.
- Schools will have to hold regular counselling sessions to ensure that parents are on the same page while executing the transformation.
- The task force in each state will have to plan, execute and review the implementation based on priorities, strategies.
- Good coordination between the Centre and the state governments is essential, as school education primarily comes under the domain of the state governments.

The Times of India 12.1.2021

# अधिसभा, व्यवस्थापन परिषदेचे निर्णय आता संकेतस्थळावर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे आणि अधिसभेचे ठराव, निर्णय आता संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहेत. विद्यापीठाच्या अधिसभेने या बाबतचा ठराव केला असून, व्यवस्थापन परिषदेने ठराव केल्यानंतर पुढील महिन्याभरात यासंबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

विद्यापीठाच्या अधिसभेत आणि व्यवस्थापन परिषदेत प्रशासकीय धोरणात्मक, शैक्षणिक विषयांवर चर्चा होते, निर्णय घेतले जातात. त्यामुळे माहिती अधिकार कायदा २००५नुसार विद्यापीठाने माहिती संकेतस्थळावर जाहीर करणे बंधनकारक आहे. त्या बाबत अनेकदा मागणी करूनही विद्यापीठाकडून त्या बाबतची कार्यवाही केली जात नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष कल्पेश यादव यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना निवेदन दिले होते. 'लोकसत्ता'ने या बाबतचे वृत्त प्रसिद्ध केले होते.

> ठराव, निर्णयांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबत अधिसभेने ठराव केला आहे. तसा व्यवस्थापन परिषदेतही ठराव केला जाईल. त्यानंतर महिन्याभरात अधिसभा आणि व्यवस्थापन परिषदेच्या बैठकांतील ठराव, निर्णयांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.
>
> – डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

या पार्श्वभूमीवर अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी ठराव, निर्णयाची माहिती संकेतस्थळावर देण्याबाबत प्रश्न विद्यापीठाच्या अधिसभेत उपस्थित केला. त्यानंतर कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी ही माहिती संकेतस्थळावर देण्यात येईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे पुढील महिन्याभरात या संदर्भातील कार्यवाही विद्यापीठाकडून होणे अपेक्षित आहे.

लोकसत्ता Tue, http

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुणे PLUS

## उर्दू भाषेतील कोर्स विद्यापीठात सुरू

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून उर्दू भाषेतील पदविका अभ्यासक्रम सुरू केला असून, या अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. विद्यापीठातील उर्दू पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्यास १३ ते २७ जानेवारी अशी मुदत राहणार आहे.

विद्यापीठातर्फे प्रथमच उर्दू भाषेचा अभ्यासक्रम हिंदी विभागांतर्गत सुरू करण्यात येत आहे. त्यानंतर शंभर गुणांची प्रवेश परीक्षा राहील. गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता ३० इतकी असून, हा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमासाठी किमान बारावी उत्तीर्णासह पदवी, पदव्युत्तर, एमपीएल, पीएचडीचे विद्यार्थी अर्ज करू शकतील, अशी माहिती विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी दिली. विद्यापीठाने हिंदी विभागप्रमुख डॉ. सदानंद भोसले यांच्या अध्यक्षतेसाठी समिती नेमली. या समितीने अभ्यासक्रमाची रचना तयार केली. त्यानंतर हा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### उर्दू संभाषणही शिकता येणार

ऑनलाइन अर्जासाठी खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना ५००, तर मागासवर्गीय गटांतील विद्यार्थ्यांना ३५० रुपये शुल्क आहे. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना उर्दू वाचन, उर्दू लेखन, उर्दू श्रवण आणि उर्दू संभाषण अशी चार कौशल्ये शिकता येणार आहेत.

Maharashtra Times 13.1.2021

## विद्यापीठ कायद्यातील बदलांसाठी पुण्यात समिती

**पुणे, ता. १२ :** 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६' मध्ये बदल करण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या समितीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा प्रतिनिधी नसल्याने त्याचे पडसाद अधिसभेच्या बैठकीत उमटले होते. त्यानंतर आता या उपसमितीचे सदस्य शनिवारी (ता. १६) पुणे विद्यापीठात येऊन कायद्यातील बदलासाठी विविध घटकांशी चर्चा करणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने कोणते बदल सुचविले जातात, याकडे लक्ष लागले आहे.

राज्य सरकारने विद्यापीठ कायद्यात बदल करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. कायद्यातील बदल करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील घटकांशी चर्चा करावी म्हणून या उच्चस्तरीय समितीने उपसमित्या गठित केल्या आहेत. यापैकी एक 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती' या उपसमितीची बैठक पुणे विद्यापीठात होणार आहे. यामध्ये जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रतिनिधींनाही सूचना मांडण्यासाठी निमंत्रित केले आहे.

सकाळी ९ वाजल्यापासून या उपसमितीचे कामकाज सुरू होणार आहे. यामध्ये पुणे, जळगाव आणि सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा संचालक, वित्त अधिकारी यांच्यासोबत बैठक होणार आहे. त्यानंतर तिन्ही विद्यापीठांचे उप कुलसचिव, विभाग प्रमुख, शिक्षक प्रतिनिधी आणि संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली जाणार आहे. दुपारच्या सत्रात व्यवस्थापन संस्था आणि विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली जाणार असल्याचे पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी काढलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

Sakaal 13.1.2021

## 'यूजीसी'च्या सूचनांनुसार महाविद्यालये उघडावीत

### अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाची मागणी

**पुणे, ता. १२ :** राज्य सरकारने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांनुसार लवकरात लवकर विद्यापीठांमधील आणि महाविद्यालयांमधील वर्ग सुरू करावेत, अशी मागणी अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघाने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले की, महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठामार्फत वेगवेगळी परिपत्रके काढली जात आहेत. महाविद्यालये सुरू करण्याबाबत विविध पातळ्यांवर चर्चा देखील होत आहे. प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण निर्माण होत आहे. 'शाळा, महाविद्यालये बंद आणि शिक्षण सुरू' उपक्रमांतर्गत कोरोना काळात विविध महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन वर्ग घेताना नेटवर्कची समस्या, अनिश्चितता यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीची भरपाई करण्यासाठी परीक्षेआधी ऑफलाइन पद्धतीने वर्ग सुरू करून उजळणी वर्ग घेण्यावर भर देणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्य सरकारने त्यादृष्टीने सकारात्मक पावले उचलावीत, असे संघाने निवेदनात म्हटले आहे.

Sakaal 13.1.2021

## अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत आता 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' फेरी

### १३ ते ३१ जानेवारीदरम्यान विद्यार्थ्यांना प्रवेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** इयत्ता अकरावीच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत रिक्त जागांसाठी आजपासून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी राबवण्यात येणार आहे. १३ ते ३१ जानेवारीदरम्यान राबवल्या जाणाऱ्या या प्रवेश प्रक्रियेत पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह एटीकेटीचे विद्यार्थी पात्र असून, सात फेऱ्यांतून विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातील.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशांसाठी आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या आणि दोन विशेष फेऱ्यांतून गुणवत्ता आणि पसंतीनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यानंतर आता रिक्त जागांवरील प्रवेशांसाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी राबवण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला. या फेरीसाठीचे नियोजन आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. त्यात ४५० ते ५०० गुण (९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण) मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पहिला संवर्ग, ४०० ते ५०० गुण (८० टक्क्यांपेक्षा अधिक) असलेल्यांचा दुसरा संवर्ग, ३५० ते ५०० गुण (७० टक्क्यांपेक्षा अधिक) असलेल्यांचा तिसरा संवर्ग, ३०० ते ५०० गुण (६० टक्क्यांपेक्षा अधिक) असलेल्यांचा चौथा संवर्ग आणि २५० ते ५०० गुण असलेल्यांचा (५० टक्क्यांपेक्षा अधिक) पाचवा संवर्ग, तर सहाव्या संवर्गात दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थी आणि सातव्या संवर्गात एटीकेटी विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या सात संवर्गांसाठी स्वतंत्र फेऱ्या घेतल्या जाणार आहेत.

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरीसाठी प्रवेश अर्जाचा भाग एक भरून प्रमाणित केलेल्या, या पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये प्रवेश न मिळालेल्या, या पूर्वी घेतलेला प्रवेश रद्द केलेल्या किंवा नाकारलेल्या, या पूर्वी किंवा डिसेंबरमधील पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी, एटीकेटी मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. फेरीची सविस्तर माहिती https://rrthadmission.org.in/ या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**संवर्गनिहाय वेळापत्रक**

- पहिला संवर्ग : १३ ते १५ जानेवारी
- दुसरा संवर्ग : १६ ते १८ जानेवारी
- तिसरा संवर्ग : १९ ते २० जानेवारी
- चौथा संवर्ग : २१ ते २२ जानेवारी
- पाचवा संवर्ग : २३ ते २५ जानेवारी
- सहावा संवर्ग : २७ ते २८ जानेवारी
- सातवा संवर्ग : २९ ते ३१ जानेवारी

लोकसत्ता Wed, 13 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57704086

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## SPPU REPRINTING AND SELLING RARE, OLD BOOKS

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) is now reprinting its old and rare books related to history, mythology and autobiographies and making it available online for sale.

All the listed books can be purchased online through the official SPPU website.

"The details of all these books and its list along with the book price is given on SPPU official website – www.unipune.ac.in. Those who want to buy the books can choose it and through the QR code can make a payment and accordingly the books will be sent to them," said SPPU registrar Prafulla Pawar.

Ashwin Nagpure a post-graduate history student said, "There are some books which are published in the past by SPPU publications but are not available in the market. It was our demand that the SPPU should reprint them again."

Hindustan Times 13.1.2021

## प्रथम येणाऱ्यास प्राधान्य प्रवेश फेरीला सुरुवात

**पुणे, ता. १३ :** इयत्ता अकरावीच्या नियमित व विशेष प्रवेश फेरीनंतर आजपासून (ता. १३) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) या प्रवेश फेरीस सुरुवात झाली. या फेरीसाठी पात्र ठरलेल्या १ हजार ४१३ जणांपैकी ८१ जणांनी पहिल्या दिवशी प्रवेश निश्चित केले.

शालेय शिक्षण विभागातर्फे अकरावी प्रवेशाच्या प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी या फेऱ्यांचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले. त्यामध्ये सात संवर्ग करण्यात आले आहेत. ९० टक्के व त्यापुढील गुणांच्या विद्यार्थ्यांसाठी पहिला संवर्ग आहे. यासाठी १३ ते १५ जानेवारी या काळात 'एफसीएफएस' ही फेरी राबविली जात आहे.

आवडते महाविद्यालय मिळाले नाही, एटीकेटी, पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यासह इतर कारणांनी ज्यांना प्रवेश मिळाला नाही अशा प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश मिळावा म्हणून त्यांना मिळालेल्या गुणांवरून संवर्ग तयार केले आहेत. या सर्व संवर्गासाठी ३० जानेवारीपर्यंत प्रक्रिया सुरू राहणार आहे.

Sakaal 14.1.2021

## विद्यापीठात 'ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्स'

### अनुदान आयोगाने दिले स्थापन्याचे आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवीन शैक्षणिक धोरणातील तरतुदीनुसार परदेशी संस्थांशी सामंजस्य करार करण्याबरोबरच परदेशी विद्यार्थ्यांना भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये सहभागी करून घेण्यास प्रोत्साहन द्यावे लागणार आहे. त्यामुळे देशाचे उच्च शिक्षणाचे अंतरराष्ट्रीयीकरण व्हावे, यासाठी देशातील सर्व विद्यापीठांमध्ये ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्स स्थापन करावे, अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिल्या आहेत.

गेल्या काही वर्षांपासून परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी केंद्र शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. त्यातच नवीन शैक्षणिक धोरणात त्यावर अधिक भर दिला आहे. त्यामुळेच देशातील सर्व विद्यापीठांमध्ये ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्स स्थापन करण्याच्या सूचना यूजीसीने दिल्या आहेत.

ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्सच्या माध्यमातून परदेशी विद्यार्थ्यांशी निगडित असणारी सर्व प्रकरणे हाताळणे व भारतात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, परदेशी विद्यार्थ्यांपर्यंत प्रवेश प्रक्रियेची माहिती सुलभपणे प्रसारित करणे, भारतीय शैक्षणिक संस्थांकडून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती परदेशी संस्थांना करून देणे, शैक्षणिक संस्थांचा दर्जा वाढवणे आदी कामे केली जाणार आहेत. त्याचप्रमाणे परदेशातील सर्व शैक्षणिक संस्थांशी एकच ठिकाणाहून संपर्क साधता यावा आणि त्यांच्याबरोबर शैक्षणिक उपक्रम राबविता यावेत, परदेशी विद्यार्थ्यांच्या तक्रारी किंवा प्रश्न एकाच व्यासपीठावरून सोडविता याव्यात, या उद्देशाने ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्सचा उपयोग केला जाणार आहे.

Lokmat 14.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## 'परदेशी विद्यार्थ्यांची संख्या वाढवा'

**पुणे** : परदेशी विद्यार्थ्यांना विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्याबाबत योग्य माहिती मिळावी; तसेच प्रवेशप्रक्रियेची माहिती त्यांच्यापर्यंत सुलभपणे पोहोचण्यासाठी विद्यापीठांमध्ये 'ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्स' स्थापन करावे, अशा सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कुलगुरूंना दिल्या आहेत. 'यूजीसी'च्या या प्रयत्नांमुळे भारतीय विद्यापीठांमध्ये परदेशी विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यास हातभार लागणार आहे.

'ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्स'च्या माध्यमातून परदेशी विद्यार्थ्यांशी निगडित प्रकरणे हाताळणे, परदेशी विद्यार्थ्यांचे स्वागत करणे, प्रवेशप्रक्रियेची माहिती सुलभपणे पोहोचविणे, भारतीय शैक्षणिक संस्थांकडून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती परदेशी संस्थांना देणे आदी कामे केली जाणार आहेत. परदेशातील सर्व शैक्षणिक संस्थांशी एकाच ठिकाणाहून संपर्क साधता यावा, शैक्षणिक उपक्रम राबविता यावेत, परदेशी विद्यार्थ्यांच्या तक्रारी किंवा प्रश्न एकाच व्यासपीठावरून सोडविता याव्यात, या उद्देशाने 'ऑफिस फॉर इंटरनॅशनल अफेअर्स'चा उपयोग केला जाणार आहे, अशी माहिती 'यूजीसी'चे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी पत्रकाद्वारे दिली.

Maharashtra Times 14.1.2021

## विद्यापीठाकडून दुर्मीळ पुस्तकांचे पुनर्प्रकाशन

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने काही वर्षांपूर्वी प्रकाशित केलेली 'निजाम-पेशवे संबंध : १८ वे शतक', 'पोर्तुगीज-मराठे संबंध अर्थात, पोर्तुगीजांच्या दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास', 'महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती' अशी दुर्मीळ पुस्तके नव्याने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार आता ही पुस्तके वाचकांना खरेदीसाठी विद्यापीठाच्या मुद्रणालयात उपलब्ध करून देण्यात आली आहेत.



पुस्तकांची यादी विद्यापीठाने वेबसाइटवर प्रकाशित केली आहे. वाचकांनी पुस्तकांच्या मागणीनुसार देय असणारी रक्कम ऑनलाइन 'क्यूआर कोड'द्वारे द्यावी. बँक ऑफ महाराष्ट्रच्या पुणे विद्यापीठ शाखेत वित्त व लेखा अधिकारी यांच्या नावाने पुस्तकांसाठी देय असणाऱ्या रकमेचे चलन काढून ते विद्यापीठाच्या मुद्रणालयात जमा करायचे आहे. त्यानंतर संबंधित रकमेचे पुस्तक मुद्रणालयाकडून संबंधितांना देण्याची व्यवस्था करण्यात येईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली आहे. पुस्तकांची यादी व अधिक माहिती विद्यापीठाच्या http://unipune.ac.in/ वेबसाइटवर उपलब्ध आहे.

### ही पुस्तके उपलब्ध

'पुणे विद्यापीठ इतिहास', 'प्राचीन मराठी कोरीव लेख', 'महामानव रवींद्रनाथ', 'रविकिरण मंडळ गौरविका', 'मराठी नाट्यसमीक्षा', 'वेदिक रिलिजन अँड मायथॉलॉजी', 'रससिद्धांत का सामाजिक मूल्यांकन', 'आधुनिक वैद्यकशास्त्राचा इतिहास', 'द कन्सेप्ट ऑफ मॉरल ऑब्लिगेशन', 'ऑटोबायोग्राफी ऑफ गुरुदेव आर. डी. रानडे', 'जवाहरलाल नेहरू : द एक्स्टसी अँड द ॲगनी', 'पातंजलीज व्याकरण : महाभाष्य', 'महात्मा जोतिराव फुले यांचे वारसदार' अशा दुर्मीळ पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी पुन्हा खुला झाला आहे.

Maharashtra Times 14.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## मुख्याध्यापकांच्या प्रशिक्षणाबाबत निरुत्साह

### नव्या शैक्षणिक धोरणाच्या यशस्वीतेवरच प्रश्नचिन्ह

**प्रशांत देशमुख, लोकसत्ता**

**वर्धा :** नव्या शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापकांसाठी केंद्राने आखलेल्या प्रशिक्षणास राज्यातून विशेष प्रतिसाद मिळाला नाही. या प्रशिक्षणासाठीच्या नोंदणीत अव्वल असलेल्या कोल्हापूरसह पाचच जिल्ह्यांनी या प्रशिक्षणाला गांभीर्याने घेतल्याचे चित्र आहे.

मुख्याध्यापकांना नव्या शैक्षणिक धोरणात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडायची आहे. शाळेचे नेतृत्व करणारा हा घटक नव्या बदलांची योग्य अंमलबजावणी करण्यास समर्थ ठरावा म्हणून हे प्रशिक्षण आहे. राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था (निपा) नवी दिल्ली अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय शालेय नेतृत्व विकास केंद्राने यासाठी कार्यक्रम तयार केला. त्याची अंमलबजावणी औरंगाबादच्या महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा)द्वारे होत आहे. शालेय नेतृत्व विकास व्यवस्थापन अशा या कार्यक्रमाची सुरुवात ३ डिसेंबर २०२० ला झाली होती. देशभरातील



प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणस्थळावरील शाळाप्रमुखांसाठी हा कार्यक्रम मोफत व ऑनलाइन आहे. दिल्लीच्या 'निपा'तर्फे नुकताच राज्यातील जिल्हानिहाय अहवाल तयार झालेला आहे.

या अहवालानुसार, प्रशिक्षणात स्वारस्य दाखवण्यात ९६५ मुख्याध्यापकांसह कोल्हापूर जिल्हा राज्यात अव्वल आहे. त्यापाठोपाठ

**“ अधिकाधिक मुख्याध्यापकांना प्रशिक्षणात सहभागी करून घेण्याचे प्रयत्न विविध माध्यमातून होत आहेत. राज्यातील काही जिल्ह्यात नोंदणी अल्प प्रमाणात झाली हे खरे आहे. शिक्षणाधिकारी, शैक्षणिक प्रशिक्षण संस्था तसेच सर्वसंबंधितांना नोंदणी व प्रशिक्षणासाठी सूचना करण्यात आली आहे. बदल दिसेलच.**

– डॉ. नेहा बेलसरे, संचालक, 'मिपा', औरंगाबाद.

सोलापूर ८६५, नागपूर ६८५, मुंबई उपनगर ६६७, जळगाव ६३९, सातारा ६०३ या जिल्ह्यांचा क्रम लागतो. नोंदणी करण्यात वर्धा सर्वात शेवटी असून वाशीम, अकोला, धुळे, गडचिरोली, लातूर, परभणी शंभरीही गाठू शकले नाहीत. नोंदणी करीत प्रशिक्षण आटोपणाऱ्या मुख्याध्यापकांची संख्या मुंबई उपनगर व पुणे जिल्ह्यात लक्षणीय आहे. भाषिक अडचण येऊ नये म्हणून मराठी भाषेत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचा पहिला मान देशात महाराष्ट्रास लाभला.

मात्र ही सुविधा मिळूनही या मोलाच्या प्रशिक्षणात राज्यातील मुख्याध्यापक मागेच आहेत. हे प्रशिक्षण शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमावर आधारित व केवळ दोन महिन्यात पूर्ण होणारे आहे. नव्या शैक्षणिक धोरणात शाळा परिसर, समाजाचा सहभाग, विविध उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापकांची जबाबदारी वाढणार असल्याने प्रशिक्षण अत्यावश्यक असल्याची भूमिका 'निपा'तर्फे मांडण्यात आली आहे.

मुख्याध्यापक संघटनेचे नेते सतीश जगताप म्हणाले, मुख्याध्यापकांचा निरुत्साह चिंतेची बाब आहे. संघटना पातळीवर प्रशिक्षणात अधिकाधिक नोंदणी करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. प्रशिक्षणातून मुख्याध्यापकांमध्ये चांगले बदल निश्चितच घडून येतील. प्रशिक्षण गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

लोकसत्ता Thu, 14 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57727358

## अखेर दुर्मीळ ग्रंथसंपदा विद्यापीठाकडून उपलब्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने काही वर्षांपूर्वी प्रकाशित केलेली आणि गेली काही वर्षे अनुपलब्ध असलेली मौलिक ग्रंथसंपदा पुनर्प्रकाशित केली आहे. ग्रंथ पुनर्प्रकाशित करून तयार असतानाही केवळ विक्री आणि वितरण धोरणाअभावी हा प्रकल्प रखडला होता. अखेर विद्यापीठाने विक्री आणि वितरणाबाबतचा निर्णय घेऊन मुद्रणालयात ग्रंथांच्या नव्या प्रति उपलब्ध करून दिल्या आहेत.

विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाने काही वर्षांपूर्वी प्रकाशित केलेली निजाम-पेशवे संबंध १८ वे शतक, पोर्तुगीज मराठे संबंध अर्थात पोर्तुगिजांच्या दफ्तरांतील मराठ्यांचा इतिहास, महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती अशी दुर्मीळ पुस्तके आणि ग्रंथ नव्याने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार या पुस्तकांची विद्यापीठाच्या मुद्रणालयाकडून नव्याने निर्मिती करण्यात आली. मात्र, पुस्तकांच्या विक्री व वितरणासाठीची व्यवस्था होत नसल्याने हा प्रकल्प रखडला होता. आता विद्यापीठाने नव्याने प्रकाशित केलेल्या ग्रंथांच्या वितरण आणि विक्रीची व्यवस्था विकसित केली आहे. ग्रंथ विकत घेण्यासाठी वाचक, अभ्यासकांना क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन पद्धतीने रक्कम द्यावी लागणार आहे किंवा बँक ऑफ महाराष्ट्रच्या पुणे विद्यापीठ शाखेत वित्त व लेखा अधिकारी यांच्या नावाने ग्रंथांसाठी देय असणाऱ्या रकमेचे चलन काढून ते विद्यापीठाच्या मुद्रणालयात जमा केल्यावर संबंधितांना पुस्तक देण्याची व्यवस्था करण्यात येईल, असे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली.

लोकसत्ता Thu, 14 January 2021
https://epaper.loksatta.com/c.

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## विद्यापीठ कायद्यात मागासवर्गीयांना हवे प्रवर्गनिहाय आरक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६' मध्ये विविध अधिकार मंडळावर निवडून जाण्यासाठी ५० टक्के आरक्षणाच्या नियमाची उचित अंमलबजावणी केली जात नाही. परिणामी अधिसभा, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद या विद्यापीठाच्या अधिकार मंडळात मागासवर्गीयांना प्रतिनिधित्व मिळत नाही. विद्यापीठ अधिकार मंडळावर निवडून जाणाऱ्या व्यक्तीऐवजी थेट नियुक्त केल्या जाणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढली आहे. यात बदल करत मागासवर्गियांना प्रवर्गनिहाय आरक्षण देण्याची मागणी विद्यापीठ कायद्यातील दुरूस्तीसाठी स्थापन केलेल्या समितीपुढे येत्या शनिवारी (दि. १६) केली जाणार आहे.

उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी आणि विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी राज्य शासनातर्फे विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची बैठक १६ जानेवारीला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणार आहे. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी संघटनांशी समिती संवाद साधणार आहे.

Lokmat 15.1.2021

## माजी विद्यार्थ्यांशी संपर्क वाढवा; यूजीसीच्या विद्यापीठांना सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : भारताने आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे केंद्र बनावे ,या उद्देशाने केंद्र शासनातर्फे प्रयत्न केले जात असून नवीन शैक्षणिक धोरणातही त्यादृष्टीने महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून अल्युमनी कनेक्ट अंतर्गत सर्व विद्यापीठांनी परदेशातील व भारतातील माजी विद्यार्थ्यांशी संपर्क वाढवा, अशी सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे.

सर्वच शैक्षणिक संस्थांसाठी माजी विद्यार्थी हे भक्कम आधार असतात. त्यांच्याकडून आर्थिक व इतर सहकार्य मिळू शकते. त्याचप्रमाणे भारतातील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेवून सध्या परदेशात असणारे माजी विद्यार्थी उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. त्यामुळे विद्यापीठांनी भारतातील व परदेशातील माजी विद्यार्थ्यांची माहिती जमा करावी, त्यांना विविध कार्यशाळा व वेबिनारमध्ये सहभागी करून घ्यावे, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगने त्यांची संपर्क साधावा, माजी विद्यार्थ्यांच्या सल्ल्याने शैक्षणिक संस्थांचा दर्जा वाढवावा, असे परिपत्रक युजीसीने प्रसिध्द केले आहे.

Lokmat 15.1.2021

## तंत्रशिक्षण शुल्कवाढीचा जाच कायम; सवलत नाहीच

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई** : व्यावसायिक अभ्यासक्रमांची शुल्कवाढ रद्द करण्याच्या निर्णयाला संस्थाचालकांनी विरोध करताना गरजू विद्यार्थ्यांना सवलती देण्याच्या पर्यायाला सुद्धा केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे शुल्कवाढीचा ससेमिरा विद्यार्थ्यांमागे कायम आहे.

### 'अतिरिक्त शुल्क घेतल्यास तक्रार करा'

शुल्क नियमन प्राधिकरणाने सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शुल्क निश्चित केले आहे. सर्व महाविद्यालयांच्या शुल्काचे तपशील प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर आहेत. महाविद्यालयांनीही हे तपशील त्यांच्या संकेतस्थळावर जाहीर करणे अपेक्षित आहे. प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्काव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने किंवा कारणासठी महाविद्यालये अतिरिक्त शुल्क मागत असल्यास त्याची शुल्क नियमन प्राधिकरणाकडे तक्रार करावी, असे आवाहन प्राधिकरणाने केले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मुळातच लाखो रुपयांच्या घरात असलेल्या शुल्कात दर दोन वर्षांनी वाढ होते. करोनाची साथ येण्यापूर्वी अनेक महाविद्यालयांना १० ते १५ टक्क्यांनी शुल्कवाढ मंजूर करण्यात आली होती. आता प्रवेशानंतर महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू होणार की ऑनलाइन सुरू होणार याबाबत अद्यापही संदिग्धता आहे. शुल्क नियमन प्राधिकरणाने महाविद्यालयांना वापराव्या लागणाऱ्या सुविधा, मंदीची परिस्थिती, विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती अशा मुद्द्यांच्या आधारे या शैक्षणिक वर्षाची (२०२०-२१) १० टक्के शुल्कवाढ रद्द करण्याचा ठराव केला होता. त्याचप्रमाणे पुढील शैक्षणिक वर्षातही (२०२१-२२) संस्थांना शुल्कवाढ मागता येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला होता. मात्र प्राधिकरणाच्या या ठरावाला संस्थाचालकांनी विरोध केला आणि शुल्कवाढ रद्द करण्याऐवजी गरजू विद्यार्थ्यांना सवलती, अभ्यासवृत्ती अशा सुविधा देण्याचा पर्याय सुचवला होता. प्राधिकरणाने संस्थाचालकांपुढे नमते घेत शुल्कवाढ रद्द करण्याचा निर्णय मागे घेतल्यानंतर आता संस्थाचालकांना आपल्या आश्वासनाचा विसर पडल्याचे दिसत आहे. कोणत्या सवलती, कशा स्वरूपात देणार हे जाहीर करण्याची सूचनाही प्राधिकरणाने दिली होती. मात्र, संस्थांनी अशी कोणतीही माहिती जाहीर केलेली नाही.

### दोन अभ्यासक्रमांच्या शुल्काचा भार

तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया रखडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी इतर अभ्यासक्रमांन प्रवेश घेतला होता. इतर पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्राची परीक्षाही अनेकांनी दिली. य अभ्यासक्रमांसाठी घेतलेले प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यांना दुसऱ्य अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा लागणार आहे. नियमानुसार एक सत्र झाल्यानंतर वर्षभराचे शुल्क भरले असल्यास ते सर्व परत मिळू शकत नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास आता महाविद्यालयांनाही दुसरे विद्यार्थी मिळणे शक्य नसल्यामुळे महाविद्यालयांनाही शुल्क परत करणे जड जाणार आहे. त्यामुळे मूळातच तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाचे शुल्क आणि दुसऱ्या अभ्यासक्रमाल घेतलेल्या प्रवेशाचे शुल्क अश दोन्हीचा भार विद्यार्थ्यांना उचलाव लागण्याची शक्यता आहे.

लोकसत्ता Fri, 15 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57737440

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## 'करोना'मुळे पुढील दोन वर्षे शैक्षणिक कामकाज विस्कळीतच

**पूर्वार्ध**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यभरात अकरावी ते पदव्युत्तर पदवी दरम्यानच्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अजूनही पूर्ण झालेली नाही. दरवर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा यंदा एप्रिल-मेपर्यंत पुढे ढकलल्या जाणार असून, परिणामी पुढील दोन शैक्षणिक वर्षेही विस्कळीतच राहणार आहेत.

देशात मार्चपासून करोनाचा संसर्ग सुरू झाल्यावर दहावी-बारावीपासून पदव्युत्तर पदवी पर्यंत विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा, प्रवेश परीक्षा, निकाल आणि नव्या शैक्षणिक वर्षाचे प्रवेश या प्रक्रियेला विलंब होऊन यंदाच्या (२०२०-२१) शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक बिघडले आहे. शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक बिघडल्याने पुन्हा परीक्षा आणि निकालांना उशीर होणार आहे. त्यामुळे यंदाचेच नाही, तर पुढील दोन शैक्षणिक वर्षे विस्कळीतच राहणार असल्याचा शिक्षण तज्ज्ञांचा अंदाज आहे. पुढील वर्षी शैक्षणिक वर्षात विस्कळीत शैक्षणिक कामकाज पूर्वपदावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू आणि भारतीय विद्यापीठ महासंघाचे अध्यक्ष डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, की करोनाचा पुढील दोन शैक्षणिक वर्षांवर परिणाम होणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे ऑनलाइन आणि ऑफलाइन अध्यापनासारख्या पद्धतींचा वापर करावा लागेल. शैक्षणिक वर्ष पूर्वपदावर कधी येईल याबाबत सांगता येणार नाही. लसीचे वितरण किती लवकर होईल यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत.

'करोनाचा पुढील वर्षीच्या शैक्षणिक कामकाजावर परिणाम नक्कीच होणार आहे. ऑनलाइन शिक्षण पुरेसे ठरत नसल्याने परीक्षेवर अवलंबून असलेली मूल्यमापन पद्धती बदलून नव्या शक्यता विचारात घ्याव्या लागतील, सत्र कालावधी कमी करावा लागेल,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मांडले.

### दहावी-बारावीसाठी 'परीक्षा केंद्रित शिक्षण'

करोना संसर्गाचा काळ शैक्षणिकदृष्ट्या आव्हानात्मक आहे. स्वाभाविकपणे पुढील दोन शैक्षणिक वर्षे विस्कळीतच असतील. मात्र दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्याला प्राधान्य द्यावे लागेल. त्या दृष्टीने परीक्षेसाठी आवश्यक तितकाच अभ्यासक्रम शिकवल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळेल. विद्यार्थ्यांना स्वअध्ययन, सहअध्ययनासाठीही प्रोत्साहित करून आवश्यकतेनुसार शिक्षकांनी मार्गदर्शन करावे, असे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी सांगितले.

> 'करोना'मुळे पुढील शैक्षणिक वर्षांवरही परिणाम होणारच आहे. कारण दहावी-बारावीच्या परीक्षा, विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा दरवर्षीच्या वेळापत्रकानुसार होतील का, याबाबत काहीच खात्री नाही. पुढील शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीवर परिणाम होणार आहे. अभ्यासक्रमातील काही भाग कमी करण्याबाबतचा विचार करावा लागेल. तसेच पुढील शैक्षणिक वर्ष किमान एक-दोन महिने पुढे जाण्याची शक्यता आहे.
>
> – **डॉ. भास बापट**, अधिष्ठाता, शैक्षणिक विभाग, आयसर पुणे

लोकसत्ता Fri, 15 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57737448

## अकरावी प्रवेशासाठी शेवटची संधी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमधील अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात येत असलेल्या 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' फेरीच्या (एफसीएफएस) पहिल्या गटातील प्रवेशासाठी आज (शुक्रवारी) शेवटचा दिवस आहे. त्याचप्रमाणे शनिवारपासून ८० टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

अकरावी प्रवेशाच्या तीन नियमित; तर दोन विशेष फेऱ्या संपल्यानंतर एफसीएफएस फेरी राबविण्यात येत आहे. या फेरीत प्रवेश घेण्यासाठी बुधवारी लिंक ओपन करण्यात आली. यामध्ये एक हजार ४१३ विद्यार्थी पात्र झाले. परंतु, केवळ २८ विद्यार्थ्यांना महाविद्यालये अॅलॉट करण्यात आली. त्यातील केवळ २५ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दिली. त्यातील केवळ २१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये चार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही; तर तीन विद्यार्थी महाविद्यालयांकडे गेलेच नाहीत. कोटा प्रवेश प्रक्रियेत ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला; तर एका विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात आला आहे. अशा एकूण ८१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

**प्रवेशाची 'परीक्षा'**

गुरुवारी १४ जानेवारीला मकरसंक्रांतीची महाविद्यालयांना सुट्टी असल्यामुळे १५ जानेवारी रोजी पहिल्या गटातील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यात येईल. त्यानंतर १६ जानेवारीपासून दुसऱ्या गटाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

Maharashtra Times
15.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## Students want DTE to follow national guidelines for MBA admissions

**Candidates claim the state body robs them of enrolment by not considering graduation results**

| Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror



Students complained admissions to DTE colleges started after almost seven months of announcing the entrance test results

Even while the MBA admissions in private universities and colleges have been completed, the same has started after a long wait at colleges under the Directorate of Technical Education (DTE). Now, students have demanded that the government body should follow national norms for its admissions.

All India Council for Technical Education (AICTE) had informed all MBA colleges that admissions for this academic year can be completed on the basis of graduation marks but the same is not followed by DTE.

Students have also complained that DTE did not respond to their requests in case they need to have some changes in their admission process. Anil Thombare, one of the students, said, "While the admission has begun on the basis of CET results, the verification for the same has been started but students are facing problem in caste validity certificate. Those who have not uploaded it are automatically being taken away from the admission process. We might have to miss the admission process altogether. Even if we complain to DTE about such technical problems, it is not responding."

DTE has approximately 100 colleges under its umbrella in Pune region and admissions for the same have started after almost seven months of announcing the entrance test results. Students complained that even while CET results were out, the admission process was delayed and students who had not sat for the test, they can also complete admission on the basis of graduation results.

Another student on the basis of anonymity said, "I want admission in MBA courses and AICTE has also informed that admission can be completed without any entrance test results and can be completed through graduation marks. While this norm is followed by private colleges, the same rule is not being followed by DTE. Due to pandemic, as the norms were changed by AICTE, we have demanded that the same should be followed by DTE."

Thombare said, "We have also been asking that DTE office here should respond and solve our queries. If students who are facing problems in submission of documents during verification round, the same is not resolved."

DTE officials, on the other hand, confirmed that as of now admission for the same is conducted through CET and will be continued so. DV Jadhav, joint director, DTE, Pune, said, "As of now, the admissions details are processed by CET cell of Maharashtra."

Students have complained that apart from CET cell marks, DTE should also consider graduation marks at least for one round of admissions so that their academic year is not wasted.

Pune Mirror 15.1.2021

## ऑनलाइन माध्यमाद्वारे मुलांना शिकवायचे कसे?

**शिक्षकांसाठी 'स्वयं पोर्टल'चे प्रशिक्षण**

पुणे, ता. १५ : ऑनलाइन शिक्षण कंटाळवाणे झाल्याने विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. असे असताना शिक्षकांनी व्हिडिओ तयार करताना कसे बोलावे आणि रंजकपणे संकल्पना कशा स्पष्ट कराव्यात, याबाबत प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र सरकारच्या 'स्वयं पोर्टल'ने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी चार आठवड्यांचा ऑनलाइन कोर्स तयार केला असून, त्याची सुरुवात १८ जानेवारीपासून होणार आहे.

कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षणाचा प्रसार झाला खरा; पण या माध्यमातून नेमके शिकवायचे कसे, याचे प्रशिक्षण बहुसंख्य शिक्षकांना नाही. शाळा सुरू झाल्या, तरी विद्यार्थिसंख्या कमीच आहे. महाविद्यालये सुरू झाली तरी ऑनलाइन शिक्षण सुरूच राहणार आहे. त्यामुळे या गोष्टीचा विचार करून 'स्वयं पोर्टल'वर शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षकांसाठी चार आठवड्यांचा विशेष ऑनलाइन अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. सोमवारपासून (ता. १८) सुरू होत आहे. हा कोर्स विनामूल्य उपलब्ध आहे. दरम्यान, यापूर्वी पान ७ वर »

**नावनोंदणीसाठी लिंक**
https://onlinecourses.nptel.ac.in/noc21_ge11/preview

**क्यूआर कोड स्कॅन करा.**

Sakaal 16.1.2021

## महाविद्यालयाची स्वायत्तता कागदोपत्रीच

पुणे : विद्यापीठ अनुदान मंडळाच्या नियमानुसार महाविद्यालयांना रोजगार व कौशल्यांवर आधारित नवे अभ्यासक्रम सुरू करता येतात. मात्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि विद्यापीठांकडून या अभ्यासक्रमांना वेळेत मान्यता दिली जात नसल्याने, महाविद्यालयांना नवे अभ्यासक्रमच सुरू होताना दिसत नाही. त्यामुळे यूजीसीची स्वायत्तता कागदोपत्रीच असल्याचे दिसून येत आहे.

सरकारी विद्यापीठांशी सलंग्न महाविद्यालयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे विद्यापीठांवरील ताण कमी करण्यासाठी केंद्रीय शिक्षण विभाग आणि यूजीसीकडून महाविद्यालयांना स्वायतत्ता देण्याचे धोरण अवलंबले जात आहे. त्याअंतर्गत महाविद्यालयांना स्वायत्ता देखील मिळत आहे. मात्र, राज्य सरकार आणि विद्यापीठ प्रशासनाच्या दिरंगाईमुळे महाविद्यालयांना नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात अडचणी येत असल्याचे चित्र आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग व विद्यापीठाकडून आवश्यक कार्यवाही वेळेत होत नसल्याने, महाविद्यालयांना संबंधित अभ्यासक्रम सुरुच करता येत नसल्याचे चित्र आहे. पुणे व पिंपरी चिंचवडसह राज्यातील मोठ्या शहरांमध्ये स्वायत्ता मिळवलेल्या महाविद्यालयांसमोर हा प्रश्न आहे.

या प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता असल्याचे प्राचार्य व शिक्षणसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

Kesari 16.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## विद्यापीठ अधिकार मंडळाचे सदस्य वाढवा

### सुखदेव थोरात समितीकडे संस्थाचालक, प्राचार्य प्राध्यापकांची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे: विद्यापीठाशी संलग्न असणा-या महाविद्यालयांची संख्या लक्षात घेवून विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर निवडून जाणा-या सदस्यांची संख्या निश्चित करावी, प्र-कुलगुरूंचे अधिकार कमी करावेत, विद्यापीठाच्या विद्याशाखांनुसार स्वतंत्रपणे अधिष्ठात्यांची नियुक्ती करावी,राज्यपालकांकडून व्यवस्थापन परिषदेवर पाठविला जाणारा सदस्य शिक्षण क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव असणारा असावा,असे मुद्दे संस्थाचालक,प्राचार्य व प्राध्यापकांची शनिवारी विद्यापीठ सुधारणा समिती समोर मांडले.

उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी व विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी राज्य शासनातर्फे विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.या समितीची बैठक शनिवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घेण्यात आली. त्यात विविध विद्यापीठांसह शिक्षण क्षेत्राशी निगडीत असणा-या घटकांना सूचना मांडण्यासाठी वेळ देण्यात आली होती. त्यानुसार संस्थाचालक व प्राचार्य संघटनेचे प्रा. नंदकुमार निकम, डॉ.सुधाकर जाधवर, डॉ.संजय खरात यांनी समिती समोर सूचना सादर केल्या. तसेच शिक्षक हितकारणी संघटनेच्या वतीने प्रा.प्रकाश पवार यांनी प्राध्यापकांची भूमिका मांडली.

विद्यापीठ अधिकार मंडळावर निवडून जाणा-या महिला व मागासवर्गीय प्रतिनिधींच्या संख्येत वाढ करावी.कायद्यात विविध प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव मांडण्याची तरतुद असावी,राज्यपाल यांच्या परवानगीने तीन दिवस अधिसभा घेता यावी,अधिसभेवर शिक्षक आमदारांची निवड करावी,आदी मुद्दे नंदकुमार निकम यांनी मांडले.

विद्यापीठातल्या सर्व अधिकार मंडळाला सामाजिक आरक्षणाचे तत्त्व लागू करावे ,सिनेट सभागृहाचे सदस्य संख्या वाढवावी,तक्रार निवारण समिती दाखल केलेली तक्रारलवकर निकालात काढावी त्यासाठी कालमयार्दा निश्चित करावी, कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक अत्याचार निर्मूलन समिती स्थापन करावी,अशी भूमिका प्रकाश पवार यांनी मांडली.

Lokmat 17.1.2021

## विद्यापीठाची 'कॅस' प्रक्रिया वादात

### मुलाखतींवर संस्थाचालकांचा आक्षेप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सहाय्यक व सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम (कॅस) या अंतर्गत घेतलेल्या मुलाखतींवर संस्थाचालकांनी आक्षेप घेतला आहे. या मुलाखती महाविद्यालय स्तरावरच घेणे योग्य ठरेल, असे पत्र उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यापीठाला पाठवले असून खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

प्राध्यापकांच्या पदोन्नतीबाबत पुणे विद्यापीठाने वर्षभरात तीन वेळा 'कॅस' शिबीराचे आयोजन केले. त्यातील दोन रद्द केले. दबाव वाढल्याने ८ ते १४ जानेवारी या काळात विद्यापीठ स्तरावर मुलाखती घेतल्या. प्राध्यापक निवड समितीचे अध्यक्ष हे संबंधित संस्थेचे संचालक असतात. त्यामुळे मुलाखती राज्य शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाविरोधात आहेत, अशी लेखी तक्रार डॉ. पी .ए. इनामदार यांच्यासह इतर तीन संस्थाचालकांनी केली. त्यावर उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी 'कॅस'अंतर्गत पदोन्नती समितीच्या



मुलाखती महाविद्यालयात घेणे उचित ठरेल, असे पत्र पाठवले आहे.

विद्यापीठाने मुलाखती गरवारे महाविद्यालयात नियमबाह्य पध्दतीने आयोजित केल्या. प्राध्यापकांकडून आकारलेले शुल्क महाविद्यालयाच्या खात्यात जमा केली, अशी चर्चा आहे.

विद्यापीठाकडून उच्च शिक्षण संचालक कार्यालयाने दिलेल्या आदेशानुसार या बैठकांचे आयोजन केले. उच्च शिक्षण विभागाने प्रतिनिधी पाठवून विद्यापीठाला सहकार्य केले. विद्यापीठाकडे मनुष्यबळाचा तुडवडा असल्याने विद्यापीठाने गरवारे महाविद्यालयाच्या सहकार्याने कॅसचे कामकाज केले. त्यासाठीच्या खर्चाचा तपशील ३ ते ४ दिवसात प्रसिध्द केला जाणार आहे, असे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले.

Lokmat 17.1.2021

## 'कॅस'बाबत प्रश्नचिन्ह

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पदोन्नतीसाठी प्राध्यापकांच्या निवडीचे अधिकार संस्थाचालकांना असून, विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या निर्णयाच्या विरोधात निर्णय घेण्याचा विद्यापीठाला अधिकार नसल्याचे उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला पत्राद्वारे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्राध्यापक पदोन्नतीच्या प्रक्रियेबाबत (कॅस) प्रश्न निर्माण झाले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने कॅस अंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखती २८ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीत घेतल्या. मात्र, या मुलाखतींच्या प्रक्रियेला शिक्षणसंस्थाचालकांनी आक्षेप नोंदवत त्याची तक्रार उच्च शिक्षण संचालनालयाला केली आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. माने यांनी विद्यापीठाला पत्राद्वारे अहवाल पाठवण्यास सांगितले आहे.

प्राध्यापक निवडीसाठी संबंधित संस्था नियुक्ती प्राधिकारी असून, महाविद्यालयातील प्राध्यापकांची निवड समिती आणि कॅस अंतर्गत पदोन्नती समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य सदस्य सचिव असतात. त्यामुळे महाविद्यालयांमधील ज्या प्राध्यापकांची निवड करायची आहे किंवा कॅस अंतर्गत पदोन्नती करायची आहे त्या संदर्भातील बैठक संबंधित महाविद्यालयात आयोजित करणे उचित ठरेल, असे डॉ. माने यांनी स्पष्ट केले आहे.

### प्राचार्यांनी सहकार्य करावे

सातव्या वेतन आयोगाच्या प्राध्यापक पदासाठी पदोन्नती मिळण्यास खूपच उशीर झालेला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या निर्देशानुसार केंद्रीय स्तरावर प्रक्रिया राबवण्यासाठी पात्र शिक्षकांचे पदोन्नतीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी सादर केले आहेत. मात्र, काही प्राचार्यांनी ही प्रक्रिया महाविद्यालय स्तरावर करण्याची मागणी केल्यामुळे या प्रक्रियेत विलंब होऊन प्राध्यापकांचे नुकसान होणार आहे. तसेच ही प्रक्रिया खर्चिक असल्याने प्राचार्यांनी केंद्रीय पद्धतीने प्रक्रिया पूर्ण होऊ देण्यास सहकार्य करावे, असे विद्यापीठ विकास मंचाचे डॉ. ए. पी. कुलकर्णी यांनी आवाहन केले आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Sun, 17 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57811313

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राध्यापक भरती प्रक्रियेतील प्रकार

## मुक्त विद्यापीठाच्या 'पीएच.डी.'धारकांना डावलले

अनिकेत साठे, लोकसत्ता

**नाशिक :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्राध्यापक पदासाठी 'कॅस' अंतर्गत पार पडलेल्या प्रक्रियेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या अनेकांना डावलण्यात आले आहे.

सुरुवातीला मुक्त विद्यापीठाची पीएच.डी. ग्राह्य धरत नसल्याचे सांगून मुलाखतीत अनुत्तीर्ण करण्यात आले. नंतर मात्र काहींची तीच पीएच.डी. ग्राह्य धरली गेली. एकाच प्रक्रियेत परस्परविरोधी निकषांमुळे सहयोगी प्राध्यापकांमध्ये अन्यायाची भावना आहे.

दरम्यान, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार उपरोक्त प्रक्रिया पार पडली. ज्यांची पीएच.डी. ग्राह्य धरली, ती प्रकरणे शासन मान्यतेसाठी पाठविली जाणार असल्याचे पुणे विद्यापीठाने म्हटले आहे.



**दावा काय? :** जे सरळ मार्गाने मुलाखतीला सामोरे गेले, त्यांना मुक्त विद्यापीठाच्या पीएच.डी.चे कारण देऊन बढती नाकारली. हा निकष नंतर समितीने बदलून काही सहयोगी प्राध्यापकांना बढती दिल्याची तक्रार डॉ. खैरनार यांनी विद्यापीठाकडे केली आहे. मुलाखतीत अनुत्तीर्ण झालेल्यांना वर्षभराने पुन्हा या प्रक्रियेत सहभागी होण्याची मुभा आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने मुक्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम अन्य विद्यापीठांना समकक्ष असल्याचा निर्वाळा दिल्याचा संबंधित प्राध्यापकांचा दावा आहे.

पुणे विद्यापीठात प्राध्यापक पदासाठी पार पडलेल्या मुलाखत प्रक्रियेवर अनेक सहयोगी प्राध्यापकांनी शंका उपस्थित केली. यात प्राध्यापकांचे संशोधनातील योगदान, विद्यापीठ-महाविद्यालयीन कामकाज, अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग तसेच विषय ज्ञान, सादरीकरणाची पद्धत आदी निकषांवर गुणांचे वर्गीकरण केले जाते.

विहित निकषांपेक्षा उजवी कामगिरी करणाऱ्यांना मुलाखतीत डावलले गेल्याची तक्रार नाशिकच्या सहयोगी महिला प्राध्यापिकेने केली. १८ संशोधन निबंध, ज्यातील सात हे यूजीसीच्या यादीतील पत्रिकेत प्रसिद्ध झाले, संशोधन कार्याचे अनेक देशांत, राष्ट्रीय परिषदेत सादरीकरण, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन याकडे समितीने दुर्लक्ष केले. कचरा डेपोमुळे परिसरात होणाऱ्या प्रदूषणाबाबतच्या संशोधन कार्याची दखल नाशिक महापालिकेला घ्यावी लागली. प्लास्टिक बंदीनंतर वापरल्या जाणाऱ्या कापडीसारख्या पिशव्यांमध्ये प्लास्टिकचे अंश असल्याची बाब प्रयोगांती सिद्ध केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याची दखल घेतली. मुलाखत प्रक्रिया उत्तम पार पडूनही मुक्त विद्यापीठाची पीएच.डी. ग्राह्य धरता येणार नसल्याचे सांगून कमी गुण दिल्याची तक्रार होत आहे. लॅपटॉपमध्ये बिघाड असल्याचे सांगून समितीने सादरीकरणाची संधी दिली नाही. या प्रक्रियेत व्यक्तिनिहाय वेगवेगळे निकष लावले गेल्याचा आक्षेप मनमाड महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संभाजी खैरनार यांनी नोंदविला.

> 'कॅस'ची प्रक्रिया उच्च शिक्षण विभागाच्या आधिपत्याखाली नियमानुसार पार पडते. पुणे विद्यापीठाने तिचे केवळ व्यवस्थापन केले. या संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पण, त्यामध्ये तथ्य नाही हे सहयोगी प्राध्यापकांनाही माहिती आहे. मुक्त विद्यापीठाची पदवी कला, वाणिज्यसारख्या विषयात ग्राह्य धरली जाते. परंतु, व्यावसायिक, विज्ञानाच्या अभ्यासक्रमात ग्राह्य धरली जात नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाचे तसे निकष आहेत. या प्रक्रियेत काहींची पीएच.डी. 'शासन मान्यतेच्या अधीन राहून' असा शेरा मारून ग्राह्य धरण्यात आली. कामगिरीअभावी काही जण मुलाखतीत अनुत्तीर्ण झाले. यात विषय तज्ज्ञांचा निर्णय अंतिम असतो. त्यानुसार ही प्रक्रिया पार पडली. – नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sun, 17 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57773026

## पाली भाषा विभागासाठी स्वतंत्र इमारत

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये उभारणी; १३ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

पुणे, ता. १६ : बौद्ध तत्त्वज्ञानाचे भांडार पाली भाषेमध्ये असल्याने या भाषेचा अभ्यास, संशोधन आणि विकास होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली भाषा विभागाला स्वतंत्र आणि प्रशस्त जागा उपलब्ध झाली आहे. राज्य सरकारच्या सामाजिक व न्याय विभागाने पाली विभागासाठी १३ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, इमारत उभारणीचे काम सुरू झाले आहे.

राज्यात अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील महान व्यक्तींचे स्मारक बांधणे आणि सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी सरकारने अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून विद्यापीठाच्या पाली विभागासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी सरकारने १३ कोटी ३४ लाख ७५ हजार २१० रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामध्ये ९० टक्के खर्च (१२ कोटी १ लाख) राज्य सरकार, तर १० टक्के खर्च (१ कोटी ३३ लाख) पुणे विद्यापीठाकडून केला जाणार आहे.

इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. विद्यापीठात २०१३ पासून पाली भाषा विभाग 'पुम्बा'च्या समोर असून आता त्यासाठी पर्यावरण विभागाच्या पाठीमागे स्वतंत्र इमारती बांधली जाणार आहे.

> नव्या इमारतीमध्ये वर्ग खोल्या, प्राध्यापक कक्ष, ग्रंथालय, सभागृह, धान्यधारणा कक्ष आदी सुविधा असणार आहेत. पाली विभागासाठी स्वतंत्र इमारत बांधली जात असताना भविष्यात संशोधन व रोजगाराभिमुख असे शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत.
> डॉ. महेश देवकर, प्रमुख, पाली भाषा विभाग

> सामाजिक न्याय विभाग व पुणे विद्यापीठाच्या निधीतून ही इमारत बांधली जाईल. बांधकाम व वृक्षतोडीसाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत.
> -मनोज ठाकरे, सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

#### वृक्षतोडीमुळे नाराजी

पाली भाषा विभागाची इमारत बांधण्यासाठी विद्यापीठात वृक्षतोड करून जागा मोकळी करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या असून, एकास तीन याप्रमाणे वृक्षारोपण केले जाणार आहे. मात्र, विद्यापीठात बांधकामे होऊन झाडे कमी होत असल्याने प्राध्यापक, अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

Sakaal 17.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

## Section: Education

## पाली भाषा अभ्यास, संशोधनास चालना

### राज्य शासनातर्फे पुणे विद्यापीठासाठी १३ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १६ - राज्य शासनाच्या सामाजिक व न्याय विभागाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पाली विभागासाठी १३ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या माध्यमातून पुणे विद्यापीठाच्या पाली विभागासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता पाली भाषेच्या अभ्यास, संशोधनास आणखी चालना मिळणार आहे.

राज्यात अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील महान व्यक्तींचे स्मारक बांधणे, सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. याद्वारे विद्यापीठाच्या पाली विभागासाठी स्वतंत्र इमारत



बांधण्यात येणार असून, त्याचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी शासनाने १३ कोटी ३४ लाख ७५ हजार २१० रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामध्ये ९० टक्के खर्च (१२ कोटी १ लाख) महाराष्ट्र शासन, तर १० टक्के खर्च (१ कोटी ३३ लाख) पुणे विद्यापीठाकडून केला जाणार आहे. इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून (पीडब्ल्यूडी) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. पुणे विद्यापीठात २०१३ पासून पाली भाषा विभाग 'पुम्बा'च्या समोर

"नव्या इमारतीमध्ये वर्ग खोल्या, प्राध्यापक कक्ष, ग्रंथालय, सभागृह, ध्यानधारणा कक्ष आदी सुविधा असतील. पाली विभागासाठी स्वतंत्र इमारत बांधली जात असताना भविष्यात संशोधन व रोजगाराभिमुख असे शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. त्यामुळे ही नवी इमारत उपयुक्त ठरणार आहे.

– डॉ. महेश देवकर,
पाली विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

आहे. आता या विभागासाठीच्या स्वतंत्र इमारतीचे काम पर्यावरण विभागाच्या पाठीमागे बांधली जाणार असून, त्या ठिकाणचे झाडे काढण्यात आली आहेत.

Prabhat 17.1.2021

## पदोन्नतीसाठी प्राध्यापकांची शिबिरे यापुढे महाविद्यालय स्तरावरच घ्या

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - सहायक व सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम (कॅस) शिबिर हे विद्यापीठ स्तरावर आयोजित न करता ते महाविद्यालय स्तरावरच घेणे योग्य ठरेल, असे सांगत उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला त्यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

पुणे विद्यापीठाने गेल्या वर्षभरात तीन वेळा 'कॅस' शिबिर रद्द केले होते. त्यानंतर आता दि.८ ते १४ जानेवारी



**पुणे विद्यापीठाला उच्च शिक्षण विभाग संचालकांचे आदेश**

या काळात पुणे विद्यापीठामध्ये मुलाखती घेतल्या. मात्र, यावर पुण्यातील संस्थाचालकांनी आक्षेप घेत विद्यापीठाने महाविद्यालयांच्या अधिकारावर अतिक्रमण करून 'कॅस'च्या मुलाखती घेतल्या अशी तक्रार उच्च शिक्षण संचालकांकडे तक्रार केली आहे. पुणे विद्यापीठाने घेतलेल्या मुलाखती राज्य शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयाविरोधात आहेत. असे मुद्दे या तक्रारीत आहेत. त्यावर डॉ. धनराज माने यांनी 'कॅस' अंतर्गत पदोन्नती समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष व सचिव प्राचार्य असतात. त्यामुळे अध्यापकांची निवड आणि शिबिर घेणे संबंधित महाविद्यालयात बैठक घेणे उचित ठरेल, असे माने यांनी पत्रात नमूद केले आहे.

Prabhat 18.1.2021

## 'कॅस'च्या अंतर्गत पुन्हा मुलाखती?

**संचालनालय आणि विद्यापीठामध्ये वाद**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'कॅस' अंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठीच्या मुलाखती कोणी घ्यायच्या, या प्रश्नावरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्यामध्ये वाद निर्माण झाला असून, या प्रकरणात उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी विद्यापीठ प्रशासनाला विचारणा केली आहे. त्याचप्रमाणे 'कॅस' अंतर्गत मुलाखती या संबंधित महाविद्यालयांमध्ये घेणे उचित ठरणार आहे, अशीही सूचना डॉ. माने यांनी केली आहे. त्यामुळे कॅसच्या मुलाखती पुन्हा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने कॅस अंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखती २८ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीत घेतल्या. मात्र, या मुलाखतीच्या प्रक्रियेला शिक्षण संस्थाचालकांनी आक्षेप नोंदविला होता. त्याची तक्रार उच्च शिक्षण संचालनालयाला केली होती. अशासकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या निवडीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारला किमान पात्रता व अनुभव ठरविण्याचे अधिकार आहे. त्यामुळे संस्थेने कोणत्या प्राध्यापकांची निवड करावी, याबाबतचे संपूर्ण अधिकार संबंधित संस्थेचे आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांची निवड आणि पदोन्नती करण्याचे; तसेच निवड केलेल्या शिक्षकांच्या निवडीची यादी ठरविण्याचे अधिकार विद्यापीठास नसून, हा राज्यघटनेतील कलम १९ (१) (जी)चा भंग असल्याचे संस्थाचालकांनी तक्रारीत नमूद केले आहे.

या तक्रारीची छाननी केल्यानंतर, डॉ. माने यांनी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांना पत्र पाठवून, प्रकरणाबाबत अहवाल संचालनालयाला पाठविण्याचे आदेश दिले आहेत. डॉ. माने यांच्या पत्रानुसार, प्राध्यापक निवडीसाठी संबंधित संस्था ही नियुक्ती प्राधिकारी असून, महाविद्यालयातील प्राध्यापकांची निवड समितीचे तसेच कॅस अंतर्गत पदोन्नती समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष असतात. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य हे सदस्य सचिव असतात. त्यामुळे ज्या महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची निवड करायची आहे किंवा कॅस अंतर्गत पदोन्नती करायची आहे, अशा प्राध्यापकांच्या निवड/पदोन्नतीची बैठक ही त्या महाविद्यालयात आयोजित करणे उचित ठरेल, अशी सूचना डॉ. माने यांनी केली आहे.

### 'केंद्रीय पद्धतीने कॅससाठी सहकार्य करावे'



सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार महाविद्यालय शिक्षकांना प्राध्यापक पदासाठी पदोन्नती मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मात्र, यासाठी खूपच उशीर झालेला आहे. त्यामुळे विद्यापीठाने केंद्रीय पद्धतीने सर्व महाविद्यालयांना आपल्या पात्र शिक्षकांचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे सर्व महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले आहेत. मात्र, काही प्राचार्यांनी ही प्रक्रिया महाविद्यालय स्तरावर करण्यात यावी, अशी मागणी केल्यामुळे शिक्षकांना प्राध्यापक पदावर पदोन्नती मिळण्यासाठी विलंब होऊन त्यांचे नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे ते अधिक खर्चीक असून त्यामध्ये अडचणी असल्याने, आमचा याला विरोध होता. प्राचार्यांनी केंद्रीय पद्धतीने आयोजित केलेल्या प्राध्यापक पदासाठीची प्रक्रिया पूर्ण होऊ देण्यास सहकार्य करावे, अशी आमची भूमिका असल्याचे विद्यापीठ विकास मंचाचे डॉ. ए. पी. कुलकर्णी यांनी सांगितले.

Maharashtra Times 18.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

## दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांना आज शेवटची संधी

**पुणे** : इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) फेरी अंतर्गत दुसऱ्या गटातील विद्यार्थ्यांना सोमवार, दि.१८ सायंकाळी पाच वाजेपर्यंत संबंधित महाविद्यालयांत प्रवेश निश्चित करता येणार आहे. त्यानंतर १९ जानेवारीपासून तिसऱ्या गटातील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार असल्याची माहिती उपसंचालक कार्यालयातून देण्यात आली आहे.

**अकरावी प्रवेश**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने १३ जानेवारीपासून एफसीएफएस फेरी राबविण्यात येत आहे. या फेरीच्या पहिल्या टप्प्यात पहिल्या गटासाठी म्हणजेच ९० टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. ही प्रक्रिया १५ जानेवारीपर्यंत सुरू होती. त्यानंतर दुसऱ्या संवर्गातील म्हणजेच ८० टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठीची प्रक्रिया सुरू आहे. या अंतर्गत अलॉट झालेल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी सोमवारपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. कनिष्ठ महाविद्यालयात झालेले प्रवेश संकेतस्थळावर नोंदविण्यासाठी महाविद्यालयांना सोमवारी रात्री आठ वाजेपर्यंत अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. त्यानंतर पुढील टप्प्यातील तिसऱ्या गटासाठी म्हणजेच ७० टक्के आणि त्यापेक्षा अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. दरम्यान, सातव्या गटातील प्रवेशाची प्रक्रिया २९ जानेवारीला सुरू होऊन ३० जानेवारीपर्यंत संपेल. त्यानंतर सर्वसाधारण अंतिम रिक्त जागांचा तपशील ३१ जानेवारीला जाहीर होईल, अशी माहिती उपसंचालक कार्यालयातून देण्यात आली आहे.

My Pune Edition
Jan 18, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## विद्यापीठात 'बौद्ध वारसा आणि पर्यटन' अभ्यासक्रम

### पुणे विद्यापीठ, डेक्कन कॉलेजमध्ये सामंजस्य करार; रोजगाराच्या संधी वाढणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : विद्यार्थ्यांना आशिया खंडातील दक्षिण पूर्व राष्ट्रांमधील बौद्ध संस्कृती आणि वारसा, चित्रकला, स्थापत्यकलेचा अभ्यास करता यावा. तसेच त्यातून विद्यार्थ्यांना पर्यटन क्षेत्रात रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डेक्कन अभिमत विद्यापीठाने 'बौद्ध वारसा आणि पर्यटन' हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. देशात प्रथमच अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरू होत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रसाद जोशी यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. विद्यापीठाच्या पाली विभागातर्फे या अभ्यासक्रम प्रवेश दिला जाणार आहे. हा अभ्यासक्रम दीड वर्षाचा असून त्यातील सहा महिने विद्यार्थ्यांना वारसा आणि पर्यटन या क्षेत्राचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. पाली विभागाचे प्रमुख महेश देवकर म्हणाले, 'बौद्ध वारसा आणि पर्यटन 'या अभ्यासक्रमात बौद्ध कला, स्थापत्य, जागतिक वारसास्थळे, पर्यटनशास्त्र, बौद्ध वाङ्मय, तत्त्वज्ञान, भारतीय बौद्ध स्थळे आदी विषयांचा समावेश केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकाच वेळी विविध विषयांचा अभ्यास करता येईल.

विदेशी पर्यटकांना दुर्लक्षित प्राचीन बौद्ध वारशाची माहिती होणे गरजेचे आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमातून बौद्ध सांस्कृतिक वारसास्थळांच्या पर्यटनाला भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चालना मिळेल.

**बौद्ध स्थळांची ओळख**

डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे डॉ. श्रीकांत गणवीर म्हणाले, महाराष्ट्र, तेलंगणा, गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यांतील अनेक महत्त्वाची प्राचीन बौद्ध स्थळे अजूनही पर्यटनाच्या दृष्टीने उपेक्षित आहेत. अजूनही जपान, चीन, श्रीलंका, थायलंड आदी बौद्धधर्मीयबहुल राष्ट्रांतील पर्यटक काही मोजकी प्राचीन बौद्धस्थळे वगळता अनेक महत्त्वाच्या स्थळांना भेट देत नाहीत.

Lokmat 19.1.2021

## बारावीच्या विद्यार्थ्यांना आधीच्या विषय निवडीनुसार परीक्षेची अंतिम संधी

### नवीन मूल्यमापन योजनेतील नियम यंदा शिथील

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता बारावीसाठी सुधारित विषय योजना आणि सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली. मात्र, यामुळे विद्यार्थ्यांना ऐनवेळी विषय बदलावे लागत आहेत. शिवाय, सध्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अध्ययनातही मर्यादा येत आहेत. याची दखल घेत अखेर या योजनेस यंदाच्या वर्षापुरती स्थगिती देण्यात आली आहे. त्यानुसार, यंदा अंतिम संधी म्हणून बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या विषयाची परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जाहीर करण्यात आला असून, त्यामुळे २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

बंद करण्यात आलेल्या विषयांचे अध्यापन तातडीने बंद करण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. शिक्षण संचालकांनी सर्व संस्थाचालकांच्या ही बाब निदर्शास आणून देण्याच्या सूचना शिक्षण विभागाने केल्या आहेत. पुढील वर्षापासून बारावीच्या विद्यार्थ्यांना अशी सवलत देता येणार नाही आणि सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य असणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या शैक्षणिक वर्षात शाळा व महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरू न झाल्याने ऐनवेळी विषय बदलून परीक्षा देणे विद्यार्थ्यांसाठी गैरसोयीचे ठरणार होते. यामुळे अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण होऊन त्यांचे वर्ष वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याचे निवेदन कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघातर्फे शिक्षण विभागाला देण्यात आले होते, अशी माहिती मुंबईचे सरचिटणीस मुकुंद आंधळकर यांनी दिली.

Lokmat 19.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## प्रश्नपत्रिका आणि उजळणीवर शाळांचा भर

### दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी प्रयत्न

सकाळ EXCLUSIVE

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १८ : तुमचा मुलगी किंवा मुलगा दहावी-बारावीत आहे का?, बोर्डाच्या परीक्षेसाठी तिचा किंवा त्याचा अभ्यास कसा होणार, याची चिंता लागलीय का? मग जरा इकडे लक्ष द्या. दहावी आणि बारावीला असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून बोर्डाच्या परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी आता शाळांनीच कंबर कसल्याचे पहायला मिळत आहे. विद्यार्थ्यांकडून प्रश्नपत्रिका सोडवून घेणे, लिखाणावर भर देणे, तसेच ऑनलाइन वर्गात शिकविलेल्या अभ्यासक्रमाची उजळणी करून घेणे, याकडे शाळांनी लक्ष केंद्रित केले आहे.

ऑनलाइन शिकविलेला अभ्यासक्रम किती समजलाय, हा अंदाज यावा, म्हणून उजळणी करून घेण्यावर भर दिला जात आहे. ८० ते ८५ टक्के अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला आहे. उर्वरित अभ्यासक्रम येत्या काही दिवसांत शिकवून पूर्णदेखील होईल. परंतु असे असले, तरी शाळांनी डिसेंबर २०२० अखेरपासूनच विद्यार्थ्यांकडून बोर्डाच्या प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याला प्राधान्य दिले जात आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी नऊ महिन्यांपासून ऑनलाइन धडे घेत आहेत. त्यामुळे लिखाणाचा सराव बराचसा कमी झाला असल्याचे निरीक्षण शिक्षकांनी नोंदविले आहे.

> दहावीच्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नपत्रिका वेळेत सोडवून घेण्यावर भर देत आहोत. ऑनलाइन वर्गात शिकविलेला अभ्यासक्रम न कळल्यास विद्यार्थ्यांना समजावून सांगितला जात आहे.
> – तेजस्विनी राजपूत, मुख्याध्यापिका, गोपाळ हायस्कूल

**तणावमुक्त राहण्यासाठी...**

- वेळापत्रक करून नियोजनबद्ध अभ्यास करा
- परीक्षेचा वेळ गृहीत धरून, एका जागेवर बसण्याचा सवय हवी
- लिखाणाचा सराव करावा
- पाठांतर आणि वाचनाच्या सरावात सातत्य हवे.
- पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी एकमेकांशी संवाद साधावा.

– केतकी कुलकर्णी, समुपदेशक

> ऑनलाइन वर्गात शिकविलेल्या अभ्यासक्रमाची उजळणी करण्याच्या सूचना शिक्षकांना दिल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यावर भर दिला जात आहे.
> – रोहिदास भारमळ, मुख्याध्यापक, भावे हायस्कूल

Sakaal 19.1.2021

## महाविद्यालये सुरू करण्याची घोषणा हवेतच?

### राज्यातील विद्यार्थ्यांना महाविद्यालये सुरू होण्याची प्रतीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत शासन स्तरावर अद्याप काहीच हालचाली सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याबाबत २० जानेवारीपर्यंत निर्णय घेण्याची उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केलेली घोषणा हवेतच असल्याचे चित्र असून, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालये सुरू होण्याची प्रतीक्षा आहे.

राज्यातील नववी ते बारावीचे वर्ग २३ जानेवारीपासून सुरू झाले. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रात्यक्षिके, प्रकल्पांसाठी महाविद्यालये सुरू करण्याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करून तीन महिने होऊन गेले तरीही राज्यातील महाविद्यालये बंदच आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेऊन ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र शासनाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत कोणताही आदेश दिलेला नसताना कोणत्या नियमाच्या आधारे महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाकडून खुलासा मागवण्यात आला. त्यानंतर विद्यापीठाने ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय स्थगित केला. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ९ जानेवारीला केलेल्या फेसबुक संवादात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून २० जानेवारीपर्यंत महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले होते.

शालेय शिक्षण विभागाने काही दिवसांपूर्वी नववी ते बारावीच्या वर्गांनंतर आता पाचवी ते आठवीचे वर्गही २७ जानेवारीपासून सुरू करण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे आता महाविद्यालये कधी सुरू होणार असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

दरम्यान महाविद्यालये सुरू करण्याबाबत शासन स्तरावर अद्याप काहीच चर्चा झालेली नाही. त्यामुळे महाविद्यालये कधी सुरू होतील हे सांगता येणार नाही, अशी माहिती उच्च शिक्षण संचालनालयातील अधिकाऱ्यांनी दिली.

लोकसत्ता Wed, 20 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57855892

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## माजी विद्यार्थी कक्ष स्थापन करा

### यूजीसीकडून विद्यापीठांना सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** माजी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संस्थांशी पुन्हा जोडण्यासाठी माजी विद्यार्थी कक्ष स्थापन करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना केली आहे. माजी विद्यार्थी कक्षाच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांची नोंदणी करावी, त्यांना होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती द्यावी, चर्चासत्रे, परिषदांसाठी माजी विद्यार्थ्यांना निमंत्रित करावे, मेळावे-कार्यक्रमांचे आयोजन करावे, असेही यूजीसीने स्पष्ट केले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये देशातील उच्च शिक्षण संस्थांनी जागतिक स्तरावर पोहोचण्यासंदर्भात भर देण्यात आला आहे. तसेच केंद्र सरकारकडून शिक्षणासाठी भारत जागतिक केंद्र होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शिक्षण संस्थांसाठी माजी विद्यार्थी हा महत्त्वाचा घटक असतो.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

विद्यार्थ्यांना सहकार्य, अभ्यासक्रम, निधी उपलब्धता अशा वेगवेगळ्या स्तरांवर माजी विद्यार्थी संघटना उपयुक्त ठरते. त्यामुळे देशातील शिक्षण संस्थांचा जागतिक स्तरावर नावलौकिक होण्यास माजी विद्यार्थी हातभार लावू शकतात. त्यामुळे माजी विद्यार्थी देशात आणि देशाबाहेर असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याची सूचना यूजीसीने परिपत्रकाद्वारे विद्यापीठांना केली आहे. त्याबाबतचा अहवाल १५ फेब्रुवारीपर्यंत देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 20 January 2021 https://epaper.loksatta.com/c,

परीक्षा नियोजन अंतिम टप्प्यात

## दहावी, बारावीचा अभ्यासक्रम आणखी कमी करणे अशक्य

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – बोर्डाच्या परीक्षांचे नियोजन अंतिम टप्प्यात असून, आता परीक्षेच्या तोंडावर अभ्यासक्रम ५० टक्क्यांपर्यंत कमी करणे अशक्य आहे, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले.



परीक्षेसाठी शिक्षण मंडळ गेल्या दोन एक महिन्यांपासून तयारी करीत असून, प्रश्नपत्रिकांची आखणी, छपाई ही कामे सुरू झाली आहेत, असेही त्यांनी सांगितले.

कोरोनामुळे ऑनलाइन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष यंदा उशिराने सुरू झाले. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास पुरेसा वेळ नसल्याने अभ्यासक्रम ५० टक्क्यांपर्यंत कमी करा, अशी मागणी विविध शिक्षक संघटनांकडून होत आहे. या मागणीबाबत शिक्षणमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट केली. याआधीच अभ्यासक्रमात २५ टक्क्यांपर्यंत कपात करण्यात आली असून, अभ्यासक्रम आणखी कमी करणे शक्य नसून, या घडीला अभ्यासक्रम कमी केल्यास नियोजन बिघडेल असेही त्या म्हणाल्या.

**बालचित्रवाणीचा विद्यार्थ्यांना फायदा**

बालचित्रवाणीचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा झाला असून, या काळात बालचित्रवाणीच्या जुन्या सीडी, व्हीसीडी किंवा जो काही कंटेन्ट होता त्याची पाहणी करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यातील काही गोष्ट अद्ययावत करून त्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे त्या म्हणाल्या.

### शालेय शुल्काबाबत न्यायालय योग्य निर्णय देईल

शुल्कावरून शाळा आणि पालक यांच्यात मोठा वाद होत असून, फीवाढी संदर्भात राज्य सरकारने घेतलेला निर्णय न्यायप्रविष्ट असून, उच्च न्यायालय याबाबत काय निर्णय देईल, तो सर्वांसाठी बंधनकारक असणार आहे. मात्र, सरकारचा निर्णय कायम राहावा यासाठी आमचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत, असेही वर्षा गायकवाड म्हणाल्या.

Saamana 20.1.2021

## सव्वाचार हजार विद्यार्थ्यांचे शुल्क पालिका भरणार

पुणे : महापालिकेच्या शाळांमधील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरण्याचा निर्णय महापालिकेच्या स्थायी समितीने मंगळवारी घेतला. त्यासाठी ३१ लाख रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली असून, या योजनेत दहावी आणि बारावीच्या सव्वाचार हजार विद्यार्थ्यांचे शुल्क भरले जाणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी-पालकांना दिलासा देण्यासाठी ही योजना आखली आहे. कोरोना आणि त्यानंतर सलग लॉकडाऊन झाल्याने शहरातील अनेक कुटुंबातील व्यक्तींचा रोजगार गेला; तर काहींचा व्यवसायही बुडाला आहे. त्याचा परिणाम, अशा कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर झाला आहे. त्यातील काही विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कही भरण्यात अडचणी येतात. त्यामुळे वर्ष वाया जात असल्याच्या घटना घडल्या आहेत. या बाबींचा विचार गरीब-गरजू कुटुंबातील विद्यार्थ्यांचे परीक्षा महापालिकेच्या माध्यमातून भरण्याचा आग्रह होता. त्यानुसार मांडलेल्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे, असे स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने यांनी सांगितले. महापालिकेच्या विविध शाळांत चालू शैक्षणिक वर्षात (२०२०-२१) दहावीच्या वर्गात ३ हजार ८०६ विद्यार्थी आहेत. तर यंदा बारावीसाठी ४०५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहे. या दोन्ही वर्गांसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे परीक्षा घेण्यात येतात. त्यामुळे त्यामुळे त्या त्या शाळा-महाविद्यालयांच्या नावाने मंडळाकडे विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे शुल्क भरले जाणार आहे, असेही रासने यांनी स्पष्ट केले.

Kesari 20.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

# महाविद्यालये सुरू कधी? अद्यापही अनिश्चितताच

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून बुधवारपर्यंत ( दि. २०) विद्यापीठे व महाविद्यालये शिक्षणासाठी खुली करण्याबाबत निर्णय घेऊ, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली होती. मात्र विद्यापीठाला यासंदर्भात कोणताही आदेश प्राप्त झालेला नाही. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्याप अनिश्चितताच आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची महाविद्यालयात येण्याची इच्छा असतानाही कोणताच निर्णय न झाल्याने, विद्यापीठ व महाविद्यालये सुरू होण्याची सर्वांना वाटच पाहावी लागणार आहे.**

## लहान मुले शाळेत, तर मोठी मुले घरी...

राज्यातील शहर व ग्रामीण भागातील लहान मुले सुरक्षित अंतराचे नियम पाळून शाळेत ये-जा करतात. मात्र, त्याचवेळी सज्ञान विद्यार्थी, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी, संशोधक हे विद्यापीठ व महाविद्यालये प्रात्यक्षिक व पारंपरिक शिक्षणासाठी बंद असल्याने घरी आहेत. त्यामुळे लहान मुळे शाळेत, तर पदवी,पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी घरी, हे चित्र शैक्षणिकदृष्ट्या प्रगत असणाऱ्या महाराष्ट्रात दिसत आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शाळा, विद्यापीठे, महाविद्यालये मार्च महिन्यात बंद करण्यात आली. त्यानंतर ऑनलाइनच्या माध्यमातून शैक्षणिक सत्रालासुरुवातझाली. मात्र, ऑनलाइन शिक्षणासाठी प्रत्येकाकडे स्मार्टफोन, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, आयटी सुविधा नसल्याने, या शिक्षणाला मर्यादा आल्या. अशा परिस्थितीत शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी २३ नोव्हेंबरपासून इयत्ता नववी ते बारावीच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला, तर आता २७ जानेवारीपासून पाचवी ते आठवीच्या शाळा सुरू होणार आहेत. मात्र, सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठे व महाविद्यालये कधी खुली होणार हे अजूनही गुलदस्त्यात ठेवले आहे.

शैक्षणिक संस्था सुरूच होच नसल्याने इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी, कृषी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक व प्रकल्प करता येत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ही बाब लक्षात घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ११ जानेवारीपासून विद्यापीठ व संलग्न महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय घेतला. मात्र, राज्य सरकारची परवानगी न घेतल्याचे कारण पुढे करीत, उच्चशिक्षण संचालनालयाने पुणे विद्यापीठाला नोटीस पाठवत निर्णय मागे घ्यायला लावला. त्यानंतर उदय सामंत यांनी फेसबुक लाइव्हद्वारे संवाद साधत, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करुन, येत्या २० जानेवारीपर्यंत विद्यापीठे व महाविद्यालये शिक्षणासाठी खुली करण्याबाबत निर्णय घेऊ, अशी माहिती दिली होती. प्रत्यक्षात मंगळवारपर्यंत कोणताच निर्णय न झाल्याने, विद्यापीठे व महाविद्यालये प्रात्यक्षिके व वर्गखोल्यांमधील पारंपरिक शिक्षणासाठी कधी खुली होतील, याची वाटच विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना पाहावी लागणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

Pune Edition
Jan 20, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# प्राध्यापकांना परीक्षांचे मानधन

## अंतिम वर्षाबाबत पुणे विद्यापीठातील बैठकीत प्राथमिक चर्चा

**पुणे, ता. १९ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेतल्या, त्यामध्ये काम केलेल्या प्राध्यापकांसह इतर घटकांना मानधन देण्यात येणार आहे. यावर सोमवारी प्राथमिक चर्चा झाली असून, अंतिम निर्णय पुढील काही दिवसात होण्याची शक्यता आहे.

### सुमारे सव्वा कोटीचा खर्च

अंतिम वर्षाच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेत १७ ते १८ हजार जण विविध स्तरावर कार्यरत होते. या परीक्षेत ३ हजार ३०० विषय होते, त्या प्रत्येक विषयाचा प्रश्नसंच तयार करण्यासाठी सहा प्राध्यापक, त्याचे अध्यक्ष असे मोठे मनुष्यबळ होते. तसेच परीक्षा केंद्रांवरही यंत्रणा होती. सर्व घटकांना किती मानधन द्यायचे हे अद्याप निश्चित झालेले नसले तरी सुमारे सव्वा कोटी रुपये यासाठी खर्च येईल असे सूत्रांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे विद्यापीठाने सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन तर ५० हजार विद्यार्थ्यांची ऑफलाइन परीक्षा घेतली होती. ती घेत असताना बहुपर्यायी प्रश्नसंच तयार करणारे प्राध्यापक, ऑफलाइन परीक्षेसाठी महाविद्यालयात व्यवस्था करणे, पर्यवेक्षक, परीक्षा नियंत्रक यासह इतर घटकांना मानधन देण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. दरम्यान, विद्यापीठामार्फत परीक्षा घेण्यात आल्या आहेत, त्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक घटकास मानधन दिले गेलेले आहे. परंतु यंदा ऑनलाइन परीक्षा असल्याने व ऑफलाइन परीक्षेतही कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मानधन देण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नव्हता.

परीक्षा पार पडल्यानंतर, निकालाची प्रक्रियाही झाल्याने गेल्या काही दिवसांपासून परीक्षेचे मानधन मिळण्याबाबत चर्चा होती. यासंदर्भात आज परीक्षा विभागातील अधिकारी, अधिष्ठाता व इतर अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये मानधन देण्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. जानेवारीच्या अखेरीस व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार असून, त्यामध्ये हा परीक्षेसाठीच्या खर्चाचा प्रस्ताव ठेवला जाणार आहे.

Sakaal 20.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## प्राध्यापकांच्या रखडलेल्या मानधनावर चर्चा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २० - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्ष ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेतल्या. त्यामध्ये परीक्षेचे काम केलेल्या प्राध्यापकांसह सर्व घटकांना मानधन देण्याबाबतच्या प्रस्तावावर परीक्षा विभागात अधिष्ठातांच्या उपस्थितीत चर्चा झाली. त्यामुळे परीक्षेचे काम केलेल्या प्राध्यापकांना मानधन मिळण्याची चिन्हे आहेत.

करोना पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाने सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन, तर पन्नास हजार जणांची ऑफलाइन परीक्षा घेतली. ही परीक्षा घेत असताना बहुपर्यायी प्रश्नसंच तयार करणारे प्राध्यापक, ऑफलाइन परीक्षेसाठी महाविद्यालयात व्यवस्था करणे, पर्यवेक्षक, महाविद्यालय परीक्षा नियंत्रक यासह इतर घटकांना मानधन देण्याबाबत कोणताही निर्णय घेतला नव्हता.

करोनाची गंभीर स्थिती लक्षात घेता परीक्षेचे काम केलेल्या प्राध्यापकांना मानधन देण्याबाबत काहीच कार्यवाही होऊ शकली नाही. त्या पार्श्वभूमीवर सोमवारी विद्यापीठाच्या परीक्षा विभागात झालेल्या बैठकीत चर्चा झाली. याबाबतचा प्रस्ताव येत्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मांडला जाणार आहे. त्यावर मानधन संदर्भात अंतिम निर्णय होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

Prabhat 21.1.2021

## शिक्षण पद्धतीतील बदलासाठी स्टार्स प्रकल्पाची अंमलबजावणी

मुंबई, दि. २० - राज्यातील शिक्षण पद्धतीचे अध्यापन, अध्ययन व परिणाम याचे बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने जागतिक बँक अर्थसहाय्यित, केंद्र पुरस्कृत प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पासाठी महाराष्ट्रासह हिमाचल प्रदेश, ओडिसा, राजस्थान, मध्यप्रदेश व केरळ अशा एकूण सहा राज्यांची परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्समधील कामगिरीच्या आधारावर निवड करण्यात आली आहे. हा प्रकल्प राज्यातील शिक्षण क्षेत्रासाठी उपयुक्त असल्याने तो राज्यात राबवण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. या योजनेवर केंद्र शासन ६० राज्य शासन ४० टक्के या प्रमाणात खर्च करील. हा प्रकल्प पाच वर्षांसाठी म्हणजेच २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीसाठी असून प्रकल्पाच्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी ९७६.३९ कोटी रकमेची गरज लागणार आहे.

### अध्ययन सुधारण्यावर भर देत एकात्मिक शिक्षणाचा प्रयत्न

यात केंद्र शासनाकडून ५८५.८३ कोटी तर राज्य शासनाकडून ३९०.५६ कोटी रुपयांचा निधी पाच वर्षांच्या कालावधीत उपलब्ध करून दिला जाईल. पूर्व प्राथमिक ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, नियमित व गतीशील प्रयत्नांनी अध्ययन निष्पती सुधारण्यावर भर देणे, योग्य व एकात्मिक शिक्षण देण्याच्या प्रयत्नांवर भर देणे, शाळांच्या प्रशिक्षण व शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यावर भर देणे, शैक्षणिक व्यवस्था पारदर्शक बनवण्यासाठी सर्वसमावेशक धोरणाची निश्चिती करणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, विशेष गरजा असणारी बालके, मुली आणि वंचित समुदायातील विद्यार्थी यांच्यावर लक्ष केंद्रित करणे ही या प्रकल्पाची उद्दिष्टे आहेत.

Prabhat 21.1.2021

## 'एमआयएस'मध्ये माहिती भरताना अडचण

### कोरोनामुळे अनेक महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया अपूर्ण असल्याचा परिणाम

सकाळ EXCLUSIVE

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २० : नव्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील शैक्षणिक, प्रशासकीय माहिती संस्थांना दरवर्षी ऑनलाइन 'व्यवस्थापन माहिती प्रणाली'मध्ये (एमआयएस) जाहीर करावी लागते. त्याद्वारे मिळणाऱ्या 'ना हरकत' प्रमाणपत्रामुळे अनुदान आणि योजनांचा लाभ महाविद्यालयांना मिळतो. मात्र, यंदा कोरोनामुळे प्रवेश प्रक्रियेवर परिणाम झाल्याने ही माहिती भरण्यात अडचणी निर्माण होत आहेत. आतापर्यंत सुमारे ३० टक्के महाविद्यालयांनी ही माहिती सादर केली असून त्यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

उच्च शिक्षणाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाला सांख्यिकी महत्त्वाची असते. त्यामुळे उच्च शिक्षण संचालनालयातर्फे राज्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण यांच्या अनुदानित, विना अनुदानित, कायम विनाअनुदानित संस्थांना 'व्यवस्थापन माहिती प्रणाली'मध्ये (एमआयएस) माहिती भरावी लागते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यासाठी १ जानेवारीपासून लिंक खुली करून दिली आहे. अभियांत्रिकी, एमबीएससह इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्रपणे माहिती संकलित केली जाते. यामध्ये याचा समावेश नाही.

#### 'ना हरकत' प्रमाणपत्र महत्त्वाचे

राज्य शासनातर्फे अंदाजपत्रक जाहीर करण्यापूर्वी आर्थिक पाहणी अहवाल जाहीर केला जातो. त्यामध्ये शिष्यवृत्ती, इतर योजनांसाठी ही माहिती आवश्यक असते. त्यामुळे महाविद्यालयांना याची पूर्तता करावी लागते. 'एमआयएस'मध्ये माहिती देणाऱ्या महाविद्यालयांना 'ना हरकत' प्रमाणपत्र दिले जाते. महाविद्यालयांना सर्व प्रकारच्या प्रशासकीय कामांसाठी, विविध योजनांचा लाभ, अनुदान मिळविण्यासाठी हे प्रमाणपत्र उपयुक्त ठरते; अन्यथा या योजनांचा लाभ मिळत नाही.

महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती या प्रणालीमध्ये द्यावी लागते. मात्र, यंदा कोरोनामुळे ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश कमी घेण्यात आले आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षाचे प्रथम सत्र संपत आले असले, तरी ऑनलाइन शिक्षणामुळे अजूनही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे महाविद्यालयांना 'एमआयएस'मध्ये माहिती भरताना अडचणी येत आहेत. विधी, शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया देखील अजूनही सुरूच असून त्यासाठी अजून किमान एक महिना लागणार आहे. त्यामुळे या महाविद्यालयांना माहिती सादर करता आली नाही.

पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षातर्फे 'एमआयएस'मध्ये माहिती भरण्यासाठी २५ जानेवारीपर्यंत

माहिती भरण्याचे आदेश दिलेले होते. मात्र, त्यास कमी प्रतिसाद मिळाल्याने पुन्हा एकदा परिपत्रक काढून माहिती सादर करण्यास सांगितले आहे. 'एमआयएस'मध्ये माहिती भरताना काही महाविद्यालयांना अडचणी आलेल्या नाहीत. मात्र, जेथील प्रवेश प्रक्रिया अजून सुरू आहे, अशा महाविद्यालयांना अडचणी येत असून त्यास प्राचार्यांनी दुजोरा दिला आहे.

Sakaal 21.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

मटा अँकर महिनाअखेरपर्यंत राज्यातील महाविद्यालये सुरू होण्याची शक्यता

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांची नवी 'डेडलाइन'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

राज्यामध्ये सुरू असलेल्या 'अनलॉक'च्या प्रक्रियेमध्ये शाळांपाठोपाठ महाविद्यालयेही सुरू करण्याचा विचार सरकार करीत असून, याबाबत या महिनाअखेरपर्यंत निर्णय अपेक्षित असल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. सामंत यांनी वीस जानेवारीपर्यंत महाविद्यालये खुली करण्याबाबत निर्णय घेऊ, असे आश्वासन यापूर्वी दिले होते. आता महिनाअखेरपर्यंत निर्णय अपेक्षित असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

करोनाकाळात बंद झालेले शिक्षण राज्य सरकारने ऑनलाइन स्वरूपात सुरू केले. मात्र विज्ञान,



राज्यात महाविद्यालये सुरू होण्याची अद्याप प्रतीक्षा

इंजिनीअरिंग अशा शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षण घेणे आवश्यक आहे. तसेच, पीएचडी, पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही ऑफलाइन मार्गदर्शन, सर्वेक्षण, निरीक्षण करणे आवश्यक असते. यामुळे या विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन कॉलेज सुरू करा, अशी मागणी सर्व स्तरावरून होत आहे. याबाबत सामंत यांना विचारले असता त्यांनी स्पष्ट केले, की कॉलेज सुरू करण्याबाबत सरकार सकारात्मक आहे. याबाबत लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंतिम निर्णय होईल. ज्या प्रमाणे टप्प्याटप्प्याने शाळा सुरू केल्या, तशाच पद्धतीने कॉलेजेही सुरू करण्याचा विचार आहे. यात ५० टक्के उपस्थितीत कॉलेज सुरू होऊ शकतात का, नेमकी काय काळजी घ्यावी लागणार आहे, याबाबत आम्ही अभ्यासही केला आहे.

### प्रवेश प्रक्रिया संपण्यापूर्वी प्रमाणपत्र सादर करा

राज्य सामाइक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) तंत्रशिक्षण कक्षातील इंजिनीअरिंग, फार्मसी, मॅनेजमेंट अशा पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ईडब्ल्यूएस, नॉन-क्रीमी लेअर, जात वैधता प्रमाणपत्रांच्या आधारे राखीव प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे. प्रमाणपत्रे सादर करण्यास अपयशी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि सीईटी सेलचे आयुक्त चिंतामणी जोशी यांनी दिली आहे.

Maharashtra Times 21.1.2021

## विद्यार्थी पुण्यात; पण महाविद्यालयांना टाळेच

### उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून अद्याप निर्णय अधांतरीच

पुणे, ता. २० : महाविद्यालये सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून, २० तारखेपर्यंत निर्णय घेऊ, अशी घोषणा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केली होती. महाविद्यालये सुरू होतील, या आशेने गावाकडे असलेले विद्यार्थी पुण्यात दाखल झाले आहेत. पण २० तारीख उलटून गेली तरी अद्याप निर्णय झालेला नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर राज्याच्या उच्च शिक्षण खात्याने शासनाची परवानगी न घेता महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय कसा काय घेतला, यावर खुलासा करण्यासाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी पत्र पाठवले होते. त्यामुळे पुणे विद्यापीठाने एक पाऊल मागे घेऊन शासनाच्या पुढील आदेशानुसार महाविद्यालये सुरू केले जातील, असे स्पष्ट केले होते. दरम्यान, उदय सामंत यांनी फेसबुक लाईव्हवर २० तारखेपर्यंत निर्णय घेतला जाईल, असे सांगितले होते.

राज्यातील पाचवी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू झाल्या आहेत, पण महाविद्यालये सुरू झाली

पान ८ वर »

> वीस जानेवारीपर्यंत निर्णय होणार असल्याने मी पुण्यात आले आहे; पण अजून काहीच निर्णय झाला नाही. वर्गात थेट शिकवणे महत्त्वाचे आहे; पण ते शक्य नसेल तर किमान प्रॅक्टिकल तरी सुरू केली पाहिजेत. याबाबत लवकर निर्णय घेऊन आमचे नुकसान टाळावे.
>
> **- भक्ती पाटील, तृतीय वर्ष, बीएस्सी**

### विद्यार्थी पुण्यात पण महाविद्यालयांना टाळेच

» पान १ वरून

नाहीत. विज्ञान शाखेसह व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टीकलचा प्रश्न गंभीर झाला आहे. पहिल्या टप्प्यात सर्व नियमांचे पालन करून, किमान प्रयोगशाळा तरी सुरू झाल्या पाहिजेत अशी मागणी विद्यार्थी, प्राध्यापकांकडून होत आहे. २० तारखेपर्यंत राज्य सरकारकडून निर्णय होईल व पुढच्या काही दिवसात महाविद्यालये सुरू होतील, यामुळे अनेक पुण्याबाहेरील विद्यार्थी शहरात दाखल झाले आहेत. पण शासनाला निर्णय घेता आला नाही.

पुणे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता, अजूनपर्यंत आम्हाला काहीही कळविण्यात आलेले नाही, असे सांगितले. राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनीही अद्याप निर्णय झाला नसल्याचे सांगितले

Sakaal 21.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## उच्च शिक्षणाबाबत उदासीन का?

### राज्य सरकारला विद्यार्थ्यांचा सवाल

**देवेश गोंडाणे, लोकसत्ता**

**नागपूर :** राज्य सरकारने आता इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. परंतु उच्च शिक्षण संस्था सुरू करण्याबाबत सरकार उदासीन का, असा सवाल विद्यार्थी संघटनांकडून विचारला जात आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातही ठोस भूमिका घेत नसल्याने, उच्च शिक्षणाबाबतच्या सरकारच्या धोरणाचा विरोध होत आहे.

करोना आल्याने बंद पडलेली महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अद्याप कुठलाही निर्णय घेतलेला नाही. ग्रंथालय, संशोधन कार्य, स्पर्धा परीक्षा केंद्र सारेच बंद असल्याने विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. करोनाचा प्रभाव कमी होताना लहान मुलांच्या शिक्षणाबाबत गांभीर्य दाखवणारे सरकार महाविद्यालयीन शिक्षणाबाबत उदासीन का, असा सवाल 'अभाविप'चे विदर्भ प्रांत मंत्री रवी डांगे यांनी उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षांसंदर्भातही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मवाळ भूमिका घेतली होती. यूजीसीच्या आदेशानंतरही परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला होता. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण, संशोधनाला सरकार गांभीर्याने घेत नाही का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

**ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादा**

शिक्षण थांबायला नको म्हणून ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय महाविद्यालय आणि विद्यापीठांनी उपलब्ध करून दिला असला तरी त्याला अनेक मर्यादा आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक मोठा वर्ग ग्रामीण भागात राहतो. इंटरनेट व अन्य समस्यांमुळे त्याला ऑनलाइन शिक्षण घेणेही अडचणीचे ठरत आहे.

लोकसत्ता Thu, 21 January 2021 https://epaper.loksatta.com/c

## बारावीसाठीची सुधारित मूल्यमापन योजना यंदा स्थगित

### विद्यार्थ्यांना आधीच्या विषय निवडीनुसार परीक्षा देण्याची अंतिम संधी

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** करोना काळात आलेल्या अध्ययन-अध्यापनातील मर्यादा लक्षात घेऊन बारावीच्या सुधारित विषय योजना आणि मूल्यमापन योजना यंदासाठी स्थगित करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अंतिम संधी म्हणून त्यांनी आधी निवडलेल्या विषयाची परीक्षा देण्याची संधी देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१पासून बारावीसाठी सुधारित विषय योजना आणि मूल्यमापन योजना करण्यात आली होती. त्यात अवेस्ता, सामान्य ज्ञान, हिंदी उपयोजित, मराठी साहित्य, इंग्रजी साहित्य असे काही विषय बंद करण्यात आले. तर शाखांतील विषय निवडीचे पर्याय बदलण्यात आले होते. या बदलांची दखल न घेता काही महाविद्यालयांनी संबंधित विषयांचे अध्यापन सुरूच ठेवले. त्यामुळे राज्य मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यात अडचणी निर्माण झाल्या. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने नवीन मूल्यमापन योजना यंदापुरती स्थगित करण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.

यंदा अंतिम संधी म्हणून बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या विषयांची परीक्षा देण्याची संधी देण्यात आली आहे. पुढील वर्षापासून अशी सवलत देता येणार नाही. कनिष्ठ महाविद्यालयांनी सुधारित विषय आणि मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. बंद झालेल्या विषयांचे आणि शाखेसाठी उपलब्ध नसलेल्या विषयांचे अध्यापन बंद करणे आवश्यक आहे, असे शासन निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Thu, 21 January 2021 https://epaper.loksatta.com/c/57873619

## बारावीची २३; तर दहावीची २९ एप्रिलपासून परीक्षा

### जुलै-ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात निकाल जाहीर होणार

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २१ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांच्या तारखांची प्रतीक्षा अखेर गुरुवारी संपली. बारावीची लेखी परीक्षा २३ एप्रिलपासून, तर दहावीची २९ एप्रिलपासून सुरू होणार आहे. बारावीच्या परीक्षेचा निकाल जुलैच्या शेवटच्या आठवड्यात, तर दहावीच्या परीक्षेचा निकाल ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्यावर्षी म्हणजेच २०२० मध्ये घेतलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षांचा निकाल दरवर्षीपेक्षा उशिरा (जुलैमध्ये) लागला. त्यानंतर नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये दहावी-बारावीची पुरवणी परीक्षा घेण्यात आली. राज्यातील ३० लाखांहून अधिक विद्यार्थी दरवर्षी या परीक्षा देतात. त्यामुळे २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षेकडे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे लक्ष लागले होते. 'परीक्षा कधी होणार?', हे शालेय शिक्षण विभागाकडून जाहीर केले जात नव्हते. त्यामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक संभ्रमात होते. याची दखल घेत वर्षा गायकवाड यांनी काही दिवसांपूर्वी बोर्डाच्या परीक्षा एप्रिल-मे महिन्यात होतील, असे जाहीर केले. त्यानंतर गायकवाड यांनी गुरुवारी ट्विटरद्वारे दहावी-बारावीच्या परीक्षांच्या तारखांची माहिती देऊन विद्यार्थी आणि पालकांना दिलासा दिला आहे.

कोरोनाबाबत केंद्र व राज्य सरकार तसेच आरोग्य विभागाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून या परीक्षांचे आयोजन करण्यात येईल, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

> 'जेईई'च्या तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील परीक्षा एप्रिल आणि मे महिन्यात होणार आहेत, त्यामुळे राज्य मंडळाच्या विशेषत: बारावीच्या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक तयार करताना जेईई परीक्षेच्या तारखा पाहून निर्णय घ्यावा. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळणे अपेक्षित आहे. राज्य सरकारने बोर्डाच्या परीक्षांचा कालावधी आणि जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षांचा कालावधी जोडून येणार नाही, याची पुरेशी काळजी घ्यावी.
> - स्नेहल घोंगडे, पालक

**सविस्तर वेळापत्रक**

| दहावी | बारावी |
|---|---|
| लेखी : २९ एप्रिल ते ३१ मे<br>३३ दिवस | लेखी : २३ एप्रिल ते २९ मे<br>३७ दिवस |
| प्रात्यक्षिक/श्रेणी सुधार/तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन : १ ते २८ एप्रिल<br>२० दिवस | आयटी व सामान्यज्ञान ऑनलाइन : २७ मे ते ५ जून<br>१० दिवस |
| दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यशिक्षण : २८ मे ते ९ जून<br>१३ दिवस | प्रात्यक्षिक/श्रेणी सुधार/तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन : १ ते २२ एप्रिल<br>२२ दिवस |

Sakaal 22.1.2021

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

## बारावीची परीक्षा २३, तर दहावीची २९ एप्रिलपासून

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोनामुळे शैक्षणिक वर्षाला झालेल्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर यंदा बारावीची लेखी परीक्षा २३ एप्रिल, तर दहावीची परीक्षा २९ एप्रिलपासून सुरू होणार असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी गुरुवारी केली.

राज्यात आजवर बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी, तर दहावीच्या परीक्षा मार्चमध्ये होऊन निकाल जूनमध्ये लागत होते. मात्र, या वेळी करोनामुळे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक बिघडले. शाळा, महाविद्यालये काही दिवसांपासून सुरू झाली आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील शाळा-महाविद्यालये अद्यापही बंदच असून, विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे परीक्षाही लांबणीवर गेल्या आहेत. बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा १ ते २२ एप्रिलदरम्यान होईल तर लेखी परीक्षा २३ एप्रिल ते २९ मे या कालावधीत घेण्यात येईल. या परीक्षेचा निकाल जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा ९ ते २८ एप्रिल यादरम्यान होतील तर लेखी परीक्षा २९ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत घेण्यात येतील. या परीक्षेचा निकाल ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल.

करोनाबाबत केंद्र आणि राज्य सरकारने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन, तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन परीक्षा प्रक्रिया पार पडेल.



**बारावी**

- प्रात्यक्षिक परीक्षा : १ ते २२ एप्रिल
- लेखी परीक्षा : २३ एप्रिल ते २९ मे
- निकाल : जुलैअखेर

**दहावी**

- प्रात्यक्षिक परीक्षा : ९ ते २८ एप्रिल
- लेखी परीक्षा : २९ एप्रिल ते ३१ मे
- निकाल : ऑगस्टअखेर

epaper.loksatta.com
लोकसत्ता Fri, 22 January 2021 https://epaper.loksatta.com/c/5

## बारावीची परीक्षा २३, तर दहावीची २९ एप्रिलपासून

*शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांची माहिती*

**मुंबई (प्रतिनिधी) :** १२ वीची लेखी परीक्षा २३ एप्रिलला, तर १० वी ची लेखी परीक्षा २९ एप्रिलपासून सुरु होणार आहेत. बारावीच्या परीक्षेचा निकाल जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर होईल, तसेच दहावीचा निकाल ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा गुरुवारी शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी केली.

कोरोनाच्या संकटामुळे यंदा शाळांचे सर्व वेळापत्रक कोलमडून पडले आहे. त्यामुळे दहावी व बारावीच्या परीक्षा कधी होणार याबद्दल विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम होता. या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी काल मंत्रालयात पत्रकार परिषद घेऊन परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या. यावेळी अपर मुख्य सचिव वंदना कृष्णा, शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, परीक्षा मंडळ संचालक दिनकर पाटील उपस्थित होते. १२ वीच्या प्रात्यक्षिक परीक्षा १ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान होणार असून, २३ एप्रिल ते २९ मे या कालावधीत लेखी परीक्षा घेण्यात येतील. या परीक्षेचा निकाल अंदाजे जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल.

तसेच, दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा ९ ते २८ एप्रिल या दरम्यान होतील. तर लेखी परीक्षा २९ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत घेण्यात येतील. या परीक्षेचा निकाल ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल, अशी माहिती शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली. कोविड-१९ च्या संदर्भात केंद्र व राज्य शासन, तसेच आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

Kesari 22.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## माजी विद्यार्थ्यांनो बना 'ब्रँड ॲम्बेसिडर'

### भारतीय शिक्षणाचे सामर्थ्य दाखविण्यासाठी विद्यापीठाचा उपक्रम

**पुणे, ता. २१ :** देशातील विद्यापीठांतून तुम्ही उच्च शिक्षण घेतलंय आणि आता माजी विद्यार्थी आहात का? आणि विद्यापीठात मिळालेल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थ्यांनाही घेता यावा, असे तुम्ही वाटतंय का?, तर मग तयार रहा! लवकरच तुम्हाला उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेचा दर्जा उंचाविण्याची किंवा भारतीय उच्च शिक्षणाचे सामर्थ्य दाखविण्यासाठी 'ब्रँड ॲम्बेसिडर' बनण्याची संधी मिळू शकणार आहे.

होय, देशातील शिक्षण संस्थांचा दर्जा जागतिक पातळीवर उंचाविण्यासाठी माजी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी सेलची ताकद उपयोगी ठरू शकते. या हेतूने आता विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठांना माजी विद्यार्थ्यांशी जोडण्याच्या सूचना दिल्या आहेत. विद्यापीठांमधील 'ॲल्युमनी सेल'ची माहिती माजी विद्यार्थ्यांना कळविण्याची सूचना केली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये देशातील उच्च शिक्षण संस्थांना जागतिक पातळीवर पोचविण्यावर भर दिला आहे. येत्या काही वर्षात देशाला जागतिक अभ्यास केंद्र बनविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. म्हणूनच शैक्षणिक संस्थांमधील माजी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी संघटना शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शैक्षणिक संस्थांना आर्थिक आणि त्या व्यतिरिक्त योगदानही त्यांच्याकडून मिळू शकते. तसेच देशातील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेतलेले परदेशी विद्यार्थी आणि सध्या परदेशात असलेले भारतीय विद्यार्थी हे देखील शैक्षणिक संस्थांच्या 'ब्रॅण्ड बिल्डिंग'साठी हातभार लावू शकणार आहेत, असे आयोगाचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी सूचनेद्वारे अधोरेखित केले आहे.

**'ॲल्युमनी कनेक्ट' उपक्रम**

विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा शैक्षणिक संस्थांची जोडून घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने 'ॲल्युमनी कनेक्ट' हा उपक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून विविध विद्यापीठांमधील माजी विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या संघटनांची माहिती संकलित करण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांना विद्यापीठातील घडामोडीत सहभागी करून घेण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच विद्यापीठांमधील 'ॲल्युमनी सेल'ची माहिती १५ फेब्रुवारीपूर्वी द्यावी, असे आवाहन आयोगाने केले आहे.

**या आहेत यूजीसीच्या सूचना**

1. 'ॲल्युमनी सेल' स्थापन करून माजी विद्यार्थ्यांची माहिती संकलित करा
2. शैक्षणिक संस्थेतील नवीन घडामोडींची माहिती माजी विद्यार्थ्यांना द्या
3. विविध परिषदा, वेबिनारमध्ये त्यांना सहभागी करून घ्या
4. स्नेहमेळावे आयोजित करा
5. शैक्षणिक संस्थेच्या विकासासाठी सहकार्य घ्या

Sakaal 22.1.2021

लोकमत

## महाविद्यालय सुरू करण्याची पोकळ घोषणा केली होती का?

### शिक्षण वर्तुळात चर्चा : विद्यार्थी, प्राध्यापकांना हवेत आता प्रत्यक्ष वर्ग : राज्याचा उच्च शिक्षण विभाग उदासीन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील शाळा सुरू करण्याबाबत निर्णय झाला असला तरी महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात कोणतीही घोषणा अद्याप उच्च शिक्षण विभागाने केली नाही. त्यामुळे राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून येत्या २० जानेवारीपूर्वी जाहीर केला जाईल, अशी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पोकळ घोषणा केली होती का? अशी चर्चा शिक्षण वर्तुळात केली जात आहे.

कोरोनानंतर बंद असलेले राज्यातील नववी ते बारावीचे वर्ग सुरू झाल्यानंतर पाचवी ते आठवीपर्यंतचे वर्ग येत्या २७ जानेवारीपासून सुरू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने केला आहे. मात्र, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासह व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग उदासिन असल्याचे दिसत आहे. तसेच कोरोनाबाबत आवश्यक खबरदारी घेवून महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात पुढाकार घेणाऱ्या विद्यापीठांना रोखले जात आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याची उच्च शिक्षण विभागाची इच्छा नाही का? असा सवाल उपस्थित होत आहे.



**ऑनलाईन शिक्षणाचा आला कंटाळा**

राज्य शासनाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला महाविद्यालय सुरु करण्याच्या घेतलेल्या निर्णयावर खुलासा मागवला होता. मात्र, विद्यापीठाच्या अधिसभेत त्याचे चांगलेच पडसाद उमटले होते. काही अधिसभा सदस्यांनी याबाबत निषेध नोंदवला होता. त्याचच ऑनलाईन शिक्षणाचा कंटाळा आला असून प्रत्यक्ष महाविद्यालये सुरु करावीत, अशी मागणी विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. तसेच सध्या विद्यार्थी महाविद्यालयात येत नाहीत. परिणामी शैक्षणिक संस्थांकडे शुल्क जमा होत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तात्काळ महाविद्यालये सुरु व्हावीत,अशी मागणी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे. सर्वच क्षेत्रातून महाविद्यालय सुरु करण्याची मागणी होत असताना उच्च शिक्षण विभाग हातावर हात ठेऊन बसल्याने सर्वांकडूनच नाराजी व्यक्त केली जात आहे.

Hello Pune
Page No. 3 Jan 22, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## पीएचडी प्रवेश परीक्षा २८ फेब्रुवारीला

**मुंबई :** करोनाच्या प्रादुर्भावामुळे एका वर्षापासून रखडलेली एम.फिल आणि पीएच.डीची प्रवेश परीक्षा (पेट) अखेर २८ फेब्रुवारी रोजी होणार असून विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी २८ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी गेल्यावर्षी केलेले अर्जही वैध राहतील.

मुंबई विद्यापीठाने गेल्या वर्षी २७ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२० दरम्यान पेटसाठी ऑनलाइन अर्ज घेतले होते. त्यावेळी ६ हजार ५१२ उमेदवारांनी अर्ज केले होते. मात्र, करोनाच्या प्रादुर्भावामुळे परीक्षा होऊ शकली नाही. आता फेब्रुवारी अखेरीस परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. इच्छुक नव्याने अर्ज भरू शकतील. ज्यांनी गेल्यावर्षी अर्ज भरले आहेत त्यांचे तेच अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अर्ज आणि माहिती उपलब्ध आहे.

गेल्यावर्षीच्या अर्जांपैकी ४६१ विद्यार्थी राज्याबाहेरील होते. विद्याशाखानिहाय वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेसाठी १ हजार १४८, मानव्यविद्या १ हजार ६९१, आंतरविद्याशाखेसाठी ३३३ आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी ३ हजार ३४० एवढे अर्ज आले होते.

लोकसत्ता Fri, http:

## 'बौद्ध वारसा' अभ्यासक्रम तयार

**येरवडा :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डेक्कन कॉलेज यांच्यात 'बौद्ध वारसा व पर्यटन' या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी नुकताच करार झाला आहे. बौद्ध सांस्कृतिक वारसा, बौद्ध वाङमय, कला व स्थापत्यशास्त्र आणि पर्यटन यांची एकत्र सांगड घालून हा अभ्यासक्रम तयार केला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. नितीन करमळकर आणि डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रसाद जोशी यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली विभागाचे प्रमुख प्रा. महेश देवकर यांनी सांगितले, 'देशात अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम प्रथमच दोन्ही विद्यापीठांतर्फे सुरू केला जात आहे. कुठलाही पदवीधर या अभ्यासक्रमासाठी पात्र असून, एकूण तीस जागांची प्रवेश क्षमता आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम दीड वर्षाचा असून, यात सहा महिन्यांच्या कालावधीत वारसा आणि पर्यटन क्षेत्रातील प्रशिक्षण दिले जाणार आहे.'

डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे डॉ. श्रीकांत गणवीर यांनी सांगितले, 'महाराष्ट्र, तेलंगण, गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यांतील अनेक महत्त्वाची प्राचीन बौद्ध स्थळे अजूनही पर्यटनाच्या दृष्टीने उपेक्षित आहेत.'

Maharashtra Times 22.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education



## विद्यापीठ उपकेंद्राला एप्रिलचा मुहूर्त

**उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राला मान्यता मिळाली असून, साधारण दोन कोटी रुपये खर्चून एप्रिल महिन्यात इमारतीच्या बांधकामाला कामाला सुरुवात होणार आहे,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या पुणे उपकेंद्राच्या इमारतीची उभारणी सुमारे दहा कोटी रुपयांतून होणार असल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले.

सामंत यांनी नाशिक जिल्ह्यातील शिवनाई येथील पुणे विद्यापीठाच्या प्रस्तावित उपकेंद्राच्या जागेची पाहणी केली. त्यानंतर पुणे विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या विस्ताराबाबत कुलगुरू, जिल्हाधिकारी, अधिकाऱ्यांची बैठक घेउन चर्चा केली. या वेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, जिल्हाधिकारी सूरज मांढरे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार उपस्थित होते. पुणे विद्यापीठाच्या नगर उपकेंद्राच्या जागेची पाहणी लवकरच करणार असून, त्यानंतर उपकेंद्राच्या बांधकामाचा प्रश्न सोडविण्यात येईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

सामंत म्हणाले, 'नाशिक उपकेंद्राच्या प्रस्तावित जागेनजीकच्या ग्रामस्थांसाठी १५ फूट रस्ता मंजूर करण्यात आला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुर्नव सनाचा विषय निकाली निघाला आहे. विद्यापीठाने उपकेंद्राच्या बांधकामासाठी सुमारे दोन कोटी रुपये मंजूर केले आहेत. दीड ते दोन महिन्यांत निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल. १५ एप्रिलपासून इमारतीच्या बांधकामाला सुरुवात होईल.'

> राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये खुली करण्याबाबत सचिवांकडून पडताळणी करण्यात येत आहे. येत्या २६ जानेवारीनंतर अधिकाऱ्यांची पुन्हा बैठक घेऊन, निर्णय जाहीर करू.
>
> – उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

**सीमावर्ती भागात सुसज्ज उपकेंद्र**

चंदगड, उमरी, म्हैसाळ या सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाचे उपकेंद्राची निर्मिती करण्यात येणार आहे. या उपकेंद्राचा सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्यासाठी फायदा होणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. 'नागपूर उपकेंद्राच्याही जागेचा प्रश्न सुटला असून, साडेपाच कोटी रुपये खर्चून इमारत बांधण्यात येईल. त्याचप्रमाणे रत्नागिरीतही उपकेंद्र उभारण्यात येईल,' असे सामंत यांनी सांगितले.

Maharashtra Times 23.1.2021



## महाविद्यालये खुली करण्यासाठी आंदोलन

महाविद्यालये सुरू करण्याच्या मागणीसाठी 'अभाविप'चे कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी आंदोलन केले.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील महाविद्यालये पारंपरिक शिक्षणासाठी खुली करावीत, यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वर्ग भरवून आंदोलन केले. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत महाविद्यालये खुली करण्याची केवळ घोषणा करून, विद्यार्थ्यांची फसवणूक करीत असल्याची टीका विद्यार्थ्यांनी केली. या वेळी कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनी महाविद्यालये खुली करण्यासाठीचे निवेदन जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांना दिले.

करोनाच्या साथरोगामुळे गेल्या मार्च महिन्यापासून सर्व विद्यापीठे व महाविद्यालये बंद आहेत. सद्यस्थितीत लॉकडाउन शिथिल करण्यात आले असून, दुकाने, मॉल, चित्रपटगृह सर्वत्र सुरू करण्यात आली आहेत. शाळादेखील सुरू असताना, केवळ विद्यापीठ व महाविद्यालये बंद ठेवण्यात आली आहेत. ऑनलाइन शिक्षणासाठी प्रभावी आयटी सुविधा आणि साधने नसल्याने, हे शिक्षण गरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी; तसेच अभाविप कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले. शैक्षणिक वर्ष संपत आले असताना, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक व प्रकल्प सुरू झालेले नाहीत. महाविद्यालयाबाबत कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाकडे असतात. अशा परिस्थितीत हस्तक्षेप करून राज्य सरकार विद्यापीठाच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम करत आहे, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

> महाविद्यालये सुरू झाली नाहीत; तर कॅम्पस प्लेसमेंट होतील का, असा प्रश्न विद्यार्थी व पालकांना पडला आहे. विद्यार्थी व पालकांच्या चिंता वाढवण्याचे काम हे सरकार करीत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचे काम सरकार करीत आहे. सरकारने महाविद्यालये तातडीने सुरू करावीत.
>
> - शुभम भुतकर, पुणे महानगर मंत्री, अभाविप

स्वप्नील

Maharashtra Times 23.1.2021

# News Paper Clippings During January 2021

Section: Education

## 'एक्स्प्रेसिव्ह मूव्हमेंट थेरपी'चा विद्यापीठात अभ्यासक्रम

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'एक्स्प्रेसिव्ह मूव्हमेंट थेरपी' हा अनोखा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि संचेती हेल्थकेअर अ‍ॅकॅडमी यांनी सामंजस्य करार केला असून, आशियातील अशा प्रकारचा पहिलाच अभ्यासक्रम आहे.

सामंजस्य करारावेळी कुलगुरू डॉ.



नितीन करमळकर, डॉ. के. एच. संचेती, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. पराग काळकर, डॉ. अपूर्वा पालकर, डॉ. दीपक माने, संचेती हेल्थकेअर अ‍ॅकॅडमीच्या कार्यकारी संचालिका मनीषा सिंघवी आदी या वेळी उपस्थित होते.

आंतरविद्याशाखेअंतर्गत हा अभ्यासक्रम राबवल्या जाणाऱ्या या अभ्यासक्रमासाठी परदेशातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. दोन वर्षे कालावधीचा हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांत समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ, दुर्धर आजाराने आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्यांवर उपचार करता येतील.

लोकसत्ता Sat, 23 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57927056

---

जिल्हानिहाय आढाव्यानंतर अंतिम निर्णय -उदय सामंत

## पदवी महाविद्यालये लवकरच सुरू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

### 'कॅस'बाबत तक्रारींचे कुलगुरूंच्या स्तरावर निराकरण

● सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सहयोगी प्राध्यापकांना प्राध्यापक पदावर बढती देण्याच्या 'कॅस' प्रक्रियेविषयी अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. मुक्त विद्यापीठाच्या पीएच. डी बाबत या प्रक्रियेत परस्परविरोधी निकष लावण्यात आल्याचे उघड झाले आहे.

● या संदर्भात पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंशी चर्चा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार प्राध्यापकांमध्ये काही गैरसमज निर्माण झाले आहेत. या संदर्भात कुलगुरू दोन दिवसांत बैठक घेऊन संबंधित प्राध्यापकांच्या तक्रारींचे निराकरण करणार असल्याचे सामंत यांनी सांगितले.



नाशिक : करोना काळात राज्यातील काही महाविद्यालयांची वसतिगृहे रुग्णांच्या विलगीकरणासाठी वापरण्यात आली. करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असून जिल्हानिहाय आढावा घेऊन राज्यातील पदवी महाविद्यालये लवकरच सुरू करण्याचा निर्णय होणार असल्याचे उच्च तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांचा लाभ देशातील मराठी भाषिकांना घेता यावा म्हणून गोव्यात प्रायोगिक तत्त्वावर सुविधा उपलब्ध केली जात आहे. तसेच चंदगड, उमडी आणि म्हैसाळ या सीमावर्ती भागातील गावांमध्ये मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शुक्रवारी नाशिक दौऱ्यावर आलेल्या सामंत यांनी पुणे विद्यापीठाच्या नाशिक विभागीय केंद्राचे काम आणि मुक्त विद्यापीठाचा राज्यात अधिकाधिक विस्तार करण्याच्या अनुषंगाने आढावा घेतला. प्रसारमाध्यमांशी संवाद साधतांना त्यांनी मध्यंतरी पुणे विद्यापीठाने कोणतीही प्रक्रिया न करता पदवी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे नमूद केले. उच्च शिक्षण विभागाने विचारणा केल्यावर विद्यापीठाने तो निर्णय मागे घेतला. मुळात महाविद्यालये सुरू करण्याचा अधिकार राज्य शासनाचा आहे. जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून त्या अनुषंगाने लवकरच निर्णय होईल, असे त्यांनी सांगितले.

मुक्त विद्यापीठाचा राज्यात विस्तार करण्यासाठी पुणे उपकेंद्राचे रखडलेले काम, मुंबईत स्वतःच्या इमारतीत उपकेंद्र, रायगड-ठाण्यासाठी एक आणि गोवा-रत्नागिरी-सिंधुदुर्गसाठी एक तसेच नागपूरच्या उपकेंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. मुक्त विद्यापीठाचा 'बीएस्सी कृषी' अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाने बंद केला आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना तो शिक्षणक्रम करता यावा म्हणून राज्य शासनामार्फत तो सुरू करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. देशातील ज्या मोठ्या शहरांमध्ये मराठी भाषिक आहेत, त्यांना मुक्त विद्यापीठाचे दालन खुले करण्याचा प्रयत्न आहे. मुक्त विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता देण्यात आल्याचे सामंत यांनी नमूद केले. ऑनलाइन परीक्षेतील गोंधळाची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर कोण दोषी आहेत याची स्पष्टता होईल. पुणे विद्यापीठाच्या विभागीय केंद्राचे बांधकाम एप्रिलमध्ये सुरू होणार आहे. त्यासाठी दोन कोटींचा निधी मंजूर असल्याचे सामंत यांनी नमूद केले.

लोकसत्ता Sat, 23 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57912733

## *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# More than half of teaching posts lying vacant at SPPU

## Quality Of Education & Research Output Hit

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Only 186 of the 386 sanctioned teaching posts in 42 departments at Savitribai Phule Pune University (SPPU) have been filled in the last four years. There are over 200 vacant posts, affecting the quality of teaching and research output at the university.

The stay on recruitment has crippled one of the biggest universities in the country with over 800 affiliated colleges and recognised institutes in the three districts of Ahmednagar, Pune and Nashik.

SPPU officials said they were unable to provide a wide range of subject-electives in each department, consultancy jobs have decreased and quality independent research has also dwindled.

University Grants Commission vice-chairman Bhushan Patwardhan said SPPU's situation was causing concern and will affect funding and rating.

Some core branches requiring huge practical laboratory work have the maximum number of sanctioned teachers, but also over 50% vacancies. For example, chemistry and physics branches have the highest teaching strength at 42 and 40 sanctioned posts, respectively, but there are 22 vacancies in each.

Statistics, which is one of the most in-demand courses across the city due to increasing interest in data science, has 20 sanctioned posts. But only seven have been filled.

Vice-chancellor Nitin Karmalkar said the workload on the existing professors was too much to spare time for independent research. "In the last two years, the number of consultancy research work from outside has fallen. In fact, for the smooth functioning of the university, we need at least 500 teachers for 6,000 students," he added.

The last recruitment was four years ago for some of the sanctioned posts. "Some interviews were held during the last VC's tenure, but interviews with candidates for big departments were not. When I took charge, the whole process had to be started again, but the government stayed the recruitment and the vacancies remained," Karmalkar said, adding that Covid-19 also resulted in delay.

### WHAT'S THE OPTION?

- The university has now started retaining retired professors after an interview process calling them professor emeritus. In some departments, industry experts also give lectures
- When senior teachers retire, there is a void because every department needs their expertise. Hence, after a stringent process, they have retained about 20 professors

"I have started the school system where departments which are similarly structured are grouped together under a school so as to enable horizontal mobility. But these are mitigation measures and not long-term solutions. We need full-time teachers as per the student strength for smooth functioning of the university"

**Nitin Karmalkar** | VICE-CHANCELLOR OF SPPU

**POPULAR COURSES NEED PROFESSORS** (Sanctioned / Filled / Vacant)

| Department | Sanctioned | Filled | Vacant |
|---|---|---|---|
| Adult & Cont.Ed | 8 | 6 | 2 |
| **Anthropology** | 8 | 2 | 6 |
| Atmospheric Space Science | 3 | 1 | 2 |
| **Biotechnology** | 6 | 1 | 5 |
| Botany | 20 | 13 | 7 |
| C.A.S.S | 11 | 5 | 6 |
| Centre For Performing Arts | 2 | 1 | 1 |
| **Chemistry** | 42 | 20 | 22 |
| Communication and journalism | 5 | 3 | 2 |
| Communication Studies | 3 | 2 | 1 |
| Defence & Strategic Studies | 4 | 1 | 3 |
| **Economics** | 3 | 1 | 2 |
| Education | 1 | 1 | 0 |
| **English** | 8 | 2 | 6 |
| Environmental Science | 1 | 0 | 1 |
| **Foreign Languages** | 14 | 4 | 10 |
| Geography | 13 | 8 | 5 |
| Geology | 13 | 12 | 1 |
| Health Science | 3 | 1 | 2 |
| Hindi | 8 | 6 | 2 |
| **History** | 8 | 2 | 6 |
| IDS (Humanities & Social Sci.) | 1 | 0 | 1 |
| IDS (Science) | 1 | 0 | 1 |
| Instru. Science | 1 | 0 | 1 |
| Law | 9 | 6 | 3 |
| Library Information Science | 15 | 10 | 5 |
| Marathi | 7 | 3 | 4 |
| **Mathematics** | 14 | 8 | 6 |
| Microbiology | 6 | 4 | 2 |
| **Pali** | 15 | 6 | 9 |
| Philosophy | 13 | 6 | 7 |
| **Physics** | 40 | 18 | 22 |
| Politics & Public Administration | 12 | 7 | 5 |
| **Psychology** | 8 | 4 | 4 |
| **Sanskrit & Prakrit Languages** | 8 | 2 | 6 |
| **Sociology** | 9 | 2 | 7 |
| Sports | 1 | 1 | 0 |
| **Statistics** | 20 | 7 | 13 |
| Women's Studies | 2 | 1 | 1 |
| **Zoology** | 18 | 8 | 10 |
| Total | 386 | 186 | 200 |

# Unfilled positions may impact funding: UGC vice-chairman

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** No recruitment in the last four years for teaching vacancies at Savitribai Phule Pune University have raised a host of concerns

University Grants Commission vice-chairman Bhushan Patwardhan said the shortage of quality teaching faculty in SPPU is worrisome. "UGC insists that the status of the faculty recruitment process should be available on the website. Faculty vacancies have implications on funding and National Assessment and Accreditation Council ranking," he said.

National Education Policy 2020 strongly recommends mitigation of the shortage of faculty. NEP is silent on the student-teacher ratio, but ideally it should be less than 20. The UGC has issued advisories on October 22, 2019 informing universities that any delay in filling up vacant faculty positions will be viewed seriously, Patwardhan added.

"For instance, funding under RUSA may be delayed when a large number of faculty vacancies exist in the universities. To improve education quality, it is necessary to fill up vacant positions," he said.

Student activist Satish Gore said a single professor teaches two-three subjects in departments that have fewer staff. He said many contract staff do not have a command over the subject or the language, as is expected in a postgraduate department. "Human resources matter the most in a university. SPPU used to have teachers recognised everywhere. Such was their scholarship that industry experts would come to the university to attend their lectures. But that is not the case any more," Nitin Karmalkar, vice-chancellor of SPPU, said.

Joint research under Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan is happening where faculty from different institutes come together, but independent research is not much, he said.

The Times of India 24.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

## Section: Education

# उच्च शिक्षणाचाच 'बॅकलॉग'!

भाग:२

- तंत्र शिक्षणाचे वेळापत्रकही विस्कळीत
- शासन-विद्यापीठ यांच्यात असमन्वय
- करोनाच्या फटक्यातून सावरण्याची गरज

व्यंकटेश भोळा

पुणे, दि. २३ - वरिष्ठ महाविद्यालये आणखी बंदच आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेचा पहिला टप्पा संपला आहे. करोनामुळे शैक्षणिक वेळापत्रक कोलमडले असतानाही, त्याबाबत शासन आणि विद्यापीठांत समन्वय नाही. याचा परिणाम उच्च शिक्षणावर झाला आहे. करोनामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे वेळापत्रक विस्कळीत झाल्याने, शैक्षणिक वर्ष कधी पूर्वपदावर येईल, याविषयी सांशकता आहे.



### ऑनलाइन शिक्षण अपुरे..

करोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच महाविद्यालयांनी प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केली. पण, ही शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांसाठी अपुरी ठरत आहे. दरवर्षी मार्च ते एप्रिलमध्ये विद्यापीठाकडून द्वितीय सत्र परीक्षा घेतल्या जातात. आता जानेवारीचा शेवटचा आठवडा सुरू असून, अजूनही पहिल्या सत्राच्या परीक्षांबद्दल स्पष्टता नाही. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाचे वेळापत्रक पूर्वपदावर येण्यास दोन-तीन वर्षे लागण्याचा अंदाज आहे.

### शैक्षणिक वर्ष बदलण्यास अडचणी

करोनामुळे यंदापासून परेदशी धर्तीवर जानेवारी ते डिसेंबर असे शैक्षणिक वर्ष नव्याने निश्चित करावी, अशी मागणी काही तज्ज्ञ करत आहेत. नवे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यास काय हरकत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र, तांत्रिकदृष्ट्या भारतात तसे करणे शक्य नसल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे म्हणणे आहे. आता सहा महिन्यांचा कालवधी निघून गेला आहे. अशा परिस्थितीत जानेवारीपासून शैक्षणिक वर्ष सुरू करणे अशक्य असल्याचे सांगितले जात आहे.

### विद्यार्थ्यांचे प्रवेश अधांतरी

अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी आदी व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशाची पहिली प्रवेश फेरी घेण्यात आली.

आता दुसऱ्या फेरीचे नियोजन राज्य सीईटी सेलकडून होत आहे. पहिल्या फेरीत सुमारे २५ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केल्याचे दिसून येत आहे. ही प्रवेशप्रक्रिया पूर्ण होण्यास आणखी किमान महिना लागणार आहे. या स्थितीत किती विद्यार्थी प्रवेश घेतील, याविषयी संदिग्धता आहे. दरवर्षी होणाऱ्या दुसऱ्या सत्राच्या परीक्षेच्या कालावधीतच प्रवेशप्रक्रिया पूर्ण होण्याची चिन्हे आहेत. अशा परिस्थितीत वेळापत्रकाचे नियोजन करण्यासाठी तंत्रशिक्षण विभागास नियोजन करावे लागणार आहे.

"करोनामुळे बहुतांश विद्यापीठांनी ऑनलाइन शिक्षणास प्राधान्य दिले. त्यानुसार महाविद्यालयांनी ऑनलाइन वर्ग चालवले आहेत. तसेच विद्यापीठाने अभ्यासक्रम कमी केला आहे. त्याप्रमाणे सर्व नियोजन सुरू आहे. मात्र, शैक्षणिक वेळापत्रक रूळावर येण्यास वेळ लागणार हे मात्र निश्चित आहे.

\- डॉ. पंडित विद्यासागर, माजी कुलगुरू

Prabhat 24.1.2021

# महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय लवकरच!

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) - कोरोनामुळे अनेक महाविद्यालये क्वारंटाइन सेंटर म्हणून वापरात आहेत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून किती सेंटर कार्यरत आहेत, किती बंद झाली याची माहिती घेऊन येत्या काही दिवसांत महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय घेऊ, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले. सामंत म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून विद्यापीठे-महाविद्यालये खुली करण्याबाबतचा निर्णय घेतला जाईल. लसीकरण सुरू झाले असले, तरी मुंबई, पुणे यांसारख्या शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे दूर झालेला नाही. विद्यापीठ व महाविद्यालयांत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता एकाही विद्यार्थ्याला कोरोनाची बाधा होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागणार आहे. त्यामुळे जनजीवन पूर्वपदावर येईपर्यंत आपल्याला अजूनही ऑनलाइन शिक्षणावरच भर द्यावा लागणार आहे. राज्यात प्राध्यापक भरतीबाबत येत्या काही दिवसांत निर्णय जाहीर करण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, पुणे' असा उपक्रम राबविण्यात येणार असून, यामध्ये शिक्षण खात्यातील वरिष्ठ अधिकारी पुण्यामध्ये येऊन तक्रारींचे निवारण करणार आहेत.

Prabhat 25.1.2021

# 'देशातील सर्व बोर्डांच्या अभ्यासक्रमांत हवी समानता'

पुणे, ता. २४ : देशातील शिक्षण मंडळे आणि सर्व राज्यांमधील शिक्षण मंडळांचा अभ्यासक्रम हा सारखा असावा, अभ्यासक्रमात विषय निवडीचे स्वातंत्र्य शाळास्तरापासूनच मिळावे, यासारखे नानाविध पर्याय देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांना सुचविले आहेत.

डॉ. पोखरियाल यांनी ट्विटर अकांऊटवरून 'नवीन शैक्षणिक धोरणाची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी करण्यासाठी काय करता येईल?' असे ट्विट करत सूचना मागितल्या आहे. या सूचना येत्या सोमवारपर्यंत (ता. २५) डॉ. पोखरियाल यांच्या सोशल मीडिया अकौंऊटवर कळविता येणार आहेत. त्यांना शेकडो नागरिकांनी ट्विटरद्वारे सूचना कळविल्या आहेत.

देवांशू शर्मा म्हणतात, "देशातील आयआयटी आणि त्यासारख्या मोठ्या शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना 'बी. एड' शिवाय इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान आणि गणित विषय शिकविण्याची मुभा द्यावी." इंडिया वाइड पेरेंट्स असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड. अनुभा सहाय म्हणाल्या, "शिक्षण हक्क कायदा, बाल हक्क संरक्षण कायदा यात काही सुधारणा करणे गरजेचे आहे."

Sakaal 25.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

## Section: Education

### सामना



▮ संवाद पुणे आयोजित 'प्रबोधन'च्या शतकोत्सव कार्यक्रमात बोलताना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत. यावेळी शिवसेना उपनेते नितीन बानुगडे पाटील, डॉ. रघुनाथ कुचिक, जिल्हाप्रमुख रमेश कोंडे उपस्थित होते.

## विद्यापीठात प्रबोधनकार ठाकरे अभ्यास केंद्र सुरू करणार - उदय सामंत

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) - प्रबोधनकार ठाकरे यांचा विचार आणि त्यांच्या कार्याची माहिती सर्वांपर्यंत पोहचावी यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अभ्यास केंद्र सुरू करणार, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केली.

संवाद पुणे आयोजित 'प्रबोधन'च्या शतकोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी शिवसेनेचे उपनेते नितीन बानुगडे पाटील, डॉ. रघुनाथ कुचिक, जिल्हाप्रमुख रमेश कोंडे आदी उपस्थित होते.

उदय सामंत म्हणाले, प्रबोधनकार ठाकरे हे व्यक्तिमत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, ते देशव्यापी आहे. त्यामुळे हा कार्यक्रम देशातील प्रमुख शहरांमध्ये आयोजित करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रबोधनकार ठाकरे अभ्यास केंद्र सुरू करण्याबाबत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याशी चर्चा केली आहे. विद्यापीठात अभ्यास केंद्र कोणत्या पद्धतीने हवे आहे, याबाबत डॉ. नितीन करमळकर यांच्याशी संवाद साधून येत्या काही दिवसांत त्याची स्थापना करण्यात येईल. शालेय शिक्षणात प्रबोधनकार ठाकरे यांच्या जीवनावर आधारित धडा सामाविष्ट करण्याबाबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. पुणे विद्यापीठाची स्थापना मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी झाली आहे. त्यामुळे मराठी भाषा संवर्धनासाठी एक केंद्र पुणे विद्यापीठात सुरू झाले पाहिजे, अशी अनेकांची इच्छा आहे. त्यासाठी मराठी भाषा संवर्धनमंत्री सुभाष देसाई यांच्यासोबत बैठक आयोजित करून मराठी भाषा केंद्र स्थापन करण्याबाबत चर्चा करणार आहे. दिल्लीत स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संकुल सुरू करण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

चित्रप्रदर्शनात सन १९९६ मधील 'माझी जीवनगाथा' या कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका पाहिली. याचे उद्घाटन बाळासाहेबांच्या हस्ते आणि अमिताभ बच्चन यांच्या उपस्थितीत झाले. या निमंत्रण पत्रिकेत शाह, जैन, खोतमल अशी नावे होती. त्यामुळे काल, परवा आमच्यावर जिलबी-ढोकळ्याचा आरोप झाला, त्यात तथ्य नाही. हे सर्व महाराष्ट्रातील लोक आहेत, म्हणून आपल्यासोबत असले पाहिजेत, हा पायंडा शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी पाडला आहे. त्यामुळे टीकेसाठी कोणीही टीका करू नये, असा टोला सामंत यांनी विरोधकांना लगावला.

Saamana 25.1.2021

येत्या चार ते पाच दिवसांत नियमावली निश्चित होणार : उदय सामंत यांची माहिती

## महाविद्यालये सुरू करण्यासाठी अद्यापही अभ्यासच

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - महाविद्यालये सुरू करण्याबाबत मुख्य सचिव अभ्यास करत आहेत. किती टक्के विद्यार्थी, प्राध्यापक महाविद्यालयात बोलवायचे याची नियमावली बनविणे सुरू आहे, ते येत्या चार ते पाच दिवसांत निश्चित होईल. त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून महाविद्यालये सुरू होतील. याचा लवकरच निर्णय घेणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी रविवारी सांगितले.

बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित प्रबोधन महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी उदय सामंत आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात अजून निर्णय झालेला नसल्याचे सांगत अभ्यास सुरू असल्याचे उदय सामंत यांनी म्हटले.

लसीकरण सुरू झालेले असले तरी अजूनही करोनाचे रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे महाविद्यालयात येणाऱ्या आणि परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याचा ताळमेळ घालावा लागेल. ही परिस्थिती जोपर्यंत सुरळीत होत नाही तोपर्यंत ऑनलाइन शिक्षण व ऑनलाइन परीक्षा घ्यावी लागणार असल्याचे ते म्हणाले.

### शालेय अभ्यासक्रमात प्रबोधनकार ठाकरे यांच्या जीवनावरील धडा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रबोधनकार ठाकरे अध्यासन सुरू करणार असून, शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या जीवनावर धडा सामविष्ट करण्यात येणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी 'प्रबोधन'च्या शतकोत्सव कार्यक्रमात केली. यावेळी शिवसेनेचे पुणे शहर उपप्रमुख किरण साळीसह अन्य उपस्थित होते. त्याचप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी भाषा संवर्धनाबाबत केंद्र सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) ३१ जानेवारीपर्यंत प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले आहे. पण, ती १५ फेब्रुवारीपर्यंत चालेल अशी स्थिती आहे. त्यानंतर मार्च, एप्रिल, मेमध्ये शिक्षण देऊन परीक्षा घ्यावी लागणार आहे. त्यासाठीचे वेळापत्रक आणि अभ्यासक्रम ठरविण्याची जबाबदारी विद्यापीठांची असल्याचे त्यांनी सांगितले.

Prabhat 25.1.2021

## विद्यापीठांच्या स्तरावर जनता दरबार

पुणे, ता. २४ : विद्यापीठ, महाविद्यालये, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यासह इतरांच्या अनेक समस्या आहेत. त्यातील प्रत्येकाला मुंबईत मंत्रालयात येऊन कामे करून घेता येतातच असे नाही. यासाठी राज्यातील विद्यापीठांच्या स्तरावर जनता दरबार घेण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी घेतला आहे.

पहिला जनता दरबार सोमवारी (ता. २५) कोल्हापूर येथे घेतला जाणार आहे. त्यास 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर असे नाव देण्यात आले आहे. याचपद्धतीने इतर विद्यापीठासाठी नाव असणार आहे.

तंत्र शिक्षण विभागाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे, तर उच्च शिक्षण संचालनालय पुण्यामध्ये आहे. राज्यभरातील महाविद्यालये, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी यांना त्यांच्या कामासाठी मुंबई किंवा पुणे गाठावे लागते. विद्यार्थ्यांना देखील त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी या शहरांमध्ये खेटे घालावे लागतात. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयच राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी मुंबईमध्ये यावे लागते. हा त्रास कमी व्हावा, यासाठी विद्यापीठाच्या स्तरावरच मंत्रालय आणण्यात येणार आहे.
> - **उदय सामंत**, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग

उदय सामंत म्हणाले, "या उपक्रमात माझ्यासह उच्च व तंत्र शिक्षण खात्याचे प्रधान सचिव, सचिव, संचालक, सह संचालक, संबंधित विद्यापीठाचे कुलगुरू यासह मंत्रालयातील कक्ष अधिकारी यावेळी उपस्थित असतील. त्यामुळे तक्रारदारांच्या समस्यांचा निपटारा लगेच होऊ शकणार आहे. कोल्हापूरला हा उपक्रम होणार असून, आतापर्यंत बाराशे ऑनलाइन तक्रारी आलेल्या आहेत. याच पद्धतीने इतर विद्यापीठांमध्ये हा उपक्रम घेतला जाणार आहे. पुणे विद्यापीठातील प्रश्नांसाठी पुणे आणि नाशिक या दोन ठिकाणी या बैठका घेतल्या जातील.

Sakaal 25.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## महाविद्यालयांबाबत अभ्यास सुरूच

### मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेणार : उदय सामंत

**पुणे ता. २४ :** "कोरोनाच्या काळात महाविद्यालये, वसतिगृहांमध्ये 'क्वारंटाइन सेंटर'ची व्यवस्था केली होती. त्यापैकी किती क्वारंटाइन सेंटर बंद झाले आहेत, याचा जिल्हाधिकाऱ्यांशी आम्ही बोलून अभ्यास करत आहोत. किती विद्यार्थी, प्राध्यापक महाविद्यालयात बोलवायचे याची नियमावली बनविण्याचे काम सध्या सुरु आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय लवकरच घेतला जाईल," असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित प्रबोधन महोत्सवासाठी उदय सामंत उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, "लसीकरण सुरू झाले असले तरी, अजूनही कोरोनाचे रुग्ण सापडत आहेत. त्यामुळे महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याचा ताळमेळ घालावा लागेल. ही परिस्थिती जो पर्यंत सुरळीत होत नाही, तो पर्यंत ऑनलाइन शिक्षण सुरु ठेवावे लागणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) ३१ जानेवारीपर्यंत प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले आहे. पण राज्यात ती १५ फेब्रुवारीपर्यंत चालेल, अशी स्थिती आहे. मार्च, एप्रिल आणि मे मध्ये शिक्षण देऊन परीक्षा घ्यावी लागणार आहे."

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) विना सीईटी एमबीए प्रवेश द्यावेत, असे सांगितले. पण त्यासाठीचे निकष सर्वच अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लावला पाहिजे. याबाबतचे आदेश देताना त्यात स्पष्टता असली पाहिजे. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

**विरोधामुळे लगेच निर्णय होत नाहीत**

सोशल मीडियावर 'वेक अप उदय सामंत' अशी मोहीम सुरू आहे. त्याबाबत विचारले असता ते म्हणाले, "मी माझ्याशी प्रामाणिक राहून निर्णय घेतो. शुल्क कमी करावी ही मागणी रास्त असेल, पण त्यासाठी प्रक्रिया आहे. शुल्क नियंत्रण प्राधिकरण (एफआरए) ही स्वायत्त आहे. ज्याची परीक्षा झाली नाही, त्यांचे शुल्क पुढील वर्षासाठी वापरावे, यासाठी बैठक घेत आहोत. सोशल मीडियावर विरोध झाला म्हणून तातडतोब निर्णय घेतला पाहिजे, असे नाही."

**प्रबोधनकार अध्यासन केंद्र उभारणार**

**पुणे :** "प्रबोधनकार ठाकरे यांचे विचार विद्यार्थांना समजला पाहिजे. यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अध्यासन केंद्र सुरू केले जाईल, त्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याशी चर्चा झाली आहे." अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

संवाद पुणे संस्थेतर्फे प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या प्रबोधन पाक्षीकाच्या शकतोत्सवाचे आयोजन बालगंधर्व रंग मंदिरात करण्यात आले आहे. या वेळी ते बोलत होते. शिवव्याख्याते नितीन बानुगडे-पाटील, शिवसेनेचे उपनेते डॉ. रघुनाथ कुचिक, जिल्हाप्रमुख रमेश कोंडे, किरण साळी, सुनील महाजन, निकिता मोघे आदी उपस्थित होते. सामंत म्हणाले, "प्रबोधनकारांचे विचार विद्यार्थ्यांना समजण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या कार्यावरील धडा समाविष्ट करण्यात येईल. प्रबोधनकार ठाकरे कळण्यासाठी मुंबई, दिल्लीसह प्रमुख शहरात असे कार्यक्रम झाले पाहिजेत."

**पुणे विद्यापीठाची स्थापना मराठी भाषेच्या प्रसार-प्रचारासाठी झाली आहे. विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन केंद्र सुरू करण्यासाठी मराठी भाषा संवर्धनमंत्री सुभाष देसाई यांच्यासोबत एक बैठक आयोजित करून त्यास गती दिली जाईल.**

**- उदय सामंत**, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

Sakaal 25.1.2021

## कॉलेजबाबत अभ्यासच सुरू!

### विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन घेणार असल्याची उदय सामंतांची घोषणा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'महाविद्यालये खुली करताना शाळा आणि महाविद्यालये, अशी तुलना करून चालणार नाही. करोनाच्या प्रादुर्भावामुळे अनेक महाविद्यालये व वसतिगृहे क्वारंटाइन सेंटर होती. राज्याचे मुख्य सचिव आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून, यापैकी किती सेंटर कार्यरत आहेत, याचा आम्ही अभ्यास करीत आहोत. येत्या चार ते पाच दिवसांत महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय घेऊ,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

सामंत पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त आले असताना, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मात्र, पुण्यात सध्या शाळा आणि महाविद्यालयांतील क्वारंटाइन सेंटरपैकी केवळ एकाच शाळेत हे सेंटर सुरु असल्याची माहिती महापालिकेकडून मिळाली आहे. अशीच परिस्थिती राज्यातही आहे.

सामंत म्हणाले, 'विद्यापीठे-महाविद्यालये सुरू झाल्यावर विद्यार्थी आणि प्राध्यापकांना ५० टक्के किंवा २५ टक्के संख्येच्या प्रमाणात बोलवायचे, याबाबत नियमावली तयार करण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून विद्यापीठे-महाविद्यालये खुली करण्याबाबतचा निर्णय येत्या चार ते पाच दिवसांत जाहीर करू.' या वेळी त्यांनी प्राध्यापक भरती, टीचर्स ट्रेनिंग अॅकॅडमी, ऑनलाइन परीक्षा, प्रवेश परीक्षा आदींबाबत सविस्तर माहिती दिली. सामंत म्हणाले, की करोनामुळे शैक्षणिक वर्ष विस्कळित झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) यंदाच्या प्रवेशप्रक्रिया ३१ जानेवारीपर्यंत आहेत. गरजेनुसार ही प्रवेशप्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत वाढू शकते. अशा परिस्थितीत प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मार्च, एप्रिल, मे, जून महिन्यांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील; तसेच विशेष पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागतील.

टीचर्स ट्रेनिंग अॅकॅडमीचे बांधकाम ७० टक्के पूर्ण झाले असून, येत्या दोन महिन्यांत अॅकॅडमीचे उद्घाटन करण्यात येईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

**प्राध्यापक भरतीची फाइल अर्थ खात्याकडे**

राज्यात प्राध्यापकांच्या एकूण रिक्त पदांपैकी काही पदांवर प्राध्यापक भरतीबाबत येत्या काही दिवसांत निर्णय जाहीर करण्यात येईल. या भरतीबाबतची फाइल अर्थ मंत्रालयाकडे पाठविण्यात आल्याने, लवकर निर्णय अपेक्षित असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत येणारे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय@पुणे' असा उपक्रम राबविण्यात येणार आहे. कार्यक्षेत्र मोठे असल्याने नाशिकमध्येही हा उपक्रम होणार असल्याचे सामंत यांनी जाहीर केले.



**'परीक्षा ऑनलाइन घ्याव्या लागतील'**

'राज्यात लसीकरण सुरू झाले असले, तरी मुंबई, पुणे यांसारख्या शहरांत करोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे दूर झालेला नाही. विद्यापीठे व महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या; तसेच प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची संख्या याचा विचार करावा लागेल. एकाही विद्यार्थ्याला करोनाची बाधा होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. त्यामुळे जनजीवन पूर्वपदावर येईपर्यंत आपल्याला अजूनही ऑनलाइन शिक्षणावरच भर द्यावा लागणार असून, विद्यापीठांच्या सत्र परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने घ्याव्या लागतील,' अशी माहिती सामंत यांनी दिली.

Maharashtra Times 25.1.2021

## *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

पुढारी

# महाविद्यालये सुरू करणार; तारीख नाही सांगणार!

## नेमका दिवस सांगण्यास उदय सामंत यांचा नकार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनामुळे महाविद्यालये व वसतिगृहांचे रूपांतर विलगीकरण कक्षात करण्यात आले. त्यामुळे महाविद्यालये खुली करताना शाळा आणि महाविद्यालये अशी तुलना करता येणार नाही. परंतु राज्याचे मुख्य सचिव आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून याबाबत निर्णय होईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. मात्र, महाविद्यालये सुरू करण्याची नेमकी तारीख सांगण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे महाविद्यालये सुरू करणार, परंतु तारीख नाही सांगणार, अशीच भूमिका मंत्र्यांची असल्याचे दिसून आले.

एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आले असताना, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सामंत म्हणाले, ''विद्यापीठे-महाविद्यालये सुरू झाल्यावर विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संख्येच्या ५० किंवा २५ टक्के प्रमाणात बोलवायचे, याबाबत नियमावली तयार करण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून विद्यापीठे-महाविद्यालये खुली करण्याबाबतचा निर्णय येत्या चार ते पाच दिवसांत जाहीर करू.'' या वेळी त्यांनी प्राध्यापक भरती, टिचर्स ट्रेनिंग अ‍ॅकॅडमी, ऑनलाइन परीक्षा, प्रवेश परीक्षा आदींबाबत सविस्तर माहिती दिली.

सामंत म्हणाले, ''कोरोनामुळे शैक्षणिक वर्ष विस्कळीत झाले आहे. यदांच्या प्रवेश प्रक्रिया ३१ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहेत. गरज भासल्यास, ही प्रवेश प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत वाढू शकते. त्यामुळे पहिल्यांदाच यंदा नवे शैक्षणिक वर्ष १५ फेब्रुवारीनंतर सुरू होणार आहे. अशा परिस्थितीत प्रथम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांचे मार्च, एप्रिल, मे, जून महिन्यांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील; तसेच त्यांच्या विशेष पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागतील.''

विद्यापीठांतर्गत येणारे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, पुणे' असा उपक्रम पुण्यात लवकरच राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम बालगंधर्व रंगमंदिरातच होण्याची शक्यता आहे. राज्यात प्राध्यापकांच्या भरतीबाबतची फाइल अर्थमंत्रालयाकडे पाठविण्यात आल्याने, लवकर निर्णय अपेक्षित असल्याचेदेखील सामंत यांनी स्पष्ट केले.

### सत्र परीक्षा ऑनलाइनच

लसीकरण सुरू झाले असले तरी कोरोनाचे रुग्ण सापडत आहेत. त्यामुळे विद्यापीठे व महाविद्यालयांत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या; तसेच प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांवरील विद्यार्थ्यांची संख्या याचा आम्हाला विचार करावा लागेल. एकाही विद्यार्थ्याला कोरोनाची बाधा होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागणार आहे. त्यामुळे जनजीवन पूर्वपदावर येईपर्यंत ऑनलाइन शिक्षणावरच भर द्यावा लागणार असून, विद्यापीठांच्या सत्र परीक्षा या ऑनलाइन पद्धतीनेच घ्याव्या लागणार असल्याचेदेखील सामंत यांनी स्पष्ट केले.

My Pune Edition
Jan 25, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# महाविद्यालये खुली करण्याबाबतचा निर्णय चार-पाच दिवसांमध्ये

### उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शाळा आणि महाविद्यालये, अशी तुलना करून चालणार नाही. करोनाच्या प्रादुर्भावामुळे अनेक महाविद्यालये आणि वसतिगृहे विलगीकरण केंद्र होती. राज्याचे मुख्य सचिव आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून, यापैकी किती केंद्र कार्यरत आहेत, याचा आम्ही अभ्यास करीत आहोत. येत्या चार ते पाच दिवसांत महाविद्यालये खुली करण्याचा निर्णय घेऊ, असे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी रविवारी सांगितले.

एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आलेल्या सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, विद्यापीठे-महाविद्यालये सुरू झाल्यावर विद्यार्थी आणि प्राध्यापकांना ५० टक्के किंवा २५ टक्के संख्येच्या प्रमाणात बोलवायचे, याबाबत नियमावली तयार करण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून विद्यापीठे-महाविद्यालये खुली करण्याबाबतचा निर्णय येत्या चार ते पाच दिवसांत जाहीर करू. करोनामुळे शैक्षणिक वर्ष विस्कळीत झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) यंदाच्या प्रवेश प्रक्रिया ३१ जानेवारीपर्यंत आहेत. गरज भासल्यास, ही प्रवेश प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत वाढू शकते. त्यामुळे नवे शैक्षणिक वर्ष १५ फेब्रुवारीनंतर सुरू होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत प्रथम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम मार्च, एप्रिल, मे, जून महिन्यांमध्ये पूर्ण करावे लागतील. तसेच विशेष पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागतील.

राज्यात प्राध्यापकांच्या एकूण रिक्त पदांपैकी काही पदांवर प्राध्यापक भरतीबाबत येत्या काही दिवसांत निर्णय जाहीर करण्यात येईल. या भरतीबाबतची फाइल अर्थ मंत्रालयाकडे पाठविण्यात आल्याने, लवकर निर्णय अपेक्षित असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय अॅट पुणे' असा उपक्रम महिनाभरात राबविण्यात येणार आहे. कार्यक्षेत्र मोठे असल्याने नाशिकमध्येही हा उपक्रम होणार असल्याचे सामंत यांनी सांगितले.

### ऑनलाइन शिक्षणावरच भर

राज्यात लसीकरण सुरू झाले असले, तरी मुंबई, पुणे यांसारख्या शहरात करोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे दूर झालेला नाही. विद्यापीठे आणि महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या; तसेच प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची संख्या याचा आम्हाला विचार करावा लागेल. एकाही विद्यार्थ्याला करोनाची बाधा होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागणार आहे. त्यामुळे जनजीवन पूर्वपदावर येईपर्यंत आपल्याला अजूनही ऑनलाइन शिक्षणावरच भर द्यावा लागणार असून, विद्यापीठांच्या सत्र परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागणार आहेत, असे उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता
Mon, 25 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57965095

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

लोकमत

# विद्यापीठात प्रबोधनकारांच्या नावाने अभ्यास केंद्र

## मंत्री उदय सामंत यांची घोषणा : 'प्रबोधन' पाक्षिकाच्या शतकोत्सवानिमित्त 'संवाद पुणे' तर्फे प्रबोधन महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रबोधनकार ठाकरे यांचे सत्यशोधक विचार आजच्या तरुणाईपर्यंत पोहोचण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने अभ्यास केंद्र सुरू करण्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली. 'प्रबोधन' पाक्षिकाच्या शतकोत्सवानिमित्त संवाद पुणेतर्फे प्रबोधन महोत्सवात सामंत यांनी बालगंधर्व कलादालनातील छायाचित्र-व्यंगचित्र तसेच प्रबोधनकार ठाकरे, शिवसेनाप्रमुख ठाकरे यांच्या साहित्यसंपदेची पाहणी केली. त्यानंतर बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पुणे विद्यापीठात अभ्यास केंद्र व शालेय विद्यार्थ्यांना प्रबोधनकारांविषयी माहिती होण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात प्रबोधनकारांवर धडा समाविष्ट करावा, अशी मागणी सुनील महाजन यांनी केली. विद्यापीठात अभ्यास केंद्र सुरू करण्याच्या मागणीस सामंत यांनी तत्काळ मान्यता देत या संदर्भात कुलगुरूंशी आज चर्चा झाली आहे. अभ्यासकेंद्रासाठी समिती नेमण्याची घोषणाही त्यांनी केली. प्रबोधनकार ठाकरे यांच्यावरील धडा शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी संबंधित विभागांशी चर्चा करून निर्णय घेण्यास भाग पाडू, असे आश्वासनही सामंत यांनी दिले.

शिवव्याख्याते नितीन बानगुडे पाटील, ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव, शिवसेना उपनेते रघुनाथ कुचिक, ज्येष्ठ पत्रकार हरिश कैंची, चित्रपट महामंडळाच्या संचालिका निकिता मोघे, सचिन इटकर, किरण साळी, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रमेश कोंडे उपस्थित होते. प्रबोधनकारांच्या विचारांचा जागर होण्यासाठी रत्नागिरीत अशा प्रकारचा महोत्सव सुरू करण्याची जबाबदारी मी घेतो. प्रबोधन महोत्सव महाराष्ट्रातील किमान दहा मोठ्या शहरांमध्ये व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सचिन इटकर यांनी प्रास्ताविक केले. सुनील महाजन, निकिता मोघे, हरिश कैंची, किरण साळी यांनी स्वागत केले. संतोष चोरडिया यांनी सूत्रसंचालन केले.

### एआयसीटीईकडून हवी प्रवेशाबाबत स्पष्टता



अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) सीईटी परीक्षा न दिलेल्या विद्यार्थ्यांना 'एमबीए' अभ्यासक्रमास प्रवेश देण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु, हा निकष सर्वच अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लावला पाहिजे. तसेच एआयसीटीईने प्रवेश प्रक्रिया राबविण्यासंदर्भात स्पष्टता दिलेली नाही. त्यामुळे अद्याप यावर निर्णय घेतला नाही,असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी सांगितले. मात्र, यासंदर्भात तंत्र शिक्षण संचालकांशी चर्चा केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कोरोनावरील लसीकरण सुरु झाले असले तरी अजूनही कोरोनाचे रुग्ण सापडत आहेत. त्यामुळे महाविद्यालयात येणाऱ्या व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याचा ताळमेळ घालावा लागणार आहे. कोरोना परिस्थिती सुधारणा होत नाही तोपर्यंत ऑनलाइन शिक्षण व ऑनलाइन परीक्षा घ्यावी लागणार आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) येत्या ३१ जानेवारीपर्यंत प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले आहे. येत्या मार्च, एप्रिल, मे महिन्यात अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. परंतु, यासंदर्भात निर्णय घेण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे, असेही सामंत यांनी सांगितले.

### विद्यापीठात मराठी भाषा केंद्र स्थापनेसाठी बैठक

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व उत्कर्षासाठी स्थापन झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी भाषा संवर्धनासाठी स्वतंत्र केंद्र पुणे सुरु व्हावे, अशी अनेकांची इच्छा आहे. त्यासाठी मराठी भाषा संवर्धन मंत्री सुभाष देसाई यांच्यासोबत बैठक आयोजित करून मराठी भाषा केंद्र स्थापनेवर चर्चा केली जाईल, असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रविवारी सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विभागाचे रूपांतर विविध संकुलात केले आहे. मराठी विभागाचा समावेश स्कूल ऑफ इंडियन लॅंग्वेजमध्ये केला आहे. मात्र, मराठी विभागाला स्वतंत्र संकुलाचा दर्जा द्यावा, अशी मागणी विविध घटकांकडून व्यक्त केली जात आहे.'लोकमत'ने या प्रश्नाला वाचा फोडली होती. त्यावर रविवारी उदय सामंत यांनी सुभाष देसाई यांच्याशी चर्चा केल्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन केंद्र सुरु करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे सामंत यांनी सांगितले.

# महाविद्यालय सुरू करण्यास 'तारीख पे तारीख' सुरूच

## अद्याप निर्णय झाला नसल्याची सामंतांची माहिती

**पुणे :** महाविद्यालये सुरू करण्याबाबत उच्च शिक्षण विभागाचा अभ्यास अजूनही पूर्ण झालेला नाही. सध्या उच्च शिक्षण विभाग महाविद्यालये व वसतिगृहांतील क्वारंटाईन सेंटरचा आढावा घेत आहे. या संदर्भातील अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहेत. त्यामुळे राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्याचे रविवारी स्पष्ट झाले.

महाविद्यालय सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे तरूणाई अस्वस्थ आहे. उच्च शिक्षण विभाग महाविद्यालये सुरू करण्याबाबत अजूनही उदासिन आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत हे सुध्दा 'तारीख पे तारीख' देत आहेत. रविवारी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना सामंत यांनी महाविद्यालय व वसतीगृहातील क्वारंटाईन सेंटरबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगितले. शाळांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करून या शाळा सुरू केल्या. पुणे शहरात सुमारे दीड महिन्यांपूर्वी सुरू असलेल्या १९ क्वारंटाईन सेंटर पैकी १८ सेंटर बंद केले आहेत. तर केवळ बनकर शाळा येथील एकच केंद्र सुरू आहे. सुमारे दहा दिवसांपूर्वी सेंटरचा आढावा घेवून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय २० जानेवारीपर्यंत जाहीर केला जाईल, असे सामंत यांनी सांगितले होते.

> महाविद्यालये सुरु करण्यासाठी किती टक्के विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बोलवावे याबाबतची नियमावली तयार करण्याचे काम सुरु आहे. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आहेत. त्यांच्याशी चर्चा करून राज्यातील महाविद्यालये सुरु करण्याबाबत लवकर निर्णय घेऊ.
>
> \- उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

Pune Main
Page No. 2 Jan 25, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । मंगळवार, २६ जानेवारी २०२१ ३

## 'कॅस'च्या मुलाखती महाविद्यालय स्तरावर

म. टा. प्रतिनिधी, पुणे



अध्यापकांच्या सेवा अंतर्गत प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नती अर्थात 'कॅस'च्या मुलाखती महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात, असे आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना दिले आहेत. या मुलाखती कोणी घ्यायच्या, या प्रश्नावरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि उच्चशिक्षण संचालनालयामध्ये निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या उपकुलसचिवांनी हे आदेश काढले.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातर्फे 'कॅस' अंतर्गत अध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखती २८ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीत घेण्यात आल्या. मात्र, या मुलाखतीच्या प्रक्रियेला काही शिक्षण संस्थाचालकांनी आक्षेप घेतला होता. त्याची तक्रार उच्चशिक्षण संचालनालयाकडेही करण्यात आली होती. अशासकीय महाविद्यालयातील अध्यापकांच्या निवडीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य सरकारला किमान पात्रता व अनुभव ठरविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे संस्थेने कोणत्या अध्यापकांची निवड करावी, याबाबतचे संपूर्ण अधिकार संबंधित संस्थेचे आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांची निवड आणि पदोन्नतीचे, तसेच निवड केलेल्या शिक्षकांच्या निवडीची यादी ठरविण्याचे अधिकार विद्यापीठास नसून, हा राज्यघटनेतील कलम १९ (१) (जी) चा भंग असल्याचे संस्थाचालकांनी तक्रारीत नमूद केले होते. या तक्रारीच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावरच मुलाखतींचे आयोजन करणे योग्य राहील, असे उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी स्पष्ट केले होते.

## शिक्षकांचे तंत्रकौशल्य वाढवण्यासाठी स्वतंत्र संस्था

### विद्यापीठ अनुदान आयोगाचा विचार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अचानक समोर आलेल्या ऑनलाइन वर्गांशी जुळवून घेताना शिक्षकांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची गरज प्रकर्षाने समोर आल्यानंतर आता यासाठी स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विचाराधीन असून 'राष्ट्रीय शिक्षण तंत्रज्ञान व्यासपीठ'चा मसुदा जाहीर केला आहे.

शिक्षकांना तंत्रकुशल करण्याची गरज लक्षात घेऊन आयोगाने स्वतंत्र संस्था सुरू करण्याचा मानस जाहीर केला आहे. यासंदर्भातील मसुदा जाहीर करण्यात आला असून इच्छुकांना ६ फेब्रुवारीपर्यंत सूचना आणि आक्षेप नोंदवता येतील. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढणे अपरिहार्य आहे. याबाबतचे बदल सक्षमपणे अंतर्भूत करता यावेत, येत्या काळात शिक्षण तंत्रज्ञानाचा वापर योग्य प्रकारे व्हावा आणि सर्वांना योग्य प्रकारे त्याच्या सुविधा मिळाव्यात यासाठी विशेष व्यासपीठ स्थापन करण्यात येणार आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून संकल्पना सुचविणे, सुविधांचे व्यवस्थापन, नियोजन, मूल्यांकन, अध्ययन सुविधा उपलब्ध करून देण्यात यातील. ही सुविधा महाविद्यालयांबरोबरच शाळांसाठीही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे या मसुद्यात स्पष्ट करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात निवृत्त प्राध्यापक, विषय तज्ज्ञ आदींचे मार्गदर्शन घेण्याबाबत यात सूचना करण्यात आल्या आहेत. यामध्ये देशातील विविध भाषांमध्ये शिकविणाऱ्या प्राध्यापकांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. देशात शिक्षण प्रशिक्षणासाठीही तज्ज्ञांची एक फळी तयार करण्याची सूचना या मसुद्यात करण्यात आली आहे. यात विविध क्षेत्रांतील उद्योजक, उच्च पदस्थांचाही समावेश करण्याच्या सूचना यात करण्यात आल्या आहेत.

लोकसत्ता Tue, 26 January 2021 https://epaper.loksatta.com/c,

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## उच्चतंत्र शिक्षण विभागाचे विद्यार्थिहिताकडे दुर्लक्ष

### महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनचा आरोप

पुणे, ता. २५ : ऑनलाइन शिक्षणामुळे उच्च व तंत्र शिक्षणाच्या अभ्यासक्रमांची शुल्ककपात करावी, परीक्षा न झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात सूट द्यावी यासह महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे वारंवार करण्यात आली. पण, विद्यार्थिहिताचा निर्णय न घेता केवळ वेळकाढूपणा केला जात आहे, असा आरोप महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनने (मासू) केला आहे.

नाशिक येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राच्या प्रश्नांसंदर्भात सामंत यांनी बैठक घेतली. त्यावेळी मासुचे विभागप्रमुख सिद्धार्थ तेजाळे व इतर पदाधिकारी यांनी सामंत यांची भेट घेऊन म्हणणे मांडले. शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये शिक्षण पद्धत ऑनलाइन असल्याने फक्त शिकवणी फी घेतली जावी. पण महाविद्यालये विद्यार्थ्यांना फीसाठी तगादा लावून परीक्षेला अपात्र करत आहेत. शुल्क पूर्ण घेतले जात असले तरी उच्च तंत्र शिक्षण विभाग थेट महाविद्यालय सुरू करत नाही. परीक्षा शुल्काबाबतही कोणताही निर्णय घेतला जात नाही. हे निदर्शनास आणून दिले, पण त्याबाबत ठोस आश्वासन दिलेले नाही.

तेजाळे म्हणाले, मासूने यापूर्वी उदय सामंत यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन, निवेदन देऊन मागण्या सादर केल्या. पण, सामंत यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देणारा एकही निर्णय घेतला नाही.

#### सोशल मीडियावर 'सावंत जागो' मोहीम

'मासू'ने विद्यार्थिहिताचा निर्णय घ्यावा यासाठी #WakeUpUdaySamant नावाने सोशल मीडियावर व्हिडिओ मोहीम सुरू केली आहे. राज्यातील मासूचे प्रतिनिधी व विद्यार्थ्यांनी फेसबुक, ट्वीटरवर, सोशल मीडियावर उदय सामंत यांच्याविरोधात व्हिडिओ टाकून निर्णय न घेतल्याचा निषेध करत आहे. उच्च शिक्षण विभागाला जागे करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे तेजाळे यांनी सांगितले.

Sakaal 26.1.2021

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

### महाविद्यालये सुरू करण्याची 'अभाविप'ची मागणी

पुणे, ता. २५ : राज्यात शाळा सुरू झाली, पण उच्च तंत्र शिक्षण विभागाला महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेता आलेला नाही. याविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच वर्ग भरवून आंदोलन केले. महाविद्यालये बंद ठेवून आमच्या भविष्याशी खेळू नका, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर इतरवेळी घोळक्याने लोक थांबून, घोषणाबाजी करत आंदोलन करतात. मात्र, रांगेमध्ये खाली बसून, हातात वह्या-पुस्तके आणि घोषणांचे फलक घेऊन विद्यार्थी आंदोलन करत असल्याचे चित्र दिसले. या विद्यार्थ्यांनी महाविद्यालये सुरू करा, आम्हाला प्रॅक्टीकल करु द्या, वर्गात बसून शिकु द्या अशा मागण्या करत याकडे लक्ष वेधले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत केवळ घोषणा करून विद्यार्थ्यांची फसवणूक करत आहे.त्यामुळे विद्यार्थी आणि अभाविप कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. महाविद्यालये सुरू करण्याचा अधिकार विद्यापीठाचा असताना राज्य सरकारने त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणू नये, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली.



जिल्हाधिकारी कार्यालय : महाविद्यालये सुरू करावीत या मागणीसाठी 'अभाविप'तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर वर्ग भरवून आंदोलन करण्यात आले.

"महाविद्यालयांत होणाऱ्या कॅम्पस इंटरव्ह्यूमुळे मिळणाऱ्या नोकरीसाठी विद्यार्थी प्रयत्नशील असतात. महाविद्यालयेच सुरू झाली नाहीत तर कॅम्पस प्लेसमेंट होतील का, असा प्रश्न विद्यार्थी व पालकांना पडला आहेत. राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नये. महाविद्यालये सुरू करावीत म्हणून हे आनोख्या पद्धतीने आंदोलन केले आहे.

– शुभम भुतकर, महानगर मंत्री, अभाविप

Sakaal 26.1.2021

## पदव्युत्तर पदवीचे प्रथम सत्र सुरू

### ऑनलाइन वर्गांना आजपासून प्रारंभ; विद्यापीठाकडून वेळापत्रक जाहीर

पुणे, ता. २७ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आणि महाविद्यालयांमध्ये ज्या पदव्युत्तर पदवीचे प्रथम वर्षाचे प्रवेश पूर्ण झालेले आहेत, अशा अभ्यासक्रमांचे ऑनलाइन वर्ग गुरुवारपासून (ता. २८) सुरू होणार आहेत. प्रथम सत्र मे महिन्यात संपल्यानंतर, जून महिन्यात दुसरे सत्र सुरू होणार आहे. याबाबत विद्यापीठाने वेळापत्रक जाहीर केले आहे.

कोरोनामुळे अंतिम वर्ष वगळता इतर वर्षांच्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश देण्यात आला. तर अंतिम वर्षाच्या परीक्षा वादामुळे लांबणीवर पडल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिलेल्या सूचनांनुसार पुणे विद्यापीठासह इतर विद्यापीठांनी ऑक्टोबर महिन्यात परीक्षा घेतल्या. पुणे विद्यापीठाच्या परीक्षा नोव्हेंबर महिन्यात संपल्या, निकालातील त्रुटी दूर करण्यातही बराचसा कालावधी गेला. दरम्यान, अजून व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू असली, तरी इतर अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वेळापत्रक पुणे विद्यापीठाने जाहीर केले आहे.

राज्य शासनाने अद्याप थेट महाविद्यालये सुरू करण्याचे आदेश काढलेले नाहीत. त्यामुळे तूर्त प्रथम वर्षाचे वर्ग हे ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. शासनाचे आदेश आल्यानंतर थेट शिक्षण सुरू केले जाईल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट यासह इतर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अजून सुरू आहे. ती संपल्यानंतर त्याचे प्रथम व द्वितीय सत्राचे स्वतंत्र वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.



#### या अभ्यासक्रमांचे वर्ग सुरू

एमएस्सी, एमकॉम, एमए, मेंटल मॉरल ॲण्ड सोशल सायन्स, एमए एज्युकेशन, बीएस्सी बीएड इंटिग्रेटेड, एमलीब, फाइन आर्ट, एमए जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन हे महाविद्यालयांमध्ये शिकवले जाणारे वर्ग सुरू होतील. तर पुणे विद्यापीठात शिकवले जाणारे एमएस्सी, एमटेक, एमकॉम, एमबीए एक्झिकेटीव्ह, एमबीए (फार्मा बीटी), एमए, मेंटल मॉरल ॲण्ड सोशल सायन्स, एलएलएम, एमए एज्युकेशन, बीएस्सी बीएड इंटिग्रेटेड, एमलीब, फाइन आर्ट, एमए जर्नालिझम ॲण्ड मासकम्युनिकेशन आणि एमए योगा अभ्यासक्रम ऑनलाइन सुरू होणार आहेत.

**प्रथम सत्र**
**२८ जानेवारी ते २२ मे**

**दुसरे सत्र**
**१५ जून ते १ ऑक्टोबर**

Sakaal 28.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## उच्च शिक्षणातील कालमर्यादेची चौकट संपुष्टात

### 'श्रेयांक बँक' संकल्पना पुढील वर्षापासून : विषय, कालावधी निवडीचे विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : पदवीसाठी तीन वर्षे, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी दोन वर्षे अशा उच्चशिक्षणातील कालमर्यादेच्या चौकटी आता संपुष्टात येणार आहेत. विद्यार्थी विविध विषयांचे श्रेयांक साठवून त्यानुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी हे शिक्षणाचे वेगवेगळे टप्पे आता पूर्ण करू शकतील. श्रेयांक साठवण्यासाठी 'श्रेयांक बँके'ची संकल्पना पुढील वर्षापासून अमलात आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मसुदा तयार केला आहे.

उच्च शिक्षणातील प्रमाणपत्रापासून ते पीएच.डीपर्यंतचे वेगवेगळे अभ्यास टप्पे पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना आता ठरावीक *(पान १० वर)*

सध्या ढोबळपणे पदवी अभ्यासक्रम तीन वर्षे, पदव्युत्तर अभ्यासक्रम दोन वर्षे अशा कालमर्यादेच्या चौकटी आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमांत ठरावीक वर्षात, ठरावीक विषय शिकण्याचेही बंधन आहे. आता विद्यार्थी त्यांना हवे ते विषय निवडून त्याचे श्रेयांक मिळवू शकतील. प्रत्येक विषयाचे श्रेयांक

**काय होणार?**

मिळवण्यासाठी ठरावीक तास शिक्षण पूर्ण करणे, प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक आहे. श्रेयांक बँकेतील खात्यात विद्यार्थी त्यांचे श्रेयांक जमा करू शकतील. प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अशा प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित करण्यात आलेले श्रेयांक खात्यात साठल्यावर विद्यार्थी त्यांच्या गरजेनुसार त्यांचा वापर करू शकतील. एका विषयाचे श्रेयांक सात वर्षांपर्यंत विद्यार्थ्यांना वापरता येऊ शकतील. त्याचप्रमाणे एका विषयाचे श्रेयांक एका टप्प्यासाठी वापरल्यास ते दुसऱ्या टप्प्यासाठी वापरता येणार नाहीत.

लोकसत्ता Thu, 28 January 2021
https://epaper.loksatta.com/c/58021466

## उच्च शिक्षणातील कालमर्यादेची चौकट संपुष्टात

*(पान ३ वरून)* कालमर्यादेचे बंधन राहणार नाही. हवे ते विषय शिकून त्याचे श्रेयांक विद्यार्थी साठवू शकतील. साठवलेले श्रेयांक गरजेनुसार वापरून वेगवेगळ्या टप्प्यातील शैक्षणिक मान्यता मिळवण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना मिळणार आहे. एका विषयाचे श्रेयांक विद्यार्थी सात वर्षांपर्यंत वापरू शकणार आहेत. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदीनुसार 'शैक्षणिक श्रेयांक बँक' (अ‍ॅकॅडमिक क्रेडिट बँक) स्थापन करण्यासाठी आयोगाने मसुदा केला आहे. त्यामुळे विषय निवडीचे आणि कालमर्यादा निवडण्याचे स्वतंत्र्यही विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

**विषय निवडीचे स्वातंत्र्य** : विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय आणि संस्था निवडण्याचे स्वातंत्र्य मिळू शकणार आहे. त्यासाठी विद्याशाखांचे बंधन असणार नाही. 'श्रेयांक बँके'शी जोडल्या गेलेल्या कोणत्याही संस्थेत विद्यार्थी शिकू शकतील. ज्या विद्यापीठात विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली असेल तेथील अभ्यासक्रम आराखड्यानुसार ५० ते ७० टक्के श्रेयांक आणि इतर विद्यापीठ किंवा संस्थेतून ३० ते ५० टक्के श्रेयांक विद्यार्थी मिळवू शकतील. एखाद्या विशिष्ट विद्याशाखेतील पदवी मिळवण्यासाठी त्या शाखेतील महत्त्वाच्या विषयांचे श्रेयांक मिळवणे बंधनकारक असेल. पदवी घेण्यासाठी पुरेसे श्रेयांक आहेत. परंतु ते एका कोणत्याही विशिष्ट शाखेतील नाहीत अशा विद्यार्थ्यांना पदवी हवी असल्यास 'लिबरल आर्टस'मधील पदवी देण्यात येईल.

कोणत्याही टप्प्यावर शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी मिळवलेल्या श्रेयांकानुसार प्रमाणपत्र किंवा पदविका मिळू शकेल. येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२१-२२) श्रेयांक बँक स्थापन होणार असून राष्ट्रीय मूल्यांकन आणि श्रेयांकन प्रणालीकडून (नॅक) 'अ' श्रेणी मिळालेले महाविद्यालय किंवा विद्यापीठाला या योजनेत सहभागी होता येईल.

> "विद्यार्थ्यांना कोणताही विषय, कुठेही शिकण्याचे आणि त्यासाठी कालावधीही ठरवण्याचे स्वातंत्र्य 'अ‍ॅकॅडमिक क्रेडिट बँक' या योजनेच्या माध्यमातून मिळणार आहे. देशाच्या उच्चशिक्षणातील येऊ घातलेल्या बदलांची ही नांदी आहे. या योजनेत सहभागी होऊनही त्याचे नियम न पाळणाऱ्या संस्थांवर कारवाईची तरतूदही मसुद्यात आहे.
>
> - डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

लोकसत्ता Thu, 28 January 2021
https://epaper.loksatta.com/c/58021772

# News Paper Clippings During January 2021

## Section: Education

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । शुक्रवार, २९ जानेवारी २०२१ ३

### अकरावी प्रवेशाची अखेरची संधी

**६९ हजार २३६ विद्यार्थ्यांचे ऑनलाइन प्रवेश**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इयत्ता अकरावी प्रवेशासाठी तीन नियमित आणि दोन विशेष फेऱ्या संपल्यानंतर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी राबविण्यात येत असून, आतापर्यंत ६९ हजार २३६ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. अकरावी प्रवेशासाठी आता शेवटचे दोन दिवस राहिले असल्याने, इच्छुकांनी प्रवेश घेण्याचे आवाहन अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून करण्यात आले आहे.



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील ३०४ ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी यंदा एक लाख दोन हजार ७०२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ८६ हजार ८२३ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज भरून लॉक केले आहेत. अर्ज लॉक केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८६ हजार ६२४ विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणीही झाली आहे. त्यापैकी ६९ हजार २३६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, ३७ हजार ८५४ जागा प्रवेशासाठी अद्यापही रिक्त आहेत.

अकरावी प्रवेशप्रक्रियेत तीन नियमित आणि दोन विशेष फेऱ्या संपल्यानंतर उर्वरित जागांवरील प्रवेशासाठी १३ ते ३० जानेवारी दरम्यान 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वानुसार प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे जवळपास सात गटांत विभाजन करण्यात आले आहे. यातील सातव्या गटाची प्रवेशप्रक्रिया आज २९ आणि ३० जानेवारी रोजी राबविण्यात येणार आहे. त्यानंतर सर्वसाधारण अंतिम रिक्त जागांचा तपशील ३१ जानेवारीला जाहीर होणार आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशासाठी आता शेवटचे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत.

### Last FYJC admission round today, 37k seats still vacant

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The last round of admissions to first-year junior colleges in Pune and Pimpri Chinchwad municipal corporation areas will begin on Friday.

The admissions which are online on a first-come first-served mode will be open to all students who have passed their standard X examination as well as those with ATKT (Allowed To Keep Term).

Of the seats in 304 colleges available, 69234 admissions have been confirmed against an intake of 1,07,090 seats leaving 37,856 seats vacant in the junior colleges.

The centralised admission process committee had conducted three regular rounds and two special rounds before throwing open the admission process on a first-come first-served basis.

However, even in this process, admissions are done as per the merit of the students applying in each college, officials added.

Meena Shendkar, assistant director of Pune division, said, "Students who have passed class X or have been allowed to keep term (failed in maximum two subjects in class X) can apply in this round. This is the last round and the admission process will stop with this round. *Hence we appeal to students to take admissions to whichever college is allotted to them.* They need to first check the updated vacancy list which will be available tomorrow and then check whether the college they are applying to has vacant seats or not before filling in the options form."

The students can apply for allotment on January 29 between 10am and 8pm. They would get allotment as per their merit and they need to proceed for admission and confirm it by January 30, the notification said.

All FYJC students from the state board, irrespective of their admission status, began online classes from November 2. The directorate of education had roped in 80 teachers from different colleges to roll out the classes online for three hours every day.

**THE FINAL PICTURE**



Pic for representational purpose

| | Round | Available Seats | Eligible Students | Allotted | Admitted | Vacancy |
|---|---|---|---|---|---|---|
| Regular | 1 | 90,806 | 68,072 | 40,013 | 22,544 | 68,262 |
| | 2 | 68,262 | 46,794 | 23,120 | 9,585 | 58,677 |
| | 3 | 58,677 | 33,661 | 12,461 | 3,842 | 54,835 |
| Special | 1 | 54,835 | 20,347 | 17,722 | 14,345 | 40,490 |
| | 2 | 40,490 | 8,419 | 5,555 | 3,477 | 37,013 |
| First-Come First-Served | | | | | | |
| | 1 | 37,013 | 0 | 28 | 26 | 36,987 |
| | 2 | 36,987 | 0 | 421 | 397 | 36,590 |
| | 3 | 36,590 | 0 | 1,083 | 935 | 35,655 |
| | 4 | 35,655 | 0 | 1,727 | 1,457 | 34,198 |
| | 5 | 34,198 | 0 | 1,528 | 1,356 | 32,842 |
| | 6 | 32,842 | 0 | 1,511 | 1,378 | 31,464 |

The Times of India 29.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# मराठी भाषेसाठी विद्यापीठात स्वतंत्र केंद्र

## केंद्राद्वारे साहित्य, संस्कृती अभ्यासासह व्यावसायिक भाषाव्यवहाराला प्राधान्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, संवर्धन आणि विकासासाठी स्वतंत्र राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांची संकुल प्रणालीमध्ये पुनर्रचना करताना हे स्वतंत्र केंद्र स्थापन करण्याच्या मराठी विभागाच्या प्रस्तावाला कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी अनुकूलता दर्शवली आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पुढाकार घेऊन विद्यापीठात संकुल प्रणाली अवलंबली आहे. या अंतर्गत शैक्षणिक विभागांची विद्याशाखांनिहाय संकुलांमध्ये पुनर्रचना करण्यात येत आहे. त्यात मराठी भाषेसाठी स्वतंत्र राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव

> **नव्या शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांची भूमिका महत्त्वाची आहे. भाषांसह संस्कृतीही येते. त्यामुळे मराठीसाठीचे स्वतंत्र केंद्र नक्कीच उपयुक्त ठरेल.**
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विभागप्रमुख डॉ. प्रभाकर देसाई यांनी मांडला आहे. 'मराठी भाषा साहित्य, संस्कृती, संवर्धन व विकास केंद्र' असे नाव असलेल्या केंद्राच्या माध्यमातून मराठी भाषा व साहित्य अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, पद्धतीविकास आणि प्रशिक्षण, बोली भाषांचा अभ्यास, ज्ञानभाषा निर्मिती प्रकल्प, भाषा प्रमाणीकरण, ई संसाधनांची निर्मिती, अमराठी भाषकांसाठी मराठीचे प्रशिक्षण, लोकसाहित्याचा अभ्यास, अनुवाद अभ्यास अशा एकूण पंधरा विषयांवर काम करण्यात येईल.

केंद्राबाबत विभागप्रमुख डॉ. प्रभाकर देसाई म्हणाले, की सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थापना मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी झाली आहे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणात मातृभाषेतील शिक्षणावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे मराठी भाषेचे स्वतंत्र संकुल आणि राष्ट्रीय केंद्र असे दोन प्रस्ताव देण्यात आले होते. त्यापैकी राष्ट्रीय केंद्रासाठी अनुकूलता दर्शनविण्यात आली आहे. त्यामुळे विविध विद्याशाखांचे अभ्यासक्रम मराठीतून निर्माण करण्यासह विविध प्रकल्प केंद्राद्वारे राबवले जातील. संकुल प्रणालीअंतर्गत मराठी भाषा विभागाला जोडून हे स्वतंत्र अभ्यास केंद्र स्थापन स्थापन करता येईल.

लोकसत्ता Fri, 29 January 2021
https://epaper.loksatta.com/c/58058657

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# बदलत्या काळानुसार शिक्षकांनाही नवे प्रशिक्षण

## यूजीसीकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** बदलत्या काळानुसार शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'मेंटरशिप ऑफ टीचर्स इन नॉन टेक्निकल स्ट्रीम' या मार्गदर्शक सूचना तयार के ल्या आहेत. मूलभूत संवादकौशल्ये, अध्यापन पद्धतींपासून बौद्धिक संपदा, संशोधन आणि नवसंकल्पना, हरित आणि शाश्वत तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण अशा विविध घटकांचा त्यात समावेश असून, या मार्गदर्शक सूचनांच्या मसुद्यावर ६ फेब्रुवारीपर्यंत हरकती आणि सूचना नोंदवता येणार आहेत.

> शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होत असल्याने शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. सध्या रिफ्रेशर कोर्स वगैरे होतात, पण शिक्षकांना त्यांची बदलती भूमिका समजावून सांगितली पाहिजे. त्यासाठीच मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येत आहेत.
>
> – डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, यूजीसी

नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे. प्रादेशिक भाषांतून शिकवण्याची क्षमता विकसित करण्यासाठी राष्ट्रीय प्रशिक्षण मोहीम (नॅशनल मिशन फॉर मेंटरिंग), नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम स्थापन करण्याबाबत नव्या शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीने प्रा. ए. सी. पांडे यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती नियुक्त करून शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठीच्या मार्गदर्शक सूचना तयार के ल्या आहेत. त्यानुसार शिक्षकांना आठ आठवड्यांचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. नव्या प्रशिक्षणात शिक्षकांना मूलभूत संवाद कौशल्ये, अध्यापन यासह संशोधन आणि नवसंकल्पना, प्रकल्प नियोजन आणि व्यवस्थापन, व्यवसायाधारित संशोधन, बौद्धिक संपदा अधिकार, संस्थात्मक व्यवस्थापन आणि उद्योजकता यासह उदयोन्मुख अध्यापन पद्धती, अध्ययन विश्लेषण, अभ्यासक्रम निर्मिती, आभासी शिक्षण, विदा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण, हरित आणि शाश्वत तंत्रज्ञान अशा विविध घटकांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मार्गदर्शक सूचनांचा मसुदा यूजीसीने संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. तसेच, त्यावर ६ फेब्रुवारीपर्यंत हरकती आणि सूचना नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लोकसत्ता Sat, 30 January 2021
https://epaper.loksatta.com/c/58072791

# प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याबाबत कुलगुरूंची राज्यपालांकडे मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** राज्यातील उच्च शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांतील वर्ग प्रत्यक्ष सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी असूनही राज्य शासनाच्या परवानगीशिवाय महाविद्यालये सुरू करता येत नाहीत. विद्यार्थीही महाविद्यालये सुरू करण्याची मागणी करत असून, महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी देण्याची मागणी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे शुक्रवारी केली. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्देश दिले असून विद्यापीठांनी प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याबाबत पुढाकार घ्यावा, असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूबरोबर दूरचित्रसंवादाद्वारे बैठक घेतली. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता या वेळी उपस्थित होते. विद्यापीठांचे २०२०-२१ या शैक्षणिक सत्रातील प्रत्यक्ष वर्ग सुरू करणे, विद्यापीठांतील रिक्त पदांची स्थिती, विद्यापीठांचे वार्षिक लेखापरीक्षण याबाबत आढावा घेण्यासाठी ही बैठक झाली.

राज्यातील पाचवी ते आठवीचे वर्ग सुरू झाल्याचे वर्तमानपत्रांतून कळते. अशा वेळी महाविद्यालये आणि विद्यापीठांतील वर्ग प्रत्यक्ष सुरू न होणे विसंगत वाटते. विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष सुरू करून ऑनलाइन वर्ग घेतले जात आहेत. आता करोनाची परिस्थिती नियंत्रणात आल्याने विद्यापीठे, महाविद्यालयांनी वर्ग सुरू करण्याचा, पाळ्यांमध्ये चालवण्याचा विचार करावा. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालये सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले असल्याने विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे राज्यपालांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांची वसतिगृहे सुरू करण्याच निर्णय लवकर घेण्याची सूचनाहि राज्यपालांनी केली.

**पदभरतीला अनुमती देण्याची सूचना**

विद्यापीठांमध्ये संविधानिक पदांशिवाय शिक्षकांची व शिक्षकेत कर्मचाऱ्यांची जवळ जवळ ५० टक्के पदे रिक्त असल्याचे काही कुलगुरूंनी राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिले. रिक्त पदांमुळे विद्यापीठ प्रशासन चालवणे कठीण झाले असून तातडीने पदभरती करण्यास परवानगी देण्याची मागणीही कु लगुरूंनी के ली. य पार्श्वभूमीवर संविधानिक पदांच्य भरतीला परवानगी देण्याची सूचन राज्यपालांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाला केली.

लोकसत्ता Sat, 30 January 2021
https://epaper.loksatta.com/c/58071191

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## महाविद्यालयांबाबत लवकरच घोषणा

### उदय सामंत यांची माहिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत येत्या दोन-तीन दिवसांत निर्णय जाहीर केला जाईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. तर महाविद्यालये व शिक्षणसंस्था सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी असल्याचे कुलगुरूंनी राज्यपालांबरोबर झालेल्या बैठकीत स्पष्ट केले.

करोनाचा संसर्ग वाढल्याने मार्च २०२० पासून राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे बंद करण्यात आली. त्यानंतर ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले. मागील दोन-तीन महिन्यांपासून करोनाचा प्रादुर्भाव कमी होऊ लागल्यामुळे पहिल्या टप्प्यात २३ नोव्हेंबर २०२० पासून ९ वी ते १२ वीचे वर्ग सुरू करण्यात आले. त्यानंतर २७ जानेवारीपासून ५ वी ते ८ वीचे वर्ग सुरू करण्यात आले.

विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा अंतिम निर्णय लवकरत जाहीर केला जाईल. आरोग्य सुरक्षेची काळजी घेत लगेच पूर्ण क्षमतेने महाविद्यालये सुरू न करता पहिल्या टप्प्यात काही टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती असावी, असा विचार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी राज्यातील

लोकसत्ता Sat, 30 https:/,

---

लोकमत

## महाविद्यालये अजून सुरू का नाहीत?

### राज्यपालांच्या सरकारला कानपिचक्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील सर्व उच्च शिक्षण संस्था व महाविद्यालयांतील वर्ग त्वरित सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी आहे. विद्यार्थ्यांचीही तशीच मागणी आहे. मात्र सरकारच्या परवानगीशिवाय महाविद्यालये सुरू करता येत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष वर्ग त्वरित सुरू करण्याची विद्यापीठांना अनुमती द्यावी, अशी एकमुखी मागणी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंनी शुक्रवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली. महाविद्यालये सुरू न करण्याचा निर्णय विसंगत आणि विपरीत असल्याचे राज्यपाल म्हणाले.

राज्यपाल कोश्यारी यांनी शुक्रवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता तसेच राज्यातील सर्व २० विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.

आज इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग सुरू झाले असल्याचे वर्तमानपत्रांतून कळते. महाविद्यालये व विद्यापीठातील प्रत्यक्ष वर्ग सुरू न होणे विसंगत व विपरीत वाटते. विद्यापीठांनी आपली शैक्षणिक वर्षे अगोदरच सुरू केली आहेत व ऑनलाईन पद्धतीने वर्गदेखील होत आहेत. आता कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात येत आहे. अशा वेळी महाविद्यालयीन वर्ग सुरू करता येतील का किंवा पाळीमध्ये चालविता येतील का, याचा विद्यापीठांनी विचार करावा, असे राज्यपालांनी सांगितले. विद्यापीठ अनुदान आयोगानेही महाविद्यालय कसे सुरू करावे याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे विद्यापीठांनी वर्ग सुरू करण्याबद्दल आपण होऊन पुढाकार घेतला पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

विद्यापीठांमध्ये संवैधानिक पदांशिवाय शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जवळजवळ ५० टक्के पदे रिक्त असल्याचे काही कुलगुरूंनी राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिले.

#### रिक्त पदे भरण्याची अनुमती तत्काळ द्या : राज्यपाल



विद्यापीठांमधील अनेक पदे रिक्त असल्यामुळे प्रशासन चालविणे कठीण झाले आहे. त्यामुळे ही पदे भरण्याची अनुमती द्यावी, अशीही मागणी कुलगुरूंनी केली. या पार्श्वभूमीवर शासनाने विद्यापीठांना ही पदे तातडीने भरण्याची अनुमती द्यावी, अशी सूचना राज्यपालांनी केली. विद्यार्थ्यांची वसतिगृहे सुरू करण्याबाबतही लवकर निर्णय घ्यावा, असेही राज्यपालांनी सांगितले.

Pune Main
Page No. 4 Jan 30, 2021
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

**सामना**

# राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याची कुलगुरूंची मागणी

## राज्यपालांशी साधला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)- राज्यातील सर्व उच्च शिक्षण संस्था, पदवी महाविद्यालये व विद्यापीठे त्वरित सुरू करण्याची मागणी सर्व विद्यापीठाच्या कुलगुरूंनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली. महाविद्यालये सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी आहे. मात्र राज्य सरकारच्या परवानगीशिवाय महाविद्यालये सुरू करता येत नसल्याचे कुलगुरूंनी राज्यपालांसोबत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे पार पडलेल्या बैठकीत सांगितले.

राज्यातील विद्यापीठांमधील अनेक संविधानिक पदे रिक्त असल्यामुळे विद्यापीठ प्रशासन चालविणे कठीण झाले आहे. त्यामुळे ही पदे भरण्याची परवानगी द्यावी, अशी मागणीही या वेळी कुलगुरूंनी केली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता तसेच राज्यातील सर्व २० विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. विद्यापीठांचे २०२०-२१ या शैक्षणिक सत्रातील प्रत्यक्ष वर्ग सुरू करणे, विद्यापीठांमधील रिक्त संविधानिक पदांचा आढावा घेणे, सद्यस्थितीचा आढावा घेण्याकरिता राज्यपालांनी बैठकीचे आयोजन केले होते.

विद्यापीठांनी आपली शैक्षणिक वर्षे अगोदरच सुरू केली आहेत व ऑनलाईन पद्धतीने वर्गदेखील होत आहेत. आता करोना परिस्थिती नियंत्रणात येत आहे. अशा वेळी महाविद्यालयीन वर्ग सुरू करता येईल का? किंवा पाळीमध्ये चालवता येईल का? याचा विद्यापीठांनी विचार करावा, असे राज्यपालांनी सांगितले. विद्यापीठ अनुदान आयोगानेदेखील महाविद्यालये कशी सुरू करावीत याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे विद्यापीठांनी वर्ग सुरू करण्याबद्दल आपण होऊन पुढाकार घेतला पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले. राज्यातील सर्व विद्यापीठांनी आपापले लेखापरीक्षण नियमितपणे करून घ्यावे, अशीही सूचना राज्यपालांनी विद्यापीठांना केली.

### महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय लवकरच!

महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा आढावा घेण्यात आला आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांसाठी एसओपीदेखील तयार आहेत. येत्या दोन ते तीन दिवसांत राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

Pune Edition
Jan 30, 2021 Page No. 6
Powered by : eleletto.com

## परवानगीसाठी राज्यातील विद्यापीठांचे राज्यपालांकडे साकडे

# प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याची महाविद्यालयांची तयारी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९ -** राज्यातील सर्व उच्च शिक्षण संस्था व महाविद्यालयातील वर्ग त्वरित सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी आहे. मात्र, शासनाच्या परवानगीशिवाय तसे करता येत नाही. वर्ग सुरू व्हावेत अशी मागणी विद्यार्थीदेखील करीत आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याची विद्यापीठांना अनुमती द्यावी, अशी मागणी राज्यातील सर्व विद्यापीठाच्या कुलगुरुंनी शुक्रवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली.




राज्यपाल कोश्यारी यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. त्यावेळी कुलगुरुंनी ही मागणी केली. बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता उपस्थित होते. राज्यपालांनी विद्यापीठाच्या सद्य:स्थितीचा आढावा घेतला.

राज्यातील विद्यापीठांमधील अनेक संविधानिक पदे रिक्त असल्यामुळे विद्यापीठ प्रशासन चालविणे कठीण झाले आहे. त्यामुळे ही पदे भरण्याची अनुमती द्यावी, अशीही मागणीही कुलगुरुंनी केली. या पार्श्वभूमीवर शासनाने विद्यापीठांना संविधानिक पदे तातडीने भरण्याची अनुमती द्यावी अशी सूचना राज्यपालांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला केली. विद्यार्थ्यांची वसतिगृहे सुरू करण्याबाबत लवकर निर्णय घ्यावा, असेही राज्यपालांनी सांगितले.

राज्यपाल म्हणाले, इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग सुरू झाले आहेत. अशावेळी महाविद्यालये व विद्यापीठातील प्रत्यक्ष वर्ग सुरू न होणे विसंगत व विपरीत वाटते. विद्यापीठांनी आपली शैक्षणिक वर्षे अगोदरच सुरू केली आहेत व ऑनलाइन पद्धतीने वर्गदेखील होत आहेत. आता करोना परिस्थिती नियंत्रणात येत आहे.

अशावेळी महाविद्यालयीन वर्ग सुरू करता येईल का किंवा पाळीमध्ये चालवता येईल का याचा विद्यापीठांनी विचार करावा, असे राज्यपालांनी सांगितले. विद्यापीठ अनुदान आयोगानेदेखील महाविद्यालये कसे सुरू करावे याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे विद्यापीठांनी वर्ग सुरू करण्याबद्दल आपण होऊन पुढाकार घेतला पाहिजे, असे यावेळी राज्यपालांनी सांगितले.

प्रभात Sat, 30 January 2021
https://epaper.eprabhat.net/c/58075616

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# कुलगुरूंनो, कॉलेजे उघडा !

## पुढाकार घेण्याबाबत कुलपतींचीच सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सुरक्षित अंतराच्या नियमांचे पालन करून महाविद्यालये सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे महाविद्यालये खुली करण्यासाठी आता विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा,' अशी सूचना राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी राज्यातील कुलगुरूंना केली आहे. महाविद्यालये व विद्यापीठे पारंपरिक शिक्षणासाठी खुली करण्यासाठी कुलगुरूंनी कोश्यारी यांच्याकडे धाव घेतली आहे.



### 'संविधानिक पदे तातडीने भरा'

राज्यातील विद्यापीठांमधील अनेक संविधानिक पदे रिक्त असल्यामुळे विद्यापीठाचे कामकाज, प्रशासन चालविणे कठीण झाले आहे. त्यामुळे ही पदे भरण्याची अनुमती द्यावी, अशीही मागणी या वेळी कुलगुरूंनी केली. या वेळी राज्य सरकारने विद्यापीठांना संविधानिक पदे तातडीने भरण्याची अनुमती द्यावी, अशी सूचना कोश्यारी यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव गुप्ता यांना केली आहे. विद्यापीठांमध्ये संविधानिक पदांशिवाय प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जवळजवळ ५० टक्के पदे रिक्त असल्याचे काही कुलगुरूंनी राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिले.

कोश्यारी यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. त्या वेळी ते बोलत होते. राज्य सरकारचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाविद्यालये खुली करण्याबाबत उत्सुक नसताना कोश्यारी यांनी विद्यापीठे-महाविद्यालये खुली करण्याबाबत सूचना केल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्यातील वाद पुन्हा पेटण्याची शक्यता आहे. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओमप्रकाश गुप्ता; तसेच राज्यातील सर्व २० विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.

विद्यापीठांचे २०२०-२१ या शैक्षणिक सत्रातील प्रत्यक्ष वर्ग सुरू करणे, विद्यापीठांमधील रिक्त संविधानिक पदांचा आढावा घेणे; तसेच विद्यापीठांच्या वार्षिक लेखा परीक्षणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्याकरिता राज्यपालांनी बैठकीचे आयोजन केले होते.

उच्चशिक्षण संस्था व महाविद्यालयांच्या वर्गातील शिक्षण सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी आहे. मात्र, सरकारच्या परवानगीशिवाय वर्गखोल्यांमधील शिक्षणासाठी विद्यापीठे-महाविद्यालये सुरू करता येत नसल्याचे चित्र आहे; तर महाविद्यालयातील वर्ग त्वरित सुरू करावेत, अशी मागणी विद्यार्थी करीत आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष वर्ग त्वरित सुरू करण्याची विद्यापीठे व महाविद्यालयांना अनुमती द्यावी, अशी एकमुखी मागणी कुलगुरूंनी कोश्यारी यांच्याकडे केली होती.

त्यावर कोश्यारी म्हणाले, 'इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग उत्साहात सुरू झाले असल्याचे वर्तमानपत्रातील बातम्यांमधून समजले. अशा वेळी महाविद्यालये व विद्यापीठातील प्रत्यक्ष वर्ग सुरू न होणे विसंगत वाटते. विद्यापीठांनी आपली शैक्षणिक वर्षे यापूर्वीच सुरू केली असून, ऑनलाइन पद्धतीने वर्गदेखील होत आहेत. आता करोनाची परिस्थिती नियंत्रणात येत आहे. अशा वेळी महाविद्यालयीन वर्ग सुरू करता येईल का किंवा शिफ्टमध्ये चालवता येईल का, याचा विद्यापीठांनी विचार करावा. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे वर्ग सुरू करण्याबद्दल विद्यापीठांनी पुढाकार घेतला पाहिजे.'

विद्यार्थ्यांची वसतिगृहे सुरू करण्याबाबतही लवकर निर्णय घ्यावा, अशाही सूचना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केल्या.

Maharashtra Times 30.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# महाविद्यालयांवरून राजकीय 'शाळा'

## राज्यपालांची भूमिका स्वीकारण्याची मागणी

पुणे, ता. ३० : अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यावरून राज्यपाल आणि राज्य सरकार एकमेकांच्या विरोधात उभे होते. आता महाविद्यालये सुरू करण्याच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राजकीय 'शाळा' केली जात आहे. विद्यार्थी संघटनांनी राज्य सरकारने राज्यपालांची भूमिका स्वीकारून महाविद्यालये सुरू केली पाहिजेत, अशी भूमिका घेतली आहे, तर सरकार महाविद्यालये सुरू करण्याच्या तयारीत असताना राज्यपाल श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक घेऊन महाविद्यालये सुरू करण्याबाबत भूमिका ऐकून घेतली. त्यानंतर कोश्यारी यांनी त्यांची भूमिका मांडली. "शाळा सुरू झाल्या असताना महाविद्यालये सुरू न होणे हे विसंगत वाटत आहे. कोरोनाची स्थिती नियंत्रणात येत असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिलेल्या नियमाप्रमाणे महाविद्यालये सुरू करता येतील का, याचा विचार केला पाहिजे," अशी सूचना त्यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ११ जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला होता; पण उच्च शिक्षण संचालकांनी पत्र पाठवून त्यावर खुलासा करण्यास सांगितल्याने विद्यापीठाचा निर्णय वादात सापडला. त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी

पान ६ वर »

"शाळा, मंदिर, लोकल, उद्याने यांसह सर्व काही सुरू झाले आहे; पण महाविद्यालये सुरू केली जात नाहीत. कोरोना फक्त महाविद्यालयांमधूनच पसरतो का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने राज्यपालांची भूमिका स्वीकारून त्वरित महाविद्यालये सुरू करावीत.
-स्वप्नील बेगडे, प्रदेश मंत्री, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

"राज्यपाल आणि उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांची भूमिका पूर्णपणे वेगळी आहे; पण राज्यपालांची भूमिका विद्यार्थी हिताची असेल, तर ती सरकारने स्वीकारली पाहिजे. एकीकडे राज्य सरकारमधील काँग्रेसचे मंत्री शाळा सुरू करत आहेत, तर सामंत महाविद्यालये सुरू करण्यास विरोध करत आहेत. हे योग्य नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान करू नये.
-ॲड. सिद्धार्थ इंगळे, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टुडंट युनियन

"उच्च तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन तसेच सुरक्षेच्या उपाययोजना करून महाविद्यालये सुरू करणार आहेत. त्यासाठी तयारीही सुरू आहे; पण राज्यपाल नेमकी आताच भूमिका घेऊन महाविद्यालये सुरू करण्याचे श्रेय घेत आहेत. ज्यावेळी विद्यार्थी भीतीच्या वातावरणात होते, तेव्हा राज्यपाल कुठे होते?
-किरण साळी, पुणे शहर उपप्रमुख, शिवसेना

# महाविद्यालयांवरून राजकीय 'शाळा'

» पान १ वरून

महाविद्यालये सुरू करण्यासाठी अभ्यास सुरू असल्याचे सांगितले होते. त्याचवेळी राज्यपालांनी घेतलेल्या बैठकीमुळे पुन्हा एकदा महाविद्यालये सुरू करण्याचा मुद्दा चर्चेत आला आहे.

पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या मुद्द्यावरून राज्यपाल आणि राज्य सरकारची भूमिका एकमेकांच्या विरोधात होती. त्यामुळे विद्यापीठांच्या स्वायत्ततेचा मुद्दा चर्चेला आला होता. आता महाविद्यालये सुरू करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे राज्यपालांनी सांगितल्याने पुन्हा एकदा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

Sakaal 31.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## प्रत्येक महाविद्यालयाचे २०२२ पर्यंत मूल्यांकन

### मूल्यांकनात किमान अडीच गुणांचे उद्दिष्ट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रत्येक महाविद्यालयाने मूल्यांकन करणे बंधनकारक केलेले असतानाही अनेक महाविद्यालयांनी मूल्यांकन केलेले नाही. मात्र आता यूजीसीने २०२२ पर्यंत प्रत्येक महाविद्यालयाचे मूल्यांकन करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून मूल्यांकनात किमान अडीच गुण आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयांनी पुढे येऊन मूल्यांकन करून घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

शिक्षण प्रणालीमध्ये मूल्यांकन ही आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त प्रक्रिया आहे. त्यामुळे यूजीसीने २०१२ मध्ये अधिसूचनेद्वारे प्रत्येक महाविद्यालयाला मूल्यांकन बंधनकारक केले आहे. त्यात दर सहा वर्षांनी मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे. यूजीसीने महाविद्यालयांच्या मूल्यांकनाबाबतचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

देशभरातील प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेचे २०२२ पर्यंत मूल्यांकन आणि किमान अडीच गुणांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २०१९ मध्ये 'परामर्श' ही योजना लागू करण्यात आली. त्या अंतर्गत १६७ महाविद्यालयांची मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली. देशभरातील अनेक संस्थांनी अद्याप मूल्यांकन करून घेतलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन मूल्यांकन करून घेणे आवश्यक असल्याचे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Sun, 31 January 2021 https://epaper.loksatta.com/

## परीक्षा ऑनलाइन घेण्याची मागणी

पुणे : करोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात, अशी मागणी नॅशनल स्टुडंट युनियन ऑफ इंडियाने (एनएसयूआय) केली आहे. शैक्षणिक सत्रही ऑनलाइन पार पडल्याने परीक्षासुद्धा ऑनलाइन घ्याव्यात, अशी भूमिका 'एनएसयूआय'ने मांडली आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात, अशा मागणीचे निवेदन 'एनएसयूआय'चे प्रदेशाध्यक्ष आमिर शेख आणि पुणे जिल्हाध्यक्ष भूषण रानभारे यांनी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना केली आहे.

यंदाच्या सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येईल, असे सूतोवाच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले आहे.

Maharashtra Times 31.1.2021

## *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# अब 2.5 से कम नैक स्कोर वाले विश्वविद्यालय, कॉलेज होंगे बंद

अमर उजाला ब्यूरो

**नई दिल्ली।** 2022 सत्र से 2.5 नैक स्कोर वाले विश्वविद्यालय और कॉलेज ही पढ़ाई करवा पाएंगे। नई शिक्षा नीति 2020 के तहत विश्वविद्यालय अनुदान आयोग (यूजीसी) ने उच्च शिक्षा की गुणवत्ता में सुधार के लिए नए व सख्त नियम तय कर दिए हैं। फिलहाल देशभर के 936 संस्थानों को एक साल में नैक मान्यता लेनी जरूरी होगी। यदि किसी संस्थान के पास 2.5 नैक स्कोर नहीं होगा तो ऐसे संस्थान बंद हो जाएंगे। विश्वविद्यालय अनुदान आयोग के सचिव प्रो. रजनीश जैन की ओर से सभी राज्यों और विश्वविद्यालयों समेत सभी उच्च शिक्षण संस्थानों को पत्र लिखा गया है। यूजीसी (मेनडेटिरी असेसमेंट एंड एक्रेडिएशन ऑफ हायर एजुकेशंन इंस्टीट्यूशन) रेग्युलेशन 2012 के तहत उच्च शिक्षण संस्थानों के लिए नैक मान्यता अनिवार्य कर दी गई है। इसके अलावा हर छह साल के बाद उन्हें मान्यता लेनी होगी। लिहाजा जिन संस्थानों ने नैक मान्यता के लिए आवेदन नहीं किया है, उनको प्रोत्साहित किया जा रहा है। इसके लिए बड़े विश्वविद्यालयों को उनका मेंटर बनाया गया है। करीब 167 विश्वविद्यालय मेंटर का काम कर रहे हैं।

### उच्च शिक्षा की गुणवत्ता में सुधार के लिए यूजीसी का नया और सख्त नियम

## नए तरीके से होगा आकलन

प्रो. जैन के मुताबिक, अभी तक उच्च शिक्षण संस्थानों को नैक एक्रेडिएशन जरूरी नहीं था। भारत में राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद (नेशनल असेसमेंट एंड एक्रेडिएशन काउंसिल) उच्च शिक्षण संस्थानों का आकलन और प्रत्यायन करके स्कोर जारी करती है। अभी तक यूजीसी द्वारा विभिन्न विश्वविद्यालयों के प्रोफेसर को मिलाकर एक कमेटी गठित कर दी जाती थी, जोकि विश्वविद्यालयों और कॉलेजों में शिक्षक, छात्र अनुपात, रिजल्ट, रिसर्च समेत अन्य मापदंडों के आधार नैक स्कोर करती थी। हालांकि भ्रष्टाचार की शिकायतों के बाद अब आईआईएम, आईआईटी जैसे संस्थानों को भी इसमें शामिल किया जा रहा है।

# News Paper Clippings During January 2021

## Section: Education

# मराठी मातीने दिला राजपथावर परेडचा सन्मान

## पुणे विद्यापीठाच्या तीन विद्यार्थिनींची प्रजासत्ताक दिनासाठी निवड

पुणे, ता. १ : 'इंजिनिअरिंग करताना दानपट्टा चालवायला शिकले, त्यानंतर ही कला मी जोपासली, सोबत लावणीही करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. या कला आपल्या मराठी मातीची ओळख आहे, त्याच मुळेच मला यंदा 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या (एनएसएस) माध्यमातून २६ जानेवारीला राजपथावर प्रजासत्ताक दिनानिमित्त संचलनात सहभागी होण्याचा सन्मान मिळाला आहे,'' असे राजश्री माने भरभरून सांगत होती.

### अशी होते निवड

केंद्र सरकारच्या युवा व खेल मंत्रालयातर्फे 'एनएसएस'च्या विद्यार्थ्यांची प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी निवड केली जाते. त्यामध्ये ३० गुण सांस्कृतिक सादरीकरण, ५० गुण संचलन आणि प्रत्येकी १० गुण हे मुलाखत आणि शारीरिक चाचणीसाठी असतात. यामध्ये राजश्री, सायली आणि जोत्स्ना तिघीही पात्र ठरल्या. या तिघींनी वैयक्तिक कला सादरीकरण केलेच. शिवाय सामूहिकपणे जोगवा आणि लावणी सादर केल्याने त्यांची निवड झाली.

बारामती येथील कमल नयन बजाज अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी राजश्री माने, लोणी (जि. नगर) येथील गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालयाची सायली चाहणकर आणि नाशिक येथील के. एस. के. डब्लू. महाविद्यालयाची जोत्स्ना कदम या तिघींचा राजपथावरील संचलनासाठी निवड झाली आहे. इतिहासात प्रथमच फक्त मुलीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

राजश्री, सायली आणि जोत्स्ना या तिघीही त्यांच्या महाविद्यालयामध्ये 'राष्ट्रीय सेवा योजना'च्या (एनएसएस) माध्यमातून विविध उपक्रमात सहभागी होत. राजपथावर भारताचे सैन्य वगळता इतर कोणालाही संचलनात सहभागी होता येत नाही. ती संधी केवळ 'एनएसएस' मधूनच मिळवता येत असल्याने तिघांनीही त्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. नोव्हेंबर महिन्यात हैदराबाद येथील पश्चिम क्षेत्र राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात त्यांनी शैक्षणिक गुणवत्तेसह, शारीरिक क्षमता सिद्ध केली. त्यातून पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.

पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई म्हणाले, ''यापूर्वी विद्यापीठाचे विद्यार्थी पथसंचलनात सहभागी झाले आहेत, परंतु यंदा प्रथमच तिन्ही मुलींचाच समावेश असल्याने ही अभिमानाची बाब आहे. इतर मुलींसाठी ही प्रेरणादायी घटना आहे.''



राजपथावर संचलन करताना त्यात परेड कमांडर म्हणून माझी निवड व्हावी यासाठी दिल्लीत पूर्ण क्षमतेने सरावात भाग घेणार आहे. तसेच राष्ट्रपती भवन येथे होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात कार्यक्रमात दानपट्टा चालविण्याची इच्छा आहे.
- राजश्री माने, विद्यार्थिनी



राजपथावर संचलनात सहभागी व्हावे हे लहानपणापासून वाटत होते, महाविद्यालयात आल्यानंतर 'एनएसएस'मध्ये सहभागी झाल्याने माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळेच आता ही संधी निर्माण झाली आहे.
- सायली चाहणकर, विद्यार्थिनी



मी घेत असलेले शिक्षण आणि आपली संस्कृती याबद्दल निवड समितीने प्रश्न विचारले. योगासने करून दाखविली, महाराष्ट्राची लावणी आणि जोगवा आम्ही उत्तमप्रकारे सादर केला. त्यामुळे ही दुर्मीळ संधी मिळाली. या संधीचे आता सोने करायचे.
- जोत्स्ना कदम, विद्यार्थिनी

Sakaal 2.1.2021

# कॉलेजमध्येच ड्रायव्हिंगचा अभ्यास

मटा विशेष

## 'ऑप्शनल' विषयाबाबत विद्यापीठाला प्रस्ताव

Kuldeep Jadhav
@timesgroup.com
Tweet : @KuldeepJadhavMT

### ड्रायव्हिंग स्किल्सला 'क्रेडिट पॉइंट'

कॉलेजमध्ये अनेक अभ्यासक्रमांत सध्या 'क्रेडिट बेस्ड' पद्धतीचा अवलंब केला जात आहे. यात विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी ठरावीक 'क्रेडिट पॉइंट' गरजेचे असतात. त्यात 'ड्रायव्हिंग स्किल' विषयाला 'क्रेडिट पॉइंट' निश्चित करून विद्यार्थ्यांना तो वैकल्पिक विषयाचा पर्याय द्यावा, असे प्रस्तावात नमूद केले आहे. अनेक महाविद्यालये विद्यार्थ्यांना संगणकाची अद्ययावत कौशल्ये, मुलाखतीचे तंत्र, भाषा कौशल्य, सॉफ्ट स्किल्स असे कोर्स करायला सांगतात आणि ते उपलब्धही करून देतात. त्याच धर्तीवर या संस्थांनी ड्रायव्हिंग स्किल्सचे धडे द्यावेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

" विद्यार्थ्यांना वाहन चालविण्याचे तांत्रिक ज्ञान आणि कायद्याचे ज्ञान कॉलेजमध्ये दिले जावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठ, शिक्षण विभागाने त्यास सकारात्मक प्रतिसाद दिल्यास परिवहन विभाग, वाहतूक पोलिस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक पाठबळ दिले जाईल.
- संजय ससाणे,
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

### 'रोजगारासाठीही उपयोग'

'व्यावसायिक दृष्टिकोनातून ड्रायव्हिंग कौशल्याचा विचार करणे गरजेचे आहे. ई-कॉमर्स कंपन्यांपासून खाद्यपदार्थांची घरपोच डिलिव्हरी करण्यापर्यंतच्या क्षेत्रात हजारो तरुण कार्यरत आहेत. सध्या घरपोच वितरणाला महत्त्व दिले जात असून, या क्षेत्रात अधिक रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे. क्रेन, व्होल्वो बस, ट्रक यांसारख्या वाहनांना 'ड्रायव्हिंग'सह तांत्रिक ज्ञानाची गरज असते. त्यामुळे रोजगार निर्मितीसाठीसुद्धा ही कौशल्ये अंगीकारणे गरजेचे आहे,' असे मत संजय ससाणे यांनी व्यक्त केले.

पुणे : 'वाहनाच्या तांत्रिक माहितीपासून ते चालविण्यापर्यंतचे शास्त्रशुद्ध शिक्षण महाविद्यालयीन स्तरावरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे. त्यासाठी अभ्यासक्रमात वैकल्पिक (ऑप्शनल) विषय म्हणून 'ड्रायव्हिंग स्किल्स' या विषयाचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन विभागाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि शिक्षण विभागाला पाठविला आहे. येत्या काही दिवसांत परिवहन अधिकारी विद्यापीठातील विभागप्रमुखांना याबाबतचे प्रेझेंटेशनही देणार आहेत.

देशातील वाहतुकीची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. रस्ते अपघात आणि प्रदूषणाच्या समस्येसह बेशिस्त वाहनचालक हीसुद्धा डोकेदुखी आहेच. त्यामुळे चांगले चालक घडविण्याची गरज निर्माण झाली आहे. कौशल्याधारित चालकांना नोकरीच्या संधीही उपलब्ध असून, त्यासाठीही या शिक्षणाचा उपयोग होईल, असे परिवहन विभागातील अधिकाऱ्यांचे मत आहे. त्यामुळे 'आरटीओ'तील अधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाला, विद्यापीठाला याबाबतचा प्रस्ताव पाठवला आहे, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय ससाणे यांनी 'मटा'ला दिली.

Maharashtra Times 7.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

# विद्यार्थ्यांतील उद्योजकतेला वाव

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व डीसीएफ व्हेंचर यांच्यामध्ये करार

पुणे, ता. १६ : विद्यार्थ्यांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी, तसेच त्यांना योग्य मार्गदर्शनासह यशस्वी होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'रिसर्च पार्क फाउंडेशन' आणि 'डीसीएफ व्हेंचर' यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नवे स्टार्टअप सुरू करण्यापासून, त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. यातून पुण्यात रोजगार निर्मितीस हातभार लागणार आहे.

'रिसर्च पार्क फाउंडेशन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद शाळिग्राम आणि 'डीसीएफ व्हेंचर'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मी पोटलुरी यांनी या करारावर स्वाक्षरी केली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रसेनजीत फडणवीस, डॉ. अपूर्वा पालकर, डॉ. दीपक माने आदी उपस्थित होते. रिसर्च पार्क फाउंडेशन हे उद्योग आणि शैक्षणिक संस्थांना जोडण्याचे आणि विद्यार्थ्यांमधील संशोधनाला चालना देण्याचे काम करते. व्यावहारिक अनुभव आणि संभाव्य रोजगारासाठी कौशल्य वाढवण्यासाठीही प्रयत्न केला जातो. विद्यापीठाने 'डीसीएफ व्हेंचर'बरोबर करार केल्याने विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे.



पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डीसीएफ व्हेंचर यांच्यात सामंजस्य करार झाला. या वेळी (डावीकडून) डॉ. अपूर्वा पालकर, डॉ. अरविंद शाळिग्राम, डॉ. नितीन करमळकर, लक्ष्मी पोटलुरी, प्रसेनजीत फडणवीस, डॉ. दीपक माने.

'डीसीएफ व्हेंचर' हे मुंबईतील फाउंडेशन आहे. नवसंशोधनासाठी मार्गदर्शन, तसेच राज्य सरकार, शिक्षण संस्था यांच्यासमवेत विकास आणि संशोधन प्रकल्पावर ते काम करते. नवसंशोधनासाठी धोरण ठरविणे, परदेशी संस्थांबरोबर करार करून विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचे कामही या फाउंडेशनकडून केले जाते. या कराराद्वारे विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकास आणि उद्योजक बनू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टार्टअपसाठी सक्षम करण्यासाठी उपक्रम राबविले जाणार आहेत.

शाळिग्राम म्हणाले, "फाउंडेशन आणि डीसीएफ व्हेंचर यांच्यातील करारामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळेल. या व्हेंचरबरोबर काम करणाऱ्या उद्योजकांच्या अनुभवाची जोड नव्या स्टार्टअपसाठी मिळेल. यातून तरुण उद्योजक निर्माण होण्याबरोबरच रोजगार निर्माण होण्यास मदत होईल."

पोटलुरी म्हणाल्या, "रिसर्च पार्क फाउंडेशन हे संशोधन आणि उद्योजकता विकास आणि विद्यापीठाला प्रथम पाच नावीन्यपूर्ण भारतीय विद्यापीठांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. तसेच स्टार्टअप आणि उद्योगासाठी जागतिक स्तरावरील संशोधन सुविधा निर्माण करण्यासाठी पावले उचलत आहेत. या सामंजस्य करारानुसार त्यांच्या या प्रयत्नांना आणखी बळ मिळणार आहे."

### विद्यार्थ्यांना होणार लाभ

1. विद्यापीठाबरोबर आणि डीसीएफ व्हेंचर्स नेटवर्कमधील गुंतवणूकदारांशी नव्या स्टार्टअपला जोडून देणे. (इन्व्हेस्टर कनेक्ट प्रोग्रॅम).
2. उद्योजकतेच्या विविध पैलूंशी संबंधित विविध कौशल्ये देण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार.
3. परदेशातून होणाऱ्या वस्तूंची आयात कमी होण्यासाठी विद्यार्थ्यांची विचारधारा तयार करणे, तसेच आयातीला पर्यायी (इंपोर्ट सबस्टिट्यूट) वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आदी उपक्रम या करारामुळे शक्य होणार.

"विद्यापीठातील विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेवर आमचा विश्वास आहे. 'डीसीएफ व्हेंचर'ची क्षमता आणि त्यांचे जागतिक स्तरावरील उद्योग, नवउद्योजक, तज्ज्ञांचे नेटवर्क याचा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी फायदा होणार आहे. या करारामुळे घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण व्यवसाय निर्माण करण्यासाठी कौशल्य देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**"पुणे विद्यापीठाचे नाव हे संशोधन आणि शैक्षणिक गुणवत्तेसाठी आघाडीवर आहे. आम्ही एसपीपीयू आणि त्याच्या विद्यार्थ्यांसह कार्य करण्यास उत्सुक आहोत आणि यशस्वी स्टार्टअप सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ या कराराच्या माध्यमातून मिळेल. विद्यार्थ्यांनी नोकरी करण्यापेक्षा 'नोकरी देणारे' व्हावे, या उद्देशातून फाउंडेशन काम करीत आहे.**

– लक्ष्मी पोटलुरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, डीसीएफ व्हेंचर

Sakaal 17.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

## SPPU and Deccan College to launch PGD course on Buddhist heritage and tourism

**ANJALI MARAR**
PUNE, JANUARY 17

THE SAVITRIBAI Phule Pune University (SPPU) and Deccan College Post Graduate and Research Institute will jointly roll out a first-of-its-kind course in India on Buddhist heritage and tourism. The universities plan to increase the popularity of Buddhist heritage sites like the Ajanta and Ellora caves.



**One of the aims of the SPPU course it to increase popularity of Buddhist heritage sites like the Ajanta and Ellora caves.** *File*

Last week, an MoU was inked between the heads of the two institutions - *Prof Nitin Karmalkar, Vice-Chancellor, SPPU and Prof Prasad Joshi, Vice-Chancellor (Acting) of Deccan College.*

The one-and-a-half-year-long postgraduate diploma (PGD) course is unique as it combines Buddhist heritage, history and culture with tourism. The course will commence from 2021 - 2022 and graduates from all faculty are eligible to apply. The PGD degree will be awarded by SPPU.

"Students will be required to undertake an entrance test where their knowledge on basic Buddhist literature, heritage sites, history and culture will be tested. The present course intake has been decided at 30, excluding foreign nationals," said Prof Mahesh Deokar, head, Department of Pali at SPPU.

Buddhist Literature and Philosophical Heritage, History of Buddhism in Asia, Buddhist Virtual Art, Architecture of world Buddisht Heritage sites, Buddhist Pilgrimage and sites in India, Living Buddhist Cultural Heritage, Fundamentals of Tourism, Tourism and Heritage Studies will be the broad topics covered during the three-semester programme. Faculty from the Department of Pali, SPPU and visiting scholars from Deccan College will take the lectures.

"We aim to introduce students to the history of Buddhism in India and Asia, its heritage and literature and also the world Buddhist heritage circuits with special focus on Indian sites. The Ajanta and Ellora caves are popular among visitors. But there are similar and equally magnificent Buddhist heritage sites in Andhra Pradesh, Odisha, Gujarat, Madhya Pradesh and Maharashtra which are not very well known even today," said Dr Shrikant Ganvir, assistant professor in Ancient Indian History and Culture, at the Deccan College.

Tourism is one of the largest employers both globally and in India. This course, experts say, will be a platform for budding tourist guides who can specialise in working at Buddhist heritage sites in India and abroad.

"More often than not, tourists and visitors from Buddhist-majority countries like China, Japan, Sri Lanka and Thailand do not get to learn about Buddhism or its history when they visit Indian sites. Through internships and training in tourism management, we hope to prepare students for the tourism industry, especially for Buddhist heritage sites," added Ganvir.

The two institutions plan to also offer hands-on training by arranging internships and workshops. "We are planning to bring industry experts and tie up with tourism sector departments of the government so that students get to learn on the job. This could include joining ongoing projects and field work to heritage sites," said Deokar.

The Indian Express 18.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Education

लोकमत

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची रासेयोच्या पुरस्कारावर मोहोर

### पुणे विद्यापीठासह, कार्यक्रम समन्वयक व अधिकाऱ्यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुरस्कारावर यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपला ठसा उमटवला असून तब्बल पाच पुरस्कार पटकावले आहेत. त्यात सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचा, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयकाचा तसेच सर्वोत्तम कार्यक्रम अधिकारी या पुरस्कारांचा समावेश आहे. निस्वार्थ भावनेने काम केलेल्या पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची सुध्दा पुरस्कारासाठी निवड केली आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत २०१९-२० मध्ये निस्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगिकृत कामात प्रोत्साहन मिळावे. तसेच निस्वार्थ भावनेतून केलेल्या सेवेचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे विविध पुरस्कार दिले जातात. सर्वोत्कृष्ठ विद्यापीठ पुरस्कारासाठी पुणे विद्यापीठ, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ. प्रभाकर देसाई यांची निवड झाली आहे. सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कासाठी विद्यापीठाशी संलग्न नाशिक जिल्ह्यातील कर्मवीर शांतारामबापू कोंडोजी वावरे महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी रवींद्र अहिरे यांची निवड केली आहे. अहिरे यांच्या वावरे महाविद्यालयाचीच सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाच्या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. तर आकुर्डी येथील रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील मनोज गुंजाळ या विद्यार्थ्याची सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून पुरस्कारासाठी निवड केली आहे.

## शासकीय कार्यालयांसाठी मिळणार या तीन सुट्या

**पुणे** : राज्य शासनाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी सन-२०२१ या वर्षासाठी पुणे जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांसाठी स्थानिक सुट्या जाहीर केल्या असल्याचे सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त संतोष पाटील यांनी सांगितले. गुरुवार (दि. ७ ऑक्टोबर, घटस्थापना), मंगळवार (दि. २ नोव्हेंबर, धनत्रयोदशी), मंगळवार (दि. ३० नोव्हेंबर, आळंदी यात्रा) या तीन दिवशी स्थानिक सुट्या जाहीर केल्याचेही परिपत्रकात नमूद केले आहे

Pune Main
Page No. 2 Jan 22, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Sports

पुढारी

# क्रीडा संकुलाच्या वाढीव शुल्कात बदल करणार

## क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरियांचे आश्वासन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांमध्ये खेळ भावना विकसित व्हावी, खेळाच्या कौशल्यपूर्ण सरावातून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू तयार होण्यासाठी तालुका ते विभागीय क्रीडा संकुलांची उभारणी करण्यात आली. वाढीव क्रीडा शुल्कास लगाम घालून खेळाडूंना न्याय दिला जाईल, तसेच मुलींना नाममात्र शुल्क आकारले जाईल, असे आश्वासन क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरीया यांनी दिले आहे.

म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात अमरावती शारीरिक शिक्षण महामंडळ व राज्य क्रीडा शिक्षक महासंघ यांची बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला उपसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक अनिल चोरमले, सहायक संचालक सुहास पाटील, विजय संतान, अरुण पाटील यांसह संघटनेचे दत्तात्रय हेगडकर, महादेव फाफाळ, बाबूराव दोडके, शेखर कुदळे आदी उपस्थित होते. दरम्यान, फिट इंडियाअंतर्गत शाळांच्या नोंदणीची मुदत वाढविण्यात आली असून, सर्व शाळांनी नोंदणी करण्याचे आवाहन ही याप्रसंगी करण्यात आले.



**क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरियांसोबत आयोजित बैठकीत चर्चा करताना पदाधिकारी.**

क्रीडा आयुक्तांसोबत मैदाने - कोर्ट वापराच्या वाढीव शुल्क आकारणीसंदर्भात व खेळाडूव्यतिरिक्त इतरांना आरक्षित करण्यात आलेल्या मैदानावरील वेळेबाबत तसेच फिट इंडिया उपक्रमाच्या यशस्वी आयोजन व वाढीव कार्यभार, बीपीएड-एमपीएड-एनआयएस बेरोजगार युवकांना क्रीडा प्रशिक्षक नियुक्ती देणेबाबत महामंडळाचे सहसचिव शिवदत्त ढवळे यांनी माहिती दिली. खेळाडू शिष्यवृत्तीतील वाढ, पंच मानधन, खेळाडू अपघात विमा, खेळाडू दैनिक भत्त्यात वाढ, ग्रामीण क्रीडा स्पर्धा पुन्हा सुरू करणे, क्रीडा परीषदेवर ५० टक्के शिक्षक व संघटना प्रतिनिधी घेण्यात यावे, या मागण्या महासंघाचे राज्याध्यक्ष राजेंद्र कोतकर यांनी याप्रसंगी मांडल्या.

आठवीपर्यंतच्या खेळाडूंना मैदानावरील प्रवेशशुल्क व फी माफी अमंलबजावणीबाबत सहसचिव विलास घोगरे यांनी बाजू मांडली, तर क्रीडा स्पर्धा विषयी महामंडळाचे निवृत्ती काळभोर व फिरोज शेख यांनी काही सुधारणा सूचविल्या. खेळाडूंसाठी मैदाने खुली करण्यासंदर्भात दिरंगाई होत असून लवकरात लवकर मैदाने खुली करावीत, याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली. बैठकीत सर्व मागण्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

My Pune Edition
Jan 14, 2021 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Research

## गोगलगाय गिळणाऱ्या सर्पाचा शोध

### अरुणाचल प्रदेशातील घनदाट जंगलात अभ्यासादरम्यान संशोधन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २ -** अरुणाचल प्रदेश येथील घनदाट जंगलामधील जैवविविधतेचा अभ्यास करताना, पुण्यातील वन्यजीव संशोधक गौरांग गोवंडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्पाच्या नवीन प्रजातींचा शोध लावला आहे. या संशोधन कार्यात हर्षल भोसले, पुष्कर फणसळकर, मंदार सावंत, हर्षिल पटेल आणि झीशन मिर्झा यांचा समावेश आहे. नुकतेच त्यांचे गोगलगाय गिळणाऱ्या सापाच्या नवीन प्रजातीबाबतचे संशोधन 'युरोपियन जर्नल ऑफ टॉक्सोनॉमी' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रकाशित झाले.

'अरुणाचल येथील घनदाट सदाहरित जंगलात आढळलेल्या सापाच्या या नवीन प्रजातीचे नाव वन्यजीव चित्रपटनिर्माता संदेश कदूर यांच्या नावावर ठेवले आहे. जास्त करून झाडांवर आढळणारा या सापाची दात आणि मानेची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. याठिकाणी साप, पाल, सरड्यांच्या आणखीही काही प्रजाती असून, त्याबाबत अधिक संशोधन आवश्यक आहे. आगामी काळात आम्ही याबाबत अधिक संशोधन करणार आहोत', असे असे मत गोवंडे यांनी सांगितले. या संशोधनाबाबत गोवंडे यांनी दैनिक 'प्रभात'शी संवाद साधला.

संशोधनाबाबतचा अनुभव सांगताना गोवंडे म्हणाले, 'या प्रदेशात संशोधन करताना, सर्वाधिक अडथळा असतो तो येथील वातावरणाचा अतिशय तीव्र स्वरूपाचे वातावरण असल्यामुळे अनेकदा संशोधन कार्य मध्येच थांबवावे लागते. याशिवाय, बऱ्याचवेळा रात्रीच्या वेळीच संशोधनासाठी जंगलात फिरावे लागते, अशावेळी अधिक काळजी घेऊन काम करावे लागते.'

#### नॅचरल सायन्सेस, भारतातील संधी

गोवंडे म्हणाले, नॅचरल सायन्सेस म्हणजेच पर्यावरणाशी निगडित विषयांचा अभ्यास. इतर देशांच्या तुलनेत आपणही या विषयात चांगली प्रगती केली असून, संशोधनासाठी आवश्यक तंत्रज्ञान आणि साधने यांची मुबलक उपलब्धता आपल्याकडे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्राचाही विचार करावा. आपल्याकडे आयसर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस यासारख्या काही महत्त्वपूर्ण संस्था आहेत. ज्याठिकाणी नॅचरल सायन्सेस हा अभ्यासक्रम अतिशय चांगल्याप्रकारे शिकविला जातो. या व्यतिरिक्त केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या माध्यमातून संशोधनासाठी विविध संस्थांमध्ये आवश्यक सोयी-सुविधा आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. यामध्ये जेनेटिक्स, मायक्रोसिटी स्कॅनिंग यासारख्या पद्धतींचा समावेश असतो. भारतासारख्या देशात जिथे जैवविविधतेचा प्रचंड खजिना आहे, शाश्वत विकासासाठी प्रयत्न सुरू आहेत, अशा ठिकाणी पर्यावरण अभ्यासक्रम आणि संशोधनासाठी चांगल्या संधी उपलब्ध असून, विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे सकारात्मकतेने पाहण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.



३/१/२०२१ प्रभात

Prabhat 3.1.2021

## अंदमान-निकोबार बेटांवर ऑर्किडच्या २ प्रजातींचा शोध

#### टीममध्ये पुण्यातील संशोधकाचा समावेश

प्रभात वृत्तसेवा



ल्युइसिया डिग्लिप्पुरेन्सिस



ल्युइसिया जरावना

पुणे, दि. ६ - अंदमान-निकोबार बेटांवर 'ऑर्किड'च्या दोन नवीन प्रजातींचा शोध लावण्यात संशोधकांना यश मिळाले आहे. या संशोधनात भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्थेच्या (बीएसआय) संशोधकांचाही सहभाग होता. तुलनेने कमी प्रमाणात ज्ञात असलेल्या अंदमान-निकोबार बेटांवरील जैवविविधतेच्या अभ्यासासाठी हा एक महत्त्वाचा शोध मानला जातो.

सापडलेल्या नवीन प्रजाती या 'ल्युइसिया' प्रजातील असून, अनुक्रमे 'ल्युइसिया डिग्लिप्युरेन्सिस' आणि 'ल्युइसिया जरावना' असे नामकरण करण्यात आले आहे. या संशोधनात 'बीएसआय' येथील वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. जीवन जलाल, संजय मिश्रा, लालजी सिंघ आणि विवेक पौलोझ हे सहभागी होते. 'ल्युइसिया डिग्लिप्युरेन्सिस' ही वनस्पती जुलै ते सप्टेंबरदरम्यान, तर 'ल्युइसिया जरावना' ही वनस्पती जून ते ऑगस्टदरम्यान आढळते.

या शोधाबाबत डॉ. जलाल म्हणाले, 'या दोन्ही ऑर्किड प्रजातींची रचना आतापर्यंत आढळलेल्या ऑर्किड फुलांपेक्षा वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. जैवविविधतेच्या दोन हॉटस्पॉटदरम्यान आढळणारी या बेटांवर अजूनही अनेक प्रकारच्या वनस्पती प्रजाती आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी याठिकाणी अजून खोलवर संशोधन करणे गरजेचे आहे.' संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार, अंदमान-निकोबार बेटे येथे ऑर्किडच्या एकूण १५८ प्रजाती आढळतात. त्यापैकी २३ प्रजाती या 'इंडेमिक' म्हणजेच स्थानिक स्वरुपातील प्रजाती आहेत. बेटांच्या चहुबाजूंनी असलेला समुद्र आणि याठिकाणी असणारे 'एक्सट्रिम वेदर' म्हणजेच अतिशय टोकाचे हवामान या दोन्हींचा प्रभाव येथील वनस्पतींवर होत असून, याबाबत अधिक अभ्यासाची आवश्यकता संशोधकांनी व्यक्त केली आहे.

Prabhat 7.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Research

# 'पानिपत'चा चित्रमय इतिहास

## मनोज दाणी यांचे संशोधन; 'बॅटल ऑफ पानिपत'ची निर्मिती

**पुणे :** मराठ्यांच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या पानिपतच्या लढाईचा थरार दुर्मीळ चित्रांद्वारे उलगडण्यात आला आहे. पानिपतच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या जगभरातील अनेक संग्रहालयातील चित्रे एकत्र करून इतिहास अभ्यासक मनोज दाणी यांनी 'बॅटल ऑफ पानिपत' (इन लाइट ऑफ रिडिस्कव्हर्ड पेंटिंग्ज) या पुस्तकाची निर्मिती केली आहे. १७व्या आणि १८व्या शतकात काढण्यात आलेली ही चित्रे 'पानिपत'च्या वास्तवावर प्रकाश टाकणारी ठरणार आहेत.

येत्या १४ जानेवारीला पानिपतच्या रणसंग्रमाला २५९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर दाणी यांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. पुस्तकात बिब्लिओथिक नॅशनल डी फ्रान्स, ब्रिटिश लायब्ररी, दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालय, अमेरिकेचे बोनहॅम संग्रहालय आणि पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळातील पानिपतावर आधारित दुर्मीळ चित्रांचा समावेश केला आहे. पानिपत रणसंग्रामाबद्दलच्या मिथकांना छेद देणारी आणि वास्तवाजवळ जाणारी ही चित्रे असल्याचा दावा, दाणी यांनी केला आहे. या चित्रांमध्ये अहमद शाह अब्दाली, सदाशिवराव भाऊ, नजीब खान रोहिल्ला, दत्ताजी शिंदे, विश्वासराव पेशवे, सूरजमल जाट आणि इतर मराठा, अफगाण, रोहिल्ला आणि जाट अशा लढवय्या सरदारांच्या चित्रांचा समावेश केला आहे. दिल्लीच्या संग्रहालयात उपलब्ध असलेल्या 'ताजुक-ए-असफिया' या हस्तलिखितातील पानिपताला समर्पित केलेली काही चित्रेही या पुस्तकाचा भाग आहेत.

या चित्रांतून तत्कालीन स्थापत्यशास्त्र, कला, वेशभूषा, आभूषणे या माहितीवर प्रकाश टाकण्यात आला असून, आतापर्यंत पानिपतच्या इतिहासावर आलेल्या ग्रंथांत ही बाब क्वचितच आढळत असल्याचे दाणी यांनी सांगितले आहे.



### पुस्तकातील महत्त्वाच्या बाबी...

- अमेरिका, फ्रान्स, दिल्ली, पुणे, लंडन येथील संग्रहालयातील चित्रांचे संकलन व अभ्यास.
- सदाशिवरावभाऊ, अहमदशाह अब्दाली, विश्वासराव यांच्या चित्रांचा समावेश.
- पानिपतच्या कालखंडातील स्थापत्यशास्त्र, कला, वेशभूषा याचा अभ्यास.
- पानिपतच्या अनेक मिथकांवर पुस्तकात परखड भाष्य.
- पानिपतावरील संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प.

**"मराठी माणसासाठी पानिपतची लढाई हा कायमच अस्मितेचा विषय राहिला आहे. या लढाईबद्दल आजही अनेक समज-गैरसमज आहेत. ते दूर करण्यासाठी या चित्रांची मदत होईल, असा विश्वास आहे. लढाईच्या काही वर्षांनंतर ही चित्रे रेखाटली गेल्याने ती त्या वेळच्या वास्तवाच्या जवळ जाणारी आहेत. त्यामुळेच पुढील अभ्यासाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.**

– **मनोज दाणी**, इतिहास अभ्यासक

Maharashtra Times 11.1.2021

## *News Paper Clippings During January 2021*

Section: Research

# पाच नद्यांच्या माहात्म्याची दुर्मीळ हस्तलिखिते उपलब्ध

**विद्याधर कुलकर्णी, लोकसत्ता**

**पुणे :** भीमा, कृष्णा, गोदावरी, तापी आणि पयोष्णी या पाच नद्यांचे माहात्म्य कथन करणारी दुर्मीळ हस्तलिखिते मराठी हस्तलिखित केंद्राकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. या पाच नद्यांच्या १३ माहात्म्यांचा यामध्ये समावेश आहे. या माहात्म्यांच्या आधारे अमेरिकेच्या अरिझोना विद्यापीठातील डॉ. ॲन फेल्डहाऊस यांनी संशोधन ग्रंथाचे लेखन केले असून डॉ. विजया देव यांनी 'नदीचे स्त्रीत्व' हे त्याचे मराठी रूपांतर केले आहे.

या हस्तलिखितांपैकी कृष्णा माहात्म्य हे स्कंद पुराणातील मूळ संस्कृत तर, भीमा माहात्म्य हे पद्म पुराणातील मराठी ओवीबद्ध माहात्म्य आहे. स्कंद नारद संवादे अशी सुरुवात असलेल्या कृष्णा माहात्म्याचे ६० अध्याय आहेत. मूळ संस्कृत हस्तलिखित सखाराम विठ्ठल चाफळकर यांनी शके १८०७ मधील कार्तिक शुद्ध द्वादशी या तिथीला वाई येथील विराज वैभव छापखान्यामध्ये छापून घेतले आहे. कृष्णा माहात्म्याची किंमत दीड रुपये होती, अशी माहिती दुर्मीळ हस्तलिखितांचे अभ्यासक वा. ल. मंजूळ यांनी दिली.



भीमा माहात्म्यातील चित्र

भीमा माहात्म्य सचित्र असून त्यावर काळाचा उल्लेख नाही. ब्रह्मदेव आणि नारद संवादातून भीमा माहात्म्य निर्माण झाले आहे. भीमाशंकर डोंगरावर शंकराने त्रिपुरासूराचा वध केला. त्यावेळी अंगातून निघालेल्या घामाने भीमा नदी जन्माला आली, अशी आख्यायिका सांगितली जाते. रघुवंशातील भीमरथ राजाने या नदीमध्ये स्नान करून मोक्ष मिळविला. त्यामुळे भीमा नदी भीमरथी झाली. पुढे इंद्रायणी, मुळा-मुठा संगम, नीरा नरसिंहपूर, कृष्णा, माण अशा नद्यांना भेटत कृष्णेच्या रूपाने समुद्राला मिळाली. पंढरपूर येथे या नदीला पुष्पावती आणि कुंडल तीर्थ मिळतात, असे भीमा माहात्म्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. या माहात्म्यातील ३५ व्या अध्यायात 'वि म्हणजे विज्ञान ठ म्हणजे अज्ञान आणि ल म्हणजे दूर करी म्हणोनि विठ्ठल माझे नाव' अ म्हटले आहे, याकडे मंजूळ यांनी लक्ष वेधले.

या माहात्म्यांच्या आधारे डॉ. ॲन फेल्डहाऊस यांनी संशोधन ग्रंथाचे लेखन केले आहे. त्याचा डॉ. विजया देव यांनी 'नदीचे स्त्रीत्व' ह मराठी अनुवाद केला आहे.

डॉ. देव यांनी पाच नद्यांची माहात्म्ये कथन करणारी १३ दुर्मीळ हस्तलिखिते मराठी हस्तलिखित केंद्राकडे नुकतीच सुपूर्द केली आहेत, असे मंजूळ यांनी सांगितले.

लोकसत्ता Wed, 13 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57704135

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Research

## नष्टप्राय पक्षी आढळल्याने निसर्गप्रेमींमध्ये उत्साह

# इंदापूर तालुक्यात दुर्मीळ 'इजिप्शियन गिधाड'

**तानाजी काळे, लोकसत्ता**



> पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात मागील तीन-चार वर्षांमध्ये इजिप्शियन गिधाड हा पक्षी तुरळक प्रमाणामध्ये आढळून आला होता. उजनी धरणाच्या परिसरात पुणे जिल्ह्याच्या पूर्व बाजूला इंदापूर तालुक्यात तो यापूर्वी कधी दिसला नाही. परंतु या वर्षी उजनी जलाशयाच्या प्रदेशात त्याचे आगमन झाले आहे. उजनी पाणवठ्यावरील पक्षी पाहण्याबरोबरच आता इंदापूर तालुक्यातील गवताळ प्रदेशातही पक्षिनिरीक्षण करण्याचा आनंद मिळेल. मात्र आपल्याकडील थंडी संपताच या पक्षाचे पुन्हा अन्यत्र स्थलांतर होण्याची शक्यता आहे.
>
> - अजिंक्य घोगरे, पक्षिमित्र

**इंदापूर :** नष्टप्राय श्रेणीतील पक्ष्यांच्या यादीत समावेश असलेले 'इजिप्शियन गिधाड' इंदापूर तालुक्यातील भिगवण-कळस भागाच्या गवताळ प्रदेशात हौशी पक्षी निरीक्षकांना आढळून आले आहे. गिधाडांच्या अनेक जाती, प्रजाती नष्टप्राय श्रेणीत जात असताना हे गिधाड आढळल्याने इंदापूर तालुक्यातील पक्षी जगतात एका दुर्मीळ पक्ष्यांची नोंद झाली असून, त्यामुळे हौशी पक्षिनिरीक्षक व निसर्गप्रेमींचा उत्साह वाढला आहे.

इंदापूर तालुक्यातील उजनी जलाशयालगत यंदा नेपाळी गरुडांच्या संख्येतही वाढ होत असल्याचे अनुमान, पक्षिनिरीक्षकांकडून व्यक्त होत असून उजनी धरणाच्या पाणवठ्यावरून पक्षिनिरीक्षकांनी इंदापूर तालुक्यातील भिगवण, कळस, पळसदेव परिसरातील गवताळ प्रदेशात पक्षी निरीक्षणासाठी आपला मोर्चा वळवला आहे. अनेक कारणांनी गिधाडांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. हे गिधाड मेलेल्या प्राण्यांचे मांस व हाडाच्या आतील भाग खात असल्याने, निसर्गातील स्वच्छतादूत म्हणून त्यांचे निसर्ग साखळीत महत्त्वाचे स्थान मानले जाते. १९८५ च्या पूर्वी महाराष्ट्रात विविध जातींच्या गिधाडांची संख्या लक्षणीय होती. मात्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनावरांना दिलेल्या काही औषधांच्या प्रभावामुळे औषधांचा वापर करण्यात आलेले जनावरे मृत पावल्यानंतर त्यांचे मांस गिधाडांनी खाल्ल्यास गिधाडे मृत्युमुखी पडतात. याच कारणामुळे भारतात गिधाडांची संख्या कमी झाली असल्याचे अनुमान व्यक्त होत आहे.

इजिप्शियन गिधाडाला पांढरे गिधाड म्हणूनही ओळखतात. आकाराने जरा लहान असलेल्या गिधाडाचे डोके पिसेविरहित व पिवळसर आहेत. उड्डाण पिसे काळसर, लांबट व टोकदार असतात. ही जात आता नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे अनुमान वर्तवण्यात येत आहे. सौंदर्याने कुरूप असलेला हा पक्षी मृतकभक्षक असल्यामुळे सामाजिक स्तरावर उपेक्षितच राहिला. आता तर त्याचा नष्टप्राय होत असलेल्या पक्ष्यांच्या यादीत समावेश झाला आहे. आतातरी गिधाडांच्या संवर्धनासाठी सर्व थरातून सामूहिक प्रयत्न होण्याची गरज व्यक्त होत आहे.

लोकसत्ता Fri, 29 January 2021
https://epaper.loksatta.com/c/58061383

# शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांकडून महत्त्वपूर्ण संशोधन

**कोल्हापूर, दि. २९ (प्रतिनिधी)** - शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी स्तनांच्या कर्करोगाबाबत सर्वसामान्य पेशींना अपाय न करता केवळ कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करणाऱ्या औषधाविषयी यशस्वी संशोधन केले असून नुकतेच त्याचे भारतीय पेटंट या शास्त्रज्ञांना प्राप्त झाले आहे. रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक डॉ. गजानन राशिनकर आणि त्यांचे विद्यार्थी डॉ. प्रकाश बनसोडे यांनी ही बहुमोल कामगिरी केली आहे.



डॉ. राशिनकर डॉ. बनसोडे

या संशोधनाविषयी माहिती देताना डॉ. गजानन राशिनकर म्हणाले, काही दशकांमध्ये जगभरात तसेच भारतातही कर्करोगाच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेषतः महिलांमधील स्तनांच्या कर्करोगाचे प्रमाण खूप वाढले आहे. या कर्करोगामुळे महिलांचा जागतिक मृत्यूदर अधिक आहे. स्तनांचा कर्करोग हा जटील आजार आहे. सदर कर्करोगाच्या उपचारासाठी सर्जरी, केमोथेरपी, रेडिओथेरपी, अँटीबॉडीज अशा विविध प्रकारच्या उपचार पद्धती विकसित केल्या आहेत. परंतु या उपचार पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारादरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साईड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. तसेच कर्करोगावरील औषधांमध्ये आढळणाऱ्या प्रतिरोधामुळे (ड्रग रेजिस्टन्स) सातत्याने नवनवीन संशोधनातून विकसित केलेल्या औषधांची गरज भासत असते. शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागामध्ये यासंदर्भात महत्त्वपूर्ण संशोधन झाले असून नुकतेच या संशोधनाचे पेटंट प्राप्त झाले आहे.

### काय आहे संशोधन?

डॉ. राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बनसोडे यांनी 'सिंथेटिक स्टडीज इन न्यू अँटीकॅन्सर थेराप्युटिक्स' या विषयावर पीएचडीचे संशोधन केले. कर्करोगावरील केमोथेरपी उपचारांमध्ये चांदी, सोने व प्लॅटिनम या राजधातूंना त्यांच्या विशिष्ट जैविक गुणधर्मांमुळे विशेष महत्त्व आहे. परंतु या धातूंचे सामान्य पेशींवरही दुष्परिणाम होतात. तसेच कर्करोगावरील औषधेही सामान्य पेशी व कर्करोगाच्या पेशी यात फरक करण्यास असमर्थ ठरतात. यामुळे रुग्णांना केमोथेरपी उपचारांदरम्यान या औषधांच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. स्तनांच्या कर्करोगावर उपयुक्त टॅमॉक्सीफेन या औषधाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी व उपचाराची उपयुक्तता वाढविण्यासाठी फेरोसीन हा घटक वापरून फेरोसीफेन हे उपयुक्त औषध तयार करण्यात संशोधकांना यश आले आहे. फेरोसिन हा घटक मानवी शरीरास अपायकारक नाही, हे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. त्यामुळे फेरोसीनचा वापर करून स्तनांच्या कर्करोगावर अत्यंत प्रभावी व सुरक्षित औषध विकसित करता येईल या हेतूने डॉ. बनसोडे यांनी डॉ. राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली फेरोसीन लेबल्ड एन-हेटरोसायक्लिक कारबिन कॉम्प्लेक्स ऑफ सिल्वर, गोल्ड अँड प्लॅटिनम' या विषयावर संशोधन पूर्ण केले.

### संशोधनास भारतीय पेटंट प्राप्त

डॉ. राशिनकर यांनी या महत्त्वपूर्ण संशोधनाची भारतीय पेटंटसाठी नोंदणी केली होती. विविध स्तरांवरील शास्त्रीय व पेटंट कायदे विषयक परीक्षणानंतर भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने या संशोधनाचे पेटंट डॉ. गजानन राशिनकर व डॉ. प्रकाश बनसोडे यांना प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र दिले आहे.

प्रभात Sat, 30 January 2021
https://epaper.eprabhat.net/c/58084504

# News Paper Clippings During January 2021

## Section: Miscellaneous

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कलावैभवाकडे अक्षम्य दुर्लक्ष

# मराठेशाहीपासूनचा दुर्मीळ चित्रठेवा धूळ-बुरशीत खितपत

चिन्मय पाटणकर, लोकसत्ता

**पुणे :** स्कॉटलंडमधून आलेल्या जेम्स वेल्स या चित्रकाराने मराठेशाहीतील प्रमुख नेते सवाई माधवराव पेशवे, नाना फडणवीस आणि महादजी शिंदे पुणे दरबारात एकत्र असताना त्यांचे चित्र काढले. सुमारे सव्वादोनशे वर्षे जुने असलेले हे चित्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात धूळ आणि बुरशीच्या थराखाली गेले आहे. कोट्यवधी रुपये किमतीच्या या चित्रासह विद्यापीठाच्या संग्रहातील काही चित्रांची अवस्था दयनीय आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संग्रहात अनेक चित्रे आहेत. ही चित्रे *(पान ४ वर)*



**महत्वाची चित्रे**

- संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास, संत गाडगेबाबा
- स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, विष्णूशास्त्री चिपळूणकर, पेरियार, स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडिता रमाबाई, कर्मवीर भाऊराव पाटील, विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. मुकुंदराव जयकर
- विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत भारताची राणी असणारी अलेक्झांड्रा, तिचे पती सातवे एडवर्ड आणि मुंबई इलाक्यात त्यांचे प्रतिनिधी असणारे इंग्रज अधिकारी



epaper.loksatta.com
लोकसत्ता Sat, 02 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57442742

# मराठेशाहीपासूनचा दुर्मीळ चित्रठेवा धूळ-बुरशीत खितपत

*(पान ३ वरून)* विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत लावण्यात आली होती. मात्र विद्यापीठाच्या ब्रिटिशकालीन वास्तूच्या नूतनीकरणाचे काम बरीच वर्षे सुरू असल्याने ही चित्रे विद्यापीठ प्रशासनाने काढून ठेवली. बरीच वर्षे ही चित्रे पाहण्यात नसल्याने आज अनेकांना त्याबाबत माहिती नाही. या चित्रांचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व मोठे आहे. मात्र विद्यापीठ प्रशासनाकडून ही चित्रे अडगळीत ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी 'लोकसत्ता'ला दिली.

एकीकडे मराठा साम्राज्याच्या अभ्यासासाठी विद्यापीठाकडून स्वतंत्र केंद्र स्थापन केले जात असताना विद्यापीठाला स्वतःच्या संग्रहातील मौलिक चित्रठेवा योग्य रीतीने जपता आलेला नाही. काही चित्रांवर पाण्याचे ओघळ, धूळ आणि बुरशीचे थर साचले असल्याने हा दुर्मीळ चित्रठेवा धोक्यात आहे, असेही सूत्रांनी सांगितले.

**चित्रे खराब झाल्याने?**



नूतनीकरणाचे काम पूर्ण झाल्यावरही ब्रिटिश अधिकाऱ्यांची तैलचित्रे मूळ जागी लावलेली नसल्याबाबत लोकसत्ताने २०१८ मध्ये 'शिवाजी सभागृहातील सहा चित्रचौकटी रिकाम्याच' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते. त्या वेळी नूतनीकरण सुरू असल्याने चित्रे व्यवस्थित जपून ठेवण्यात आल्याचे कारण विद्यापीठाने दिले होते. आता त्या पुढे दोन वर्षे होऊनही चित्रचौकटी अजूनही रिकाम्याच आहेत. एकीकडे विद्यापीठ प्रशासन विद्यापीठाची इमारत ब्रिटिशकालीन असल्याचे मोठेपण मिरवत असताना, हेरिटेज वॉकसारखे उपक्रम राबवत असताना ब्रिटिश अधिकाऱ्यांची चित्रे मूळ जागी न लावण्यामागे खराब झालेली चित्रे हेच कारण आहे काय, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

विद्यापीठाकडे असलेली शस्त्रे, वस्तूंचे संग्रहालय केले आहे. त्या धर्तीवरच चित्रांचेही संवर्धन करून संग्रहालय करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने केल्या जातील. विद्यापीठाकडे असलेला हा चित्रठेवा महत्त्वाचा आणि अमूल्य आहे, याची जाणीव आहे.

– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sat, 02 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57441346

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

## कृष्णन यांचे चरित्र मराठीत

पुणे : सन १९७१च्या भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानी नौदलाची गाझी पाणबुडी बुडविण्यात मोलाची भूमिका बजावलेले माजी व्हाइस ॲडमिरल नीलकांत कृष्णन यांची शौर्यगाथा आता मराठीतूनही वाचता येणार आहे. त्यांच्या इंग्रजी आत्मचरित्राचा भूषण तळवलकर यांनी केलेला मराठी अनुवाद आता 'ॲमेझॉन किंडल'वर उपलब्ध झाला आहे.

ॲडमिरल कृष्णन यांनी दुसऱ्या महायुद्धादरम्यान सहा वर्षे घेतलेले सागरी युद्धाचे अनुभव, भारतीय नौदलाची उभारणी आणि १९७१च्या युद्धातील कामगिरीने त्यावर चढवलेला कळस हा कालखंड या आत्मचरित्रातून उलगडतो. सर्वाधिक पदकांनी सन्मानित असलेल्या अधिकाऱ्यांपैकी एक असलेले कृष्णन १९७१च्या युद्धादरम्यान नौदलाच्या पूर्व मुख्यालयाचे प्रमुख होते. गाझी पाणबुडी बुडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांचे आत्मचरित्र अत्यंत रोचक आणि रोमांचक आहे. १९७१च्या युद्धाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात त्याचे मराठी भाषांतर होणे औचित्यपूर्ण आहे, असे तळवलकर यांनी सांगितले. 'किंडल' डिव्हाइस, कम्प्युटर अथवा स्मार्टफोनवर हे पुस्तक वाचता येईल.

Maharashtra times 2.1.2021

## विद्यापीठ नामविस्ताराचा विसर

### दिशादर्शकांवर अद्याप 'पुणे विद्यापीठ'च; तातडीने सुधारणा करण्याची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे विद्यापीठाच्या नामविस्ताराचा महापालिका प्रशासनाला विसर पडला आहे. राज्य सरकारने 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' या नामविस्तारास मान्यता दिली. त्या गोष्टीला आता सहा वर्षे झाली असली, तरीही महापालिकेच्या दिशादर्शकांवर अद्याप 'पुणे विद्यापीठ' असाच उल्लेख आढळून येतो. त्यामुळे दिशादर्शकांवरील नावात सुधारणा केव्हा होणार, असा प्रश्न विचारण्यात येत आहे.

महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुणे शहरात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली होती. शिक्षण आणि विशेषतः स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन पुणे विद्यापीठाला 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असे नाव देण्याची मागणी केली जात होती. त्यासंबंधीचा प्रस्ताव विद्यापीठाच्या अधिसभेने मंजूर केला होता. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये नामविस्ताराच्या ठरावावर चर्चा झाली आणि 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असा ठराव एकमताने संमत करण्यात आला. त्यास जुलै २०१४ रोजी राज्य मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली. त्यानंतर राज्यपालांनी पुणे विद्यापीठाच्या नामविस्तार अध्यादेशावर सही केली आणि त्यांच्याच उपस्थितीत नऊ ऑगस्ट २०१४ रोजी नामविस्ताराचा सोहळा पार पडला. या गोष्टीला आता सहा वर्षे पाच महिने झाले आहेत.

प्रशासकीय कारभारात विद्यापीठाच्या नावाचा उल्लेख 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असाच केला जात आहे. मात्र, शहराच्या विविध भागांतील दिशादर्शक फलकांवर अद्यापही 'पुणे विद्यापीठ' असेच नमूद केल्याचे दिसते. बहुसंख्य दिशादर्शक फलक नामविस्तारानंतर बसविण्यात आलेले आहेत. तरीही त्यात महापालिकेकडून सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

उद्या, रविवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे. त्यानिमित्त नागरिकांनी या विसंगतीकडे लक्ष वेधले. विद्यापीठाकडे जाणारा गणेशखिंड रस्ता, सेनापती बापट रस्ता, औंध, बाणेर आणि पाषाणकडून येणाऱ्या रस्त्यांवर 'पुणे विद्यापीठ' असा उल्लेख आहे. चिपळूणकर रस्त्यावर (लॉ कॉलेज रस्ता) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या दारात महापालिकेचा दिशादर्शक फलक आहे. त्यावरदेखील 'पुणे विद्यापीठ' एवढाच उल्लेख आहे. केवळ विद्यापीठाच्या बाहेर आचार्य आनंदऋषीजी चौकात 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असा उल्लेख असलेला नामफलक आढळून आला. शहरातील, तसेच शहराबाहेरील नागरिकांना दिशादर्शक फलकावरून अर्थबोध होतो, त्यांची गैरसोय होत नाही. मात्र, नामविस्तार झाल्यानंतरही महापालिकेकडून त्याचा उल्लेख का केला जात नाही, असा प्रश्न विचारून यामध्ये तातडीने सुधारणा करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.




महापालिकेच्या दिशादर्शकांवर अद्याप 'पुणे विद्यापीठ' असाच उल्लेख आढळून येतो.

> पुणे विद्यापीठाचे नाव आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ झाले आहे, याचा विसर पुणे महापालिकेला पडला आहे. दिशादर्शक फलकांवर विद्यापीठाच्या संपूर्ण नावाचा उल्लेख असावा, यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा करू.
>
> \- पंढरीनाथ बनकर, शहराध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद

Maharashtra Times 2.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

» पत्रकार दिन विशेष

## रत्नागिरीत आढळली १४५ वर्षांपूर्वीची वृत्तपत्रे!

### १८७४चा 'जगन्मित्र', तर १९०९चा 'सत्यशोधक'

**अमित पंडित** : सकाळ वृत्तसेवा

**साखरपा, (जि. रत्नागिरी) ता. ५** : कनकाडीत तब्बल १४५ वर्षांपूर्वीची वृत्तपत्रे सापडली आहेत. ग्रामस्थ सरला पंडित यांच्या घरी 'जगन्मित्र' आणि 'सत्यशोधक' या दोन वृत्तपत्रांचे दोन अंक सापडले आहेत.

सरला पंडित (वय ९४) या रत्नागिरी येथे राहातात. नुकत्याच त्या त्यांच्या मुलींसह कनकाडी या त्यांच्या मूळ गावी आल्या होत्या. घराची साफसफाई करत असताना त्यांना एका ट्रंकेत वृत्तपत्राचे जुने अंक सापडले. यात 'जगन्मित्र'चे १८७४ आणि १८८० या सालातील तर 'सत्यशोधक'चे १९०९ आणि १९१६ सालचे अंक आहेत. दोन्ही वृत्तपत्रांचे वैशिष्ट्य म्हणजे वृत्तपत्रांचा अविभाज्य भाग असलेले संपादकीय त्यामध्ये नाही. बहुतांश मजकूरासोबत जाहिराती आहेत. 'सत्यशोधक' वृत्तपत्रात इंग्रजी आणि मराठी भाषांमधील वृत्ते एकत्रच छापलेली दिसतात.

या वृत्तपत्रात त्यावेळी सुरू असलेल्या युरोपमधील युद्धाचे वृत्त छापण्यात आलेले आहे. त्याचबरोबर पुण्यातील प्लेगची बातमीही वाचावयास मिळते. दुर्गम खेड्यात १५० वर्षांपूर्वी वृत्तपत्रे येत असल्यामुळे त्या काळातही वृत्तपत्रे लोकप्रिय होती, हे सिद्ध होते.

**एक दृष्टिक्षेप...**

- इंग्रजी आणि मराठी भाषांमध्ये मजकूर
- चार पानी, प्रत्येक पानावर चार कॉलम
- दीड शतकांनंतरही वाचता येते.
- दोन्ही वृत्तपत्रात संपादकीय नाही



'जगन्मित्र' आणि 'सत्यशोधक'चे अंक.

**'जगन्मित्र'मधील अक्षरछपाई मोडी लिपीच्या धर्तीवर**

'जगन्मित्र' वृत्तपत्र मराठीत आहे. पण या वृत्तपत्राची अक्षर छपाई मोडी लिपीच्या धर्तीवर आहे. वृत्तपत्रात दोन्ही अंकात शेवटच्या पानावर पर्जन्यकोष्टक छापण्यात आलेले आहे. काळाच्या ओघात या वृत्तपत्रांचा कागद पिवळा पडला असला तरी त्यावरील छपाई मात्र स्पष्ट वाचता येण्यासारखी आहे.

Sakaal 6.1.2021

## विद्यापीठाच्या जागेत सीएनजी पंप उभारण्याचा घाट

### जागेसाठी एमएनजीएलकडून राज्यपालांना पत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जागेत सीएनजी पंप उभारण्याचा घाट महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल) या कंपनीने घातला आहे. या सीएनजी पंपासाठी जागा मिळण्याबाबत एमएनजीएलकडून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पत्र देण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत प्रदूषण टाळण्यासाठी, कर्ब उत्सर्जन कमी होण्यासाठी सीएनजीच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. तसेच एमएनजीएलने सामाजिक उत्तरदायित्वाच्या निधीतून (सीएसआर) विद्यापीठाला गेल्या वर्षी दोन सीएनजी बस दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे शहर स्वच्छ आणि हरित करण्यासाठी, विद्यापीठातील कर्मचारी आणि पुणेकर नागरिकांच्या वाहनांसाठी सीएनजी पंप उभारण्यासाठी जागा मिळण्याबाबत एमएनजीएलकडून राज्यपालांना विनंती पत्र डिसेंबरमध्ये देण्यात आले आहे, असे एमएनजीएलच्या संकेतस्थळावर नमूद करण्यात आले आहे. मात्र विद्यापीठ हे शैक्षणिक संकु ल असल्याने विद्यापीठाच्या जागेत सीएनजी पंपाची उभारणी कशासाठी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एमएनजीएलचे संचालक राजेश पांडे म्हणाले, की पुणे शहरात मोठ्या प्रमाणात वाहने आहेत. त्यात बरीच वाहने सीएनजीवरील असल्याने सीएनजी पंपांची आवश्यकता आहे. सीएनजी पंपासाठी शासकीय जागा मिळण्याबाबत पीएमपीएल, पुणे महापालिका, राज्य शासन यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे. तसेच विद्यापीठात जागा मिळण्याबाबत राज्यपालांनाही पत्र दिले आहे. अर्थात विद्यापीठाची जागा शासकीय असली, तरी विद्यापीठ व्यावसायिक कंपनीला जागा देऊ शकत नाही.



**अधिसभा सदस्यांचा विरोध**

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारावे, ग्रंथालय, उपाहारगृह किंवा शैक्षणिक कार्यक्रमांसाठीची व्यवस्था उभारण्यात यायला हवी. विद्यापीठ शैक्षणिक संस्था आहे. त्यामुळे विद्यापीठ संकुलातील जागेचा वापर विद्यार्थ्यांच्या हितासाठी, शैक्षणिक कामांसाठीच व्हायला हवा. व्यावसायिक उपक्रमांसाठी विद्यापीठाची जागा वापरणे चुकीचे आहे. सीएनजी पंप विद्यापीठाच्या जागेत उभारल्यास सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो, असे सांगत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी सीएनजी पंपाला जागा देण्यास विरोध दर्शवला आहे. वेळप्रसंगी या बाबत आंदोलनही करण्याची भूमिकाही अधिसभा सदस्यांनी घेतली आहे.

लोकसत्ता Thu, 07 January 2021 https://epaper.loksatta.com/c/

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा विद्यापीठात पुतळा उभा करा



**विश्रांतवाडी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, या मागणीसाठी भीम बटालियन संघटनेच्या वतीने कुलगुरूंना निवेदन देण्यात आले.

भीम बटालियन संघटनेच्या अध्यक्षा आम्रपाली धिवार म्हणाल्या, विद्येचे माहेरघर असणाऱ्या आपल्या पुण्यात देशातील मुलींची पहिली शाळा सुरू करण्यात आली, हे आपले भाग्य आहे. पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुलेंचे नाव देवून त्यांना सन्मान दिला, याबाबत महिलावर्गाकडून विद्यापीठाचे आभार मानते. परंतु, ज्यांचे नाव विद्यापीठाला आहे, अशा सावित्रीमाईंचा पूर्णाकृती पुतळा विद्यापीठ परिसरात नाही याची थोडी खंत वाटते. यामुळे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा पूर्णाकृती पुतळा त्यांच्या जीवनकथेसह उभारण्यात यावा ही मागणी संघटनेने केली आहे. लवकरात लवकर पुतळा न उभारल्यास संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

Kesari 8.1.2021

## दुर्मीळ चित्रठेव्याच्या जतनाची कार्यवाही सुरू

### पुरातत्त्व संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्या अध्यक्षतेखाली समिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दुर्मीळ चित्रठेव्याच्या जतन आणि संवर्धनासाठीची कार्यवाही सुरू केली आहे. राज्याच्या पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून, चित्रांचे शास्त्रीय पद्धतीने जतन आणि संवर्धन करण्यासाठी ही समिती काम करणार आहे.

'मराठेशाहीपासूनचा चित्रठेवा धूळ-बुरशीत खितपत' या वृत्ताद्वारे 'लोकसत्ता'ने विद्यापीठातील चित्रठेव्याची झालेली दुरवस्था उघडकीस आणली. या वृत्ताची दखल घेऊन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ऑनलाइन



बैठकीद्वारे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना मार्चपर्यंत चित्रांच्या जतनाचे काम पूर्ण करण्याची सूचना केली. त्यानुसार विद्यापीठाकडून चित्रठेव्याच्या जतन व संवर्धनासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त केली आहे. या समितीची पहिली बैठक गुरुवारी झाली. राज्याच्या पुरातत्त्व संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार आहे. 'दुर्मीळ चित्रांच्या जतन आणि संवर्धनासाठी आवश्यक ते निर्णय समिती घेणार आहे. चित्रांच्या जतनामध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता न राहण्याचे आदेश कुलगुरूंनी दिले आहेत,' असे डॉ. पवार यांनी सांगितले.

> चित्रांच्या जतन आणि संवर्धनासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीची पहिली बैठक झाली. आता पुरातत्त्व विभागाची समिती पुढील काही दिवसांत विद्यापीठातील चित्रांची तपासणी करून चित्रांच्या जतन आणि संवर्धनाच्या कामासाठी येणारा खर्च आणि लागणारा कालावधी या बाबतचा अहवाल सादर करेल.
>
> – डॉ. तेजस गर्गे, पुरातत्व संचालक

लोकसत्ता Fri, 15 January 2021
https://epaper.loksatta.com/c/57745045

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

## पर्यावरणासाठी ब्रिटिशांनी सुरू केलेले ग्रंथालय

महाराष्ट्र टाइम्स

माझे पुणे

Chaitrali.Chandorkar
@timesgroup.com
Tweet : @chaitralicMT

पुणे : महाराष्ट्र, तसेच पश्चिम घाटाच्या प्रेमात पडलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दीडशे वर्षांपूर्वी जंगले पिंजून काढली. रानावनात फिरून अनेक टिपणे काढली, पुस्तके लिहिली. येथील संशोधनावर आधारित जैववैविध्याचे 'डॉक्युमेंटेशन' केले. निसर्गसंपत्तीची गुपिते उलगडणाऱ्या या दुर्मीळ पुस्तकांसह आजच्या तरुण संशोधकांनी केलेल्या लेखनापर्यंतचा समग्र साहित्य ठेवा वन भवनाच्या वन ग्रंथालयाने जपला आहे.

निसर्गशास्त्रावर आधारित पुस्तकांना वाहिलेले राज्यातील वन विभागाचे हे एकमेव ग्रंथालय आहे. सेनापती बापट रस्त्यावरील पत्रकारनगरजवळ पुणे वन विभागाचे मुख्यालय आहे. याच इमारतीमध्ये वन ग्रंथालय आहे. काही वर्षांपूर्वी ते स्वारगेट भागातील 'पीएमपी'च्या इमारतीमध्ये छोट्याशा जागेत होते. वन भवनची इमारत उभी राहिल्यावर ग्रंथालयाला हक्काची जागा मिळाली.

वन विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि संशोधकांना एकाच ठिकाणी सर्व संशोधन अहवाल, नियतकालिके,

### ओळख संस्थांची

वने व वन्य प्राण्यांविषयी कायद्यावर आधारित पुस्तके उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने १९३९मध्ये मुंबईतील राज्याचे मुख्य वनसंरक्षक ए. सी. हेली यांनी पहिल्यांदा पुण्यामध्ये केंद्रीय वन ग्रंथालयाची स्थापना केली. तेव्हापासून हे ग्रंथालय वनाधिकारी आणि सर्वसामान्य नागरिकांना अखंड सेवा देत आहे. 'वन ग्रंथलायचामध्ये दीडशे वर्षे जुन्या दुर्मीळ ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यात आले आहे. यात ब्रिटिशांनी सुरू केलेल्या वेगवेगळ्या मासिकांसह शोधनिबंध, पुस्तके, खंड, नियतकालिके अशा १८ हजार पुस्तकांचा हा ठेवा आहे,' अशी माहिती सहायक वनसंरक्षक संजय कडू यांनी दिली.

'वनांशी निगडित सर्वाधिक पुस्तके असलेले राज्यातील हे एकमेव ठिकाण आहे. पुढील पिढीलादेखील या पुस्तकांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने गेल्या काही वर्षांपासून वन विभागाने दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशन सुरू केले. याशिवाय दुर्मीळ पुस्तकांचे प्रत्येक पान लॅमिनेट करण्यात आले आहे. सरकारी कार्यालयीन वेळेत हे ग्रंथालय सर्वांसाठी खुले आहे,' असे ग्रंथालयाच्या समन्वयक दया ढोमे यांनी सांगितले.

### ग्रंथालयातील संपदा

ब्रिटिशांनी १८७६मध्ये सुरू केलेले 'इंडियन फॉरेस्टर' हे सर्वांत जुने मासिक वन ग्रंथालयामध्ये आहे. या मासिकाच्या सर्व प्रती ग्रंथलयात आहेत. 'फॉना ऑफ ब्रिटिश इंडिया'चे २९ खंड, 'डिक्शनरी ऑफ इकॉनॉमी प्रॉक्डट ऑफ इंडिया'चे ३५ खंड, 'वेल्थ ऑफ इंडिया'चे ए टू झेड आणि 'इंडस्ट्रियल प्रॉडक्ट ऑफ इंडिया'चे खंड असा दुर्मीळ ठेवा जतन करण्यासाठी त्यांचे प्रत्येक पान लॅमिनेट करण्यात आले आहे. याशिवाय वन संवर्धनशास्त्र, वनौषधी, वनस्पतींचे वर्गीकरण, ब्रिटिशकालीन कायदे आणि धोरणे, परिसंवादातील मुद्दे, प्राणिशास्त्र, मत्स्यशास्त्र, तसेच शेतीविषयक पुस्तकांचा यात समावेश आहे.



"पुण्यातील वन ग्रंथालय राज्यातील वन विभागाचे एकमेव विभागीय ग्रंथालय आहे. यातील अनेक दुर्मीळ पुस्तके इतरत्र उपलब्ध नाहीत. राज्यातील वनाधिकाऱ्यांना संदर्भासाठी याचा उपयोग होतो. ग्रंथालयाची वेबसाइट आहे, मात्र ती केवळ वनाधिकाऱ्यांसाठी मर्यादित आहे. भारतीय वन सेवा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग अशा स्पर्धा परीक्षांना बसणारे विद्यार्थी आणि सर्वसामान्यांसाठी वन ग्रंथालय खुले आहे. अनेक नागरिक संदर्भासाठी ग्रंथालयामध्ये येतात, तिथे बसून टिपणे काढतात.

– सत्यजित गुजर, वनसंरक्षक, संशोधन विभाग

Maharashtra Times 21.1.2021

## नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २२ - विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नेताजी सुभाषचंद्र बोस यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती विविध कार्यक्रमांतून साजरी करण्याची सूचना देशभरातील विद्यापीठांना केली आहे. २३ जानेवारीपासून वर्षभर व्याख्याने, नेताजींसंदर्भातील लघुपट, माहितीपट, सायक्लथॉन, योगाथॉन असे क्रीडा उपक्रम आयोजित करण्याचे सूचित केले आहे.

देशातील तरुणांना प्रेरणा मिळण्यासाठी, त्यांच्यात देशभक्ती निर्माण होण्यासाठी केंद्र सरकारने नेताजींचा जन्मदिवस पराक्रम दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. नेताजींचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष २३ जानेवारी २०२१ ते २३ जानेवारी २०२२ दरम्यान साजरे होत आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीने नेताजींची जयंती विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांमध्ये साजरी करण्यासंदर्भातील परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

वर्षभर विविध कार्यक्रमांद्वारे नेताजींचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष साजरे करण्यात यावी. त्यादरम्यान कार्यक्रमांचे आयोजन करताना करोनासंदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. राबवलेल्या उपक्रमांची माहिती युनिव्हर्सिटी ॲक्टिव्हिटी पोर्टलवर अपलोड करण्याची सूचनाही 'यूजीसी'ने केल्या आहेत.

Prabhat 23.1.2021

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

लोकमत

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आर्थिक स्थिती बिघडली

## व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चिंता : विद्यापीठाच्या ठेवी निम्म्याने घटल्या

स्पेशल रिपोर्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' आणि राज्यातील सर्वात सधन विद्यापीठ अशी ओळख असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आर्थिक स्थिती चांगलीच बिघडली. विद्यापीठाकडील ६०० पैकी ३०० कोटींपर्यंत ठेवी कमी झाल्याची माहिती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत गुरुवारी समोर आली. पुढील काळात महाविद्यालय यांच्या विकासकामांना कात्री लावावी लागणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाचे उत्पन्न कमी झाले आहे. विद्यापीठाच्या ठेवींवर मिळणाऱ्या व्याजातही घट झाली. तसेच विद्यापीठाचा खर्च आणि मिळणारे उत्पन्न यांचे प्रमाण यात मोठी तफावत निर्माण झाली.

एकूणच विद्यापीठाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर विद्यापीठाच्या ठेवी निम्म्याने घटल्याचे गुरुवारी झालेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दिसून आले. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. तसेच विद्यापीठाने यापुढील काळात खर्चात काटकसर करावी.

उत्पन्नवाढीसाठी नवीन स्रोत तयार करावेत. त्यासाठी विद्यापीठाचे क्रीडांगण, क्रीडांगणातील अत्याधुनिक सुविधा, संशोधन प्रकल्प, अभ्यागत निवास, जॉगिंग पार्क, प्रयोगशाळा आदींचा वापर करावा, अशा सूचना व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी दिल्या.



### संशोधनासाठी निधी कमी पडू देऊ नका

१ विद्यापीठाचे उत्पन्न घटल्याने यापुढे संलग्न महाविद्यालयांच्या विकासकामांच्या खर्चांना कात्री लावावी. मात्र, विद्यार्थी हितासाठी आणि संशोधनासाठी निधी कमी पडणार नाही याची काळजी घ्यावी, असेही निर्देश व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिले.

२ विद्यापीठाच्या नाशिक येथील उपकेंद्राच्या बांधकामास परवानगी दिली. मात्र, निधी घटल्याने विद्यापीठाच्या अहमदनगर व नाशिक येथील उपकेंद्राच्या विकासकामांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अनेक वर्षांपासून विद्यापीठाचा तुटीचा अर्थसंकल्प सादर केला जात आहे. तसेच विद्यापीठाच्या उत्पन्नात घट होत असून, खर्चात वाढ होत आहे. विद्यापीठाच्या ठेवी घटल्याने गुरुवारी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली.

**- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

### विद्यापीठाने नवीन स्त्रोत निर्माण करावेत



विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी विद्यापीठाने देश विदेशातील माजी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून निधी उभा करावा. त्यासाठी स्वतंत्र पोर्टल निर्माण करावे. विद्यापीठाच्या ठेवीतून मिळणारे व्याज ५० वरून २५ कोटींपर्यंत आले आहे. तसेच विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ६० कोटी रुपये खर्च होत आहे. त्यामुळे विद्यापीठाने उत्पन्नाचे नवनवीन स्त्रोत निर्माण करावेत.

**- राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 2 Jan 29, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

## करोनामुळे पुणे विद्यापीठाचे बजेट कोलमडले

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - करोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा खर्च आणि मिळणारे उत्पन्न यांच्यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. त्यातच विद्यापीठाकडील ६०० कोटींच्या ठेवी ३०० कोटींपर्यंत कमी झाल्याचे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे एकूणच करोनामुळे विद्यापीठाची आर्थिक घडी विस्कटल्याचे स्पष्ट होत आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यात विद्यापीठाच्या ठेवी निम्म्याने घटल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यापीठाला आता यापुढील काळात खर्चात काटकसर करावी. उत्पन्न वाढीसाठी नवीन स्रोत तयार करावेत, अशा सूचना



व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी दिल्या.

दरम्यान, विद्यापीठाचे उत्पन्न घटल्याने यापुढे संलग्न महाविद्यालयांच्या विकास कामांच्या खर्चांना कात्री लावावी. मात्र, विद्यार्थी हितासाठी आणि संशोधनासाठी निधी कमी पडणार नाही याची काळजी घ्यावी, ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी निदर्शनास आणून दिली. तथापि, विद्यापीठाच्या उत्पन्नात घट होत असून, खर्च वाढत आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाच्या विकास कामांना कात्री लागणार असल्याचे दिसून येत आहे.

प्रभात Sat, 30 January 2021 https://epaper.eprabhat.net/c/58(

---

**लोकमत**

ठेवी मोडण्याची पाळी : विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या जागा भरल्या

## शिक्षकांच्या रिक्त जागा भरल्याने विद्यापीठावर ६० कोटींचा बोजा

सुपर एक्सक्लुजिव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या आणि प्रशासकीय कार्यालयांतील अधिकारी व शिक्षकांच्या रिक्त जागांवर विद्यापीठ फंडातून भरलेल्या पदांमुळे विद्यापीठाच्या तिजोरीवर दरवर्षी तब्बल ६० कोटींचा ताण येत आहे. त्यातच विद्यापीठात नव्याने स्थापन केलेल्या कंपन्यांच्या उभारणीसाठी लागणारे भांडवल ठेवी मोडून उभे करावे लागले, अशा विविध कारणांमुळे विद्यापीठाच्या ठेवी निम्म्याने घटल्याचे बोलले जात आहे.

पुढील काळात विद्यापीठाने उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने विविध उपाययोजना कराव्यात,अशा सूचना व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला केल्या.केवळ कोरोनामुळेच विद्यापीठाच्या ठेवी घटल्या नाहीत तर त्याला इतरही कारणे आहेत. त्यात विद्यापीठ फंडातून नियुक्त केलेले कर्मचारी,सुमारे पंधरा वर्षांपासून अभ्यासक्रम व परीक्षा शुल्कात न केलीली वाढ,नव्याने स्थापन करण्यात आलेल्या कंपन्या आदी बाबींचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या मंजूर पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या पदावर शासनाकडून भरती करण्यास मंजूरी मिळत नाही. विद्यापीठातील इंग्रजी, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र विभाग आदी विभागांमध्ये केवळ एक किंवा दोन प्राध्यापक शासनाने मंजूर केलेल्या पदावर कार्यरत आहेत. एवढ्या कमी प्राध्यापकांवर विभाग चालवणे शक्य होत नाही. त्यामुळे गेल्या काही वर्षात विद्यापीठ फंडातून अनेक पदे भरण्यात आली आहे. केवळ प्राध्यापकांचीच नाही तर शिक्षकेतर कर्मचा-यांची पदेही फंडातून भरली गेली. मात्र, त्यातील काही पदे अनावश्यक असल्याची चर्चा सातत्याने विद्यापीठ वर्तुळात केली जाते. विद्यापीठाच्या बिघडलेल्या आर्थिक स्थितीत आता विद्यापीठ प्रशासन या पदांना मुदतवाढ देणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### उत्पन्नात घट होत गली अन् खर्चात वाढ झाली...

विद्यापीठाने अनेक वर्षांपासून अभ्यासक्रमाच्या शुल्कात वाढ केली नाही. यंदा अनेक महाविद्यालयांनी अभ्यासक्रमांचे नुतनीकरण केले नाही.'प्रोरेटा'शुल्क जमा केले नाही. त्याचप्रमाणे कोरोनामुळे शासनाने विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात सवलत दिल्यामुळे विद्यापीठाच्या तिजोरीत रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे गेल्या काही वर्षात विद्यापीठाच्या उत्पन्नात घट होत गेली आणि खर्चात वाढ होत राहिली. मात्र, आता विद्यापीठाला यापुढील काळात खर्चाचा आणि उत्पन्न वाढीचा ताळमेळ घालावा लागेल,असे शिक्षणतज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.



Hello Pune
Page No. 1 Jan 31, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During January 2021*

Section: Miscellaneous

# स्वरभास्कराच्या जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रम

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे माजी विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठाशी पुन्हा जोडण्यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

## माजी विद्यार्थ्यांसाठी वेबपोर्टल निर्मिती; विद्यापीठातर्फे निर्णय

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी बैठक झाली. त्यामध्ये विविध अभ्यासक्रमांना मान्यता देण्यासोबतच प्रशासकीय निर्णय घेण्यात आले. यासोबतच अर्थसंकल्प व विविध प्रशासकीय विषयांवर चर्चा झाली. विद्यापीठातील भीमसेन जोशी अध्यासन आणि ललित कला केंद्राच्या माध्यमातून कार्यक्रम करण्याचा व्यवस्थापन परिषदेने ठराव केला. २०२१-२२ हे पंडित भीमसेन जोशी यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने यंदा विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा ठराव व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी मांडला.

या ठरावावर चर्चा होऊन वर्षभरात कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पुणे विद्यापीठातील भीमसेन जोशी अध्यासन आणि ललित कला केंद्राच्या माध्यमातून पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध उपक्रम राबवता येऊ शकतात. या कार्यक्रमांतून पं. भीमसेन जोशी यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाला अभिवादन करण्यात येईल. या कार्यक्रमांचे नियोजन येत्या काळात केले जाईल. त्यातून विद्यार्थ्यांना कला सादरीकरणाची संधी मिळणार आहे, असे पांडे यांनी सांगितले. पुणे विद्यापीठाचे माजी विद्यार्थी जगभरात विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. या विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी विविध क्षेत्रांसाठी जोडण्यासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्याचाही ठराव मांडण्यात आला. या ठरावालाही मान्यता देण्यात आली. त्यामुळे आगामी काळात माजी विद्यार्थ्यांसाठी वेबसाइट निर्माण करण्यात येणार आहे, असे पांडे यांनी सांगितले.

Maharashtra Times 31.1.2021




**दुःखद बातमी:**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसयटीचे माजी सचिव व मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे -५ चे माजी उपप्राचार्य प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांचे दिनांक २१. ०१. २०२१ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही परमेश्वर चरणी प्रार्थना...! आपण सर्वजण त्यांच्या व कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.






## प्रा. जगदीश चिंचोरे यांचे निधन

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे माजी सचिव व मॉडर्न महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांचे गुरुवारी निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रगतीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. चिंचारे हे १९७७ पासून मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांनी 'कनिष्ठ महाविद्यालयाचे वरिष्ठ महाविद्यालयाशी जोडावीत की नाही' या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून पीएचडी पदवी संपादन केली. प्रो. ए. सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणून ते कार्यरत होते.

Kesari 22.1.2021



## जगदीश चिंचोरे यांचे पुण्यात निधन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे माजी सचिव व शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांचे गुरुवारी (२१ जानेवारी) सायंकाळी निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे आहेत.

त्यांच्या पार्थिवावर आज, शुक्रवारी सकाळी अंत्यसंस्कार होणार आहेत. न्यूमोनियामुळे त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृतीतील गुंतागुंतीमुळे अवयव निकामी होत जाऊन त्यांची प्राणज्योत मालवली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संस्थेतर्फे आज, शुक्रवारी दुपारी चार वाजता संस्थेच्या सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

इयत्ता अकरावीसाठीच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे समन्वयक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. इंग्रजीचे प्राध्यापक असलेले प्रा. डॉ. चिंचोरे यांना कला, क्रीडा, साहित्यातही रुची होती. उच्च शिक्षणासंदर्भात, प्रवेशप्रक्रियांबाबत ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. विविध क्षेत्रांतील शैक्षणिक व करिअर संधींबाबत ते सातत्याने लिखाण करीत. निवृत्तीनंतर त्यांनी 'करिअर कौन्सेलिंग'ही केले. कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयांशी जोडावीत की नाही, या विषयावर त्यांनी पीएचडी केली होती.



Maharashtra Times 22.1.2021




## डॉ. जगदीश चिंचोरे यांचे निधन

**पुणे:** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे माजी सचिव, शिवाजीनगरच्या मॉडर्न महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. जगदीश चिंचोरे (वय ६७) यांचे खासगी रुग्णालयात गुरुवारी निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी (२२ जानेवारी) सकाळी आठ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होतील. त्यांच्या मागे पत्नी, मुलगी, मुलगा, सून, जावई असा परिवार आहे.

मॉडर्न महाविद्यालयाचे १९७८ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाल्यावर चिंचोरे रूजू झाले, तर २०११ मध्ये उपप्राचार्य म्हणून निवृत्त झाले.

epaper.loksatta.com
लोकसत्ता Fri, 22 Jan https://epa

पुढारी

## डॉ. जगदीश चिंचोरे यांचे निधन



**पुणे :** मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांचे (वय ६७) गुरुवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. चिंचोरे १९७७ पासून मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते. शिक्षक असताना त्यांनी 'कनिष्ठ महविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयाशी जोडावीत की नाही' या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून पीएचडी पदवी संपादन केली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणून ते कार्यरत होते.

My Pune Edition
Jan 22, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## मॉडर्न कॉलेजचे माजी उपप्राचार्य प्रा. जगदीश चिंचोरे यांचे निधन



**पुणे, दि. २२ -** शिवाजीनगर येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांचे (वय ६७) गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रगतीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. चिंचोरे हे १९७७ पासून मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते. शिक्षक असताना त्यांनी 'कनिष्ठ महविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयाशी जोडावीत की नाही' या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणून ते कार्यरत होते.

प्रभात Sat, 23 January 2021 https://epaper.eprabhat.net/c/57935

» प्रासंगिक

# विद्यार्थिप्रिय प्राध्यापक

**अशोक धिवरे,**
**पोलिस महासंचालक (निवृत्त)**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सचिव आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक जगदीश चिंचोरे यांचे पुणे येथे नुकतेच निधन झाले. नाशिक जिल्ह्यातील डांगसौन्दाणे या अतिदुर्गम भागात जन्मलेल्या चिंचोरे यांचा पुण्यातल्या नावाजलेल्या संस्थेच्या सचिवपदापर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे.



जगदीश चिंचोरे

लहानपणीच गांधीवादी, स्वातंत्र्य सेनानी वडिलांच्या कडक शिस्त आणि प्रेमळ देखरेखीखाली वाढलेला. माणसाची ओळख फक्त माणूस म्हणूनच असते, त्याला जाती धर्माच्या कप्प्यात बसवता येत नाही याविचारांचे रोपण त्याच्या मनावर त्याच्या वडिलांनी केलं होत. ते त्याने अखेरपर्यंत अंगीकारले आणि निभावलेही. शैक्षणिक कामावरील त्याची निष्ठा आणि काम करण्याची तयारी पाहून संस्थेने त्याच्यावर सचिव पदाची जबाबदारी सोपवली. ती त्याने समर्थपणे पेलली. सरकारी तसेच बिगरसरकारी क्षेत्रात त्याने जपलेल्या मैत्रीचा संस्थेला खूप उपयोग झाला. त्यामुळे विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संस्थेला जगदीशचा मोठा आधार होता. शैक्षणिक क्षेत्रापुढील समस्या व त्यावरील उपाय यावर तो सतत चिंतन करत असे. त्यातूनच धोरणात्मक दृष्ट्या दिशादर्शक ठरणाऱ्या शोध निबंधाचे लिखाण त्याच्या हातून घडले. कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालये ही संलग्न असली पाहिजेत, असा मूलभूत विचार त्याने आपल्या शोधनिबंधांमध्ये मांडला. शालेय शिक्षण हाच उच्च शिक्षणाचा पाया असतो, ही त्याची ठाम धारणा होती. त्यामुळेच मॉडर्न शिशू विद्या मंदिराची जबाबदारी संस्थेने त्यांच्यावर सोपवली. या शाळेचा नावलौकिक वाढवण्यात त्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे समजले जाते.

शैक्षणिक सुधारणांबद्दल आग्रही असणारा जगदीश विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबतीतही तेवढाच आग्रही होता. याच आग्रहामुळे फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रकाश पवार, आदिवासी चळवळीमध्ये काम करणारे किशोर ढमाले आणि प्रतिमा परदेशी हे दांपत्य, मराठी चित्रपट दिग्दर्शक परेश मोकाशी, गायक त्यागराज खाडिलकर, नाटककार गगनविहारी बोराटे यासारखे विद्यार्थी घडले. त्याच्या अकाली निधनाने शिक्षक, विद्यार्थी यांच्या सुधारणेबद्दल आग्रही असणाऱ्या मित्राला आपण कायमचे मुकलो.

Sakaal 2.2.2021




# विद्यार्थीप्रिय जाणता शिक्षक

**प्रा. जगदीश चिंचोरे यांचे गुरुवार, २१ जानेवारी २०१२ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मृती जागविणारा हा लेख...**



**डॉ. पद्माकर पंडित**

अनेकांचे परममित्र प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे यांचे २१ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी एका खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात निधन झाले. त्यांची प्रकृती बिघडणे, खालावणे आणि त्यांचे जाणे, या सर्व गोष्टी अकस्मात आणि विलक्षण वेगाने घडल्या. अगदी आत्ता होते आणि बघता बघता गेले, अशी परिस्थिती झाली. दम्याचा आजार असल्याने करोनाकाळात त्यांनी सूचनांची लक्ष्मणरेषा कसोशीने पाळली. अत्यावश्यक कामांशिवाय घराबाहेरसुद्धा ते गेले नाहीत. मात्र, साथीचा भर ओसरत असतानाच त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यातच त्यांची जीवनज्योत मालवली. साहजिकच त्यांचे आप्तेष्ट, विद्यार्थी, मित्रपरिवार व समाजबांधवांना मोठा धक्का बसला. इंग्रजीचे अध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक-समुपदेशक, ज्ञातिसमूहाचे मार्गदर्शक, शिक्षणातील वाचस्पती म्हणून ते लोकप्रिय होतेच; पण त्यांच्यातील माणुसकी असामान्य होती. कुणालाही, कधीही, कसलीही मदत निःस्वार्थीपणे करण्याची त्यांची वृत्ती समोरच्याला जिंकणारी होती. मलाही त्यांचे वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभत असे. आमची गाढ मैत्री आणि घरोबा पाच दशकांचा होता. माझ्यासारखेच अनेकांचे ते बंधुतुल्य स्नेही होते. प्रसन्न, आश्वासक व्यक्तिमत्त्व व आत्मीयतेने ऐकून घेण्याची सवय हा त्यांचा स्थायी भाव होता. त्यामुळे कोणत्याही कारणाने त्यांना भेटणाऱ्या माणसांना त्यांच्या भेटीने हायसे वाटत असे.

त्यांच्याकडून प्रेरणा घेऊनच मी प्राध्यापक व्हायचे ठरवले होते, त्यांच्यापैकी ते एक होते. शिक्षक म्हणून मी त्यांच्यातील ज्या काही बाबी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला, त्यांचा उल्लेख या श्रद्धांजलीत करायलाच हवा. आजकालच्या गुरुशिष्यांसाठी ती पर्वणीच ठरावी. जगदीशराव अध्यापक झाले, तेव्हा मी एमबीबीएस करीत होतो. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून मीही प्राध्यापक झालो. त्यांच्याकडून शिकलेली पहिली गोष्ट म्हणजे 'अभेद'. आपल्याकडे येणाऱ्या विद्यार्थी, रुग्ण वा कुणाचीही धर्म, जात, आर्थिक स्थिती, रंगरूप वगैरे काहीही न पाहता त्याला सांभाळणे, समजावणे व त्याच्यात सुधारणा घडवणे, ही त्यांची खासियत होती. हे काम ते अत्यंत निरलसतेने करीत. शंभर टक्के पारदर्शकता हा त्यांचा मला भावलेला आणखी एक गुण होय.

**निमित्त**

मी त्यांचा नियमित वैद्यकीय सल्लागार नव्हतो, तरीही ते मला बरेच वेळा प्रकृतीविषयी विचारत असत. जेव्हा काही तातडीची समस्या निर्माण होत असे, त्या वेळी ते आवर्जून माझ्याशी बोलत. या वेळी मात्र, त्यांचा फोन आला नाही. ही खंत माझ्या मनात कायम राहणार. स्वतःच्या पायांनी चालत ते रुग्णालयात गेले. तिथे त्यांचा आजार अचानक वाढला आणि त्यांना अतिदक्षता विभागात हलविण्यात आले. त्या वेळी मला त्यांच्या कन्येचा कल्याणीचा फोन आला. मी त्वरित रुग्णालय गाठले. ते अत्यवस्थ होते. फारसे काही करण्यासारखे नव्हते, तरीही शर्थीचे प्रयत्न केले. गुंतागुंत वाढतच होती. फुप्फुसातील जंतुसंसर्ग रक्तात पसरला होता. रक्तादाब कमालीचा खालावला. त्यामुळे महत्त्वाच्या अवयवांना फार कमी रक्तपुरवठा झाला. त्यामुळे त्या अवयवांचे कार्य मंदावले. प्रकृती खालावत गेली आणि एका क्षणी त्यांची प्राणज्योत मालवली. खरे तर त्यांनी अजून खूप जगायला हवे होते. त्यांच्यातील दुर्मीळ गुण नव्या पिढीतील शिक्षकांच्या अंगी बाणविण्याच्या कामी त्यांचे मार्गदर्शन सर्वांनाच फार उपयुक्त ठरले असते. आपण सगळ्यांनी मिळून असे अध्यापक घडविणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

Maharashtra Times
29.1.2021

# Upcoming Events

## February 2021

| Sun | Mon | Tue | We | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 Sant Sevalal Maharaj Jayanti  | 16 | 17 | 18 | 19 Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti  | 20 |
| 21 | 22 | 23 Sant Gadgebaba Maharaj Jayanti  | 24 | 25 | 26 | 27 Sant Ravidas Maharaj Jayanti  |
| 28 | | | | | | |

Image Courtesy: Google Images




*Other than the College Photos, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*